**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

Proceedings of

One Day Interdisciplinary National Level Conference

On

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**15 March 2020 , Special Issue 28 , Vol. 1**

**Sponsored by**

**University Grants Commission, New Delhi**

**Organized by**

**Gandhian Studies Centre**

**(Established Under the UGC Scheme of**
**EPOCH Making Social Thinkers of India-XII$^{th}$ Plan)**

**SHIVAJI COLLEGE, HINGOLI**

**Tq/Dist- Hingoli- 431513 (MS)**

**Shaurya Offset , Latur**

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

(Special Issue 28 (March-2020) Vol- 1 )

*Guide*
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

***Chief Editor***
**Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar**
**Director, Gandhian Studies Centre**
**Shivaji College, Hingoli (MS)**

***Editor***
**Dr. Kishor N. Ingole**
**Department of English**
**Shivaji College, Hingoli (MS)**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# Message

I congratulate the organizers of the One Day Interdisciplinary National Level Conference on **"Relevance of Mahatma Gandhi in Today's World"** held on 15 March 2020 organized by Gandhian Studies Centre and sponsored by University Grants Commission, New Delhi in Shivaji College, Hingoli. Tq/Dist. Hingoli. It is a very good academic event and I am sure the deliberations, the scholarly arguments and the interactions of the academicians and research scholars in the conference will bear fruit.

I believe that the conference would provide a platform to the researchers to get innovative ideas for making worthy contributions. I am highly appreciation the very idea of this conference as it will give a big academic treat to the faculty of Humanities and Social Sciences. The present conference is an attempt to explore the ideas of Mahatma Gandhi who was a 'man of millennium' who imparts the lesson of truth, Non-violence and peace. The philosophy of Gandhiji was based on truth, truth, sacrifice, non-violence, simplicity, selfless service and cooperation.

I congratulate one and all involved with organization of this One Day Interdisciplinary National Conference and wish the conference a grand success.

With the Best Wishes….

Thank You.

**Hon. Shri. Shivajirao Eknathrao Pawar, Founder**
**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Hingoli**
**Ex-Education Officer Z. P. Hingoli**

# Principal's Desk……

The college is affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded. The affiliating university has been playing the vital role in the curriculum design and the enhancement of the affiliated colleges as per the UGC norms. This college was established in 1998 in Hingoli Dist. Hingoli. The college is run by Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Hingoli, Dist. Hingoli. The college has been organizing various curricular, co-curricular and extra-curricular activities. I am immensely happy that the Gandhian Studies Centre of our college is organizing One Day Interdisciplinary National Conference on **"Relevance of Mahatma Gandhi in Today's World"** held on 15 March 2020 organized by the Gandhian Studies Centre and sponsored by University Grants Commission, New Delhi.

Shivaji College, Hingoli has borne the mantle of excellence, committed to ensure the students their own space to learn, grow and broaden their horizon of knowledge by including into diverse spheres of learning. In our endeavor to raise the standards of discourse, we continue to remain aware in order to meet with the changing needs of our stakeholders. I would like to thank ……for providing us with the platform for publication.

The aim of this conference is to bring different ideologies under one roof and provide opportunities to exchange ideas face to face, to establish research relations and to find global partners for future collaborations. The theme and the sub-themes for this conference are indicative of relevant research areas to give the prospective authors innovative prepositions about the ambit of discussion. Mohandas Karamchand Gandhi well known as Mahatma Gandhi is famous in our country and abroad for his valuable thoughts of each and every field of life. He touched all spheres of life like political, social, religious, economic, moral, ethical and educational. I believe that this conference will act a medium for all of us present here to ponder upon the topic of discuss, challenge us to strive towards it and improve at the same time.

I express my sincere gratitude to UGC, our sponsors for having been very generous in contributing its share in the process of organizing this event. I whole-heartily appreciate the sustained and the relentless efforts put in by the entire faculty in general and the Gandhian Studies Centre in particular, the non-teaching staff and the students of the institution in guiding this all important event to see the light of the day.

I express my sincere gratitude to those who have directly or indirectly contributed to making this event a grand success. The deliberations and scholarly arguments in this conference, I wish, will teach us with power, conviction and feeling.

Once again I wish the conference a grand success.

**Dr. B. G. Gaikwad, Principal**
**Shivaji College, Hingoli Tq/Dist. Hingoli**

# Foreword

It is the deep satisfaction that I write this foreword to the research journal of One Day Interdisciplinary National Conference on **“Relevance of Mahatma Gandhi in Today’s World”** held on 15 March 2020 organized by the Gandhian Studies Centre and sponsored by University Grants Commission, New Delhi.

The conference particularly encouraged the interaction of research students and developing academies with the more established academic community in an informal setting to present and to discuss new and current work. This contribution helped to make the conference as outstanding as it has been. More than 262 research papers are contributed by the eminent participates in four languages i.e. Marathi, English, Hindi and Urdu.

In this conference our main aim is to promote research scholars for their views on the themes and the sub-themes of the conference. Mahatma Gandhi was a great dreamer of dreams. His vision of a new India free from foreign rule is embodied in his literature. Gandhiji’s ideas of truth and non-violence are not only confined to ‘Hind Swaraj’ but also spread over many decades in the course of his unrelenting struggle for attaining the freedom of India.

This academic event is being conducted with the financial assistance from University Grants Commission, New Delhi. I am glad that Gandhian Studies Centre is also bringing out a research journal of the conference that includes invited talks of the resource persons and the contributions of the participants. My sincere thanks and appreciation are due to the staff members for taking great-efforts in organizing this event and making it a grand success.

Dear friends I tried my level best to edit these research papers as per my knowledge. I believe that this research journal will fulfill your expectations. If there is any drawback or any technical mistake in the editing I hope that your suggestions and good wishes will help me for my future works.

Thank you…

**Dr. Balasaheb S. Kshirsagar**
**Chief Editor and Convener**

# Index

**महात्मा मोहनदास करमचंद गांधी आणि स्वामी रामानंद तीर्थ**
**डॉ. अनिल कठारे**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा मोहनदास करमचंद गांधी आणि स्वामी रामानंद तीर्थ

**डॉ. अनिल कठारे**

प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदव्युत्तर इतिहास विभाग, श्री शिवाजी कॉलेज, कंधार जि. नांदेड

---

**प्रस्तावना**

महात्मा मोहनदास करमचंद गांधी हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे नेते होते. त्यांच्याच नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय चळवळ यशस्वी होऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश ब्रिटिश सत्तेच्या राजकीय गुलामगिरीतून स्वतंत्र झाला. स्वामी रामानंद तीर्थ हे हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेते होते. त्यांनी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली निजाम सरकारच्या विरोधात आंदोलन करून हैद्राबाद राज्य भारतीय संघ राज्यात विलीन करून घेतले. एवढेच नव्हे तर स्वामी रामानंद तीर्थ हे महात्मा गांधीजींच्या मार्गदर्शनानुसारच हैद्राबाद राज्यात निजाम सरकारच्या विरोधात कार्य करीत होते. या दोन नेत्यामधील संबंधाचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्र परिषद :**

हैद्राबाद राज्यात कर्नाटक, तेलंगण आणि मराठवाडा हे तीन प्रादेशिक विभाग होते. मराठवाडा या प्रादेशिक विभागात इ.स. १९३७ साली महाराष्ट्र परिषद ही संघटना स्थापन झाली. यासाठी केशवराव कोरटकर, काशीनाथराव वैद्य, एकनाथराव कुलकर्णी, अनंत भालेराव, रा.गो. परांजपे, गोविंदभाई श्राफ, वामनराव रामचंद्र नाईक, माणिकचंद पहाडे, दिगंबरराव बिंदू, पुरूषोत्तम चपळगावकर, विठ्ठल रंगनाथ देशपांडे, रामचंद्रराव अंतु, लक्ष्मणराव गानु व लक्ष्मणराव फाटक[१] यांचे प्रयत्न कामी आले. महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन जालना जिल्ह्यातील परतूर येथे[२] १ जून १९३७ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष परभणीचे वकील गोविंदराव उर्फ दाजीसाहेब नानल हे होते. तर केंधळी येथील गोविंदराव घारे हे स्वागताध्यक्ष होते. या अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ यांनी सहभाग घेतला होता.परंतु या अधिवेशनात कुठेही काहीही बोलले नाहीत. दुसरे अधिवेशन १ व २ जून १९३८ रोजी लातूर[३] येथे झाले. याही अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ यांनी सहभाग घेतला होता. या अधिवेशनात ते महाराष्ट्र परिषदेचे सरचिटणीस झाले होते. महाराष्ट्र परिषदेची यापुढील अधिवेशने नांदेड जिल्ह्यातील उमरी, औरंगाबाद, परभणी जिल्ह्यातील सेलू आणि पून्हा लातूर येथे झाली. महाराष्ट्र परिषदेत कार्य करीत असताना स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासमोर महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचा आदर्श व प्रेरणा होती.

**हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस :**

हैद्राबाद राज्यात कर्नाटक, तेलंगण व मराठवाडा या तीन प्रादेशिक विभागात अनुक्रमे कर्नाटक परिषद, आंध्र महासभा व महाराष्ट्र परिषद या तीन स्वतंत्र संघटना कार्यरत होत्या. हैद्राबाद राज्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रीय स्वरूपाची राजकीय संघटना अस्तित्वात नव्हती. तशी संघटना असावी असे राज्यातील पुढाऱ्यांना वाटत होते. यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्राफ, दिगंबरराव बिंदु आणि आनंद कृष्ण वाघमारे यांचा समावेश होता. यांच्याच प्रयत्नाने इ.स. १९३७ मध्ये कर्नाटक परिषद, आंध्र महासभा व महाराष्ट्र परिषदेचे एकीकरण[४] झाले. २९ जून १९३८ रोजी हैद्राबाद शहरातील मवाळ नेत्यांनी बैठक घेऊन हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची स्थापना केली. परंतु या स्थापनेवरच निजाम सरकारने बंदी घातली. त्यामुळे मवाळ नेत्यांचे धाबे दणाणले व स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्व याचवेळी पुढे आले.

**हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी, महात्मा गांधीजी व स्वामीजी :**

२९ जून १९३८ रोजी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसची[५] स्थापना झाली. कॉंग्रेसची स्थापना करीत असताना मवाळ नेत्यांनी जहाल विचारसरणीचे नेते स्वामी रामानंद तीर्थ, आनंद कृष्ण वाघमारे, दिगंबरराव बिंदू व गोविंदभाई श्राफ यांना बाजूला सारले होते. परंतु सरकारने कॉंग्रेसच्या स्थापनेवर बंदी घातल्यामुळे बंदी उठविण्यासाठी त्यांच्यात निजाम सरकारच्या विरोधात संघर्ष करण्याचे धाडस नव्हते. याचवेळी स्वामी रामानंद तीर्थ हे समोर आले आणि त्यांनी मवाळ नेत्यांना इशारा दिला की, कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी सरकारच्या विरोधात सत्याग्रह करा नसता खुर्च्या खाली करा. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस स्वामी रामानंद तीर्थ यांच्या ताब्यात आल्यानंतर कॉंग्रेसवरील बंदी सरकारने उठवावी यासाठी काय करता येईल या संदर्भात त्यांनी महात्मा मो.क. गांधी यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन घेतले. हैद्राबाद सरकारचे म्हणणे असे होते की, कॉंग्रेस[६] हा शब्द वगळत असतील तर संघटनेच्या स्थापनेवरील बंदी उठविण्यात येईल. स्वामीजींनी सरकारचे हे म्हणणे महात्मा मो.क. गांधी यांच्या पुढे सादर केले. महात्मा मो.क. गांधी यांनी स्वामी रामानंद तीर्थ व इतर जहाल[७] नेत्याशी चर्चा करून संघटनेच्या नावातील कॉंग्रेस हा शब्द वगळायचा नाही अशी भूमिका घेतली. या संदर्भात सत्याग्रह करावा लागला तरी चालेल असे महात्मा मो.क. गांधी यांनी स्पष्ट मत नोंदविले.

**हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांनी काय करता येईल या संदर्भात महात्मा मो.क. गांधी यांच्याशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन घेतले. त्यावेळी महात्मा मो.क. गांधी यांनी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविण्यासाठी निजाम सरकारच्या विरोधात सत्याग्रह करावा असे स्वामीजींना मार्गदर्शन केले. त्यानुसार स्वामीजींनी परभणीचे गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली एक स्टेट कॉंग्रेसची कार्यकारीणी व कृती समिती[८] स्थापन केली. एच. रामकिशन धुत हे कृती समितीचे सरचिटणीस तर रवि नारायण रेड्डी, श्रीनिवासराव

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

बोरीकर व जनार्दनराव देसाई हे कृती समितीचे सदस्य होते. या कृतीसमितीने "हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवावी, जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणावी व जनतेला राजकीय स्वातंत्र्य देण्यात यावे"[९] या मागणीसाठी निजाम सरकारच्या विरोधात २४ ऑक्टोबर १९३८ रोजी अहिंसक मार्गाने सत्याग्रह[१०] सुरू केला. हा सत्याग्रह २४ डिसेंबर १९३८ पर्यंत चालू होता. शेवटी महात्मा मो.क. गांधी यांच्याच आदेशानुसार[११] हा सत्याग्रह २४ डिसेंबर १९३८ रोजी स्थगित करण्यात आला. या सत्याग्रहामुळे निजाम सरकार चांगलेच अडचणीत आले होते.

**वंदे मातरम् सत्याग्रह, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

इ.स.१९३८ हे वर्ष हैद्राबाद राज्यात संघर्षाचे वर्ष म्हणून मानले जाते. कारण याच वर्षात निजाम सरकारच्या विरोधात हैद्राबाद हिंदू महासभा, आर्य समाज आणि हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने सत्याग्रह सुरू केले होते. तसेच याच वर्षात हैद्राबाद राज्यात हिंदू विद्यार्थ्यांनी निजाम सरकारच्या विरोधात वंदे मातरम चळवळ अर्थात सत्याग्रह सुरू केला होता. वंदे मातरम सत्याग्रहाची सुरूवात मराठवाड्यातील औरंगाबाद येथून झाली होती. गोविंदभाई श्राफ हे या चळवळीचे उद्गाते मानले जातात. मराठवाड्यातील पुढारी महात्मा मो.क. गांधी यांच्या विचाराने प्रभावीत झालेले होते. त्यांनी व स्वामी रामानंद तीर्थ यांनी महात्मा मो.क. गांधी यांची भेट घेऊन हैद्राबाद राज्यातील राजकारण चळवळ आणि सत्याग्रहाबाबत मार्गदर्शन घेतले व त्यांच्या मार्गदर्शनानुसारच राज्यात सत्याग्रह केले. राज्यात वंदे मातरम् हे गीत म्हणण्यास सरकारने बंदी घातल्यामुळे सरकारच्या विरोधात विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् सत्याग्रह सुरू केला. औरंगाबाद येथून सुरू झालेली वंदे मातरम चळवळ राज्यात पसरली. विद्यार्थ्यांनी शाळा, कॉलेज व विद्यापीठावर बहिष्कार घातला. वंदे मातरम् या चळवळीस महात्मा मो.क. गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि विनायक दामोदर सावरकर[१२] यांनी पाठींबा दिला. सरकारने चळवळ दडपण्यासाठी ५०० विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढून टाकले. अशा विद्यार्थ्यांना पुढे राष्ट्रीय शाळांमध्ये प्रवेश देण्यात आले. अशावेळी महात्मा मो.क. गांधी यांनी सरकारला ठणकावून सांगितले की, वंदे मातरम गीत गाण्याचा व म्हणण्याचा[१३] विद्यार्थ्यांना संपूर्ण अधिकार आहे. स्वामी रामानंद तीर्थ यांनीही या चळवळीस पाठींबा दिलेला होता.

**वैयक्तिक सत्याग्रह, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

स्वामी रामानंद तीर्थ हे महात्मा मो.क. गांधी यांच्या विचार व मार्गदर्शनानुसारच हैद्राबाद राज्यात सरकारच्या विरोधात न्यायासाठी सत्याग्रह करीत होते. पुढे महात्मा मो.क. गांधी यांनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. अशा वेळी स्वामी रामानंद तीर्थ यांनी महात्मा मो.क. गांधी यांची भेट घेऊन वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग नोंदवण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली. मुंबई येथे झालेल्या भेटीत महात्मा मो.क. गांधी हे स्वामी रामानंद तीर्थ यांना म्हणाले की, "हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अस्तित्व मान्य करवून घेण्यासाठी सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. मात्र यावेळचा सत्याग्रह वेगळा असेल. तुमच्यापैकी ज्यांची अतुच्छ त्यागाची तयारी असेल त्यालाच या सत्याग्रहात भाग घेता येईल. यावेळी सामुदायिक चळवळ होणार नाही. जे जेलमध्ये जातील त्यांना दीर्घ काळ तेथे राहावे लागेल. मी मध्यस्थी करणार नाही, सुटकेसाठी लिहीणार नाही."[१४] यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी महात्मा मो.क. गांधी यांचे म्हणणे मान्य केले व त्यानंतर त्यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्यास महात्मा मो.क. गांधी यांनी परवानगी देऊन टाकली. स्वामीजींनी सेवाग्राम आश्रमात महात्मा मो.क. गांधी यांच्या बरोबर आठ दिवस घालविले. महात्मा मो.क. गांधी यांनी स्वामीजींना हैद्राबादेतील पहिले वैयक्तिक सत्याग्रही[१५] म्हणून मान्यता दिली.

**१९४२ चे आंदोलन, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

१ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायुध्द सुरू झाले. या महायुध्दात ब्रिटन अडकल्यामुळे महात्मा मो.क. गांधी यांनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात चलेजाव चळवळ सुरू केली. तत्पूर्वी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे गवालिया टॅंक मैदानावर कॉंग्रेसचे विशेष अधिवेशन घेवून चलेजाव चळवळ करण्याचा ठराव पास करून घेतला. या अधिवेशनास स्वामी रामानंद तीर्थ उपस्थित होते. महात्मा मो.क. गांधी यांनी या चळवळीत संस्थानालाही सामावून घेण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांना हैद्राबाद राज्यात सरकारच्या विरोधात आंदोलन करण्याचा आदेश दिला. त्यानुसार स्वामी रामानंद तीर्थ यांनी राज्यात आंदोलन सुरू केले. हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग[१६] आहे असे महात्मा मो.क. गांधी यांनी १९४२ मध्ये जाहीर केले होते.

**कायदेभंगाची चळवळ, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

३ जुलै १९४६ रोजी निजाम सरकारने हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठविली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. परंतु हैद्राबादचे निजाम मीर उस्मानअली खान यांनी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच राज्यात भारतीय तिरंगा ध्वज फडकवण्यास कायद्याने गुन्हा ठरवण्यात आला. त्यामुळे महात्मा मो.क. गांधी यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार ७ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात कायदेभंग चळवळीस स्वामी रामानंद तीर्थ यांनी सुरूवात केली. ७ ऑगस्ट आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने झेंडा सत्याग्रह[१७] सुरू केला. हा सत्याग्रह १२ सप्टेंबर १९४८ पर्यंत चालू होता. राज्यात साग, मोह, ताडी व सिंदीची झाडे तोडणे गुन्हा ठरविण्यात आला होता. ही झाडे तोडून कायदेभंग करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांनी ७ ऑगस्ट १९४७ पासूनच जंगल सत्याग्रह सुरू केला. हा सत्याग्रह १६ सप्टेंबर १९४८ पर्यंत चालू होता.

**सशस्त्र आंदोलन, महात्मा मो.क. गांधी व स्वामीजी :**

महात्मा मो.क. गांधी यांची चळवळ व लढा अहिंसक मार्गाने चालणारा होता. त्यांचा सशस्त्र मार्गावर विश्वास नव्हता. हैद्राबाद राज्यात मात्र अरब, राहिले, पठाण व रझाकार हे जनतेवर अन्याय अत्याचार करीत असत. ते स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहापुढे नमलेले नव्हते.

त्यामुळे हैद्राबाद स्टेट काँग्रेसला सशस्त्र लढा सुरू करण्याशिवाय पर्याय राहिलेला नव्हता. या संदर्भात स्वामीजींनी महात्मा मो.क. गांधी यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन घेतले. परंतु मो.क. गांधी यांनी स्वामीजींना त्यांनी सुरू करीत असलेल्या सशस्त्र लढ्याला पाठींबा दिला नाही. थोडक्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी सातत्याने महात्मा मो.क. गांधी यांच्याशी चर्चा करून व त्यांचे मार्गदर्शन घेऊनच त्यांच्या मार्गदर्शनानुसारच हैद्राबाद राज्यात चळवळ व सत्याग्रह केले.

**संदर्भ सूची :**


१) कठारे अनिल व नगराळे एन.एन. , मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, नोव्हेंबर १९९९, पृ. २२६.
२) जोशी द.प. ( संपा.), काळाच्या पडद्याआड खंड - ३, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, १९९२, पृ. ३०५.
३) देऊळगावकर वि.पा. ( अनु.), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, स्वामी रामानंद तीथ स्मारक समिती, हैद्राबाद, द्वितीय आवृत्ती १९९८, पृ. ७५.
४) Desai V.H. ( Edi.), The visionary important speeches and writing of Swami Ramanand Teerth, S.R.T.M.U. Nanded, १९९६, P. ४.
५) Remesan N. ( Edi.), The freedom struggle in Hyderabad, Vol.-I, १९२० to १९४७, Hyderabad, P. ५७.
६) Ibid, P. ३३.
७) देऊळगावकर वि.पा. ( संपा.), स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००१, पृ. २२.
८) कित्ता.
९) Kate P.V., Marathwada under the Nizams, Mittal Publications, Delhi, १९८७, p.६१.
१०) देऊळगावकर वि.पा. ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २२.
११) भालेराव अनंत, हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, मुंबई २००१, पृ.१०९.
१२) कित्ता, पृ. १४६.
१३) Hyderabad State Archives, Hyderabad, Constitutional affairs, Secretariat, File No. १२४६.
१४) देऊळगावकर वि.पा. ( अनु.), पृ.११५.
१५) कित्ता, पृ. ११६.
१६) Dhengle B.S., Hyderabad Freedom Struggle, Kalpana Prakashan, Nanded, १९९८, P. १४३.
१७) भालेराव अनंत, पूर्वोक्त, पृ. २८९.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


## ''म.गांधी यांचेआर्थिक विचार''


**संशोधक**
**प्राचार्य, डॉ.बी.जी. गायकवाड**
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली, ता.जि.हिंगोली


---

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्यासाठी अलौकिक असे योगदान देऊन सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने साम्राज्यवादी वसाहतीक सरकारच्या जोखडातून मुक्तता देणारे, परकियाच्या पारतंत्र्यातून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे एक महान कृतीशील व्यक्तिमत्व म्हणजे म.गांधी यांचा आपणास अतिशय नम्रपणे नामोल्लेख करावा लागेल. दुसरे महत्वाचे म्हणजे म.गांधीनी भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीचा विचार करतांना इतर देशांच्याही स्वातंत्र्याचा हिरारीने पुरस्कार केला, किंबहूना जागतिक शांततेच्या दृष्टिनेही त्यांनी अनेक मौलिक विचार मांडले. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरीता त्यांनी राष्ट्रीय स्तरावर व्यापक असे जनआंदोलन उभारले आणि शेवटपर्यन्त या स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांनीच आम्हाला सत्याग्रह आणि अहिंसेची शिकवण दिली. धर्म आणि राजकारण यांची सांगड कशी आवश्यक आहे, हेही त्यांनीच आपल्या चिंतनातून दाखवून दिले, ते सत्याचे कट्टर तेवढेच नम्र उपासक होते. ते सत्याला परमेश्वर मानीत असत, त्यांचे विचार अगदीच व्यापक होते, त्यांच्या प्रत्येक विचारात आणि त्यांच्या चिंतनात 'समग्र वैश्विकता' दिसून येते, याही पुढे जाऊन विचार करता 'उच्च असा मानवतावादही' दिसून येतो. त्यांचे चिंतन समग्र अर्थाने आधिक व्यापक होते, त्यांच्या विचारांना चिंतनाला कोणतेही क्षेत्र वर्ज्य नव्हते, म्हणूनच म.गांधी यांच्या विचारात सामाजिक, आर्थिक, धार्मिक या विचारांबरोबर कांही वैचारिक असे तत्वज्ञानही आढळून येते. विशेषतः त्यांच्या आर्थिक विचारातील चिंतन हे पराकोटीचे एक महान असे तत्वज्ञानच होते. त्यांनी येथील राजकीय प्रश्न आणि परिस्थिती एव्हाना सामाजिक समस्या व सुधारणा याबाबतचे त्यांचे विचार जसे महत्वपूर्ण आहेत, तसेच आधुनिक भारतीय आर्थिक विचारसरणीतही त्यांचे स्थान अगदीच महत्वाच्या ठिकाणी आहे. एकंदरीतच 'भारतीय स्वातंत्र्य' या उद्दिष्टाखेरीज इतर क्षेत्रातील त्यांचे चिंतनही अनमोल असेच आहे. विशेषतः म.गांधी यांच्या आर्थिक विचारात अहिंसेला महत्वाचे स्थान आहे. किंबहूना म.गांधीच्या अर्थाविषयक विचारसणीचे दुसरे मूलभूत तत्व हे अहिंसा होय. खास करुन आर्थिक क्षेत्रात अहिंसा कशी आणावी याचाही त्यांनी विचार केलेला होता. ''मी आर्थिक रचनेला जर अहिंसक पाया न देईन तर मला संपूर्ण सत्याचे दर्शन होणे अशक्य आहे'' असे म्हात्माजींस वाटले, कारण सत्यदर्शन अहिंसेच्याच प्रकाशात होऊ शकते''[1] यारुन म.गांधीच्या आर्थिक विचारांचा पायारंभ हा अहिंसेच्या तत्वानी होतो, हे नव्याने मांडण्याची गरज नाही, असे स्पष्टपणे दिसून येते. अहिंसेवर आधारीत आर्थिक विचारांचा वेध त्यांच्या मौलिक चिंतनातून दिसून येतो. तत्पूर्वी म.गांधी यांच्या आर्थिक विचारांच संशोधनात्मक उहापोह करताना व त्याचे संशोधनात्मक अध्ययन करतांना प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढीलप्रमाणे संशोधन आराखडा तयार केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये म.गांधी यांच्या 'आर्थिक विचारांचा' धावता आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिदष्टे :**

1) म.गांधीना अभिप्रेत असलेल्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
2) म.गांधी यांच्या आर्थिक विचारातील विविध संकल्पनाचे विवेचन करणे.
3) म.गांधी यांच्या आर्थिक विचारातील स्वदेशी, श्रमप्रतिष्ठा, विश्वस्त, सर्वोदय या सारख्या विविध मुद्यांवर प्रकाश टाकणे.
4) म.गांधी यांच्या आर्थिक पैलूंचे अध्ययन करणे.

**संशोधन समस्या :**

'म.गांधीनी आपल्या अर्थाविषयक चिंतनातून ज्या बाबी सूचविलेल्या आहेत, प्रत्यक्षात त्या 'आर्थिक विचारासमोर' काळानुरुप कांही समस्या निर्माण होतात का याचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

1) म.गांधी यांच्या सर्व अर्थविषयक संकल्पना हया प्रथमतः अहिंसेच्या तत्वाने परिपूर्ण आहेत.
2) म.गांधीनी आपल्या अर्थ विषयक विचारात मानवी श्रमाची प्रतिष्ठा पूर्णपणे जोपासलेली आहे.
3) म.गांधी यांच्या विचारात 'किमान गरजा' आणि 'साधी राहणी' ही तत्वे महत्वाची भूमिका पार पाडतात.
4) विश्वस्त, सर्वोदय, ग्रामराज्य, स्वयंपूर्ण खेडी, आदर्श राज्य, सर्वोदय समाज, लघू उद्योग, खादी हे मुद्दे म.गांधीच्या आर्थिक विचारात केंद्रस्थानी आहेत.

**संशोधनाचा हेतू :**

प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधी यांच्या प्रमुख विचारातील त्यांच्या अर्थविषयक विचारावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**तथ्य संकलन :**

संशोधनाचे क्षेत्र कोणतेही असले तरीही, संशोधनातील सर्वाधिक महत्वाची बाब म्हणजे तथ्य संकलन असते. कारण तथ्य संकलनाशिवाय कोणत्याही प्रकारचे संशोधन करता येत नाही. प्रस्तुत संशोधनात विश्वासदर्शक अशाच तथ्यांचे संकलन करण्यात येऊन शक्यतो प्रकाशीत साधनांचा वापर केला आहे.

**अभ्यासाची पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधाचे संशोधनात्मक अध्ययन करतांना ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानत असतांना संशोधनाच्या इतर गरजेप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषनात्मक इत्यादी सारख्या पध्दतीचाही वापर करण्यात आला.

उपरनिर्दिष्ठ केलेल्या संशोधन आराखड्याचा विचार करुन म.गांधीच्या आर्थिक विचारावर प्रकाश टाकतांना, म.गांधी यांच्या आर्थिक विचाराचे जे विविध पैलू आहेत, त्याचाही तपशील या ठिकाणी मांडणे अग्रीमपणाचे वाटते. समग्र आणि व्यापक दृष्टिकोणातून विचार करता म.गांधीच्या विचाराचा केंद्रबिंन्दू 'मानव' आहे. किंबहूना सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्यचर्य या प्रमुख पंचनैतिक मूल्यांवर त्यांची विचारसरणी अवलंबून आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे म.गांधीनी इतर सामाजिक व राजकीय विचारांचे जसे मौलिक चिंतन केले, त्याप्रमाणेच त्यांनी आपल्या विचारात आर्थिक चिंतनही केल्याचे दिसून येते. हे त्यांचे चिंतन विश्वस्त संकल्पना, सर्वोदय समाज, ग्रामस्वराज्य, स्वदेशी, श्रमप्रतिष्ठा अवजड यांत्रिकीकरणास विरोध, ग्रामोद्योग, लघुउद्योग, विकेंद्रीकरण या सारखे अनेक पैलू म.गांधीचा आर्थिक विचारांत दिसून येतात. विशेषतः म. गांधीनी आपल्या सामाजिक सेवेच्या जीवनात भारतातील गोरगरीब, कष्टकरी जनता यांचा नेहमीच विचार केला. ''प्रत्येकाला आपल्या किमान गरजा भागवता आल्याच पाहिजेत अशारितीने साधने उभी करुन त्यांचे वाटप करणे हा गांधीना समाजवादाचा मार्ग वाटतो''[2] एकंदरीतच म.गांधीनी आपल्या आर्थिक विचारात व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर समाजवादाची भलावण केल्याचे दिसते, पण त्यातील निराळेपण मात्र अगदीच वेगळे आहे. या ठिकाणी त्यांना ''विश्वस्त कल्पना'' अगदीच महत्वाची वाटते अपरिग्रहाच्या कल्पनेतून विश्वस्ताची संकल्पना निर्माण झाली. त्यांच्या मते ''समाजातील लोकांनी स्वतःच्या गरजा पूर्ण होतील एवढीच संपती स्वतः जवळ ठेवावी आणि राहिलेली संपती समाजासाठी वापरावी''[3] एवढा व्यापक विचार म.गांधीनी आपल्या आर्थिक विचारात केला, किंबहूना श्रीमंतानी जर विश्वस्त भूमिका नाकारली तर त्यांचे विरुध्द असहकार, अहिंसा, सत्यागृह या मार्गाचा वापर करता येईल. म.गांधीच्या आर्थिक चिंतनात 'साधी राहणी' व किमान गरजा हे मुद्देही महत्वाच्या स्थानी आहेतच. एकंदरीतच गांधीजीच्या अर्थशास्त्राचे जे मूलभूत सिध्दांत आहेत, त्यात साधी राहणी, अहिंसा, श्रमप्रतिष्ठा, मानवीमूल्ये यांना महत्वाचे स्थान दिसून येते. खास करुन आपल्या गरजा खूप वाढवून घेतल्याने त्या गरजा पुरवता येतील का याचाही विचार करणे तेवढेच महत्वाचे आहे. जी पध्दती मानवी जीवन अगदी साधे, परिपूर्ण बनवील तीच खरी प्रगतीपर अर्थपध्दती अशी त्यांची कल्पना आहे.[4] साधी राहणी उच्चविचारसरणी या तत्वांखेरीज माणसाच्या पायाभूत गरजा कोणत्या व किती या बाबत एक पथ्य प्रत्येकांने सांभाळावे हा विधायक विचारही त्यांच्या चिंतनातून पुढे येतो. 'साधनशुचिता हा गांधीजीच्या राजकारणाचा कणा होता. स्वतःचे जगणे आणि त्यातून उभी राहिलेली त्यांची प्रतिमा यात सुसंगती होती, त्यातूनच राष्ट्रपित्याची प्रभावी प्रतिमा उभी राहिली'.[5]

म.गांधीजींच्या आर्थिक विचारात ख–या अर्थाने अनेक पैलूंचे दर्शन घडते. विश्वस्त, साधी राहणी, श्रमप्रतिष्ठा, किमान गरजा याबरोबरच 'सर्वोदय समाज' यावरही त्यांचे चिंतन अगदीच मूलगामी होते. सर्वोदयाच्या संकल्पनेत त्यांना संपूर्ण समाजाचा सर्वांगिण विकास, रोग–दारिद्र्य– शोषणातून मुक्ती या बाबी अग्रीम होत्या, किंबहूना शोषणाविरहित आदर्श समाजाची निर्मिती हे म.गांधी यांच्या आर्थिक विचारात महत्वाचे सुत्र सापडते. 'Unto The Last' या रस्किनच्या ग्रंथाचाही प्रभाव म.गांधी यांचेवर राहिलेला आहे. हा ''सर्वोदय याचा अर्थ सर्वाचा उदय म्हणजेच सर्वांचेच कल्याण होय''[6] म. गांधीनी येथील अनेक आर्थिक प्रश्नांकडे त्यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून पाहिले. आपल्या राष्ट्राचा आर्थिक जीवनस्तर लक्षात घेताना व भारताची एकंदर आर्थिक परिस्थिती ही बाब सुध्दा लक्षात घेताना खेडे हा भारताच्या आर्थिक रचनेचा केंद्रबिंदू आहे असे त्यांनी मानले होतेच. शिवाय श्रमाची प्रतिष्ठा जोपासताना त्यांनी यांत्रिकीकरणाला विरोध केला होता. हिंद–स्वराज्य या ग्रंथात म.गांधीनी यांत्रिकीकरणाबाबतची आपली मते स्पष्टपणे नोंदविली आहेतच. 'यंत्रानी युरोप उजाड होत चालले आहे आणि त्याचे वारे आता हिंदुस्थानात वाहू लागले आहेत. यंत्रे ही आधुनिक सुधारणेची मुख्य निशाणी आहे. ते महापाप आहे असे मला तरी स्पष्ट दिसत आहे.[7] असे स्पष्ट मत म.गांधीनी यंत्राच्या बाबतीत नोंदवले आहे, शक्यतो हळूहळू मोठ्या अवजड यंत्राचा त्याग करुन श्रमाची प्रतिष्ठा जोपासावी हा सकारात्मक विचार गांधीजीच्या आर्थिक विचारात दिसून येतो. किंबहूना खादी आणि ग्रामोद्योग यांचा त्यांनी पुरस्कार केलेला होता. बेकारीला त्यांचा विरोध होता याशिवाय त्यांनी स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेची कल्पना मांडलेली होती. 'स्वदेशी' बाबतही ते आग्रही हाते. म.गांधी यांच्या मते ''प्रत्येक भारतीयांनी स्वदेशीचा आग्रह धरला तर देशातील उद्योगाना उत्तेजन मिळेल. परदेशातून वस्तू आयात करण्याचे थांबविले तर देश आर्थिक दृष्ट्या संपन्न बनेल'' असे गांधीना वाटत होते.[8] शिवाय ग्रामोद्योगातून अनेक आर्थिक प्रश्न मार्गी लागतील, शेतीवरचा भार कमी होईल अशा आशावाद गांधीजीच्या विचारातून पुढे येतो. संपतीचे समान वाटप, विकेंद्रीकरण, सर्व संपत्ती इश्वराची, –हदयपरिवर्तन, आदी तात्विक मुद्येही त्यांच्या अर्थाविषयक चिंतनात केंद्रस्थानी असल्याचे दिसून येतात. स्वयंपूर्ण खेडे हा गांधीजींच्या अर्थकारणाचा एक केंद्रीबिंदू म्हणून दिसून येतो. यंत्रे व औद्योगिकरण ही शहरी सभ्यतेची मुख्य प्रतिके असून मानवमात्रावरील ते शाप आहेत, असा एक सूरही त्यांच्या विचारात दिसून येतो. शेतीकेंद्रीत अर्थव्यवस्था,

शोषणमुक्त समाजनिर्मिती याकरिता कोणताही टोकाचा मार्ग क्रांती वैगेरे स्वीकारण्या ऐवजी नैतिक मार्ग स्वीकारावा ही गांधीजीची अपेक्षा होती. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार या प्राथमिक गरजेच्या पुर्ततेशिवाय माणसाचे खरे सबळीकरण होत नाही, असे त्यांचे म्हणणे हाते.[9] उपरनिर्दिष्ठ केलेल्या विवेचनातून म.गांधी यांच्या आर्थिक चिंतनाजवळ आपणास जाता येते. किंबहूना विश्वस्त, ग्रामस्वराज्य, सर्वोदय, स्वयंपूर्ण खेडी, दारिद्र्याचे उच्चाटन, श्रमप्रतिष्ठा, आदर्शराज्य याबाबतच्या विविध पैलूतून त्यांचे आर्थिक विचार पुर्णतः स्पष्ट होतात.

**सारांश /निष्कर्ष :**

म.गांधी यांचे आर्थिक विचार समजून घेताना त्यांच्या आर्थिक चिंतनात जे महत्वाचे पैलू आहेत, त्यांचा संशोधनात्मक उहापोह आणि विशलेषन अत्यंत महत्वाचे ठरते. विशेषतः श्रमप्रतिष्ठा, भाकरीसाठी श्रम याबाबी तर महत्वाच्या आहेतच, याशिवाय विश्वस्त, सर्वोदय, ग्रामस्वराज्य, स्वयंपूर्ण खेडी, स्वदेशी, अवजड यांत्रिकीकरणास विरोध, सत्य–अहिंसा, अस्तेय, अपरिगृह, ग्रामोद्योग, लघुउद्योग, कुटीरउद्योग या सारख्या संकल्पनाही मध्यवर्ती आहेत, असे म्हणण्यापेक्षा या विचारातूनच त्यांचा ख–या अर्थाने आर्थिक दृष्टिकोण स्पष्ट होतो.

**<u>संदर्भ ग्रंथ सूची</u>**

1) साने गुरुजी, गोष्टीरुप गांधीजी व इतर, (15 ऑगस्ट, 2011), रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, पृ. 288.
2) डॉ.भोळे भा.ल., भारतीय राजकीय विचारवंत,(1995), पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. 114.
3) प्रा.रायखेलकर ए.आर., आर्थिक विचाराचा इतिहास,(जून 2005), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.250.
4) कोकंडाकर जे.आर., गांधीजी महात्मा आणि राष्ट्रपिता,(ऑक्टो 2002), श्री मंगेश प्रकाशन नागपूर, पृ.74.
5) किणीकर रॉय,(संपा), गांधी नावाचे महात्मा,(नोव्हे. 2014), डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ.293.
6) के.सागर,(संपा ), भारतीय राजकीय विचारवंत,(2002) अनिरुध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.235
7) महात्मा गांधी, हिंद स्वराज्य,(2011), साकेत प्रकाशन प्रा.लि., पुणे, पृ.96.
8) प्रा.रायखेलकर ए.आर., आर्थिक विचाराचा इतिहास, पृ. 259.
9) सुमंत यशवंत, म.गांधीची विचारसृष्टी, (एप्रिल 2016), साधना प्रकाशन, पुणे, पृ. 45.

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधीची अहिंसा व वर्तमान स्थिती


**प्रा. डॉ. क्षीरसागर बी. एस.**

इतिहास विभाग प्रमूख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली,


---

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकात मानवाने विविध नव-नवीन शोध लावून तंत्रज्ञान, विज्ञान व उद्योगामध्ये मोठी प्रगति केली. यामुळे सर्व मानवी समुह सुखी, आनंदी असल्याचे दिसून येते. परंतू या प्रगतिबरोबरच दहशतवाद, नक्षलवाद, असूरक्षितता, अशांतता, भिती, अस्थैर्य जीव घेणी शस्त्रस्पर्धा व विविध साथीचे रोग इत्यादी समस्येमुळे मानवी जीवन विस्कळीत झाले आहे. आज संपूर्ण जगामध्ये भितीयूक्त स्थिती आहे. मानवी महत्वाकांक्षेमुळे र्स जग युध्दाच्या तोंडावर उभे आहे. केव्हा युध्दाचा भडका होईल सांगता येत नाही. युध्द व युध्दखोर वृत्ती वाईट आहे, हि बाब सर्वज्ञात असूनही सत्ता, लोभ, इर्शा, मत्सर, वंश-कुळभेद, वर्ग-वर्णभेद, धर्म-जातीभेद यासर्व गोष्टी मानवी प्रगतीस हाणीकारक आहे. हे माहित असूनही सर्वांनी डोळयावर गांधारीसारखी पट्टी बांधली आहे.

आज संपूर्ण जगाला 'कोरोना' या आजाराने व्यापून टाकले आहे. हा विषाणू चीनमधील वुहानमध्ये असलेल्या पी-4 या प्रयोगशाळेत तयार करण्यात आल्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे. चीनने वुहानमधील प्रयोगशाळेतूनच वेगवेगळे शोध लावून अणवस्त्रे तयार केले आहेत. जगातील अनेक देश जैविक अस्त्रे तयार करण्यासाठी जिवाणू आणि विषाणूंच्या जनुकीय रचनेत परिवर्तन करण्याच्या खटपटीत आहेत. हि पूर्वकल्पना स्टीफन हॉकिंग या महान शास्त्रज्ञाने दिलेली आहे. त्यामुळे मानव विघातक ठरणाऱ्या प्रयोगांना कोण्या मर्यादेपर्यंत परवानगी दयायची हा मोठा प्रश्न आहे. जनूकीय फेरबदल केल्याने विशाणू अधिक शक्तीशाली होतात. त्याद्वारे जैविक अस्त्रे तयार करुन एखादया देशावर हल्ला केला. तर त्याचा बचाव करणे अशक्य होईल हा मोठा धोका आहे.

सर्व मानवजातीवर आपलेच अधी राज्य असावे, महासत्ता बनने, इतरांवर आपणच हक्क व हुकुम गाजवावे, व स्वत:च्या अस्तित्वाबाबत असुरक्षित राहणे. यापासून आपण सुरक्षित असावे. यासाठी चीनला 'कोरोना' नावाचा अणूबाँब तयार करावयाचा होता कि काय ? कि ज्याचा उपयोग तो इतर राष्ट्रांवर करु शकेल. परंतू निसर्गाच्या समोर कोणीही जाऊ शकत नाही. कारण हा चीनचा प्रयोग सपसेल फेल झाला व या विषाणूचा पहिला बळी चीनच ठरला. परंतू म्हणतता ना 'विनाश काले विपरीत बुध्दी' अशी गत चीनची झाली आहे. मात्र त्याची दाहकता संपूर्ण मानवजातीस भोगावी लागत आहे. आज संपूर्ण जग अस्थिर, वैफल्यग्रस्त, विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीतून फक्त 'गांधी विचार' मानवजातीस तारु शकते.

जगामध्ये दोन मोठया शक्ती अस्तीत्वात आहे. एक अणूबाँब व दूसरी गांधीचे अहिंसक विचार, अणूबाँब हे विध्वंसाचे प्रबल्याचे, सर्वनाशाचे प्रतिक तर गांधींची अहिंसा हि शांततेचे, विधायकतेचे, निर्मितीचे प्रतिक. वर्तमान स्थितीमध्ये गांधींची अहिंसा अंगिकारणे हा एकच पर्याय आहे. त्यासाठी महात्मा गांधींच्या अहिंसक विचाराची कास धरणे गरजेचे आहे. नसता मानवजातीचा एक दिवस शेवट होणे निश्चित आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट :-

1) महात्मा गांधींचे अहिंसक विषयक विचार समजून घेणे.

2) वर्तमान स्थिती व महात्मा गांधींची अहिंसा यावर प्रकाश टाकणे.

**गृहितक :-**

1) महात्मा गांधीसा हि दूबळयांची नसून शुरांचा अहिंसा असून त्यात अध्यात्माची जोड आहे.

2) अणूबाँब व महात्मा गांधी विचार या दोन शक्तीच आज जगात सर्व शक्तीमान आहेत.

संशोधन पध्दत व तथ्य संकलन :-

प्रस्तूत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला असून शोधनिबंध लेखनासाठी तथ्यसंकलनाच्या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. यात गांधी यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा तसेच गांधी यांच्यावर इतरांनी लिहिलेले ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे यांच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

**गांधीची अहिंसा :-**

अखंड भारतात शोषण विरहित आणि समतेवर, न्यायावर आधारीत असा लोकशाही समाज गांधींना अभिप्रेत होता. धर्मभेद, जातिभेद, भाषाभेद व वर्गभेद अशा समाजविघटित करणाऱ्या व समाज मोडणाऱ्या वृत्तींच्यावर उठणारा नि बंधुभावाने परस्पर व्यवहार साधणारा असा समाज महात्मा गांधींना अपेक्षित होता.[1] त्यामध्ये मात्र अनंत अडचणी आजच्या समाजात राजकारणाने निर्माण केल्या आहे.

भारतीय संविधानाने एकच म्हणजे भारतीय नागरिकत्व मान्य केले आहे. मग तुम्ही कुठल्याही गावाचे, धर्माचे वा जातीचे आतात याचा नागरीकत्वाशी संबंध नाही. 'नागरीकत्व प्रादेशिक, धार्मिक नाही तर फक्त भारतीय आहे. हि अखिल भारतीयत्वाची संकल्पना गांधीजींची देगणी आहे.'[2] आणि आज नागरीकतेच्या कायदयामुळे भारतभर मोठे राजकारण होत आहे. केवळ भारतीय स्वार्थापोटी देशहित बाजूला सारले जात आहे. हि फार खेदाची बाब आहे. यासाठीच गांधीजींनी ब्रिटीशांपासून आपली मुक्तता केली का ? सत्य व अहिंसेचा आधार घेऊन गांधींनी इंग्रजांना भारत सोडण्यास भाग पाडले. कारण इंग्रजांचे प्रत्येक धोरण व्यापाराच्या संभावनेवर आधारीत होते. यामुळे नेपोलियन इंग्रजांना 'दूकानदाराचे राष्ट्र'[3] म्हणत असे. या दूकानदारीला गांधींनी अहिंसेच्या मार्गाने प्रतिकार करुन भारतास स्वातंत्र्य मिळवून दिले. गांधींच्या यासर्व कार्यामागे अध्यात्मिक भूमिका ही महत्वाची आहे. त्यांची एक स्वतंत्र्य विचारपध्दती असून त्या विचाराचा मुळ पाया हा नीतीमूल्ये, आदर्शवाद, परमधर्मसहिष्णूता, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, सत्य आणि अहिंसा या विधायक संकल्पनेतून पक्का झाला होता. आचार आणि विचार यांच्यातील एकरुपता हे गांधी जीवनपध्दतीचे वैशिष्टये होते. गांधी विचार हा इतरांना सांगण्याचा वा लिहण्याचा विषय नाही तर तो प्रत्यक्ष जगण्याचा विषय आहे. गांधींनी अहिंसा, त्याग, सर्वोदय, हिजरत, स्वदेशी, ग्रामस्वराज्य, नई तालीम व असहकार या संकल्पना प्रथम स्वत: आचरणात आणल्या त्यामुळेच गांधींच्या विचाराचा प्रभाव सर्वत्र मानला जातो. मार्टीन ल्युथर किंग पासून ते बराक ओबामापर्यंत तर नेहरुपासून ते आजपर्यंत गांधी यांच्या विचाराचा मोठा प्रभाव आहे. महात्मा गांधी यांच्या कार्याचा पायाच अध्यात्म आहे.[4] परंतू आज अध्यात्मापेक्षा भौतिक उपभोगाचा हव्यास मोठया प्रमाणात हवासा अशी सर्व सामान्यांची वृत्ती होत चालली आहे. गांधींनी मात्र मिळणाऱ्या सोईंचा कमित-कमी उपयोग करावा.[5] अशा अहिंसा पालनाने आपले जीवन व्यतीत केले.

विध्वंसक शक्तीला केवळ अहिंसक शक्तीनेच शांत करता येते. जगामध्ये जनतेमार्फत जेथे-जेथे परिवर्तन घडून आले. तेथील मानसांना सुटत अंगाने जी आपल्या शक्तीची जाणीव झाली, त्यामागे महात्मा गांधी यांच्या अहिंसक विचाराचा मोठा वाटा आहे, कारण प्राचीन काळापासून मानवजातीने विनाशाचे तांडव किती भयंकर असतात हे अनुभवले आहे. काही व्यक्ती मात्र याकडे दूर्लक्ष करतात. हुकुमशहा किम झोंग, याशिवाय काही धर्मवेडेपणातून दहशतवादी कृत्य करणारी मनोवृत्ती, तर काही नक्षलवादी मात्र आजही हिंसेनेच प्रश्न सुटतात या विचारास घट्ट धरुन आहे. या लोकांमध्ये गांधींच्या अहिंसक विचारांची पेरणी करणे आवश्यक आहे. तरच मानवजातीला स्थैर्य लाभेल. आज बहूतांश युध्दखोर मानसांनाही समजायला लागले आहे. विनाश नको, विकास हवा या विधायक विचारांच्या पाठीमागे गांधींच्या अहिंसक विचारांचीच प्रेरणा व स्फुलिंग आहे.

अहिंसेला प्राचीन इतिहास मोठा आहे. भारतात अहिंसेचा प्रांरभ श्रीकृष्णाने केलेला दिसेल. जेव्हा कौरव व पांडवामध्ये युध्दजन्य स्थिती निर्माण झाली, तेव्हा युध्द होऊ नये. त्यासाठी श्रीकृष्णाने शक्य ते प्रयत्न केले. परंतू दुर्योधनाच्या हट्टामुळे युध्द होऊ शकले नाही. "या युध्दामध्ये मी शस्त्र हातात घेणार नाही. 'हिंसा अनिवार्य असेल पण अहिंसा हीच श्रेष्ठ आहे, हिंसेने कोणाचेच भले होणार नाही. म्हणून मी हिंसेच्या पक्षात असणार नाही"[6], असा संदेश श्रीकृष्णाने लोकांना दिला. कृष्णानंतर येतो वर्धमान व बुध्दाचा काळा, जैन आणि बौध्द धर्माने तर अहिंसेची प्रतिष्ठा वाढवली. इ.स. पूर्व 261 मध्ये कलिंग युध्दातील नरसंहार पाहून सम्राट अशोकाचा हिंसेवरील विश्वास उडाला व तो अहिंसेचा पुजारी बनला. अहिंसा हि जैन धर्माचा प्राण आहे. महात्मा गांधींनी अहिंसा जनमानसात रुजविण्यासाठी अहिंसेला गती दिली. गांधी म्हणत सत्य आणि अहिंसेचा उपयोग केवळ व्यक्तिगत नव्हे. तर सार्वजनिक जीवनातही तेवढाच महत्वाचा आहे. अहिंसेचा उपयोग शस्त्रासारखाही होऊ शकतो. हिंसेच्या हत्यारापेक्षा ते अधिक शक्तीशाली आहे.

इंग्रजाविरुध्द लढयात हिंसेचे नाव सुध्दा असता कामा नये. हा गांधींनी भारतीयांना दिलेला मोठा संदेश आहे. आपण फक्त शांतीने आणि हिंसेने लढा देऊ शकतो.[7] कोणाचाही प्राण घेणे हे सर्वात मोठे पाप आहे. सर्वांनी देशांच्या स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे. हि लढाई आपण हत्यारांनी नव्हे तर अहिंसेने, शांतीने लढु[8] अहमदाबाद आणि मुंबईमध्ये स्वदेशी व परदेशी मालावरील बहिष्काराच्या आंदोलनात 'महात्मा गांधी की जय' म्हणत दगडफेक झाली. तेव्हा गांधीजींना फार वाईट वाटले. कि आपल्या नावाने दंगे होत आहेत. तेव्हा लोकांना त्यांनी समजावले, हिंसेने मिळालेल्या स्वातंत्र्याची मला मुळीत जरुर नाही.[9] कारण यामध्ये गांधी आणि अहिंसा दोघांचाही पराजय आहे. गांधींना अभिप्रेत असलेली अहिंसा लोकांमध्ये रुजली नव्हती. ब्रिटीशांचा अत्याचार निमुटपणे सहन करुन शांत राहणे ही अहिंसेची खरी कसोटी आहे. असहकार आंदोलनात चौरीचौरा येथील हिंसक घटनेने गांधी दु:खी झाले व त्यांनी लढा बंद केला. व म्हणाले हिंसेच्याद्वारे म्हणजेच एका माणसाला मारुन देखिल किंवा त्रास देऊन मिळविलेल्या स्वातंत्र्याचा माझ्या मते काहीही उपयोग नाही. अशा तऱ्हेने स्वातंत्र्य होण्यापेक्षा तर गुलामी हजारपटीने चांगली[10] हिंसेने मिळालेले स्वातंत्र्य टिकणारे नाही ही गांधीजींची धारणा होती. देशातील जातीय दंगे थोपविण्यासाठी गांधींनी 'शांतीसेना' उभारण्याचा प्रयत्न केला होता. ही कदाचित गांधींची अवास्तव महात्वाकांक्षा असेल, परंतू अहिंसेच्या पायावर जर आपणास यश मिळवायचे असेल तर कोणत्याही परिस्थितीला शांतीमयतेने तोंड देण्याची शक्ती वाढवावी लागेल. विश्वशांती आणि नवीन निर्माण होणाऱ्या जागतिक व्यवस्थेला हे भारताचे मोठे साह्य ठरेल.[11]

महात्मा गांधींनी अहिंसक तत्वाला सत्याग्रह व उपवासाची जोड लावली आहे. अहिंसक शत्रागारातील उपहास हे सत्याग्रहाच्या बरोबरीचे हत्यार गांधी म्हणत "माझ्यात सत्य अगोदर आले. अहिंसा मागून आली. आणि सत्यासाठी मी अहिंसेचा बळी दयायला कचरणार नाही"[12], म्हणजे गांधी अहिंसेची प्रतारणा करीत आहेत. असे नाही तर सत्य आणि अहिंसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या तरी बिंदू

मात्र वेगळा आहे. असे त्यांना सांगायचे आहे. अहिंसा म्हणजे काय ? तर गांधींच्या मते "कुणाची हिंसा करु नये, कुणाला मारु नये", मनात क्रोध, राग, व्देश ठेवला तरी हिंसाच म्हणता येईल. अहिंसेचे पालन करणे सरळ तर नाहीच अहिंसा शुरांचा मार्ग आहे. घाबरटाचे त्यात काम नाही दुर्बलांचा अहिंसेच मुळीच समावेश होऊ शकत नाही. सर्वांनी बऱ्हादूर बणा, म्हणजे खरे अहिंसक बनता येईल. अहिंसेचे शिक्षण हे भित्र्या लोकांकरिता नाही. गांधी म्हणत, तुम्ही बहादूर बनून, कष्ठ करुन आणि सत्याने वागून आपल्या देशाची आणि त्याव्दारे जगाची सेवा करा.[14] याशिवाय वेगळा अहिंसेचा विचार गांधींनी मांडला आहे. मी अहिंसक आहे. या बाबींचा आधार जर एखादा भित्रा व्यक्ती घेत असेल तर त्यास उद्देशून गांधी म्हणतात. "भ्याडाप्रमाणे पळून जाण्यापेक्षा लोक शस्त्रे घेऊन लढत आहेत. हे माझ्या अहिंसेस बसते"[15], भारत छोडो आंदोलनात अहिंसक मार्गाने शेतकऱ्यांमध्ये प्रतिकार करण्याचा आत्मविश्वास महात्मा गांधींनी निर्माण केला.[16] त्यामुळेच हे आंदोलन सर्वव्यापी आंदोलन होऊ शकले, तदूनंतर इंग्रजांवरही जागतिक दबाव आल्याने त्यांनी भारतातून जाण्याचा निर्णय घेतला. या पाठीमागे गांधींच्या अहिंसक मार्गाचे मोठे यश आहे.

हिंद-स्वराज्य या ग्रंथामध्ये भारतीय स्वातंत्र्यासाठी शस्त्राचा उपयोग करणाऱ्या क्रांतीकारी, हिंसावादी संप्रदायाला उद्देशुन गांधी लिहीले भारताच्या दु:खावर हिंसा उपया नव्हे ; भारताची संस्कृती पाहता स्वसंरक्षणासाठी त्याला काही वेगळया उच्च प्रतीच्या शस्त्राची गरज आहे. ते शस्त्र गांधींना अहिंसेचे अभिप्रेत होते.[17] इंग्रजांनी भारतात जे साध्य केले ते हिंसेने साध्य केले. म्हणून आपणही हिंसेचा उपयोग करुन तसेच मिळवू. परंतू ते कामाचे नाही. त्याचे आयुष्य मोठे नाही. त्यामध्ये स्थिरता, शांतता, मानवता, समता, बंधूता असणार नाही. साध्य आणि साधन यांचा फार मोठा संबंध असतो. हिंसेने मिळविलेले स्वातंत्र्य चिरकाळ टिकणारे नाही. हे म्हणजे "धोतऱ्याचे रोप लावून मोगऱ्याच्या फुलांची इच्छा बाळगण्यासारखे आहे"[18], 'साधन हे बीज आहे आणि साध्य हे झाड आहे' पैराल ते उगवले, सैतानाची भक्ती करुन ईश्वर भजनाचे फळ मिळणे शक्य होणार नाही. शस्त्रबळापेक्षा दयाबळ हे अधिक सामर्थ्यवान असते शस्त्रात हानी आहे, दयेत हानी मुळीच नाही.

**वेगळया पध्दतीची अहिंसा :-**

माकडांमुळे शेतीतील नूकसान टाळण्यासाठी शेतकरी माकडांना गोकणीने हाकलीत. त्यामुळे माकडे गांधीच्या आश्रमातील शेतीकडे वळले. परिणामी आश्रमातील शेती नुकसानाने यायला लागली. ही बाब गांधींना कळली. तेव्हा या अहिंसक महात्म्याने पंचमहालाधून धनुष्यबानधारी भिल्ल बोलावले. व या माकडांना बाणांनी वेळ प्रसंगी घायाळ करण्याची परवानगी सुध्दा त्यांनी दिली.[19] म्हणजे महात्मा गांधी किती व्यवहारी होते हे हि यावरुन सिध्द होते. त्याचबरोबर प्रसंगानुरुप कोणत्या घटनेतून हिंसा व अहिंसा होते. याचा व्यवहारी दृष्टीकोण त्यांच मोठा होता. जीवदयेपक्षा गांधीजींची ही अहिंसा अगदी वेगळया प्रकारची होती. अहिंसेवर विश्वास असणाऱ्या व्यक्तीने स्त्रियांच्या शिल रक्षणार्थ शस्त्र उचललेच पाहिजे. याप्रसंगी जर तुम्ही मी अहिंसक असल्याचा आव आणत असेल तर तो धर्म आणि मानवतेचा अपराधी ठरेल.[20] गांधी म्हणत छेड काढणाऱ्या किंवा अत्याचार करणाऱ्या गुंडाचा स्त्रियांनी मिळेल त्या साधनांने प्रतिकार करावा, हा संदेश देऊन स्त्रियांना गांधींनी विचारले. "तुमच्यापाशी हाताची नखे, पायात चप्पल आणि चावा घ्यायला दात तर आहेत?" गुजरात विदयापीठातल्या मुलींना गांधींनी सल्ला दिला कि "बलात्काराचा प्रसंग असेल तेव्हा तुम्ही सुरा वापरला तरी त्यात आक्षेपार्य काही नाही. त्या वेळी तुमच्या बाबतीत ती अहिंसाच ठरेल"[21] कारण भ्याड माणसाला आपल्या अहिंसेमागे दडू दयायला गांधी तयार नव्हते. अहिंसा म्हणजे छळ करणाऱ्यांपुढे, आक्रमकांसमोर मान तुकविणे नव्हे ; अहिंसेत प्रतिघात अभिप्रेत आहेच हे भारताने जगाला दाखवून दयावे, अशी गांधींची इच्छा होती.

पाकिस्तानसबाबत महात्मा गांधींची भुमिका स्पष्ट हाती. पाकिस्तान अट्टाहात करीत असेत तर मग भारतीय संघराज्याला पाकिस्तान विरुध्द युध्द पूकारणे भाग पडेल. कारण "स्वातंत्र्य हिंदुस्थानचे आदय कर्तव्य आत्मरक्षण करणे हेच राहील."[22] खरे म्हणजे अहिंसेचे प्रत्यक्ष आचरण करणे या विकारी व झगडेखोर जगात किती बिकट असते हे मी प्रत्यक्ष पाहतोच आहे. ती एक अग्निपरिक्षा आहे. हे गांधीचे विचार राष्ट्रसंरक्षणात हे असे दिसुन येते. राष्ट्रसंरक्षणार्थ आपल्या सैनिकांने रक्त सांडले. तरी अश्रू न ढाळता सैनिकांचा गौरव करणे हे गांधीच्या अहिंसेला मोडणारे सुत्र आहे. परंतू युध्द होऊच नाही हा विचार त्यांनी सदैव रुजविण्यसाचा प्रयत्न केला आहे. अनूबाँबने हिरोशिमाला आत्मसात केले. तेव्हा गांधी स्वत:लाच म्हणाल की, "आताही जगाने अहिंसेचा स्विकार केला नाही, तर मानव जातीची आत्महत्या हा त्याचा निश्चित परिणाम असेल.[23] शस्त्रयुध्दाने सर्व जग जिंकण्यापेक्षा मनाचे विकार जिंकने मला कठीन वाटते. अहिंसा नम्रतेची पराकाष्ठा आहे.[24] नम्रतेसाठी मन स्वच्छ करणे गरजेचे आहे. त्याशिवाय युध्द टाळणे अशक्य युध्द टाळण्यासाठी समताधिष्ठित समाज निर्माण होणे अपेक्षित आहे. विषमतेवर आधारीत समाज कधीच अहिंसक राहू शकत नाही. अशी गांधींची धारणा होती.[24] म्हणून आर्थिक विषमता नष्ट करण्याकडे तयांनी अधिक लक्ष दिले.

महात्मा गांधींनी अहिंसेला कोटीजन-व्यापी आंदोलनाचे रुप देऊन, अहिंसेला युध्दाच्या मैदानात उभे केले. व तीचा उपयोग भारतीय स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केला. गांधींनी इंग्रजांना बजावले की, "आम्हाला गुलाम करण्याचा तुम्हाला कुठलाही अधिकार नाही. तुमच्या अन्यायाचा आम्ही विरोध करु पण हिंसेने नव्हे, सत्य आणि अहिंसेने. तुम्हाला गोळय चालवायच्या आहेत ? चालवा, लाठीचार्ज करा,

तुरुंगात डोंबा, आम्ही तुमच्याशी वाकडा शब्दसुध्दा बोलणार नाही. आमच्या मनात तुमच्याविषयी संताप, चीड, राग, व्देष नाही. प्रेमच आहे. खरे म्हणजे गांधींनी अहिंसेचे 'राष्ट्रीयकरण' केले."[26]

गांधींनी सर्व जगाला शांततेचा संदेश दिल्याने त्यांना महात्मा ही पदवी जनमानसाने प्रदान केली. तेव्हा गांधींनी आपल्या आत्मकथनामध्ये नमूद केले की, 'आपण संत किंवा संन्याशी नसून आपणाला कोणी महात्माही म्हणू नये.[27] महात्मा पदवीपेक्षा सत्य मला अनंत पटीने प्रिय आहे. मी महात्मा नसून अल्पात्मा आहे. माझ्याबद्दल मी केवह एवढाच दावा करु शकतो की, अहिंसेसारख्या महान वृत्तांना ओळखण्याकरिता आणि त्यांचा काया-वाचा-मनाने संपूर्ण पालन करण्याकरिता मी सतत प्रयत्नशील असतो.[28] तर महात्मा गांधींचे चरित्रकार बी. आर. नंदा म्हणतात, कदाचित कोण्याही सेनापतीने युध्दभुमीवर जेवढी संकटे झेलली नसतील तेवढी या अहिंसा सैनकाने झेलली आहेत. बाबा आमचेनी म्हटले की, "गांधी महात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाही, आणि उदयाच्या पिढयांना त्यांची ओळख पटण्यासाठी क्वचित कॉम्प्यूटर लागेल. पण काळाच्या भाळावर उमटलेली ती तरत युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही", आज आमटेंचे मत सत्य होतांना दिसत आहे.

जगाने गांधींची या सहस्त्रातील सर्वश्रेष्ठ महामानव म्हणून निवड केली आहे. भारतीयांना याची फारसी जाणीव नाही. म्हणून तर जर्मनितील प्राध्ध्यापकाने 'महात्मा गांधी इन्फरमेशन सेंटरची स्थापना करतांना म्हटले, आम्ही गांधींना येथे स्थापित करु नंतर भारतात एक्सपोर्ट, निर्यात करु, कारण भारतात एम्पोर्टेड आयात केलेल्या वस्तूच आवडतात.[29] आमटेंच्या मतानूसार आज मात्र गांधींचे महत्व भारतीय जनमानसातही मोठया प्रमाणात रुजत असलेले दिसून येते.

आजच्या स्थितीमध्ये राजकीय पक्ष आपल्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता हिंसेचा अधिकाधिक उपयोग करत आहेत. ही खरी गांधींच्या अहिंसक विचाराचा दिवाळखोरी म्हणून मान्य केली पाहिजे. गांधीजी म्हणत दुबळयांच्या अहिंसेचा काहीही उपयोग होऊ शकत नाही. भारताच्या शुरवीरांना अहिंसेचा अनूभव नाही आहे. शुरांची अहिंसा ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे. असे मी वारंवार सांगत राहिलो तर त्याचा फारसा लाभ होणार नाही. त्यासाठी प्रत्येक स्त्री-पुरषांने आपल्या आतला आवाज ओळखला पाहिजे. तरच त्यास अहिंसक विचाराची शक्ती काय याची जाणीव होईल.[30] अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळवून गांधींनी शुरविरतेची नवी परंपरा कायम केली. यामधून सर्व मानवजातीने गांधींचे अहिंसक विचार पेरण्याची, निजपण्याची, वाढवण्याची व संवर्धन करण्याची आज नितांत गरज आहे. खरे म्हणजे 'स्व' स्वार्थामुळे मानव आज दिशाहिन झाला आहे. आपली वृत्ती विघातक आहे की, विधायक आहे. तपासून घेण्याची कोणाचीच मानसिकता नाही. त्यामूळे मानवजातीचे भविष्य धोक्यात आले आहे. वर्तमानस्थितीमध्ये गांधींच्या अहिंसा विचारावर चिंतन-मनन करुन ते विचार आत्मसात करण्याची वेळ आली आहे. नसता भविष्य खडतर आहे.

**निष्कर्ष :-**

1) गांधीजींचे शरीर मारले जाऊ शकते, विचार मारले जाऊ शकत नाही. हे आज काळानेच सिध्द केले आहे.
2) गांधी म्हणजे कृतिशील श्रध्देची मूर्ती, शाश्वताचा सनातन प्रवाह होय.
3) मजबूरी का नाम गांधी नसून मजबूती का नाम गांधी हे सिध्द झाले आहे.
4) नैराश्याच्या आणि भ्रमनिरासाच्या युगात गांधी म्हणजे आशेचे प्रेषित आहेत.

**सारांश :-**

आज महात्मा गांधींचे विचार जगामध्ये सर्वमान्य होतांना दिसत आहे. विश्वातील बहुतांश विदयापीठामध्ये गांधींचे विचार जगामध्ये सर्वमान्य होतांना दिसत आहे. विश्वातील बहुतांश विदयापीठामध्ये गांधींचे विचार शिकविले जात आहेत. महात्मा गांधींना शुरांची अहिंसा अभिप्रेत आहे. दुबळयांना गांधी अहिंसेत स्थान देत नाही. शुरवीर-बलवान बनून अहिंसा तत्वाचे पालन केले पाहिजे हा मुळ उद्देश गांधींच्या अहिंसक विचाराचा आहे. अन्याय, अत्याचार करुन बलवान होण्याला गांधी शुर मानत नाही. गांधींनी सांगितलेल्या अहिंसक मार्गाचा अवलंब केल्यामुळेच आपणास नोबल पारितोषक मिळाले आहे व हे नोबल पारितोषक आम्ही गांधींना अर्पण करित आहोत असे अनेक नोबल विजेते भारतीय व परराष्ट्रीय यांनी म्हटले आहे. यावरुन आजही गांधींच्या अहिंसक विचाराची आवश्यकता आहे हे स्पष्ट होते.

जगामध्ये अहिंसक मार्गाने अन्यायी, अत्याचारी प्रस्थापितांना नमविण्याचे अनेक उदाहरणे आहेत. इजिप्तमध्ये सत्ताधीश होस्नी मुबारकला सामान्य जनतेने अहिंसक मार्गानेच सत्तेवरुन खाली खेचले. म्यानमारमध्ये एका नि:शस्त्र महिलेसमोर लष्करशाहीला झुकावे लागल. तर लिबीया या देशामधील राजेशाही जनतेने असहकार आंदोलनाने समाप्त केली. या सर्व परिवर्तनाच्या चळवळीमागे गांधी विचाराचा मोठा वाटा आहे. केवळ भारतातच नव्हे तर सर्व जगात 'शांतीदूत' म्हणून महात्मा गांधी यांना स्विकारले गेले आहे. म्हणूनच २ ऑक्टोंबर २००७ मध्ये संयूक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत 191 राष्ट्रांनी एकमताने ठराव मंजूर करुन ते ठराव पास केला की, 02 ऑक्टोंबर हा दिवस सर्व जगभर जागतिक शांतता दिवस किंवा अहिंसा दिवस म्हणून साजरा करावा. यावरुनच महात्मा गांधी यांच्या अहिंसक विचारांची आजही किती गरज आहे हे सिध्द होते.

**संदर्भ सूची :-**

1) नागोराव कुंभार, महात्मा गांधींजींचे सामाजिक तत्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातूर, 2012, पृ. (प्रस्ता-8).

2) चंद्रशेखर धर्माधिकारी, शोध गांधीचा, अक्षर प्रकाशन, मुबई, 2012, पृ. 22.
3) गांधीजी, हिंद स्वराज्य, परधाम प्रकाशन, पवणार, आ. आठवी, 2012, पृ. 24.
4) विनोबा (संपा. क्रांतीसिंह), गांधी जसे पाहिजे जाणले विनोबांनी, परधाम प्रकाशन, पवणार, 2013, पृ. 23.
5) मनुबहेन गांधी, बापू माझी आओी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, जूलै 2011, पृ. 29.
6) मुरलीधर शाह (संपा), गांधी गंगा, गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव, 2011, पृ. 77.
7) प्रभाकर मंगळवेढेकर (अनू) गांधी बापू, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 2011, पृ. 29.
8) कित्ता पृ. 31.
9) कित्ता पृ. 32.
10) कित्ता पृ. 47.
11) महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, सांकेत प्रकाशन, पूणे, 2013, पृ. 103,119.
12) श्रीपाल केळकर, एकला चलो रे, ग्रंथनिर्मिती केंद्र य.च.म. मुक्त विदयापीठ नाशिक, 2007, पृ. 57.
13) जुगतराय दवे, गांधींजी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 2011, पृ. 59.
14) आपटे गुरुजी, गांधीची गोष्ट, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,------, पृ. 139.
15) डोळे ना.य., हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, ग्रंथाली प्रकाशन, इंडीयन एज्यूकेशन सोसायटी, दादर-मुंबई, प्र. आ. 1998, पृ. 26.
16) बिपिनचंद्र (अनू. डॉ. एम. व्हि. काळे), इंडियाज स्ट्रगल फौर इंडीपेंडन्स, के. सागर पब्लिकेशन्स, पूणे, 2003, पृ. 429.
17) गांधीजी, हिंद स्वराज्य, पूर्वोक्त, पृ. (प्रस्ता-3).
18) कित्ता पृ. 52-54.
19) मुरलीधर शाह (संपा), गांधी गंगा, पूर्वोक्त, पृ. 51.
20) गांधीजी (संपा), हिंदी नवजीवन, 5-11-1925, पृ. 96.
21) श्रीपाद केळकर, एकला चलो रे, पूर्वोक्त, पृ. 58.
22) कित्ता पृ. 59.
23) प्यारेलाल, लास्ट फेज, खंड-2, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 1958, पृ. 801.
24) गांधीजी, सत्याचे प्रयोग, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, आ. 14 बी, 2005, पृ. 474.
25) खेर वी. बी. (संपा), इकोनोमिक एन्ड लाईफ रिलेशन्स, खंड-1, नवजीवन प्रकाशन, पृ. 112
26) मुरलीधर शाह, गांधी गंगा, उपरोक्त, पृ. 78
27) चंद्रशेखर धर्माधिकारी, शोध गांधींचा, उपरोक्त, पृ. 15.
28) गांधीजी (संपा), हिंदी नवजीवन, पृ. 84.
29) चंद्रशेखर धर्माधिकारी, शोध गांधींचा, उपरोक्त, पृ. 235.
30) महात्मा गांधी, हरिजन सेवक, हिंदी साप्ताहिक, 29-6-1947, पृ. 177.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी यांचे सत्य आणि अहिंसेविषयक विचार

**डॉ. मधुकर रामचंद्र साठे**
वाणिज्य शाखा प्रमुख
कै. डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय कळमनुरी जि. हिंगोली.

---

**प्रस्तावना**

सत्य, अहिंसा आणि सदाचार इत्यादी तत्वे आणि मानवीय जिवन मुल्यांची चर्चा होते तेव्हा आपल्या समोर एकाच व्यक्तिचा चेहरा तरळु लागतो आणि तो म्हणजे म. गांधीजी वैश्विकरणाच्या वर्तमान जगात गाव महानगरे बनु लागली आहेत. भारत एक विकसनशील राष्ट्र आहे. चालु असलेल्या आर्थिक उदारिकाणात स्वतःला झोकुन देण्यात संघर्षरत असलेल्या भारताची अधिकची फरफट होतानां आपनास दिसून येते.

कृषिप्रधान आणि परंपरागत अर्थव्यवस्था असलेल्या भारताला आपल्या अर्थव्यस्थेशी जगाच्या अर्थव्यवस्थेसोबत चालण्यासाठी थोडयाफार प्रमाणात अस्वस्थ वाटू लागले आहे. म. गांधीजींनी या सर्व बाबींचा विचार करून भारतीय अर्थव्यवस्थेची दशा आणि दिशा या दोहोन विषयी आपली मते मांडले आहेत. त्याचाच विचार आपण या ठिकाणी करणार आहोत.

**स्वदेषी वस्तुंचा वापर :**

महात्मा गांधीजींनी असहकार आंदोलना सोबतच स्वदेशी वस्तुंच्या वापराचे आंदोलन पण चालवले. गांधीजींच्या स्वदेशी वस्तुच्या वापराच्या आंदोननाने भारतातील पारंपरीक उद्योग धंदे सुरू राहतील. हे उद्योग पुर्ववत असेच चालु राहीले तर त्यातुन भारतीय कारागिरांना काम व रोजगार मिळेल आणि भारताची अर्थ व्यवस्था भक्कम होईल. महात्मा गांधीजी चा स्वदेशी नारा भारती औद्योगिक क्रांतीसाठी खुपच फायदेमंद होता. स्वदे**प्रा. डॉ. मुसळे आर. एस.** शी वस्तुंच्या वापराने भारतीय चलन विदेशात न जाता भारतातच राहील आणि यामुळे देशाच्या अर्थव्यस्थेला प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष हात–भारच लागेल असे त्यांचे मत होते. '' गांधीजी ने असीमित संपत्तिधारक उद्योगपति की संपत्ती को समाज के अन्य वर्गों, शोषित, पीडितो, की सेवा मे लाने के लिए तथा उद्योगों के व्दारा मजदूर वर्ग के साथ हो रहे अन्याय शोषण से मुक्ति के लिए तथा उद्योगों के लिए ऐसे सिद्धांत की स्थापन की जिससे समाज में आर्थिक विषमात कम हो।'' [01]

**भांडवलषाही व्यवस्थेचा विरोध :**

महात्मा गांधीजीनी भांडवलशाही व्यवस्थेचा पूर्णतः विरोध केला आहे. त्यांच्या मते भांडवलशाही च्या समर्थनामुळे गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे. गांधीजींच्या मतानुसार देशातील अर्थव्यवस्था देशातील मानवाच्या कल्याणासाठी उपयोगी असली पाहिजे. याच संदर्भाने आपले विचार व्यक्त करतांना दीपांशु अग्रवाल लिहतात – ''गांधी जी की दृष्टि में अर्थशास्त्र शब्द के 'अर्थ' को धर्म से जोडे बिना ना तो कोई चिन्तन किया जा सकता है और ना ही कोई क्रियाकलाप किया जा सकता है। उनकी आर्थिक नीति की अवधारणा मानवता पर आधारित है।''[02]

**ग्राम विकासातुनच राष्ट्रविकास :**

गांधीजींच्या स्वप्नातील भारत खेडयानमध्ये वसलेला आहे. त्याच्यां मते भारत खेडयानी बनलेला देश आहे. भारताची 70 टक्यापेक्षा जास्त लोकसंख्या आज ही खेडया – पाडयातच राहते. या आशयाने देशाच्या अर्थव्यस्थेत बदल करावयाचा असेल तर अगोदर खेडयांचा विकास करने तितकेच गरजेचे आहे. गांधीजीच्या मते खेडयांचा विकास लोक सहभागातू होने अपेक्षित आहे. आज गावातील भांडने शहरी न्यायालयात सोडविल्यामुळे खेडयाच्या जनतेचा वेळ आणि पैसा दोन्हींचा व्यय होत आहे. साबतच ही ग्रामवासी भोळी भाबडी मानसे शहरी सभ्यतेची गुलाम बनत चालली आहेत यात काही दूमत नाही. याच आशयाने आपले व्यक्त करताना भारदे बाळासाहेब लिहितात – ''लोकांचेच एकमेकांना सहकार्य असेल, सामुदायिक कल्याणासाठी आपण आपले श्रम देणार असाल तर त्यामुळे निश्चितच खेडयांचा विकास होईल. गावाचे उत्पन्न वाढेल. गावातील साधनसामुग्री अपुरी असली तरी किमान लोकांच्या गरजा पूर्ण करू शकेल, परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे खेडयातील लोकांना आपली स्थिती सुधारावी असे वाटतच नाही।''[03]

म. गांधीच्या मते एके काळी भारतीय खेडी स्वयंपूर्ण होती. खेडयातील प्रत्येक व्यक्ति सुख, समृध्द आणि स्वावलंबी जीवन जगत होता. म. गांधीजी आपल्या जीवनात भारतीय कॉंग्रेसच्या माध्यमातुन लोकशाहीवादी आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मीतीसाठी सदैव प्रयत्नशील राहीलेले दिसून येतात.

म. गांधीजीनी आपल्या विचारात गावांच्या आर्थिक विकासासाठी शेती व शेतीवर आधारित प्राथमिक कुटिर उद्योगांना प्राथमीकता दिली आहे. ग्रामीन खादी, हस्तकला, कलाकुसर, इत्यादी लघुउद्योगांच्या विकासातुन ग्रामीन जनतेचा विकास होउ शकेल असे विचार म. गांधी यानी आपल्या लेखनातुन व आचरणातुन व्यक्त केले व शहरी लोकांना खेडयाकडे चला असा संदेश दिला.

सत्ता आणि आर्थिक विकेंद्रीकरणातुन शोषण रहीत समानताधिष्टित समाज उदयास येईल असे त्यांचे मत होते. विविधतेनी नटलेली भारतीय खेडी ही भारतीय संस्कृतिची खरी ओळख आहे. वर्तमानात हिच खेडी आपले स्वयंशासन व स्वावलंबन सोडून आपल्या गरजांसाठी इतरत्र पाहत आहेत. यातुनच त्यांचा ऱ्हास होत असलेला आपल्याला दिसतो आहे.

अंकर डेस्मंड यांच्या मते, ''ग्रामीण विकास म्हणजे कृषीक्षेत्रात मत्स्यपालन, ग्रामीण उद्योग किंवा हस्तकौशल्य तसेच सामाजिक व आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी उपलब्ध भौतिक व मानवीय साधनांचा पूर्णपणे उपयोग करून ग्रामीण जनतेचा जीवनस्तर उंचावण्यासाठी स्वीकारली गेलेली व्यूहरचना, धोरणे किंवा कार्यक्रम यांचा समन्वय होय।''[04]

**सारांष**

वरील विवेचनाच्या आधारे आपन अशा निष्कर्षापर्यंत येवून पोहंचलो आहेत की म. गांधीजींचे आर्थिक विचार खुपच सुक्ष्म आणि सरळ आहेत. या विचाराच्या सुक्ष्मतेमध्ये त्यांची महानता दडली आहे. गांधीजीच्या मतानुसार जोपर्यंत समाजव्यस्थेच्या शेवटच्या घटकापर्यंत आर्थिक विकासाची नांदी पोहंचनार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशाचा आर्थिक विकास होत आहे असे म्हणता येणार नाही.

**संदर्भ सूची**

01. दीपांशु अग्रवाल – महात्मा गांधी के आर्थिक विचारों की सार्थकता
राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली प्रकाशन वर्ष – 2011, पृष्ठ –67
02. भारदे बाळासाहेब – गांधी विचारदर्शन – ग्रामस्वराज्य
पृथ्वीराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती – 1995, पृष्ठ–15

CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधीजींचे राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार

**प्रा. डॉ. विलास आघाव**
विभाग प्रमुख (पदवी, पदव्युत्तर), आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जि. हिंगोली - 431 513

---

**सारांश**

महात्मा गांधी या देशाला एकतेच्या सुत्रामध्ये बांधणारे महान राष्ट्रनायक होत. गांधीजींनी आपल्या विचार व आचरनातून भारतीय लोकांना एकतेची शिकवण दिली. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा व पंथाचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये अनेक कारणावरुन संघर्ष होऊन राष्ट्रीय एकात्मतेला तडा जातो. अशा या विविधता संपन्न भारतामध्ये एकता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने म. गांधीचे विचार महत्वपूर्ण आहेत.इंग्रजांशी चालू असलेल्या राजकीय संघर्षात यश मिळविण्यासाठी निरनिराळ्या गटाची अभेद एकजूट निर्माण होण्याची आवश्यकता होती म्हणून गांधीजींनी सत्याग्रहाइतकाच राष्ट्रीय एकात्मतेवरही भर दिला होता. इंग्रजपूर्व काळात भारतीय समाज कधीच एकसंघ नव्हता. धर्म, भाषा, आणि शेकडो लहान मोठी राज्य यांनी तो शतश: विदीर्ण झालेला होता. त्यातील प्रत्येक गटाची अस्मिता संकुचित व स्वयंकेंद्रीत होती.

धर्म, भाषा, जाती आणि वाढती आर्थिक विषमता यांनी विभागल्या गेलेल्या समाजामध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना कशी निर्माण करायची हाच येथील नेते व समाज चिंतकापुढील एक महत्वाचा प्रश्न होता. धर्मनिरपेक्ष शासन, लोकशाही जीवन पध्दती, व्यक्तीचे मूलभूत हक्क, समानता, सामाजिक न्याय, अहिंसा आणि सामाजिक जीवनाची पूर्णबांधणी केल्याशिवाय राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित होणार नाही हे गांधीजींनी ओळखले होते. म्हणून हिंदु-मुस्लीम, स्पृश्य व अस्पृश्य, शहरी आणि ग्रामीण, सुशिक्षित आणि अशिक्षित, गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दुरावा नाहीसा करुन त्यांना एकाच राष्ट्रीय प्रवाहात सामील करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांनी आपल्या विधायक कार्यक्रमाची आखणी केली होती.

आपल्या एकात्मिक ध्येयधोरणाचा भाग म्हणून गांधीजींनी आर्थिक स्थरावर देखिल आपले विचार व्यक्त केले आहेत. कुटीरोद्योगासह स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेच्या पायावर उभी असलेली स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थाच आदर्श समाजव्यवस्था निर्माण करु शकते, असे गांधीजींना वाटते. तथापि, त्यांच्या विचारातील विश्वस्ताची संकल्पना किंवा त्यांच्या इतर आर्थिक संकल्पना यांची तर्काधिष्टीत दृष्टीकोनातून संयुक्तिकरित्या मांडणी करण्याचा गांधीजींनी कधीच प्रयत्न केलेला नाही. मानवाचे उच्च नैतिक चारित्र्य आणि त्या अनुषंगाने त्याच्या जाणजाणीवा वृध्दींगत करुनच आदर्शवत समाजाचे उद्‌दीष्ट साध्य होऊ शकते, अशी गांधीजींना खात्री होती. आर्थिक स्तरावरील समाजात असेलेल्या आहे रे नाही रे या समाजघटकातील संघर्ष टाळून एकीकडे आर्थिक प्रभुत्वशाली समाज घटकांच्या हितसंबंधाला त्यांना ठेच पोहचवायची नव्हती. तर दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत असणाऱ्या रयेतस दिलासा देवून त्यांना राष्ट्रीय लढ्यात समाविष्ट करुन स्वातंत्र्य प्राप्तीचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे ध्येय गांधीजींना पुढे रेटायचे होते.

शतकानुशतके दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनवून त्यांच्यातील नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत करुन ब्रिटीश अधिसत्तेविरुध्द लढण्याकरीता त्यांना कटिबध्द करणारे राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व यशस्वीपणे करुन राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणारे व राष्ट्रपिता म्हणून गौरविले गेलेले केवळ भारतालाच नव्हे तर हिंसाचार, विध्वंस विनाश यामुळे भयग्रस्त झालेल्या जगाला सत्य, अहिंसा व शांतता यांचा मौलीक संदेश देवून मानवी कल्याणाचा मार्ग दाखवणारे महान राजकीय संत म्हणून भारताच्या इतिहासात गांधीजीचे नाव अजरामर झालेले आहे.

महात्मा गांधी या देशाला एकतेच्या सुत्रामध्ये बांधणारे महान राष्ट्रनायक होत. गांधीजींनी आपल्या विचार व आचरनातून भारतीय लोकांना एकतेची शिकवण दिली. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा व पंथाचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये अनेक कारणावरुन संघर्ष होऊन राष्ट्रीय एकात्मतेला तडा जातो. अशा या विविधता संपन्न भारतामध्ये एकता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने म. गांधीचे विचार महत्वपूर्ण आहेत.

**बीजसंज्ञा -** राष्ट्रीय एकात्मता, धर्म, भाषा, सांप्रदायिकता, मुलतत्ववाद, प्रांतवाद, जातीवाद ,सर्वधर्मसमभाव:

**उद्देश:**

1) राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना स्पष्ट करणे.

2) भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढील आव्हानांचा शोध घेणे.

3) महात्मा गांधीचे राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार जाणून घेणे.

4) राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हानाच्या निराकरणासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितके:**

1) मानवाच्या शांततापूर्ण सहअस्तित्वासाठी गांधी विचार महत्वपूर्ण आहेत.

2) सांप्रदायिकता, मुलतत्ववाद, प्रांतवाद, जातीवाद यांना प्रोत्साहन देणाऱ्या विचाराच्या निराकरणासाठी गांधी विचारांची आवश्यकता आहे.

3) गांधी विचारातून राष्ट्रीय एकात्मता साध्य होऊ शकते.

वरील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

**संशोधन पध्दती**:

प्रस्तूत प्रकल्पलेखनाच्या संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे. यामध्ये सामाजिक संशोधन पध्दतीतील प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करुन तथ्य संकलन केले आहे.

**तथ्य संकलन**:

प्रस्तूत विषयावर प्रकल्पलेखन करण्यासाठी तथ्य संकलन केले जाईल. तथ्य संकलनासाठी विषयाच्या अनुषंगाने पध्दतीचा आधार घेतला आहे.

**म.गांधीजींचे राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी विचार**

महात्मा गांधी या देशाला एकतेच्या सूत्रामध्ये बांधणारे महान राष्ट्रनायक होते. गांधीजींनी आपल्या विचार व आचारातून भारतीय लोकांना एकतेची शिकवण दिली. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा, पंथाचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये अनेक कारणावरुन संघर्ष होऊन राष्ट्रीय एकात्मतेला तडा जातो अशा या विविधता संपन्न भारतामध्ये एकता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने म. गांधीजींचे विचार महत्वपूर्ण आहेत. महात्मा गांधी धर्मनिष्ठेने भारलेल्या अशा वातावरणात जन्मले व वाढले. त्यांच्या विचारप्रणालीतही धर्माला फार महत्वाचे स्थान होते. सत्य हाच परमेश्वर आणि विशूध्द सत्याची उपासना म्हणजेच धर्म अशी त्यांची धारणा होती.

दिवसेंदिवस सुधारलेल्या लोकांत धर्माविषयी अनास्था वाढत आहे. ही स्थिती अशीच चालू राहीली तर अखेर मानवतेचा नाश होईल. भौतिक सुधारणा म्हणजेच जीवन सर्वस्व असेच मानून धर्मभावनेचा उच्छेद करण्याची कोणी कितीही प्रयत्न केला तरी त्यात त्यांना यश येणार नाही. कारण धर्म ही मानवी मुलभूत गरज आहे. या दृष्टीने धर्म हाच जगाचा आधार आहे असे गांधीजी सांगतात.

गांधीजींनी धर्माची व्याख्या करीत असतांना असे म्हटले आहे की, धर्म म्हणजे माझ्या मते परंपरागत धर्म नसून तो धर्म आहे जो धर्माचा मूळ असून आपणास ईश्वराचा साक्षात्कार करण्यास मदत करतो. धर्म आपला प्रत्येक कार्यात समाविष्ट असला पाहिजे असा धर्माच अर्थ सांप्रदायवाद नसून हा धर्म हिंदुत्व, इस्लाम आणि ख्रिश्चन इत्यादींपासून वेगळा आहे.

व्यक्ती धर्माशिवाय जगू शकत नाही. गांधीजींचा धर्म मूलत: मानवतावादी आहे. त्यांचे प्रमुख लक्ष्य मानवसेवा आहे. गांधीजींच्या मते धर्माचे प्रमुख तत्व सत्य आणि प्रेम किंवा अहिंसा हे आहेत. गांधीजींनी व्यक्तींच्या शारीरीक, मानसिक आणि आचरणात्मक घटकांना धर्माशी संबंधीत मानले आहे.

गांधीजींनी आपल्या धर्मास विज्ञानाशी संबंधित बनविले आहे. कारण विज्ञज्ञन हे रुढी, अंधविश्वास प्रथा, परंपरेच्या विरोधी आहे. स्वामी विवेकानंद सुध्दा गांधीजींसारखे पारंपारिक व रुढीवादी कर्मकांड मानणाऱ्या धर्मावर टिका करतांना म्हणतात. मंदिर, चर्च, धर्मग्रंथ किंवा कोणत्या ईश्वराची मूर्ती म्हणजे धर्म नव्हे. धर्म हे बौध्दिक विलास नसून ती एक अनुभव घेऊन अंतकरणाने स्विकारण्याची वस्तू आहे. गांधीजींच्या मते सत्य, अहिंसा, ब्रम्हचर्य आणि अपिरग्रह हे पाच तत्व धर्म पालनासाठी आवश्यक आहेत.

गांधीजींच्या जीवनात धर्माचे महत्व स्पष्ट करत असतांना डॉ. राधाकृष्णन म्हणतात, "गांधीजींच्या जीवनातील प्रत्येक कार्यात धर्म हे प्रमुख प्रेरणा स्त्रोत होते." तसेच प्रो. विनय कुमार यांच्या मते गांधीजींच्या जीवनाची व विचाराची सुरुवात धर्मापासून होते. त्यामुळे गांधीजी सुध्दा हे मान्य करतात की धर्माशिवाय त्यांचे अस्तित्व शून्य आहे.

**सर्वधर्मसमभाव**:

गांधीजींनी आपल्या एकादश वृत्तामध्ये सर्वधर्मसमभाव यावर भर दिलेला आहे. त्यांच्या मते सर्व धर्म ईश्वर दत्तच आहेत. परंतु ते मनूष्य कल्पित असल्यामुळे अपूर्ण आहेत. त्याला भाषेमध्ये व्यक्त करणारा मनुष्य आहे. त्याचा अर्थ लावणाराही मनुष्यच आहे. त्यामुळे कोणाचा अर्थ खरा समजायचा सर्वच धर्माचे लोक आपापला धर्म खरा मानतात. याचाअर्थ असा नाही की सर्व धर्म खोटे आहेत. म्हणूनच आपण सर्व धर्माकडून समभाव बाळगावा यामुळे स्वत:च्या धर्माबद्दल उदासिनता येत नाही तर स्वत:च्या धर्माविषयी आपले प्रेम आंधळे होण्याऐवजी ज्ञानमय बनते. सर्वधर्मविषयी समभाव बनेल तेंव्हाच आपले दिव्यचक्षू उघडतील, धर्मज्ञान होताच आडपडदे उडून जातात व समभाव उत्पन्न होतो.

गांधीजी म्हणतात, धर्म माणसांना जोडण्याचे कार्य करीत असतो, तोडण्याचे नव्हे. कारण तोडण्याचे कार्य तर अधर्माचे असते. कुठल्याही धर्माचे दुसऱ्या धर्माशी भांडण नसते तर सर्व धर्माचे अधर्माशी भांडण असते. त्यांच्या मते शाश्वत मूलतत्वे सर्व धर्मात जवळपास समानच आहेत. सत्य बोलणारा जसा हिंदू आहे तसेच मुसलमानही आहेत. कुठलाही धर्म खोटे बोला असे म्हणत नाही. परंतु आज मात्र सर्व धर्मातील चांगली तत्वे रद्द केल्यानंतर जे कर्मकांड उरते त्यालाच लोक धर्म समजतात आणि मुल्ला मौलवी व पूरोहीत या कर्मकांडाला खतपाणी घालण्याचे कार्य करतात म्हणून गांधीजी धर्म आणि अध्यात्म असे दोन शब्द वापरतात. त्यांच्या मते धर्मांधता म्हणजे धर्म नव्हे.

गांधीजींच्या सर्वधर्म सामुदायिक प्रार्थनेत परस्परांच्या भलाईसाठी केलेले आवाहन असे, हिंदू-मुसलमानांचे भले व्हावे म्हणून प्रार्थना करीत, हिंदू व ख्रिश्चनाचे भले व्हावे म्हणून मुसलमान प्रार्थना करीत सर्व मिळून परस्परांच्या भलाईसाठी प्रार्थना करतील म्हणून गांधीचा धर्म किंवा अध्यात्म माणसांना जोडणारे होते, तोडणारे नव्हे. याविषयी गांधीजी म्हणतात, धर्म लोगों को एक दुसरे से प्रथक करने के लिए नही है, व े एक दुसरों को जोडने के लिए है।

**राष्ट्रीय ऐक्य आणि महात्मा गांधी**:

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या भारताचा स्वातंत्र्य लढा हा केवळ सत्ता बदलासाठी झालेला राजकीय लढा नव्हता. तर या लढ्यात स्वातंत्र्य या मुल्याबरोबरच समता आणि बंधुता ही मुल्यही तेवढीच महत्वाची मानलेली होती. विविध धर्म, जाती, समुदाय, भाषा यांच्यात विभागलेल्या भारतीयांना स्वातंत्र्याच्या लढ्याने आणि गांधीजींच्या नेतृत्वाने एकत्र आणले. स्त्री-पुरुष समानता, अस्पृश्यते सारख्या अमानुष रुढीचा त्याग, आर्थिक स्वावलंबन आणि परस्पर सहकार्यावर आधारलेली स्वायत्तता या गांधीजींच्या विचारसुत्रांनी स्वातंत्र्य

लढ्याला एक व्यापक परिणाम आणून दिले. म्हणूनच महात्मा गांधीजींना राष्ट्रपिता म्हणून संबोधण्यात येते.

**हिंदू मुस्लीम एकता:**

'ऐक्य हेच बळ' हे केवळ कित्त्यातले सुवचन नसून तो जीवनधर्म आहे, ही गोष्ट हिंदु-मुसलमान ऐक्याच्या प्रश्नाबाबत जितकी स्पष्टपणे निदर्शनास येते तितकी दुसरी कोणत्याही बाबतीत ती येत नाही. जोपर्यंत हिंदू आणि मुसलमान ऐकमेकांचे गळेकापू पाहत आहेत तोपर्यंत कोणतीही त्रयस्थ सत्ता हिंदुस्थानला खुशाल गुलामीत ठेवू शकते. हिंदु-मुसलमान ऐक्य म्हणजेच केवळ हिंदु-मुसलमान यांचेच ऐक्य नव्हे तर हिंदुस्थानानला जो कोणी आपले घर मानतात अशा सर्वांचे ऐक्य मग त्यांचे धर्म कोणताही असोत. ऐक्याचे हे वाढणारे रोपटे असून नाजूक, बाल्यावस्थेत आहे. त्यांच्याकडे विशेष लक्ष देवून त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे, असे गांधीजी म्हणतात व अहिंसेच्या प्रयोगाचे पुढील उपाय सुचवितात.

**कायद्याने एकता स्थापित होत नाही तर त्यासाठी ह्दयाचे मिलन झाले पाहिजे:**

आपल्याला जे ऐक्य हवे आहे ते कसेही जोडलेले नको. तर ह्दयांचे मिलन हवे आहे. हिंदुस्थानातील हिंदू आणि मुसलमानांचे अभेद्य असे मिलन झाले नाही तर हिंदुस्थानचे स्वराज्य हे एक असंभाव्य स्वप्नच ठरेल, हा संशयातील सिध्दांत खंबीरपणे मान्य करुन त्यावर ऐक्य उभे राहिले पाहिजे. तो फक्त दोघांमधील तहनामा असता कामा नये, तर एकमेकांच्या धर्माविषयी आदर बाळगणाऱ्या समान दर्जाच्या लोकामध्ये ती भागीदारी झाली पाहिजे.

**सांप्रदायिकतेला विरोध:**

धार्मिक क्षेत्रात पारंपारिक कर्मकांडानूसार वागण्याऐवजी सत्य आणि बुध्दवाद यांना अधिक महत्वाचे योगदान देणे हे गांधीजींचे मुलभूत योगदान होय. गांधीजींना सांप्रदायिकता हा भारतीय इतिहासावरील कलंक वाटत होता. म्हणून धर्माचे खरे स्वरुप जाणून घेणे व तथाकथित धर्मकांडापासून लांब राहणे त्यांना इष्ट वाटत होते. जबरदस्तीने कुठल्याही धर्माचा प्रचार करणे, धर्मपरिवर्तन करणे त्यांना पटत नसे. एका धर्मातल्या लोकांनी दुसऱ्या धर्मातल्या लोकांवर हल्ले करणे, एकमेकांची प्रार्थनास्थळे उध्वस्त करणे या सर्व गोष्टी अमानवीय आहेत, असे त्यांचे म्हणने होते.

**धार्मिक एकता:**

हिंदुना आपले हाडवैरी समजून त्यांच्याशी वागावे असा इस्लामाच्या अनुयायांना आदेश देणारी वचने जर पवित्र कुराणात असतील किंवा हिंदु-मुसलमानामध्ये कायमचे वैर आहे असे मानायला हिंदुशास्त्रात जर काही असते तर अशा प्रकारचे ऐक्य घडवून आणण्याची सर्वस्वी आशा मी सोडून दिली असती. परंतु तसे मानण्यासारखे दोन्हीही धर्मात काहीही सांगितलेले नाही.

**धर्मधिष्टीत राज्याला विरोध:**

भारतातल सारी जनता एकाच धर्माची असती तरी धर्मविष्टीत राज्याच्या प्रस्तावाला विरोधच राहीला असता या गांधीजींच्या म्हणण्यामागे खुप मोठा अर्थ होता. व्यक्ती धर्मनिष्ठ असावी पण राज्य मात्र धर्मातीत असावे. सन 1931 च्या कराची अधिवेशनाच्या वेळी 'राज्य सर्व धर्माच्या बाबतीत तटस्थ राहील' असा ठराव पास करण्यात आला होता. त्याबद्दल लुई फिशरनी एके ठिकाणी असे मत व्यक्त केले आहे की, "महम्मद अली जीना हे तरुणपणी एक निधर्मी राष्ट्रवादी होते, पण शेवटी त्यांनी धर्मधिष्टीत राष्ट्राची स्थापना केली. गांधीजी पूर्णत: धर्मपारायण होते, पण त्यांनी एका निधर्मी राष्ट्राच्या स्थापनेसाठी प्राणही दिले."

**व्दिराष्ट्रवादाला विरोध:**

गांधीजींचे असे मत होते की, भारतातल्या बहुसंख्या मुसलमानांचे वाडवडील याच देशात जन्मले व वाढले, धर्म बदलला म्हणून राष्ट्र कसे बदलेल? काँग्रेसने परिस्थितीवश विभाजन स्विकारले असले तरी स्वतंत्र भारताने एका धर्मावर आधारीत असलेलया राष्ट्राची निर्मीती केलेली नाही हे लक्षात घ्यायला हवे. हिंदू-मुस्लीम एकतेसाठी गांधीजींनी जेवढे प्रयत्न केले तेवढे कुठल्याही राजकीय नेत्याने केलेले आठवत नाहीत.

**फाळणी टाळण्याचा प्रयत्न:**

भारताचे विभाजन होवू नये आणि धर्माच्या आधारावर तर होवूच नये असा गांधीजींचा आग्रह होता. कारण देशाची फाळणी ही धार्मिक साम्राज्याच्या मुळावर घाव घालील असे गांधीजींना वाटत होते. फाळणी टाळण्यासाठी सर्व प्रकाराच्या त्यागाला ते तयार होते. मुस्लीमांचे समाधान होईल अशा सर्व प्रकारच्या सवलती व संरक्षण तरतुदी भारतात कराव्यात परंतु पाकिस्तानची निर्मीती टाळावी. फाळणीनंतर कलकत्ता, नौखाली, बिहार आणि अखेरीस दिल्ली येथे गांधीजींनी जातीय उग्र दंगली थांबविण्यासाठी आपले प्राणही पणाला लावले यामुळे या जातीय दंगली शांत झाल्या.

**आर्थिक समानता आणि राष्ट्रीय ऐक्य:**

आपल्या एकात्मिक ध्येयधोरणाचा भाग म्हणून गांधीजींनी आर्थिक स्थरावर देखिल आपले विचार व्यक्त केले आहेत. कुटीरोद्योगासह स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेच्या पायावर उभी असलेली स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थाच आदर्श समाजव्यवस्था निर्माण करु शकते, असे गांधीजींना वाटते. तथापि, त्यांच्या विचारातील विश्वस्ताची संकल्पना किंवा त्यांच्या इतर आर्थिक संकल्पना यांची तर्काधिष्टीत दृष्टीकोनातून संयुक्तिकरित्या मांडणी करण्याचा गांधीजींनी कधीच प्रयत्न केलेला नाही. मानवाचे उच्च नैतिक चारित्र्य आणि त्या अनुषंगाने त्याच्या जाणजाणीवा वृध्दींगत करुनच आदर्शवत समाजाचे उद्‌दीष्ट साध्य होऊ शकते, अशी गांधीजींना खात्री होती. आर्थिक स्तरावरील समाजात असेलेल्या आहे रे नाही रे या समाजघटकातील संघर्ष टाळून एकीकडे आर्थिक प्रभुत्वशाली समाज घटकांच्या हितसंबंधाला त्यांना ठेच पोहचवायची नव्हती. तर दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत असणाऱ्या रयेतस दिलासा देवून त्यांना राष्ट्रीय लढ्यात समाविष्ट करुन स्वातंत्र्य प्राप्तीचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे

ध्येय गांधीजींना पुढे रेटायचे होते. गांधीजींच्या मते, भांडवलदार किंवा जमीनदार हे मुलत: शोषक नसल्याने श्रमजीवी अन त्यांच्यात हितसंबंधाबाबत टोकाचा विरोध नाही. म्हणून भांडवलदार आणि जमीनदार यांचा नाश करण्याऐवजी श्रमजीवी आणि त्यांच्यात सौख्य प्रस्थापित करण्याची गरज आहे. श्रीमंत माणसाने (भांडवलदार किंवा जमीनदार) मालमत्ता किंवा उत्पादन साधनावरील स्वत:चे नियंत्रण एक विश्वस्त म्हणून ठेवावे. उत्पादनावरील स्वत:च्या गरजेपुरता हिस्सा वेगळा करुन उर्वरित उत्पादन विरतरणाच्या समतेच्या तत्वानुसार सामाजिक उपभोगासाठी द्यावे.

**अस्पृश्यता निवारण हा राष्ट्रीय ऐक्याचा एक अविभाज्य भाग**:

समाजात अभेद्य एकजुट निर्माण करण्यासाठी अस्पृश्यांना अस्पृश्य या बंधनातून मुक्ती मिळवून देणे हा स्वातंत्र्य लढ्याचा एक अविभाज्य भाग आहे. अस्पृश्यता ही भारतीय हिंदू धर्मातील एक भयंकर विकृती आहे असे गांधीजी मानत असत आणि या अस्पृश्यतेच्या निर्मुलनासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

**निष्कर्ष**

महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मतेतील योगदान व त्यांच्या विचारांचा अभ्यासांती पुढील निष्कर्ष काढले आहेत.

1) महात्मा गांधी यांनी देशाची एकता व अखंडता याला प्राधान्य दिले आहे.

2) भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणारे अनेक घटक आहेत उदा. जातीवाद, प्रांतवाद, भाषावाद, सांप्रदायवाद, नक्षलवाद, दहशतवाद, फुटीरतावाद इ.

3) जागतिक अशांतता व देशांतर्गत असुरक्षितता यावर प्रभावी उपाय गांधी विचारातच आहेत.

4) मानवाच्या शांततापूर्ण सहअस्तित्वासाठी गांधी विचार अंगीकारणे आवश्यक आहे.

5) गांधी विचारातूनच राष्ट्रीय एकात्मता कायम राहू शकते.

6) गांधी विचारातून ग्रामीण विकासाला चालना मिळू शकेल आणि याव्दारेच प्रादेशिक असमतोल विकास टाळला जाऊ शकेल.

**संदर्भसूची**


1) शिखरे दा.न., गांधी विचार दर्शन (हरिजन) खंड 7 वा, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे, 1995.

2) शिखरे दा.न.,गांधी विचार दर्शन, खंड 3 रा, नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, 1969.

3) धर्माधिकारी भाऊ, गांधी विचार दर्शन - राजकारण, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1995.

4) गांधी मो.क., माझ्या स्वप्नांचा भारत, परधान प्रकाशन, पवनार, वर्धा, 2007.

5) मोहनराव यु.एस., महात्मा गांधीजींचा संदेश, माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, 1960.

6) गांधी मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, 2008.

7) गांधी मो.क., हिंदस्वराज्य, परधान प्रकाशन, वर्धा, 2007.

8) कृपलानी कृष्णा, गांधी जीवन चरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट इंडीया, दिल्ली.

9) भारदे बाळासाहेब, गांधी विचारमीमांसा महाराष्ट्र गांधी स्मारक निधि प्रकाशन गांधी भवन कोथरुढ, पुणे 1993.

10) पटवर्धन अप्पा, मंगल प्रभात, परधान प्रकाशन, पवनार, वर्धा, 2007.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# ''21 व्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचाराची आवश्यकता''

प्रा.डा. बी. जी. जोगदंड

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय, अकोला

---

प्रस्तावना

भारत आणि भारतीयांची ओळख समान्यतः महात्मा गांधी शिवाय अपूर्ण आहे, भारतीय स्वतंत्र चळवळीतील त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय स्वतंत्र लढा हा त्यांच्या व्यक्तिमत्व व कार्याभौवती केंद्रित झाला. भारतीय स्वतंत्र लढ्यातील गांधीजी ही एकमेव अशी व्यक्ती होय की, जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचले होते, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. स्वातंत्र्ययोद्धे, समाजसुधारक, शिक्षण तज्ञ, राजकीय विचारवंत, अर्थतज्ञ वगैरे सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध दिलेला लढा हा मानव समाजाच्या इतिहासातील अपूर्व लढा होता. त्यांच्या या गुणांमुळेच गांधीजी तत्कालीन परिस्थितीत जितके प्रासंगिक होते तितकेच आजही प्रासंगिक आहे. आधुनिक समाजात अस्तित्वात असलेला भ्रष्टाचार, दहशतवाद, राजकीय गुन्हेगारीकरण, अनैतिकता, जातिवाद, सांप्रदायिकता चारित्र्याचे होणारे अंधःपतन यासारख्या समस्या आज देशासमोर आहे. वर्तमान जग अशांती, संघर्ष याच्या वणव्यात गुरफटलेले असतांना गांधीचे विचार शांतता, सद्भावना, अहिंसा आणि आणि परस्पर सहजीवनाचा संदेश देतो. जगास नवीन दिशा देण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारांमध्ये आहे. ॲडम स्मिथ, कार्ल माक्र्स यापेक्षाही जगाला नवा प्रकाश देण्याचे कार्य गांधीविचारांनी केलेले आहे. त्यामुळे फिशर या विचारवंतांनी म्हटल्यानुसार, गांधीजी ही, भारताने पाश्चात्य जगाला दिलेली एक देणगी होय. कारण जगातील सामाजिक, आर्थिक विकासाचे प्रश्न सोडवून उभ्या मानवजातीला शास्वत विकासाकडे घेवून जाण्यासाठी गांधी विचार हा संपूर्ण जगाला परिवर्तनाचा विचार दाखविणारा विचार आहे. समकालीन वैश्विक वातावरणात गांधीजींची विकेंद्रीकरण अर्थव्यवस्था, स्वयंपूर्ण खेड्यांची योजना, निर्वाहश्रम सिद्धांत, राष्ट्रीय शिक्षण, स्त्री-पुरुष यांचा समान दर्जा, अस्पृश्यता निवारण, स्वदेश चळवळ, ग्रामोद्योगाला चालना, अपरीग्रह, साधना सुचिता अशा विविध विषयासंबंधीचे गांधींचे विचार आजही उपयुक्त, मार्गदर्शक व प्रेरक आहेत.

शोध निबंधाचे उद्देश:

1. महात्मा गांधींचे राजकीय, आर्थिक व सामाजिक विचार स्पष्ट करणे.
2. महात्मा गांधींच्या विचारांची आजच्या काळात उपयुक्तता, प्रासंगिकता स्पष्ट करणे.

महात्मा गांधींच्या आधी आधुनिक भारतातील कोणत्याही चिंतकांनी त्यांच्याइतका सर्वस्पर्शी विचार केला होता असे दिसत नाही. धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो, वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड मोठा आवाका गांधी विचाराने व्यापला आहे. मानवावर प्रभाव टाकणाÚया सर्व प्रक्रियांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांचे मूलगामी चिंतन गांधींनी केले होते. माणसाचा विचार करताना कोणतेही आयात तत्वज्ञान स्वीकारून त्यानुसार मानवी जीवनाचा अर्थ गांधीजींनी लावला नाही, तर माणसाची प्रगती ज्या अनेकानेक क्षेत्रातील सुयोग्य प्रतिक्रियांवर अवलंबून असते त्यांच्या समग्र दृष्टीने मागोवा घेऊन त्या सर्व प्रक्रिया मानवाच्या सुख शांतीसाठी कशा परिणत होतील याचे सर्वस्पर्शी, सर्वलक्षी व सर्व हितकारक विश्वमानवदर्शन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्यामुळेच जात, धर्म, पंथ, वर्ग, राष्ट्र इत्यादी भेदभाव मनात न आणता मानवाच्या भवितव्याबद्दल आस्था असणारे सर्व विचारी मानव गांधीजींच्या विचाराने प्रभावित झाले आहे. म्हणूनच महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव अनेक नेत्यांवर व

समाजसुधारकांवर पडला आहे. यामुळेच महात्मा गांधींचे महात्म्य अनन्यसाधारण आहे. त्यांचा प्रभाव आईन्स्टाईन पासून रिचर्ड अॅटेनबरा पर्यंत, रविद्रनाथ टोगोरांपासून विनोबा भावे पर्यंत, मार्टिन ल्युथर किंग पासून नेल्सन मंडेला पर्यंत तर आजच्या बराक ओबामापर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आहे. यातूनच त्यांचे विचार किती उपयुक्त मार्गदर्शक व प्रासंगिक आहे हे समजते.

महात्मा गांधींच्या राजकीय विचारात अहिंसा ह्या सिद्धांताला फार महत्त्व आहे. पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही वस्तू मात्राला व प्राणिमात्रांना शब्दाने वा कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे अशी अहिंसेची व्याख्या गांधीजींनी 'हरिजन' मधील एका लेखात केली आहे. दृष्टाच्या मनोदयाचा विरोध करण्यासाठी आपल्या संपूर्ण आत्मबलाचा उपयोग करणे म्हणजे हिंसा अशी ही व्याख्या गांधी करतात.

कृत्रिम किंवा भौतिक वादातून जन्माला येणाÚया यांचे नाव अंशात्मक मार्गाने सोडवणे शक्य असल्याचे प्रतिपादन महात्मा गांधींनी केले आहे. आज भारताच्या विविध भागात जात, धर्म, भाषा, प्रांत या आधारावर हिंसात्मक संघर्ष निर्माण होत आहे. तसेच माओवाद, नक्षलवाद, वंशिकवाद यांच्याकडून शस्त्राचा वापर वाढतो आहे. याच पाश्र्वभूमीवर महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्वज्ञानाची गरज आज जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात उपयुक्तता सिद्ध होत आहे. उदारणार्थः दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेलांनी वर्णभेदाविरुद्ध लढा हा महात्मा गांधींच्या अहिंसात्मक मार्गाने दिलेला आहे. महात्मा गांधी यांच्या मते, सामाजिक जिल्ह्यातील तणाव व दंगली सत्ताधाÚयांच्या जुलूम व दडपशाही आणि आंतरराष्ट्रीय तंटे देखील सत्याच्या व अहिंसेच्या मार्गाने सोडवता येतील. आज भारताच्या विविध भागात नक्षलवादाने मोठे आव्हान उभे केले आहे. 233 जिल्हे नक्षलवादी समस्यांनी ग्रासलेले आहेत. नक्षलवादी हिंसात्मक कारवायांमुळे हजारो निरपराध आदिवासी, नागरिक, पोलिस, प्रशासकीय अधिकारी बळी पडले आहेत. नक्षलग्रस्त भागाचा विकास खुंटला आहे. अशा नक्षलग्रस्त भागातील हा हिंसाचार गांधीजींच्या मार्गाने शोधता येऊ शकतो. अशा प्रकारचा एक प्रयोगच आंध्रप्रदेशातील नक्षलग्रस्त भागात तेथील पोलीस उपमहानिरीक्षक श्री. महेश भागवत यांनी केल्याचे दिसून येते. त्यांनी सुरुवातीला आपल्या परिक्षेत्रातील हिंसात्मक कारवाई रोखण्यासाठी शस्त्राचा वापर केला, परंतु यश न आल्यामुळे त्यांनी आपली मानसिकता बदलली आणि समस्येच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. त्या भागातील समस्या जाणून घेतल्या व त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. अनेक विकास योजना अमलात आणल्या. या अहिंसात्मक पद्धतीमुळे या भागातील नक्षलवाद संपुष्टात आला. आंध्रप्रदेशातील हे उदाहरण अहिंसावादाची प्रासंगिकता सिद्ध करते.

हिंसा कोणत्याही प्रकारची असो ती दुःख पोहचवते े व मोठ्या प्रमाणात मनस्तापाला खतपाणी घालत असते. आज ज्याप्रमाणे सर्वत्र हिंसा पसरली आहे ती खूपच धोकादायक आहे. सामाजिक हिंसेचे बीज समाजात जागोजागी जाणून बुजून पेरले जात आहे. सामाजिक हिसेंच्या जखमा समाज मनावर अनंत काळ घर करून राहतात. अशा परिस्थितीत समाजाच्या विकासासाठी जवळ-जवळ सर्वच प्रश्न मागे पडतात व दहशतवादाच्या जात्यात सामान्य जनता भरडली जाते. सामाजिकतेच्या आगीवर राजकारणी पोळी भाजून होत आहेत. त्यांच्या हा खेळ पाहून दुःख होते व महात्मा गांधींचे स्मरण होते.

महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या साधनाची आजही आवश्यकता आहे. गांधीजींनी सत्याग्रह कल्पना ही एक अभिनव कल्पना असून पश्चिमेतील सामाजिक राजकीय विचारात तिला तोड सापडणार नाही. सत्याग्रह संकल्पना गांधींनी विश्व विचाराला दिलेली अभिजात देणगी आहे. परकीय राजवटीत मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी तिला घडवली असली तर जगातील अनेक राष्ट्रात भिन्न स्वरूपाच्या समस्या सोडविण्यासाठी व अन्याय निवारणासाठी तिचा अवलंबही करण्यात आला आहे. महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत पासून भारताच्या स्वतंत्र पर्यंत दीर्घकाळ सत्याग्रहाच्या साधनाचा उपयोग केला आहे. या सत्याग्रहाच्या साधनाची आवश्यकता जितकी भारत पारतंत्र्यात होता त्यापेक्षाही आज ही आवश्यकता काही कमी नाही. कारण राजहट्ट पहिल्यापेक्षाही अधिक

आहे. त्याच्या प्रतिरोध सत्याग्रही जनलढा द्वारे ही करता येतो. सरकार कोणतेही असो स्वदेशी असो की विदेशी त्याच्याजवळ मोठ्या प्रमाणात हिंसाबल असते. तिच्याजवळ कायद्याचे बळ असते. प्रशासन शक्ती असते. अर्थशक्ती असते पोलिस बल असत, सैन्य शक्ती असते. याउलट ज्यांचे जनते जवळ काय असते? जनतेजवळ या हिंसाबळी विरूध्द लढण्यासाठी अहिसाबल असते. हेच गांधीजींनी ओळखले होते व त्याचा उपयोग केला होता. आजही सरकार विरुद्ध लढण्यासाठी या सत्याग्रहाच्या साधनांची आवश्यकता आहे. देशात अण्णा हजारे, मेघा पाटकर यासारख्या सामाजिक कार्यकत्र्यांद्वारे या साधनांचा वापर होत आहे.

महात्मा गांधींनी सरकारद्वारे करण्यात येणारे जुलमी, अन्यायी कायद्याच्या विरोध करण्यासाठी सविनय कायदेभंगाची संकल्पना मांडली आहे. सविनय कायदेभंगाचे म्हणजे घटनात्मकरित्या मंजूर झालेल्या पण नीतीशी संबंध नसलेल्या कायद्याचा भंग करणे. ंआज सरकार भारतीय असले तरी सरकारद्वारे करण्यात येणारे कायदे जनतेच्या कल्याणासाठी असतील असे सांगता येत नाही. सत्तारूढ पक्ष द्वारे केवळ राजकीय हेतूने व आपल्या फायद्यासाठी जनहितविरोधी कायदे निर्माण केले जात आहेत. आज सरकारद्वारे अशा प्रकारचे कायदे केले जात आहेत. सरकारने सेझ साठी किंवा इतर जमीन अधिग्रहणासाठी केलेले कायदे हे जनहित विरोधीच आहेत. अशा कायद्याचा जनतेद्वारे भंग केल्या जावा, या कायद्याला विरोध करणे योग्यच ठरेल. मागील पन्नास वर्षात आपल्या देशातील लोकांनी शासनास अनेक चुकीचे नियम व कायदे मागे घेण्यास भाग पाडले. सत्याग्रहाचा सामाजिक व राजकीय पर्नुरचनेसाठी उपयोग झालेला आहे. यावरून महात्मा गांधीजींचे सत्याग्रहाचे तंत्र किती शक्तिशाली आहे हे लक्षात येते.

महात्मा गांधींनी साधनांच्या पवित्र्यावर भर दिला होता. राजकीय साध्य-साधनांबद्दलची गांधीजींची मते ही त्यांच्या धार्मिक नैतिक परिवर्तनीय संज्ञा म्हणून वापरतात. जशी साधने तसेच साध्य. गांधीजींच्या मते, त्यांना विभागणारी भिंत नाही, ‘साधन’ हे बीजा सारखे आहे व साध्य म्हणजे त्या बीजातून निर्माण होणारा बीज वृक्ष यांचा संबंध जितका अभेद्य आहे तितकाच साधन साध्य यांचा आहे.’ त्यांच्या मते भ्रष्ट साधनांची परिणीती भ्रष्ट साध्यात होते. हिंसक मार्गांनी प्राप्त झालेले स्वराज्यही हिंसक असेल, या कात्रीतून गांधींनी अहिंसक वृत्तीचा व खुल्या साधनांचा पुरस्कार केला होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात देशातील राजकीय नेतृत्व राजकीय अभिजन यांना गांधींच्या साधनांच्या पावित्र्याचा विसर पडलेला दिसून येतो. सत्ताप्राप्तीसाठी नेतृत्वाद्वारे अनैतिक, हिंसक मार्गाचा वापर करण्यात येत आहे. यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण घडून येत आहे. राजकारणाचे शुद्धीकरण करण्यासाठी त्यांची शिकवण आजही उपयोगी आहे. राजकारणाचे अध्यात्मीकरण किंवा नैतिकीकरण करणे आज आवश्यक आहे. धर्माशी राजकारण जोडले जाण्यातून राजकारणाचे शुद्धीकरण व उन्नयन घडून येेणे आवश्यक आहे. आधुनिक समाजातील राजकारणात भ्रष्टाचार, प्रांतवाद, जातीयवाद, इमानदारीची, उणीव या सारख्या वाइट प्रथांचा वाढता प्रभाव पाहता गांधींच्या राजकारणाच्या अध्यात्मिकरण्याची संकल्पना उपयुक्त वाटते.

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची प्रसंगी आज मोठ्या प्रमाणात आहे. आज भारतात दोन भारत निर्माण झाले आहेत. एक चमकणारा तेजस्वी इंडिया व दुसरा वंचित असा भारत निर्माण झाला आहे यातील विषमता वाढत आहे आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विचार करून नेहरूंनी देशाची औद्योगिक प्रगती घडवून आणण्यासाठी देशात मोठे औद्योगिक प्रकल्प व उद्योगधंदे सुरू केले. त्यामुळे औद्योगिकीकरण, शहरीकरण वाढले. काही प्रमाणात देशाचा विकास घडून आला. परंतु त्याबरोबर काही समस्या निर्माण झाल्या. ग्रामीण भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले. गांधीजींची स्वयंपूर्ण खेड्यांची योजना पूर्णपणे डावलली गेली. ग्रामोद्योग, लघुउद्योग यांच्याकडे दुर्लक्ष झाले, जवळपास 6 दशके योजना राबवूनही किमान गरजा पूर्ण करणारा स्तर जनतेला उपलब्ध करुन देण्यास हा विकास अपूर्ण आहे. जवळपास 40 टक्के जनता दारिद्रयत जीवन जगत आह. बेरोजगारी आणि अल्परोजगाराची आज देशात मोठी संख्या आहे व ती दिवसेंदिवस वाढत आहे. उत्पन्न व

संपत्ती यातील विषमता वाढत आहे. काही लोकांच्या हातातच संपत्तीचे केंद्रीकरण वाढत आहे. भूसुधारणा योग्य रीतीने लागू झाल्याने ग्रामीण भागात मोठा असंतोष आहे. या व्यतिरिक्त देशात एक तर कधी दुसया वस्तूंचा तुटवडा जाणवत राहतो. त्यामुळे देशात एक भयंकर चलन वाढीची, दबावाची परिस्थिती निर्माण होते. ही परिस्थिती पाहता श्री चरण सिंह सारख्यांनी आर्थिक विकासाच्या गांधीवादी मॉडेलची उपयुक्ततेचे समर्थन केले. प्रसिद्ध अर्थतज्ञ गुन्नार मिर्डल यांच्या मतानुसार भारताच्या उध्दार व आर्थिक प्रगतीचा एकमेव मार्ग म्हणजे गांधीवाद होय. भारतातील बेकारीच्या समस्येचे निराकरण कुटिरोद्योगांच्या व्यवस्थेमुळेच केला जाऊ शकते. भारतातील बेकारीच्या निर्मूलनासाठी तसेच आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी लघु व कुटीर उद्योग यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण याने लघु व कुटीर उद्योगास समाप्त केले आहे. या नव्या आर्थिक धोरणामुळे भारत पारतंत्र्याकडे वाटचाल करीत आहे. जगातील अनेक राष्ट्रांवर भारताचे अवलंबन वाढत आहे. ही परिस्थिती अशीच सुरू राहिली तर देश गुलामगीरीमध्ये जाईल. अशा परिस्थितीत राजकीय आत्मनिर्भरता तेव्हाच शक्य आहे जेव्हा गांधीजींच्या विचारानुसार लघु व कुटीर उद्योग यांना प्रोत्साहन व संरक्षण केले पाहिजे. पाॅल केनेडी यांनी त्यांच्या अॅप्रोचींग ट्वेंटी फस्ट सेंच्युरी या ग्रंथात भारतासंदर्भात असे लिहिले आहे की, भारतात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भांडवल गुंतवणूक करून आधुनिक तंत्रविज्ञानाष्ठित उद्योगधंदे करीत आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे बेकारांची संख्या वाढत आहे. अशा उद्योगधंद्यांचे फायदे भारतातील काही मोजक्या नवश्रीमंतांना मिळतील. परंतु गरीब जनतेला उदरनिर्वाह करणे कठीण होणार आहे. अशा वेळी त्यांची बेकारी कमी करण्यासाठी त्यांच्या विचारसारणी कडेच वळावे लागेल.

सर्वांच्या हाताला काम मिळाले पाहिजे आणि श्रमांना प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, असा गांधीजींचा दृष्टिकोन स्वीकारून उत्पादन व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

गांधीजींच्या संपूर्ण आर्थिक विचारात त्यांच्या विश्वस्तांची संकल्पना सर्वात महत्त्वपूर्ण व मानवाधिकारवादी आहे. कारण या कल्पनेने कल्पनेतूनच त्यांनी संपत्तीचा संचय समाप्त केला नाही, तर मनुष्याला संपत्तीचा एक विश्वस्त बनविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते जेव्हा मनुष्य स्वतःला एक सेवक समजेल, समाजासाठी धन कमावेल, समाजाच्या कल्याणासाठी तो खर्च करेल तेव्हा त्याच्या समाजासाठी धन कमावील, समाजाच्या कल्याणासाठी तो खर्च करेल तेव्हा त्याच्या कमाईमध्ये शुद्धता येईल. उत्पादन साधना वरील खाजगी मागणी व मालकी आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचे दुष्परिणाम नाहीसे करण्यासाठी गांधींची विश्वस्त संकल्पना आज उपयुक्त आहे. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आलाच तर समाजात संघर्षविना एक मूल क्रांती होईल.

गांधीजींची अपरिग्रहाची कल्पना आजच्या युगात फारच महत्त्वाची आहे. स्वतःच्या जीवनात गांधीजींनी विरक्त जीवनाचा स्वीकार केला व आपल्या गरजा कमीत कमी केल्या आज आधुनिक काळात तरुण पिढी ही उपभोगवादाच्या आहारी गेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या याचा फायदा घेत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा वाईट परिणाम होत आहे. अशा वेळी गांधींच्या मर्यादित गरजा ही शिकवण उपयोगी आहे. आधुनिक काळात निसर्गाचा विनाश होतांना पर्यावरणवादी चळवळीतील विचारवंतांनी गांधींच्या विचाराकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले दिसते. पर्यावरणाविषयी महात्मा गांधींनी 'हिंद स्वराज्य' पुस्तकात आपले मत व्यक्त केले की, 'वसुंधरा सर्वांचे पोषण करायला समर्थ आहे, परंतु लालसा भागवायला ती असमर्थ आहे. तसेच मानवाने निसर्ग साधनसंपत्तीचा वापर करावा परंतु हा वापर अतिरेकी नसावा, शोषणमुक्त असावा,' गांधीजींचे हे मत जगाला शाश्वत विकासासाठी महत्वपूर्ण आहे. अर्थकारण आणि आधुनिकीकरण यांचा समतोला साधतांना गांधीजींचे पर्यावरणविषयक विचार भारताच्या विकासाला पूरक आणि मार्गदर्शक ठरणार आहेत.

निष्कर्ष

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधींचे स्थान महत्त्वपूर्ण होते व हा लढा त्यांच्या कार्याभोवती केंद्रित होता.
2. आधुनिक समाजातील भ्रष्टाचार, जातीयवाद, अनैतिकता, दहशतवाद चारित्र्याचं इत्यादींच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींच्या विचारांची उपयुक्तता वाढत आहे.
3. भारतातील विविध प्रांतात जात, धर्म, भाषा, प्रांत या आधारावर निर्माण झालेला संघर्ष माओवाद नक्षलवाद, वांशीकवाद या पार्श्वभूमीवर आज गांधींच्या अहिंसावादी विचारांची उपयुक्तता आहे.
4. राज्यद्वारे सत्तेचा दुरूपयोग होत आहे त्यामुळे सत्याग्रहाची उपयुक्तता वाढत आहे.
5. भारतीय राजकारणातील राजकीय गुन्हेगारीकरण समाप्त करण्यासाठी गांधींच्या साधनाच्या पवित्र या शिकवणीची आज आवश्यकता आहे.
6. भारतातील दारिद्रय व बेकारी या समस्या सोडविण्यासाठी गांधीप्रणाली लघु व कुटीर उद्योगाची आज आवश्यकता आहे.
7. शाश्वत विकासासाठी गांधींच्या विचारांची आज आधुनिक समाजाला आवश्यकता आहे.

**संदर्भसूची**

1. भारदे बाळासाहेब गांधी विचार मीमांसा महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे 1993
2. भोळे भास्कर लक्ष्मण आधुनिक भारतातील राज्यांच्या पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर
3. योजना हिंदी मासिक ऑक्टोबर 2004
4. देवगावकर गो राजकीय विचारवंत पाश्चिमात्य आणि भारतीय श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# महात्मा गांधी आणि ग्रामविकास

डॉ.राखी सिद्राम सलगर
सहा.प्राध्यापिका, नाट्यशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा , विद्यापीठ,औरंगाबाद

---

प्रस्तावना:

भारत हा खेडयांचा देश आहे. आपली संस्कृती ही खेडयातूनच उदयास आलेली आहे. तसेच तिचे जतन आणि संरक्षण ही स्थिती आहे हे पाहणे गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे खेडयातील लोकधारी, लोकपरंपरा, लोकजाणिव, शेतीविषयक साधने राहणीमान, रस्ते, निसर्ग या सर्वांची जागा जागतिकीरणाच्या गर्तेत अडकलेली आज दिसते. कारण शहरीकणांचा प्रभाव व नागर संस्कृती ही खेडी नष्ट करायला कारणीभूत कारणीभूत ठरतेय असे वैयक्तिक मला वाटते.

कारण आज प्रत्येक जणाला शहर अर्थात नागर संस्कृती आकर्षित करत आहे. मोठमोठे मल्टिप्लेक्स, मॉल, मोटरगाडया, मोठमोठी घरे, सिमेंटची जंगले कारखाने हे या सर्व गोष्टी ग्रामीण भागातील लोकांना आकर्षित करीत आहेत.

जेथे निसर्ग, मोकळी हवा, मोठे आंगण, प्रदूषण, विरहित रस्ते, सैंद्रिय शेती, जंगले हे सर्वसामान्य लोकांना अर्थात ग्रामीण भागातील लोकांना नको वाटत आहे. आकर्षण वाटतंय ते शहरांचे. बैलगाडीची जागा मोटारकारने घेतली. शेतीतील काम करणा-या माणसांची जागा मशीन साधनांनी घेतली. सेंद्रीय खतांची जागा रासायनिक खतांनी घेतली. त्यामुळे शेतीतील मातीचा कस कमी होवून पीक उत्पन्न घटत आहे व रासायनिक खतांमुळे त्या पिकवलेल्या धान्यांचा परिणाम आरोग्यावरती होत आहे.

या सर्व गोष्टी विचारात घेतल्यावर प्रश्न येतो, की कुठे आहे महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारत ? कुठे आहे त्यांच्या विचारातील ग्रामविकास ? महात्मा गांधींनीच नारा दिला होता की, ष्खेडयाकडे चलाष्. कुठे आहेत ती खेडी ? का लोप पावत चाललेली आहेत खेडी ? कारण परत एकदा अशी वेळ आलेली आहे महात्मा गांधींच्या विचारांची. त्यांच्या विचारताली खेडयाची.ग्रामविकासाची, ग्रामीण मानसिकता समजून घेण्याची. त्या ग्रामीण भागातील लोकांना महात्मा गांधींचे खेडयाकडे चला या हाकेची आठवण करुन देण्याची वेळ आलेली आहे.

महात्मा गांधीजींची ग्रामीण विकासाची संकल्पना ही खेडे गावात गावक-यांना कारभाराची पूर्ण सत्ता अधिकार सवयंपूर्णतेस प्राधान्यक्रम कृषीविकासावर लक्ष केंद्रित शैक्षणिक विकासास प्राधान्य स्वच्छता व साफसफाईस महत्व, महिला सक्षमीकरणांचे महत्व ही महात्मा गाधींच्या ग्रामविकासाची संकल्पना होती.

कारण गांधीजी म्हणत की खरा भारत पहायचा असेल तर खेडयाकडे चला. म्हणजे तुम्हाला खरे चित्र दिसेल. कारण भारतात इंग्रज येण्यापूर्वी भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. पण सत्तेच्या केंद्रिकरणामुळे खेडयाचे स्वरुप बदलले. त्यात परत भर म्हणजे शासनाचे दुर्लक्ष. अशाने खेडी नष्ट होत आहेत आणि पर्यायाने हा देशच नष्ट होईल.

आज सत्तेच्या केंद्रिकरणामुळे खेडयात आज शिक्षणाच्या अपु-या सोयी, अंधश्रध्दा, रुढी-परंपरा, पिण्याच्या पाण्याची सोय, निरक्षरता, वाईट चालीरीती यामुळे आज खेडी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आज परत भारताला गांधीजींच्या हाकेची गरज आहे. त्यांच्या ग्रामविकास विचारातूनच भारतातील खेडयाचे सक्षमीकरण होवू शकते.

शोधनिबंधाचे उद्येश किंवा उ्दिष्टये:

1. महात्मा गांधीच्या विचारातील खेडी
2. महात्मा गांधीच्या ग्रामविकासाचा आढावा.
3. गांधीजींनी खेडयांच्या माध्यमातून भारत देश समृध्द व स्वयंपूर्ण बनविण्यासंदर्भात त्यांनी सांगितलेल्या विचारांचा आढावा.
4. महात्मा गांधीच्या ग्राम विकासाची संकल्पना स्पष्ट करणे.

Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

संशोधनाची गृहितके:

1. महात्मा गांधीच्या विचारांचे ग्रामविकासात महत्वाचे व मोठे योगदान आहे.
2. ग्रामीण भागाच्या विकासाचे बीज गांधीजींनी रोवले.
3. गांधीजींचे विचार ग्रामीण विकासाला पूरक आहेत.

संशोधन विषयाचे महत्व किंवा संशोधन पध्दती:

प्रस्तुत शोधनिबंध लिखानासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे व तथ्य संकलनाच्या दुयम साधनांचा आधार घेतला आहे. उदा-संदर्भ ग्रंथ,पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे.

ग्रामविकासाची संकल्पना:

गांधीजींनी सांगितलेला आदर्श समाज पूर्णपणे माध्यमिक व नैतिक अधिष्ठानावर आधारलेला होता असा कमीत -कमी गरजा असणारा ग्रामीण समाज असला पाहिजे असे त्यांनी स्वप्न पाहिले होते. खेडयांच्या जीवनातच संपूर्ण भारताचे जीवन सामावलेले आहे असा त्यांचा विश्वास होता. गाव हे सर्व प्राथमिक उत्पादनाचे उपजीविकेचे केंद्र असून ते भारताचे हृदय आहे.

स्वतंत्र भारतातील खेडयाची संकल्पना करताना गांधीजींनी म्हटले होते, भारतातील प्रत्येक गाव हे तेव्हा सुधारित समजले जाईल, ज्या गावाच्या गरजेनुसार उत्पादन करणारा प्रत्येक प्रकारचा ग्रामोद्योग असेल. जिथे कुणीही निरक्षर नसेल, जिथे स्वच्छ रस्ते असतील. कचरा निश्चित जागी असेल, जिथे पाण्याच्या स्वच्छ विहिरी असतील, शौचालयाची उपलब्धता असेल. जर तुम्ही स्वस्थ भारताची कल्पना करत असाल तर तुम्ही खेडयांना स्वस्थ बनविणे आवश्यक आहे. कारण खरा भारत हा खेडयातच वसलेला आहे. असे गांधीजींचे ग्रामविकासाबददलचे विचार होते.

पण गांधीजींना खेडयातील काही दोषही लक्षात आले होते. ते म्हणजे खेडयात प्रचंड अस्वच्छता, शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा, शौचालयाची उपलब्धता नसणे व त्याबद्यलचे गैरसमज यामुळे खेडयातील मागासलेपण वाढत आहे. आरोग्याविषयी लोकांच्या मनातील अनास्था व आर्थिक -हास झाला म्हणून गांधीजींनी खेडयांच्या पुर्नरचनेवर भर दिलेला आहे.

1. खादी अर्थात स्वदेशाची स्थिती:

गांधीजींच्या मते खादी उद्योग हाच ग्रामीण जीवनाला विकसित करणारा व्यवसाय आहे. चरखा हेच साधन रोजगार व संपत्ती मिळवून देणारे आहे. त्यामुळे दारिदय नष्ट होईल.

२. कुटीरोद्योग:

ग्रामीण भागात ग्रामोद्योग व कुटीरोद्योग सुरु करुन वस्तूंचे उत्पादन करावे, त्यातून खेडी ही स्वावलंबी व स्वयंपूर्ण होतील व शहरात त्या वस्तूंची विक्री केंद्रे काढावीत. त्यातून ग्रामीण विकेंद्रीत अर्थव्यवस्था तर मजबूत होईल पण प्रत्येकाला आपापल्या गावातच रोजगार उपलब्ध होवून बेरोजगारीचा प्रश्न सुटेल. म्हणून गांधीजींचा मोठया उद्योगांना व कारखान्यांना विरोध होता. कारण त्यामुळे शहरे वाढतील व काहीच लोकांना काम मिळेल. परंतु अनेक लोक वेकार राहतील व खेडयांची अप्रत्यक्ष पिळवणूक होईल तसेच यंत्रांनाही गांधीजींचा विरोध होता. कारण यंत्रांमुळे माणूस त्याचा गुलाम होतो व परावलंबी बनतो व मुठभर धनिकच या यंत्रांमुळे धनसंचय करतील. परंतु बहुसंख्य गरीब जनतेची यामुळे पिळवणुक होईल. म्हणून गांधीजींचा कुटीरोद्योगांना पाठिंबा होता.

3. पंचायतराज:

स्वातंत्र्योत्तर काळात देशाने पंचायतराजचा स्वीकार करुन संपूर्ण देशाने त्याची अंमलबजावणी केली. ग्रामविकास, गावविकास, नियोजन, न्यायदान, प्रशासन इत्यादी कामे गावस्तरावर ग्रामपंचायतीने करावे कारण ग्रामीण विभागाची प्रगती साधण्यासाठी सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. त्यासाठी गांधीजींनी पंचायतराजचे समर्थन केले.

4. मातृभाषेवर आधारित शिक्षण:

शिक्षणाशिवाय देशाला तरणोपाय नाही. कारण प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. माणसाला त्याच्यातील आर्थिक शोषण, पारतंत्र्य, गुलागगिरी, दारिदय यांचे ज्ञान लोकांना करुन द्यायचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे गांधीजींचे मत होते.

कारण माणसाला माणूस बनविणारे, त्याला उद्योग देणारे शिक्षण हे साध्य नसून साधन आहे. मुलभूत शिक्षणामुळे धार्मिक व नैतिक अधिष्ठान प्राप्त होते. म्हणून हे सर्व शिक्षण मातृभाषेतूनच असावे असे गांधीजींचे मत होते. कारण लोकशिक्षणाद्वारे बुध्दी व घाम यांचा समन्वय साधला जावून ग्रामीण भागातील लोकांचा विकास साधता येईल.

5. ग्रामस्वच्छता:

भारतातील अस्वच्छता पाहून गांधीजींनी स्वच्छ भारताची हाक दिली होती. स्वच्छता ही गांधीजींची जीवनशैली होती. त्यांच्या मते मनुष्याच्या बाबतीत आत्म्याची स्वच्छता किंवा शुध्दता हे अंतिम ध्येय असेल पाहिजे. भारतीय समाज हा स्वच्छ आणि शुध्द अशा चांगल्या सवयी आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील नाही. म्हणून गांधीजींनी संपूर्ण स्वच्छता अभियान हे राज्याचे, समाजाचे व प्रत्येक नागरिकाचे ध्येय असले पाहिजे या विचाराची सुरुवात त्यांनी आश्रमापासून केली होती व त्यांनी ती आश्रमात प्रत्येकाला बंधनकारक केली होती.

तसेच गांधीजींसाठी स्वतःच्या शुध्दीच्या प्रक्रियेत व्यक्तीगत व पर्यावराण हे पहिले पाउल आहे. स्वातंत्र्योत्तर साठ वर्षे उलटून गेली तरी आपल्या देशात ग्रामस्वच्छता अभियान चालूच आहे व देशातील सार्वजनिक स्वच्छता जशास तशी आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात गांधीजींचे ग्रामविकासाचे विचार स्वीकारुन अथवा आत्मसात करुन देशाचा विकास साधणे शक्य होते. तसेच तो विकासाचा मार्ग म्हणून स्वीकारायला पाहिजे होता. पण तसे न करता लोकशाही समाजवादाचा व मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने ओैद्योगिकरणाला महत्व मिळाले. यातून गांधीजींची स्वयंपूर्ण खेडयांची योजना पूर्णपणे डावलली गेली. माणूस हा यंत्रमानव न होता किंवा त्या यंत्राचा गुलाम न होता विकासाचा केंद्रबिंदू झाला पाहिजे असा गांधीजींचा दृष्टीकोन होता. पण झाले उलटेच.

निष्कर्ष:

अशा प्रकारे महात्मा गांधींनी ग्रामविकास संकल्पनेच्या आधारे भारतीय समाजास सर्वांगीण विकासाचा एक नवा आधार प्राप्त करुन दिला. थोडक्यात काय महात्मा गांधीजींनी सर्वांना सन्मानपूर्वक जगण्याची संधी देणारे मानवकेंद्रित विकास प्रतिमान मांडण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या ग्ारमीण विकासात केवळ मानवी कल्याण व मानवी सुखाचा मूलगामी विचार केंद्रित झाला असून मूलतः गरीब,श्रीमंत, जमीनदार, मजुर, विविध जाती धर्मीय या सर्वांमध्ये जो संघर्ष आहे, तो नाहीसा व्हावा असे गांधीजींना मनोमन वाटत होते. म्हणून गांधीजींचे विचार आजही आपल्या देशाला प्रेरणादायी आहेत व ग्रामविकासासाठी देखील पूरक आहेत. फक्त आपण ते आत्मसात करायला हवेत.

संदर्भग्रंथ सूची :

1. डॉ.प्रतिभा पाटील - महात्मा पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, गांधी आणि ग्रामीण विकास,एज्युकेशन
2. महात्मा गांधी - माझ्या स्वप्नातील भारत
3. महात्वा गांधी - विचारदर्शन
4. महात्मा गांधी - ग्राम स्वराज्य
5. कटार सिंह - ग्रामीण विकास

# 21 व्या शतकात महात्मा गांधींजीच्या अहिंसा विषयक विचारांची प्रासंगिकता

**प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविदयालय,हडोळती, ता. अहमदपूर, जि. लातूर**

---

**प्रस्तावना :-**

आज जगातील सत्तेची स्पर्धा पाहता, सांस्कृतिक, धार्मिक मतभेदातून निर्माण होत असलेला संघर्ष आणि अण्वस्त्र स्पर्धा पाहता संपूर्ण जग आणि अखिल मानव जातच विनाषाच्या उबंरठयावर येऊन पोहचलेली आहे. या पार्श्वभुमीवर गांधीजीच्या विचाराची संपूर्ण जगाला आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत गांधी विचारच जगाला तारु शकतील. यावर अनेक विचारवंतामध्ये एकमत आहे. यांसदर्भाने गांधीजीचे अंहिसा विषयक विचार समजावून घेणे. जगाला हे विचार पटवुन देणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोध निबंध याच उददेशाने लिहिला आहे.

**सारांश (Abstract)**

1. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महात्मा गांधीजीच्या आणि अहिंसा या विचाराचा आढावा घेण्यात आलेला आहे. अहिंसा या विचारांची आजच्या काळात कशी गरज आहे. हेस्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा गांधी अहिंसा ही संकल्पना अतिशय व्यापक असून त्यांनाफक्त शारिरिक अहिंसा अभिप्रेत नव्हती तर विचाराची, मानसिक अहिंसा सुध्दा अभिप्रेत होती. त्यांना हिंसा करण्याची क्षमता असणा-या व्यक्तीने अहिंसा तत्व स्विकारणे गांधीजींना अभिप्रेत होते.

**बिज संज्ञा (Key Words) :-**सत्य, हिंसा, सत्ता, मतपरिवर्तन, विनाष, ध्येय इ.

**गृहीतके(ypothesis ) :-** 1. अहिंसा या संबधीचा विचार फक्त राजकारणाशी संबंधित नाही तर व्यक्तीच्या जीवनात सुध्दा अतिशय महत्वाचा आहे.

2. अहिंसा ही संकल्पना बहुआयामी सर्वांगीण आहे.

3. आजच्या काळात शांतता निर्माण करण्यासाठी गांधीजीच्या अहिंसा या
विचाराची गरज आहे.

4. गांधीजीची अहिंसा संकल्पना सत्याशी संबंधित आहे.

**उदेष्टये(Objective) :-** 1. सत्य व अहिंसा संकल्पनाचा परस्पर संबंध शोधणे आणि अभ्यास करणे आहे.

2. गांधीजीच्या संकल्पनेतील अहिंसा ही संकल्पना समजुन घेणे.

3. गांधीजीच्या विचारातील अहिंसा या सकंल्पनेचा प्रसार करणे.

4. अहिंसेची जगासाठी गरज स्पष्ट करणे.

**तथ्य संकलन (Data Collection):-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी व्दितीयक स्त्रोताचा तथ्य संकलनासाठी आधार घेतलेला आहे. त्यासाठी पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्राचा आधार घेतलेला आहे.

**विश्लेषणात्मक बाजू :-** महात्मा गांधीनी अहिंसेचा विचार व्यापक दृष्टीने केला आहे. अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव नव्हे तर राग, व्देष लोभ, स्वार्थ शारीरीक, किंवा मानसिक दुखापत न करणे म्हणजे अहिंसा होय. मनामध्ये हिंसा निर्माण न होवु देणे म्हणजे अहिंसा होय. स्वतःच्या मनामध्ये एखादी व्देषात्मक भावना येणे म्हणजे अहिंसा होय. क्रोधाला प्रेमाने, हिंसेला अहिंसेनेशत्रुला मित्रत्वाने उत्तर देणे म्हणजे अहिंसा

गांधीजीनी आपल्या विचारात सुड, हिंसा याला अजिबात स्थान दिलेले नाही. गांधीजी म्हणतात की व्यक्तीचे मतपरिवर्तन करण्याची ताकद हीफक्त अहिंसेतच आहे.[1]

गांधीजी म्हणतात हिंसा करण्याची शारिरिक आणि मानसिक क्षमता असुनही व्यक्ती अहिंसेचाच स्विकार करतो, ही अहिंसा तो स्वइच्छेने स्विकारलेली असते. धैर्य आणि नम्रता ही अहिंसेसाठी अतिशय महत्वाची असते. हे सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील गोष्ट असल्यामुळे त्याला गांधीजीनी वीर पुरुषाची अहिंसा असे म्हटले आहे. हिंसा करणे शक्य नाही म्हणुन ही स्वीकारलेली अहिंसा होय. अशा प्रकारची अहिंसा ही नाईलाजाने स्विकारावी लागते. कारण स्वतः मधील दुर्बलतेमुळे आशा अहिंसेचा स्विकार करावा लागतो म्हणून गांधीजी याला दुर्बलांची अहिंसा असे म्हणतात.

अहिंसा आणि भित्रेपणा हा एकत्र राहु शकत नाही. एखादी व्यक्तीला ज्यावेळी बिकट परिस्थितीचा सामना करण्याचे धाडस नसते त्यावेळी तो अहिंसेचा आधार घेत असतो. पण गांधीजीना अशा अहिंसेपेक्षा हिंसा केलेली बरी असे वाटते.

याचाच अर्थ असा की, गांधीजीनी अहिंसा ही व्यापक संकल्पना आहे. हिंसेपासून परावृत्त होणे म्हणजे अहिंसा एवढाच मर्यादित अर्थ त्यात नाही. हा अहिंसेचा नकारात्मकआशय होय. अहिंसेचे विधायक स्वरुप म्हणजे, सर्वव्यापी स्वरुप, म्हणजे प्रेम, सर्वगामी औदार्य होय. मानवजातीचा बचाव अहिंसेनेच होतो. चराचराच्या ठिकाणी ईश्वर आहे, असे अहिंसेवर श्रध्दा ठेवणारा मानत असतो. ईश्वराच्या कृपेने अहिंसा माणसांमध्ये स्फुरत असते. अहिंसा म्हणजे शस्त्र न उगारणे, म्हणजे भित्रेपणा समजला जातो. कारण शस्त्र बाळगायला, चालवायला धैर्य लागते. भित्र्या माणसाकडे ते नसते. गांधीजीच्या मते अहिंसा ही अशी भेकडांची हिंसा नाही. वाईट करणा-या शक्तिवानासमोर दुबळयाने शरण जाणे म्हणजे अहिंसा नाही. गांधीनी हे स्पष्ट केले की, भित्र्या लोकांच्या अहिंसेपेक्षा, त्यांना हिंसा मान्य आहे. जास्तीत जास्त हिंसेचा प्रतिकार, जास्तीत जास्त अहिंसेने होतो. अहिंसानिष्क्रियतेचे ही प्रतिक नाही. माझ्या मते, अहिंसा ही जगातील अत्यंत कार्योदयुक्त शक्ती आहे. अहिंसा हे हिंसेपेक्षा प्रभावी, परिणामकारक अस्त्र आहे. आत्माक्लेशात अहिसेंची शक्ती साठवलेली आहे. ख-या लोकशाहीला अहिंसेची जोड पाहिजे.[2]

गांधीजींना निरपेक्ष अहिंसा सर्वश्रेष्ठ अहिंसा वाटत होती. त्यांनी निषेदात्मक अहिंसा किंवा विधायक अहिंसा यापेक्षाही त्यांना निरपेक्ष अहिंसा महत्वाची वाटत होती. गांधीजीच्या या निरपेक्ष अहिंसेच्या मार्गाने सत्याची म्हणजेच ईश्वरांची प्राप्ती होते व अहिंसेला ते महापुरुषांची अहिंसा असे म्हणतात. गांधीजी म्हणतात या मार्गाने बचाव करण्यासाठी पूर्व तयारीही करावी लागते. संपूर्ण देशाचे आर्थिक, सामाजिक जीवन सुरक्षित करणे, रचनात्मक मार्गाने सामाजिक संबंध सुधारणे हे पूर्व तयारीचेस्वप्न असते. ही पूर्वतयारी झाल्यानंतर अहिंसक सत्याग्रहींना कोणत्याही प्रकारचे शस्त्रबळ नमवू शकत नाही. असा गांधीचा विश्वास होता.

सत्याचे परिपक्व फळ म्हणजे अहिंसा असे गांधीजी म्हणतात. सत्य, अहिंसा हे शब्द एकमेकांना जोडुन वापरले जातात. सत्य आणि अहिंसा हा आंर्तमनातील आवाज आहे असे ते नेहमी म्हणत.अहिंसा हा सत्याचा आत्मा असून अहिंसा हा सर्वक्षेण धर्म आहे.

सत्या इतकेच गांधीजींनी अहिंसेला अनन्यसाधारण महत्व दिले. सत्य व अहिंसा एक दुस-याला पुरंक असणा-या गोष्टी आहेत सत्य, आणि अहिंसा दोन्ही आत्माचे गुण आत्माच्या शक्ती आहेत. अहिंसेच्याच मार्गाने सत्यापर्यंत पोहचता येते. इतरांना शारिरिक क्लेश पोहोचविणे किंवा रक्तपात करणे म्हणजे हिंसा इतका मर्यादित अर्थ गांधीजीनी अभिप्रेत नव्हता तर दुस-याच मन दुखविणे म्हणजे ते हिंसाच समजत होते. गांधीजीच्या अहिंसा तत्वात सांगितले आहे शरीराने, मनाने, विचाराने, कोणलाही न दुखविणे म्हणजे अहिंसा होय. चुकीचे कृत्य करणा-यालाही मदतीचा हात देणे त्याच्याबाबत चागुलपणा बळगाणे म्हणजेच अहिंसा होय.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

सत्य, अहिंसा हे शब्द एकमेकांना जोडून वापरले जातात. इतके ते अन्योन्य संबंधित आहेत. गांधीजीच्या अहिंसाविषयक विचारांवर टॉलस्टायचा प्रभाव होता. 1894 मध्ये गांधीनी टॉलस्टायचे "किंगडम ऑफ गॉड इज वुइथ इन यू" वाचले त्यात हिंसाविषयक प्रश्नांवर चर्चा त्यांना आढळली. सत्याचे परिपक्व फळ म्हणजे अहिंसाए असेही गांधी म्हणतात. अहिंसा शब्दप्रयोग भारतासाठी अपरिचित नाही. वेद, उपनिषद, गीता या ग्रंथामध्ये अहिंसाचा पुरस्कार असला तरी अहिंसा तत्वाला पुढे आणले. गौतम बुद्ध, महावीर जैन, सम्राट अशोक यांनी. गांधीजीनी अहिंसा संकल्पना विस्ताराने मांडली. तिचे महत्व विशद केले. तिला आधुनिक संदर्भ प्राप्त करुन् दिला. मुख्य म्हणजे स्वातंत्र्य चळवळीला अहिंसेचे अधिष्ठान प्राप्त करुन् दिले. गांधीजीचा राजकीय दृष्टीकोन यात साधनशुचिता केंद्रस्थानी होती. अहिंसा हे साध्यही होते तसेच साधनही. म्ह्णत अहिंसा हा सत्याचा आत्मा असून अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. अहिंसा हा जीवनधर्म आहे म्हणून जे तुमच्याशी हिंसेने वागतात. तुम्ही त्यांच्याशीही अहिंसेने वागले पाहिजे. परमसहिष्णुता ही अहिंसा होय. आपल्या आत्मकथेत गांधीजी म्हणतात, "ज्या ऋषीला सत्यज्ञान झाले, त्याने भोवती माजलेल्या हिंसेतून अहिंसा शोधून काढली आणि त्याने सांगितले की, हिंसा मिथ्या असून अहिंसा हेच सत्य आहे".[3]

सत्य आणि अहिंसा ही दोन गांधी विचारांची मूल्य आहेत. गांधी म्हणत, मी सत्यरुपी परमेश्वराचा पूजक आहे. तोच एक सत्य आहे. बाकी सर्व मिथ्या आहे. ते सत्य मला सापडलेले नाही, पण मी त्याच शोधक आहे. सत्याच्या मार्गावरचा मी एक वाटसरु आहे. भक्तीयुक्त अंत:करणानेकेलेल्या शोधाअंती ईश्वर सत्य आहे,या प्रचलित सुत्राऐवजी सत्य हेच ईश्वरच आहे ते वस्तुस्थिती सांगणारे सूत्र मला सापडले. तेंव्हापासून मीमाझ्या व्यक्तीगत व सार्वजनिक जीवनात सत्यासाठी आग्रह धरणे आवश्यक मानू लागलो. सत्य हे साध्य असून अहिंसा हे ते प्राप्त् करण्याचे साधन आहे. अहिंसेवाचून सत्याचा शोध अशक्य आहे. अहिंसा वा सत्य ही मूल्ये एवढी एकरुन आहेत की, एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणता येईल. जे अहिसेने प्राप्त केले जाते ते चिरस्थानी टिकणारे असते. गांधीजीनी सत्य, अहिंसा या तत्वावर आधारित व्यक्तीगत व सार्वजनिक जीवनात न्याय मिळवून देण्यासाठी जो प्रयोग वा प्रयत्न केला त्यातून सत्याग्रहाचे शास्त्र जन्मास आले. गांधीजीनी आपल्या जीवनात सत्याचे प्रयोग केले असून त्यातून जे मिळवता आले ते शाश्वत, शांततामश्, मानवतेचा विश्वास वाढवणारे राहिल्याने जग पुन्हा गांधीवादाकडे विश्वासाने पाहताना दिसत आहे.[4]

गांधीजीनी अहिंसेचा संबंध सत्याशी जोडलेला आहे. ते म्हणतात. सत्याचा शोध हा अहिंसा तत्वावर घेतलेला असावा. गांधीजीनी सत्याला जीवनातील अंतिम ध्येय मानले आहे आणि ध्येय साध्य करण्यासाठी अहिंसेच्याच मार्गचा अवलंब करावा असे स्पष्ट केले. अहिंसा हे तत्व गांधीजीच्या जीवनपध्दतीचे प्राणतत्व होय हे प्राणतत्व प्रत्येकासाठी प्रेरणादायी होय. गांधीजीनी सत्याला जीवनोच अंतिम ध्येय मानले हे ध्येय साध्य करण्याचे साधन म्हणजे अहिंसा होय.

गांधीजी म्हणतात जीवनाकडे पाहतांना अहिंसा अभिप्रेत आहे जगातील सर्व राजकीय प्रश्न अहिंसेच्या मार्गाने सोडविले जावू शकतात असे गांधीजीना वाटत होते. गांधीजी अतिशय व्यापक अर्थाने अहिंसेचा विचार करतात ते म्हणतात अहिंसा ही शरीराप्रमाणे मनाने आणि विचारांशी संबंधित आहे. ते म्हणतात अहिंसेच्या विचारामध्ये इतरांचा आनंद ही महत्वाचा आहे. गांधीजीनी सुचवलेला ही सत्य अहिंसेचा मार्ग संपूर्ण मानवाला शांततेकडे नेणारा मार्ग आहे. त्यांच्या अहिंसेच मुख्य उदिष्टये जगामध्ये प्रेम, सत्भावना, विक्ष्व बंधुत्वाच निर्माण करणे. हे गांधी विचाराचे मुख्य उदिष्ट होते वातावरण निर्माण करणे हे आहे. गांधीजी म्हणतात अंहिसेसाठी जसे सत्य आवश्यक आहे. त्याच प्रमाणे इतरही अनेक घटक आवश्यक आहे त्यामध्ये अंतरिक शुध्दता उपवास निर्भयता सहशनता इत्यादह घटकांचा समावेश करता येते.

गांधीजी जगातील शांततेचा विचार करतात. त्यांना कोणत्याही राष्ट्राचा संरक्षण बळाने करणे मान्य नाही. ते म्हणतात संपत्तीच संरक्षण करण्यासाठी सुध्दा अहिंसेची गरज आहे. त्यांची या संदर्भातील ट्रस्टीशिप

संकल्पना प्रसिध्द आहे ते म्हणतात अनैतिक मार्गाने व गरजेपेक्षा अधिक संपत्तीची आवश्यकता नाही. त्यांच्या मते अहिंसा मध्ये दोष असू शकत नाही एखादया वेळी जर अहिंसेला यश मिळत नसेल तर त्यावेळी अहिसैंसाठी श्रध्दा कमी पडते एवढाच त्यांचा अर्थ असतो. अहिंसेला यश आल नाही असे वाटत. गांधीजी म्हणता सर्व देशात सर्व काळामध्ये अहिंसा तत्व प्रभावी आहे कारण या तत्वाला अध्यात्मिक अधिष्ठान आहे. गांधीजीच्या सर्व चळवळी मध्ये अहिंसा तत्व केंद्र स्थाने होते. मग त्यांचा तो असहकारांचा लढा असेल, कायदे भंगाचा लढा असेल, असहकाराचा लढा असेल, की उपोषण असेल या सर्व लढयामध्ये त्यांनी अहिंसा तत्व प्रमुख मांडलेला आहे.

गाव खेडयामध्ये समृध्दी असावी, विकास असावा, शांतता असावी. देशाचा केंद्रबिंदु ग्रामीण भाग असावी ही गांधीजीची कल्पना होती. आजची महात्मा गांधी तंटामुक्ती योजनेचे मूळ महात्मा गांधीच्या रामराज्य संकल्पनेत असलेले दिसते. भांडणे मिटली, हाडवैर संपणे, वादमिटणे म्हणजे राज्याला अंतर्गत सुरक्षिततेचा प्रश्न मिटतो. राज्यात अत्याअल्प फौजफाटा असेल असे गांधीजी म्हणत्. ख-या अर्थाने गांधी विचाराचर आधारित तंटामुक्त गाव झाल तर गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देशाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. गांधीच्या सत्य आणि अहिंसा यांची जगालाच वरचेवर जास्त गरज भासत आहे. जगभरात धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक कारणाने हिंसाचार उकाळून येत आहे. त्यात लाखो लोकांच्या जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला जात आहे. अशा परिस्थितीत गांधीजीची अहिंसा कल्पना मानवाच्या जीविताच्या हक्कासाठी महत्वाची आहे. गांधीजी म्हणतात की, जग आता रक्तपाताला कंटाळलेल आहे. जग आता शांततेचा मार्ग शोधत आहे. गांधीजीच्या विचाराच्या केंद्रस्थानी जागतिक शांतता व सहकार्य या बाबी होत्या त्यासाठीच ते चिंतन करत व प्रयत्न करत आसत संपूर्ण मानव जातीचे कल्याण फक्त पूर्ण अहिंसेमध्ये आहे. आज राष्ट्रा राष्ट्रात अविश्वासाचे वातावरण आहे. द.कोरिया / उ. कोरिया, भारत – पाकिस्तान याप्रमाणे जगातल्या अनेक राष्ट्रामध्ये अविश्वासाचे वातावरण आहे. सातत्याने युध्दजंन्य परिस्थिती असते. म्हणून आज तरी गांधी वादाशिवाय जगाला पर्याय नाही. जग पुन्हा एकदा विनाशाच्या उंबरठयावर येऊन पोहोचले आहे. भयानक मानवी संहारक दोन महायुध्दांचे परिणाम जगाने पाहिलेले आहेत. अशाही परिस्थितीमध्ये जागतिक अनेक देशात तणावपुर्ण परिस्थिती आहे अशा वेळी जगात शांतता निर्माण करण्याचे कार्य फक्त गांधीवादच करु शकतो. गांधीजींनी सुरुवातीपासून अण्वस्त्राला विरोध केलेला होता. ते म्हणतात की, अमेरिकन बांधवाना चरख्याची ओळख करुन दयाविशी वाटते. कारण चरखा हे चिंतनशील यंत्रा त्यांना अणुबांबचा विसर पाडील, म्हणजेच सामान्य माणसांच्या प्रश्नाचा विचार करु लागतो तर अणुबांबची आठवण होणार नाही.[5]

आज जगभरातच मानवी जीवन गतिमान झालेले आहे. प्रत्येक माणूस स्वतःच्या करिअरच्या पाठीमागे लागलेला आहे. त्यामधुन भोगवाद, चंगळवाद वेगाने विकास पावत आहे.व्यक्तिवादानेटोकाचे रुप् धारण केलेल आहे. अशा परिस्थीतीत या सर्वपरिस्थीवर मात करण्याचा माझ्या मते एकच उपाय आहे तो म्हणजे गांधीवाद.

**निष्कर्ष :-**

गांधीजीची अहिंसेची सकंल्पना नकारात्मक नसुन सकारात्मक आहे. त्यांनी अहिंसेला नैतिक तथ्य मानलेल आहे. त्यांना दुर्बलांची अहिंसा मान्य नव्हती हिंसा कमी करण्यासाठी अहिंसा हा एकमेव मार्ग आहे असे गांधीजीना वाटत होते.

गांधीजीच्या विचारातील अहिंसेत जय-पराजयाची भावना नसते त्यामुळे गांधीजीचा हा विचार जगातील संघर्ष नाहीसा करुन जगाची समतेच्या तत्तावर उभारणी करण्यासाठी महत्वाचा ठरतो. आजच्या परिस्थितीत हिसांच्या, अणुयुध्द यांचा सामना करण्यासाठी गांधी विचारांची आजही आपणाला गरज वाटते.

आजच्या एकुण भारतीय राजकीय परिस्थितीचा विचार करता व्यक्तीला गांधी विचारांची गरज वाटली आहे. विशेषत: शांततेच्या मार्गाने भारत जगाच नेतृत्व करुन शकतो हे वास्तव आहे.

अहिंसा सत्याच्या शोधाचा आधार आहे. सत्याचा शोध अहिंसेवर आधारित नसेल तर तो व्यर्थ आहे. म्हणून सत्याच्या मार्गाने प्रवास करण्यासाटी अहिसेचाच रस्ता स्विकारला पाहिजे. अहिंसा ही दृष्टपणा आणि बदल्याची भावना यांच्याविरुध्द संघर्ष करणार अधिक संक्रिय शक्ती आहे ती वेळीच रुजविणे आवश्यक आहे.

गांधीजीची अहिंसेची संकल्पना अतिशय व्यापक असून शरीर मन आणि वाचा या व्दारे हिंसा न करण्याशी संबंधित आहे. गांधीजीच्या या कल्पनतेन भारतातील संपूर्ण समाजांचा, समाजातील लोकांच्या कल्यानाचा आणि जगाच्या शांततेचा विचार सामावलेल्या आहे.

**संदर्भ :-**


1. डॉ. भोगले शांताराम – आधुनिक भारतीय विचारवंत, डिसे 1998, भगवंत मुद्रणालय, पूणे, पृ. 35
2. डॉ. रमेश ढोबळे – आधुनिक भारतीय विचारवंत, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 2010,पृ 146
3. डॉ. रमेश ढोबळे – आधुनिक भारतीय विचारवंत, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 2010, पृ 146
4. डॉ. भारदे बाळासाहेब – सत्याग्रह विचार ,महाराष्ट्र गांणी स्मारक निधी ,गांधी भवन, कोथरुड, पूणे चौथीआववृत्ती तथ्य, पृ 146
5. व्यंकटेश वकील – गांधी विचार मिमांसा पृ 25.

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


## महात्मा गांधीजीचे राजकीय विचार


प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे.

(राजशास्त्र विभाग प्रमुख), श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हदगाव जि . नांदेड


---

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 ला पोरबंदर येथे झाला आणि मृत्यू 30 जानेवारी 1948 ला झाला. त्यांचे जीवन हे 79 वर्षाचे होते या हयातीत त्यांनी केलेले कार्य आणि मांडलेल्या विचारामुळे त्यांचे स्थान भारतातच नव्हेतर संपूर्ण जगामध्ये अद्वितीय राहिलेले आहे. महात्मा गांधीना प्रामुख्याने अध्यात्मवादी व मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखल्या जाते. भारतात टिळकांच्या निधनानंतर स्वराज्याच्या चळवळीच्या नेतृत्वाची धुरा त्यांनी शिरावर घेतली आणि ही धुरा इतर असंख्य देशप्रेमी नेते व जनता यांच्या सहायाने ब्रिटिशांना 'चले जाव' करण्यास सांगून भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यन्त मोठ्या समर्थ पणे वाहिली. [1] भारताला स्वातंत्र्य मिळून 73 वर्ष उलटून गेली आहेत आणि भारतीय संविधानाला 70 वर्ष झालेली आहेत. या 70 वर्षाच्या कालखंडात महात्मा गांधीजींचे राजकीय विचार कितपत फलदाई ठरलेले आहेत हे आज पाहणे गरजेचे आहे. भारताचे स्वातंत्र्य हे घटनात्मक राज्याच्या रूपाने अस्तित्वात आले पाहिजे आणि ते संविधान भारतीयांनीच तयार केले असले पाहिजे हा तत्कालीन कॉँग्रेसचा आग्रह होता व महात्मा गांधी हेच या अग्रहाचे प्रवक्ते होते. लोकशाही संदर्भात कॉँग्रेसचा विश्वास होता. परंतु 1908 पर्यन्त इंग्लड मधील प्रचलित संसदीय शासनाला त्यांचा विरोध होता. महात्मा गांधीजिनी त्यांचे राजकीय विचार स्वतंत्र मांडलेले नाहीत तर त्यांनी मांडलेले विविध ठिकानचे विचार, त्यांनी केलेले विविध भाषणे आणि त्यांच्या वर्तुनुकीतून दिसून येतात. महात्मा गांधीजी रूढ अर्थाने राजकीय विचारवंत नव्हते त्यांचे राजकीय विचार त्यांच्या एकूण विचारांचा भाग आहे. त्यांनी राजकीय साधनांवर अधिक भर दिला आहे. महात्मा गांधी हे प्रामुख्याने मानवतावादी होते. धर्म आणि राजकारणाचा त्यांनी समन्वय साधून राजकारणाला आध्यात्मिक आधार दिला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात तर त्यांच्या विचारांचे महत्व अधिक जाणवयाला लागते.[2] म्हणजेच महात्मा गांधीजींच्या राजकीय विचाराची आज गरज दिसून येत आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे :-**

1) म. गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा यांचा अभ्यास करणे.
2) म. गांधीजींच्या धर्मनिरपेक्षतेचा अभ्यास करणे.
3) म. गांधीजींच्या प्रौढमताधिकाराचा अभ्यास करणे.
4) म. गांधीजींच्या धर्म आणि नीती यांचा अभ्यास करणे.

**अध्ययनाची गृहितके :-**

1) म. गांधीजीनी आपल्या जीवनात सत्य आणि अहिंसेला महत्व दिले.
2) म. गांधीजीनी धर्मनिरपेक्षतेचे समर्थन केले आहे.
3) म. गांधीजीनी प्रौढमताधिकाराचे समर्थन केले होते.
4) म. गांधीजीनी धर्माबरोबर नितीला राजकरणात स्थान दिले होते.

**महात्मा गांधीजीचे राजकीय विचार**

महात्मा गांधीनी मांडलेले तत्वज्ञान गांधीवाद या नावाने ओळखल्या जाते. परंतु त्यांनी आपले तत्वज्ञान सांगणारा असा कोणताही स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही. त्यांचे विचार 'हरिजन' आणि 'यंग इंडिया' या सारख्या वृतपत्रातून, त्यांनी लिहिलेले लेख, त्यांची भाषणे, पत्र व्यवहार, सत्याचे प्रयोग हे आत्मकथा आणि त्यांचे

प्रत्यक्ष जीवन कार्य या मधून दिसून येतात. म. गांधीजिनी आपले राजकीय विचार हे भारतीय परंपरेवर आधारलेले असले तरी ते पूर्णपणे रुढीवादी किंवा परंपरेवर आधारलेले नाहीत. भारतीय जनतेला भारतातील उपलब्ध साधनसंपत्तीचा व जीवनपद्धतीचा विचार करून त्यांनी राजकीय विचार मांडलेले दिसून येतात. त्यांचे राजकीय विचार खालील प्रमाणे दिसून येतात.

**१) म. गांधीजींची सत्य आणि अहिंसा**

म. गांधीजीनी स्वराज्य स्थापणेत राजव्यवस्थेला विरोध करून सत्य आणि अहिंसेला महत्वाचे स्थान दिले. कारण हिंसा हा शासन व्यवस्थेचा आधार असतो. म. गांधीजीनी आपल्या जीवनात सत्य आणि अहिंसेला महत्व दिले. त्यांनी सत्याला सापेक्षतेचे स्वरूप दिले आहे. कारण निरपेक्ष सत्य हे अनूभवाणे ठरते. संपूर्ण गांधी विचारात अहिंसेला महत्व आहे. सत्य आणि अहिंसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण अहिंसा हे साधन तर सत्य हे साध्य आहे. म. गांधीच्या मते सत्य हे ईश्वर आहे. म्हणून अहिंसा ही विरपुत्राचे शौर्य आहे. माणसे जेव्हा आगतीत होतात पराकाष्ठेच्या दबावाखाली असतात तेव्हा त्यांची प्रतिक्रिया हिंसक बनते हे आपण समजू शकतो परंतु हे स्वभाविक असली तरी समर्थनिय नाही आपण अन्याया विरूध्द संघर्ष केलाच पाहिजे कोणतीही हिंसा म्हणजे अन्यायच होय अहिंसा ही मरण्याची कला आहे, मारण्याची नव्हे म्हणजेच जगातील कोणतीही शक्ती अहिंसेचा मुकाबला करू शकत नाही.[3] त्यांच्या या सत्य, अहिंसेच्या आग्रहामुळे हे एक महान व्यक्ति बनले याच बरोबर म. गांधीजीना अशी खात्री होती की, युद्धाने जगाचा उद्धार होणार नाही. याबाबत ते म्हणतात की, शस्त्राच्या खणखनाटाने भारताचा नाही तर जगाचा ही उद्धार होणार नाही.[४] त्याच प्रमाणे म. गांधीजी म्हणतात की, माझे हे विचार अखेरचे भाष्य समजू नका मला स्वत:च्या मर्यादेची जाणीव आहे. सत्याचा शोध करणारा मी एक नम्र पाईक आहे. जर मला हिंसेच्या साह्याने माझ्या देशाचे स्वतंत्र मिळवता येत असेल तरी मी नाकारीण जे तलवारीने कमावता येईल ते शमवता देखील येईल. यावर माझ्या दृढ विश्वास आहे. तसेच ते असेही म्हणतात की , ईश्वर म्हणजे सत्य हे काही वर्ष झाली, ईश्वर सत्य आहे म्हणण्या ऐवजी सत्य ईश्वर आहे असे मी म्हणू लागलो आहे हेच मला न्यायाचे वचन वाटते सत्या वाचून या जगात काही नाही.[५] म्हणून गांधीजी सत्य व अहिंसा यात फरक करीत नाहीत. सत्याच्या आधारेच जीवनात अहिंसा रुजविता येते असे ते म्हणत यासाठी धैर्य, त्याग व नीतीची गरज असते. त्याच बरोबर ते असेही म्हणतात की, आपले बोलणे, वागणे असे असावे की इतरांच्या मनाला यातना होऊ नयेत, त्रास होऊ नयेत, इजा,दुखापत होता कामा नये. द्वेषाची भावना बाळगणे हा ही हिंसेचाच प्रकार आहे असे ते मानतात. [६] थोडक्यात राजकीय,सामाजिक जीवनात सुड, हिंसा, प्रतिकार, राग, रक्तपात यांना मुळीच स्थान नाही. म्हणून म. गांधीजीनी आपल्या जीवनामध्ये सत्य आणि अहिंसेला फार महत्वाचे स्थान दिले आहे.

**२) महात्मा गांधीजींची धर्मनिरपेक्षता**

महात्मा गांधीजिनी धर्मनिरपेक्षते विषयी विचार मांडले नसले तरी त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात ते दिसून येतात त्यांनी आपल्या जीवनात धर्माला महत्वाचे स्थान दिलेले आहे म्हणून ते म्हणत होते की, धर्म विना राजकारण म्हणजे आत्म्याविणा शरीर होय.[७] महात्मा गांधी धर्मनिरपेक्षते संबंधी म्हणतात की, तुम्ही तुमच्या मता प्रमाणे जरूर वागा पण, राजकारणात धर्म आनू नका कारण धर्म केवळ भावनेच्या भाषेतच बोलत असतो राजकारणात असे चालत नाही. तिथे नेहमी वाटाघाटी करून समझोता करावा लागतो.[८] म्हणजेच प्रत्येकाणी आपल्याला जो धर्म आवडला त्या धर्माचे आपण आचरण केले पाहिजे व आपला सर्वांगीण विकास करून घेतला पाहिजे परंतु शासकीय क्षेत्रात धर्माला मुळीच स्थान देऊ नये या पुढे जाऊन ते म्हणत होतेकी हिंदू, मुसलमान व ख्रीश्चण हे खोटे हिंदू, खोटे मुसलमान व खोटे ख्रीश्चण आहेत सर्व धार्मिकाणा गांधीजी काट्या प्रमाणे सळत होते याचे कारण त्यांची ही भूमिका होती.[९] म्हणजेच प्रत्येक धर्मीय आपल्या धर्माचे योग्य

आचरण करत नाहीत असे त्यांना वाटत होते. त्याच प्रमाणे प्रा. सुधीरचंद यांच्या मते, सन १९८० पर्यन्त तरी भारतातील अभिजन वर्गाने उभी केलेली चळवळ मोठ्या प्रमाणावर सेक्युलरच होती.[१०] तसेच धर्माच्या संदर्भात महात्मा गांधी म्हणत होते की, मी स्वतःला आग्रहाने सनातनी हिंदू म्हणवून घेतो, तरी हिंदू धर्माच्या नावावर ज्या अनेक गोष्टी सर्वसाधारण पणे केल्याजातात त्या मी मानीत नाही. त्यामुळे जर मी त्याच्या मताप्रमाणे तसा वागत नसेन तर मला कोणी सनातनी हिंदू मानावे, असी माझी ईच्छा नाही. म्हणून मला हे अत्यंत आवश्यक वाटते की, माझ्या मते हिंदू धर्म म्हणजे काय हे एकदा परखडपणे मांडलेच पाहिजे.[११] एकंदरीत भारताच्या संसदीय लोकशाहीत प्रत्येकाणी आपल्याला जो धर्म आवडला त्या धर्माचे आपण पालन केले पाहिजे व आचरणात आणले पाहिजे परंतु राजकीय क्षेत्रामध्ये धर्माला मुळीच स्थान देऊ नये. परंतु हे आज भारतात दिसून येत नाही कारण भारतातील प्रत्येक राजकीय पक्ष कमी अधिक प्रमाणात राजकारणात धर्माचा आधार घेत असल्याचे दिसून येते. महात्मा गांधीनी राजकारणाला धर्माची जोड दिल्यामुळे सर्वसामान्य लोक त्यांच्या चलवळीकडे आकर्षित झाले आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून भारताला स्वातंत्र मिळवून देण्याच्या माध्यमाने देशातील जहाल राष्ट्रवादामुळे सुशिक्षित तरुण त्याच्याकडे आकर्षित झाले त्यांच्या विचारसरणीत धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, व्यक्तीची स्वयं सिदध प्रतिष्ठा, विश्वबंधुता इत्यादि कल्पणामुळे देशातील सुशिक्षित तरुणाना आकर्षण वाटले परंतु त्यांचे रामराज्य, वर्णाश्रय धर्म, अराज्यवादी संकल्पना या विचारला सुशिक्षित तरुणांनी विरोध केला.[१२] एकंदरीत म. गांधीजीने मांडलेले विचार हे आज उपयुक्त आहेत.

**<u>३) म. गांधीजी आणि प्रौढमताधिकार</u>**

प्रौढमताधिकार म्हणजे देशातील प्रत्येक प्रौढाला मतदानाचा अधिकार होय. कारण की, या अधिकारमुळे प्रत्येक व्यक्ति आपल्या प्रतिनिधीची निवड करू शकतात. म. गांधीजी आणि तत्कालीन कॉँग्रेसने सुद्धा प्रौढ मताधिकारचा आग्रह धरला होता हे अनेक वेळा तत्कालीन कॉँग्रेसने वेगवेगळ्या ठरवाव्दारे, निवेदनाव्दारे, आणि इतर मार्गानी प्रगट केले होते. म. गांधीजी या प्रक्रियेत सहभागी होते. त्यांच्या मते प्रौढमताधिकार हा योग्यता, संपत्ती यावर आधारित असू नये तसेच सामाजिक स्थितीवर सुद्धा आधारित असू नये तर शारीरिक श्रमावर आधारित मतदान करण्याचा अधिकार असावा कारण की, शारीरीक श्रम ही अशी चीज आहे की, आशा वेळी प्रत्येकाला शासन व्यवस्था आणि राज्याचे कल्याण यात त्याला सहभागी होता आले पाहिजे.[१३] त्याच प्रमाणे म. गांधीजीनी हा मताधिकार १८ किंवा २१ वर्षाच्या वर आणि ५० वर्षाच्या कमी वय असणाऱ्यालाच हा अधिकार असावा असे म्हटले होते. म्हणूनच आज भारतामध्ये ज्यांचे वय १८ वर्ष परिपूर्ण झालेल्या प्रत्येक नागरीकास मताधिकार देण्यात आला आहे.

**<u>४) म. गांधीजीची धर्म आणि नीती</u>**

म. गांधीजीवर जैन व बौद्ध धर्माचा अधिक प्रभाव पडलेला होता म्हणून त्यांनी आपल्या जीवनात सत्य आणि अहिंसेला मूलभूत सूत्र मानलेले आहे. त्यांनी धर्माचा अर्थ आजच्या पेक्षा वेगळा मांडलेला आहे. त्यांच्या मते धर्म म्हणजे कर्तव्य, धर्म म्हणजे कार्यनिष्ठा, धर्म म्हणजे सुसंस्करीत जीवन जगण्याचा मार्ग होय. म. गांधीजीनी हिंद-स्वराज्य हे पुस्तक लिहिले हे पुस्तक धर्मप्रेम शिकविते नफरत नाही, आत्मत्याग शिकविते हिंसा नाही आणि पशूबळाच्या मुकाबल्यात आत्मबळ उभा करतो.[१४] म्हणजेच म. गांधीनी धर्माला प्रेमाची, आत्मत्यागाची आणि आत्मबळाची सांगड घातली आहे त्याच्या मते अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध म्हणजे हिंदू धर्म होय.[१५] धर्म म्हणजे सत्याच्या शोधाची अविश्रांत साधन होय तसेच ते म्हणत होते की, धर्माच्या नावाखाली आपण हिंदुनी बाह्यकर्म कांडाला विनाकारण जास्त महत्व देऊन खण्यापिन्याचा प्रश्न म्हणजेच धर्म मानून धर्माची अवनती केली आहे.[१६] म. गांधीजीना भारतामध्ये राजकारणाची उभारणीच धर्माच्या पायावर केल्याचे दिसून येते या संदर्भात ते म्हणतात की, मी राजकारणात भाग घेत आहे याचे मुख्य कारण

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

राजकारणाने आपल्याला सर्वबाजूनी घेरले आहे. तसेच धर्माचा संबंध स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाशी असतो असे ते म्हणत असत. राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना, संकुचित, पांथीक सूचिता, धर्माधिष्ठाना राजकारणात प्रवेशबंदी, विश्वात्मक नैतिक शासनात तसेच देशाच्या व व्यक्तिच्याही स्वयं शासनात अहिंसेचे असलेले महत्व ही सारे नैतिकी करणाच्या प्रक्रियेचीच मुलतत्वे होती.[१७] म. गांधीजिनी आपल्या जीवनात नितीमत्तेलाही फार महत्व दिले आहे त्यांच्या मते नितीमत्ता जीवनाचा आधार आहे. व्यक्ति राष्ट्र यांचा विकास नितीमत्तेवरच आधारित आहे. नितीमत्तेमुळेच वाइट स्वभाव व युद्धे नष्ट होऊ शकतात त्यामुळे प्रगती, मैत्री, सुख व जागतिक शांतता निर्माण होऊ शकते असा म. गांधीजिना विश्वास वाटत होता.

**निष्कर्ष**

१) म. गांधीजींचे सत्य आणि अहिंसा ही तत्वे आज भारतात उपयोगात आणणे गरजेचे आहे.
२) आज भारतात म. गांधीजींच्या धर्मनिरपेक्षतेचे तत्व काही प्रमाणात अंमल झाल्याचे दिसून येते.
३) आज भारतात प्रौढमताधिकार देण्यात आला आहे ज्यांचे वय वर्ष १८ परिपूर्ण करणाऱ्या प्रत्येकणा अधिकार देण्यात आला आहे.
४) म. गांधीजिनी सामाजिक आणि राजकीय जीवन एक उच्च नैतिक पातळीवर नेले.
५) म. गांधीजिनी सतत उच्च नैतिक मूल्यांचा आग्रह धरला होता.
६) भारतातील सर्व राजकीय पक्षांनी भारतातील धर्माबाबत परस्पर विश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**सारांश**

म. गांधीजींच्या विचारांचे चिंतन आंतरराष्ट्रीय कल्याणाच्या व मानवतेच्या रक्षणाकरीता कल्याणकारी असे आहे. संपूर्ण जगात ज्या समस्या उद्भवल्या आहेत या समस्यांची सोडवणूकही म. गांधीजीच्या चिंतनात व विचारात आहे. गांधीवादातील धर्म व नीती, सत्य आणि अहिंसा, धर्मनिरपेक्षता, मताधिकार ह्या संकल्पना समजून त्या साठीच्या मूल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे. म्हणजेच आज जगाला भेडसावणाऱ्या दहशतवाद, भ्रष्टाचार, प्रांतवाद, युद्ध, भांडवलशाहीची मक्तेदारी, गरीबी, बेकारी, विषमता, इ. संमस्या दुर करणारी गांधीजीची विचारसरणी आहे. म्हणून गांधीजींच्या राजकीय विचारांची गरज आज जगाला आहे.

**संदर्भ**

१) शिंदे अनिल, मोठ्यांची बालपण, उन्मेष प्रकाशन, पुणे, १९८९, पान. क्र. ३१
२) मुठाळ राम, भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, अंशूल पब्लिकेशन, नागपूर, १९९८, पान. क्र. ७४.
३) जैन यशपाल, अहिंसाकी कहाणी, गांधी स्मारक निधी, सस्ता साहित्य मंडळ.
४) पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पान. क्र. १६५
५) गांधीजी, हिंद – स्वराज्य, परधांम प्रकाशन, पवनार जि. वर्धा, आवृती ५ वी, जुलै २००७, पान. क्र. ५७.
६) पाटील वा. भा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, भाग-२, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००९, पान. क्र.३२.

७) राठी शुभांगी, भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१६, , पान. क्र. ११५.

८) साधना दिवाळी अंक,२०१२, , पान. क्र.७१.

९) कुरूंदकर नरहर, आकलन, आवृती पहिली, देशमुख आणि कंपनी,पुणे,१९८५, , पान. क्र.१२५.

१०) कुंभार नागोराव,(संपादित), धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? प्रबोधन प्रकाशन, लातूर,१९८८, , पान. क्र.३७.

११) गांधी,महात्मा, (धर्माधिकारी तारा अनुवादित), हिंदू धर्म म्हणजे काय? नॅशनल बूक ट्रस्ट, इंडिया, तर्फे भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, दुसरी आवृती, नवी दिल्ली, २००१, पान. क्र.५.

१२) पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,१९८३, पान. क्र.१०.

१३) धवण गोपीनाथ, सर्वच्च तत्वदर्शन, संत साहित्य प्रकाशन, दिल्ली,१९५१, पान. क्र.३२३.

१४) उपरोक्त, गांधीजी हिंद स्वराज्य, पान. क्र.६७.

१५) यंग इंडिया, २४ एप्रिल १९२४.

१६) यंग इंडिया, ५ जानेवारी १९२२.

१७) चव्हाण पंजाब, भिसे रामचंद्र, जवळगे हनुमंत, हट्टेकर विजय(संपादित), गांधी तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही, Avon publication, Delhi, 2013, पान. क्र.२.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# महात्मा गांधी यांचे स्त्री सुधारणा विषयक कार्य

प्रा. डॉ. हुरगूळे निवृत्ती रंगनाथ

समाजशास्त्र विभागप्रमुख ,शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

---

सारांश

आज मानवाने खुप प्रगती केली आहे. प्रगती करुन आपले जीवन सुखमय केले आहे. असे असले तरी आजच्या समाजात आणि गांधी कालीन भारतीय समाजात आणि गांधी कालीन भारतीय समाजात स्त्रीयांसमोर काही प्रश्न होते. ते प्रश्न फार पूर्वीपासुन चालत आले होते. त्यात महिलांचा दर्जा, बालविवाह, सतिप्रथा, देवदासीप्रथा, स्त्री शिक्षण इत्यादी. यासर्व घटकांवर गांधींनी केलेले कार्य व विचार हे आजच्या स्थितीत ही महत्वपूर्ण ठरते.

संज्ञा :-

सतिप्रथा, बालविवाह, देवदासी, घरगुती हिंसा, दर्जा.

प्रस्तावना

आधुनिक युगात सर्व जग हे जवळ आले आहे. माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, संदेशवहन यामध्ये विज्ञानाने बरीच प्रगती केली आहे. यामुळे मानवी जीवन अधिक सुखी झाले आहे. जेवढे मानवी जीवन सुखी झाले आहे. तेवढेच ते गुंतागुंतीचे सुध्दा झाले. जस-जसे मानव प्रगती कडे वाटचाल करत आहे. तसे मानवी जिवनात अनेक समस्या वाढत चालल्या आहेत. आज मानव हा पृथ्वीशिवाय दुसऱ्या ग्रहावर वस्ती करु इच्छीत आहे. मानवाने एका बाजुला ऐवढी प्रगती केली असली तरी आजही स्त्री जिवन हे अनेक समस्यांनी व्यापलेले पहावयास मिळते. भारतीय समाजाचा विचार केला असता राज्यघटनेने महिला व पुरुष यांना समान अधिकार दिले आहेत. परंतू समाजात मात्र आपणास वेगळे चित्र पहावयास मिळते आहे. स्वातंत्र्य पूर्वकाळात स्त्रीयां पुढे जे प्रश्न होते. ज्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. तेच प्रश्न, समस्या, दर्जा, बालविवाह, विधवा विवाह, वैश्याव्यवसाय, घरगुती हिंसा, हुंडाबळी इत्यादी प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

'यत्रनार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' म्हणजे ज्या समाजातील नारीची पुजा केली जाते. त्यांना सन्मानाने वागवले जाते. त्या समाजात कुटुंबात देवता निवास करतात. अशी धारणा प्राचीन भारतीय समाजात होती. परंतु मनुस्मृतीच्या काळात गवारशुद्र पशु, नारी असे संबोधल्या गेले. स्त्रीला हिन लेखल्या गेले. पुरुष प्रधान संस्कृतीचा उदय याच ठिकाणी झाला असे म्हणता येते. मानवजातीची उपकारक सृजनशक्ती असलेली स्त्री हळुहळु एक भोग वस्तु बनली. तीच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत गेला. आणि स्त्री जीवन हे यातनामय झाले. स्त्रीच्या अंगी असलेला नैसर्गिक सेवाभाव, सहनशिलता, सोशिकता, मालमत्ता लज्जाभाव तिच्यासाठी मारक ठरला. पुरुषप्रधान संस्कृतीने याचा फायदा घेऊन स्त्रिला बंधने टाकले. तिच्या प्रगतीच्या वाटा बंद झाल्या यामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यात सतीप्रथा, केशवपण, देवदासी, हुंडा याचा समावेश होतो. हुंडा प्रथेने नविन प्रश्नाला जन्म दिला तो म्हणजे स्त्रिभृण हत्या यामुळे स्त्रिचा गर्भ मातेच्या उदरात मारल्या जाऊ लागले.

अशा एकूण अंधकारमय परिस्थितीत भारतावर इंग्रज सत्तेचे अंमल सुरु झाले. हे जरी राजकीय परिवर्तन झाले असे वाटत असले तरी याचे परिणाम हे फार दुरगामी स्वरुपाचे झाले असे म्हणता येते. कारण यामुळे पाश्चात्य सांस्कृतीक जीवन मुल्ये भारतीय जीवन मुल्याहून सर्वस्वी भिन्न होती. बुध्दीप्रामान्य, उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, समानता असा तात्वीक आधार पाश्चात्य संस्कृतीला होता. याच आधुनिक शिक्षणामुळे मिळालेल्या प्रेरणेद्वारे राजा राममोहन रॉय, आगरकर, महात्मा फुले, रानडे, महात्मा गांधी अशा अनेक समाज सुधारकांनी स्त्रीयांची दयनिय अवस्था बदलण्यासाठी समाज व शासनासी दोन हात केले. महात्मा गांधी हे स्त्री शक्तीसाठी प्रेरणा ठरले. त्यांच्या स्फुर्तीने अनेक स्त्रीयांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग नोंदवला. स्त्रि जीवनात सुधारणासाठी गांधीजींनी अनेक प्रयोग केले. त्यांनी केलेल्या कार्याचा परामर्श प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आला आहे.

उद्देश :-

1) गांधीकालीन स्त्रियांची स्थिती जाणुन घेणे.

2) गांधीजींनी स्त्रिजीवन सुधारणासाठी केलेले कार्य जाणुन घेणे.

गृहितक :-

1) गांधीकालीन स्त्रियांची स्थिती हालाखीची होती.

2) गांधीजींनी स्त्रि जीवन सुधारण्यासाठी कार्य केले.

संशोधन पध्दती / तथ्य संकलन

प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्यांचे संकलन हे तथ्य संकलन पध्दतीचा दुय्यम साधनांच्या आधारावर करण्यात आले आहे. संकलित तथ्यांचे गुणात्मक आधारावर वर्गीकरण केले. वर्गीकृत तथ्यांची व्यवस्थित माडणी करुन वर्णनात्मक विवेचन करण्यात आले आहे. सदरिल विवेचनाच्या आधारावर निष्कर्षाची मांडणी करण्यात आली आहे.

विषय विवेचन :-

महात्मा गांधी यांच्या स्त्रि सुधारणा विषयक दृष्टीकोनाचा अभ्यास करत असतांना आपल्या असे लक्षात येते की, जगातील सर्वच मानव समाजात स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला हजारो वर्षाचा इतिहास आहे. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाबद्दल समाज सुधारकांना जाणिव होऊ लागली. तेंव्हा समाज सुधारकांनी त्या विषयक लिखानाला व कार्याला सुरुवात केलेली दिसुन येते. नंतर स्त्रीवाद हा शब्द प्रयोग वापरण्यात आला. एखादया देशाच्या संस्कृतीचा अभ्यास करावयाचा झाल्यास त्या देशातील स्त्रीयांच्या दर्जा व स्थितीचा अभ्यास केल्या शिवाय देशाच्या संस्कृतीचा अभ्यास होणे शक्य नाही. भारतीय समाजात स्त्रीयांचा दर्जा हा अत्यंत निम्न होता. “गितेसारख्या धर्मग्रंथात स्त्रीयांची अतिशुद्रामध्ये गणना केली आहे.”[1] परंतू प्राचीन भारतात वैदिक कालखंडात स्त्री-पुरुष समानता असल्याचे इतिहास सांगतो. तरी ही स्त्रीयांना धार्मिक व राजकीय अधिकार नव्हते. गौत्तम बुध्दांनी मात्र स्त्रीयांना धार्मिक अधिकार दिले. म्हणून संघमित्रा सारख्या स्त्रीने ‘स्त्रीगाथा’ हा ग्रंथ लिहिला व धर्म प्रसाराचे कार्य केले. मध्ययुगाच्या काळात महानुभव पंथाने जातीभेद, लिंगभेद मानुन स्त्रीयांना पुरुषा बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे असे मत स्पष्ट केले. शिवकाळात सुध्दा स्त्रीयांची सामाजिक परिस्थिती फार सुधारलेली नव्हती. परंतू छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक आदरभावाने स्त्रियांचे जीवन काही प्रमाणात सुखी झाले होते.

स्त्री सुधारणेची वाटचाल खऱ्या अर्थाने राजाराम मोहनरॉय यांच्या पासून झालेली दिसते. पुढे स्त्री सुधारणेसाठी महात्मा फुले, शाहू, आंबेडकर व महात्मा गांधी यांनी कार्य केलेले आहे. “स्त्रियांना आपले स्वातंत्र्य प्राप्त करुन घेण्याची इच्छा असेल तर त्यांचे पहिले साधन शिक्षण हे आहे.”[2] मुलांपेक्षा मुलींना शिक्षण देणे अधिक महत्वाचे आहे. हिंदूस्थान स्वतंत्र झाल्यावर मी जिवंत असलो आणि माझा अधिकार चालू राहिला तर मी स्त्री शिक्षणावर अधिक भर देईन असे मत महात्मा गांधी यांनी स्त्री शिक्षण विषयी मांडलेले दिसते. ज्या समाजात शिक्षणाचा गंध नाही त्या समाजाची अवस्था पशु पेक्षा वेगळी नसते. पुर्वी भारतात स्त्रीयांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे स्त्रीयांना शिक्षण घेता येऊ लागले. परंतू समाजाची मानसिकता याबाबत तयार झालेली नव्हती. या प्रसंगी गांधी यांनी स्त्री शिक्षणासाठी सत्याग्रहाच्या माध्यमातुन प्रयत्न केले. शिक्षण हे एक साध्य नसुन साधन आहे. ज्या साधनांच्या साहाय्याने मानवाला आपले चारित्र्य घडवायचे असेल तर स्त्री शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

महात्मा गांधी यांच्या मते स्त्री व पुरुष समान आहेत. दोघ एकमेकांच्या सहकार्याशिवाय जिवन जगू शकत नाहीत. परंतू पुरुषांनी अनंत काळापासुन स्त्रीवर आपले अधिकार प्रस्थापित केले. पुरुष आपल्या स्वार्थासाठी स्त्रीला कनिष्ठ समजतो हे योग्य नाही. मुलगा-मुलगी दोघे समान आहेत. दोघांनाही जगण्याचा समान अधिकार आहे. “पत्नी ही पतीची दासी नसुन सहचरींनी आहे. त्यामुळे पत्नीला पतीच्या बरोबरीने अधिकार मिळाले पाहिजेत.”[3] पत्नी ही पतीची गुलाम नाही. पती परमेश्वर असेल तर पत्नी ही देवी आहे. पतीचा दर्जा जेवढा आहे तेवढाच पत्नीचा सुध्दा आहे. किंबहूना पत्नीचा दर्जा हा पतीपेक्षा उच्च असायला हवा कारण स्त्री ही मानव जातीची जननी आहे. मृत्युमुळे समाजातील व्यक्ती नष्ट होतात. तर जन्माने त्यांची जागा भरुन निघते व ते कार्य स्त्रीया करतात. म्हणुन समाजाचे सातत्य व स्थैर्य हे स्त्रीयांवर अवलंबून आहे. “स्त्रीयांना स्वत:ला पुरुषांच्या अधीन मानण्याचे किंवा त्याच्यापेक्षा हीन समजण्याचे काही कारण नाही. विभिन्न भाषांमध्ये स्त्रीला पुरुषाचे अर्धांग मानले जाते.”[4] या अर्थाने पुरुषही स्त्रीचे अर्धांग आहे. स्त्री-पुरुष वेगवेगळया सत्ता नाहीत. तर एकाच सत्तेचे दोन भाग आहेत.

महात्मा गांधी यांनी बालविवाह पध्दतीवर कडाडून हल्ला केला आहे ते म्हणतात, “बालविवाह पध्दती म्हणजे नैतिक व शारीरिक दृष्टता आहे”[5] यामुळे नैतिकते बरोबर शारीरिक अधोगती होते. बालविवाह पध्दती ग्रामीण भागाइतकीच शहरी

भागात सुध्दा आहे. ही एक समाजाला लागलेली कीड आहे. ती समुळ नष्ट करावयास हवी. ह्या साठी स्त्रीयांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे. म्हणुन त्यांनी अखिल भारतीय महिला परिषदेला असा सल्ला दिला की, जर परिषदेला आपले नाव सार्थकी लावायचे असेल तर परिषेदच्या महिलांनी ग्रामीण भागात जाऊन कार्य करावयास पाहिजे.

बालविवाहास पाठिंबा देणे म्हणजे देवापासुन तसेच स्वराज्यापासुन दुर जाणे होय. स्वराज्यासाठी झगडणे म्हणजे केवळ राजकीय जागृती नव्हे तर सर्वांगीण प्रगती होय. हया नंतर भारतात १९२९ साली बालविवाह विरोधी कायदा संमत झाला. याचबरोबर विधवांच्या पुनर्विवाहाबाबत गांधीजींनी सकारात्मक भूमिका घेतली. विधवा हा काही समाजाला लागलेला कलंक नाही. विधवांनी पुन्हा विवाह करण्याची इच्छा असेल तर त्यांनी पुनर्विवाह करणे योग्यच आहे असे विचार गांधीजींनी मांडले होते.

भारतातील काही जाती व धर्मामध्ये स्त्रीयांसाठी पडदा पध्दती अस्तित्वात होती. ती आजही काही अंशी आपणास पहावयास मिळते. स्त्रियांनी चेहऱ्यावर पडदा ओढल्याने त्यांचे शील सुरक्षित राहते. या कल्पनेत तथ्य नसुन शील संरक्षण हे आतील प्रेरणेने, स्वयंभूच होत असते. अशी भूमिका महात्मा गांधी यांनी मांडली. पडदा पध्दती ही स्त्रीयांना कमी लेखण्याच्या रुढीमुळे, त्या दुर्बल आहेत. या समजुतीमुळे आलेली आहे. पुरुषाच्या वाईट नजरेच्या त्या शिकार होऊ नयेत. यासाठी स्त्रिया पडदा ओढतात. म्हणुन पुरुषांनीच स्त्रीयांना अभय दयावे व त्यांना पडदा पध्दतीतुन मुक्त करावे.

भारतीय समाजात फार पुर्वीपासुन देवाला मुलगी किंवा मुलगा सोडण्याची प्रथा प्रचलित होती. त्यांना “वाघ्या-मुरळी” असे म्हटले जायचे. मुरळी म्हणून सोडलेल्या स्त्रीयावर समाजाकडून अत्याचार केला जायचा त्याचा परिणाम हा त्या स्त्रीला पुन्हा वैश्या व्यवसायाकडे वळावे लागे. हया कारणामुळे स्त्री वैश्या होत नव्हती तर इतर ही कारणे त्याला कारणीभुत होती. त्या पुरुषी सत्ता व अधिकार गाजवण्याची पध्दत एक महत्वाची ठरते. प्राचीन भारतात राजे, राजवाडे होऊन गेले. त्यांच्या कडे फार मोठे जनानखाने असत. याचा सुध्दा परिणाम स्त्रीयांना वैश्या व्यवसायाकडे वळवण्यासाठी होत होता. आजही भारतात हा व्यवसाय फार मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. स्त्रीयांची खरेदी-विक्री झाल्याची उदाहरणे आपणास पहावयास मिळते. “वैश्या व्यवसाय म्हणजे लाजिरवाने जीवन”[6] असे मत गांधीजींनी मांडले, त्यांच्या व्यवसायाच्या जागेस त्यांनी नितीविघातक अड्डा असे संबोधले आहे. हा व्यवसाय जरी पुर्वी पार चालत आलेला असला तरी त्यास आपण नियतेने किंवा गुलामगिरीने स्विकारावयास नको. पूर्वजांनी केलेल्या चुकांना वाव देणे म्हणजे आपल्या स्वराज्याच्या कल्पनेलाच डाग लागण्यासारखे आहे. “त्यांनी 1921 मध्ये बंगालमधील बरीसाल येथे वैश्यांशी संवाद करुन त्यांची दु:खे जाणुन घेतली”[7] पुढील काळात समाजापुढे त्यांनी ‘वेश्यांचे पुनर्वसन’ करण्याचे आव्हान मांडले. वैश्यांना शिवणकाम, सुतकलाई, विनकाम अशी कामे देऊन मदत करण्याचे सुचविले. असे असले तरी आजमितीस भारतातील प्रत्येक शहरात हा व्यवसाय फार मोठया प्रमाणात सुरु असलेला दिसुन येतो.

निष्कर्ष :-

महात्मा गांधी यांनी आपल्या विविध विचार प्रणालीतुन स्त्री-पुरष समानता विषयक विचार व्यक्त केले. त्यांच्या मते स्त्री ही मानवी समाजाची निर्मिती ह्या बाजुने विचार केल्यास स्त्री ही पुरुषा पेक्षा श्रेष्ठ आहे. भारतातील स्त्रीयांवरील अन्याय-अत्याचार दूर करण्यासाठी त्यांनी कार्य केले. त्यात बालविवाह, विधवाविवाह, वेश्याव्यवसाय, स्त्रीशिक्षण विषयक विचार स्त्रीयांच्या जीवनाला कलाटनी देणारे आहेत. त्यांनी आपल्या मीठाच्या सत्यागृहातुन स्त्रीयांना सुध्दा सहभागी करुन घेतले होते. म्हणुन गांधीचे कार्य स्त्री जीवनात सुधारणा घडवून आणणारे असे म्हणता येते.

संदर्भ :-

1) संचालक, दुरशिक्षण विभाग, भारतीय सामाजिक विचारवंत, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड, पृष्ठ क्र. 30.
2) सेटिया एस.सी. संपादक (ज.स. आपटे), ऑक्टोबर 2001, योजना, हुतात्मा चौक, मुंबई, पृष्ठ क्र. 14.
3) सेटिया एस.सी. संपादक (ज.स. आपटे), ऑक्टोबर 2001, योजना, हुतात्मा चौक, मुंबई, पृष्ठ क्र. 33.
4) शहा. मु.ब., जानेवारी 2007, गांधी विचार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृष्ठ क्रं. 133.
5) शहा. मु.ब., जानेवारी 2007, गांधी विचार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृष्ठ क्रं. 97

**********

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ. फ़डसुदाम**
(इतिहास विभाग), शाहिर अण्णाभाऊसाठे महाविद्यालय, मुखेड

---

प्रत्येक महापुरुष हा दिसतो, कळतोत्यापेक्षा कितीतरी महान असतो.कधी कधीत्यांचीतुलनाअथांग सागराशी, विशाल विस्तृत आकाशाशी व उंच पर्वत शिखरांशी केली जाते. महापुरुषाच्या शोधहा क्षितिजांच्या शोधासारखा असतो. सतत वृद्दिंगंतहोत विस्तारत जाणारा, अखिल मानव जातीला वेगवेगळे काही सांगण्याचा, देण्याचा व संस्कृतीला नवी दिशा देण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला त्यात महात्मा गांधीचा निश्चितच समोवेश करावा लागेल. त्यांची वाणी आणि राहणी नेहमीसाधीसरळहोती. महापुरुषाच्या महामार्गला अनेक वाटा, पायवाटा असतात त्यांचा शोध घेणे म्हणजे महापुरुषाच्या अंतरंगात घुसणेहोय.

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर भारतीय स्वातंत्र्य लढयाला महात्मा गांधीचे नेतृत्व लाभले. त्यांनी असहकार सविनय कायदेभंग चळवळ, अहिंसा, सत्याग्रह, आत्मनिर्धार, मौन, उपवास इ.शस्त्रे वापरुन इंग्रज सरकारला निरुत्तर केले. गांधीजीनी शिक्षणाबाबत विचार मांडत असताना असे म्हंटले की " आमचे शिक्षण पुर्णपणे विदेशी आहे, राष्ट्रीय शिक्षणावाचुन सर्व काही व्यर्थ आहे. स्वराज्य आज मिळेल वा उद्या मिळेल पण राष्ट्रीय शिक्षणावाचून ते टिकू शकणार नाही."

गांधीजीच्या या विचारात त्यांना देशाच्या स्वातंत्र्यापेक्षाही देशाची शैक्षणिक व सांस्कृतिक विषमता कमी करुन सुसंस्कृत समाज निर्माण करावयाचा होता असे दिसते. शिक्षणाशिवाय भारतीयांना स्वातंत्र्याची जाणीव खऱ्या अर्थानेहोणार नाही असेत्यांचे मत होते.म्हणजेच शिक्षणापेक्षाही स्वावलंबन आवश्यक आहे, म्हणून २३ ऑक्टोबर १९३७ मध्येत्यांनी'नयीतालीम' या नवीन शिक्षण पध्दतीचा विचार त्यांनी मांडला.या देशात स्वराज्य कसे प्रस्थापित होईल. दारिद्रय, बेकारी, उपासमार इ. गोष्टी कशा नाहीशाहोतील, आर्थिक सामाजिक विषमता कशी कमीहोईल. बुकर टि वॉशिंग्टन, मॉर्टिन ल्युथर, रुसो या विचारवंता प्रमाणेच गांधीनीही सार्वत्रिक शिक्षण, व्यक्तीस्वातंत्र्य समाज विकास या दृष्टीने शिक्षणाला आपल्या जीवन प्रणालित महत्वाचे स्थान दिलेहोते. जॉन डयुई प्रमाणेच गांधीजीनीकृतीद्वारा शिक्षण व शिक्षणाद्वारे लोकशाहीची प्रतिष्ठापणाहा मार्ग स्विकारला होता.गांधीजीनी शिक्षणाचा उद्देश, महत्त्व व त्या विषयीची पध्दती यांचेसखोल विवेचन केले आहे.तसेच देशी भाषा, राष्ट्रभाषा यांचेमहत्वबालशिक्षण, स्त्रीशिक्षण, प्रौढशिक्षण, उच्च शिक्षण, हरिजन शिक्षण, धार्मिक शिक्षण, लैगिंक शिक्षण, शारीरीक शिक्षण अशा विविध शिक्षणाची आवश्यकता व त्यांचेमहत्वगांधीनी सांगितले आहे. त्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम, शिस्त शिक्षणाचे माध्यम, शिक्षक इ. बाबत आपली मते व्यक्त केली आहेत.

**शिक्षणाचा अर्थ व उद्देश :**

गांधीजीच्या मते - प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. मानवता म्हणजे सत्य होय आणि सत्य हाच ईश्वर असल्याने मानवतेची सेवा करणे म्हणजेच ईश्वरप्राप्ती होय. म्हणून माणसाला मानवतेची शिकवण देणारे शिक्षण अधिक उपयुक्तहोय. माणसाला 'माणूस' बनविणारे, त्याला उदयोग देणारे, आणि चारित्र्यसंपन्न बनविणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एक साधन आहे, असेत्यांचे मत होते.

शिक्षणाद्वारेव्यक्तीला आपल्या हक्काची अधिकाराची जाणीव होते. स्वत:चा विकास कसा करुन घ्यावा या बाबत व्यक्तीच्या बुध्दीला चालना मिळते शरीर, बुध्दी, हृदय (मन) यांचा समतोल विकास साधणारेहे एक प्रभावी साधन आहे. असे गांधी म्हणत.

**गांधीजीच्या शिक्षणाची उद्दीष्टे :-**

१) मानवाला सुशिक्षीत करुन त्याच्या चरितार्थासाठी उदयोग निर्माण करण्याबाबत प्रोत्साहन देणे.
२) मानवाला त्याच्या हक्काची जाणीव करुन देणे.
३) व्यक्तीला त्याच्या अधिकाराची जाणीव करुन देणे.
४) संस्कृती संवर्धन करणे.
५) समता, सहिष्णुता व सहकार्य या गुणांचा वाढ करणे.
६) चरित्र्य संवर्धन करणे.
७) नैतिकशिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व सुसंस्कृत बनवणे.
८) स्वावलंबन व स्वयंपुर्णता वाढवणे.
९) राजकीय, सामाजिक,आर्थिक क्षेत्रात समानता निर्माण करणे.

गांधीजी शिक्षकांबाबतही काही विचार मांडताततेे म्हणतात, सत्य, सहिष्णुता, प्रेम व सहानुभुती निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करीत असतो म्हणून शिक्षकहा आदर्श, ज्ञानी व उत्साही असला पाहिजे.शिक्षकहा एक चारित्र्यसंपन्न व श्रध्दावान साधक असला पाहिजे. गांधीनीहिंदी भाषेस राष्ट्र भाषा म्हणून प्रसार केला. गांधीजीनी शिक्षणाचे विविध प्रकार पाडूनसमाजातील सर्व लोकांना शिक्षण कसे मिळेल यासाठी प्रयत्न केले.

**नयीतालीम**- मध्ये बाल शिक्षणाबाबत विचार मांडले आहेत.प्राथमिक शिक्षण सक्तीचे व विनामूल्य असावे.

**मुलभूत शिक्षण पध्दती** - यास नैतिकतेचे व धार्मिकतेचे अधिष्ठान असावे

**प्रौढ शिक्षण** - अज्ञानी व आडाणी लोकांनासुशिक्षीत करण्यासाठी

**स्त्री शिक्षण** - स्त्रियांची बौध्दिक नैतिकशक्तीपातळीपुरुषांच्या बरोबरीने आहे. तेव्हा त्यांना शिक्षण देऊन चूल आणि मूल यातून बाहेर काढावे परंतु ग्रामीण भागाच्या सध्याच्या गरजा पाहता आणि ग्रामीण भागाच्या विकासाचे कार्यक्रम पाहाता असे दिसते की, आज ग्रामीण भागात सामाजिक सक्रियता कार्यक्रम आणि सामाजीक नेतृत्व बळकट करण्याची खूप गरज आहे. परिवर्तनाच्या या टप्यात आजचे शिक्षण कुचकामीठरत आहे.

**university is power house of society** परंतु आधुनिक युगामध्ये**university is poore house of society** अशी आवस्था झाली आहे. इतर क्षेत्रात जशा क्रांत्या झाल्या उदा.हरीतक्रांती, धवलक्रांती, यामुळे त्या क्षेत्रात अमुलाग्र, परिवर्तन झालेतसेच शिक्षण क्षेत्रात पण क्रांतीहोणे गरजेचे आहे गांधीजीनी पेरलेल्या नवीन शिक्षणाचे बीज देशभर ग्रामीण भागात पसरवण्याची गरज आहे. गांधीजीचे शिक्षण तत्वज्ञान समग्र शिक्षण आहे. नवीन शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे शिक्षण आहे या शिक्षणाचे उद्ददीष्टे शोषणमुक्त समानता आधारित नवीन समाज निर्माण करुन सर्वाचे विशेषत : समाजातील मागास घटकांचे शैक्षणिक , आर्थिक आणि सामाजिक विकास करणे आहे. शिक्षणामुळे नेतृत्व क्षमता आणि व्यक्तीमध्ये दृढनिश्चय शक्तीचा विकास व्हावा हे अपेक्षित आहे. शिक्षणामुळेच जबाबदार नागरीकांचा विकास शक्य होईल. त्यामुळेते समाजाला नेतृत्व प्रदान करु शकतील. समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करु शकतील. वैज्ञानिक दृष्टीकोनतयारहोणे गरजेचे आहे.

परंतु लहान मूल जेव्हा वडीलांचा हात धरुन शाळेत जाते त्यावेळेस त्याला शाळेतहाताची घडी तोंडावर बोट असे ब्रिद वाक्य त्याच्या मनावर बिंबवली जातात.म्हणूनच डॉ. बी.आर. आंबेडकर म्हणतात " स्त्रीला गुलाम केले की नवरा गुलामहोतो. मुले गुलामहोतात नंतर समाज गुलामहोतो व समाजावर राज्य करता येते म्हणून सनातनवादी किंवा मनुवादी लोकांनी भारतीय समाजातील स्त्रियांच्या मनात वृत्तवैकल्य कर्मकांडाचे भूत घुसवले आहे. अशा प्रकारे धर्म हे शोषणाचे प्रभावी साधन बनवले, समाजाला मानसिक पंगु करुन अंधश्रध्देचे स्वरुप गडद करण्यात आले, परिणामता भारतात वैज्ञानिकदृष्टीकोन रुजु शकला नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. नयीतालीम प्रसार की आवश्यकता - एस. व्ही. प्रभात
२. भारतीय राजकीय विचार- प्रा.बी. पाटील प्रा. उर्मिला चव्हाण
३. पाथेय - डॉ सहदेव चौगुले
४. आधुनिक भारतातील राजकीय वारसा -
५. भारताचा इतिहास व संस्कृती- डॉ. एस.एस.गाढाळ
६. आधुनिक भारत- एस.एस. भांडवलकर
७. आधुनिक भारताचा इतिहास- र.म. लोहारै

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधी यांचे सत्य आणि अहिंसेविषयक विचार

**प्रा. पाडदे शिवाजी संभाजी**
(इतिहास विभाग प्रमुख ), शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय मुखेड

---

**प्रस्तावना:-**

महात्मा गांधीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव करमचंद गांधीहेहोते.त्यांचे प्राथमिक शिक्षण पोरबंदर येथे झाले पुढे उच्च शिक्षाणासाठीते इंग्लडला गेले.इंग्लडमध्ये वकिलीचे शिक्षण घेऊनते बॅरिस्टर झाले.त्यानंतरते भारतात परतले.ते मुंबई व राजकोट येथे वकिली करु लागले पण त्यांचा वकिलीत जम बसला नाही.

महात्मा गांधीजीहे एक महान मानवता आणि विश्वबंधुत्व यांचा संदेश देणारेतेसत्याचे पुजारीहोते. अहिंसात्मक प्रतिकारांचा मार्ग स्वीकारुन त्यांनी भारतीय स्वातंत्र्य मिळविले. केवळ स्वातंत्र्यप्राप्तीहे ध्येय न ठेवता त्यांनीहिंदु -मुस्लीमांचे ऐक्य, अस्पृश्यता, निर्मुलन, स्वयंपुर्ण खेडयाची योजना, विकेंद्रीकरणात्मक अर्थ व्यवस्था, अराज्यवाद, विश्वस्त वृत्तीचा सिध्दांत, ग्रामराज्य , रामराज्य, ग्रामोओध्दयोग, सर्वोदय, राष्ट्रीय शिक्षण, स्त्री -पुरुष समानता, स्वदेशी चळवळ इत्यादी विषयक कृतिशील विचार मांडले. समाज परिवर्तनाच्या दृष्टीकोणातुन गांधीच्या विचाराला महत्व आहे.

गांधीजीच्या मनावर भगवतगीता, रामायण, महाभारत, बौध्द वाङ्मय बायबल, रास्किन, थेरो, टॉल्सराय, लाओ, कन्फ्युशियस यांच्या विचाराचा प्रभाव पडलेलाहोता. गांधीजी चे कार्य महान आहे. गांधीजीनीहरीजन, यंग इंडिया, नवजीवन या व नियतकालीकातून आपले विचार मांडले, सत्याचे प्रयोग, हिंद स्वराज्य, माझेसमकालीन, गीताबोध, सर्वोदय, ग्रामसेवा, खादी धर्मनिती, नीतीधर्म, गीताई मंगलप्रभात, सत्याग्रह, ब्रम्हचर्य, राष्ट्रवाणी, आरोग्याची गुरु किल्ली, रचनात्मक कार्यक्रम इ.ग्रंथ लिहूनत्याद्वारे आपले विचार जनतेपुढे ठेवले. भारतीय समाज परिवर्तनाच्या दृष्टीनेत्याचे विचार आवश्यक आणि महत्वाचे मानले जातात.गांधीजीचा राष्ट्रवाद विधायक स्वरुपाचा होता. राष्ट्रवादी भावना वाढीला लावण्यासाठी गांधीजीनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारलेला होता. समानता, प्रेमसहकार्यसहिष्णुता, बंधुता, मानवता या गुणांची जोपासना करण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारात आढळते. सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असहकार यांचा वापर त्यांनी केला. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सत्याग्रहाचे मार्ग, ग्रामराज्य, स्वराज्य, अराज्यवाद, आदर्श, समाज, या दृष्टीकोणातुन गांधीजीचे विचार आवश्यक आहेत.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधास प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा आधार घेवुन या शोध निबंधाची शासकीय मांडणी केलेली आहे.प्रस्तुतसंशोधनाला काही मर्यादाही जोपासल्या आहेत.प्रस्तुत शोध निबंधासाठी संदर्भ साहित्याचा आढावा घेतलेला आहे.ऐतिहासिक कागदपत्रे संदर्भ ग्रंथ, पुराभिलेखा कोषागार व इतर शोध निबंधाचा आधार घेतला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टये :-**

१) महात्मा गांधी यांच्या योगदानाचा अभ्यास करणे
२) व्यक्तीत व समाजात सत्य व अहिंसा तत्व रुजविणे
३) भारतीय स्वातंत्र्य लढयात सत्य व अहिंसा मार्गाचा स्वीकारणे
४) विविध धर्मात सत्य आणि अहिंसाचा मार्ग स्वीकारावयास लावणे.

**सत्य :-**

महात्मा गांधीजीच्या राजकीय विचारांचा आधार सत्य हे तत्व आहे. सत्य हेत्यांनी साध्य मानलेहोते. अहिंसा या साधनाद्वारे सत्य साध्य करता येते, अशीत्यांची धारणाहोती. त्यामुळे सत्य व अहिंसा एकमेकांला पुरक आहेत. सत्याशिवाय कोणतेही तत्व पुर्ण नाही, असेस्पष्ट करुन त्यांनीसत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. १) सापेक्ष सत्य २) निरपेक्ष सत्य

**सापेक्ष सत्य : -**गांधीजीच्या मते विशिष्ट परिस्थितीत एखादी विशिष्ट गोष्ट सत्य आहे असे वाटते तेव्हा त्यास सापेक्ष सत्य असे म्हणतात. अर्थात प्रत्येक व्यक्ती परिस्थितीनुसारसत्याची कल्पना बदलु शकते.अशा प्रकारचे सत्य हे अपुर्ण सत्य असते.परंतु पुर्ण सत्य शोधण्याचा तो एक अयशस्वी प्रयत्न असतो.उदा. मानवी सुखाची कल्पनाहीसापेक्षसत्याची कल्पनाहोय. प्रत्येक व्यक्तीच्या मनाप्रमाणेसुखाची कल्पना बदलत असते. तसेच परिस्थितीनुसारसुखाची कल्पना बदलावी लागते.

**निरपेक्ष सत्य :-** सापेक्ष सत्याच्या सहाय्याने व्यक्ती निरपेक्षसत्याकडे जाते. निरपेक्ष सत्य म्हणजे सत्, चित् व आनंद याचा सुंदर समन्वय होय. निरपेक्षसत्य म्हणजे ईश्वर होय. गांधीजीच्या मते निरपेक्ष सत्य हेश्रेष्ठ दर्जाचे सत्य असते.हे प्राप्त करण्यासाठीसापेक्ष सत्याचा मार्ग स्वीकारावा लागतो.व्यक्ती सापेक्ष सत्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणी परिस्थिती प्रमाणेसुधारण्याचा प्रयत्न करते आणि निरपेक्षसत्याकडे पोहोचते. निरपेक्ष सत्य प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला फार मोठीकिंमत द्यावी लागते. गांधीजीच्या मते, सत्य म्हणजे सर्वोच्च प्रेम, सर्वोच्च आत्मबलिदान होय. प्रेम, दया, आत्मबलिदान, बंधुत्व, सेवा याद्वारे निरपेक्ष सत्य प्राप्त करता येते.सॉक्रेटिस, येशुख्रिस्त यांना निरपेक्ष सत्य आत्मबलिदान प्राप्त झ ाालेहोते. धैर्य, चिकाटी, विवेक, आत्मविश्वास, त्याग या गुणांची गरज निरपेक्ष सत्याच्या प्राप्तीसाठी असते. गांधीजीनी अहिंसेपेक्षा सत्याला अधिक महत्व दिलेहोते.गांधीजीनी आपल्या सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रातसत्याची महती वर्णिलेली आहे. सत्य व अहिंसा या प्राचीन तत्वामध्ये

गांधीजीनी नवा आशय भरला आणि ती तत्वे स्वत: आचरणात आनुनसामुदायिक आचारात रुढ करण्याचा प्रयत्न केला केवळ सत्य शब्दोच्चार म्हणजे सत्य नव्हे विश्वाच्या बुडांशी असणारे सनातन तत्व म्हणजे सत्य होय. सत्यामध्ये न्यायाचा अंतर्भाव असतो. अधर्म व अन्याय दुर करण्याचे सामर्थ्य सत्यामध्ये असते. गांधीजीनीसत्याचे महत्व विशद करतांना असे म्हटले आहे, सहस्त्रसूर्य एकत्र केलेतरीहीसत्याची बरोबरी होणार नाही. सत्य व अहिंसा या तत्वज्ञानास अनुसरुनच गांधीजी सर्व जन्मभर निष्काम कर्मयोगी म्हणून स्वातंत्र्य आंदोलनासाठी लढत राहिले. दक्षिण अफ्रिकेतीलसत्यागृहांच्या वेळी त्यांनी सत्य व अहिंसाही तत्वे आधार शक्ती म्हणून स्विकारली होती. ब्रिटीश साम्राज्यशाहीला विरोध करण्याचे सामर्थ्य व गांधीजीना सत्य व अहिंसा या तत्वामुळेच प्राप्त झालेहोते.

**अहिंसा :-**

गांधीजीनी अहिंसा या तत्वाला अतिशय महत्व दिले.सत्य व अहिंसा या दोन गोष्टी परस्परपुरक आहेत.अहिंसेच्या मार्गानेच सत्य प्राप्त होते. सत्य हे साध्य असूनते प्राप्त करण्यासाठी अहिंसाहे आत्मबलाचे उत्तम साधन आहे. त्यांनी सत्य म्हणजे ईश्वर मानूने अहिंसेच्या मार्गानेच ईश्वर प्राप्तीहोऊ शकते असे सांगितले आहे.सत्य व अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.कारण सत्य व अहिंसा एकमेकांपासून अलग करणे कठीण असते. सत्य व अहिंसा या आत्म्याच्या दोन शक्ती असे म्हणतहरिजन या साप्ताहिकातूनत्यांनी अहिंसेची व्याख्या स्पष्ट केलीहोती. पृथ्वीच्या पाठीवरील वस्तुमानाला व प्राणीमात्राला विचाराने, शब्दाने वा कृत्याने संभवणारी दुखापत टाळणे म्हणे अहिंसाहोय. म्हणजे जाणीवपुर्वक क्लेशसहन करणे दृष्टासमोर शरणागती पत्करणे म्हणजे अहिंसा नव्हे, तर दुष्टाच्या मनोदयाला विरोध करण्यासाठी आपल्या संपुर्ण आत्मबलाचा वापर करणे म्हणेज अहिंसाहोय. गांधीजीनी अहिंसेचे प्रमुखतीन प्रकार पाडले आहेत.

**निषेधात्मक अहिंसा :-** गांधीजीच्या मते, प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे कष्ट किंवा दु:ख पोहोचवु नये. आपल्या कार्याद्वारे कृतीद्वारे किंवा शब्दाद्वारे दुसऱ्याला दु:ख होईल असे वर्तन करु नये. दुसऱ्याला त्रास न देणे, दुसऱ्याची कृत्य न करणे म्हणाजे निषेधात्मक अहिंसाहोय.

**विधायक अहिंसा :-**केवळ दुसऱ्याला त्रास न देणे म्हणजे खऱ्या अर्थाने अहिंसा म्हणाता येणार नाही, तर दुसऱ्यावर प्रेम करणे, दुसऱ्याच्या सुखासाठी झटणे यास विधायक अहिंसा असे म्हटलेहोते. स्वत: क्लेशसोसुन जेव्हा व्यक्ती दुसऱ्याच्या सुखासाठी झटते, तेव्हा खऱ्या अर्थाने अहिंसा प्रकटहोते.दुर्बल तर त्या वेळी त्यांच्या मदतीला धावून जाणे, हिच खरी विधायक अहिंसाहोय.

**निरपेक्ष अहिंसा :-** निरपेक्ष अहिंसाहा निरपेक्षसत्याकडे जाण्याचा महत्वाचा मार्ग होय. निरपेक्ष अहिंसाही महान व्यक्तीची अहिंसा असते. धर्माचे पुर्णपणे पालन करुन निरपेक्ष अहिंसेच्या मार्गाने ईश्वर (सत्य) प्राप्तीहोते.गांधीजीच्या मते, निरपेक्ष अहिंसेचेतीन उपप्रकार आढळून येतात.

**वीर पुरुषांची अहिंसा :-**गांधीजीच्या मते, शुरांची अहिंसा मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आढळुन येते. नैतिक आत्मबल व आंतरिक विश्वास या द्वारे व्यक्ती जेव्हा अहिंसेच्या मार्ग स्विकारतो.तेव्हा तिला वीर किंवा शुर पुरुषांची अहिंसा असे म्हटले जाते.वीर पुरुषांची अहिंसा शाश्वत असते.वीर पुरुष समाजातील कोणतीही गोष्टसहज करु शकते.ही अहिंसा म्हणजे वीर पुरुषांचे भूषण असते. स्वत: गांधीजीनी वीर पुरुषांची अहिंसा स्वीकारलेली होती.

**दुर्बलांची अहिंसा :-**समाजातील जे दुर्बल, अगतिक लोक असतात त्यांनीही अहिंसा स्विकारलेली असते. दुर्बलांची अहिंसा विशिष्ठ परिस्थितीत व्यक्ती स्वीकारु शकते.त्यामुळे नंतरचीती कायमपणे राहु शकते.या बाबत काहीही सांगता येत नाही.म्हणून दुर्बलांची अहिंसाही शुरांच्या अहिंसेपेक्षा कमी प्रतीची मानली जाते.व्यक्तीला आपल्या दुर्बलतेमुळे ही अहिंसा मान्य करावी लागते.नैतिक धारणा, सत्य, साहस इ.गोष्टीचा अभाव असल्यामुळे दुर्बलांनी स्वीकारलेली अहिंसा फार प्रभावशाली नसते.संरक्षणासाठी स्वीकारलेला तो एक अहिंसेचा मार्ग असतो.

**भित्र्या व्यक्तीची अहिंसा :-** गांधीजीच्या मते, भित्र्या लोकांच्या ठिकाणी अहिंसा राहू शकत नाही. कारण भीती व अहिंसा या दोन गोष्टी एकत्र राहूच शकत नाहीत.समाज जीवनात जेव्हा एखादी व्यक्ती अयशस्वी बनते.तेव्हा भितीमुळे अहिंसेचा मार्ग स्वीकारण्याचा प्रयत्न करते परंतु गांधीजीनी भित्र्या लोकांच्या अशा अहिंसेला विरोध केला. याबाबत गांधीजी, म्हणतात " भ्याडपणा व हिंसा या दोन मार्गापैकी कोणता मार्ग स्वीकारला असे मला कोणी विचारले तर मीहिंसेचा मार्ग पत्करीन, कारण भित्र्या लोकांच्या अहिंसेपेक्षाहिंसा अधिक उपयुक्त व योग्य असते. वीर पुरुषांची अहिंसा हिचश्रेष्ठ अहिंसा असते.तात्विक दृष्टया सत्य, अहिंसाहे तत्वे आचरणात आणणे अवघड असते.ती स्वीकारली पाहिजे.गांधाीजीनी जगापुढे अहिंसेच्या मार्ग जगाला दिला. समाजामध्ये राष्ट्रराष्ट्रात शांतता, सुव्यवस्था, निर्माण होईल. आर्थिक, सामाजिक जीवन सुरळीतहोईल. राष्ट्राच्या संपत्तीचेसंरक्षणहोईल या दृष्टीकोणातून महात्मा गांधीजीचे सत्य आणि अहिंसाहे विचार अत्यंत महत्वाचे आहेत.

**निष्कर्ष :-**

१) महात्मा गांधीजीचे कुशल नेतृत्व करण्याची क्षमता दिसून आली.
२) व्यक्तीत समाजात सत्य व अहिंसेची तत्व रुजविले.
३) सर्व धर्म समभावना निर्माण होण्यास मदतहोते.
४) सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय जनतेलातयार करणे
५) भारतीय तरुणात राष्ट्रवादी विचारांची जागृती करण्याचे कार्यत्यांनी केले.

**संदर्भ सुची :-**

१) आधुनिक भारताचा इतिहास- प्रा. अशोक भवरे, कल्पना प्रकाशन नांदेड -२००६
२) भारताचा इतिहास- डॉ. कालेकर व्ही.एल. /प्रा.चव्हाण पी.एल. /प्रा.राठोड बी.एन. - अरुणा प्रकाशन लातुर २००९
३) भारताचा इतिहास- डॉ. एस.डी.जाधव- संस्कृती पुस्तकालय नांदेड, २००५.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139



४) आधुनिक भारताचा इतिहास - आर.डी. गायकवाड - फडके प्रकाशन कोल्हापुर -२००७
५) आधुनिक भारताचा इतिहास- जयसिंगराव पवार
६) आधुनिक भारताचा इतिहास- डॉ. साहेबराव गाढाव
७) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. सुमन वैध्य, शांता कौठेकर
८) भारताचा स्वातंत्र लढा- डॉ. वा.ना. कुवेर

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# २१ व्या शतकात महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांची आवश्यकता

**प्रा. माधव मंदेवाड**

एम.ए. (अर्थशास्त्र), सेटए शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेडए ता. मुखेड जि. नांदेड

.................................................................................................................................

## Abstract

महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार म्हणजे संपूर्ण मानव जातीला एका नैतिक व उच्चकोटीच्या विचारावर रोड करणारे विचार आहेत. त्यांना समाजातील दबलेल्या कुजलेल्या लोकांचे सामाजिक व आर्थिक जीवन पाहून ते आत्मक्लेष व्हायचे. म्हणून त्यांनी 'विश्व कुटुंबकम' ची संकल्पना मांडली. त्यासाठी त्यांनी सत्य, अहिंसा, या तत्त्वाचा जीवनभर अवलंब केला. आर्थिक विकास व्हावा यासाठी त्यांनी प्रत्यक्ष असे नेमके विवेचन केले नाही तर त्याच्या एकूण जीवन कार्यातूनच आर्थिक विकासाची बीजे भारतीय अर्थव्यवस्थेत रोवली गेली आहेत. विकासाच्या संकल्पनेत त्यांनी ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग, खादीउद्योग, विश्वस्त संकल्पना, स्वदेशी चळवळ, सर्वोदयाची संकल्पना, श्रमशक्ती, यंत्र व यांत्रिकीकरण स्वयंपूर्ण ग्राम साधी राहणी, मानवी मुल्याची संकल्पना, विकेंद्रीकरण, अशा विविध संकल्पनेची मांडणी त्यांनी सहज केली आहे. जी की त्यांची ही जीवनशैली होती. की जिच्यामुळे संपूर्ण विश्वाला योग्य दिशा आणि विकास यातून निर्माण होईल असे युगपुरुष महात्मा गांधी यांचे विचार होते की ज्यांच्या आर्थिक विचारातून आपण चाललो तर आजच्या एकविसाव्या शतकात भारत हा महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही.

भारतीय इतिहासात सत्य, अहिंसा, सत्याग्रह, व स्वदेशी या चतु:सुत्रीचा अंगीकार करून जनमनामध्येच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये एक अदभूत व प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणून आपण ज्या महामानवाकडे पाहतो ते म्हणजे महात्मा गांधी होय. त्यांनी देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी सर्वाधिक प्रयत्न केले आहेत. तसेच ते सामाजिक, राजकीय, व आर्थिक, तसेच सांस्कृतिक जीवनाला जो मार्ग गांधीजींनी दाखवला त्यामुळेच त्यांचे स्थान प्रत्येक भारतीयांच्या हृदयात कोरले गेले आहे. त्यांचे कार्य भारतीय स्वातंत्र्यसंग्रामासाठी वाहिले गेले. १९२० ते १९४८ या काळाला त्यांच्या या कार्यामुळेच आपण "गांधी युग" असे म्हणून ओळखतो आहे. एवढेच नाहीत तर त्यांना "महात्मा""राष्ट्रपिता" या नावानेदेखील गौरविले जाते.

खरे पाहता महात्मा गांधी यांनी स्वतंत्रपणे कुठेही आपले आर्थिक विचार मांडले नाहीत किंवा एखाद्या आर्थिक प्रश्नावर स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही परंतु गांधीजींनी मांडलेल्या त्यांच्या धर्म, राजकारण, सत्य, अहिंसा, सर्वोदय, ग्रामोद्योग, समाजकारण यावर जे विचार मांडले आहेत त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचारांची पाळेमुळे रुजली आहेत. त्यांच्या ठिकठिकाणी विखुरलेल्या आर्थिक विचारांना एकत्रित आणण्याचे काम त्यांच्या अनेक अनुयायांनी केले आहेत. महात्मा गांधीजींना वाटायचे की अर्थशास्त्र काही वेगळे शास्त्र नसून ते मानवी जीवनाचे एक तत्त्वज्ञान आहे. त्यांना शास्त्र आणि नीती मध्ये फारकत करणे मान्य नव्हते. मानवाचा नैतिक विचारांचा प्रभाव हा आर्थिक जीवनावर असायला पाहिजे असे त्यांचे मत होते. व्यवहारिक शास्त्राला नैतिक मूल्यांची जोड दिल्या शिवाय व्यक्तीचे व राष्ट्राचे कल्याण होणार नाही, अशी त्यांची विचारप्रणाली होती. आजच्या युगात अर्थव्यवस्थेतील गळेकापू स्पर्धा, फसवी जाहिरातबाजी, अवाजवी नफेखोरी, आर्थिक शोषण, नैतिकतेला तिलांजली अशी व्यवस्था आपणास पहावयास मिळते. अशा अंधकार आर्थिक युगातून मुक्त होण्यासाठी महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराची २१ व्या शतकात अत्यंत आवश्यकता आहे.

**महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार**

१. विश्वस्तसंकल्पना.

महात्मा गांधींनी १९१६ मध्ये बनारस विश्व हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी जे भाषण केले त्यात विश्वस्तांची संकल्पना स्पष्ट केली. त्यात गांधीजी म्हणतात तुम्ही करोडो रुपये खुशाल मिळवा. पण लक्षात ठेवा की तुमची संपत्ती ही तुमची नसून केवळ तुमच्या न्याय गरजा भागविण्यासाठी आवश्यक तेवढीच घ्या व बाकी उरलेली संपत्ती ही समाजासाठी वापरा. म्हणजेच समाजातील दीन-दुबळया, गोर-गरीब लोकांच्या सेवेसाठी तुमच्या बाकीच्या संपत्तीचे तुम्हीच विश्वस्त व्हा. विश्वस्त म्हणजे दुस-याच्या मालमत्तेचा

व्यवस्थापक होय. भारतातील श्रीमंत व भांडवलदार वर्गाने आपल्या संपत्तीचा वापर विश्वस्तासारखा करावा. भांडवलदार हे कामगारांचे शोषण करतात त्यांच्याकडून जास्तीचे काम करून घेऊन मजुरी कमी देतात, त्यामधून ते जास्तच श्रीमंत बनतात. त्यात कामगारांची पिळवणूक होते व कामगार व भांडवलदार असी दरी निर्माण होते. त्यांच्यात चांगले संबंध राहत नाहीत. त्यामुळे भांडवलदारांनी आपल्याकडील संपत्ती गरजेपुरती जवळ ठेवावी व बाकी संपत्तीचा उपयोग समाज कार्यासाठी करावा अशा प्रकाराची विश्वस्ताची संकल्पना महात्मा गांधी यांनी मांडली.

महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेत खालील काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश होतो.

१. विश्वस्त संकल्पने मधून भांडवलशाहीला थारा नाही. आणि त्यातून समाजवादी समाज रचना निर्माण करणे.

२. अतिरिक्त संपत्तीचा साठा करू नये तिचा उपयोग समाजासाठी करावा.

३. सब भूमी गोपाल की - म्हणजेच सर्व संपत्ती ही समाजाची आहे. आणि तिचे आपण केवळ विश्वस्त आहोत.

४. श्रीमंतांकडे संपत्तीचा उपयोग करून घेण्यासाठी श्रीमंतांवर जोर जबरदस्ती करून घेणे अयोग्य मानले आहे. त्यांचे मत परिवर्तन करून उपयोग व्हावा व त्यांच्यात नैतिकता रुजवावी असे महात्मा गांधी यांना वाटत होते.

५. उत्पादनाचा उद्देश नफा न राहता गरज असावा.

६. कामगारांना जीवनावश्यक किमान वेतन तसेच कोण्याही व्यक्तीचे कमाल उत्पन्न किती असावे यावरही मर्यादा घालणे जरुरीचे आहे.

**२.ग्रामस्वराज्य.**

महात्मा गांधी म्हणायचे की खरा भारत पाहायचा असेल तर खेड्याकडे चला. प्राचीन काळातील खेडी ही स्वयंपूर्ण होती, आर्थिक दृष्ट्या ती संपन्न व स्वावलंबी होती. त्याकाळी भारतात प्रत्येक खेड्यामध्ये उत्पादन, विभाजन, व उपभोग या तिन्ही गोष्टी एकाच वेळी घडत असत. यासाठी कोणतीही खेडे हे दुस-या कोणत्याही खेड्यावर अवलंबून नसायचे.

परंतु आधुनिक काळात भारतातील खेड्याचे चित्र फारच बदललेले दिसून येते. खेडयामध्ये शेती व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय शिल्लक राहिलेला नाही. त्यातही खेडयातील लोकांची होणारी पिळवणूक, तेथील दारिद्रय, इतर सुविधांचा अभाव, अनारोग्य, शिक्षणाचा अभाव, वाहतुकीचा अभाव, यामुळे आजची खेडीही बक्काल होत चालली आहेत. व ते शहराकडे स्थलांतरित होत आहेत. ह्यासाठी महात्मा गांधी म्हणायचे की भारतीय संस्कृती जर टिकवायची असेल तर खेडी टिकली पाहिजेत. व खेडयांचा कायापालट झाला पाहिजे. त्यामुळे प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण झाले पाहिजे. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, व आरोग्य ह्या सेवाउपलब्ध झाल्या पाहिजेत. प्रत्येक गावात व्यक्तिगत स्वातंत्रयावर आधारलेली पूर्ण लोकशाही असली पाहिजे असे गांधीजींची विचारधारा होती. आदर्श ग्रामस्वराज्य कसे असावेत याबद्दल गांधीजींनी काही पुढील अटी सांगितल्या आहेत.

- खेडयाची रचना व्यवस्थाबद्ध असावी.
- खेडी ही आर्थिक दृष्टया स्वावलंबी असावी.
- खेडयात धर्मशाळा व छोटा दवाखाना असावा.
- खेडयात पाणीपुरवठ्यच्या सोयी असाव्यात.
- प्रत्येक खेडयात करमणुकीच्या सोयी, खेळाची मैदान व जनावरांसाठी राखीव जागा असावी.
- खेडयाचा ग्रामकारभार हा ग्रामपंचायतीमार्फत चालावा व त्यांना कायदे करण्याचे अधिकार असावेत.
- खेडयात जातिव्यवस्थेला थारा असू नये.
- खेडयात मूलभूत शिक्षण सक्तीचे असावे.
- खेडयातील उत्पादनाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

**३. सर्वोदय**

सर्वोदय म्हणजे सर्वांचे कल्याण होय. ह्या मध्ये समाजातील ज्या वर्ग संकल्पना आहेत त्या नाहीशा होतील. सर्वांचे हित व्हावे, सर्वांचे मंगल व्हावे असा त्याचा अर्थ आहे. महात्मा गांधी यांनी जॉन रस्किनचे “अन टू धिस लास्ट”(Un to This Last) हे पुस्तक वाचून खूपच प्रभावित झाले. त्यांनी त्या पुस्तकाचे गुजराती

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


मध्ये भाषांतर करून त्या पुस्तकाचे नाव गांधीजींनी ”सर्वोदय“ असे ठेवले यावरून सर्वोदया ची संकल्पना त्यांनी मांडली.

गांधीजींनी अहिंसक मार्गाने समाजवाद आणण्यासाठी सर्वोदयाची संकल्पना मांडली आहे. त्यांना रक्ताचा एक थेंबही न सांडता अहिंसक मार्गाने समाजवाद आणावयचा होता. यामध्ये सर्व जाती, धर्म, पंत हे गुण्या गोविंदाने नांदावे त्यांच्यात बंधुभाव निर्माण व्हावा अशी त्यांची धारणा होती. वर्ग विरहित समाज रचना निर्माण होत असताना यातील उत्पादन, वितरण, विज्ञान, तंत्रज्ञानाचा उपयोग होईल परंतु भौतिक प्रगतीमागे आंधळेपणाने धावणे योग्य नसेल. व्यक्तीचे स्वातंत्र व प्रेरणा जिवंत राहतील व सर्वांना किमान वाजवी उत्पन्न देणारी वितरण रचना असेल, पण अतिरेकी संग्रहण व शोषण टाळून त्यातील समाजाचे कल्याण साधले जाईल. केवळ भौतिक प्रगतीला थारा न देता शाश्वत मूल्यांवर भर दिला जाईल त्यातून सर्व समाजाचे कल्याण होईल अशी महात्मा गांधी यांची सर्वोदयाची संकल्पना होती.

**४. स्वदेशी चळवळ**

महात्मा गांधी यांनी स्वदेशी चळवळ उभी केली त्यामागचे कारण असे की, भारतातून ब्रिटिशांना हाकलून लावणे हा हेतू होता. या माध्यमातून सामान्य जनता इंग्रजां विरुद्ध बंड करण्यास तयार करावी हा होता. स्वदेशी म्हणजे आपल्या देशातील मालाचा उपभोग घ्यावयाचा व परदेशी माल हा नाकारावयाचा हा स्वदेशी चळवळ चालू होण्या मागे हेतू होता. त्याचबरोबर भारतातील लघु आणि कुटीर उद्योगांना एक प्रकारचे संरक्षण मिळून व्यापार व उद्योगात वाढ होईल कापड उद्योगाला प्रोत्साहन मिळेल व ब्रिटीशांची आर्थिक कोंडी करून त्यांच्यावर दबाव टाकता येईल या हेतूने महात्मा गांधीनी ह्या चळवळीचा आरंभ केला.

भारतात ब्रिटिश येण्या अगोदर भारताची आर्थिक परिस्थिती मजबूत होती. कारण तेव्हाची ग्रामीण अर्थव्यवस्था ही स्वयंपूर्ण होती. भारतात ब्रिटिशांची सत्ता असल्यामुळे येथील कच्चामाल घेऊन त्यांचे पक्क्या मालात रूपांतर करून तो भारतीय बाजारपेठेत स्वस्तात विकला जात होता. त्यामुळे भारतातील कुटीर व लघु उद्योग बंद पडण्याचा मार्गी लागत होते. ग्रामीण भाग हा लघु व कुटीर उद्योग यावर निर्भर होतो. त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगार बंद होऊ लागले. म्हणून जोपर्यंत आपण ब्रिटिशांच्या मालावर बहिष्कार टाकणार नाही तोपर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्था व उद्योगधंद्याचा विकास होणार नाही. म्हणूनच महात्मा गांधींनी असहकार व स्वदेशी चळवळ उभारली.

**५. खादी व ग्रामोद्योग**

गांधीजी म्हणत असत की खरा भारत पाहायचा असेल तर खेडयाकडे पहा खेडी सुधारली तर देश सुधारेल म्हणून त्यांनी ग्रामस्वराज्याची आदर्श कल्पना मांडली आणि त्याच प्रमाणे भारतातील खेडयांची नवनिर्मिती झाली पाहिजे असे प्रतिपादन केले. परंतु आपल्या खेडयातील आरोग्य, आहार, शिक्षण, उपासमार, बेकारी, दारिद्रय, यासारखे प्रश्न सुटणार नाहीत तोपर्यंत आपल्या खेड्यची प्रगती होऊन ग्राम स्वराज्य निर्माण होणार नाही. त्यासाठी महात्मा गांधी यांनी खेड्यतील वरील प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी खेडोपाडी खादीउद्योग व ग्रामोद्योग निर्माण झाले पाहिजेत असे प्रतिपादन केले आहे.

महात्मा गांधींनी खादी ग्रामोद्योगाला ग्रामोद्योग म्हणून संबोधले आहे. कारण गांधीजींनी खादीला अहिंसेचे प्रतिक म्हणून मानले आहे. खादी ही चरख्यावर तयार होणारे वस्त्र आहे. त्यामुळे त्यांनी चरख्याला सूर्यमालेतील सूर्याचे स्थान दिले आहे. जसे सूर्यमालेतील ग्रह फिरतात तसा चरखा फिरतो व त्यामुळे ग्रामोद्योग हे चालतात. चरखा हा सर्व ग्राम उद्योगांचा केंद्रबिंदू आहे. चरखा हा सूर्य मानला तर अन्य ग्रामउद्योग हे सूर्याभोवती फिरणारे सूर्यमालेतील ग्रह ठरतील व सूर्य जेवढा शक्तिमान तेवढे त्याच्या भोवती फिरणारे ग्रह ही शक्तिमान बनतील व त्यामुळे ग्रामोद्योग ही शक्तिमान होतील. यावरून गांधीजींनी खादी व ग्रामोद्योगाला एक आगळे वेगळे महत्त्व मिळवून दिले आहे.

**६. श्रमप्रतिष्ठा**

श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असे महात्मा गांधी म्हणत त्यांच्या मते कोणतेही काम कमी प्रतीचे नाही. श्रमिकांचे श्रम व भांडवलदाराचे श्रम हे सारखेच आहेत. श्रम हे पूजनीय आहेत असे महात्मा गांधी म्हणायचे कारण चांगले आरोग्य राहण्यासाठी श्रम करणे अनिवार्य आहे. कुठली गोष्ट मिळवायची असेल तर श्रम हे करावेच लागतील व हे एक पवित्रच कार्य आहे. निसर्ग ज्या प्रमाणे आपले कार्य करते त्याचप्रमाणे मानवाने आपले कार्य करावे. म्हणजेच समाजात श्रमाला प्रतिष्ठाही मिळाली पाहिजे की ज्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळू शकेल.

**७. यंत्र व यांत्रिकीकरण**

देशाच्या आर्थिक विकास हा यांत्रिकीकरणामुळे वाढतो, उद्योगात वाढ होते, तांत्रिक प्रगती होते परंतु महात्मा गांधींनी या यांत्रिकीकरणाला विरोध केला आहे. परंतु त्यांचे विचार आपण नीट समजून घेतलो नाही. म्हणून त्यांच्या विचारांची गफलत होत आहे. गांधीजी म्हणायचे की यांत्रिकीकरणामुळे मूठभर लोकांकडे संपत्तीचे केंद्रीकरण होईल आणि त्यामधून देशात आर्थिक विषमता निर्माण होईल. त्याचबरोबर भारतासारख्या मुबलक श्रम असलेल्या देशात यांत्रिकीकरणाची उपयुक्तता नाही. तर ज्या देशात भांडवलाची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता आहे अशा देशात यांत्रिकीकरण फायद्याचे आहे. भारतात आधीच श्रमिक बेकार आहेत त्यांच्या हातांना काम मिळत नाही त्यामुळे यांत्रिकीकरणामुळे भारतातील बेरोजगारी आणखीनच वाढ वाढेल त्यामुळे यांत्रिकीकरणाला विरोध केला आहे. एवढेच नाहीतर गांधीजींच्या मते यांत्रिकीकरणाचा वापर हा विवेकपूर्ण व्हावा यावरही त्यांचा भर होता. त्यांच्या मते माणसाला मदत करणारी यंत्रे हवीत परंतु माणसांना बेरोजगार बनविणारे यंत्र नकोत असे ते म्हणायचे.

**८. नीतिशास्त्र आणि आर्थिक विचार**

महात्मा गांधीचे संपूर्ण आर्थिक विचार हे नीतीमत्तेवर आधारलेले असून त्यांचे आर्थिक विचार हे नीतिशास्त्र पासून वेगळे करताच येत नाहीत त्यांची विश्वस्त संकल्पनाही नीतीशास्त्रावरील आधारलेली दिसते त्याचबरोबर आपण वर उल्लेख केलेल्या सर्व मुद्द्यांमध्ये नीतिशास्त्र भरलेले दिसते.यांत्रिकीकरण, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय चळवळ ह्या सर्व संकल्पना नितीशास्त्रावरच आधारलेल्या दिसतात. त्याचबरोबर त्यांचे असे मत आहे की समाज हा शोषण विरहित असला पाहिजे. तसेच समाजात अनैतिकतेला थारा नाही शोषण करून श्रामाद्वारे तयार केलेल्या वस्तूंचा उपभोग घेणे अनैतिक कार्य आहे असे गांधीजी म्हणत असत.

**समारोप.**

महात्मा गांधीजी यांनी आपल्या विचारात जी “विश्व कुटूंबाची” जी संकल्पना मांडली आहे. त्यावरून त्यांच्या मते अर्थव्यवस्थेतील कुठलाही घटक वंचित असता कामा नये, किंवा त्यांचे शोषण होऊ नये. खेडीही स्वयंपूर्ण झाली पाहिजे ग्रामीण लघु व कुटीर उद्योगाची भरभराट होऊन खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजे. त्यातच कुठलाही भेदभाव, जातपात, वर्गकलह असता कामा नये. म्हणून त्यांनी ग्राम उद्योगावर भर दिला. आणि अतिरेकी यांत्रिकीकरणाला विरोध केलेला दिसून येतो. त्याचबरोबर स्वदेशी चळवळ, व श्रमाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून ते स्वत: चरखा चालवायचे आणि आपले वस्त्र आपणच तयार करून धारण करायचे, याद्वारे श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. यावरून महात्मा गांधीजींचे विचार आजच्या २१ व्या शतकातही लागू पडणारे आहेत. १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत कमालीचे बदल झाले. खाउजा धोरणामुळे भांडवलदारांचा मोठया प्रमाणात फायदा व श्रमिकांचे आणि गरिबांचे शोषण होत चालले आहे. देशातील मुठभर लोकांच्या हातात आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण झाले असून आर्थिक विषमतेची दरी दिवसेंदिवस वाढत आहे. यातून मुक्त व्हावयाचे असेल तर महात्मा गांधीचे विचार आज ह्यघ व्या युगातही प्रस्तुत ठरतात.

**संदर्भ.**

१. आर्थिक विचारांचा विकास - विजय कविमंडन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
सप्टेंबर १९९० पेज क्रं. ३९० ते ४०१

२. अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास -के.एच.ठक्कर, फडके प्रकाशन, कोल्हापूर
५ सप्टेंबर २००५ पेज क्रं. २४८ ते २६६.

३. आर्थिक विचारांचा इतिहास - पी.आर.कुमानाचे, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
जुन १९९ पेज क्रं. १४४ ते १४९.

४. eostredse.wordpress.com

# CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


## महात्मा गांधीजीचे तात्विक विचार


**प्रा.सोळंके अंकुश अभिमन्यू**

**क्रिडासंचालक, स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय पाथरी**


आधुनिक भारताच्या नवनिर्माणात राजा राम मोहनरॉय यांच्यापासून ते स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, राम मनोहर लोहिया आदी महापुरुषानी मौलिक योगदान दिलेआहे. त्यापैकी महात्मा गांधीले योगदान राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाचे आहे. त्यामुळे आपण त्यांना राष्ट्रपिता असे संबोधतो. महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख नेते व तत्वज्ञ होते. या संग्रामात त्यानी सत्य, अहिंसा व सत्याग्रह या मार्गाचा अवलंब केला. अहिंसात्मक मार्गानी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी संपुर्ण जगाला प्रेरित केले. भारतीय लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत आणि त्यांना स्वातंत्र भारताचा राष्ट्रपिता मानले जाते. तेसत्याग्रहाचे जनक होते. 2 ऑक्टोबर हा गांधीजीचा जन्म दिन जागतीक अहिंसा दिन म्हणुनपाळलाजातो. सर्व जग आज हिंसेच्याशक्यतेनेभयग्रस्त झाले आसताना जगात शांतता व मानवी जीवनाची शाश्वती केवळ गांधी तत्वज्ञानच देऊ शकते या भावनेतुन आज खुपमोठ या प्रमाणावर गांधी विचाराचे अध्ययन केले जात आहे. गांधीचे तत्वज्ञान हे मानवी मुल्यांचा पुरस्कार करणारेआहे व जगाला भयाच्या छायेपासुन दु र घेवून जाणारेआहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी गांधी तत्वज्ञानातील सत्य व अहिंसा या तत्वाचा अवलंब जर जागतीकराजकारणात केला गेला तर राष्ट्राराष्ट्रातीलजटीलप्रश्नदेखील सहज सुटू शकतात आणि देशात परस्पर विश्वास वाढल्याने जग विश्व शांततेकडे मार्गाक्रमण करुशकते एवढी मोठी शक्ती गांधी विचारातआहे. कोणत्याही सामाजीक, आर्थिक, राजकीय व पर्यावरणीयव्यवस्थेतीलबदलासाठी गांधी तत्वज्ञान हे विधायक साधन आहे. गांधी विचारात सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सविनय प्रतिकार या विचारालामहत्वाचे स्थान आहे. गांधीजीच्यामते सत्य व अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजुआहेत. सत्या शिवाय अहिंसा व अहिंसेशिवायसत्याची आपण कल्पना करू शकत नाही. गांधी विचारात सत्य, अहिंसा, अराज्यवाद, अपरिग्रह, रामराज्य, सर्वेदय या विचारालासर्वेच्च स्थान आहे. गांधी विचार वाचायला व समजुनघेण्यास बरे वाटतातपरंतूवास्तवीकजीवनातत्यांचा अंगीकार करण्यासाठी फार मोठया आत्मीक बळाची आवश्यकता आहे. आज देशातील तरुणांचे आत्मीक बळ हरवत चालले आहे. तरुणांत व्यसनाधीनता, चंगळवाद वाढत चाललेला असुन दिवसें दिवस तरुणातील आत्मीक बळ कमी होत चाललेले आहे. म्हणून तरुणांनी आपल्या जीवनात गांधी विचारानुसार मार्गक्रमण करण्याची आज खरी गरज आहे.

**संशोधनाचीउदिष्ट्ये**

१. गांधीतत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
२. गांधी विचाराचा जनमानसावरील प्रभाव समजून घेणे.
३. सामाजिक, आर्थिकव राजकीय प्रश्नसोडविण्यात गांधी विचाराची भूमिका जाणून घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीय साधनसामुगीचा वापर करण्यात आलेला आहे. या शोध कार्यासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रेइत्यादी साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे.

**ग्रहितकृत्येः**

१. गांधीतत्वज्ञानाने जगाला शांततेचा मार्ग दाखविलेला आहे.
२. गांधी विचाराने राष्ट्रासमोरील अनेक प्रश्नसोडविण्यास मदत झालेली आहे.
३. समाजाच्याउनातीसाठी गांधी तत्वज्ञान मार्गदर्शक आहे.

**संशोधनाचेमहत्त्व**

महात्मागांधीजीचे विचार व तत्वज्ञान आज जगमान्यझालेले आहे. मानवाला सत्य, अहिंसाव शिस्तीचे धडे देण्याचे काम गांधी विचाराने केलेले आहे. आज हिंसेच्या भीतीने जग चिंतातूर झालेले असताना जगात शांतता निर्माण करण्यासाठी गांधी विचार आशेचा किरण म्हणून समोर येत आहे.म्हणून आज मोठ्या प्रमाणावर गांधी विचाराचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.गांधीजीजेवडे समजावून घेवूतेवडे कमी आहे. कारण गांधी विचाराचे क्षेत्र खूप व्यापक आहे. म्हणून गांधी तत्वज्ञानाचा अभ्यास या शोध निबंधात केलेला आहे.

**महात्मागांधीजीचेतत्वज्ञान**

महात्मा गांधी यांनी 'हिंद स्वराज्य' या ग्रंथामध्ये आधुनिक भारताच्यानवनिर्मितीचा विचार मांडलाआहे. राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रांतकृषी, उद्योग आणि शिक्षण या क्षेत्रातील भारतीय दृष्टिकोनत्यांनीप्रामुख्यानेमांडलाआहे. १९३६ मध्येलिहिलेल्या 'नयी तालीम' या पुस्तकामध्येत्यांनी शिक्षण विषयक विचार मांडलेआहेत. 'नयी तालीम' हात्यांचा ग्रंथ शिक्षणाचा मूलभूत विचार म्हणूनहीओळखलाजातो. महात्मा गांधी यांनीलॉर्डमेकॉलेयांच्यावसाहतवादी शैक्षणिक विचारांचे आकलन करूनत्याबाबतचेपरखड चिंतन 'नयी तालीम' या संकल्पनेत केले आहेत. गांधीजींचा शिक्षण विचार हा शिक्षण आणिराष्ट्रजीवनयांनाजोडणाराआहे. तसेचव्यक्तिमत्त्वाच्याविकासातील बौद्धिक विकास, आध्यात्मिक विकास आणि शारीरिक विकास या तीनहीदृष्टीनेव्यक्तिमत्त्वाच्या सकल अंगांना स्पर्श करणाराआहे. मीपेक्षाआम्हीमहत्वाचाआहे. आपणसर्वांनीमिळूनराष्ट्रजीवनबदलवायचेआहे, असा त्यांचा स्वच्छ, सुस्पष्ट आणि पारदर्शी विचार होता.

**महात्मा गांधीचे शिक्षणविषयकविचार**

लोकमान्य टिळकांनीत्यांच्याचतुःसूत्रीमध्ये स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणिपरकीयमालावर बहिष्कार या चार कल्पना मांडल्याहोत्या. गांधीजींनीटिळकांच्यास्वदेशीचेरुपांतरखादीमध्ये केले. राष्ट्रीय शिक्षणाचेरुपांतरनयी तालीम या संकल्पनेत केले. याचा अर्थ असा की, गांधीजींनास्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होता. त्यासाठी महात्मा गांधींनी 'नयी तालीम' ही संकल्पना मांडली. मकरंदपरांजपे 'डीकॉलनायजिंग हिंद स्वराज' या ग्रंथातअसेम्हणतात की, गांधीजींनावसाहतवादीशिक्षणाचा विचार बदलावयाचा होता व त्याऐवजी राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करायचा होता. असा राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करतानात्यांनीभारतातील तत्कालीन परिस्थिती, इंग्रजांचेधोरणआणि भारतीय शिक्षण संस्थांपुढीलआव्हाने या सर्व बाबींचा विचार करून नवा विचार विकसित केला. काळाच्याप्रवाहात विचार करता असे दिसते की, महात्मा गांधींनीआपल्या 'नयीतालीम'या शिक्षण विचारामध्येस्वावलंबन, आत्मसन्मानआणिश्रमप्रतिष्ठा ही तीन मूल्येरुजवण्याचा प्रयत्न केला. गांधीजींना प्रत्येक विद्यार्थ्यास स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करावयाचे होते

गांधीजींचा शिक्षण विचार मन, मस्तिष्क आणि कर म्हणजेच मन, मेंदूआणिहातयांनाजोडणारा होता. माणसाच्याबुद्धिमत्तेचा संपूर्ण विकास व्हावा, त्याच्याहातीनिर्माणाचे सामर्थ्य यावे, श्रमप्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्याचेअंतःकरण स्वच्छ व्हावे, त्याच्याहृदयातूनयेणारा हुंकार आणिआतला आवाज हात्याला स्वाभिमान आणि अस्मिता प्रदान करणाराअसावा, असेगांधीजींनावाटत होते. त्यांच्यामते, हाताने श्रमदान करावे. मनाने समाजातीलदुर्बलाचा विचार करावाआणिबुद्धीच्याविवेकाने संबंध राष्ट्रजीवनउजळवूनटाकावे. असे स्वावलंबी शिक्षण, ओजस्वी शिक्षण गांधीजींना अभिप्रेत होते. त्यांच्या या शिक्षणामुळेव्यक्तीआणिसभोवतीचानिर्सग, शिक्षण संस्था आणि समाज, शिक्षण आणिराष्ट्रजीवनयांना एकत्रित जोडणेशक्यहोणार होते. त्यामुळेगांधीजींनीमूल्याधारितशिक्षणावर भर दिला. शिक्षणाचेअध्यात्मिकरणव्हावे, अशीत्यांची भूमिका होती. भारतीय प्रश्नांना भारतीय उत्तरेशोधण्याचा प्रयत्न 'नयी तालीम' या संकल्पनेतून केला आहे.

**ग्रामस्वच्छता**

ग्राम स्वच्छतेचेमहत्त्वत्यांनीत्याकाळातचओळखले होते आणित्याचीसुरुवातत्यांनीस्वतःपासूनकेली होती. आज हे सूत्र स्वीकारून देश-विदेशात स्वच्छता मोहीमराबवली जात आहे. भारतात विद्यमान

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

सरकारनेतसेचत्यापूर्वीच्याराज्यातीलसरकारनेवेगवेगळ्यापद्धतीने पण गांधीजींच्याचस्वच्छतेच्यामंत्राचा आधार घेऊनमोहीमसुरूकेल्याआहेत. कारणस्वच्छता हा समाज जीवनाचा आरसा आहे व निरोगी जीवनाचा मूलमंत्र आहे.

**गांधीजींचे 'एकादश'**

महात्मा गांधी यांनी व्यक्तिगत जीवनासाठी 'एकादश' व्रत दिले होते. प्रत्येकानेत्याचे पालन करावे,असेत्यांचेमत होते. त्यातप्रामुख्याने सत्य, अहिंसा, शरीरश्रम, ब्रम्हचर्य, अपहिग्रह, सर्वधर्म समभाव, स्वदेशी, स्पर्शभावना आणि सर्वत्र भय वर्जनआदींचा समावेश आहे. हे सूत्र प्रत्येकानेपाळायचे प्रयत्न केल्याससमाजातीलवाईट भावना दूर होतीलअसे गांधी म्हणत.

**सत्याग्रह**

सत्याग्रह हा शब्द संस्कृत शब्द सत्य आणि आग्रह ;क शब्दापासून निर्माण झालेला आहे. याचा अर्थ सत्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी होय.गांधीजी सत्य व अहिंसेचे पुजारी होते. गांधीजी म्हणतात की, सत्य आणि अहिंसा याचा अवलंब तोच करू शकतो जो अहिंसावादी आहे.ज्याचा सत्यावर विश्वास आहे. या साधनाचा अवलंब सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक म्हणजे जीवनाच्या प्रत्यक क्षेत्रात करता येतो.गांधीजी यापुढेजावून म्हणतात की, सत्याग्रह करणारा व्यक्ति निर्भीड, त्यागी, सदाचारी असावा लागतो. हिंसेला अहिंसेने उत्तर दिले पाहिजे म्हणून गांधी म्हणतात पापाचा विरोध करा पाप्याच नाही.गांधीजी म्हणतात की, सत्याग्रही नि स्वार्थी असला पाहिजे. स्वत:च्या स्वार्थासाठी सत्याग्रह करू नये.

**सत्याग्रहीचे गुण-**

१.सत्याग्रह करणा-यामध्ये स्वंयशिस्त असावी त्याचे आचरण सैनिका प्रमाणे असावे लागते.
२.सत्याग्रहाचा लढा हा मुलत:आत्मीक बलावर लढायचा लढा आहे. या लढ्यामध्ये इतर कोणत्याही सामर्थ्यापेक्षा आत्मीकसामर्थ्याचे महत्व आहे.
३.सत्याग्रहामध्ये शारीरिकबळाचा किंवा कोणत्याही प्रकारे हिंसक मार्गाचा वापर करणे व्रज्य आहे.
४.सत्याग्रही सत्य वचनी असला पाहीजे त्याचा त्याचा कार्यावर पुर्णविश्वास असलापाहीजे.
५.सत्याग्रहीमध्ये सहन शीलतापाहीजे. तो सहनशील नसेल तर शत्रूपक्षावर विजय मिळवुशकत नाही.
६.सत्याग्रही उपवासाचे व्रत जोपासणारा असला पाहीजे. उपवासाने व्यक्ती स्वत:वर सर्वार्थाने नियंत्रण ठेवुशकतो.
७.सत्याग्रही विनम्र असला पाहीजे.
८.सत्याग्रही चारीत्रवान असला पाहीजे.

महात्मा गांधीनी अशा प्रकारे सत्याग्रहीमध्येगुणतत्वाचा विचार मांडूण सत्याग्रहाची अभिनव संकल्पना भारतीयांना दिलेली आहे. महात्मा गांधीनी आपल्या जीवनात अनेक निशस्त्रसत्यग्रह केलेले आहेत. १९२०-२१असहकार चळवळ, १९३०-३१ सविनय कायदेभंग, १९४२चलेजावअशा अनेक आंदोलनाने त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळुन दिले आहे.

**सारांश**

गांधीजीचा विचार केवळ भारतापुरताच मर्यादीत राहीलानसुन सत्याग्रह हा विचार जगप्रसिध्द झाला आहे. यावरुन गांधी विचाराचे महत्व लक्षात येते. ते एक कृतीशीलविचारवंत होते. त्यांचे विचार सत्यावर आधारलेले होते. गांधी विचारावर आज टिका जरी होत असेल तरी त्यांच्या विचाराचे योगदान हे कोणीही अमान्य करुशकत नाही. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्यांचे विचार अनमोल अशा स्वरुपाचे आहेत. मानव जाती समोरीलप्रश्नसोडवण्याचेसामर्थ्य या विचारात आहे. जगाला हिंसेच्या भयापासुन मुक्त करण्याची शक्ती गांधी तत्वज्ञानात आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. श.गो.देवगावकर, राजकीय विचारवंत,श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139



२. बी.वाय.कुलकर्णी, भारतीय राजकीय विचारवंत,विध्याभारती प्रकाशन लातूर

३. मनोज कुमार सिंह, भारतीयराजनीतिक चिंतक,डिस्कवरीपब्लिशिंग हाऊस, दिल्ली

४. http://www.pudhari.news, प्रा.डॉ.वि.ल.धारूरकर

५. दै. लोकसता

CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधींची सर्वोदय कल्पना

डॉ. शिवाजी पाते,

सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी


---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधीजींच्या जयंतीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी सोहळा सारे जग साजरा करत आहेत. या निमित्ताने या महामानवाच्या जीवनातील विविध पैलुवंर व त्यांच्या तत्वज्ञानावर चर्चा करून त्यांच्या शिकवणूकीची उजळणी होऊन त्यांचा लाभ सर्वांना होईल. महात्मा गांधींचे व्यक्तीमत्व म्हणजे गुणांची खाण होय. "बोले तैसा चाले", "साधी राहणी उच्च विचारसरणी". या उक्ती प्रमाणे गांधीची जीवन जगले. दूसऱ्यांप्रति आदर हा गांधीजींचा स्थायी भाव होता. महात्मा गांधींचा जन्म 02 ऑक्टोबर 1869 मध्ये गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. गांधीजींवर भगवद्गीता, ना. गोखले, जॉन रस्कीन यांच्या विचारांचा प्रभाव होता.

महात्मा गांधीनी कायद्यातील बॅरिस्टर ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली होती. गांधीजीं नेहमी अन्यायाच्या विरूध्द उभे राहिले. याची सुरूवात दक्षिण आफ्रिकेपासून झाली. नंतर त्यांनी भारतात येऊन इंग्रजी अन्यायी राजवटीच्याविरोधात सत्य, अहिंसा या तत्वावर आधारीत 1920 पासून भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व स्वीकारले. गांधीजींनी इंग्रजांच्या विरोधात अनेक आंदोलने करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या जगात अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्याचा लढा लढवून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारी महात्मा गांधी सारखी अद्वितीय व्यक्ती होऊन गेली यावर पुढील पिढी विश्वास ठेवणार नाही. असे उद्गार थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन स्टाईन यांनी काढून महात्मा गांधीजींची महत्ती गायली. महात्मा गांधीजींचे व्यक्तीमत्व सर्वगुण संपन्न होते. त्यांचे कार्य राजकीय, सामाजिक व आर्थिक अशा विविध अंगानी होते. भारतात त्यावेळी समाजावर धर्माचा पगडा होता. गांधींनी समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी देशातील जाती -भेद, धर्मभेद, गरीबी, स्त्री-पुरूष भेद, अनिष्ठ रूढी-परंपरा नष्ट करण्यासाठी ते संपूर्ण भारत भर फिरले. त्यांना त्यावेळी भारतातील आर्धी जणता गरीब आहे. त्यांच्या अंगावर बरोबर कपडे नाहीत, खायला अन्न नाही अशा विवंचनेत अडकलेला समाज पाहून गांधींना दु:ख झाले. व त्यातून त्यांनी सर्वोदय कल्पना मांडली. गांधीजींच्या विचारावर जॉन रस्कीन यांच्या Un to the last यापुस्तकाचा प्रभाव होता. गांधीजींनी या पुस्तकाचे भाषांतर सर्वोदय या नावाने केले. सर्वोदय या कल्पनेचा अर्थ म्हणजे सर्वाचा उदय किंवा सर्वाचे कल्याण असा आहे. समाजातील सर्व घटकांचे कल्याण व्हावे असे गांधीजींना वाटत होते. म्हणून त्यांनी सर्वोदय कल्पना मांडली. कालांतराने ही कल्पना त्यांच्या जीवनाचा आधार बनली. सर्वोदय कल्पना भारतीय संस्कृती आणि भारतीय जीवनाचे आदर्श या कल्पनांवर उभी आहे. सर्वांचे कल्याण साधणे हे सर्वोदयाचे उद्दिष्ट असल्याने साहजिकच या चळवळीद्वारे प्रत्येकाला काम, पुरेसे अन्न, वस्त्र आणि निवारा मिळण्याची खात्री होईल.

- **संशोधनाची उद्दिष्टे :**

1) गांधीजींनी मांडलेल्या सर्वोदय कल्पनेचा अभ्यास करून त्याची आजची उपयुक्ता तपासणे.

- **संशोधनाची गृहिते :**

1) सर्वोदय कल्पनेमुळे भारतातील गरीबी कमी होण्यास मदत झाली.

- **संशोधनाची पध्दती :**

सदरील संशोधनासाठी द्वितीयक सामग्री संग्रहण पध्दतीद्वारे माहितीचे संग्रहण करून त्याचे विश्लेषण केले आहे.

➢ **सर्वोदय कल्पना :**

❖ महात्मा गाधींना अभिप्रेत असलेल्या सर्वोदयाच्या कल्पनेत पुढील गोष्टींचा समावेश होता.

❖ सर्व लोकांचे कल्याण म्हणजे सर्वोदय, त्यामुळे सर्वांच्या कल्याणामध्ये व्यक्तीचे कल्याण समाविष्ट असते.

❖ शेतकरी, कामगार, हस्तव्यवसायीक यांचे जीवन जगण्यासाठी आहे.

❖ घरकाम करणारी व्यक्ती आणि वकील यांचे काम समान त्यामुळे त्यांच्या कार्याचे मूल्य समान दोघांनाही उत्पन्न प्राप्त करण्याचा आणि जगण्याचा हक्क आहे.

❖ सर्वोदयात प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरज पूर्ण करण्यासाठी समान संधी असते.

➢ **सर्वोदय समाज :**

सर्वोदयाच्या माध्यमातून समाजामध्ये परिवर्तन करणे गांधीजींना अपेक्षित होते. त्यांच्या मते सर्वोदयी समाज हा खऱ्या अर्थाने स्वतंत्र समाज असेल या समाजात सर्व लोक समानतेने राहतील, सर्वोदयी समाजात लोक रोग. दारिद्रय, भिती या पासून मुक्त असतील, सर्व जाती धर्माच्या आदर करणारे व सर्वांना विकासाच्या समान संधी निर्माण करून समाजात सामाजिक व आर्थिक समता या द्वारे निर्माण केली जाईल, या समाजात सर्वांना शिक्षणाची समान संधी. अस्पृश्यता या समाजात नसेल, कोणताच वर्ग संघर्ष नसेल, लघुउद्योगावर आधारीत व्यवस्था असेल.

➢ **सर्वोदयाचा कार्यक्रम :**

महात्मागांधींनी भारतातील शेतकरी, शेतमजुर, श्रमिक व सर्वसामान्य लोकांच्या राहणीमानात वाढ घडवून आणण्यासाठी सर्वोदय कार्यक्रम अंमलात आणला. यामध्ये शेतमजूर,शेतकऱ्यांचे जमीनदारांकडून आणि श्रमिकांचे भांडवलदारांकडून कोणत्याच प्रकारचे शोषण होता कामा नये. त्यासाठी शेतकऱ्यांनी व श्रमिकांनी आपल्या संघटना स्थापन कराव्यात. समाजातील प्रौढ व्यक्तींना सर्वसामान्य शिक्षण व आणि तांत्रिक शिक्षण दिले जावे. असे शिक्षण रात्र शाळेत दिले जावे, ज्यामुळे दिवसाचा रोजगार बुडणार नाही. ग्रामीण भागाच्या विकास करण्यासाठी ग्रामीण उद्योग सुरू करावेत. ग्रामीण भागातील स्वच्छता, आरोग्य याकडे विशेष लक्ष द्यावे. खेडी ही स्वयंपूर्ण झाली पाहिजेत या दृष्टिने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाने सुतकताई केली पाहिजे, खादी मुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकेल असे गांधीजींना वाटत होते.

➢ **निष्कर्ष :-**

महात्मा गांधी यांनी मांडलेली सर्वोदय कल्पना ही भांडवलशाही, साम्यवाद, समाजवाद याही पेक्षा वेगळी होती. यामध्ये विविध जातीधर्मांमध्ये सलोखा निर्माण करून सर्वांना समान संधी निर्माण करू त्याद्वारे सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून येईल असा त्यांचा विश्वास होता. यामध्ये स्वातंत्र्य, स्वयंपूर्णता, सत्तेचे विकेंद्रिकरण, लघुउद्योगाच्या वापरावर भर, स्वदेशी, ग्रामस्वराज्य या द्वारे आदर्श भारत निर्माण होईल असे गांधीजींना वाटत होते. आज देशात मोठया प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. काळाच्या ओघात ग्रामीण विकासाकडे दूर्लक्ष झाल्यामुळे ग्रामीण भाग ओस पडून शहरात लोकांचे स्थलांतर मोठया प्रमाणात वाढून शहरातील समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे गांधींच्या मते खरा भारत खेडयात आहे. गांधीजींच्या स्वप्नातील भारत निर्माण करावयाचा असेल तर सर्वोदयाचा कार्यक्रम सरकारी धोरणात दिसला पाहिजे तरच आपण सक्षम भारत निर्माण करू.

**संदर्भ :**

1. आर्थिक विचारांचा इतिहास, प्रा.अ.श. रायखेलकर विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
2. लोकराज्य मासिक, ऑक्टोंबर 2019
3. आत्मकथा, माझे सत्याचे प्रयोग, महात्मा गांधी.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# महात्मा गांधी यांच्या विचाराची प्रासंगिकता

डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव
मराठी विभाग प्रमुख,शिवजागृतीवरिष्ठ महाविद्यालय,नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर.

**गोषवारा**

महात्मा गांधी म्हणजे सर्व जगाला भुरळ घालणारे अहिंसेचे, ग्रामविकासाचे, सत्याग्रहाचे, महामानवाचे नीतीमत्ता असणारे प्रतिक होते. जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष हिटलर यांना कोणी महामानव मानत नाहीत. आलेक्झंडार यांचे संपूर्ण जग जिंकण्याचे स्वप्न होते. त्या तुलनेत महात्मा गांधी हे महान होते. महात्मा गांधी हे मुत्सद्दयांचे मार्गदर्शक होते. महात्मा गांधीचे अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि आइनस्टाईनचा सिध्दांत जगाने दिला. आजच्या तरूण पिढीने महात्मा गांधी व त्यांचे वैचारिक तत्त्वज्ञान समजून घेण्याची आवश्यकता आहे. फ्रान्सचे सम्राट नेपोलियन बोनापार्ट, महात्मा गांधी यांच्यावर जवळपास एक लाख ग्रंथ असतील., परंतु आज वाचत नाहीत, ही खंत आहे. सहाशे विद्यापीठात महात्मा गांधी यांच्यावर अभ्यास विद्वानांनी केले. पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात की, मानवाने एक तर अणूबाम किंवा गांधी विचार स्विकारावे लागेल. एकविसाव्या शतकात, जागतिकीकरणात, यंत्रयुगात, कार्लमार्क्स, सॉक्रेटिस, महात्मा गांधी यांच्या विचारांची समाजाला प्रासंगिक गरज आहे. गांधी विचाराशिवाय मानवजातीला पर्याय नाही. आपल्या आशेचा किरण म्हणजे गांधीजी आहेत. पाश्चात्य सभ्यता सत्तेच्या लालसेवर उभी आहे. असे गांधी सांगतात. इंद्रिय व इरशा यावर महात्मा गांधीजीचे नियंत्रण होते. माझे जीवन हेच माझे फाऊंडेशन आहे असे गांधीजी मानायचे. त्यांचे जगणं हेच प्रेरणास्त्रोत आहे. त्यांची सकारात्मकता, व्यापकता समजून घेवून चालण्याची आवश्यकता आहे. सद्सद्विवेक प्रवृत्ती, सत्य, अहिंसा, प्रामाणिकता, प्रेम या मूल्यांचा अंगिकार करण्याची आवश्यकता आहे. विकाररहित मानव समाज निर्माण व्हायचा असेल तर गांधीजींचे तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागेल. व्यक्ती व समाज यांचे तात्त्विक अधिष्ठान होते. त्यात परिवर्तन म्हणजे क्रांती होय. गांधी म्हणजे अन्यायाचा प्रतिकार आणि न्यायाची प्रतिष्ठापना होय. चर्चिल म्हणतात की, तुरूंगात कोंडवलं असते तर ब्रिटिशांचे आणखी फावले असते. झार घराणे जुलमी, अत्याचारी होते. रशियात झालेल्या राजकीय उलथापालथीस रशियन क्रांती म्हटले जाते. यामुळे झारची निरंकुश सत्ता लयाला गेली. रशियन राज्यक्रांती ही पहिली साम्राज्यवादी क्रांती होती. जगभरातील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास ती कारणीभूत ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे. साम्यवादी विचार रशियाचा नायक झाला. परंतु गांधी म्हणजे एकटा दंगली सहन करणारी ताकद आहे. एकटया ताकदीवर, आत्मबलाच्या साहयाने साम्राज्यवाद संपवला. आपल्या देशात गांधीविचार हा नायक झाला. धर्म, अध्यात्म म्हणजे माणसाच्या अंतःकरणात आत शिरणे होय. असा अध्यात्म गांधीना मान्य होता. न्यायसमाजव्यवस्था निर्माण करावी असे त्यांना वाटत असे. उच्च प्रतीची नितीमत्ता समाजात निर्माण करण्याची इच्छा होती. अन्यायाचा प्रतिकार करताना, सत्याचा शोध घेण्यासाठी दीन-दुबळयांची सेवा करताना, नैतिक मूल्यांचे जेंव्हा-जेंव्हा अंधःपतन होत असताना गांधीची वैचारिक प्रेरणा आवश्यक आहे. महात्मा गांधीबद्दल कुजबुज केल्याशिवाय आपल्या देशाला गांधी समजून घेता आला नाही. एका गालावर मारलं तर दुसरा गाल पुढे करा असे गांधीनी कधीच लिहिले नाही. गांधीला शिव्या दिल्याशिवाय आजचे व्याख्याते भगतसिंगावरचे भाषण पूर्ण करत नाहीत. ज्याप्रमाणे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा रिंग मास्टरसारखा वापर केला जातो. त्याचप्रमाणे गांधीजीबद्दल चुकिचे सांगितले जात आहे. गांधीजी लढवय्ये होते. दलित बांधवांच्या

समस्या गांधीजीनी सोडविल्या. गांधीहत्त्या यावर अठ्ठावीस लाख दस्ताऐवज थोर गांधी म्हणून आहेत. कुजबुज करून पुरावे नष्ट करता येतात. पण सत्य नष्ट करता येत नाही. स्वातंत्र्ययोत्तर 70 वर्षातील आपल्या देशातील तरूणाईने गांधी विचार आत्मसात केला असता, तर देश विकसीत झाला असता.माणसातले माणूसपण जाती-धर्माच्या पलिकडे जावून माणूसपण शोधा असे गांधीजीनी सांगितले होते. आत्मीयता ही श्रध्देची केंद्र बनावीत. शिक्षणातून नैतिकमूल्यांचे धडे शिकवावेत कोणालाही शिव्या देवून मोठं होता येत नाही. "खेडयाकडे चला" असे गांधीनी सांगितले. या भूतलावर गांधीसारखा माणूस उगवला यावर विश्वास बसत नाही असे आइनस्टाईन सांगतो. चर्चिल म्हणतो की, "या महाता-याला एकबार संपवा" कारण त्याच्या साम्राज्याला गांधीजी संपवत होते. ज्या सम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही, एवढया मोठया साम्राज्याला गांधीनी झुकवले ते केवळ नैतिकमूल्य शक्तीच्या बळावर गांधीनी करून दाखविले. नैतिक शक्तीच्या बळावर राष्ट्र झुकते हे लक्षात येते. गांधीसारखा कोणताही धार्मिक दुसरा माणूस नाही. आध्यात्मिक मूल्य त्यांनी दिले. सर्वच धर्माचा त्यांनी आदर केला. कोणत्याच धर्माचा त्यांनी द्वेष, तिरस्कार केला नाही. मी हिंदू, ख्रिश्चन, शिख, इसाई, मुस्लिम आहे असे गांधी म्हणत असत. सनातनी हिंदू धर्म माझा आहे. पण मी माझा धर्म कोणावरही लादू शकत नाही.यातून सर्वधर्मसमभाव हे तत्त्व पुढे आले. गांधीजी इतका धर्मनिर्पेक्ष दुसरा कोणी निर्माण झाला नाही.राज्यघटना धर्मर्निपेक्ष तत्त्वावर तयार केली आहे. सर्व धर्माला महत्त्व म्हणजे सत्य होय. सत्य हेच ईश्वर आहे. ईश्वराला माना अथवा नको माना पण सत्याला कोणीही मानतो. परंतु प्रत्येकाला आपलाच धर्म स्विकारावा असे वाटत आहे. धर्मपरिवर्तन करायला लावणे म्हणजे आमच्या धर्म युगायुगाच्या नंतर अशी माणसं जन्माला येतात. गांधी युगपुरूष व युगकर्ता होते. फक्त महात्मा गांधीची सॉक्रेटिसबरोबर तुलना होवू शकते. अ‍ॅथेन्स (ग्रीस) या देशात लोकशाही वाममार्गाला जाते. सॉक्रेटिसला विष पाजवून मृत्यू दंडाची शिक्षा दिली गेली. याचे प्लेटो या नावाच्या विद्यार्थ्यास हळहळ वाटली होती. सत्यासाठी मी जगलो आहे, तर सत्यासाठी मरेण असे सॉक्रेटिस म्हणाले. दिवस मावळण्याच्या सुमारास मृत्यू झाला होता. सॉक्रेटिस तरीही अमर आहे. तो सत्यासाठी मेला. येशू ख्रिस्ताशी गांधीजींची तुलना होवू शकते. गांधीला नथुराम गोडसे याने गोळया झाडून मारले. गांधीजी हिंदू व मुस्लिम ऐक्यासाठी झगडले. “हे राम” हे दोन शब्द गांधीजीनी शेवटपर्यंत वापरले.

**प्रस्तावना**

“भारत सोडून जा” असे इंग्रजाना ठणकावून सांगितले. असा शक्तीशाली माणूस आपण शब्दात पकडू शकत नाही. माणुसकीशिवाय त्यांनी दुसरे कांहीच कमवले नाही. आश्रमात स्वतःचे घर नसलेला माणूस होते. जे साध्य आहे ते पवित्र मानले. साधं, सहज त्यांनी जीवन जगले. गांधीजींची दृष्टी आज आवश्यक आहे. गांधीना कसल्याही प्रकारची हाव नव्हती. ते खरे ग्रामीण अर्थशास्त्रज्ञ होते. आज तरूण पिढी यंत्राच्या आधीन जात आहे. गांधीनी यंत्राच्या आधिन जावू नका असे सांगितले होते. आज प्रगती का ? अधोगती ? हेच समजत नाही. वीज, पाणी, इंधन, वृक्ष, खनिज, रेती जपून वापरा. बलाढय राष्ट्रानी हे प्रश्न निर्माण केले आहेत. आज नद्यांना पाणी नाही व ज्या नद्यांना पाणी आहे त्या मोठ-मोठया नद्या कारखानदारीमुळे प्रदुषीत झाल्या आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे दारिद्रय संपत नाही. गांधीना दारिद्रय नष्ट करायचे होते. गरीबी-श्रीमंती ही विषमता वाढत आहे. आज गांधीचा विचार समजून घेण्याची आवश्यकता आहे. हिंसा, शस्त्र, रक्तपात करू नका असे गांधी म्हणत असत. गांधी कसे जगले असे मांडायचे असेल, तर अ‍ॅडल्टपिक्चर पाहण्याची गरज आहे. जो चांगला विचार मांडतो त्याला त्रास होतोच. येशुख्रिस्त, महम्मद पैगंबर यांच्या मृत्यूची कथा-पाच दिवसाचे औषध वाचवणार का ? वाचवले तर ईश्वरच वाचवू शकतो. मग त्यांनी पांघरून घेवून जीव सोडला. एका दस्तरखान्यावर बसून

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

सर्वांनी जेवण करायचे शिकविले. महात्मा गांधीना का मारले ? तर देशाची वाटणी व्हायला नको असे त्यांना वाटत असे. 55 कोटी पाकिस्तानला दिले पाहिजे अशी वाटणीही झाली. पंडित नेहरू एका कार्यक्रमाला घेवून जाण्यासाठी घरी आले होते. तरूण पोरं म्हणाले की, 55 कोटी द्यायचे नाहीत. अरे 55 कोटीमुळे शत्रुत्व संपणार असेल तर द्यायला काय हरकत आहे. यातून दुस-या दिवसी नथुराम गोडसे याने गोळया घालून हत्या केली. गांधीजीमुळे श्रीमंती, गरीबी वाढणार नाही; पण गरिबाची गरिबी कमी होणार नाही. सर्वांना शिक्षण दिले तर नोकरी सर्वांना देता येईल का ? ज्या शिक्षणाने काम मिळत नाही. तर शिक्षण घेण्याची आवश्यकता नाही शिक्षणातून चांगले माणसं निर्माण होण्याची गरज आहे. 565 प्रांतामध्ये 565 राजे आपल्या देशात होते. राजेशाही नको आम्हाला लोकशाही हवी आहे. असे गांधी, नेहरू यांनी सांगितले. अकबर, निजाम, अशोक सम्राट यांना करता आले नाही. नेपोलियन, अलेक्झांडर यांच्या युध्दनीतीपेक्षा महात्मा गांधीचा विचार महत्वाचा आहे.जे शक्तीने जगणारे आहेत. त्यांचेच राज्य निर्माण होईल असे येशुख्रिस्ताने म्हटले आहे. त्यामुळे येशुला मारले गेले. आपली सत्ता आपलेच राज्य सगळीकडे असावे म्हणून युध्द झाले. शास्त्रज्ञांची संख्या वाढवायचे का नाही ? विचार करून युध्द थांबवा. 1942 च्या सुमारास ‘करा किंवा मरा‘ हे गांधीनी सांगितले; होते. कर्मयोग, विज्ञानयोग, भक्तीयोग, श्रीकृष्णाने अर्जूनाला भगवद्गीतेत सांगितले. परंतु गांधीजीने अहिंसेच्या मार्गाने मरेपर्यंत लढायला सांगितले. भिती, द्वेष, ठेवू नका. आपुलकीने जगा. निसर्गाने सर्व गोष्टी आपल्याला दिलेल्या आहेत. कसं जगावं आणि कसं मराव हे समजते. पावरटी हटाव (रोजगार हटाव) इंदिरा गांधी यांनी म्हटले. तर सेक्युरटी अॅक्ट सोनिया गांधीनी केले. तीन रूपयाने गहू, तर दोन रूपयाने तांदूळ देण्याचा कायदा केला. दुपारच्या जेवणाची व्यवस्था शाळेत केली. शिक्षण हे दुस-यावर दबाव, शोषण करण्यासाठी नाही, तर चांगला माणूस घडविण्यासाठी आहे. पैसा कमविण्यासाठी शिक्षण नाही हा विचार शिक्षण व्यवस्थेतील लोकांनी आत्मसात केला तर खूप चांगले दिवस येतील. शिक्षक हा आई आहे. आज शिक्षकांचाच बलात्कार होवून खुन होत आहे. किंवा शिक्षकही आपल्या शिष्यांशी अनैतिकतेने वर्तन करत आहेत. यामुळे समाज अंधःकारात बुडत आहे. यांना प्रकाशाची वाट धरायची असेल, तर गांधीचा शैक्षणिक विचार समजून घेण्याची गरज आहे.

**विषयप्रतिपादन**

महात्मा गांधी यांच्या दक्षिण अफ्रिकेतल्या कार्याचा लोकांना विसर पडला आहे. त्यांनी भारत व दक्षिण अफ्रिकेचे राजकारण केले. गांधी खरे राजकारणी होते. एक साधे व्यक्तिमत्व असणारे गांधी वकिलाचे मदतनीस म्हणून दक्षिण अफ्रिकेला गेले. अब्दुला कंपनीत कामाला गेले. 1860 साली ब्रिटिशांना मजुरांची गरज भासली तेंव्हा गेले. दक्षिण अफ्रिका हा भारताची कॉपी झाला भारतीयांनी दक्षिण अफ्रिकेत खूप चांगले काम करून पैसे कमावले. ज्यांच्या लग्नाला फादरसन यांनी मान्यता दिली तेच लग्न होत असत. ढोरमेहनत करून शेती केली, शेती घेतली अशा भारतीयांना तेथून हाकलून देण्याचे ठरवले तेंव्हा गांधीजीनी संघर्ष केला. वर्णद्वेष सुरू झाला. आधार कार्डसारखे कार्ड दक्षिण अफ्रिकेत काढायला सुरूवात झाले होते. गांधीनी त्याला विरोध केला. दुय्यम दर्जाची वागणूक देवून मालमत्ता हडप करून भारतीयांना हाकलून द्यायचे ठरवले. तिथला कुल्ली हा कामगार भारतीय होता. गांधीना त्याच्यावर होणारा अन्याय बरोबर वाटत नव्हता. टॉलस्टॉयचा प्रभाव याच काळात पडला होता. सत्याग्रहाची चळवळ पहिल्यांदा हंगेरीत गांधीनी सुरूवात केली. गांधीनी संघर्ष करून लेखी निवेदनेही दिली. त्यांना रेल्वेतून बाहेर काढले. गांधीनी दक्षिण अफ्रिकेतील निग्रो व भारतीय लोकांना संघटीत केले. गो-यांना आवड, कोळसाखाणीत, शेतीत होती. समूह करून लोकांनी एकत्र राहावे. यासाठी ‘फिनिक्स‘ आश्रम स्थापन केले. इंडियन ओपनियन वर्तमानपत्र आपल्या लोकांना वाचता यावे म्हणून

गांधीनी चालू केले. चळवळ संघटीत होण्यास मदत झाली. कामगार, खाणकामगार, संघटना यांनाही सामावून घेतले. जुलमी वातावरणाच्या विरोधात संघर्ष, सत्यागृह केला. चळवळीमध्ये कस्तुरबालाही उतरवलं त्यांनाही तुरूंगवास घडला. आफ्रिकेत त्यांच्या कामाला यश आले. सर्व काळे कायदे तेथील राजवटीला मागे घ्यावे लागले. आफ्रिकन निग्रो कॉग्रेस तिने स्थापन केले कारण निग्रोवरचे अन्याय कमी होत नव्हते. नेल्सन मंडेला यांना तुरूंगात खडी, चुनखडी फोडावी लागली. रॉबीन बेटावर काम करायला लावले. नेल्सन मंडेलाची प्रेरणा गांधीना होती. ते लढले व जिंकले. आफ्रिकेत गोपाळकृष्ण गोखले यांच्याशी नित्य संपर्क होता. गोखल्यांची टिंगल टवाळी लोकमान्य टिळकांनी केली. भारतातून गोखले नावाचा माणूस संपला. असे म्हटले. मार्गदर्शन करण्यास आफ्रिकेत गेले. 1915 साली गांधी भारतात परत आले.

महात्मा गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले तेंव्हा भारताची परिस्थिती कशी होती. तर 1916 चा लखनो करार केला. या करारानूसार टिळकांनी लिहून दिले की, मुसलमानांना 33 टक्के जागा राखीव असतील. तुम्ही मुसलमानांसाठी वेगळे मतदारसंघ द्या. मुसलमान समाजात व राजकारणात आला पाहिजे. 16 जुलै 1917 साली बेळगावला अथनी इथे त्यांनी सभा घेतली. तुमची स्वराज्याची कल्पना सांगा. टिळकांचे उत्तर धक्का देणारे होते. ते असे - जशी इंग्लंडला पार्लमेंट असेल तशी भारतात असेल. शिंपी लोक काय तिथे जावून पार्लमेंट चालवणार नाहीत. दिनकरराव जवळकर गणपतीच्या मंडपासमोर बसून कवणं लिहितात. ‘अथनीस बोलतो नकटा’ टिळकांची सामाजिक भूमिका प्रतिगामी होती. हे स्वामी विवेकानंदही नोंदवतात. सर्व बहुजन समाज तत्कालीन चळवळीपासून दूर गेला. महर्षी विट्ठल रामजी शिंदे जवळ गेले. गांधीजी राजकारणात येण्याअगोदर गोखले म्हणाले, “तुला राजकारणात यायचे असेल तर हा देश जवळून बघ. ”सूटा-बूटाचा त्याग करून गांधीजीनी तेंव्हा अंगावर पंचा घातला. जाहिरनामा काढला. बनारस हिंदी विद्यापीठ, अलिगडला विद्यापीठ सर सय्यद यांनी काढले होते. त्याच्या पायाभरणीला लॉर्ड हार्डिंग पाहुणे होते. संस्थानिक, जाहागिरदारही होते. गांधी इथे दोन मिनिट बोलले. तुम्ही आणि तुमचे लोक हिंदूस्थानातून शांतपणे चालते व्हा. देशाचे व्हाईसराय लॉर्ड हार्डिंग समोर बोलतात. ॲनिबेझंट थांब-थांब असे म्हणतात. तरीही ठणकाहून बोलतात. हे दागिने लोकांच्या रक्तातून तयार झालेली आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाले की, परत करावी लागतील. सर्व संस्थानिकांचे मी राष्ट्रीयकरण करीन. पण सर्व संस्थानिक विरोधात गेले. जेंव्हा आर्थिक प्रश्न होवून उभा राहातो. तेंव्हा त्याचा खून होतो. हे जनू तंत्र आहे. हे हिंदू धर्माचे संकट म्हणून त्यांची टेहळणी केली गेली. राजा हिंदू असेल अथवा मुस्लिम असेल; पण राजाचे ऑफिस सांभाळणारा एक माणूस होता. तो गांधीजींचा कट्टर विरोधक होता. संस्थानिकांना गांधीनी सुरूंग लावला. प्रत्येक संस्थानिकांचे राष्ट्रगीत होते. ब्रिटिश गेले की, आपली संस्थानिक मिळतील अशी आशा होती. पण त्याला गांधीनी सुरूंग लावला. 1858 साली इंडियन आर्म ॲक्ट असा एक कायदा करण्यात आला. ब्रिटिशांनी शस्त्र बाळगण्यास बंदी घातली. देश निःशस्त्र केला. पोलीस खातं मजबूत करून संस्थानिकांच्या कार्यावर लक्ष ठेवले. सेनापती बापट यांनी पुस्तकात पिस्तूल ठेवून आणलं होत. त्यावेळी साठ कोटी जनता असणारा देश निःशस्त्र असताना शस्त्रक्रांती करणार का ? कम्युनिष्टानी, भगतसिंगानी प्रयत्न केला. पण तोही फसला. गांधीनी मात्र निःशस्त्र लढायचे ठरविले. विनोबा भावे गांधीना भेटण्यास गेले. महाराष्ट्रात शिवबा, तुकोबा, ज्ञानोबा मग तू विनायक कसा ? त्यांच्याजवळ जो कोणी गेला तो त्यांचा झाला. माणसं जोडणं हा दुर्मिळ गुण गांधीकडे होता. गांधीना यश का मिळाले तर त्यांनी सोपे कार्यक्रम घेतले. सकाळी लवकर उठ, झाडून काढ, आंघोळ कर, वंदेमातरम् म्हणत या टोकापासून त्या टोकापर्यंत झेंडा घेवून चल मग तू देशभक्त झालास. टिळकांच्या भाषणांने जे लोक घरात गेले. ते लोक गांधीनी बाहेर काढले.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


स्त्रियांचा शस्त्र दारू हे आहे. तू दारूच्या दुकानासमोर घोषणा देत बस. लोक आजही स्त्रियांच्या समोर दारू पित नाहीत. कार्यक्रम सोपा; पण शक्ती मोठी लावत असत. तेंव्हाच तो यशस्वी होतो. गांधीनी सुरु केलेले आंदोलन म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन. यामुळे कार्यकर्त्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. तो पुर्वीच्या नेत्यामध्ये नव्हता. महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ पुढे आली. टिळकयुग संपून गांधीयुग सुरू झाले. देशात लोकशाही स्थापन होवून सर्व जातीधर्माच्या स्त्री पुरूषांना मताचा अधिकार असेल असा ठराव घेतला. राजकीय पक्षांना केवळ राजकीय भूमिका न घेता सामाजिक भूमिका घ्यावी. एक साधी दलित मुलगी घरी आणून शिक्षण देईल तेंव्हाच तो काँग्रेस पार्टीचा कार्यकर्ता होवू शकेल. शासकीय कर्मचारी, लष्कारावरील खर्च कमी करा. हे विचार मांडल्यानंतर सर्वच देश हादरून गेला. राजकीय जाहिरनामा व वंदेमातरम् घोषणा इथून ब्रिटिशांनी गांधीच्या जाहिरनाम्याला विरोध केला दलितांची अस्मिता कशी जागवली तर चळवळीत ये मी तुला डोक्यावर टोपी घालायला देतो. ही टोपी आफ्रिकेत तयार केली. डोकं झाकण्याचे स्वातंत्र्य मी तुम्हाला देतो. गांधीची टोपी पांढरी असेल, तर आमचा काळया टोपीला विरोध आहे.असे नागपूरमध्ये सांगितले. वंदेमातरम् गांधीने सांगितले तर शेंडी कातरणे असे इतरांनी म्हटले. तेंव्हा वंदेमातरम् हे गीत हजारो लोक म्हणून लागले याचा परिणाम असा घडला की, भारतीयांना तुरूंगात टाकू लागले. अर्थकारणामुळे राजकारणांचा पाया उखडतो, तेंव्हा त्याला धर्मविरोधी ठरवतात. (संघस्थापनेतील अप्रकाषित इतिहास, राजप्रकाशन, पुणे) स्वातंत्र्य चळवळीत संघाचा एकही माणूस सहकारी नव्हता. स्वातंत्र्य मिळाले तर पंचायतपासून जिल्हापरीषदेपर्यंत सर्व लोक आमचेच व आपल्याच हाती सूत्रे असतील असे म्हणून गांधीचा विरोध केला. 1931 पासून गांधीच्या राजकारणाला कितपत यश आले. असे म्हटले तर ब्रिटिशांनी मिठावरती कर लावला.ब्रिटिशांनी भावनेलाच हात घातला. देशातील स्त्रियां व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र आले आणि मिठाचा सत्याग्रह केला. इ. स. 1935 साली दलित समाजाला ब्रिटिशांनी गांधीपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. त्याला 'कम्युनिष्ट आवार्ड' म्हणतात. दलितांसाठी वेगळा मतदारसंघ मागणीस विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुत्सदीगिरीने मिळवले. जास्तीतजास्त दलित कार्यकर्ते निवडून येण्यासाठी केले. यामध्ये मतभेद आहेत.

26 जानेवारी 1929 रोजी लाहोरला काँग्रेस सभा भरली होती. त्या सभेला भगतसिंगही होते. या गांधीचा विरोध होता. पण पुन्हा गांधीनी जाहिरनाम्यातील तत्त्व घातले. 1937 च्या सार्वत्रिक निवडणूकीतून गांधीची मुत्सदीगिरी लक्षात येते. काँग्रेसच्या उमेदवाराला लोकांनी पाडले. आणि लिगला निवडून दिले. 40 हजार पानाचा मजकूर त्यांच्या नावाने उपलब्ध आहे. त्यातून त्यांची विचारसरणी स्पष्ट होते. 1946 साली जिना, सरदार वल्लभाई पटेल, महात्मा गांधी यांची एक बैठक संपन्न झाली. बैठक समाप्त झाली असे गांधी म्हणतात. माझ्या बकरीच्या पायाला मलम लावायची आहे. सामान्य माणूस व बकरीलाही स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी गांधीजी कल्पना मांडतात. 1942 ला जो ठराव झाला त्यात श्रीनिवास सरदेसाई कम्युनिष्ठाचे सभासद होते. या ठरावाला विरोधही होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही सत्ता शेतात राबणा-यांच्या कारखान्यात काम करणा-या लोकांच्या हातात द्या असे गांधी म्हणाले. तेंव्हा आता सर्व सत्ता सर्वसामान्यांच्या हातात जाणार. साता-यात पर्यायी सरकार स्थापन झाले. (नाना पाटील) सत्यागृह व अहिंसा हे स्वातंत्र्यासाठी उपयुक्त आहे. हे निश्चित झाले. आठरा पगड जाती वंश, भाषा यांचा हा देश आहे. एकत्र यायचे असेल तर आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत. हा मुद्दा प्रथम महात्मा बसवेश्वरांनी मांडला होता. पुढे हाच मुद्दा महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. धार्मिक सुधारणा घडवल्या. गांधीजी हिंदूत्ववादी व अत्यंत धार्मिक होते. त्यांची दिनचर्या प्रार्थनेने सुरूवात होत असे. सार्वजनिक जीवनात धर्म आणला. आजही सामान्य माणसाला धर्माची गरज आहे. हे गांधी व

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


विवेकानंदानी सांगितले आहे. "ज्याला धर्म कळतो तो निधर्मी असतो" 1946 च्या निवडणूकीत जिना मशिदीत गेले. रतनबाई जिना हयाही धावत मागे गेल्या. तो मौलवी डोक्याला हात लावून बसला.

**सारांश**

पहिला करार भारत व पाकिस्तान मध्ये झाला. तेंव्हा टेबल खुर्च्यासुध्दा वाटण्यात आल्या. लाहोर येथील प्रशासकीय व्यवस्था चालविण्यासाठी 55 कोटी रूपये दिले. त्यावर सरदार वल्लभाई पटेल व महात्मा गांधीची स्वाक्षरी आहे. ज्यांनी हा करार केला त्यांनी पैसे द्यावे असे गांधी म्हणाले. पाचगणीत हातात सूरा घेऊनही नथुराम गोडसे गांधीजीचा खून करण्यासाठी गेला होता. गांधीजी ज्या रेल्वेत बसले होते ती रेल्वे पलटी करण्याचा प्रयत्न झाला होता. तुषार गांधीनी 'लेटस्ट गांधी' हे पुस्तक लिहिले आहे वरळी कांचन (पुणे) येथे पटेलांना अल्सर झाला आहे म्हणून गांधीजवळ आला. मुद्दाम होवून एक माणूस येवून गांधीना भेटण्यास आला व एक भेटवस्तू आणलोय. ती गांधीना द्यावी. असे मुलीला म्हणाला, त्या मुलीने भेटवस्तू घेवून गांधीकडे गेली. त्या भेटवस्तूच्या बॉक्समध्ये फाटकी चप्पल, बुट होते. मिटिंग आश्रमात चालू होती. ही वस्तू तपासा या आश्रमात ठेवू, नाही तर वापरू. पण एक डावी तर दुसरी उजवी अशी भेटवस्तू होती. सर्व पाहणारे नाराज झाले. 'हरीजन' नावाच्या वर्तमानपत्राला दोन रूपयाची पावती फाडून पैसे दिले. त्याचेच आभार मानले. तो माणूस मध्येच उठला आणि म्हणाला, या 'हरीजन' वर्तमानपत्रास देण्यास माझा विरोध आहे. पण ती मुलगी नव्हती. नंतर काकासाहेब गाडगीळ यांना मुलींने ओळखले. हा नथुराम गोडसे कोण होता ? हे समजून घेण्याची आज गरज आहे. हा माणूस या देशाची सत्ता सर्वसामान्य माणसांच्या हातात देईल.

**निष्कर्ष -**

1. महात्मा गांधी हे आलेक्झांडर, हिटलरपेक्षाही महान आणि अनेक मुत्सद्यांचे मार्गदर्शक होते.
2. महात्मा गांधीनी जगाला अहिंसा, सत्य, प्रेम, प्रामाणिकता, तत्त्वज्ञान दिले. हे तरूण पिढीने आज समजून घेण्याची आवश्यकता आहे.
3. आज अणुबॉम्ब स्विकारावा का महात्मा गांधी स्विकारावा याचे चिंतन करण्याची गरज आहे.
4. इरशा, इंद्रिय यावर महात्मा गांधीचे नियंत्रण होते.
5. उच्चप्रतीची नीतीमत्ता निर्माण करण्यासाठी सत्याचा शोध घेण्यासाठी, दीन दुबळयांची सेवा करण्यासाठी आजही महात्मा गांधी यांचे विचार प्रेरक ठरतात.
6. महात्मा गांधीनी समाजाला आध्यात्मिक मूल्य, सर्वधर्मसमभाव, धर्मनिर्पेक्षता, या मूल्यांचा जीवनभर अंगिकार केला. सत्य हेच ईश्वर मानले.
7. महात्मा गांधी यांची तुलना फक्त सॉक्रेटिससोबत होवू शकते. गांधी खरे ग्रामीण अर्थशास्त्रज्ञ होते.

**संदर्भ :-**


1. डॉ. आनंद मेणसे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दहाव्या उजळणी वर्गात दिलेले व्याख्यान दिनांक 06/03/2014
2. डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. नागोराव कुंभार, श्री भुजंग बोबडे, मा.श्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी दिनांक 04/10/2018 रोजी महात्मा गांधी अध्यासन केंद्र उद्घाटन समारंभात नळेगाव येथे दिलेले व्याख्यान.
3. खोज गाँधी की, गांधी रिसर्च फाऊंडेशन, जलगाँव की द्वैमासिक पत्रिका, जनवरी-जून 2013
4. डॉ. विश्वास पाटील, 'साधक गांधी' गांधी रिसर्च फाऊंडेशन, जलगाँव, प्रथमावृत्ती 2011

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय आजादीचे शिल्पकार: एम. के. गांधी

**प्रा डॉ व्हि. बी. चांदजकर**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम**

भारतीय आजादीचे शिल्पकार असे म. गांधी यांना म्हणता येईल. म्हणूनच त्यांना राष्ट्रपिता असा दर्जा देण्यात आला आहे. आपल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून या देशाला आझादी मिळवून देणाऱ्या म. गांधीजीचा जन्म 02 आक्टोबर 1869 रोजी पोरबंदर येथे झाला.

1888 मध्ये ते कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडाला गेले होते. तेथे त्यांनी बॅरीस्टरची पदवी मिळवली. 1891 मध्ये भारतात परत आल्यानंतर त्यांनी वकिलीला सुरूवात केली. पण आयुष्यात एक वळण असे आले की ते दक्षिण अफ्रिकेत गेले. तेथे जावून वकिली करू लागले. तेथेही ते योगायोगानेच तेथील भारतीयांच्या अधिकाराच्या आंदोलनात ओढल्या गेले. पुढे त्या आंदोलनाचे नेतृत्व करून त्यांनी अहिंसात्मक आंदोलनाव्दारे आपले हक्क मिळवण्याचा अभिनव प्रयोग यशस्वी करून दाखवला. सत्याग्रहाचे प्रयोगही त्यांनी तेथेच केला. तेथे त्यांनी 1903 मध्ये इंडियन ओपीनियन नावाचे वृतपत्रे काढले. सत्याग्रह शिबिराची स्थापनाही त्यांनी तेथेच केली. 1914 मध्ये ते भारतात परतले.

1915 पासून ते महात्मा म्हणून विख्यात झाले. 1917 मध्ये त्यांनी चंपारण्य येथील शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलन केले. पुढे 1920 ते 1922 मध्ये अहिंसात्मक असहकार आंदोलन, 1930-32 दरम्यान दांडी येथील मीठाचा सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग, 1940-42 दरम्यान व्यक्तिगत सत्याग्रह आणि 1942 चे भारत छोडो आंदोलन या साऱ्यात म.गांधीचे नेतृत्व झळाळून उठले.

9 आगस्ट 1942 ला त्यांनी मुंबईत करा किंवा मरा असे आवाहन जनतेला केले. त्यांना नंतर त्यांना अटक झाली. त्यांना पुण्यात आगाखान पॅलेस येथे ठेवण्यात आले. ते 06 मे 1944 ला त्यांना सोडण्यात आले. त्यांनी अनेकदा उपोष्णाचा मार्ग अवलंबून ब्रिटिश सरकारला जेरीला आणले. त्यांच्या प्रयत्नांना यश येवून अखेर 15 आगस्ट 1947 ला भारतास् स्वातंत्र्य मिळाले. पण त्यावेळी ते नोआखालीत सुरू असलेली जातीय दंगल विझवण्यासाठी काम करीत होते. लोकांसाठी आयुष्याचा होम करणाऱ्या म. गांधींना एका असंतुष्टाने 30 जानेवारी 1948 ला गोळी घातली. त्यातच त्यांचे निधन झाले.

म. गांधी केवळ अटल राजकारणीच नव्हते तर जीवनाच्या विविध पैलूवर त्यांचा चांगलाच प्रभाव होता. ते चांगले समाजसुधारक, कुशल अर्थतज्ञ होतेच या बरोबरच त्यांचा उत्कृष्ट जनसंपर्क होता. ज्यावेळी मुद्रणमाध्यम इंग्रजाच्या अधिपत्याखाली होते, अशावेळी गांधीजींनी आपल्या विचाराची लाट गावागावात आणि शहराशहरात पोहचवली. त्यांच्या सरळ साध्या व सोप्या भाषेचा प्रभाव लोकांवर पडत असे.

इंडियन ओपिनियन मध्ये लिहिले आहे...व्यक्तिचा प्रमुख संघर्ष आतून असतो. ती आतील शक्ती प्रेरणा देत असते. हे कार्य वर्तमानपत्रे चांगल्याप्रकारे करू शकतात. एका पत्रकाराच्या रूपाने त्यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार मांडले. त्यामुळे तत्कालीन बुध्दीवंत वर्गाने म्हणजे वकिल, शिक्षक, विद्यार्थी, पत्रकार,व्यापारी युनियनचे नेते आदिंनी गांधीजींना आपले प्रेरणास्थान मानले. त्यांनी सुरू केलेल्या हरिजन वृतपत्राचा उध्देश ग्रामिण भागातील लोकांचे भले करणे आणि त्यांच्या जीवनामध्ये सुधारणा करणे होता. सामाजिक सुधारणा, शिक्षणपर लेखांच्या शिवाय गांधीजीच्या वर्तमानपत्रात अगामी राजकीय कार्यक्रम, रणनीती यांचेही विवरण असायचे.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


प्रख्यात शास्त्रज्ञ आईनस्टईनने गांधाजीच्या बाबतीत एकदा म्हटले होते, असा कुणी माणूस या धरतीवर निर्माण झाला होता. यावर येणारी पिढी क्वचितच विश्वास ठेवेल.

गांधीजी असहकार, अहिंसा आणि शांततामय विरोध यांना शस्त्र म्हणून इंग्रजाविरूध्द वापरले. पंजाबमध्ये जालियनवाला बाग हत्याकांडानंतर लोकांच्या क्रोधाचा उद्रेक झाला आणि अनेक ठिकाणी हिंसक विरोध झाला. गांधीजींनी जालियनवाला बाग हत्याकांड तसेच त्यानंतरचे हिंसक विरोध दोन्हींचा निषेध केला. त्यांनी या दंग्यांना बळी पडलेल्या ब्रिटिश नागरिकांबदल सहानुभूती दर्शविणारा आणि दंग्यांचा निषेध करणारा एक ठराव मांडला. या ठरावाला सुरूवातीला काँग्रेसमध्ये विरोध झाला. पण गांधीच्या तत्वानुसार कोणत्याही प्रकारची हिंसा ही पाप होती आणि त्याचे समर्थन करता येणे शक्य नव्हते. हे तत्व मांडणाऱ्या त्यांच्या भावनाप्रधान भाषणानंतर कांग्रेसने त्यांचा ठराव मान्य केला. पण या हत्याकांडाच्या आणि त्यानंतरच्या हिंसेच्या पश्चात गांधीजींनी आपले सर्व लक्ष पूर्ण स्वराज्यावर केंद्रित केले. त्यांच्या पूर्ण स्वराज्याच्या कल्पनेत पूर्ण वैयक्तिक, धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्य समाविष्ट होते.

डिसेंबर 1921 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पूर्ण अधिकार म. गांधीजींना देण्यात आले. त्यांच्या नेतत्वाखाली कांग्रेसची पुनर्बांधणी नवीन संविधानुसार करण्यात आली. ज्याचा मुख्य उध्देश होता स्वराज्य. पक्षाचे सभासदत्व थोड्याशा फीच्या मोबदल्यात सर्वांना खुले करण्यात आले. पक्षातील शिस्त वाढवण्यासाठी श्रेणीनुसार समित्या बनवल्या गेल्या. यामुळे फक्त उच्चभ्रूंसाठीच समजल्या जाणाऱ्या पक्षाचे स्वरूप बदलले आणि काँग्रेस जनसामान्याचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष बनला. गांधीजींनी अहिंसेच्या तत्वाला स्वदेशीची जोड दिली. त्यांनी सर्वांना परदेशी विशेषतः ब्रिटिश वस्तुंचा बहिष्कार करण्याचे आवाहन केले. या तत्वानुसार सर्व भारतीयांनी ब्रिटिश कपड्यांच्या ऐवजी खादीचा उपयोग करावा असे अभिप्रेत होते. प्रत्येक भारतीय पुरूष आणि स्त्रीने, प्रत्येक गरिब आणि श्रीमंत व्यक्तिने, दिवसाचा काही वेळ भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या समर्थनार्थ चरख्यावर सूत कातावे असा गांधीजीचा आग्रह होता. याचा मुख्य उध्देश शिस्त आणि स्वावलंबनाचे महत्व लोकांच्या मनावर ठसवणे तसेच स्त्रियांना स्वातंत्रलढ्यात सहभागी करूण घेणे हा होता. ब्रिटिश वस्तूच्या बहिष्काराबरोबरच ब्रिटिश शैक्षणिक संस्थाचा बहिष्कार, सरकारी नोकरीचा त्याग आणि ब्रिटिशांनी दिलेल्या मान आणि पदव्यांचा त्याग करण्याचे आवाहन गांधीजीनी केले.

असहकार चळवळीला समाजातील सर्व स्तरामधून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. पण असहकार चळवळ जोमात असतांनाच अकास्मात थांबविण्यात आली. या कारण ठरले उत्तर प्रदेशामधील चैरी चोरा गावात चळवळीला मिळालेले हिंसक वळण. 04 फेब्रुवारी 1922 रोजी पोलिसांनी जमावावर केलेल्या गोळीबाराने संतप्त होवून आंदोलकांनी पोलिसांवर हल्ला केला नंतर पोलिस ठाण्याला आग लावली. जमावावरील गोळीबारात तीन जण मरण पावले. पुढे अजून जास्त हिंसक घटना घडतील या भीतीने गांधीजींनी चळवळ स्थगित केली. 10 मार्च 1922 मध्ये गांधीजींनी राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली व सहा वर्षाचा तुरूंगवास ठोठावण्यात आला. इ.स. 1924 मध्ये दोन वर्षाच्या तुरूंगवासानंतर अपेंडिक्सच्या आपरेशनाच्या कारणावरून त्यांची सुटका करण्यात आली.

गांधीजी तुरूंगात असतांना त्यांच्या नेतृत्वाअभावी काँग्रेसमध्ये फुट पडली. शेवटी कांग्रेसमध्ये दोन गट पडले. एका गटाचे नेतृत्व चितरंजन दास आणि मोतिलाल नेहरू यांच्याकडे होते. हा गटाचा कल संसदीय कार्यकरणीत भाग घेण्याकडे होता. पण चक्रवर्ती राजगोपालचारी आणि सरदार पटेल यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या गटाचा याला विरोध होता. हिंदू मुस्लीमांमधला चळवळीदरम्यान वाढीस

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

लागलेला एकोपासुध्दा हळूहळू कमी होत होता. गांधीजींनी हे मतभेद दूर करण्याचे अनेक प्रयत्न केले. पण या प्रयत्नांना म्हणावे तितके यश मिळले नाही.

1920 च्या दशकात मोठा काळ गांधीजी प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राह्हिले आणि आपले लक्ष्य स्वराज्य पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय कांग्रेसमधील मतभेद दूर करण्यावर केंद्रित केले. या काळात त्यांनी समाजातील जातियता,दारू समस्या आणि गरिबी कमी करण्याचे आपले प्रयत्न चालू ठेवले. राजकारणाच्या पटावर ते इ. स. 1928 मध्ये परत आले. एक वर्ष आधी ब्रिटिश सरकारने संविधानात सुधारणा करण्यासाठी सर जान सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीमध्ये एकपण भारतीय सदस्य नव्हता. या कारणाने भारतीय पक्षांनी या समितीवर बहिष्कार टाकला. गांधीजींनी 1928 च्या कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनात एक ठराव पास केला. त्याव्दारे ब्रिटिश सरकारकडे भारताला सार्वभौम दर्जा देण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी मंजूर न केल्यास परत पूर्ण स्वराज्यासाठी असहकार चळवळ सुरू करण्यात येईल असे बजावण्यात आले. पक्षातील सुभाषचंद्र बोस, जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या तरूण नेत्यांची मागणी तात्काळ स्वराज्याची होती. पण गांधीजींनी ब्रिटिश सरकारला एक वर्षाचा अवधी दिला. पण ब्रिटिश सरकारने काहीही उत्तर दिले नाही आणि 31 डिसेंबर 1929 मध्ये लाहोर आधिवेशनात भारताचा ध्वज फडकवण्यात आला. हा दिवस कॉंग्रेसने स्वराज्य दिन म्हणून साजरा केला. गांधीजींनी मग मार्च 1930 मध्ये मिठावरील कराच्या विरोधात सत्याग्रहाची घोषणा केली आणि त्याची परिणती प्रसिध्द दांडी यात्रेत झाली. 12 मार्चला अहमदाबादहून निघालेली यात्रा, 06 एप्रिलला 400 कि. मी.चा प्रवास करून दांडीला पोहचली. हजारोच्या संख्येने भारतीय या यात्रेत सहभागी झाले होते. ही यात्रा इंग्रजांची भारतातील पाळेमुळे उखाडण्याच्या प्रयत्नामधील सर्वात यशस्वी पर्यत्न ठरली. ब्रिटिशांनी उत्तरादाखल 60,000हून अधिक लोकांना तुरूंगात डांबले.

शेवटी लार्ड एडवर्ड आयर्विन यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकारने गांधीजीशी वाटाघाटी करण्याचे ठरविले. मार्च 1931 मध्ये गांधी आयर्विन करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारानुसार ब्रिटिश सरकारने सर्व भारतीय कैद्यांना मुक्त करण्याचे मान्य केले आणि त्याबदल्यात कायदेभंगाची चळवळ मागे घेण्याची अट घातली. याबरोबरच गांधीजींना भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा एकमेव प्रतिनिधी म्हणून लंडनमध्ये होणाऱ्या गोलमेज परिषदेचे आमंत्रण दिले. ही परिषद गांधीजी आणि पक्षासाठी निराशाजनक ठरली. कारण त्यात सतांतरावर भर देण्याऐवजी भारतातील राजराजवाडे आणि अल्पसंख्याक यांच्यावर जास्त भर देण्यात आला होता. यातच भर म्हणजे आयर्विननंतर आलेले लार्ड विलिग्टन यांनी राष्ट्रवाद्यांची चळवळ नरम पाडण्याचे प्रयत्न चालू केले. गांधीजींना अटक करण्यात आली. त्यांचा अनुयायांवरील प्रभाव करण्यासाठी त्यांना वेगळे करण्याचा डाव होता. पण त्यांचे हे प्रयत्न यशस्वी झाले नाही.

इ. स. 1934 च्या उन्हाळ्यात गांधीजीवर तीन अयशस्वी प्राणघातकी हल्ले झाले.

जेंव्हा कॉंग्रेसने निवडणूक लढवण्याचा आणि फेडरेशन आराखड्या अंतर्गत सत्ताहातात घेण्याचा निर्णय घेतला तेंव्हा गांधीजींनी आपल्या पक्ष सभासदत्वाचा राजीनामा दिला. गांधीजी पक्षाच्या या निर्णयाबदल सहमत नव्हते. पण त्यांना असे वाटले की, जर त्यांनी राजीनामा दिला तर त्यांची भारतीयामधील प्रसिध्दी पक्षाच्या इतर साम्यवादी, समाजवादी, कामगार प्रसिध्दी, विद्यार्थी, धार्मिक रूढीतत्ववादी आणि व्यापारी वर्गातील प्रतिनिधींना आपले विचार जनतेसमोर मांडून देण्याच्या आड येणार नाही तसेच गांधीजी ब्रिटिश सरकारमध्ये सहभाग स्वीकारलेलया पक्षाचे कॉंग्रेसमध्ये नेतृत्व करून इंग्रजांना त्यांच्या विरूध्द बोलण्याची अजून एक संधी देऊ इच्छित नव्हते.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

गांधीजी इ. स. 1936 मध्ये पक्षात परत आले. तेंव्हा जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली पक्षाचे लखनौ येथे अधिवेशन चालू होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या भविष्याबदल विचार करण्यापेक्षा आधी पुर्ण स्वराज्य कसे मिळेल यावर सर्व लक्ष केंद्रित करण्यात यावे, असे गांधीजींचे मत होते. पण तरीही पक्षाच्या समाजवादी धोरणांचा अवलंब करण्याच्या निर्णयाला त्यांनी विरोध केला नाही. इ. स. 1938 साली पक्षाध्यक्षपदी निवडून आलेले सुभाषचंद्र बोस आणि गांधीजी यांच्यात अनेक वाद झाले. गांधीजींच्या या विरोधाची मूळ कारणे सुभाषचंद्राच्या अहिंसेवरील अविश्वासही होता. गांधींचा विरोध असून सुध्दा बोस सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी निवडून आले. पण जेंव्हा सुभाषचंद्रांनी गांधजींच्या तत्वांना सोडून दिले आहे असे कारण पुढे करून देशभरात अनेक पक्ष नंत्यांची सामुदायिक राजीनामे दिले. तेंव्हा सुभाषचंद्र बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

म. गांधीजींनी एकादश 11 व्रताचा स्वीकार केला होता. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हवर्य, अपरिगृह, शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन, सर्वधर्म समान्ताव्य, स्वदेशी, स्पर्शभावना, निर्भयता या तत्वाला गांधीजींनी आधारभूत मानत. याच तत्वांच्या आधारावर त्यांनी भारताचा स्वातंत्रलढा लढविला. गांधीजींनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रसिध्द आहे. गांधीजींनी म्हटले आहे की, सर्वात महत्वाची लढाई ही स्वतःच्या वाईट प्रवती, भय आणि असुरक्षितता यांच्यावर मात करणे होय. परमेश्वर सत्य आहे असे त्यांचे मत होते. पुढे त्यांनी ते सत्य परमेश्वर आहे असे बदलेले.

संदर्भः-

1.माझे सत्याचे प्रयोग, मोहनदास करमचंद गांधी
2. विनय लाल, हे रामः राजकारण गांधीजीच्या शेवटच्या शब्दांचे.
3.Gandhi Before India, RamshandraGuha, 2014
4.HindSwaraj; Indian Home Role, M.K.Gandhi
5.India Of My Dream,M.K.Gandhi

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# समतावादी विचारांचे पाईक : मोहनदास करमचंद गांधी

**सहा. प्रा. विलास सोमाजी पवार**

समाजशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जि. हिंगोली - 431513

---

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्य काळामध्ये भारतीय समाजात होऊन गेलेल्या महान समाजसुधारकांच्या आणि राजकीय विचारवंताच्या यादीत महात्मा गांधी यांचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. आज एकविसाव्या शतकातही अनेकांना पेलवणार नाही इतका प्रगत विचार महात्मा गांधी यांनी त्या काळात भारतीय समाजापुढे ठेवला होता. ते विचार भारतीय समाजजीवनाच्या विविध अंगामध्ये योग्य त्या प्रमाणात उतरविण्यात आपण कितपत यशस्वी ठरलो आहोत यावरुन आपले राष्ट्रीय यशापयश ओळखले पाहिजेत. 02 ऑक्टो 1869 साली महात्मा गांधीजींचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. समाजसुधारणेच्या कार्यात त्यांनी दाखविलेल्या कर्तबगारीमुळे त्यांना महात्मा ही सन्मापूर्वक पदवी मिळाली होती. असे असले तरी ते त्यांच्या काळाच्याही पुढे गेलेल्या विचारसरणीमुळे इतिहासात अजरामर झाले.

जातीयता, अंधश्रध्दा, आर्थिक व सामाजिक विषमता यासह अनेक वाईट गोष्टी अजूनही देशातून हद्दपार झालेल्या नाहीत. महात्मा गांधी व त्यांच्यासारखे समाजसुधारक त्यामुळे आजही अत्यंत समयोचित ठरतात. परकियांचे राज्य आता आपल्याला नको असले तरी स्वकीयांतीलही वर्चस्ववादाचे, जातीयवाद्यांचे अंधश्रध्दा प्रसारकांचे आणि तत्सम इतर लोकांचे राज्य आता आपल्याला नको आहेत. आपल्याला आता समतावाद्यांचे, विज्ञानवादयांचे व समन्वयवादयांचे राज्य हवे आहे. महात्मा गांधी यांचे आणि त्यांच्यासारखे इतर समतावादी महामानवांचे विचार त्यासाठी आपल्याला मार्गदर्शक आहेत. देशात कायद्याचे राज्य असावे, कायदयासमोर सर्वांना समान लेखले जावे, लोकमताची कदर करुन कायदेमंडळाने कल्याणकारी कायदे करावेत, विविध धर्मीयांसाठी समान कायदे असावेत, समाजातील सर्वच अनिष्ठ प्रथा, परंपरा, वाईट चालीरीती, अंधश्रध्दा यांचे कायद्याच्या आधारे निर्मूलन व्हावेत. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांना परस्परांच्या हस्तक्षेपापासून दूर ठेवण्यात यावे. न्याय मंडळाचे कामकाज पारदर्शपणे व्हावे. लोकांच्या जीवीतांचे व संपत्तीचे संरक्षण प्राधान्याने करण्यात यावे. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यासारख्या तत्वांच्या आधारे देशात लोकशाही व्यवस्था निर्माण करावी. सतीची चाल, बालविवाह, बालविवाह, बालहत्या, स्त्रीभ्रूणहत्या, यज्ञात बळी देण्याची प्रथा, आणि समाजविघातक प्रथा-परंपरा नष्ट करण्याच्या अपेक्षा महात्मा गांधी यांनी त्या मागासलेल्या कालखंडातही व्यक्त केलेल्या आहेत.

थोडक्यात महात्मा गांधी यांनी सुचविलेल्या सुधारणांतील कांही सुधारणा भारतीय संविधानाने अनेक सुधारणांना समाजजीवनात प्रत्यक्षात लागू करुन त्यांच्या पाठीमागे पाठबळ उभे केले असले, तरी त्यांची अंमलबजावणी मात्र अजूनही अपेक्षित गतीने व ताकदीने होत असतांना दिसत नाही. भारतातील विविध क्षेत्रामधील शोषण त्यामुळेच अजूनही मोठया प्रमाणात संपुष्टात आलेले नाही. त्यामुळे महात्मा गांधी यांचे विचार आजही अत्यंत उपयुक्त आणि कालसुसंगत ठरतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:-**

1) म. गांधी यांचे सामाजिक, समतावादी विचार अभ्यासणे.
2) म. गांधीजींचे सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
3) म. गांधीजींची अहिंसा संकल्पना समजून घेणे.

4) शेतकरी व दुर्बल घटकाबाबतचे विचार अभ्यासणे.
5) म. गांधीजींच्या स्वप्नातील भारत अवलोकन करणे.

**शोधनिबंधाची गृहितके:-**

1) म. गांधीजींचे सामाजिक विचार प्रेरणादायी आहेत.
2) म. गांधीजींचे सामाजिक कार्य अव्दितीय आहे.
3) म. गांधीजींची अहिंसा संकल्पना उपयोजित आहे.
4) शेतकरी व दुर्बल घटकाला आत्मबल देणारे विचार आहेत.
5) म. गांधीजींच्या स्वप्नातील भारत सुंदर आणि परिपूर्ण असा आहे.

**1) सामाजिक विचारांची प्रयोगशाळा**

फिनिक्स व टॉलस्टॉय फार्म म्हणजे म. गांधीजींच्या विचारांची व्यावहारीक प्रयोगशाळा होती. दक्षिण अफ्रिकेत म. गांधीजींच्या सत्याग्रहात सहभागी झाल्यामुळे अनेकांची तुरुंगात रवानगी झाली होती. त्यामुळे त्यांच्या कुटूंबाचे पोषणाची जबाबदारी म. गांधींनी घेतली. त्यासाठी त्यांनी जोहान्सबर्ग जवळ जेलबंद लोकांच्या कुटूंबासाठी वस्ती उभी केली. या वस्तीत सर्व धर्मीय लोक होते. त्यामुळे सामाजिक सलोखा स्वाभाविकपणे निर्माण झाला. सर्वांना समान वागणूक मिळू लागली. या फॉर्ममध्ये सर्वांचा पोषाख सारखाच होता. गांधीजींच्या शब्दात फार्म म्हणजे सात्विकता, आध्यात्मिक शुध्दी, नैतिक उत्क्रांती यांचे निर्मीती केंद्र होते. शांतता माणसाचा मूळ स्वभाव आहे. नैतिक उत्क्रांतीसाठी तो सतत तयार असतो. साधी राहणी, अंगमेहनत, श्रम, सकारात्मक विचार व्यक्ती व समाजाच्या सुखी जीवनाची किल्ली आहे. समाजाचा विचार करतांना व्यक्तीचा चेहरा विचारात न घेता त्याची ओळख, आवड-निवड जपत त्यांना समाजाभिमुख बनविण्यात यावेत. म्हणून हे फार्म म्हणजे गांधीजींच्या सामाजिक विचारांच्या व्यवहरिक यशाची पावतीच होती.

**2) सत्य संवाद**

शिकागो ट्रिब्यूशन या वृत्तपत्राचे वार्ताहर आणि राइज □न्ड फॉल ऑफ थर्ड राइस या जगप्रसिध्द ऐतिहासिक इंग्रजी कादंबरीचे लेखक विल्यम आयर हे म. गांधीसोबत चार वर्ष होते. म. गांधी त्यांच्या अभ्यास व कुतूहलाचा विषय होता. त्यांनी गांधीजींच्या त्या काळातील महत्वाच्या घटनांची नोंद केलेली आहे. लंडनमधील लॅकशायरला म. गांधी यांनी भेट देऊन येथील मजुरांना ते सांगत होते. भारताचा संघर्ष सामान्याच्या विरोधात नसून त्यांचा विशेष विरोध इंग्लंडच्या साम्राज्यशाहीच्या विरोधात आहे. त्यांनी लॅकशायरच्या मजुरांना आवाहन केले की आपण सर्वांनी भारतीयांसोबत रहावे. विल्यम श्रायर हे पाहून थक्क झाले. मुजरांच्या रागाचे रुपांतर व्देषात होणार नाही याची काळजी म. गांधींनी घेतली आणि लॅकशायरचे मजूर त्यांचे मित्र झाले. मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाइी हा एक अहिंसक मार्ग होता.

**3) अहिंसा आणि यांत्रिकीकरण**

म. गांधी यांच्या विचारांना आज जागतिक पातळीवर महत्व आहे. कारण त्यांचे विचार केवळ तर्कसंगतच नव्हेत तर त्यांच्या जीवनाच्या आचरणाचा तो अभिन्न भाग होता. म. गांधीजींनी संपूर्ण आयुष्यभर जपलेल्या मुल्यांची व स्वभावाची अभिव्यक्ती म्हणजे साधेपणा होय. ही गांधीजींसाठी केवळ आदर्श नव्हती तर ती एक जीवन जगण्याची पध्दती होती. अहिंसा ही माणसाची स्वाभाविकता आहे. अपघातात लोक मदतीला धावतात त्यावेळी त्यांच्यातील स्वाभाविकता वर येते. अहिंसाचा माणसातील करुणा, प्रेम, सौंद्रयपूजा यांना जागे करु शकते. अहिंसा जगाने स्विकारली तर गरीबीचा, राहण्याचा, बेकारीचा, पाण्याचा, अन्नाचा, रोगराईचा प्रश्न सोडविता येईल. कारण युध्द,

कायदा व सुव्यवस्था, पोलीस यंत्रणेवरचा पैसा वाचविता येईल व हा पैसा जनकल्याणासाठी वापरता येईल असे म. गांधींना वाटत होते. आज व्यक्तीचे जे अभद्र, अमंगल, स्वार्थी, चैनी, व्देषी, अहंकाराने भरलेले स्वरुप वर आलेले आहे. त्याला संपविण्याचा एकच मार्ग म्हणजे अहिंसा होय. म.गांधी यांचा यांत्रिकीकरणाला विरोध नव्हे तर यंत्रणांना विरोध होता ज्याच्या निर्मितीमागची प्रेरणा नफा ही होती.

### 4) शेतकऱ्यांच्या हिताचे विचार

म.गांधी यांना मार्च 1922 मध्ये राजद्रोहाच्या मुन्ह्याबद्दल अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले तेव्हा त्यांना जातीय ओळख सांगण्यात यावी असे सांगीतले. तेंव्हा गांधी म्हणाले, मी शेतकरी व विणकर आहे. गांधीजी दररोज सूत कातत असत. आणि आश्रमातील विविध पिके आणि जनावरांच्या बाबतीत प्रयोग करीत असत. शेतकरी आणि विणकर अशी जात सांगून त्यांनी जन्मावर आधारीत जात कालबाह्य केली, नाकारली होती. त्यांनी कधीच स्वत:ची जात सांगीतली नाही. कर्मावर आधारीत जात व्यवस्थेला सुरुवात स्वत: पासून केली. गांधीजी स्वत:ला शेतकऱ्यांच्या जातीचे म्हणत असत. कारण शेतकरी रचनात्मक निर्मितीत व्यस्त असतो. सात्विक जीवनाची हमी केवळ शेतीच देते म्हणून ती श्रेष्ठ, आणि शेती करतो तोही श्रेष्ठ असतो. ग्रामीण भागात कृषी, शेती करणाराच ज्ञानी असे. शरीराला व मनाला सुसंस्कृत करुन शरीर व बुध्दीला चालना देण्यासाठी श्रम अत्यंत महत्वाचे आहे. यावर भर देण्यात आला. श्रमातून शालीनता आणि सुसंस्कृतपणा आलेला असतो. पोळा, गाईची पूजा व त्यांचे सण हे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच आहेत. व्यक्ती जेंव्हा प्रेम व करुणेने ओतप्रोत भरलेला असतो तेंव्हा तो कधीच पक्षपाती नसतो. म्हणून गांधीजींनी खेड्याकडे चला म्हणत त्यांनी आपली जात शेतकरी अशी सांगीतली.

### 5) गुलामगीरी संदर्भातील विचार

म. गांधीचे जीवन, कार्य विचार समजून घ्यावयाचे असेल तर गुलामी हे प्रथम समजून घ्यावी लागेल. गुलामी शोषणातून जन्माला येते, शोषण अत्याचारातून होते. सरंजामी व साम्राज्य विस्तार आकांक्षेतून अत्याचार होत असतात. म्हणून सरंजामी एक वृत्ती आहे. सत्तेच्या बळावर कोणालाही टाचेखाली चिरडता येते. अशी मंदाधता सत्तेतून निर्माण होते. भारतात गुलागीरीची सुरुवात विदेशी आक्रमणापासून सुरु झाली. तिची पायमुळे मध्ययुगात रुजली आहे. मुघलानंतर ब्रिटीशांची गुलामगीरी भारतात सुरु झाली. ब्रिटीशांनी सत्ता आणि संपत्ती, युध्द आणि व्यापाराच्या जोरावर जगावर राज्य केले. ब्रिटीशांच्या असे जेंव्हा लक्षात आले की शेती हा कमी गुंतवणुकीवर अधिक नफा देणारा व्यवसाय आहे तेंव्हा त्यांनी भारतातील तुरुंगातील कैदी अफ्रिका खंडातील बेटावर शेतीच्या लागवडीसाठी मजूर म्हणून नेले आणि गुलाम बनविले. म. गांधींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेत आणि नंतर भारतात गुलामगीरी विरुध्द स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले. ते समजून घ्यावयाचे तर गुलामगीरीच्या वेदना समजून घ्यायला हव्यात.

### 6) दुर्बलाचे कैवारी

दक्षिण अफ्रिकेतील आशियाई नागरिकांवर बंधने घालून त्यांना गुलाम बनविण्यात येत होते. आशियाई सुधारीत कायदा या षडयंत्राचाच एक भाग होता. या कायदयानूसार राहण्याचा हक्क सांगणाऱ्या प्रत्येक नागरिकांना कचेरीत नाव नोंदविणे बंधनकारक होते. 11 सप्टेंबर 1906 मध्ये या वाईट कायदयाविरुध्द संघर्ष चिघळले होते. 8 हजार नागरिकांच्या सह्यांचे निवेदन ब्रिटीश सरकारला देवून निषेध नोंदविण्यात आला. आंदोलकांची धरपकड सुरु झाली. गांधीजींना ट्रान्सवाल सोडून जाण्याचा हुकूम देण्यात आला. हा निर्णय गांधीजींनी अमान्य केल्यामुळे त्यांना दोन महिने तुरुंगवासाची शिक्षा करण्यात आली. गांधीजींना त्याबद्दल सक्त मजूरीची शिक्षा झाली. कोणत्याही स्वातंत्र्य आणि हक्कांची लढाई म्हणजे साम्राज्यवादी मनोवृत्तीचा विरोध असतो आणि गुलामीच्या मुक्तीसाठी केलेले दुर्बलांचे ते दिव्य असते.

**7) अहिंसा बलवानांचा मार्ग**

हिंसा म्हणजे कायरता, मजबुरी तर अहिंसा म्हणजे मजबूती, शौर्य होय असे म. गांधी मानतात. कमकुवत भित्रे याचा वापर करु शकत नाहीत. भारतात सत्यासाठी, स्वत:च्या हक्कासाठी याचा वापर केल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्वातंत्र्याच्या लढयासाठी सत्याग्रहाच्या माध्यमातून त्यांनी अहिंसेच्या मार्गाचा यशस्वी प्रयोग म. गांधींनी केला. एकदा म. गांधी आणि पहेलवान गामा यांची भेट होऊन चर्चेत गांधी म्हणाले जर आपणात कुस्ती झाली तर कोण जिंकेल तेंव्हा गामा यांनी सांगीतले मी तर एका व्यक्तीस पराभूत करण्यासाठी ताकद वाढवतो आहे. तुम्ही तर एका साम्राज्याचा पराभव करण्यासाठी ताकद लावत आहात. अहिंसेच्या ताकदीचा गर्भित अर्थ यातून स्पष्ट होतो. अहिंसा हे बलवानाचे शस्त्र असून कमकूवतांचे नाही. पारंपारिक अहिंसेपेक्षा गांधीजींची संकल्पना वेगळी आहे. गांधीजी सर्व हिंसेला वाईटच मानतात. हिंसा प्रश्नांचा गुणाकार करते तर अहिंसा ही प्रश्न सोडविते. अहिंसा माणसातील करुणा, प्रेम, नि:पक्षपातीपणा, कृतज्ञता जागी करते.

**8) गांधीवाद व गांधीविचार**

म. गांधी हे वाद नसून विचार आहे. विचार करण्याची पध्दती कशी आहे हे सांगणे म्हणजे सुधारणेसाठी केवळ पाऊल पुढे टाकणे नव्हे, तर समाजातील सर्वांना विचार करण्याची परवानगी देणे म्हणजे सुधारणा होय. म. गांधी विचारांना वादात रुपांतर होऊ देण्याच्या विरोधात होते. कारण ज्ञानाचे सिध्दांत महत्वाचे नाहीत तर त्या सिध्दांतातून कोणते नेतृत्व आणि समाज आकाराला येतो हे महत्वाचे आहे. विविध वादातून रक्तपाताचे समर्थन करणारेच निर्माण होणार असतील तर ते वाद कोणाच्या हिताचे नाहीत. त्यामुळे गांधीवाद नको तर गांधी विचारच उपयुक्त आहेत. अर्धसत्यावर आधारीत मांडलेला सिध्दांत निरुपयोगी असतो. कधी-कधी विचारसरणी सत्य सांगण्यास अपूरी ठरते. कारण सत्य हे गतीशील आहे. तर विचारसरणी स्थितीशील असते. सत्याचा शोध स्वतंत्र विचारातूनच शक्य आहे. विचारसरणी म्हणजे आपणच आपल्यासाठी निर्माण केलेल्या तुरुंगाच्या अदृष्य भिंती आहेत. धर्म, जात, भाषा चालीरिती, विविध सामाजिक संकेत इत्यादी एक प्रकारच्या विचारसणीच आहेत. सत्य शोधण्यात अडसर आहे म्हणून गांधी त्यांच्या विचारांना विचारसरणीत रुपांतर करण्याच्या विरोधात होते.

**9) साधेपणाचे मुलमंत्र**

म. गांधीजी संपूर्ण देशभर फिरुन समाजाची स्थिती आणि गती समजून घेत होते. आपल्याभोवती भयंकर दारिद्र्यात खितपत पडलेला समाज दिसत होता. जागोजाग दिसणारे दारिद्रय पाहून ते अस्वस्थ होते. दारिद्रयामुळे सर्वसामान्यांना त्यांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण करता येत नव्हत्या. अन्न, वस्त्र, निवार या बाबीही पूर्ण करता येत नव्हत्या अशी परिस्थिती होती. मद्रासमध्ये झालेल्या सभेत म. गांधींनी आपली भूमिका मांडली. ज्या देशात गरीब माणसाला अंग झाकण्यासाठी पुरेसे वस्त्र मिळत नाही, त्या देशात आपण उंची वस्त्र वापरणं योग्य नाही. यापुढे आपणही साधेपणानेच राहू. यापुढे साधेपणा हाच आपल्या जगण्याचा मुलाधार असेल या निश्चयाची गाठ मनात मारुन ठेवली. एक धोतर आणि एक पंचा यावरच यापुढे आपला समाजातील वावर असेल असे सांगीतले. आणि मदुराईच्या सभेत याच पेहरावात ते पहिल्यांदा लोकांसमोर आले. या सभेतून त्यांनी लोकांना जसाधेपणाचा मुलमंत्र दिला.

**10) स्वप्नातील भारत**

म. गांधीजींचे स्वप्न हे स्वतंत्र भारताचे होते. देशाने अहिंसेच्या मार्गाने स्वतंत्र मुद्रा निर्माण करावी. आपण अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविले तर ते जगातील सर्वात श्रेष्ठ उदाहरा ठरेल असे गांधीजींचे मत होते. पारतंत्र्यातील देशाला स्वातंत्र्यासाठी मोठी आंदोलने करावी लागतात. यात लाखो लोक प्राण गमावितात. रक्ताचे

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

पाट वाहिल्यानंतरच युध्दे शमतात. जगाच्या इतिहासात अशा घटना अनेकदा पाहावयास मिळतात. त्यामुळे गांधीजींचे विचार चिंतनीय ठरतात. आज जग रक्तपाताला कंटाळले आहे. आम्ही अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवू शकलो तर ते असामान्य उदाहरण ठरेल. संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे आहे. ज्या देशातील लोक शोषणाचे बळी आहेत त्यांना शोषणमुक्त करण्याचे काम स्वतंत्र भारताकडून व्हावे असे म. गांधीजींचे मत होते. अहिंसेवरील लोकांचा विश्वास दृढ झाल्यास सैन्याची गरज उरणार नाही. जगातील विचारवंत व सामान्य माणसालासुध्दा एकमेकांशी लढणारी राष्ट्रे नकोत. परस्परात मैत्रभाव असावा, एकमेकांना समजून घेवून व्यापक विचार प्रत्येकाने करावा. माझ्या देशाचे स्वातंत्र्य इतरांनी अनुकरण करावे. स्वतंत्र व्यापक बंधुभाव निर्माण व्हावा. भारत स्वावलंबी बनावा. कोणाचेही शोषण येथे होणार नाही. सत्य आणि प्रेम या बळावर आम्ही जग जिंकू एवढा आत्मविश्वास आमच्या मनात निर्माण झाला पाहिजे. म्हणून गांधीजींच्या स्वप्नातील भारत हा एक सुंदर आणि परिपूर्ण असा होता.

**संदर्भ सूची:-**

1) डॉ. सदानंद मोरे – लोकमान्य ते महात्मा.
2) यदुनाथ थत्ते – गांधी दर्शनाची प्रासंगिकता
3) प्रा. विकास वसराम आडे – राष्ट्रीय एकात्मता आणि गांधी.
4) मोहनदास करमचंद गांधी – माझे सत्याचे प्रयोग
5) नलिनी पंडीत – गांधी
6) रमेश सक्सेना – गांधी एक अध्ययन

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार

**प्रा.भाग्यश्री एस. वानखेडे**
मानसशास्त्र विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाइ गोटे महाविद्यालय,वाशिम

---

आज एकविसाव्या शतकात म.गांधीच्या उपदेशाला व्यावहरिक दष्टिकोनातून किती महत्व आहे,आपल्या वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनात त्याचा संदर्भ किती उपयूक्त ठरावा हा चचेचा विषय असतो. वास्तविक सद्यपरिस्थित केवळ भारतातच नव्हे तर संपुर्ण जगाला गांधी तत्वज्ञानाचा संदर्भ अधिकाधिक उपयूक्त होत चाललेला आहे. नवीन पिढी अनेक सामाजिक तसेच राजकीय घडामोडीमुळे इतर अनेक गोष्टीने गांधीच्या जवळ जात असली तरी म.गांधीच्या तत्वाच्या दुर गेलेली आढळतात.

म.गांधीनी जॉन रस्कीनच्या अन टू द लास्ट या ग्रंथेहचा अभ्यास केला. त्याचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडला. जीवनात श्रमाला महत्वाचे स्थान असते याचे महत्व गांधीर्जीना पटले. श्रमप्रधान संस्कतीला महत्वाचे स्थान मिळायला पाहिजे,सर्वांचेहित ज्यात सामावलेले आहे.अशा अर्थव्यवस्थेचा आपण स्वीकार करायला पाहिजे. म.गांधीच्या आर्थिक विचाराचा मागोवा घेण्याचा प्रयत्न पस्तूत शोध निबंधातून करण्यात आला आहे.

**१) विश्वस्त कल्पना :-**

राजकारणाप्रमाणेच म.गांधजीचे अर्थकारणही मानवतावादावर उभारलेले ओहे. विश्वस्त कल्पना ही त्यांच्या आथिक विचारणीतील महत्वाची कल्पना होय. अपरिग्रहाच्या तत्वाचा तो विस्तार आहे. सारी संपत्ती इश्वराची आहे. कोणत्याही व्यक्क्ति जवळ स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक मालमता असेल तर तर ईश्वराच्या दीन दुःखी संतानाच्या सेवेसाठी उपयोग करण्याकरीता त्याने त्या मालमतेचे विश्वस्त बनावे. आपल्या जवळ जमा झालेली संपती ही ज्या गरिबांच्या व मजूरांच्या श्रमामुळे निर्माण झाली त्यांचीच ती असून ते तिचा प्रतिपाळ करू शकत नाहित. म्हणून आपण तिचे पालन करतो व जेंव्हा गरिबाला लागेल तेव्हा बँकेतला ठेविदार जसा पैसा काढू न नेतो तसा तो नेईल,ही भावना मनात बाळगणे यातच विश्वस्त कल्पनेचे सार आहे. मग कुणालाही लुटण्याचा किंवा शोषूण होण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. गरिबाचीही श्रीमंताकडे पाहण्याची दृष्टी बदलेल.

जो विश्वस्त बनतो तो मालक राहत नाही. संपतीचा रक्षक या नात्याने त्याला जे कमिशन मिळेल,त्यावर त्याने गुजारा केला पाहिजे. शुध्द विश्वस्तपण ही युक्लिडच्या बिंदुच्या व्याख्येप्रमाणे कल्पनेतच असणार आणि तितकेच अप्राप्यही असणार. पण त्यसाठी आपण जर प्रयत्न करीत रहिंलो तर दुस-या कोणत्याही साधनापेक्षा त्यानेच आपण पृथ्वीवर समतेचे राज्य आणण्याच्या दृष्टिंने प्रगती करू शकतो.व्यक्तिशः गांधींना विश्वस्ताच्यावर्तीचा फैलाव होणे,सरकारच्या मूठीत सता केद्रीत न होणे आवडत होते. कारण त्यांच्या मते खाजगी मालकीमुळे होणारी हिंसा ही सरकारी हिंसे पेक्षा कमी अपायकारक असते. तथापी सरकारी मालकी जर अपरिहार्य असेल तर ती कमीतकमी असावी या मताला त्यांचा पाठिंबा होता. सरकारी मालकी ही खाजगी मालकीपेक्षा चांगली असली तरी हिंसेच्यादृष्टीने आक्षेपार्ह ठरते.

**२) शरीरश्रम :-**

पोटासाठी परिरश्रम या नियामचे पालन स्वच्छेने केले तर संतोष व आरोग्य मिळेल. प्रत्येकाने काही ठरावीक तास शारीरिरक श्रम केलेच पाहिजेत ना श्रम ना जेवन.असा नियम असावा असे ते म्हणतात. त्यामुळे श्रमप्रतिष्ठेची कल्पना निर्माण होउन जो श्रम करणारा मजूर आहे त्याच्या बद्दल आत्मियता निर्माण होईल. शरीर श्रमाने बौध्दीक उत्पादनाचा कस वाढेल. श्रम जाणिवपूर्वक व उच्चध्येयार्थ केले पाहिजे म्हणजे ते आंनंददायक होउन त्यातुन नवसृष्टी निर्माण होते. मतदानाचा आधिकार मिळण्यासाठी शरीरश्रमाची अट आवश्यक ठेवावी असेही ते सुचवितात.

३) यंत्राचा उपयोग :-

यंत्र हे मानवीश्रमाला विरोध करते. त्यामुळे बेकार व अर्धबेकार यांच्या संख्येत भर पडते. ते योग्यस्थानी ठेवेले गेले नाही तर ते जगाची सेवा न करता विध्वंस करतील मानवी परिश्रमाचे उच्चाटन करून थोडया लोकांच्या हातात सारी सता एकत्रीत करणा-या यंत्राला त्यांचा विरोध आहे. याने मनुष्य गुलाम बनतो. मानवाला सहाय्यकारी असणा-या व त्याला होणारा त्रास कमी करणा-या यंत्राला त्यांचा पाठींबा होता. शिवणयंत्राला त्यांचा पाठिंबा होता. म.गांधीचा विरोध यंत्राच्या वेडाला होता,यंत्राला नव्हे, आणि ते जे वेड आहे श्रम वाचविणा-या यंत्राचे.सुधारीत नांगर,तारायंत्र इत्यादींना त्यांचा विरोध नव्हता.

**४) वर्ग समन्वयाचे तत्व :-**

वर्ग कलाहाची कल्पना त्यांना हिंसक वाटत होती. उलट प्रत्येक वर्गाने दुस-याचे काय व महत्व ओळखून समन्वय साधावा आणि परस्पर शोषण सोडून घ्यावे असे त्यांचे मत होते.कृषी वृतीला प्राधान्य दयावे परंतू इतर कोणताच धंदा,व्यवसाय करणा-यांनी परस्परांना कनिष्ठ समजू नये. वर्ग युध्द हे भारतताच्या मुळ प्रकृतीशी विसंगत आहे. आपल्याला जर अहिंसेचा संदेश कळाला असेल तर भारतात वर्गयुध्द अपरिरहार्य नाही,ते टाळता येण्यासारखे आहे.हे सहज पटेल असे म्हणतात.वर्ग कलाहाच्या प्रश्नला माझे उत्त्तर विश्वस्तपण आहे,असे त्यांनी सांगितले आहे.

गांधीजी म्हणतात की,समाजातील अनेक प्रश्न आपण स्वतःनिर्माण करतो. विशेषतःआर्थिक प्रश्न आपण स्वतःच निर्माण केले आहे. त्याचे कारण असे की आपण आपल्या गरजा अर्माद वाढवितो,जेव्हढया प्रमाणात गरजा वाढतात तेव्हढया प्रमाणात संपती संग्रह करण्याची प्रवत्ती वाढते. समाजावर याचे वाईट परिणाम होतात. व्यक्क्तिचे आणि समाजाचे मानसिक स्वास्थे बिघडते,संघर्ष वाढतात. अशा वेळी समाजातील समाजातील

सर्वात खालच्या स्तरावरील व्यक्तिला काय मिळते ते लक्षात घेउन आपण आपल्या गरजा निश्चित केल्या पाहिजेत. साधे जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर ते सर्व प्रश्न आपोआप सुटतील.

गांधीजींनी भांडवलदार आणि गरिब यात समन्वयासाठी -हदय परिवर्तनाचा मार्ग सांगितला आहे. आत्मक्लेषाचा मार्ग स्वीकारून श्रीमंतामध्ये परिवर्तन घडवून आणता येईल यावर त्यांचा विश्वास होता. संघर्ष आणि हिंसेच्या मार्गाने भांडवलदारी प्रवती नष्ट होणार नाही. त्यांना भांडवलदार नष्ट करायचे नव्हते तर भांडवलदारी प्रवृती नष्ट करायची होती. हिंसा आणि क्रांती ही प्रवृती नष्ट करण्याचा मार्ग नाही. त्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक जटील होतील. यासाठी समन्वयाची भूमिका महत्वाची आहे.

**५) ग्रामोद्योग :-**

हस्तव्यवसाय,कुटीरोद्योग इत्यादींचा त्यांच्या दृष्टिंने फार महत्व होते. ग्रामीण बेकारी आणि दारिद्र्य नष्ट होउन देशातील पैसा परदेशात जाणे बंद व्हावे म्हणुन,तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्वयंपुर्णता यावी यासाठी ग्रमोद्योगाला त्यांनी प्राधान्य दिले.खादी आणि चरखा यांना या कल्पनेत मध्यवर्तीस्थान आहे. गांधी म्हणतात ग्रामोद्योगाच्या याजनेत चरखा हे केंद्र बिंदू आहे. चरख्याचे चक्र हे सुर्याचे सोनेरीमंडळ असून अन्य ग्रामोद्योग हे त्या योजनेच्या नियमानुसार त्यांच्या भोवती फिरणारे गृह ठरतील. हिंदुस्थानातील सात लाख खेडी जीवंत ठेवायची असेल आणि सव सुधारणाच्या मुळाशी असणारी शांतता प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर सा-या हस्त व्यवसायाच्या केंद्रस्थानी आपण चरखा बसविला पाहिजे.

ग्रामोद्योगाच्या वस्तू वापरून आपन त्या उद्योगाचे पुनज्जीवन करीपर्यत आपल्याला खेडयांच्या प्रतिष्ठापनेचे साध्य सिध्द करता येणार नाही. खादी हा प्रमुख ग्रामोद्योग आहे. खादी ठार करा की खेडी आणि त्या बरोबरच अहिंसा ही ठार झालीच म्हणून समजा,असे ते म्हणत.

शेतीतूनच निर्माण झालेल्या कापसापासून,शेतीची इतर कामे करीत असतांना,घरीच सुत काढू न व चरख्यावर कापड विणून खादी तयार होत असल्याने शेतकारी आपला रिकामा वेळ कार्यात गुतंवू शकतो,द्रव्याजन करू शकतो. यामुळे अर्ध बेकारीची समस्या नष्ट होउन त्याची आर्थिक स्थिती सुधारते व निदान अन्न,वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजाच्या बाबतीत शेतकरी आण्णि खेडी स्वयंपुर्ण होतात. लाखो लोकांना त्यांच्या घरातून न हलविता,त्यांच्या गरजा भागविण्याचे साधन एकटा चरखाच पुरवू शकतो. खादी ही गरिबांना श्रीमंताच्या पाशापासून मूक्त करतो आणि वरिष्ठ वर्ग व सामान्य जनता यांच्यामध्ये एक नैतिक व आध्यात्मिक पाया निर्माण करते. श्रीमंतांनी गरिबापासून जे काही हिरावून घेतले असेल,त्यातील काही भाग तरी खादी गरिबांना परत मिळू न देते. सुशिक्षत लोकांनी केवळ खादी परिधान केली तरी त्याची गरिबा विषयी अनूकंपा प्रगट होईल. असे खादीचे आध्यात्मिक व आर्थिक महत्व आहे.आंतर प्रादेशिक व आंतरराष्टीय व्यापारास त्यांचा विरोध होता.

**६) स्वदेशी :-**

लोकमान्यांनी मांडलेल्या स्वदेशी कार्यक्रमाला गांधीनी फार जोमाने पुढे चालविले. ज्या उदयोगाशिवाय गलितमात्र होईल अशा भारतातील उदयोगातुन निर्माण होणा-या वस्त मुळीच न वापरणे म्हणजे स्वदेशी होय. परंतू स्वदेशी हे नैतिक साधन असून बहिष्कार राजकीय आहे .परदेशी कापड अजिबात न वापरणे फक्त खादीच वापरणे हे यात महत्वाचे होय.

७) व्यवसायासंबंधी विचार :-

म.गांधी जातीव्यवस्थेच्या विरूध्द होते पण त्यांनी आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते , प्रत्येकाने आपल्या वारसागत व्यवसाय करावा. त्यामुळे औद्योगिकरणात निमाण स्पर्धेवर आपोआप नियंत्रण बसेल. जास्तीचा नफा कमविण्याची प्रवत्ती त्यामुळे कमी होईल. पिढयान पिढया चालत आलेल्या व्यवसायामुळे कार्यकूशलता वाढेल. म.गांधीच्या मते कोणताही व्यवसाय कमीप्रतीचा नाही.सर्व व्यवसाय सारख्याच प्रतिष्ठेचे आहेत. व्यवसायाच्या बाबतीत उच्च- नीच असा भेद त्यांना मान्य नव्हता. व्यवसासाठी कष्ट करणे कमीपणाचे मानले जाऊनये.शारीरिक कष्ट प्रतिष्ठेचे मानले पाहिजे. भाकरीसाठी कष्ट हे प्रमय त्यांनी मांडले.

**निष्कर्ष :-**

म.गांधीचे आथिक विचार आजच्या युगात अत्यंत महत्वाचे आणि उपयागी आहेत. भारतीय अथव्यवस्थची पुनर्रचना करण्यासाठी त्याच्या आर्थिक धोरणाचा निश्चित उपयोग होउ शकतो. त्यांच्या आर्थिक विचारात मोठे उदयोग आणि ग्रामोदयोग,विश्वस्ताची कल्पना,वर्ग समन्वयाची कल्पना,यंत्र युगासंबंधीचे विचार भारतीय परिस्थिती लक्षात घेउन मांडलेले आहेत. भारतीयांनी यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे.

**संदर्भ :-**


१) प्रा.मुठाळ राम,राजकीय सिध्दात अणि राजकीय विचार,अंशुल पब्लीकेशन नागपुर,व्दितीय आवृती जूलै १९९३

२) देवगांकर श.गो.(डॉ),राजकीय विचारवंत,साईाथ प्रकाशन नागपुर,प्रथम आवृती जुलै २००७

३) श्रंगारपुरे अरविंद (डॉ),समग्र भारतीय पाश्चत्य राजकीय विचारवंत,विदयाप्रकाशननागपुर,जाोवारी २०१४

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# ''म.गांधी यांचे शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विचार'

**प्रा.डॉ. महानंदा श्रीराम राऊतखेडकर**
**संशोधिका**
(समाजशास्त्र विभाग प्रमूख) , शरदचंद्र महाविद्यालय नायगांव (बा) , ता.नायगांव (खै.) जि.नांदेड

---

**प्रस्तावना :**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात म.गांधी यांनी दिलेले योगदान अगदीच अतुलनीय अशा स्वरुपाचे आहे. किंबहूना भारतीय स्वातंत्र्यलढ्याला लोकाभिमुख बनवून त्याचे रुपांतर जनआंदोलनात करणारे म.गांधी हे सर्वच भारतीयांसाठी एक आदर्श व्यक्तिमत्व आहे. खरे तर म.गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबरोबर सामाजिक, आर्थिक, अध्यात्मिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील त्यांनी मांडलेले विचार हे मानवी हिताच्या दृष्टिकोनातून अगदीच मौलिक अशा स्वरुपाचे आहेत, त्यांचे व्यक्तिमत्व प्रचंड लोकविलक्षण होते, त्यांच्या विचाराला प्रत्यक्ष कृतीशीलतेची जोड होती, म्हणूनच भारतीय समाजमनाबरोबर संपूर्ण विश्वालाही गांधीवादी विचारधारेने प्रभावीत केले आहे असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. म.गांधी हे सत्याचे नम्र उपासक होते, ते अहिंसेचे प्रचंड समर्थक होते. राजकारण असो की समाजकारण अथवा धर्मकारण या कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही प्रकारची हिंसा त्यांना मान्य नव्हती. गांधीजी हे शांततावादी विचारधारेचे व्यक्ती होते, विशेष म्हणजे ते एक कार्यप्रवण पुरुषही होते. त्यांच्या कार्याचा आवाका प्रचंड व्यापक होता. भारतीयांचे स्वातंत्र्य हे एकमेव श्रेष्ठ उद्दिष्ट त्यांच्यापुढे असले तरीही ते सामाजिक अंगाने अनेक विषयात सखोल चिंतन केलेले दिसून येतात. विशेषतः समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, स्त्री समस्या, अस्पृश्यता, धर्मनिरपेक्षता, आहार–विहार इत्यादीबाबतही त्यांचे चिंतन अगदीच मुद्देसुद आहे. तसेच त्यांचे लेखन हे आत्मभान जागृत करणारे असेच आहे. विशषेतः भारतीय समाजजीवनातील अगदीच प्रमूख चारही प्रश्नावर त्यांनी केलेले विवेचन, सुचवलेल्या कांही उपाययोजना आम्हास आदर्श जीवनाकडे जाण्यास भाग पाडतात. संमग्र क्षेत्रात एवढे व्यापक चिंतन, लेखन, कृतीशीलता इत्यादी सद्गुण त्यांचेकडे असूनही गांधीजीनी आपला निर्णय चूक कि बरोबर आहे, योग्य आहे की अयोग्य आहे याची सुध्दा एक मार्मिक कसोटी सांगितलेली आहे. तीचा अर्थ पूढील वाक्यातून सहजच दिसून येतो, 'समाजातील सर्वात खालच्या पायरीवर असणाराचे ज्यात भले तो निर्णय योग्य समजावा'.[1] यावरुन एक बाब प्रकर्षाने जाणवते का ते म्हणजे अंतीम माणसाचा उदय झाला पाहीजे. सबब म.गांधी यांच्या आर्थिक, धार्मिक, राजकीय विचारात 'मानवी हीत' व याही पुढे जाऊन विचार करता 'सर्वोदयी' तत्वज्ञानाचे दर्शन घडते, मानवी प्रतिष्ठा हे त्यांच्या विचाराचे केंद्रस्थान होते. किंबहूना सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचार्य आणि अपरिगृह या सारख्या महान नैतिक विचारांवर त्यांची विचारसरणी आधारलेली दिसून येते. एकंदरीतच त्यांच्या चारही समग्र विचारांचा आढावा घेतांना आणि संबंधीत विचाराचे संशोधनात्मक उहापोह करतांना प्रस्तुत शोधनिबंधासाठी पूढील प्रमाणे संशोधन आराखडा तयार केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये म.गांधी यांच्या शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विचारांवर चिंतन करुन त्याचा धावता आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) म.गांधीच्या शैक्षणिक व आर्थिक विचारांचा आढावा घेणे.
2) म.गांधीजींच्या धर्मविषयक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
3) म.गांधी यांच्या राज्यविषयक विचारातील विविध संकल्पनेचे संधोधनात्मक अध्ययन करणे.

**संशोधन समस्या :**

म.गांधी यांच्या चारही तात्वीक विचारासमोर असलेल्या विविध समस्यांचे अध्ययन करणे.

**गृहितके :**

1) म.गांधी यांनी एकूणच व्यक्तिमत्व विकास, चारित्र्य, राष्ट्रप्रेम, व्यवहारपयोगी शिक्षणाचे समर्थन केले होते, त्याचे हे विचार नयी तालीमया नावाने प्रसिध्द आहेत.
2) म.गांधीच्या आर्थिक विकासात स्वयंपूर्ण खेडी, लघूउ़द्योग, यांत्रिकरणाला विरोध, श्रमप्रतिष्ठा, कृतीप्रवणता, विश्वस्त कल्पना, सर्वोदय, स्वदेशी, खादी, ग्रामोद्योग इत्यांदींना प्राधान्य आहे.

3) म.गांधीयांच्या धार्मिक विचारात धर्म आणि राजकारणाशी सांगड असून त्यांनी सत्य, अहिंसा या बरोबर त्यांच्या धार्मिक विचारात मानवतावाद अधिक स्पष्ट दिसतो. नितीमत्तेचे व सत्याचे आचरण म्हणजे धर्म होय.

4) म.गांधीजी यांच्या राजकीय विचारात अराज्यवाद, आदर्शराज्य, रामराज्य, ग्रामस्वराज्य, लोकशाही, आंतरराष्ट्रीयवादाचा पुरस्कार, सत्तेचे विकेंद्रीकरण इत्यादी मौलिक विचार त्यांनी मांडलेले दिसून येतात.

**संशोधनाचा हेतू :**

प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधी यांच्या एकूणच अतिशय महत्वपूर्ण असणा—या चिंतनातील त्यांच्या समग्र विचारांचे संशोधनात्मक अध्ययन करुन त्या तत्वचिंतनावर थोडक्यात प्रकाश टाकणे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रकाशित साधनांचा वापर केला आहे. शक्यतो विश्वासदर्शक तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

**अभ्यासाची पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानताना संशोधनाच्या गरजेप्रमाणे ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषनात्मक पध्दतीचाही वापर करण्यात आला आहे.

म.गांधी यांच्या एकूणच विचारातील चिंतन, लक्षा घेतले तर त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विचार व त्यानुषंगाने त्यांनी केलेले चिंतन हे मौलिक स्वरुपाचे आहे. एव्हाना ते एक कृतीशील विचारवंत, सत्य, अहिंसेचे नम्र उपासक होते, भारतीय स्वातंत्र्याबरोबर एक आदर्श समाज कसा निर्माण होईल ? यावरही त्यांच्या चिंतनातून कांही बाबी पुढे आलेल्या आहेत. विशेषतः त्यांनी केलेले सर्व क्षेत्रातील चिंतन आणि विचारधारा लक्षात घेतली तर 'मानवता' केंद्रीत तत्वज्ञान गांधीजींच्या विचारधारेत आढळते. सर्व क्षेत्रातील त्यांच्या चिंतनाच्या विचाराच्या कक्षा प्रचंड रुंदावलेल्या होत्या, त्यामुळे साहजिकच समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, सर्वाप्रती शिक्षण, सत्य, अहिंसा, ग्रामसुधारणा, खेड्यांची स्वयंपूर्णता, आदर्शराज्य निर्माण करताना सर्वोदयी, अंत्योदयी समाज या सारख्या मानवतावादी विचारधारा केंद्रीभूत मानून म.गांधीनी आयूष्यभर त्यासाठी कष्ट घेतले. नैतिकता, साधनसुचिता, निःस्वार्थ समाजाभिमुख व्रतसेवा ही म.गांधी यांच्या विचारांची ओळख करुन देतात.

उपरोक्त प्रमाणे त्यांचे विचार, त्यातील मौलिक तत्वज्ञान आणि म.गांधी यांच्या शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विचाराचा आढावा घेताना त्यांचे संपूर्ण विचार या ठिकाणी पुर्णतः प्रकट करता येणे कदापी संभव नाही. कारण गांधीजीचे तत्वज्ञान हे विशाल सागरा सारखे आहे. त्याची व्याप्ती प्रचंड आहे. परंतु शोधनिबंधाची मर्यादा लक्षात घेता शक्य असेल एवढा आढावा मांडण्याचा प्रयत्न केला आहे, क्रमशः त्यांच्या एकूणच विचारातील म.गांधी यांचे शिक्षण विषयक विचार व्यक्त करताना । शैक्षणिक विचाराबाबतची त्यांची मते जाणून घ्यावी लागतात. किंबहूना त्यांच्या जीवनात नैतिकता आणि साधनशुचितेचा आग्रह होताच, विशेषतः द्वेषरहित सत्याग्रहाचा मार्ग, स्वदेशी, सामाजिक बांधिलकी यानुषंगाने विचार करता त्याचे विचार अगदीच नैतिकतेला पुर्णतः धरुन आहेत, असेच मांडावे लागेल, त्यापैकीच त्यांच्या शिक्षणविषयक विचाराचा वेध घेताना एक स्वयंपूर्ण, स्वयंशिस्त आणि आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी शिक्षणाचा विचार केला होता. किंबहूना शिक्षण देण्याचा वा घेण्याचा हेतू निर्मळ असावा, मातृभाषेतून शिक्षणाची व्यवस्था व्हावी, किंबहूना चारित्र्य, राष्ट्रप्रेम, वाढवितांना श्रमप्रतिष्ठा जोपासणारे शिक्षण असावे हा विचार त्यांच्या चिंतनात सापडतो. ''प्राथमिक शिक्षण विनामुल्य व सक्तीचे असावे, प्राथमिक शिक्षण हे वयाच्या 7 व्या वर्षापासून ते 14 वर्षापर्यन्त देण्यात यावे.''[2] हा विचार अगदीच महत्वाच्या स्थानी आहे. सबब त्यांच्या शिक्षण विषयक विचारात प्राथमिक शिक्षणाला अगदीच महत्वाचे स्थान आहे. शिक्षण हे केवळ पोपटपंची असता कामा नये. आचार, विचार, व्यवहार या सर्व बाबी शिक्षणातून पुढे आल्या पाहीजेत असा त्यांचा कटाक्ष होता. बुनियादी शिक्षण, नयी तालीम असे शब्दप्रयोग त्यांच्या शिक्षण विषयक विचारात आढळून येतात, खरे तर त्यामागची व्यापक भावना समजून घेणे महत्वाचे आहे. ग.गांधी यांचा शिक्षण विषयक विचार हा एका बाजूला म.फुले यांच्या शिक्षणाविषयक धारणांचा विकास होता, तर दुस—या बाजूला वसाहतवादी व भांडवलशाही समाजातील शिक्षण पध्दतीची ती कठोर समिक्षा होती.[3] हे सुध्दा समजून घेणे महत्वाचे आहे. राष्ट्रीय शिक्षणाला त्यांनी महत्व दिले, शिक्षणातून, शरीर, बुध्दी, —हदय, मन यांचा विकास होतो. शारीरिक श्रम आणि आरोग्य यांचा संबंध जोडून श्रमाची प्रतिष्ठा राखणारे शिक्षण त्यांना हवे होते असे दिसून येते. वास्तविकपणे विचार केल्यास सुप्रसिध्द प्राचीन राजकीय विचारवंत तथा शिक्षण विषयक सिध्दांत मांडणारे प्लेटोपासून ते आधुनिक काळापर्यन्तच्या प्रवासातील अनेक विचारवंतानी शिक्षणाचा विचार करताना मनाचा, बुध्दीचा, शरिराचा विचार केला आहे. या सा—या पार्श्वभूमीवर म.गांधी यांचे शिक्षण विषयक विचार आम्हासाठी प्रेरणादायी आहेतच. गांधीनी 'नयी तालीम'

चा विचार सांगताना आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडला, ज्याचा संबंध शिक्षणाच्या अर्थकारणाशी आहे. त्यांच्या मते 'नयी तालीम' ही आर्थिक दृष्ट्या स्वालंबी असली पाहीजे.[4]

उपरोक्त प्रमाणे म.गांधी यांच्या शिक्षणविषयक विचाराचा उहापोह करतांना त्यांचे आर्थिक विचारही महत्वाचे वाटतात. त्यांचे आर्थिक, विचार हे सत्य अहिंसा, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय, विश्वस्त कल्पना, ग्रामस्वराज्य स्वयंपूर्ण खेडी, अवजड यांत्रिकीकरणाला विरोध, लघुउद्योग हस्तव्यवसाय, खादीचा वापर, स्वदेशी, कृतीप्रवणता इत्यादी बाबी त्यांच्या विचारातून पुढे येतात. विशेषतः व्यक्तीस्वातंत्र्याबरोबरच समाजवादाचीही भलावण गांधीजीनी केल्याचे दिसून येते. किंबहूना देशाच्या आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे असा त्यांचा आग्रह होता.[5] म.गांधी यांच्या आर्थिक विचाराच्या दृष्टिने खेडी सुधारली पाहीजेत असा त्यांचा आग्रह होता. खरा भारत हा खेड्यात नांदतो म्हणून खेड्याकडे चला असा नारा दिला देशाचा विकास होण्यासाठी प्रत्येक खेडे हे आर्थिक विचारावर टॉलस्टाय व रस्किन यांच्या विचारांचा स्पष्ट प्रभावही दिसून येतो. शारिरीक व बौध्दीक श्रमाला सारखे महत्व देतानाच ग्रामोद्योग, कुटीरउद्योग यांचे समर्थन केले. 'ना श्रम ना भोजन' श्रम करणा—यालाच भोजनाचा अधिकार असावा असे विचार त्यांच्या आर्थिक विचारातून पुढे येतात. त्यांच्या विचारात 'विश्वसत' ही संकल्पना सुध्दा तेवढीच महत्वाची आहे. माणसाच्या पायाभूत गरजाचाही विचार त्यांनी मांडला ''मानवी जीवनाचे, मनुष्यपणाचे साफल्य हे सत्य, शिव व सुंदर यांची उपासना करण्यात आहे.''[6] एकंदरीतच म.गांधी यांच्या शैक्षणिक, आर्थिक विचाराचा वेध घेतांना त्यांचे धर्मविषयक विचारही तेवढेच प्रभावी आहेत. विचाराचा वेध घेतांना त्यांचे धर्मविषयक विचारही तेवढेच प्रभावी आहेत. विशेषतः राजकारणाचे अध्यात्मीकरण व्हावे. हा विचारही त्यांच्या चिंतनात पुढे येतो. म.गांधी यांच्या धार्मिक विचारात सर्वधर्म समभाव हा आग्रही मुद्दा पुढे येतो. इतर सर्व धर्माचा आदर ही त्यांची शिकवण होती, खरे तर धर्म ही एक मनुष्याचे आचरण कसे असावे या बाबतची एक पध्दती आहे, परंतु धर्माची अशी लहान संज्ञा गांधीना मान्य नव्हती, त्यांची धर्म विषयक संकल्पना अधिक व्यापक आहे. ''धर्म हा स्वतःचे स्वार्थ व हितसंबंध सांभाळण्यासाठी नसतो, तो स्वार्थ, लाभ, दोष यातून मुक्त होण्यासाठी असतो असे गांधी मानत, त्यांच्या धर्माच्या कल्पनेत आतल्या आवाजाला महत्व आहे.''[7] म.गांधीनी सत्याच्या शुध्द स्वरुपाला धर्म मानला आहे, त्यांच्या जीवनात नैतिकतेला, इश्वरावरील श्रध्देला मोलाचे स्थान होते. त्यांचा 'वैश्विक धर्म' ही संकल्पना आजही सर्वांसाठी मार्गदर्शीत करते. ''हवा पाण्यावाचून मी जगु शकेन, परंतु इश्वरावाचून नाही'', या दोन ओळी त्यांचे धर्म विषयक चिंतन सांगून जातात. गांधीजीच्या धर्म विषयक विचाराप्रमाणे त्यांचे राजकीय विचारही आदर्शवादी विचारसरणीची कास धरतात. एव्हाना त्यांचे राजकीय विचार हे स्वार्थी वृत्ती, सत्तालोलूप धोरणाचा त्याग करावयास शिकवितात, त्यांच्या राजकीय विचारात 'राजकारणाचे अध्ययात्मीकरण' धर्म आणि राजकारण यांची सांगड, लोकशाही—जीवनमार्ग, अराज्यवाद, पंचायत राज, आदर्श राज्य—रामराज्य, अहिंसक लोकशाही, सत्याग्रह, खेडी सुधारणा, श्रमप्रतिष्ठा, स्वराज्य, ग्रामस्वराज्य इत्यादीमधून त्यांनी मांडलेल्या राजकीय विचाराचा मागोवा घेता येतो. त्यांनी आपल्या चिंतनात आदर्श राज्याच्या रचनेला महत्वाचे स्थान दिले. आदर्श राज्यात आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरण राहिल, किंबहूना अहिंसक लोकशाहीचे समर्थन करताना त्यांनी दंडशक्ती हा राज्याचा पाया असणार नाही, असे सूचीत केले. ''जे सर्वात कमी शासन करते ते सर्वोत्कृष्ठ शासन होय.'' ही थोरोंची कल्पना स्वीकारली आहे.''[8] वर्णव्यवस्था, अपरिगृह, तुरुंग पध्दती, विश्वस्त पध्दती, जनहितासाठी राजकारण, मर्यादीत राजसत्तेच्या आस्तित्वाला मान्यता, लोकशाहीचा स्वीकार इत्यादी मुद्येही त्यांच्या राजकीय विचारातून पुढे येतात. त्यांनी स्वराज्याला रामराज्य असे नाव दिले तरी ते गोरगरिबांचे, ख—या लोकशाहीचे, धर्मनिरपेक्ष अशा राजवटीचे ते उत्तम उदाहरण होते, परंतु यासाठी राजकीय स्वातंत्र्य आवश्यक आहे. राजकीय स्वातंत्र्य, आर्थिक, नैतिक सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्य अशा चार कोनांच्या स्वराज्य चौरसांचा कोणताही एक कोण बिघडला तरी चौरस पुर्णपणे विस्कटतो हे गांधीच्या विचाराचे सार आहे.[9] एकंदरीत त्यांच्या राजकीय विचारात राजकीय स्वातंत्र्य स्वराज्यासाठी आवश्यक असल्याचे सांगतात. विशेषतः ''संसदीय लोकशाही ही सामान्य लोकांच्या हितास पोषक अशी राज्यपध्दती आहे.'' या बद्दल गांधीजीच्या मनात शंका नव्हती.[10] इतर सर्व विचाराप्रमाणे गांधीजीच्या राजकीय विचारात स्वराज्य, अहिंसक लोकशाही, नैतिकता, विकेंद्रीकरण रामराज्य, स्वयंपूर्ण खेडी आणि पंचायतराज यावर त्यांचे चिंतन मौलिक अशा स्वरुपाचे आहे.

**सारांश /निष्कर्ष :**

'सत्य आणि अहिंसेच्या' मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारे म.गांधी यांचे सामाजिक क्षेत्रातील चिंतनही बहूमोल असेच आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या उदिष्टांखेरीज येथील समग्र परिस्थितीचे सुक्ष्म अध्ययन करुन सर्व प्रश्नांची उकल करण्याचा त्यांनी एक व्यापक प्रयत्न केला, किंबहूना प्रत्येक प्रश्नांमधून बाहेर पडण्याचा आणि सर्वांना परिपोषक होईल असा विधायक मार्गही त्यांनी सुचविला. खरोखरच त्यांचे शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक,

राजकीय क्षेत्रातील विचार हे प्रचंड व्यापक, अथांग सागराप्रमाणे असून त्यात नैतिकता, निस्वार्थ समाजाभिमुखता, मानवता यांच्या हिताचे तत्वज्ञान सापडते.

## संदर्भ ग्रंथ सूची


1) प्रा.कल्याणकर बा.ह.(संपा.), पं.जवाहरलाल नेहरु व्यक्ती आणि कार्य,(मे 2002), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. 196.
2) डॉ.वाडकर प्रभा, पश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत,(ऑग. 2011), अरुणा प्रकाशन, लातूर, पृ. 213.
3) सुमंत यशवंत, म.गांधीची विचारदृष्टी, (एप्रिल 2016), साधना प्रकाशन, पुणे, पृ. 18.
4) सुमंत यशवंत, पुर्वोक्त, पृ. 23.
5) डॉ. रायखेलकर ए.आर. 'आर्थिक विचारांचा इतिहास',( जून 2005), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. 254.
6) व्होरा राजेंद्र व अन्य,(संपा.), समाजप्रबोधन पत्रिका,(मार्च 2003), नर्मदा प्रिंटर्स एरंडवन, पुणे, पृ. 6.
7) कोकंडाकर जे.आर., गांधी विचार : नरहर कुरुंदकरांचा दृष्टिकोण,(2015), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. 33.
8) सागर के.(संपा.), भारतीय राजकीय विचारवंत,(2002), अनिरुध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. 259.
9) डॉ.भोळे भा.ल., भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार,(1989), पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर, पृ. 91.
10) कुलकर्णी वी.वाय, भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृ. 138.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधींच्या दक्षिण आफ्रिकेतील कार्याचे राजकीय अध्ययन

**विरभद्र गुरप्पा स्वामी**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.

---

महात्मा गांधी यांचे नाव मोहनदास करमचंद गांधी, त्यांचा जन्म 02 ऑक्टोंबर 1869 गुजराथ मध्ये पोरबंदर येथे तर मृत्यू 30 जानेवारी 1948 रोजी दिल्ली येथे झाला. ते एक भारतीय वकील, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ता व लेखक होते. ते ब्रिटीश सत्तेच्या विरूद्ध चालविलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. ते भारताचे राष्ट्रपिता म्हणून ओळखले जातात. विशेष म्हणजे त्यांचा दक्षिण आफ्रिकेतील वांशिकभेदभाव यांच्या विरूद्धचा संघर्ष जगाला प्रेरणा देणारा असाच आहे.

दक्षिण आफ्रिकेचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. नाताळ मध्ये ऊस आणि कॉफी यांचे सुंदर पिक येत होते. इंग्रजांना हे पिक मोठ्या प्रमाणात घ्यावयाचे होते त्यावेळी त्यांची 50 एक कुटुंबे वास्तव्यास होती. तेव्हा त्यांना मोठ्या प्रमाणात मजुरांची गरज भासली त्यावेळी तेथील मूल निवासी **हबशी** लोकांची मजूर म्हणून हवी तेवढी मदत मिळाली नाही. तेव्हा कांही लोकांनी त्यावेळच्या हिंदी सरकारशी म्हणजेच भारताशी पत्राद्वारे मजुजांची मागणी केली. तेव्हा भारतातने नाताळची मागणी मान्य केली. हिंदी मजुरांची पहिली बोट इ.स. 16 नोव्हेंबर 1850 रोजी नाताळात पोहोंचली. हिंदी मजुरांच्या अशा अनेक बोटी नाताळात पोहोंचल्या आणि या मजुरांची अवस्था गुलामासारखीच झाली होती. गांधीजी लिहितात **मजुरांना हिंदी दलालांनी फसविले, हे लोक भोळेपणाने नाताळला गेले होते त्यांची धर्म व नैतिकता यांची बंधने तुटून गेली**. हे मजूर त्यावेळी अग्रीमेंटवर गेलेले मजूर म्हणून ओळखले जायचे त्यावरून ते स्वत:ला **गिरमिटीया** म्हणू लागले. गिरमिटीया हे पाच वर्षांच्या कराराने जात असत. पाच वर्षानंतर ते मजुरी करायला बांधलेले नसत. स्वतंत्र मजुरी अथवा व्यापार करायचा असेल आणि नाताळमध्ये स्थायिक व्हायचे असेल तर त्यांना काम करण्याचा हक्क होता या हक्क ाचा उपयोक कित्त्येकांनी केला आणि कित्येक भारतात परतले. जे नाताळ मध्ये राहिले ते **फ्रि इंडीयन्स** या नावाने ओळखले जात तरी त्यांच्यावर अंकुश होतेच.

महात्मा गांधींचा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील व राजकारणातील प्रवेश जाणीवपूर्वक झालेला नव्हता किंवा ते त्यांच्या आयुष्याचे स्वप्नही नव्हते. गांधींनी मुंबई येथे वकीली व्यवसायाला सुरूवात केली परंतू त्यांना त्यात पाहिजे त्या प्रमाणात वकीली व्यवसायात यश मिळाले नाही. परिणामत: गांधींनी शिक्षकांची नोकरी मिळविण्यासाठी एका शाळेत अर्ज केला. परंतू त्यांच्याकडे विद्यापीठाचे पदवी नसल्यामुळे ती नोकरीही त्यांना मिळाली नाही. अखेर निराश होऊन राजकोटला परत आले. काठेवाडातील दादा अब्दुल्ला आणि कंपनीचे दक्षिण आफ्रिकेत कायद्याचे काम करण्यासाठी व तेथील त्यांच्या वकिलाला मदर करण्यासाठी गांधींना दक्षिण आफ्रिकेत वकीली व्यवसायासाठी व आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत निघाले. 1893 च्या मे महिण्याच्या अखेरीस गांधी दक्षिण अफ्रिकेतील दरबान या शहरी पोहोचले.

गांधीच्या विचारसरणीमध्ये सत्य, अहिंसा, अराज्यवाद, अपरिगृह, विश्वस्त संकल्पना, विकेंद्रीकरण अशा अनेक बाबींचा समावेश होतो. या सर्व विचारांची जडणघडण गांधीच्या दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांवर होणाऱ्या वर्णभेद, अन्याय, अत्याचार, गोऱ्यां साम्राज्यवाद्यांकडून काळ्यांची होणारी पिळवणूक, त्यांना दिली जाणारी अमानवीय वागणूकीतून गांधीच्या विचारसरणीची जडणघडण झाली. 1890-91 पासून जवळपास, दिडलाख हिंदी लोक दक्षिण अफ्रिकेचे रहिवाशी बनले होते. त्यांना असंस्कृत व जंगली म्हणून हिणवण्यात येत असे. नाताळ सरकारने विनंती केल्यामुळे हिंदुस्तान सरकारने त्यांच्याशी करार करून हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेत पाठवून दिले होते.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकातील एकीच्या अभावामुळेच साम्राज्यवादी गोऱ्यांकडून त्यांची पिळवणूक होत असल्याचे गांधीना दिसून आले. दक्षिण आफ्रिकेतील मजुरांची अवस्था तर अत्यंत हलाखीची होती. या मजुरवर्गांना इंग्रजलोक हमाल किंवा कुली म्हणून हिणवीत असते. हिंदी व्यापाऱ्यांना हमाल व्यापारी म्हणत तर गांधीना हमाल बॅरिस्टर म्हणून संबोधले जाऊ लागले. अशा अन्यायकारक, अत्याचारी वर्तनुकीस गांधीनी विरोध केला. वर्तमानकाळात देखील समाजव्यवस्थेतील स्पृश्य-अस्पृश्यतेला संविधानाने कायदा करुन बंदी घातलेली असली तरी परंतू भारतीयांमध्ये यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होतांना दिसून येत नाही. श्रीमंती आणि गरीबामध्ये निर्माण झालेली दरी कमी करण्यासाठी गांधीच्या विचारांची आवश्यकता आहे का ? हे अभ्यासने उपयुक्त ठरेल.

महात्मा गांधी नाताळची राजधानी मरिन्सबर्ग येथून प्रिटोरीयाला जाण्यासाठी रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवासास निघाले असता रेल्वे अधिकाऱ्यांनी त्यांना डब्यातून उतरण्यास सांगितले. पण गांधीने पहिल्या वर्गाचे टिकीट काढल्यामुळे डब्यातून उतरण्यास नकार दिला. तेव्हा त्यांच्या सामानासकट त्यांना रेल्वेच्या डब्यातून बाहेर फेकून देण्यात आले. दक्षिण अफ्रिकेतील गोऱ्या लोकांच्या या वर्तनुकीमुळे गांधीचे संपूर्ण जीवनक्रमच बदलुन गेला.

महात्मा गांधी रेल्वे आधिकाऱ्याच्या वर्तनुकीसंबंधी लेखी तक्रार रेल्वेच्या जनरल मॅनेजरकडे कले. प्रिटोरियास जातांना पुढील प्रवासात देखील गांधीना अत्यंत अपमानास्पद वागणुक मिळली. अनेक अपमान सहन करत गांधी प्रिटोरियाला पोहोचले. दादा अब्दुल्लाचे वकिल बेकर यांना भेटले. या दाव्यासंबंधी उत्तमातील उत्तम बॅरिस्टरचे सहकार्य मिळाले होते म्हणून गांधीची त्यांना फारशी आवश्यकता नव्हती. त्यांच्यावर माहिती गोळा करण्याची जबाबदारी टाकण्यात आली. वकिल बेकर हे ख्रिस्ती धर्म उपदेशकही होते.

दक्षिण आफ्रिकेतल्या प्रिटोरिया येथील पहिल्याच आठवड्यात गांधीनी तेथील हिंदी लोकांची सभा बोलावली. या सभेत बरेच मेमन व्यापारी उपस्थित होते. त्यांना उद्देशून गांधी म्हणाले, **व्यापारात सुद्धा सत्यधर्माचे पालक केले पाहिजे. परदेशात असतांना तर ती नीती**

**आवश्य पाळली पाहिजे. कारण तेथील तुमच्या वागणुकीवरून तुमच्या हिंदी देशबांधवांची सर्वसाधारण परीक्षा येथील लोक करीत असतात. तुम्ही हिंदू-मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, मद्रासी, पंजाबी, गुजराथी असे भेद करता कामा नयेत. तुम्ही हिंदी लोकांची अशी स्वतंत्र्य संस्था स्थापन केली पाहिजे. त्यासाठी मी माझा शक्य तितका वेळ तुम्हाला देण्यास तयार आहे.** अशा प्रकारची हिंदी लोकांची सभा गांधींनी दर महिन्याला घेवून हिंदी लोकांमध्ये एकीची भावना निर्माण केली. हिंदूस्थानचे विभाजन हे धार्मिक आधारावर झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात जातीच्या आधारावर, भाषेच्या कारणामुळे तर कधी सिमावादामुळे, भारतात दंगली घडून आल्या. दहशतवादामुळे व्यक्तीस्वातंत्र्यच संपुष्टात येवू लागले अशा परिस्थितीत पुन्हा गांधीच्या विचाराचे आवश्यकता निर्माण झालेली आहे.

दक्षिण आफ्रिकेत गांधींनी आपले वकिलीचे कौशल्य पणास लावून दादा अब्दुल्ला व तय्यब शेठ वरील फिर्याद लवादमार्फत आपसातील तडजोडीच्या माध्यमातून निकालात काढले कोणतेही संघर्ष विकोपाला न नेता त्यांची सोडवणूक मध्यस्तीच्या माध्यमातून करण्यावर गांधीचा भर होता. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांचे नागरीकत्वाचे हक्क संपूष्टात आणण्याचा प्रयत्न करीत होते. तेव्हा दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांनी त्यांना काही दिवस तेथेच राहण्याचा आग्रह केल्यामुळे गांधीनी एक महिना येथे राहण्याचे मान्य केले. गांधीनी सावर्जनिक कामासाठी कोणत्याही प्रकारची फी घेणार नाही तर सर्वाचा सेवक म्हणून राहीन असे जाहीर केले. हे कार्य करण्यासाठी अनेक माणसे आणि काही प्रमाणत पैसाही जमा करण्याची आवश्यकता गांधीनी सूचविली व यास सर्वांनी मान्यता दिली. हिंदी लोकांच्या मताधिकार विधेयका वरील चर्चा स्थगीत करावी यासाठी एका समितीची स्थापना केली. नाताळ लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या स्पिकरकडे अर्जसादर केले हा दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांनी सादर केलेला पहिलाच अर्ज होता. महात्मा गांधीनी अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा विविध प्रदेशामधील हिंदी लोकांमध्ये अस्मितेची व एकात्मतेची भावना निर्माण केली.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांवरील साम्राज्यवादी व्यवस्थेने केलेल्या अन्यायी, अत्याचारी कायद्यातून मुक्तता मिळवून देण्यासाठी गांधीनी नाताळच्या सुप्रीम कोर्टाकडून वकिलीची सनद मिळविली. त्याच बरोबर नाताळ इंडियन काँग्रेस नावाची कायमची संस्था निर्माण करण्यात आली. दक्षिण आफ्रिकेतील नाताळ प्रमाणेच ट्रान्सवाल व केपटाऊन येथेही इंडियन काँग्रेसची स्थापना करुन हिंदी लोकांच्या हिसंबंधाचे संरक्षण करण्याचे मान्य केले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी गांधीनी हिरवी पुस्तिका या नावाचे पुस्तक लिहिले.

गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात जाण्यासाठी निघाले तेव्हा तेथील लोकांची देणग्यांचा वर्षाव केला पण गांधींनी त्या देणग्यांचा तेथील लोकांच्या उपयोगासाठी विश्वस्ताची स्थापना केली. दक्षिण आफ्रिकेतील **फिनिक्स वसाहतीत गांधींनी इंडियन ओपीनिअन** नावाचे वृत्तपत्र गुजराथी व इंग्रजी भाषेतून सुरू केले. ट्रान्सवाला सरकारने केलेल्या कायद्यांविरूद्ध सविनय प्रतिकाराची चळवळ सुरू केले. त्यासच सत्याग्रह असे नाव देण्यात आले. सत्याग्रह असोसिएशन नावाच्या संस्थेतील सदस्याच्या माध्यमातून काळ्या कायद्यास विरोध केला. सत्याग्रहीच्या व कुटूंबीयांच्या मदतीसाठी टॉलस्टॉय फार्म ची निर्मिती केली. याच काळात इंग्लंडच्या वसाहतीतील अधिकाऱ्याच्या वर्तनुकीसंबंधीची गांधींनी लंडन ते दक्षिण अफ्रिकेच्या प्रवासादरम्यान हिंद स्वराजय नावाचा ग्रंथ लिहिला.

गांधीच्या सत्याग्रहास प्रतिसाद देण्यासाठी स्त्रीयाही सत्याग्रहात सहभागी झाल्या. मजुरांनी संप पुकारले. हिंदी लोकांच्या संपाची चौकशी करण्यासाठी एक समितीची नियुक्ती करण्यात आली. सदर समितीमध्ये हिंदी लाकांचा एकही प्रतिनीधी नसल्यामुळे गांधीनी त्यावर तीव्र नापसंती व्यक्त केली. सत्याग्रहींनी कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता तुरूंगवास पत्कारला परिणामत: हिंदी लोकांवरील अन्यायी कायदे रद्द करण्यासाठी इंडियन **रिलीफ बिल** नावाचा कायदा पास करण्यात आला. अनेक सत्याग्रहींची मुक्तता करण्यात आली.

***संदर्भ :***


1. *महात्मा गांधी, दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास, अनुवादक, पंढरीनाथ सावंत, मनोविकास प्रकाशन, पुणे, 2014*
2. *मोहनदास करमचंद गांधी, हिंद स्वराज्य, परंधाम प्रकाशन, पवनार-442111, वर्धा.*
3. *मोहनदास करमचंद गांधी, माझ्या स्वप्नांचा भारत, परंधाम प्रकाशन, पवनार-442111, वर्धा.*
4. *मोहनदास करमचंद गांधी, हिंदू धर्म म्हणजे काय ? अनुवादक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1995*
5. *ब्रिजमोहन हेडा, म.गांधी सत्याग्रहाच्या उंबरठ्यावर, पराग एजन्सीज, अकोला, 2005*
6. *धर्माधिकारी भाऊ, गांधी विचार दर्शन ग्राम स्वराज्य, महाराष्ट्र गांधी, स्मारक निधी, प्रकाशन, पुणे 1995*
7. *धर्माधिकारी भाऊ, गांधी विचार दर्शन, खंड (1,2), महारष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1995*

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# ''म.गांधी यांचे सत्य आणि अहिंसा याबाबतचे विचार''

**प्रो.डॉ. दादाराव दत्तराव पानपट्टे**
**संशोधक ए** (इतिहास विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक) शरदचंद्र महाविद्यालय नायगांव (बा)
ता.नायगांव (खै.) जि.नांदेड

---

**प्रस्तावना :**

भारतीय स्वतंत्र्य लढ्याच्या चळवळीतील एक अग्रगणी व्यक्तिमत्व, एव्हाना भारतीय स्वतंत्र्य लढ्याला लोकाभिमुख आंदोलनाचे स्वरुप देऊन देशाला स्वतंत्र मिळवून देणारे एक महान नेते म्हणून म.गांधी जगभर ओळखले जातात. भारताच्या स्वतंत्र्य आंदोलनासह येथील सामाजिक स्थिती, धर्म, समजासुधारणा, भारतीयांची आर्थिक परिस्थिती येथे असलेले विविध प्रश्न आदी अनुषंगाने त्यांनी केलेले चिंतन अत्यंत मौलिक स्वरुपाचे आहे. तसा तर भारतीय समाज आणि या समाजाची संस्कृती अतिशय प्राचीन आहे. जगभरातील लोकांना भारतीय संस्कृतीचे तिच्या मोठेपणाचे, सन्मानाचे आकर्षन आहेच ही बाब कोणालाही नाकारता येण्यासारखी नाही, याच मायभूमीत जगाला शांततेचा संदेश देणारे अनेक महान विचारवंताचा जन्म झालेला आहे, ज्यांनी विश्वाला एक कुटूंब मानून 'वसुधैव कुंटूबकम' ही शिकवण दिली, पुढच्या अनेक पिढ्यांना असे सुसंस्कार दिलेत. असे सुसंस्कार, सदविचार, शांतता, मानवी हीतांची जोपासना, सत्य, अंहिसा या सारख्या कृतीशील महान विचरांची देणगी देण्यामध्ये म.गांधी यांचे स्थानही अतिशय महत्वाच्या स्थानी आहे. त्यांच्या वेगवेगळ्या विषयावील मूलभूत विचारांना 'गांधीवादी' विचारधारा म्हणून ओळखाल्या जाते. किंबहूना सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या पाच नैतिक नियमांनाही त्यांच्या विचारसरणीत महत्वाचे स्थान दिसून येते. मानवी प्रतिष्ठा हे त्यांच्या विचारांचे महत्वाचे केंद्रस्थान होते. म.गांधीनी सत्य आणि अहिंसा यांना आपल्या विचारांचे मूलभूत तत्व मानले. सत्य हे त्यांच्या जीवनाचे साध्य होते तर अहिंसा हे सत्यापर्यंत पोहचण्याचे साधन होते. सत्य हा अहिंसेचा मूलभूत घटक आहे अहिंसाही सत्यावर आधारलेली असते त्यामुळे अहिंसेची सत्यापासून फारकत करता येत नाही. विशेषतः म.गांधी यांची ईश्वरावर अपार श्रध्दा होती म्हणूनच त्यांनी सत्य आणि ईश्वर यांचा संबंध जोडला आहे. ते म्हणतात, ''केवळ ईश्वर सत्य आहे म्हणून भागणार नाही. सत्य हाच ईश्वर आहे''[1] यावरुन म.गांधी यांचे सत्य आणि अहिंसा या बाबत नेमकी विचारधारा व या विचारधारेची शुध्दता, यातील मानवता, सत्याची शिकवण, सत्य आणि आहिंसेचा व्यापक अर्थ, इत्यादी विचारही म.गांधी यांच्या समग्र विचारात दिसून येतात.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये म.गांधी यांच्या 'सत्य आणि अहिंसा' या विचाराबाबतचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) म.गांधीना अभिप्रेत असलेल्या 'सत्य' या संकल्पनेचे संशोधनात्मक अध्यन करणे.
2) म.गांधीच्या विचारातील 'सत्य आणि अहिंसा' या मूलभूत संकल्पनेचा आढावा घेणे.
3) सत्य आणि अहिंसेच्या तत्वज्ञानाचा चिकित्सक अध्ययन करणे

**संशोधन समस्या :**

'सत्य आणि अहिंसेच्या' विचाराची अथवा तत्वज्ञानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना त्यापुढे कांही समस्या निर्माण होतात काय ? याचा आढावा घेणे.

**गृहितके :**

1) म.गांधीचे संपुर्ण सत्याग्रहाचे तत्वज्ञान हे 'सत्य आणि अहिंसा' या प्रमुख दोन परमतत्वावर आधारीत आहे.
2) म.गांधीनी सत्य आणि अहिंसेला आपल्या विचाराचे मूलभूत तत्व मानले, किंबहूना सत्य हे त्यांच्या जीवनाचे साध्य होते तर अहिंसा हे सत्यापर्यन्त पोहचण्याचे साधन होते.
3) गांधीजी सत्याला परमेश्वर मानत, सत्याचा शोध म्हणजे परमेश्वराची प्राप्ती तर अहिंसा म्हणजे लोभ, स्वार्थ, राग इत्यादीद्वारे इतरांना शारिरीक किंवा मानसिक दुःखापत अथवा इजा न करणे होय.
4) सत्य आणि अहिंसा हे एकमेकांना पुरक असून अहिंसेचे तत्वज्ञान हे म.गांधीनी जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे.
5) म.गांधी सत्याचे नम्र उपासक होते, त्यांची अहिंसा सकारात्मक सर्वव्यापी होती, म्हणूनच गांधीजीनी अहिंसेचा पुनरुच्चार केला व भारताला रक्तपाताशिवाय स्वातंत्र्य मिळवून दिले.

**संशोधनाचा हेतू :**

प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधी यांच्या महत्वपूर्ण विचारातील 'सत्य आणि अहिंसा' या विचारांचे संशोधनात्मक अध्ययन करुन त्यावर यथायोग्य प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**तथ्य संकलन :**

संशोधनाचे क्षेत्र कोणतेही असले तरीही, संशोधन कार्यात तथ्थांची विश्वासार्हता महत्त्वाची असते. म्हणून अशा विश्वासदर्शक तथ्थांचे संकलन करण्यात येऊन प्रस्तूत शोधनिबंधाकरिता प्रलेखीय साधनांचा वापर करण्यात आला असून संबंधीत शोधनिबंधात प्रकाशित अशाच साधनांची निवड केली आहे.

**अभ्यासाची पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानत असतांना संशोधन व शोधनिबंधाच्या गरजेप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी ग्रंथालयीन, ऐतिहासिक, विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा स्वीकार करण्यात आला आहे, संशोधकाने उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधन पध्दतीचा वापर करुन, तसेच संबंधीत संशोधन आराखडा मध्यवर्ती मानून संशोधन शिर्षकाच्या अनुषंगाने व प्रस्तुत शोधनिबंधाच्या बाबतीत पुर्नतः विचार करुन संबंधीत विषयाप्रती पुढील बाबीवर विश्लेषन केले आहे.

'सत्य आणि अहिंसा' हे म.गांधी यांच्या विचारातील अत्यंत मूलभूत असे मानवतावादी तत्वज्ञान आहे. असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही, किंबहूना म.गांधी यांनी मांडलेले तत्वज्ञान हे केवळ राजकीय स्वरुपाचेच नाही तर, भारतीय संस्कृती, परंपरा, विचार, मुल्य एव्हाना येथील सर्व क्षेत्राशी निगडीत अशा समग्र तत्वज्ञानाची ओळख म. गांधी यांच्या विचारात स्पष्टपणे दिसून येते. मानव प्रतिष्ठा हे त्यांच्या विचाराचे केंद्रस्थान होते. विशेषतः रस्कीनच्या विचारांचाही त्यांचेवर प्रभाव होता. म्हणूनच त्यांची सर्वोदयाची संकल्पना अत्यंत महत्वाची वाटते. सत्य आणि अहिंसा या तत्वज्ञानाबरोबर म.गांधीनी ग्रामस्वराज्य, विश्वस्त, स्वयंपूर्ण खेडी, सत्याग्रह, आदर्शराज्य, श्रमप्रतिष्ठा, कृतीप्रवणता, विश्वबंधुता, स्वदेशी, ग्रामोद्योग, रामराज्य इत्यादी बाबत त्यांनी मांडलेले ठळक विचार अगदीच महत्वाचे आहेत. यातील सर्वाधिक महत्वाचे म्हणजे, अन्यायाचा प्रतिकार हा अहिंसेच्या, सत्याच्या व शांततेच्या मार्गने करता येतो हा विचारच त्यांनी मांडलेला नाही, तर त्यास प्रत्यक्ष अनुरुप अशी कृती करुन प्रत्यक्षात आणले होते, चांगल्या अनुरुप तत्वाला प्रत्यक्ष व्यवहारात आणणारे म.गांधी हे एक महान कृतीशील विचारवंत होते. सर्वांनी कष्टकरी व्हावे, उच्चनिच्च भेदभाव टाकून देऊन, सर्वाशी बंधुभावाने वर्तावे, त्या मार्गाने समाज एकमय बनावा ही म.ज्योतिबा फुले यांची शिकवण म.गांधीनी शंभर टक्के आपली केली होती. ही शिकवण टॉलस्टॉय व रस्किन यांच्या लेखनातून त्यांनी आत्मसात केली होती हा योगायोगाचा भाग होय. साध्य–साधन विवेक हा गांधीच्या विचाराचा दुसरा विशेष होय. यातूनच त्यांचा अहिंसेचा व सत्यागृहाचा विचार आकारास आला.[2]

'सत्य आणि अहिंसा' या मौलिक विचाराबाबत म.गांधीनी केलेले चिंतन हे अतिशय प्रगल्भ असे होते. सत्य आणि अहिंसा या दोन्ही विचारापैकी क्रमशः म.गांधी प्रणीत 'सत्य' या बाबतचा विचार करतांना म.गांधीनी सत्याला आपल्या जीवनाचे साध्य मानले होते. सत्य म्हणजे मानवी मनाच्या अंतःकरणाला जे कांही जाणवते व सद्सद् अशा विवेक बुध्दीने बुध्दीला जे पटते तेच त्याचे सत्य अशा सत्याची ख–या अर्थाने ज्याला आराधना करता येते, त्यालाच शुध्द अशा अंतिम सत्याचे दर्शनही घडते. ही गांधीजीची शुध्द भावना होती, थोडक्यात सत्याबाबदची विशालता, उदारता या ठिकाणी पहावयास मिळते. 'सत्य' या विचाराबाबत सोपा, सहज, अर्थ जर आपणास समजून घ्यायचा असेल तर सत्याचा अर्थ खरे बोलणे, याचाच दुसरा अर्थ म्हणजे खोटे बोलू नये असा आहे. विशेषतः म.गांधीनी सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यापैकी सापेक्ष सत्य आणि दुसरे म्हणजे निरपेक्ष सत्य होय. म.गांधीना 'सत्य' याचा अर्थ केवळ खरे बोलणे इतका मर्यादीत अभिप्रेत नव्हता तर त्यांनी सत्याचा व्यापक दृष्टिकोणातून विचार केलेला होता आचार विचार आणि उच्चारात त्यांना सत्य अभिप्रेत होते.[3] थोडक्यात म.गांधी हे सत्याला परमेश्वर मानीत असत, त्यामुळे सत्याचा शोध माणसाने नियमित व अखंडपणे घेतला पाहीजे, सत्याचे सदैव पालन आपल्याकडून होईल असेच आपले वर्तन असले पाहिजे ही म.गांधी यांची शिकवणूक होती. म्हणूनच ख–या आणि रुढ अर्थाने म.गांधी यांनी सत्य–अहिंसेला एक महत्वाची प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. विशेष म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान अगदीच वाखाण्याजोगे होते, तरीही ते सत्य आणि अहिंसेपासून तसुभरही ढळले नाहीत. ते स्वतःला सत्याचे नम्र उपासक, शोधक आणि दरिद्रीनारायणाचे सेवक मानीत. त्यांच्यामते सत्य हाच ईश्वर मात्र हे सत्य वैज्ञानिक सत्याप्रमाणे केवलपणे बुध्दीगम्य नाही. ते अध्यात्मिक अनुभूतीच्या स्वरुपाचे पण भौतीक जीवनावर प्रभाव गाजविणारे असे आहे. गांधीजी शुध्दमनस्क कृतिशीलतेतून सत्याचा शोध घेऊ इच्छितात. या सत्यशोधाला भारतीय परंपरेचा दृढ आधार असला तरी त्यात कोणत्याही प्रकारची सांप्रदायिकता नाही.[4]एकंदरीत विचार करता म.गांधी यांची सत्यावर प्रचंड निष्ठा होती, सत्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी असलीच पाहीजे ही त्यांची विचारधाराही सत्य या बाबतीत बरेचसे तत्वज्ञान

सांगून जाते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात, येथील सामाजिक सुधारणेच्या एव्हाना विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी सत्याची कास धरली.म. गांधी यांची भाषा सरळ साधी, सोपी व –हदयाला भिडणारी व सुटसुटीत होती. विशेषतः सत्यागृह करताना त्याची पूर्वकल्पना, विरोधकांबाबत आदरभाव, शुध्द चारित्र्य इत्यादी गूणही सत्याग्रहाच्या अंगी असावेत ही त्यांची शुध्द विचारसरणी होती. सत्यापासून दूर जाण्याची पाळी येईल त्या सर्व गोष्टी त्यांनी नाकारल्या. एका जैन मुनींच्या मते गांधीजी अहिंसेपेक्षा सत्याचे जास्त समर्थक होते. अहिंसा व सत्य हयांपैकी गांधीजी सत्याला प्राथमिकता देत कारण सत्याचा शोध घेतानाच अहिंसेशी त्यांचा संबंध आला.[5]

सत्याप्रमाणे त्यांनी अहिंसेला महत्व दिले होते. एवढेच नाही तर सत्य आणि अहिंसा एकमेकांना पुरक आहेत, त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, म्हणून सत्याच्या आधारे जीवनात अहिंसा स्वीकाराता येते. विशेषतः मानवी जीवनाच्या वाटचालीत आजपर्यन्त निर्माण झालेल्या विविध धर्माच्या धर्मगुरुनी, त्यांच्या धर्मप्रसारकांनी आपल्या धर्मग्रंथातून सत्य, अहिंसा या सारख्या नितितत्वांचा हिरारीने पुरस्कार केलेला आहे हे आपणास विसरून चालणार नाही. अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव इतका संकूचित अर्थ म.गांधी यांना मान्य नव्हता. स्वार्थ, राग, लोभ, याद्वारे इतरांना शारीरिक किंवा मानसिक दुःखापत न करणे म्हणजे अहिंसा होय. आपल्या बोलण्याने अथवा आचरणाने कोणालाही दुःख किंवा त्रास होऊनये हा अहिंसेचा खरा मार्ग होय.[6] एकंदरीत म.गांधी यांची अहिंसेबाबतची शिकवण महान अशा नीतितत्वावर अवलंबून आहे. रागाला प्रेमाने, हिंसेला, अहिंसेने तर शत्रुला मित्रत्वाने उत्तर देणे म्हणजे अहिंसा होय. म्हणूनच ख–या अर्थाने विचार करता सत्य आणि अहिंसा हे एकमेकांत प्रचंड रित्या एकरुप झालेले असतात त्यांना कोणत्याही परिस्थितीत वेगळे करता येणार नाही. म्हणून म.गांधी यांच्या मौलिक विचारातील अहिंसेची संकल्पना ही ख–या अर्थाने सकारात्मक, सर्वव्यापक होती. गांधीच्या मते अहिंसा म्हणजे विशाल प्रेम, उदारता. अहिंसेची केवळ शिकवण हे त्यांचे ध्येय नव्हते, तर तिच्या सहायाने लोकांना स्वातत्र्य प्राप्त करुन देणे हे ध्येय होते.[7] सत्याचा शोध अहिंसेशिवाय शक्य नाही ही त्यांची दृढ विचारसरणी होती. किंबहूना सत्य आणि अहिंसेच्या जोरावर किंवा तिच्या सहाय्याने स्वातंत्र्य लढा जिंकता येतो, हे त्यांनी संपूर्ण विश्वाला दिलेली एक महान देणगी आहे. अशा या अहिंसेच्या तत्वाबाबत 1935 मध्ये म.गांधीनी आपल्या 'हरिजन' या नियतकालिकात 'अहिंसा म्हणजे जगातील कोणासही आपल्या विचारांनी, शब्दांनी आणि कृतींनी न दुखविणे' अशी व्याख्या केली आहे.[8] म.गांधीच्या विचारातील 'सत्य आणि अहिंसा' हे एक वैश्विक आणि थोर मानवतावादी तत्वज्ञान असल्याचे आपणास उपरोक्त बाबीवरुन दिसून येते. म.गांधीनी काया–वाचा–मने या तिन्ही अर्थाने अहिंसेचा अर्थ घेवून ती संकल्पना अधिक व्यापक केली आहे. वास्तविक पाहता म.गांधी यांची सत्यनिष्ठा ही म. फुले यांच्या सार्वजनिक सत्याशी अधिक इमान राखणारी आहे.[9]

**सारांश / निष्कर्ष :**

म.गांधी यांची विचारसरणी ही सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिगृह, सत्यागृह, विश्वस्त, रामराज्य, सर्वोदय या सारख्या महान विचारांवर त्यांचे चिंतन अतीशय मूलगामी अशा स्वरुपाचे आहे. म.गांधी यांच्या एकूणच विचारांचा आणि तत्वज्ञानाचा केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगावर प्रभाव पडला आहे, हे कोणालाही मान्य करावे लागते. म.गांधी भारतीय संस्कृती, अध्यात्म, वैश्विक कल्याण, पारतंत्र्यातून मुक्ती इत्यादीच्या अनुषंगाने आपले विचार मांडले. विशेषतः त्यांच्या सत्य आणि अहिंसेत सर्व मानवी प्राण्यांचे हित आहे, आंतरराष्ट्रीय शांतता आहे. अहिंसेचे मूळ शोषण विरहीत समाजात आहे. त्यामूळेच सत्य आणि अहिंसा हे पुर्णतः एकमेकास पूरक आहेत, ही व्यापक दृष्टी त्यांच्या विचारात दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) सागर के. (संपा.) भारतीय राजकीय विचारवंत, (2002), अनिरुध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. 238.
2) व्होरा राजेंद्र (संपा.), समाजप्रबोधन पत्रिका, (मार्च 2003), नर्मदा प्रिंटर्स, एंडरवन, पुणे, पृ. 5.
3) डॉ.राठी शुभांगी, भारतीय राजकीय विचारवंत, (ऑगस्ट 2016), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ. 198.
4) डॉ.पुंडे दत्तात्रय (संपा.), गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य,(1995), प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. 23.
5) कोकंडाकर जे.आर., गांधी विचार : नरहर कुरुंदकरांचा दृष्टिकोण,(2015), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. 33.
6) डॉ. वाडकर– कस्तुरे प्रभा, पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत, (ऑग–2011), अरुणा प्रकाशन, लातूर, पृ. 185.
7) कोकंडाकर जे.आर., पुर्वोक्त, पृ. 39.
8) सागर के.(संपा.), भारतीय राजकीय विचारवंत, पुर्वोक्त, पृ. 237.
9) सुमंत यशवंत, म.गांधीची विचारसृष्टी, (एप्रिल 2016), साधना प्रकाशन, पुणे, पृ. 128

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधी यांचे एकादश व्रते

**प्रा. संध्या जंजाळ**
मातोश्री उच्च माध्य. विद्यालय महागांवए ता. महागाव जि. यवतमाळ

---

आपला देश ज्या व्यक्तीला 'महात्मा', 'राष्ट्रपिता' अशा संबोधनांनी ओळखतो त्यांच्या जीवन चरित्राचा वेगळा परिचय करून देण्याची गरज नाही. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या व्यक्तीमध्ये त्यांचे नाव अतिशय गौरवाने घेतले जाते. महात्मा गांधी यांनी स्वतःच्या 'आत्मकथेस' 'माझे सत्याचे प्रयोग' म्हटले ही मोठी अर्थपूर्ण गोष्ट आहे. बौध्दिकदृष्टया सुसंगत, सर्वव्यापी, सर्वकष तत्वज्ञानाची मांडणी करणाऱ्या तत्वज्ञानाचा होता. लिबरल विचारप्रणालीची मांडणी करणाऱ्या जॉन स्टुअर्ट मिल्ल याचाही पिंड तत्वज्ञानाचा होता. हेगेल, मार्क्स यांचा पिंड तत्वज्ञानाचा होता. भारतीय उदाहरणे द्यावयाची तर योगी श्री. अरविंद; स्वामी विवेकानंद आणि काही प्रमाणात लोकमान्य टिळक यांच्या बाबतीतही असे म्हणता येईल. महात्मा गांधी या सर्वाहून वेगळे होते. या कारणाने त्यांच्या लेखनामधून 'गांधीवाद' नावाची प्रणाली सिध्द करणे हा तसा अव्यापारेषु व्यापार म्हणायला हवा.

म. गांधीजीच्या जीवनात त्यांनी हाती घेतलेल्या अनेकविध कार्यामध्ये आणि त्यांनी केलेल्या प्रासंगिक पण विपुल लेखन—भाषणामध्ये कोणतेच सुसंगत अंतःसूत्र सापडत नाही असा मात्र याचा अर्थ नाही. सत्य व अहिंसा या तत्वानुसार जीवन जगण्याचा एक भाग म्हणून गांधी त्यांच्या वेळच्या समाजातील अन्याय शोषण, दारिद्रय व दडपणूक यांना सामोरे गेले. औद्योगिक क्रांतीची पहिली भरती इंग्लंडमध्ये ज्या काळात झाली त्या काळात गांधी तरूण वयात तेथे बॅरिस्टरच्या शिक्षणासाठी गेले असताना तेथील नफेखोर भांडवलशाहीचा निर्घुण आविष्कार त्यांना दक्षिण आफ्रिकेत पहावयास मिळाला. आधुनिक पाश्चिमात्य सभ्यता ही दडपणूक व शोषण यावर आधारलेली आहे असे त्यांचे अनुभवांती मत बनले होते. हा बोध त्यांच्या मनात खोलवर रूजण्यास एक विशेष परिस्थिती झाली. मद्यपान मांसभक्षण करणार नाही अशी शपथ गांधीनी आईपाशी घेतली होती. लंडनमध्ये वास्तव करताना शाकाहारी जेवणाच्या शोधात ते अशा एका खानावळीत जाऊन पोचले की जेथे कारखानदारी संस्कृतीच्या विरोधात क्रांतीकारक नवविचारांची मांडणी करणारी मंडळी विचारविमर्शासाठी जमत असत. त्यांनी नवविचारांचा एक भाग म्हणून शाकाहाराचा स्वीकार केला तर होता. या मंडळीच्या सहवासात गांधीजीनी निसर्गाशी जवळीक साधाणाऱ्या श्रमनिष्ठ, साध्या शोषणमुक्त व समताधिष्ठित नवसमाजाची स्वप्ने पाहिली. जॉन रस्किन यांच्या 'अन टू धिस लास्ट' या पुस्तकाने आपल्या जीवनाला कसे आमुलाग्र वेगळे वळण लागले याचे वर्णन गांधीचे आत्मकथेत केले आहे. तात्पर्य असे की, वैयक्तिक व कौटुंबिक जीवनातले गांधीचे सत्याचे प्रयोग हे स्वाभाविकच नवसमाजनिर्मितीचे प्रयोग ठरले. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी फिनिक्स आश्रम व टॉलस्टॉय फार्म या दोन ठिकाणी श्रमनिष्ठ, वैराग्यशील समुदाय जीवनाचे अर्थपूर्ण प्रयोग केले. शेती, उद्योग, आरोग्य, आध्यात्मिक साधना आणि राजकीय व सामाजिक जीवनात सक्रिय सहभाग असा सर्वस्पर्शी कार्यक्रम त्यांनी राबविला. भारतात परतल्यावरही त्यांनी अहमबादजवळ प्रथम एक आश्रम स्थापन केला व स्वतःच्या कल्पनेतील आदर्श व्यक्तिगत पारिवारिक व सामुदायिक जीवनाच्या उभारणीचे काम हाती घेतले. या प्रयोगामधून जी तत्वे त्यांनी समाजापुढे ठेवली त्यांची ओळख करून घेतली नाही तर महात्मा गांधीचा विचार समग्र स्वरूपात जाणून घेतला असे होणार नाही.

म. गांधीची एकादश व्रते विनोबाजीनी पुढीलप्रमाणे सांगीतली आहेत.

''अहिंसा सत्य अस्तेय ब्रम्हचर्य असंग्रह
शरीरश्रम आस्वाद सर्वत्र भयर्जंन
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये''

यापैकी अहिंसा व सत्य आणि सर्वत्र भयवर्जंन आणि स्पर्शभावना व सर्वधर्मी समानत्व याचा अर्थ व महत्व समजण्यासारखे आहे. आपण सर्वच जर एकाच ईश्वराची लेकरे असू तर वर्ण, वंश, जात—पात, धर्म वा इतरही कोण्याकारणाने आपापसात तटबंधा उभारणे, स्पृश्यास्पृश्य, उच्चनीच असा भेदभाव करणे, द्वेष बाळगणे हे असत्य आहे. हे भेद मानवनिर्मित आहेत. यापैकी काही भेद अज्ञानापोटी केले गेले. अज्ञान दूर झाल्यावरही काहीविषयी आग्रह बाळगला जातो याचे कारण भेदाभेद करण्यात स्वार्थ व लाभ आहेत. म्हणजेच त्यात अन्याय, शोषण व दडपणूक आहे. उदा. वर्णभेद, वंशभेद, जातिभेद, अस्पृश्यता इ. वेगवेगळे धर्म या ईश्वराप्रत जाण्याच्या वेगवेगळया वाटा होत. वेगळया वाटांची उत्पत्ती ऐतिहासिक मीमांसेच्या आधारे समजून घेता येते. आज सारे जग एक होत असताना, वाटा वेगळया असल्या तरी त्याच एका सत्याप्रत आपणा सर्वाना जावयाचे आहे हे जाणून सर्वधर्मसमभाव बाणवला पाहिजे.

अस्तेय असंग्रह, शरीरश्रम, स्वदेशी याचा एक स्वाभाविक गट आहे. या चार व्रतांमध्ये गांधीचा संपूर्ण अर्थविचार सामावलेला आहे असे म्हणता येईल.

गांधीजी तत्वज्ञ नव्हते, पण गोष्टीचा थेट मुळाशी जाऊन चिकित्सा करण्याची क्षमता व धैर्य त्यांच्यात विलक्षण होते. समाजव्यवस्थेतला अन्याय, शोषण, दडपणूक यांचा उगम कशात आहे व उगम का होतो असा प्रश्न त्यांनी विचारला. इतरांजवळ पुरेसे नसताना माझी चंगळ असली पाहिजे, माझी चंगळ होण्यासाठी जमेल तेवढे इतरांचे काढून घेतले पाहिजे ही इच्छा, हा लोभ साऱ्या अनर्थांच्या मुळाशी आहे असे या प्रश्नांचे उत्तर त्यांना गवसले. उपभोगाविषयीची स्वतःची लालसा सतत वाढवीत राहावे, सर्व व्यवहार आवळा देऊन भोपळा काढण्या च्या युक्तीने करावेत. अशी आधुनिक अर्थशास्त्रास उद्देशून रसिकप्रमाणेच त्यांनी, 'हे अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र?' असा प्रश्न उपस्थित केला. त्यांचा असा ठाम निवाडा होता की दुसऱ्याच्या श्रमांच्या स्वदेशी च्या व्रतांचे महत्व पाहता येते. शोषणमुक्त बळावर, दुसऱ्याला लुबाडण्याच्या तत्वावर स्वतःची चंगळ करावयास शिकविणारे अर्थशास्त्र हे असत्य, अन्याय्य व अनर्थकारी आहे.

शोषणमुक्त समताधिष्ठित समाज खऱ्या अर्थाने अस्तित्वात यावयाचा असेल तर समाजातील प्रत्येकाने शरीरश्रम करावयास हवेत या निष्कर्षावर ते पोचले. उत्पादक–अनुत्पादक अशी विभागणी कशाच्या आधारे करणे उचित होईल? माणसाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी ज्या भौतिक वस्तु वा सेवा यांच्या उत्पादनाची गरज असते. त्या वस्तू वा सेवासाठी करावे लागणारे श्रम उत्पादक गरजांमध्ये समाविष्ट करता येतील. पण गांधीजी या बाबतीत थोडे काटेकोर होते. बौध्दिक –सांस्कृतिक व्यापार हे श्रेष्ठ व शरीरश्रम कनिष्ठ मानणारी आजची सभ्यता आहे. या भेदामुळे 'हा खराब न करता' जो उपजीविका हस्तगत करू शकतो ती व्यक्ती व ज्या व्यवसायात 'स्वच्छ' नाजुक व मुलायम राहतात तो व्यवसाय श्रेष्ठ हे मूल्य रूजलेले आहे. भारतीय समाजात तर ही गोष्ट पदोपदी आपल्या अनुभवयाला येते. या पार्श्वभूमीवर म. गांधीजीनी 'शरीरश्रम' हे व्रत म्हणून सांगितले. गुरूदेव रवींद्रनाथ टागोरांसारख्या कविवर्याने देखील सूत कातून वस्त्र विणून, शेतात काम करून अन्य प्रकारे नियमितपणे नित्य उत्पादक शरीरश्रम करायला हवेत असे आवर्जून म्हटले ते याच कारणासाठी. 'अस्तेय', 'असंग्रह' या दोन व्रतांचेही महत्व आपोआपच स्पष्ट होते. खासगी मालमत्तेचा सोस, संग्रह करून ठेवण्याचा लोभ, दुसऱ्यापेक्षा माझ्या जवळ जास्त आहे याचे कौतुक व गर्व यामधून आर्थिक, सामाजिक व राजकीय शोषणाचा जन्म होतो. माझ्या गरजेपेक्षा मी जास्त घेणार नाही. उगीच जास्त संग्रह करून ठेवणार नाही. आणि माझ्या गरजाही सतत वाढवीत नेणार नाही असे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. दारिद्र्याने गांजलेल्या लोकसंख्येचे भान अति जास्त असणाऱ्या भारतासारख्या विषम समाजात तर गरजांच्या नावाने वस्तुंचा व उपभोगांचा हव्यास वाढविल्यामुळे किती विपरीत, घातक परिणाम होत आहे. आपण हे अनुभवीत आहोत. काळाबाजार, सभ्य स्वरूपातली लुटमार, दरोडेखोरी या सर्वाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे. कायदेकरून, पोलिस व कस्टम खात्यांचा पसारा वाढवून, प्रशासकीय नियंत्रणे वाढवून यांना आळा बसणार नाही हे आज स्पष्ट झाले आहे. कारण चोरीची, लूटमारीची, तिजोऱ्या भरण्याची वृत्तीच आपण मूल्य म्हणून जोपासत आहोत.

शरीरश्रम, अस्तेय व असंग्रह ही तीन व्रते आपण एकत्र विचारात घेतली तर आजच्या यंत्रप्रधान कारखानदारी व्यवस्थेला गांधीचा विरोध यथार्थ होता हे आपणास समजू शकते. यंत्रालाच गांधीचा विरोध नव्हता. मानवी श्रमांचे शोषण करणाऱ्या वा माणसाला बेकार बनवून उकरिडयावर फेकणाऱ्या यंत्रप्रधानतेला विरोध होता. आजचे औद्योगिक तंत्रविज्ञान व त्याद्वारा करण्यात येणारी केंद्रीभूत मोठया प्रमाणावरील उत्पादन यांचे मुख्य उद्दिष्ट शोषण व नफेखोरी हे आहे. शोषण व नफेखोरी यांन वाव न देता यंत्राचा सुयोग्य वापर करावयाचा असेल तर काही पथ्ये काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे असे म. गांधीजे म्हणणे होते. समाजात सर्वाना प्रतिष्ठित रोजगार मिळावयास हवा, रोजगारामधून मानवाला साजेसे जीवन जगण्याइतके उत्पन्न प्रत्येकास मिळावयास हवे, आणि यंत्राच्या वापराने विषमता उत्पन्न होता कामा नये. यंत्राधिष्ठित कारखानदारी माणसाला यंत्राचा गुलाम बनविते व त्याचे नैतिक–आध्यात्मिक पतन घडवून आणते हा अनुभव म. गांधीना होता. शेकडो –हजारो माणसांना यंत्रावर काम करणारे यंत्रवत कामगार बनवून टाकणारी कारखानापध्दती व त्यातून अस्तित्वात येणारी झोपडपट्टया / कामगारवर्गीय चाळीवर अधिष्ठित बकाल शहरे यांना ही विरोध होता.

यंत्रावर मर्यादा असावी, यंत्रे माणसाच्या कक्षात असावीत ती त्याला सहाय्यक असावीत आणि उत्पादन विकेंद्रित स्वरूपात केले जावे या आग्रहामागे सर्वसामान्य माणसाला प्रतिष्ठा प्राप्त कयन देण्याची थोर दृष्टी होती. केंद्रीभूत कारखान्यामध्ये यंत्राच्या साहाय्याने प्रचंड प्रमाणावर प्रमाणित वस्तूंचे उत्पादन केले जाते तेथे उत्पादक कामगार हा कवडीमोलाचा ठरतो. यंत्रे अतिशय महागडी व नाजूक असल्याने ती जास्त काहजीपूर्वक जपली जातात.उत्पादनापेक्षा ते महाग दराने सर्वदूर विकून पैसा करण्यास महत्व येते. जाहिरातबाजी, दलाली, व्यापारी हिकमत, बनवाबनवी यांना महत्व येते अनीती, भ्रष्टाचार व असत्य बोकाळते या सगळयाचा तीव्र अनुभव आपण

आज घेत आहोत. उत्पादकाला मानसन्मान व प्रतिष्ठा प्राप्त व्हायची असेल, त्याचे उत्पादन त्याच्या नावाने ओळखता यायला हवे; तो तयार करीत असलेली वस्तू वापरण्याऱ्याला त्याची ओळख पटायला हवी. म्हणजेच निर्माता व उपभोक्ता यांच्यामध्ये वस्तूच्या माध्यमातून जिव्हाळयाचा, मैत्रीचा मानवी संबंध प्रस्थापित व्हायला हवा. उत्पादन जर विकेंद्रित स्वरूपात केले गेले आणि यंत्राचे सहाय्य मर्यादित ठेवले तरच गोष्टी साध्य होऊ शकतात. माणसांनी ऐहिकदृष्टया सुखी, समाधानी व संपन्न जीवन जगावे हे गांधीजीचेही लक्ष्य होते. पण माणसाचे ऐहिक जीवन हे त्याच्या नैतिक आध्यात्मिक उन्नतीचे, ईश्वरभक्तीचे व मोक्षाचे देखील माध्यम असावे हा त्यांचा आग्रह होता.

समताधिष्ठित समाजाचा पायाभूत, प्राणभूत भाव बंधुभाव हाच आहे. दळणवळणाच्या संप्रेषणाच्या साधनांमधील क्रांतीमुळे सारे जग इतके जवळ आले आहे की, आज 'द ग्लोबल व्हिलेज' असा शब्दप्रयोग अर्थपूर्ण केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्वावलंबन व स्वयंपुर्णता या गोष्टी संकुचित वृत्तीच्या द्योतक वाटतात. जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेकविध नवनव्या वस्तू मिळवून वापरण्यात लोकांना भूषण वाटते. पण दूरदूरच्या माणसाविषयी बंधुभाव आत्मीयता वाटते पण शेजाऱ्यापाजाऱ्याविषयी मात्र उपेक्षा आढळते. याचा खरा अर्थ कोणाबद्दलच बंधुभाव मनात नाही असाच असतो. माझी आवडनिवड, माझी लहर व सोय, माझा स्वार्थ तेवढा मी पाहात असतो. शेजाऱ्याविषयीचे माझे कर्तव्य पार न पाडता मी जर जगाच्या ऐक्याच्या गोष्टी करीत असेन तर त्यामधून सरळ सरळ शोषणधिष्ठित विषम समाजच अस्तित्वात येणार. तलम, मुलायम व स्वस्त म्हणून हिंदी माणसे जेव्हा मॅंसेस्टरचे कापड वापरण्यात भूषण मानीत होती तेव्हा येथील कोटयावधी विणकरांचा व कत्तिनांचा रोजगार छिनला गेला होता आणि देश पारतंत्र्यात जखडला गेला होता. धन इंग्लंडमधील कारखानदार—भांडवलदारांची होत होती. स्वदेशीचा साधा सरळ अर्थ असा आहे की सर्वप्रथम माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्याविषयीचे माझे कर्तव्य पूर्ण करण्यास मी प्राधान्य दिले पाहिजे. भारत हा आजही खेडयांचा देश आहे. शंभरातले सत्तर टक्के लोक आजही खेडयांत राहतात. या लोकाविषयीच्या कर्तव्याची आम्ही प्रथमतः पूर्तता करावयास हवी. स्वदेशीचे तत्व अंगीकारले की स्वाभाविकपणेच ग्रामस्वावलंबन, ग्रामस्वयंपूर्णता प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील.

शेवटी आपण ग्रम्हचर्य, आस्वाद व सर्वत्र भयवर्जन या व्रतांचा विचार करण्याचा विचार करणे आवश्यक आहे. देहधारणेबरोबरच येणाऱ्या काम—क्रोध—लोभ—मोह—मद—मत्सर या षडविकारांच्या प्रभावाखाली असे तोवर सत्याचे दर्शन होत नाही. दृष्टी गढूळलेली राहते शरीर आहे तोवर या षडविकारापासून सदासर्वकाळ पूर्णतः मुक्त असा कोणीच असू शकत नाही याची तीव्र जाण म. गांधीजीना होती. जगातील सर्व अन्याय—अत्याचारांचे शोषणांचे लालसेचे मूळ या विकारामध्येच आहे. सत्याच्या मार्गावरून वाटचाल करावयाची असेल, शोषणमुक्त व समताधिष्ठित समाज निर्माण करावयाचा असेल, तर षड्विकरांना सतत, जागरूकतेने काबूत ठेवले पाहिजे. ब्रम्हचर्य, आस्वाद आणि सर्वत्र भयवर्जन या तीन व्रतांचे प्रयोजन व महत्व स्पष्ट होईल. भोगप्रधान संस्कृतीमध्ये वासना पेटल्या व वाढल्या ठेवण्यावर भर इतका आहे. ती गोष्ट इतकी वांच्छनीय व भूषणास्पद मानली जाते की ब्रम्हचर्य व आस्वाद ही व्रत आचरावयाची म्हणजे सर्वानी विरकत संन्याशीच व्हावयाचा आग्रह म. गांधीजी धरीत आहेत असा आरोप केला जातो. योग्य वयात व अवस्थेत विरक्त होऊन संन्यस्त जीवन प्रत्येकाने जगावे असे म. गांधी नक्कीच म्हणाले असते. पण स्त्री पुरूषांनी वैवाहिक जीवन जगण्यासच त्यांचा विरोध होता वा नीरसपणे कसेही जगावे अशी त्यांची शिफारस होती असे मानणे गांधीजींना अन्याय करणारे होईल. जन्मजात पिंड व स्वभाव यांच्या दृष्टीने गांधीजीचे विकार विशेष तीव्र होते व याची मनमोकळी कबुली आत्मकथेत त्यांनी दिली आहे. म्हणूनच त्यांना अनासक्त बनण्याच्या दृष्टीने ब्रम्हचर्य व आस्वाद या व्रतांची विशेष गरज वाटत होती.

'सर्वत्र भयवर्जन' करण्याचे महत्व विशद करून सांगण्याची खरे तर आवश्यकता नाही. माणसाला चालना देणाऱ्या चार मूलभूत शक्ती—प्रवृत्ती आहार, निद्रा, भय व मैथुन सांगितलेल्या आहेत. भय ही उपजतच गोष्ट आहे. पण भयग्रस्त माणूस सत्याचा शोध लागला तरी सत्याचे आचरण करण्यास धजत नाही. काही नाही तर लोकापवादाचे त्याला भय वाटेल. निर्भय बनण्याचे म्हणून महत्व आहे. पण आसक्त, आकांक्षी व विकारी माणूस, निर्भय बनू शकत नाही. आपणास ज्या गोष्टीची कामना आहे ती न मिळण्याचे व मिळालीच तर ती गमावण्याचे भय त्याला जखडून ठेवत असते. भयग्रस्त माणूस भयापोटी चटकन हिंसेचा अवलंब करतो, हिंस्त्र बनतो. समाजजीवनातली पुष्कळशी हिंसा ही खोलावर मुरलेल्या भयापोटी घडून येत असते असे मानसशास्त्रज्ञ आज म्हणतात. निर्भय बनु पाहणाऱ्या व्यक्तीस अनासक्त, विकार मुक्त, आकांक्षाविरहित बनण्याची, स्वतःचे धड व शरीर स्वस्थ, शुध्द राखण्याची सतत गरज असते. म्हणजेच ब्रम्हचर्य, आस्वाद व सर्वत्र भयवर्जन यांचा परस्परांशी व सत्य आणि टहिंसा यांच्याशी संबंध आहे.

जीवनाच्या अगदी आरंभालाच, बालवयातच त्यांनी सत्यनिष्ठेचा अंगीकार केला. निष्ठापूर्वक सत्याचे आचरण करावयाचे असेल तर कोणत्या मार्गदर्शक तत्वांचा अंगीकार केला पाहिजे आणि कोणती व्रते आचरली पाहिजेत

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

याची स्पष्टतः स्वतःसाठी ते करीत गेले. व्यक्तिगत जीवनासाठी व समाजासाठी विचार, धोरणे, लढे व रचनात्मक कार्यक्रम देखील सत्याचा आचरणामधुनच आकारास येत गेलेल्या गोष्टी होत्या. म. गांधीजीचा विचार याच पध्दतीने समजून घेणे महत्वाचे आहे.

**संदर्भ सूची –**

1) म. गांधी विचार दर्शन – संपादक प्रा. नागोराव कुंभार
2) गांधी आंबेडकर (प्रस्तावना) – गज्वी प्रेमानंद
3) महात्मा गांधी और उनके जीवन – 02 ऑक्टो 2017
4) महात्मा गांधी – विकिपीडिया
5) गांधी– गौरव ग्रंथ – संपादक शिखरे दा. न.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# महात्मा गांधीचे सत्य व अहिंसेबाबतचे विचार

**रत्नपारखे शिवशंकर अशोकराव**
संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

---

**प्रस्तावना–**

राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एक आदर्शवादी व अध्यात्मवादी असे महाण पुरूष होते. बालवयात व उच्च शिक्षण घेत असतांना महात्मा गांधीच्या मनावर अनेक चांगले संस्कार झाले आणि त्या संस्काराचा परिपाक म्हणून आयुष्यात गांधींनी सत्य व अहिंसेचा मार्ग स्वीकारला. अहिंसा या साधनाद्वारे सत्य साध्य करता येते अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे सत्य व अहिंसा एकमेकांना पूरक आहेत. सत्याशिवाय कोणतेही तत्त्व पूर्ण नाही असे गांधीजींचे मत होते. अहिंसा म्हणजे अपार प्रेम व ते व्यक्त होण्याचे साधन म्हणजे जनसेवा होय.

गांधीजीने आपले विचार निरनिराळ्या वेळी परिस्थितीप्रमाणे व्यक्त केले आहे. आपले विचार संकलित करून त्यांनी कोणात्याच वादाला जन्म दिला नाही. गांधीवाद म्हणून कोणताही सिद्धांत नाही. सत्य आणि अहिंसा याची ज्योत सतत तेवत राहावी एवढीच त्यांचे म्हणणे होते. My Experiment with Truth या ग्रंथात त्यांनी गांधीवाद म्हणून आपल्या विचारांचा उल्लेख केला नाही. आपल्या विचारांना त्यांनी कधीच पुर्ण मांडले नाही. पट्टाधी सीतारामय्या यांच्यामते, गांधीवाद म्हणजे एखादा सिद्धांत नव्हे किंवा मतांचा व नियमांचा समूह नव्हे तर जीवनाचा तो एक दृष्टिकोन आहे. मनुष्याच्या जीवनातील समस्यांचे निराकारण करणारी ती एक पद्धती आहे. म्हणजे गांधीवाद एक जीवन प्रणाली आहे. ज्ञान, कर्म आणि भक्ती या गुणांनी युक्त असे महात्मा गांधी एक कर्मयोगी होते. यावरून गांधीजींच्या श्रेष्ठत्वाची प्रचिती येते.

महात्मा गांधी यांनी सत्य व अहिंसेचा तत्त्वाचा अवलंब करून भारतीय समाजाची एकात्मता व अखंडता अबाधित राखण्याचा प्रयत्न केला होता. विविध राजकीय विचारवंताचा आणि धार्मिक ग्रंथांचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. रस्कीन, थोशे, टॉलस्टॉय अशा विचारवंताचा पगडा त्यांच्या मनावर बसला. याशिवाय भगवद्‌गीता, रामायण, महाभारत आणि बौद्ध धर्मातील ग्रंथ यांचा प्रभाव गांधीवर पडला.

महात्मा गांधीनी हिंदू स्वराज्य, सत्याचे प्रयोग, (आत्मकथा) माझे समकालीन गीताबोध, सर्वोदय, ब्रह्मचर्य, राष्ट्रवाणी, ग्रामसेवा, मंगलप्रभात, खादी, धर्मनीती, नीतीधर्म, गीताई, आरोग्याची गुरुकिल्ली, सत्यवीराची कथा, सत्याग्रह, अनासक्ती, योग, इत्यादी प्रमुख ग्रंथांची रचना केली. या ग्रंथाद्वारे गांधीजींनी 'धार्मिक मानवतावाद' जगापुढे मांडलेला दिसून येतो. गांधींनी आपले विचार, तत्वे केवळ लिहून ठेवली नाहीत तर ते विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या विचारात तत्व आणि व्यवहार यांचा समन्वय साधलेला दिसतो.

**संशोधन पद्धती –**

संबंधित शोध निबंध विषयाच्या अध्ययनासाठी विविध ग्रंथ, संदर्भ, मासिके, लेख अशा दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१. महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसा विषयक विचारांचा अभ्यास करणे.
२. आजच्या परिस्थितीच्या संदर्भात गांधीजींचे योगदान विशद करणे.
३. सत्य व अहिंसा या तत्त्वाचा विविध दृष्टिकोनातून वेध घेणे.

**संशोधनाची गृहितके –**

१. महात्मा गांधी हे भारतीय समाजाचे प्रत्यक्ष अध्ययन करून सिद्धांत मांडलेले एक विचारवंत आहेत.
२. महात्मा गांधीचे ग्रंथ निर्मिती हे भारतीय समाजव्यवस्थेला लाभलेले विशेष योगदान ठरलेले आहे.
३. महात्मा गांधी हे त्यांच्या सत्य व अहिंसेच्या योगदानाबद्दल संपूर्ण आयुष्यभर कार्य करणारे विचारवंत ठरतात.

**गांधीजींचे सत्य व अहिंसे संबंधी विचार –**

'हरीनो मार्ग छे शुरांनो' अर्थात सत्याचा मार्ग हा शुरांचा आहे. तेथे भ्याडाचे काम नाही. प्रितमदास या गुजराथी कवीचे उपयुक्त उक्ती गांधींनी हृदयस्थ केली होती. म्हणूनच सत्य हा महात्मा गांधींच्या विचारांचा आत्मा

होता. सत्याची सवय लहानपणापासूनच अंगी बाळगण्यातच त्यांचा कल होता. सत्य हे मानवी जीवनातील सर्वोत्तम मूल्य आहे. सत्यशिवाय कोणतेही तत्त्व पूर्ण नाही असे स्पष्ट करून गांधीजीने सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१. सापेक्ष सत्य –**

गांधीजींच्या मते, विशिष्ट परिस्थितीत एखादी विशिष्ट गोष्ट सत्य आहे असे वाटते तेव्हा त्यास सापेक्ष सत्य असे म्हणतात. अर्थात प्रत्येक व्यक्ती परिस्थितीनुसार सत्याची कल्पना बदलू शकते. सत्य परिस्थितीसापेक्ष असते अशा प्रकारचे सत्य हे अपूर्ण सत्य असते. परंतु पूर्ण सत्य शोधण्याचा तो एक अयशस्वी प्रयत्न असतो. उदा– मानवी सुखाची कल्पना ही सापेक्ष सत्याची कल्पना होय. प्रत्येक व्यक्तीच्या मनाप्रमाणे सुखाची कल्पना बदलत असते.

**२. निरपेक्ष सत्य –**

या सत्याला सार्वभौम सत्य ही म्हणता येईल. निरपेक्ष सत्य म्हणजे सत चित व आनंद यांचा सुंदर समन्वय होय. निरपेक्ष सत्य म्हणजे ईश्वर होय. या सरळ साध्या व वरकरणी सोप्या वाटणाऱ्या सत्यासाठी मानव जातीला सर्वोच्च त्यागाची तयारी ठेवावी लागते. निरपेक्ष सत्य प्राप्त करण्यासाठी व्यक्तीला फार मोठी किंमत द्यावी लागते.

गांधीजींच्या मते, सत्य म्हणजे सर्वोच्च प्रेम, सर्वोच्च दया, सर्वोच्च आत्मबलिदान होय. प्रेम, दया, आत्मबलिदान, बंधुत्व, सेवा, याद्वारे निरपेक्ष सत्य प्राप्त करता येते. सॉक्रेटिस, येशू ख्रिस्त यांना निरपेक्ष सत्य आत्मबलिदानाने प्राप्त झाले होते. धैर्य, चिकाटी, विवेक, आत्मविश्वास, त्याग या गुणांची गरज निरपेक्ष सत्याच्या प्राप्तीसाठी असते.

**गांधीजींचे अहिंसेविषयक विचार –**

सत्याप्रमाणेच गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानात अहिंसा या तत्वाला अतिशय महत्त्व दिले आहे. सत्य अहिंसा या दोन गोष्टी परस्परपूरक आहेत. अहिंसेच्या मार्गाने सत्य प्राप्त होते. सत्य हे साधन असून ते प्राप्त करण्यासाठी अहिंसा हे आत्मबलाचे उत्तम साधन आहे. गांधीजींच्या मते जो माणूस सत्याचा उपासक असतो तो नेहमीच अहिंसेवर मनःपूर्वक प्रेम करणारा असतो हिंसेचे साम्राज्य सर्वत्र पसरलेले असताना ज्या ऋषीमुनी अहिंसा या तत्वाचा शोध लावला असेल तो नक्कीच न्यूटन पेक्षाही थोर शास्त्रज्ञ असल्याचे गांधी म्हणतात. कारण शस्त्राचा मर्यादा ओळखून शस्त्रापेक्षाही प्रभावी अशा अहिंसाचा शोध त्यांनी लावला. शरीरानेच नव्हे तर मनानेही कोणाला इजा न करणे हाच गांधी प्रणित अहिंसेचा खरा अर्थ होय.

**२. विधायक अहिंसा**

प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी नेकदिलाने प्रयत्न करणे म्हणजे अहिंसा होय. एखाद्या व्यक्तीच्या कार्यात व्यत्यय न आणणे म्हणजे विधायक अहिंसा होय. सर्व जग प्रेममय बनविणे हाच विधायक अहिंसेचा आशय होय. स्वतः क्लेश सोसून जेव्हा व्यक्ती दुसऱ्याच्या सुखासाठी झटते तेव्हा खऱ्या अर्थाने अहिंसा प्रकट होते. दुर्बल स्त्रिया व मुले यांना कोणी त्रास देत असतील तर त्यावेळी त्यांच्या मदतीला धावून जाणे हीच खरी विधायक अहिंसा होय.

**२. निषेधात्मक अहिंसा**

गांधीजींच्या मते प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे कष्ट किंवा दुःख पोहोचू नये. क्रोध द्वेषमूलक विचार, तिरस्कार, घृणा इत्यादीचा सर्वार्थाने त्याग करणे म्हणजे निषेधात्मक अहिंसा होय. सर्व पाप कर्माचा त्याग हीच निषेधात्मक अहिंसेची पूर्वअट होय.

**३. निरपेक्ष अहिंसा**

निरपेक्ष अहिंसा हा निरपेक्ष सत्याकडे जाण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग होय. निरपेक्ष अहिंसा ही महान व्यक्तीची अहिंसा असते. अर्थातच ही अहिंसा ईश्वरी आहे. सर्व सामान्यांना ही साध्य होईलच असे नाही. गांधीजींच्या मते निरपेक्ष अहिंसेचे तीन प्रकार आढळून येतात.

**अ. वीर पुरुषांची अहिंसा**

गांधीजींच्या मते शुरांची अहिंसा मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आढळून येते. नैतिक आत्मबल व आंतरिक विश्वास याद्वारे व्यक्ती जेव्हा अहिंसेचा मार्ग स्वीकारते तेव्हा तिला वीर पुरुषांच्या अहिंसा असे म्हटले जाते. या अहिंसा एवढे सामर्थ्य असते की वीरपुरुष समाजातील कोणतीही गोष्ट सहजपणे करू शकतो. हि अहिंसा म्हणजे वीर पुरुषांचे भूषण असते.

**ब. दुर्बलांची अहिंसा**

ही सोयीसाठी व स्वार्थापोटी स्वीकारलेली अहिंसा आहे. कारण अशी व्यक्ती हिंसेला विरोध करत असते. ती आत्मबलाची प्रेरणा म्हणून नव्हे तर स्वतःच्या भित्रेपणामुळे नैतिक धारणा, सत्य, साहस इत्यादी गोष्टींचा प्रभाव

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

असल्यामुळे दुर्बलांनी स्वीकारलेली अहिंसा फार प्रभावशाली नसते. संरक्षणासाठी स्वीकारलेला तो एक अहिंसा मार्ग असतो.

**क. भिन्र्या लोकांची अहिंसा**

गांधीजींच्या मते भिन्र्यालोकांच्या ठिकाणी अहिंसा राहू शकत नाही. कारण भीती व अहिंसा या दोन गोष्टी एकत्र राहू शकत नाहीत. समाज जीवनात जेव्हा एखादी व्यक्ती अयशस्वी बनते तेव्हा ती भीतीमुळे अहिंसेचा मार्ग स्वीकारण्याचा प्रयत्न करते. परंतु गांधीनी भिन्र्यालोकांच्या अशा अहिंसेला विरोध केला.

गांधीजींनी वरील प्रमाणे अहिंसेचे तीन प्रकार सांगून त्यापैकी वीर पुरुषांची अहिंसा हीच श्रेष्ठ अहिंसा आहे असे मानून तिचा स्वीकार केलेला होता. त्यांच्या मते, सत्य व अहिंसा हे साधन स्वीकारणे, ते आचरणात आणणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. गांधीजींच्या मते सत्य व अहिंसा या गोष्टी केवळ वैयक्तिक आचरणाच्या बाबी म्हणून आपल्याला प्रस्थापित करावयाच्या नसून गटांनी, समाजानी व राष्ट्राने ही त्यांचे आचरण करावे असा प्रयत्न करायचा आहे.

महात्मा गांधीनी राष्ट्रापुढे एक अत्यंत उच्च व उदात्त आदर्श ठेवण्याचा प्रयत्न केला. पर्यायाने त्यांनी जगापुढे अहिंसेचा आदर्श ठेवला. तपश्चर्या व साधेपणा या मार्गाने त्यांनी अहिंसेचे महत्त्व जगाला पटवून दिले होते. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' अशी त्यांची जीवनप्रणालीहोती. ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध, प्रतिकार करण्यासाठी त्यांनी जो सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला तो मार्ग सत्य अहिंसा या तत्त्वावर आधारित होता. अहिंसेचे अधिष्ठान असलेले राजकीय आंदोलन उभे करून त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी शुरांची अहिंसा हे सर्वोत्तम साधन अवलंबले होते.

राष्ट्राचे संरक्षण करण्यासाठी अहिंसा या नैतिक साधनाचा वापर करावा असा गांधीजींचा आग्रहहोता. महात्मा गांधी आंतरराष्ट्रवादी नेते होते. त्यांच्या मते राष्ट्रा–राष्ट्रांमध्ये सलोख्याचे, प्रेमाचे, सहकार्याचे संबंध दृढ होतील तर युद्धे, महायुद्धे होणार नाहीत. प्रत्येक राष्ट्राने अहिंसात्मक मार्गाने दुसऱ्या राष्ट्राशी संबंध प्रस्थापित केले तर शांतता व सुव्यवस्था निर्माण होईल अशाप्रकारे महात्मा गांधींनी सत्य व अहिंसेच्या तत्त्वाचा स्वीकार करून संपूर्ण समाज व्यवस्थेत एक प्रकारे आदर्शवाद प्रस्तापित केला.

**संदर्भसूची–**

१. महात्मा गांधी – शक्ति और विचार – गुप्ता विश्व प्रकाश एवं मोहिनी गुप्ता राधा पब्लिकेशन, नई दिल्ली
२. समकालीन भारतीय चिंतक – रमेश चंद्रसिंह व विजयश्री मानक पब्लिकेशन नई दिल्ली – 1995
३. भारतीय राजकीय विचार दृ प्रा. बी. बी. पाटील, प्रा. उर्मिला चव्हाण फडके प्रकाशन कोल्हापूर
४. आधुनिक भारतातील राजकीय वारसा दृ श्री आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथ निर्मिती केंद्र यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. कलेक्टेड वर्कस ऑफ महात्मा गांधी खंड 19, भारत सरकार
६. गांधी, वुमेन अँड द नॅशनल मुव्हमेंट दृ 1920 तनेजा अनुप
६. पाथेय – डॉ. सहदेव चौगुले – अजब पब्लिकेशन्स, भानूसिंगजी रोड कोल्हापूर.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# ''महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास''

**निशा मच्छिंद्र गायकवाड**

एम. फिल, राज्यशास्त्र ए डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद

---

**प्रस्तावना:**

भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे भारताच्या विकासामध्ये ग्रामीण विकासाची भूमिका ही महत्त्वपुर्ण राहीली आहे. पुर्वीच्या काळामध्ये भारतातील खेडी ही स्वयंपुर्ण व आर्थिकदृष्ट्या अवलंबून नसायचे,सर्व गरजांच्या बाबतीत प्रत्येक खेडे हे अगदी स्वतंत्र्य व स्वयंपुर्ण असायची. भारतात शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्र अधिक आहे. आज देखील एकुण लोकसंख्येच्या ६० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेती उत्पादन आणि शेतीला पुरक व्यवसाय हाच ग्रामीण जनतेचा प्रमुख्य आर्थिक स्त्रोत आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेचा विकास होण्यासाठी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. आजच्या काळात खेड्यांतील शेतीचे होत असलेले तुकडीकरण,कौशल्य आधारित विकेंद्रित लघू उद्योगांचा ऱ्हास यामुळे ग्रामीण भागात सुप्त बेरोजगारी,तसेच ग्रामीण जनतेचे शहरांकडे स्थलांतर हे प्रकार वाढत आहेत.

या सर्व समस्याचे प्रमुख्य कारण १९ व्या शतकात भारतातील ओद्योगीकरणास सुरुवात झाली आणि शहरी भागात उद्योग,व्यवसायाचे मोठ्या प्रमाणावर केंद्रिकरण झाले. शहरी भागात रोजगार व्यवसायाच्या संधी निर्माण झाल्या व ग्रामीण भागातील लोक शहरांकडे स्थलांतर करु लागले. शहरे उद्योग,व्यवसायाचे केंद्रे आहेत म्हणून ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर होत नाही तर ग्रामीण भागातील जनतेचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. जो आज ही निसर्गावर अवलंबून आहे. शेती हा व्यवसाय उत्पादनाची कोणत्याही प्रकारची हमी देत नाही. बहूतेक शेतीना सिंचनाची कायमस्वरुपी व्यवस्था नाही. ही शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी निर्माण होत आहे. या बेरोजगारीतून ग्रामीण जनता ही शहरांकडे स्थलांतरीत होत आहे. या समस्यांना तोंड देण्यासाठी महात्मा गांधीच्यां विचारामध्ये वर्ण व्यवस्थेवर आधारीत आदर्श समाज निर्माण करण्यासाठी ग्राम राज्याची संकल्पना दिसून येते. ग्रामव्यवस्था उत्तम प्रकारे ठेवून स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था प्रत्येक खेड्यात निर्माण झाली तरच संपुर्ण समाज हा आदर्श समाज होऊ शकेल. महात्मा गांधींच्या ग्राम राज्याच्या विचारांचा केंद्र बिंदू खेडे हा आहे. गांधीना राज्यविहिन आदर्श समाज अपेक्षित होता. देशातील प्रत्येक ग्राम स्वावलंबीत राहील. सहकार्य हा त्याचा आधार असेल. जनता शांती पुर्ण गौरवशाली जीवन जगेल असा ग्राम गांधीना उभा करायचा होता आणि तो ग्राम हा स्वयंपूर्ण असला पाहिजे असे गांधीजीचे मत होते. या गावांतून खरा भारत उभा करण्याचे गांधीजीचे स्वप्न होते.

**ग्रामीण विकासाचे महत्त्व:**

ग्रामीण भागातील दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातीयवाद, स्त्रीभ्रूण हत्या, बालविवाह, रोगराई, व्यसनाधीनता, पाणी टंचाई, बेरोजगारी, अस्वच्छता इ. समस्यांवर उपाय करणे पायाभूत सुविधांची निर्मिती करणे. ग्रामीण भागात समाज परिवर्तन, राजकिय परिवर्तन, आर्थिक परिवर्तन घडवून आणणे. नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करून विकासास चालना देणे व या विकास कार्यात जनतेचा सहभाग वाढवणे. यामधून जनतेला स्वावलंबी बनवणे व जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. ग्रामीण विकास हा राष्ट्र विकासाचा मुख्य आधार

स्तंभ आहे. ग्रामीण भागातील लोकांचा सामाजिक आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण विकासाची रणनिती आखणे महत्त्वाचे आहे. यातून प्रामुख्याने रोजगार वाढ,उत्पादकता वाढवणे,अन्न वस्त्र निवारा या आवश्यक मूलभूत गरजांची पुर्तता करणे,राष्ट्रांचा सांस्कृतिक वारसा जतन करणे, मानवी मुल्यांची जोपासना करणे या सर्व बाबी ग्रामीण विकासास महत्त्व प्राप्त करून देतात.

**आदर्श खेड्याची वैशिष्ट्ये:**

महात्मा गांधींनी सांगितलेली आदर्श खेड्यांची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे,

१. प्रत्येक खेडे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असावे.
२. प्रत्येक खेडे अन्न व वस्त्राबाबत स्वयंपुर्ण असावे.
३. प्रत्येक खेड्यातील कृषीव्यवसाय प्रगत असावा.
४. प्रत्येक खेड्यात मूलभूत शिक्षण सक्तीचे असावे.
५. त्या खेड्यात नाट्यगृह, धर्मशाळा, दवाखाना व समाज मंदिरे असावित.

**ग्रामीण विकासाबाबत ग्रामपंचायतीची कार्ये:**

१. गावातील केर कचरा हटवून गाव स्वच्छ केले जावेत. या कचऱ्यापासून खत व पुन्हा नवीन वस्तूंची निर्मिती करणे.
२. गावातील लोकांना विविध रोग व त्यांच्या निर्मितीची कारणे त्यावरील उपाय किंवा त्यावरील प्रतिबंध करण्याची पद्धती माहिती असावी.
३. ग्रामउद्योगाच्या व कुटीरउद्योगाच्या पुर्नजिवनातून गावातील बेरोजगार लोकांच्या हाताला काम मिळवून देणे. त्यातून गावाचा विकास नाहीतर देशाच्या ही विकासास चालना मिळते. यासाठी ग्राममानस निर्माण करणे आणि आपल्या गरजांकडे ग्रामीण दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.
४. सामुदायिक पध्दतीने शेती आणि पशुपालन व्यवसाय केला जावा.
५. अहिंसात्मक पध्दतीने परीवर्तन घडवून आणण्यासाठी गावा गावात विविध शांतता गटाची स्थापना करणे.
६. जातीय ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारू बंदी, ग्रामसफाई, प्रौढ शिक्षण इ. विविध गोष्टी विषयी गावातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे किंवा याविषयी प्रबोधन करणे.

**महात्मा गांधीचे ग्रामविकास विषयक विचार:**

महात्मा गांधी यांच्या संपूर्ण विचारांचा केंद्रबिंदू हा ग्रामीण मनुष्य होता. व्यक्ती व व्यक्ती जीवनाचा विकास यासाठी त्यांनी वेळोवेळी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

१. **विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण विकास**

महात्मा गांधीनी विकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला त्याचप्रमाणे त्यांना ग्रामीण भागाची प्रगती साधण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे यावर भर दिला. गावातील पंचायतींनी गावात सार्वजनीक सुविधांचा विकास करावा. ग्रामपंचायतीत पंचानी लोंकांचे तंटे मिटवावेत. पशुसंवर्धन दुध उत्पादनात वाढ, सार्वजनीक स्वच्छता, अस्पृश्यता निवारण इ. कामे करावीत.

भारतात सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण विकासाला नव्याने चालना मिळाली आहे. यामुळे स्थानिक राजकारणात महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले. यामुळे स्त्रियांच्या राजकीय सहभागास चालना मिळाली. व त्यांच्या राजकीय सहभागात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

**१.आत्मनिर्भरता व स्वावलंबन**

गावांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर असावे यावर महात्मा गांधी विशेष भर देतात. आत्मनिर्भर व स्वावलंबन हा मानवी जीवनाचा मुलभूत व महत्वपूर्ण घटक आहे. परावलंबीत्व हे मानवी जिवनाचे शोषण करते. व त्यामधुन हिंसेचा जन्म होतो. श्रीमंत लोक गरीब लोकांचे शोषण करतात. विकसीत देश अविकसीत देशाचे शोषण करतात. ते सर्व केवळ स्वावलंबन व आत्मनिर्भरतेच्या अभावामुळे होते. म्हणुन खेडे हे स्वावलंबी व आत्मनिर्भर असले पाहिजे. स्वत:च्या मुलभूत गरजांची पुर्तता ही खेड्यामधीच व्हावी. त्यासाठी कुटीरउद्योग, ग्रामउद्योग, हस्तकला इ. च्या माध्यमातुन रोजगाराची निर्मिती करणे आवश्यक आहे.

**३.कृषि विषयक विचार:**

गांधीजी कृषि व्यवसायास अधिक महत्त्व देत. गांधीजीच्या मते देशांच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी कृषी हा एकमेव व्यवसाय आहे. खेड्यातील सावकार पध्दतीस महात्मा गांधी विरोध करतात. सावकारांकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते. याचा परिणाम केवळ त्या शेतकऱ्यावरच नाही तर त्याच्या व्यापारावरही होतो. तेव्हा कृषी विकासासाठी सिंचन सुविधा उपलब्ध करणे, स्वस्त दरात शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणे इ. कामे केली जावेत यामुळे ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर कृषी व्यवसायास पुरक व्यवसाय म्हणुन ग्रामीण भागात कुटीरद्योग व पशुपालनास चालना देणे तितकेच आवश्यक आहे.

कुटीरद्योगामुळे रोजगाराच्या विविध संधी उपल्बध होऊन ग्रामीण विकासास चालना मिळते. तर याउलट यांत्रिकीकरणास प्रोत्साहन दिल्यास श्रमिकांपासून त्यांची कामाची संधी हिरावून घेतली जाते. महात्मा गांधीच्या मते, यंत्रे आधुनिक सभ्यतेचे एक वैशिष्ट्य होऊन बसले आहे. मात्र ते एक महापाप आहे. कारण त्यातून माणवाच्या चांगल्या असणाऱ्या परस्पर भावनांचा शेवट होतो. आणि बेराजगारी व शोषणाच्या प्रमाणात वाढ होते.

**ग्रामीण विकासापुढील समस्या:**

१. राजकीय जागृतीचा अभाव
२. निरक्षरता
३. भारतात लोकशाही विरोधी सामाजिक परिस्थिती
४. शक्तीशाली घटकांचे दुर्बल घटकांवर नियंत्रण
५. जातीय आणि धार्मिक निष्ठा
६. रोजगाराचा अभाव
७. पायाभूत सुविधांचा अभाव
८. आर्थिक निर्भरता

या समस्या ग्रामीण विकासात अडथळा असल्यास तरी त्यावर ठोस उपाय योजना राबविल्यास ग्रामीण भागाचा विकास साधने शक्य आहे.

**उपाययोजना:**

१. राजकीय जागृती निर्माण करणे
२. निवडणूक प्रक्रीयेत जनतेचा सहभाग वाढवणे तसेच महिलांचा राजकीय सहभाग वाढवणे यावर विशेष लक्ष देणे.
३. ग्रामीण भागातील लघुद्योग व कुटीरद्योगाला चालना देणे
४. राजकीय पक्षांचा मर्यादीत हस्तक्षेप असावा.

५. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच शेतीवर आधारित उद्योगांना व रोजगाराला चालना देणे.
६. केंद्र, राज्य, स्थानिक स्तरावर समन्वय स्थापन करणे.
७. ग्रामीण संशोधन व विकासावर भर देणे.

**समारोप:**

भारत हा कृषि प्रधान खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास म्हणजे देशाचा विकास खेडे हे जितके स्वावलंबी, स्वयंपुर्ण, स्वायत्त बनते तितकीच देशाची प्रगती होईल म्हणुन आजही महात्मा गांधीचे हे विचार ग्रामीण विकासास मार्गदर्शक ठरताना दिसतात. ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. त्यामुळे शासनाने स्वातंत्र्यांच्या काळात ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणावर योजना राबविलेल्या दिसून येतात. महात्मा गांधीजींचे हे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांच्या विचारांना अनुभवांचा आधार असल्यामुळे हे विचार आजही आपणास मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भसुची:**

१. पाटील. एस. एच, गांधी आणि स्वराज, दिप आणि दिप पब्लीकेशन, नवी दिल्ली, १९८३.
२. जाधव श्रीराम, गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्ययन केंद्र देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद, २००९.
३. पाटील प्रतिभा (डॉ.), पाटील अजय (डॉ.), आरगडे अंबादास, महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, २०१३.
४. चव्हाण पंजाब (डॉ.), भिसे रामचंद्र (डॉ.), जवळगे हनुमंत, हट्टेकर विजय (डॉ.), गांधी तत्त्वज्ञान आणि भारतीय लोकशाही, ओन पब्लिकेशन, दिल्ली, २०१३.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू

प्रा.सतिष .एम. कटके

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय देवळाली प्रवरा, ता.राहुरी जि. अहमदनगर

---

प्रस्तावना :-

29 व 30 जानेवारी 2007 मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी वक्तवे केले कि जागतीकीकरण,उदारीकरण, व खाजगीकरणाच्या काळातही महात्मा गांधीजींच्या विचाराचे विविध पैलू"खुले दरवाजे आणि खुली खिडक्या आसलेले घर " स्वरुपात वैचारिक खुलेपनाला दर्शवतात. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या लढयापासून ते आज पर्यंतगांधीचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक,शैक्षणिक,पर्यावरण, औद्योगिक, व्यवस्थापकीय, सत्य, अहिंसा, सत्याग्रह ,ग्रामस्वच्छता,शरीरश्रम, महिला व बुध्दिमत्ता विषयी विचार व्याहारिक आणि मार्गदर्शक स्वरूपाचे ठरतात.अनेकांना गांधी विचारांचे विविध पैलू जाती, धर्म, वर्ण-वर्ग भेदभाव न करता प्रत्येक मनुष्याला पुरेशी संधी, सहभाग व अधिकार देण्याची शिफारस करतात.प्रत्येक वर्षी महात्मा गांधीजींची जयंती 2 ऑक्टोबर ला जागतिक अहिंसा दिवस म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने घोषणा करून विरोधरहितव हिंसामुक्त जग निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.गांधींचे विचार देश, काळ व वर्तमान स्वरुपात व्यावहारिक स्वरूपाचे आहेत. गांधीच्या वेळी ज्या समस्या होत्या त्यापेक्षा कितेक पटीने आजही जगासमोर आहेत. भ्रष्टाचार, अनैतिकता, जातिवाद, चारित्र्याचा ऱ्हास, हिंसा, गुन्हेगारी, दहशतवादी हल्ले, युद्ध अशा अनेक समस्या आहेत.सुख, समृद्धी, निरामय, आंनदी, भयमुक्त, शांतता,अहिंसा व सबलीकरण जीवनाची शाश्वती 21 व्या शतकात गांधी विचारांच्या विविध पैलूमुळे शुद्धता आजही टिकून आहेहे जगाने मान्य केले आहे.

❖ शोधनिबंधाचे उदिष्टे :-

1)गांधींच्या ऐतिहासिक विचारांचा शोध घेणे.

2)आजच्या काळात गांधींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक,शैक्षणिक, पर्यावरण, औद्योगिक, व्यवस्थापकीय व बुध्दिमत्ता विषयी विचारांच्या व्याहारिक बाबींचा शोध घेणे.

३)गांधींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह विचारांचा शोध घेणे.

4)गांधींच्या सुख, समृद्धी, निरामय, आंनदी, भयमुक्त, शांतता, व सबलीकरण जीवनाची शाश्वती या विचाराच्या शुद्धतेचा शोध घेणे.

5)21 व्या शतकात गांधींच्या नैतिक बाबींचा शोध घेणे.

❖ शोधनिबंधाचे महत्त्व :-

1)गांधींचे ऐतिहासिक विचार आजही मार्गदर्शक आहेत.

2)आजच्याही काळात गांधींच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक,शैक्षणिक, पर्यावरण, औद्योगिक, व्यवस्थापकीय व बुध्दिमत्ता विषयी विचारांची व्याहारिकता महत्त्वपूर्ण आहे.

3)गांधींच्या सत्य, अहिंसा व सत्याग्रह बाबतचे विचार जगात उपयोगी आहेत.

4)गांधींच्या सुख, समृद्धी, निरामय, आंनदी, भयमुक्त, शांतता, व सबलीकरण जीवनाची शाश्वती या विचाराच्या शुद्धता जगामध्ये टिकून आहे.

5)21 व्या शतकात गांधींच्या नैतिकतेमुळे हिंसा व युद्ध थांबवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते.

❖ संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. वृतपत्र लेख, संदर्भ पुस्तके, दुरचित्रवाणी वरील बातम्या, व निरीक्षण तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

❖ महात्मा गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू :-

1)गांधींचे सत्य. प्रेम व अहिंसे बाबतविचार :-

मागील सारे शतक हे हिंसेचे व शोषणाचे होते. हिरोशिमा नागासाकी वरील बॉम्बहल्ले, दोन महायुद्ध, अनेक देशात दहशतवादी हल्ले, अनेक युद्ध यामुळे सारे जग ढवळून निघालेव चिंताग्रस्त झाले. गांधीच्या विचाराचे सूत्र सत्य,प्रेम, अहिंसा या त्रिसूत्रीत सहज मांडता येईल अहिंसा म्हणजे फक्त हिंसा न करणे, कोणालाही ठार न मारणे म्हणजे अहिंसा नव्हे. अहिंसा ही सकारात्मक संकल्पना असून त्यात जगण्याचे तत्व मान्य केले आहे.स्वत जगा व इतरानाही जगण्यास मदत करा.या इतरात गांधीनी मनुष्य,प्राणी,पृथ्वी,निसर्ग व संपूर्ण जगाचा विचार केला आहे. स्नेहाच्या तत्त्वालाच गांधीनी अहिंसा हे नाव दिले, प्रेम किंवा स्नेह एकच आहे. अहिंसा परमो धर्म हे सामाजिक मूल्य आहे.त्यांच्या अहिंसेत विरवृतीचा व निर्भयतेचा समावेश होतो.अहिंसा हे सर्वश्रेषठ बल आहे. विनम्र असल्याशिवाय मनुष्य अहिंसावादी बनू शकत नाही. अहिंसेसाठी चरित्र निष्कलकता, सत्य-निर्भय हे गुण आवश्यक आहेत. मनाची हिंसा देखील गांधीना मान्य नव्हती.द्वेष,बौद्धिक नैतिक गैरवर्तन म्हणजे देखील हिंसा होय. अहिंसा मनुष्याच्या जीवनात प्रेम,आनंद,निरागसता वसातविक्ता या नैतिक गुणांना रुजवतात व सत्याचा आग्रह धरतात.

1) गांधींचे राजकीय विचार :-

गांधीनी चांगल्या समाजासाठी राज्यविहीन समाज सांगितले होते. मात्र आज राज्याचे स्वरूप कल्याणकारी झाले आहे. राज्य हिंसेवर आधारित असेल तर अनैतिकता व शोषण केले जाते. पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार करीत सत्तेचे विकेंद्रीकरण ग्रामीण पातळीवर केल्याचे दिसून येते. भारतासारख्या खेड्याच्या देशात राजकीय सहभागाला प्राधान्य दिले आहे.सत्य, अहिंसा, सदाचार,नैतिकता या मानवीय मूल्यांना राजनीती मध्ये स्थान देऊन राजनीतीचे अध्यात्मीकरण केले आहे.राजकारणात जातीय व प्रादेशिक एकतेवर भर दिला जात आहे.आज राजकारणात हिंसा,भ्रष्टाचार,अनैतिकता, गुनेहेगारीकरणअशा विषमता दिसून येतात. गांधीचा राजकीय अध्यात्मिकरन व्यावहारिक आहे. राजकारणात चांगल्या व चारित्र्यवान लोकांच्या सहभागासाठी बदल आवश्यक आहे.आज राज्य नैतिक साधन आहे.गांधीने बहुमताचे शासन व प्रतिनिधित्व मान्य करून राजकारणात चांगला पायंडा घातला आहे.या गांधीच्या राजकीय विचारामुळे राजकारणाचे शुद्धीकरण करता येते ही बाब मान्य करावी लागेल.

2) गांधींचे धार्मिक विचार :-

विषमता सर्व क्षेत्रात आहे. देश धार्मिक पारमार्थिक आहे पण खऱ्या अर्थाने तो पारलौकिक आहे. गांधीजीचा अध्यात्म माझे घर चोहो बाजूनी बंद खिड्क्याचे असावे नाही देशो देसिच्या संस्कृतीचे वारे माझ्या घरातून सस्वच्छंद वाहतील आहे माझा धर्म हा बंदीखाण्यासारखानाही.गांधीने धर्माच्या भूमिकेला मानवी जीवनात महत्वाचे मानले आहे. सर्व धर्म समभाव स्वीकारले आहे. धर्माबाबत विचार आपलेपणाची भावना निर्माण करण्यास उपयोगी ठरतात. जुन्या रूढी परंपरेचा विरोध करून नव्या मूल्याचा स्वीकार करतात.गांधी श्रद्धावान व धार्मिक संस्कारात वाढले होते.प्रत्येक धर्म प्रेम व अहिंसा या मुल्यांचा स्वीकार करतो.विश्वधर्म व मानवताधर्म असे विचार गांधी स्वीकारतात.मनुष्य

सेवा हीच ईश्वर सेवा होय.गांधीनी धर्म व राजकारणाचे समन्वय घडून आध्यात्मीकरण केले. सर्व धर्माची मुलतत्वे सारखीच असतात.असा आशावादी विचार मांडला.

3) गांधींचे पर्यावरण विषयक विचार :-

आज माणूस आणि कलह सारखा वाढतो आहे. भौतिक विज्ञानाच्या अविवेकी प्रगतिद्वारे प्रकृती ही माणसाला भुरळ पाडत आहे. सगळीकडे स्वताच्या सुखासाठी व नफ्यासाठी सृष्टीराबून घेण्याची वृत्ती माणसामध्ये बळावत आहे.या भोगवादी स्थूल वृत्तीमुळे पर्यावरणाचे शोषण करून आम्ही अनेक संकेटे ओढून घेतली आहेत. समुद्राच्या पाण्याची उष्णता सारखी वाढत आहे.त्यामुळे निसर्गासी केलेली मजबुरी/दांडगाई महागात पडती आहे. त्यासाठी केंद्र व महाराष्ट्र सरकारने अनेक योजना आखल्या आहेत.वर्षानुवर्ष जंगल कटाई त्यामुळे प्राकर्तिक समतोल ढासळत आहे. त्यामुळे मनुष्याच्या जीवनात असंतोलन निर्माण झाले आहे. पिण्याचे पाणी प्रश्न भेडसावत आहे. यापुढे महायुध्य पानिप्रश्नावरून होईल अशी भीती वाटते. त्यामुळे गांधीच्या विचाप्रमाणे झाडे लाऊन पर्यावरणाचे संरक्षण करता येते.हवा, पाणी व अन्न शुद्ध व आवश्यक मिळाल्यास मनुष्याचे जीवन सुखकर होईल त्यासाठी गांधीनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता.सार्वजनिक पाणी, उर्जा वाया जाता कामा नये. आज माणूसपण हरवले आहे. वार्मिंग, दुष्काळ, पूर व वादळ अशा समस्या पर्यावरणाच्या दुष्परिणामामुळे झाले आहे.

4) गांधींचे अस्प्रश्यता निवारण विषयक विचार :-

गांधीना अस्प्रश्यता निवारण्यास रस होता. अस्प्रश्यता संपल्यास आपोआपच जातीव्यवस्था विरून जाईल. गांधी समाजाचे मनपरिवर्तन करू इच्छित होते. गांधीचा वर्णाश्रम स्वच्छ अन्न देणाऱ्या कोनासाठीही भोजन करण्याची परवानगी देतो.,मग तो हिंदू असो,मुस्लिम,ख्रिश्चन अथवा अन्य कोणी अतिशूद्र कुटुंबासोबत भोजन घेण्यास मोठ्या आनंदाने परवानगी देतो- किंबहुना ति एक सुसंधी असेल असे मानतो. ज्ञान, पावित्र्य, आणि ज्याच्यात देवत्वाचा अनुभव यईल अशा प्रत्येक माणसापुढे विनम्रतेने नतमस्तक होण्याची सक्ती करतो. वैयक्तिक पातळीवर गांधीनी जातिव्यवस्थेचा विरोध केला होताच शिवाय विकृत वर्णव्यथेच्या विरोधात ठराव करण्याचा विचार चालू होता.हरिजन मध्ये गांधीनी वर्णाश्रमधर्म मानणाऱ्या व न मानणाऱ्या हिंदू सुधारणावाद्याना आजवर बहिष्कृत असलेल्या अस्पृश्यांशी व्यवहार करण्याची मान्यता दिली हिती. हे विसरता कामा नये.

5) गांधींचे महिला सबलीकरणाविषयी विचार :-

गांधीनी महिला सबलीकरणासाठी स्वातंत्र्य चळवळीपासूनच महिलांना विज्ञेने, विश्वास व सहनशक्तीने कणखर मन बनविण्यासाठी नेतृत्वाची संधी मिळवून दिली.त्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग दिसून येतो.जागृत महिला गांधी विचाराचा वारसा घेऊन गावपातळीवर दारू बंदीसाठी आंदोलने व विधायक कार्यात हिरीरीने सहभाग घेताना दिसून येते. महिलांना संघटीत करून त्यांच्या मध्ये आत्मबल निर्माण करण्याचे कार्य गांधीने केले. 14-15 वर्षाच्या मुलीपासून ते 60 वर्षाच्या म्हातारी पर्यंत सर्वांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.महिलांना सामाजिक,राजकीय,आर्थिक, शैक्षणिक, ते वैयक्तिक पातळीवर सबळ करण्यासाठी आणि त्यांचे अधिकार मिळून देण्यासाठी हिंद सेविका संघाची स्थापणा केली. कोणत्याही निदेची परवा न करता एक एक हरिजन मुलगी आपल्या कुटुंबात ठेवले.नगरच्या मुस्लिम महिलांना पडद्यापासून मुक्त केले, त्यांना चरका चालविण्याचे शिक्षण दिले आजही हिंद सेविका संघ नगरचे भूषण आहे.गांधीनी जागृत केलेल्या अनेक महिलांनी स्वातंत्र्य चलवळीत धडाडीने भाग घेतल्याचे दिसून येते. इतकेच नाही तर महिला व पुरुषांना समान लेखले आहे. त्यांनी देवदासी प्रथा, पर्दाप्रथा, बालप्रथा अश्या अनेक वाईट प्रथेचा कडाडून विरोध केला आहे. महिलांना स्वतंत्र व पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन काम करण्याचे मार्गदर्शन केले आहे.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

6) गांधींचे तरून युवकाविषयी विचार :-

गांधी स्वत तारुण्याचे प्रतिक आहेत युवकांना लाजवेल आसे त्यांचे कार्य व विचार आहेत. गांधीनी युवकासाठी काही महत्वाच्या बाबी सांगितल्या आहेत 1) युवकांनी सुख अगर चैनीच्या वस्तूच मोह न ठेवता आपले कर्तुत्व व साहस दाखवले पाहिजे. 2) युवकांनी जुनाट बुरसटलेल्या मतप्रनाली ढोगी वागणुकीचा विरोध केला पाहिजे. ३) युवकांनी समर्पित जीवन जगण्यासाठी प्रयोजनांचा शोध घेतला पाहिजे. 4) युवकांनी नवे जग निर्माण करण्याचा वेडा उचलला पाहिजे. 5) युवकांनी शारीरिक व बौद्धिक कष्टाला महत्त्व देत स्वतावर विश्वास ठेवला पाहिजे. 6) युवकांनी कोणत्याही वेसनापासून दूर राहिले पाहिजे.

7) गांधींचे शैक्षणिक विचार :-

गांधींच्या मते शिक्षणाचा मुख्य उद्देश मनुष्याच्या शरीर, बुद्धी, आणि आत्म्याचा विकास करणे आहे. शिक्षणाने मनुष्याच्या चिंतन शक्तीचा विकास झाला पाहिजे. प्राथमिक शिक्षण कौशल्य आधारित आसवे, शिक्षणाचे माध्यम मात्रभाषेत दिले जावे, पारंपारिक व्यवसाय आधारित शिक्षण आसवे, शिक्षणाने चारित्र निर्माण झाले पाहिजे, शिक्षण स्वावलंबी बनण्यास उपयुक्त आसवे तसेच शिक्षणामध्ये प्रादेशिक,जातिवाद व धार्मिक असहिष्णुता अशा भावनेला भडकवणारे नसावे.आजही अशा शिक्षणाची उपयुक्तता दिसून येते.

8) गांधींचे औद्योगिक, व्यवस्थापकीय व स्वच्छते बाबतविचार :-

गांधीचे राहणीमान साधी व उच्च विचार दिसून येतात. भारतातील लोकांना रोजी रोटी मिळून देणारे साधन गावामध्येच उपलब्ध झाले पाहिजेत तेव्हाच रोजगार निर्माती वा विकासाला चालना देण्यासाठी गृहोद्योग, ग्रामद्योगावर भर दिला आहे. कारण खेड्यामध्येस्वयंमरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिले पाहिजे. त्यामुळे गावातील जनतेला रोजगार मिळून दारिद्रय,उपासमार व बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यास मदत होते. खादी हे फक्त वस्त्र नाही तर घाम शोषून घेण्याची वस्त्रात शक्ती आहे.गांधीनी ग्रामस्वच्छतेला ,कार्यक्रमाला महत्त्व दिले आहे. वैयक्तिक स्तरापासून ते स्थानिक,सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय पातळीपर्यंत स्वच्छतेची जाणीव निर्माण करून दिली आहे. " निरोगी शरीरातच निरोगी मान वास करते " या मानवी मूल्याचा उलेख करून आपण सर्व हिंसेचा त्याग करू, तुमचे पाणी, अन्न आणि हवा शुद्ध असली पाहिजे. तसेच सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व अस्वच्छता पसरविणे याचा विरोध करतात. तसेच व्यवस्थापकीय दृष्टीकोनातून वेळेवर निर्णय,दिलेले वचन गांधीनी वेळोवेळी पाळले आहे. माझ्या सत्याचे प्रयोग या ग्रंथातून स्वत:शीच स्वत: विरुद्ध टिका करून पडताळून पाहिले आहे.

❖ निष्कर्ष :-

मानवाच्या सुखी,समृद्ध, शाश्वत,आनंदी,निरामय, भयमुक्त व शांततामय जीवनाच्या प्राप्तीसाठी महात्मा गांधी विचाराचे विविध पैलू अत्यंत महतत्वपूर्ण दिसून येतात. त्यांचे सामाजिक.राजकीय, शैक्षणिक, महिला, आर्थिक असे अनेक विचार व्यावहारिक स्वरूपाचे दिसून येतात. आजच्या 21 व्या शतकातही त्यांचे महत्त्व टिकून आहे .गांधीचे विचार संपूर्ण जगाला नैतिकता,प्रेम,सत्य वा स्नेहाच्या भावनेने मानवतावादी आचार निर्माण करण्यास सह्यभूत ठरते.

❖ संदर्भसूची:-

1) सपादक: प्रा.नागोराव कुंभार, विचारशलाका, समकालीन सामाजिक चळवळी विशेषांक, लातूर,एप्रिल ते डिसेंबर 2016.
2) यशवंत सुमन, जातीअंताच्या चळवळीत फुले-आंबेडकर-गांधींचे योगदान,एप्रिल 2018 .
३) माणिक खेर, व्यावथापकीय चष्म्यातून गांधीजी, 2010 चा लेख.
4) भास्कर लक्ष्मण भोळे, परामर्श, हार्मिस प्रकाशन, डिसेंबर 2014.
5) रोहिणी गवाणकर, मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप, आदित्य प्रकाशन,मे 1986.
6) www.Googal.com

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# 'गांधीवादआणि मार्क्सवाद'

डॉ. पी. डी. सूर्यवंशी

राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.),जि. परभणी

---

गांधीवाद आणि मार्क्सवाद हे संपूर्ण जगाला प्रभावित करणारे अतिशय महत्त्वाच्या विचारप्रणाली म्हणून ओळखल्याजातात. गांधी आणि मार्क्स संपूर्ण जगाला परिवर्तनाची दिशा देणारे प्रतिभावान विचारवंत. दोघांच्याही विचारांचा कैंद्रबिंदू अखिल मानवतावाद त्यानुषंगाने समताधिष्ठित समाजरचना, आर्थिक समता, वर्ग विरहित, जातीविरहित, शोषण विरहितसमाज रचना, राज्याच्या अस्तित्वाला असणारा विरोध इत्यादी अनेक विचारांच्या बाबतीत कार्ल मार्क्स व महात्मा गांधी या दोन्हीही विचारवंतांच्या विचारांमध्ये समानता दिसून येते. परंतु याचा अर्थ गांधीवादी तत्त्वज्ञान आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञान एकच आहे असा होत नाही. वरवर पाहता समान दिसणारे मुद्दे हे साध्याच्या अनुषंगाने मांडलेले आहेत.साध्यकिंवा ध्येयया दृष्टीने विचार केल्यास दोन्ही विचारवंतांनी ज्या आदर्श समाजाचे स्वप्न पाहिले आहे ते मात्र एकच आहे. परंतु प्रत्यक्षात सैद्धांतिक मांडणी करताना मात्र दोघांच्याही विचारांमध्ये विरोधाभास मोठ्या प्रमाणात दिसून येतो.प्रामुख्याने साध्य-साधन सूचीतेच्या बाबतीत विचार केल्यास गांधी आणि मार्क्स हे दोन टोकाचे विचार असल्याचे दिसून येते. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांची तुलना केल्यास या दोन्ही विचारधारेतील भेद स्पष्ट होईल. गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणारे काही मुद्दे खालीलप्रमाणे सांगता येतील.

**साध्य-साधन सूचीता:**

गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोन्ही विचारप्रणाली मधील सर्वात महत्वाचा मतभेदाचा मुद्दा आहे तो म्हणजे साध्य-साधन सूचितेच्या बाबतचा. दोन्ही विचार प्रणालींचे ध्येय जरी समान असले तरी सुद्धा ते ध्येय साध्य करण्यासाठी ज्या साधनांचा किंवा ज्या मार्गांचा वापर करावयाचा आहे त्याबाबत मात्र दोन्ही विचार टोकाची भूमिका घेतात. गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोन्ही विचार प्रणालींमध्ये साधन सूचीतेच्याबाबतीत परस्पर विरोध आढळतो. गांधीवादांमध्ये सत्य आणि अहिंसेच्या मार्गाचा वापर करण्यावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे.साध्य साधन सूचीतेच्याबाबतीत गांधीवाद असे म्हणतो की, साध्यजेवढे नैतिक आहे तेवढेच साधनांच्या बाबतीत सुद्धा नैतिकता असली पाहिजे. केवळ साध्य आदर्श असून चालणार नाही तर त्या साध्याच्या प्राप्तीसाठी ज्या मार्गांचा वापर करावयाचा आहे तो मार्ग सुद्धा आदर्श असला पाहिजे. याउलट मार्क्सवादांमध्ये मात्र साध्य पूर्ण करण्यासाठी हिंसेच्या मार्गाचा पुरस्कार करण्यात आला आहे. मार्क्सवाद नैतिक-अनैतिक अशा कोणत्याही आचारसंहितेच्याभानगडीत पडत नाही.मार्क्सवादामध्ये ध्येय साध्य करण्यासाठी हिंसेच्या मार्गाचापर्याय खुला आहे. किंबहुना मार्क्सवादहिंसेच्यामार्गाला प्राधान्य देतो. जोपर्यंतकामगार क्रांती ही सशस्त्र असणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने परिवर्तन होणार नाही. ध्येय साध्य होणार नाही. एकंदरीतमार्क्स रक्तपाताच्या किंवा सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार करतो. माओया विचारवंतांनेसुद्धा 'क्रांती ही बंदुकीच्या नळीतून घडून येते' असे म्हटले आहे. स्वतः मार्क्स कामगारांना आवाहन करताना म्हणतो की, जोपर्यंत तुम्ही भांडवलदारांची डोकी फोडणार नाहीत तोपर्यंत क्रांती साध्य होणार नाही. थोडक्यात साध्य-साधन सूचीतिच्याबाबतीत गांधीवाद आणि मार्क्सवाद हे दोन्ही परस्पर विरोधी टोकाचे विचार आहेत.

**सत्य आणि अहिंसा:** गांधीवादामध्ये सत्य आणि अहिंसाही दोन मूल्य कैंद्रस्थानी मानली आहेत. तथागत गौतमबुद्धा नंतर सत्य आणि अहिंसेचा विचार संपूर्ण जगाला प्रभावीपणे पटवून देणारा विचार म्हणजे गांधीवाद होय. गांधीवादामध्ये नैतिक मूल्यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. गांधीवादांमध्ये सत्याग्रह हा परिवर्तनाचा

अतिशय महत्त्वाचा मार्ग सांगितला आहे. सत्याग्रह करत असतानायामूल्यांनामहत्त्व देण्यात आले आहे. सत्याग्रहीकडूनआदर्शआचारसंहितेचेपालनअभिप्रेतआहे. सत्य आणि अहिंसा या दोन्ही परस्पर पूरक आहेत. या दोन्हीपैकी एकाच मूल्याचा स्वीकार करण्याची वेळ आली तर एक वेळेस अहिंसा सोडली तरी चालेल परंतु सत्य कधीही सोडता कामा नये. असा आग्रह गांधीवादात धरण्यात आला आहे. सत्याग्रहाचे पालन करताना अनेक नैतिक मूल्यांची जोपासना आणि आदर्श आचारसंहिता गांधीवादांमध्ये सांगण्यात आलेली आहे. याउलट मार्क्सवादांमध्ये मात्र सत्याच्या बाबतीत कोणतीही भूमिका घेण्यात आलेले नाही. परिवर्तनाचा एक मार्ग म्हणून हिंसेचा किंवा सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. त्याबाबत कोणतीही नैतिक किंवा अनैतिक विचार मार्क्सवादात मांडण्यात आलेला नाही.मार्क्सवादामध्ये क्रांती करत असताना कोणत्याही प्रकारची आदर्श आचारसंहिता सांगण्यात आलेली नाही.

**अध्यात्मिक विचार:** गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोन विचारप्रणाली मधील फरक स्पष्ट करत असताना एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गांधीवादाला अध्यात्मिकतेची जोड देण्यात आलेली आहे. गांधीवाद यामध्ये प्रत्येक सिद्धांताची मांडणी करत असताना त्यामध्ये अध्यात्मिकतेची जोड देण्यात आलेलीआहे. अगदी राजकारणाचे सुद्धा अध्यात्मिकीकरण करण्यात आलेले आहे. गांधीवादामध्ये धर्माचे महत्त्व मान्य करण्यात आलेले आहे. मानवी जीवनामध्ये धर्माची भूमिका ही महत्त्वाचीआहे. धर्माशिवाय सामान्य माणूस क्षणभरसुद्धा जीवन जगू शकणार नाही असा विचार गांधीवादात स्वीकारला आहे.याउलट मार्क्सवादांमध्ये मात्र धर्माला कोणतेही स्थान देण्यात आलेले नाही. खऱ्या अर्थाने धर्माचे अस्तित्व नाकारणारा निधर्मवादी असा हा विचार आहे.मार्क्सवादांमध्ये धर्म ही एक अफूची गोळी आहे अशी भूमिका घेतली आहे.

**लोकशाही शासनव्यवस्था:** तत्वतः विचार केल्यास गांधीवाद आणि मार्क्सवाद दोन्ही विचारप्रणाली राजकीय शासनव्यवस्थेला विरोध करतात. परंतु परिपूर्ण समाजाची निर्मिती होईपर्यंत संक्रमणकालीन अवस्था म्हणून दोन्ही विचारप्रणाली मध्ये राजकीय व्यवस्थेचे समर्थन करण्यात आले आहे. परंतु ही राजकीय व्यवस्था तात्पुरत्या कालावधीसाठी असेल. अपेक्षित असलेला मानवी समुदाय अस्तित्वात आल्याबरोबर राजकीय व्यवस्था सुद्धा विलीन होईल. अशा प्रकारचा विचार स्वीकारण्यात आला आहे. गांधीवादांमध्ये राजकीय व्यवस्थेच्या बाबतीत भूमिका घेत असताना लोकशाही शासनव्यवस्थेचे समर्थन गांधीजींनी केले आहे. कारण खऱ्या अर्थाने चर्चा, विचार विनिमय, स्वातंत्र्य, समता या मूल्यांवर आधारित असलेली लोकशाही शासनव्यवस्था गांधीवादामध्ये अभिप्रेत आहे. याउलट मार्क्सवादांमध्ये मात्र वर्गक्रांती घडून आल्यानंतर संक्रमणकालीन राजकीय व्यवस्थेचा स्वीकार करत असताना कामगार वर्गाच्या हुकुमशाहीचा पुरस्कार करण्यात आला आहे. भांडवलशाहीचे समूळ उच्चाटन करण्यासाठीमार्क्सवादात कामगार वर्गाच्या हुकूमशाहीची अपरिहार्यता मान्य करण्यात आली आहे. या हुकूमशाही शासनव्यवस्थेकडून भांडवलशाहीचे समूळ उच्चाटन आणि साम्यवादी समाजरचनेची निर्मिती करण्याची अपेक्षा करण्यात आली आहे.

**विकेंद्रीकरणाचा स्वीकार:** गांधीवादामध्ये प्रमुख्याने राजकीय आणि आर्थिक सत्तेची संकल्पना मांडत असताना विकेंद्रीकरणाच्या सिद्धांताचा स्वीकार करण्यात आला आहे. राजकीय सत्तेच्या बाबतीत गांधीवादामध्ये स्वयंचलित समाज निर्मितीची अपेक्षा करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक स्तरावर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे अशी भूमिका गांधीवादात घेण्यात आली आहे. स्वयंपूर्ण ग्राम ही गांधीवादातील अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. ग्रामपातळीवर ग्रामपंचायतींना आर्थिक, राजकीय, न्यायविषयक इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये सत्ता प्राप्त झाली पाहिजे अशी भूमिका गांधीवादात घेण्यात आली आहे. अशाप्रकारे अनेक स्वयंपूर्ण ग्राम मिळून एक नवीन समाजवादी समाज निर्माण करण्याचे स्वप्न गांधीवादामध्ये सांगण्यात आले आहे. आर्थिक क्षेत्राच्या बाबत सुद्धा विकेंद्रीकरणाचे समर्थन गांधीवादात करण्यात आले आहे. गांधीवादांमध्ये उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण करण्याऐवजी लघु

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

आणि आणि कुटीर उद्योगांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आलेले आहे. व्यापक प्रमाणात यांत्रिकीकरण किंवा औद्योगीकरणाला गांधीवादामध्ये विरोध करण्यात आला आहे. उलट मार्क्सवादांमध्ये मात्र विकेंद्रीकरण ऐवजी केंद्रीकरणाच्या सिद्धांताचा स्वीकार करण्यात आला आहे. राजकीय सत्तेच्याबाबतीतकामगारवर्गाची हुकूमशाही मार्क्सवादात अपेक्षित आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या सत्ता या कामगार वर्गाकडे केंद्रित झाल्या पाहिजेत असा आग्रह मार्क्सवादाचा आहे. आर्थिक क्षेत्रामध्ये सुद्धा उद्योगांचे राष्ट्रीयीकरण किंवा सार्वजनिकीकरण करण्यावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. परंतु लघुउद्योगांचा कोणताही विचारमार्क्सवादामध्ये सांगण्यात आलेला नाही

**वर्गसमन्वय:** गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्यातील फरक स्पष्ट करत असताना वर्ग समन्वयाचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. याबाबतीत दोन्ही विचारप्रणाली मध्ये परस्पर विरोधी भूमिका घेतलेली दिसून येते. गांधीवादांमध्ये वर्गसमन्वयाची भूमिका घेण्यात आलेली आहे तर मार्क्सवादांमध्ये वर्गसंघर्षाची भूमिका घेण्यात आलेले आहे. गांधीवादामध्ये श्रीमंत आणि गरीब यांच्यातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आणि हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने त्यामध्ये आर्थिक समता प्रस्थापित करणे महत्त्वाचे मानले आहे. त्यासाठी विश्वस्तची संकल्पना मांडण्यात आलेले आहे. याप्रमाणेच उच्च जाती व शुद्र जाती यांच्यातील सामाजिक विषमता संपुष्टात आणण्यासाठी अस्पृश्यता निर्मूलन जातीभेदाचे निर्मूलन यासारख्या मार्गांचा वापर करण्यास सांगितले आहे.मार्क्सवादांमध्ये मात्र वर्गसमन्वयाची भूमिका घेण्यात आलेली नाही. भांडवलदार आणि कामगार या दोन्ही वर्गांचे हितसंबंध परस्पर विरोधी असल्यामुळे त्यांच्यामध्ये वर्गसमन्वय अशक्य आहे त्यामुळे संघर्षाची अपरिहार्यता हा सिद्धांत मार्क्सवादांमध्ये सांगण्यात आलेला आहे. भांडवलदार आणि कामगार वर्ग आणि कामगार वर्ग यामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य आहे. या दोन्ही वर्गांमध्ये कधीही समन्वय होऊ शकणार नाही कारण दोन्ही वर्गाचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत. त्यामुळे वर्गसंघर्षाची भूमिका आणि वर्गभावना निर्माण होण्यासाठी अनेक सिद्धांताची मांडणी मार्क्सवादात करण्यात आली आहे. जेणेकरून कामगार वर्गामध्ये वर्गभावना मोठ्या प्रमाणात वाढीस लागेल.

**विश्वस्ताची संकल्पना:** गांधीवादामध्ये आर्थिक समता प्रस्थापित करण्यासंदर्भात गांधीजीने नैतिक आणि अहिंसात्मक मार्ग सांगत असताना विश्वस्तासंबंधीची संकल्पना मांडली आहे. गांधीवादांमध्ये जर ही संकल्पना प्रत्यक्षात अस्तित्वात आली तर आर्थिक समता प्रस्थापित होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. या संकल्पनेनुसार संपूर्ण संपत्ती ही ईश्वराची मान्य करण्यात आलीआहे. अनेक व्यक्तींकडे विशेषतः श्रीमंत व्यक्तींकडे अतिरिक्त संपत्ती आहे.ही संपत्ती त्यांच्या मालकीची नसून ते केवळ त्या संपत्तीचे विश्वस्त आहेत आणि विश्वस्त म्हणून अतिरिक्त संपत्तीचा उपयोग समाजकल्याणासाठी केल्या गेला पाहिजे. जर श्रीमंतांकडे अतिरिक्त संपत्तीचा वापर दारिद्र्य निर्मूलनासाठी आणि समाज कल्याणासाठी केल्या गेला तर समाजामध्ये आपोआपच आर्थिक समता प्रस्थापित होईल असा विश्वास गांधी वादात व्यक्त करण्यात आला आहे.मार्क्सवादामध्येमात्र आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचे समर्थन करण्यात आले आहे.आर्थिकसमताप्रस्थापितकरण्याची जबाबदारी कामगारांची हुकूमशाही या व्यवस्थेकडे सोपविण्यात आलेली आहे. उद्योगांचे राष्ट्रीयीकरण आणि उद्योगधंद्यांवर सामूहिक मालकी प्रस्थापित करून आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा विचार मार्क्सवादांमध्ये स्वीकारण्यात आला आहे.

एकंदरीत गांधीवाद आणि मार्क्सवाद या दोन्हीही विचारप्रणालींची तुलना केल्यास हे स्पष्ट होते की, या दोन्हीही स्वतंत्र विचारप्रणाली आहेत.दोन्ही विचारप्रणाली विविध राजकीय व्यवस्थांचा आधार बनू पाहत आहेत. परंतु प्रत्यक्षात दृश्य स्वरूपात जे परिणाम समोर येत आहेत त्यावरून मार्क्सवादाच्या मर्यादा निश्चित झालेल्या

आहेत. म्हणूनच अखिल मानवजातीच्या हिताच्या दृष्टीने विचार केल्यास गांधीवाद ही एक जागतिक शांतता आणि अखिल मानवजातीच्या उत्थानासाठी आशेचा किरण म्हणून समोर येत आहे.

संदर्भसूची


1. आधुनिकभारतातीलराजकीयविचारवंतडॉ. भा. ल.भोळे
2. गांधी दर्शन की रुपरेखा, डॉ. अखिलेशप्रकाश दुबे
3. समाजवाद आणि सर्वोदय तुलनात्मक विवेचन, श. द. जावडेकर
4. समकालीन राजनीतिक विचारक, डॉ. सिंह गहलोत
5. गांधी के विचारों की 21 वी सदी मे प्रसंगीकता, मानक जैन
6. गांधी सामाजिक राजनीतिक परिवर्तन, हरीश कुमार
7. प्रमुख राजकीय विचारप्रणाली,डॉ. उमाकांत सावंत, प्रा. प्रभाकर सूर्यवंशी
8. महात्मा गांधीजींचे आर्थिक आणि अर्थव्यवस्थेविषयी विचार, डॉ. सुजाता गायकवाड

# महात्मा गांधी आणि अस्पृश्यता निवारण : एक अभ्यास

**गणेश मदनराव शिंदे**
**संशोधक विद्यार्थी, नाटयशास्त्र विभाग, डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी भारतातील सर्वच जाती धर्माने पंथांनी स्वीकारलेला त्याच बरोबर सर्वाधिक टीका झालेला महान व्यक्ती. गांधींवर आज पर्यंत जगभरात शेकडो पुस्तके लिहिली गेली. तसेच त्यांच्यावर अनेक आरोपही झाले. मृत्यूच्या सत्तर वर्षांनंतरही ते होतच असतात. त्यातील एक म्हणजे गांधी जातीयवादी, वर्णव्यवस्था मानणारे होते. अलीकडेच गांधी विरोधकच नव्हे तर काही डाव्या विचारवंतांनी देखील गांधींवर असे आरोप केले होते हे आरोप अर्धसत्य ठरतात हे मात्र निश्चित. गांधीशी सार्वजनिक जीवनाच्या सुरुवातीला चातुर्यवर्ण्य व्यवस्था मानत होते. हे सत्य असले तरी शेवटपर्यंत ते याच मतावर कायम राहिले असे नाही. जातीय व्यवस्थेचे नंतर ते प्रखर टीकाकार बनले सामाजिक समतेसाठी कायम प्रयत्नशील राहिले. 1918 साली महात्मा गांधी जाहीरपणे म्हणतात की या देशाच्या सर्वोच्चपदी भंग्याची वा चांभाराची मुलगी असणं हे माझं स्वप्न आहे आणि तोच माझ्या स्वातंत्र्याचा अर्थ आहे.

नागपूरच्या 1920 च्या काँग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव ते स्वतः मांडतात. येरवडा तुरुंगातून सुटल्यावर गांधींनी साडेबारा हजार मैलाची हरिजन यात्रा काढली होती. याच यात्रेदरम्यान त्यांच्यावर पुण्यात बॉम्बहल्ला झाला. गांधी त्यातून सहीसलामत बचावले. पण हा निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. धर्म ग्रंथाविषयी त्यांच्या मनात आदरभाव होता. तरी सामाजिक समतेच्या विशेषतः अस्पृश्यतेच्या बाबतीत धर्मशास्त्रातील विधाने तर्क व निती यांना धरून नाहीत. असे त्यांचे मत होते. अस्पृश्यता हिंदू धर्माशी विसंगत आहे. तो अधर्म आहे. अशा शब्दांत त्यांनी अस्पृश्यतेला विरोध केला होता. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात नैतिकतेची एक मंद का होईना ज्योत पेटलेली असते, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांच्या मांडणीमध्ये धार्मिक परिभाषा दिसते.

<u>विषय विवेचण</u> :

गांधी-आंबेडकर यांच्यातील फरक म्हणजे अस्पृश्यता निवारण करण्यासाठी गांधींनी वेळोवेळी आपले विचार मांडले आहेत. त्यादृष्टीने पावलेही टाकली आहेत. पण ती फार जपून व काळजीपूर्वक टाकली आहेत असे दिसून येते. ज्या प्रकारची भूमिका त्यांनी इंग्रज राजवटीविरोधात घेतली. तशी ते अस्पृश्यता निवारण याविषयी घेऊ शकले नाहीत. गांधी-आंबेडकर यांच्यातील मूळ फरक तो हाच. आंबेडकर याविषयी थेट भूमिका घेत असत. आंबेडकरांनी आपल्या कार्याने अस्पृश्य वर्गात स्वाभिमान, महत्वकांक्षा निर्माण केली.

गांधींना मात्र बहुसंख्य हिंदूंना न दुखावता कार्य करायचे होते कारण याचा परिणाम स्वतंत्र चळवळीवर होऊ नये असे त्यांना वाटत होते. डॉ.आंबेडकरांनी दलित विरुद्ध सवर्ण ही संघर्ष रेषा आखली असेल. तर गांधींची संघर्ष रेषा साम्राज्यवादी ब्रिटिश विरुद्ध भारत अशी आहे. म्हणून गांधी या प्रश्नावर आक्रमक झाले नाहीत. याचा अर्थ त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य थांबविले असा होत नाही . धर्म व्यवस्थेमध्ये गांधीजी आतून कसा संघर्ष निर्माण करत होते, वर्ण - जाती व्यवस्थेची सुद्धा ते कसा संघर्ष करत होते हे समजल्यावरच आंबेडकर - गांधी यांचे संबंध स्पष्ट व्हायला लागतील. डॉ. आंबेडकरांनी गांधीजींना सतत विरोध केला असे नाही. सामाजिक तेढ नाहीसा करण्यासाठी, सामाजिक अन्याय दूर करणे हे महत्त्वाचे कार्य होते व ते कर्तव्य म्हणून प्रत्येक भारतीयाने पार पाडले पाहिजे. या मताबद्दल आंबेडकरांनी 1925 साली गांधीजींचे कौतुक केले होते.

स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही नीतीमूल्ये गांधीजी प्रमाण मानत असल्याने जाती व्यवस्थेतील जन्मसिद्ध अधिकारभेद, उच्चनीच भाव, अस्पृश्यता यावर त्यांनी नेहमीच ताशेरे ओढले. जन्मसिद्ध उच्चनीच भाव, अस्पृश्यता, रोटी-बेटी व्यवहारातील निर्बंध आणि वंश परंपरागत व्यवसाय जाती व्यवस्थेची वैशिष्ट्य मानली जातात. यातील

उच्च-नीच भावाच्या कल्पनेला गांधीजींचा सुरुवातीपासून अखेरपर्यंत नि:संकोचपणे विरोध होता. श्रेष्ठत्वाचा दावा करणाऱ्या ब्राह्मणांविरुद्धही ते लढले होते. तसेच श्रेष्ठत्वाच्या विरुद्ध लढणा-या प्रत्येक ब्राह्मणेतरांच्या ते बरोबर होते. त्यांच्या मते कुठल्याही व्यक्तीने आपण दुस-या व्यक्तीपेक्षा मूलतः श्रेष्ठ आहोत असा दावा करणे माणुसकीला न शोभणारे कृत्य होते. महात्मा गांधींनी जगात हिंसेला अहिंसा हे उत्तर दिले. हिंसेचा भडका उसळत असलेल्या काळात सामूहिक अहिंसेची निर्मिती करण्यासाठी त्यांनी रचनात्मक कार्यक्रम सांगितले. ज्यात प्रामुख्याने हिंदू- मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, खादी, लघु उद्योग, सेंद्रिय शेतीव्दारे अन्न स्वालंबन व वस्त्र स्वालंबन इ अठरा कार्यक्रम दिले आहेत.

कर्म आणि वर्ण संकर जातीय व्यवस्था कशावर टिकली असेल तर ती जातीनुसार चालत आलेली कामे लोकांनी पुढेही करावीत. तसेच फक्त सजातीय विवाह करावा. याच आधारावर प्रेम विवाहाला विरोध होतो. गांधींनी मात्र दोन्ही व्यवस्थांना खिंडार पाडण्यासाठी कर्म आणि वर्णसंकर आला प्रोत्साहन दिले. भंगीकाम मेलेल्या जनावरांची कातडी काढणे इत्यादी कामे कोणी करावेत ? ती शूद्रांनी पण गांधीजींनी हे काम सवर्णांना ही करायला लावले. कोकणातील अप्पासाहेब पटवर्धन शुद्ध चित्पावन ब्राह्मण. त्यांनी आयुष्यभर गांधींच्या सांगण्यावरुन भंगी व चांभार काम केले अशी अनेक उदाहरणे सांगता येतील एका टप्प्यावर गांधी प्रतिज्ञाच करतात की मी फक्त आंतरजातीय विवाहांनाच उपस्थित राहीन. त्यातही वधू किंवा वर यापैकी एक अस्पृश्य म्हणजेच हरिजन असला पाहिजे. याचा फटका त्यांच्या कुटुंबालाच बसला कुटुंबातील सजातीय विवाहाला ते हजर राहिले नाहीत. अनेकांनी त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला पण ते बधले नाहीत.

विधायक कार्य सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्ती मिळावी म्हणून गांधीजींनी विधायक कार्यक्रमाची कल्पना मांडली. त्यांच्या मते विधायक कार्यक्रम हा पूर्ण स्वराज्य प्राप्त करण्याचा अहिंसेचा मार्ग आहे. राष्ट्र निर्मितीच्या या कार्यक्रमात सर्व लोक पुढे आले तर सर्व बाजुंनी अथवा अर्थांनी युक्त असे संपूर्ण स्वातंत्र्य आपल्याला मिळेल. गांधीजींच्या या उपक्रमात अस्पृश्यता निवारण, शेतकरी, आदिवासी लोक, मजूर, स्त्रियांची सेवा, जातीय ऐक्य, महारोगी अशा विविध घटकांचा समावेश होता. इंग्रजांपासून मुक्त झाल्यानंतरही खऱ्या अर्थाने 'मुक्ती' ही विधायक कार्यक्रमामुळेच मिळेल यावर गांधींचा विश्वास होता. अस्पृश्यता निवारणाचे संस्थात्मक कार्य अस्पृश्यता निवारणासाठी फक्त विचार मांडणीच पुरेसे नाही त्यासाठी संघटित कार्य करण्याची गरज आहे हे गांधीजींनी ओळखले होते. याच गरजेतून त्यांनी हरिजन सेवक संघ स्थापन केला. या संस्थेशी देशातील अनेक नामवंताना त्यांनी जोडून घेतले. त्यामध्ये प्रसिद्ध उद्योगपती घनश्यामदास बिर्ला, राजगोपालाचारी, राजेंद्र प्रसाद, जगजीवनराम, मोरारजी देसाई, सेनापती बापट यांचा समावेश होता. संस्थेचे कार्य देशभर चालत असे. ज्याद्वारे अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. शाळा महाविद्यालये चालविण्यात आली. भारताचे माजी राष्ट्रपती आर के नारायण हे या संस्थेद्वारे चालविण्यात येणा-या शाळेचे माजी विद्यार्थी. यासह डॉक्टर वकील सनदी अधिकारी अशा संस्थेमुळेच निर्माण झाले .

मंदिरप्रवेश अभियान : महाराष्ट्र आंबेडकरांची भूमी असल्याने काळाराम मंदिर सत्याग्रह सर्वांनाच ठाऊक आहे . त्याच पद्धतीने गांधींनी देखील मंदिर प्रवेशासाठी प्रोत्साहन दिले. केरळमधील वायकोम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेशासाठी सत्याग्रह करण्यात आला. त्याचे नेतृत्व आचार्य विनोबा भावे यांनी केले. मदुराई येथील मीनाक्षी मंदिर प्रवेश सत्याग्रह रामेश्वरी नेहरू यांनी केला. हे सर्व गांधींच्या प्रेरणेमुळेच शक्य झाले. सत्याग्रह करणारे सर्वच गांधींचे सच्चे सहकारी व अनुयायी होते. 'हरिजन' मधून गांधी म्हणतात, भारताच्या स्वातंत्र्याचा प्रारंभ तळापासून झाला पाहिजे. प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व स्वायत्त असले पाहिजे. व्यक्ती हा अंतिमतः समाजव्यवस्थेचा मुलभूत घटक राहील. तेथे परस्परांमधील सहकार्य सहजसिद्ध, कोणत्याही कृत्रिम बंधनापासून मुक्त असेल. प्रत्येक स्त्री पुरुषाला काय हवे याची निश्चित जाणीव असेल. जीवनाचा आकार येथे एखाद्या मनोर-यासारखा राहणार नाही. त्याचे स्वरूप महासागरातील क्षितीजापर्यंत पसरत जाणाऱ्या लाटांच्या वर्तुळा सारखे असेल. व्यक्ती हा या वर्तुळाचा मध्यबिंदू राहील.

व्यक्ती गावासाठी आपले सर्वस्व वेचेल, गाव प्रदेशासाठी स्वतःचा होम करील. त्यामधून सर्वांचे जीवन एकात्म होऊन जाईल. येथील माणसे अहंकारी व आक्रमक न होता वृत्तीने लीन असतील. ज्या महासागराचे

आपण अंश आहोत. त्याच्या भव्यतेचा त्यांना अभिमान वाटेल. अशा समाजव्यवस्थेला गांधींनी रामराज्य म्हणटले. 29 जानेवारी 1948 रोजी गांधीजींची हत्या होण्यापूर्वी एक दिवस अगोदर सात लाख खेडी व शहरातील वस्त्या यांच्यासाठी सामाजिक, आर्थिक, नैतिक स्वातंत्र्य मिळवणे अद्याप बाकी आहे असे ते म्हणले होते. स्थानिक पातळीवरील समस्या स्थानिक लोकांनाच जास्त समजतात हे गांधीजींना माहिती होते. त्यातूनच स्वावलंबी ग्राम निर्मितीसाठी सर्व गावातील लोकांनी एकत्र यावे. आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यामार्फत गावाचे प्रश्न सोडवावेत. शेती, खादी, विविध ग्राम उद्योग आणि त्याला जोडून पशुपालन ही ग्रामीण विकासासाठी अनिवार्य आहे. जेणे करून सर्व ग्रामीण लोक कामाला लागतील, सर्व समान पातळीवर असतील . यातून विषमता कमी होईल. तसेच गुन्हेगारी संपुष्टात येईल हेच गांधीजींचे स्वप्न होते.

समारोप :

महात्मा गांधींचे अस्पृश्यता निवारणासाठीचे कार्याचा अभ्यास केला असता वि.स. खांडेकरांनी त्यांना दिलेली 'दुसरे प्रॉमिथिअस' ही उपमा आणखी चपखल बसणारी वाटू लागते. त्र्यंबक शेजवलकर या प्रतिभासंपन्न इतिहासकाराने म्हटले आहे की, गांधी तत्त्वज्ञानच मुलतः अनैतिहासिक आहे. गांधी एवढा अनैतिहासिक मनाचा ऐतिहासिक पुरुष इतिहासात आजवर झालाच नसावा. पण इतिहासाचे तुकडे करून सोयीचा तो तुकडा वापरण्याचे प्रमाण सांप्रत काळी फोफावले आहे. निवड आपल्याला करायची आहे. इतिहासाला एकेरी दृष्टिकोनातून पाहायचे की समग्र आकलन करायचे. शेवटी खेद याचाच वाटतो की स्वतःला गांधींचे वारसदार म्हणविणाऱ्यांनी त्यांच्या विचारांकडे दुर्लक्ष केले आणि स्वातंत्र्य चळवळीत गांधींचे काही योगदान नव्हते असे म्हणणाऱ्या अनंत हेगडे प्रवृत्तीचे पिक वारेमाप वाढले.

**संदर्भ :**


1) Ambedkar, B. S. (1946). *What Congress & Gandhi Have done to the Untouchables*. Gautam Book Center.
2) Nikam, S. (1998). *Destiny of Untouchables in India: Divergent approaches and strategies of Mahatma Gandhi and Dr. BR Ambedkar*. Deep and Deep Publications.
3) Srinivas, M. N., & Beteille, A. (1965). The "Untouchables" of India. *Scientific American*, *213*(6), 13-17.
4) Robertson, A. (1938). *Mahar folk: A study of untouchables in Maharashtra*. Oxford University Press, London.
5) Gusfield, J. (2001). The Untouchables of India. *Contemporary Sociology*, *30*(2), 119.
6) Hatt, C. (2002). *Mahatma Gandhi*. Evans Brothers.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
| --- | --- | --- |
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराची आजच्या काळातील प्रस्तुतता.

**डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर**

राज्यशास्त्र विभागप्रमुख, आझाद महाविद्यालय औसा, जि. लातूर.

---

**गोषवारा (Abstract)**

महात्मा गांधींनी त्यांच्या आर्थिक विचारात विश्वस्त संकल्पना, सर्वोदय, औद्यागिकिरण व यांत्रिकीकरण विरोध, वर्गसमन्वय, कृषीआधारित अर्थव्यवस्था, श्रमप्रतिष्ठा, सर्व व्यवसायांचा समान दर्जा, स्वदेशी, ग्रामोद्योग, ग्राम (खेडे) केंद्रीत अर्थव्यवस्था इत्यादींबाबत विचार मांडून अहिंसक पद्धतीने आर्थिक समता निर्मितीचा मूलमंत्र दिला. त्यांचे विसाव्या शतकातील आर्थिक विचार आज एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या युगातही भारत व संपूर्ण विश्वासाठी कालबाह्य न होता प्रस्तुत आहेत.

**बीजसंज्ञा(Key words)**

विश्वस्त संकल्पना, सर्वोदय, वर्गसमन्वय, स्वदेशी, ग्रामोद्योग, औद्योगिकिकरण व यांत्रिकीकरण, श्रमप्रतिष्ठा, ग्रामकेंद्री अर्थव्यवस्था, भांडवलवाद, साम्यवाद.

**प्रस्तावना -**

महात्मा गांधीजीचे राजकीय विचार 'गांधीवाद' म्हणून संबोधले जातात. असे असले तरी त्यांनी स्वत: राजकीय विचारवंत असल्याचा अथवा राजकीय तत्वज्ञान निर्मितीचा दावा केलेला नाही. गांधीवाद नावाचे कोणतेही तत्व नाही आणि माझ्या पाठीमागे कोणताही असा पंथ चालू व्हावा अशी माझी इच्छा नाही. मी नवे तत्व किंवा सिद्धांत शोधून काढला असा दावा मला करावयाचा नाही. फक्त माझ्या दैनंदिन जीवनातील समस्यांना माझ्या स्वत:च्या पद्धतीने चिरंतन सत्य लागू करण्याचा प्रयत्न करून पाहिला. त्यांनी काही उदात्त ध्येये बाळगली पण त्यांचा हा ध्येयवाद केवळ स्वप्नरंजक स्वरुपाचा नव्हता हे स्पष्ट होते.[1]

महात्मा गांधीजींच्या पूर्वी झालेल्या कोणत्याही भारतीय विचारवंतांनी गांधीजीइतका सर्वस्पर्शी विचार केल्याचे आढळत नाही. धर्म, नीती राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती काणतेही क्षेत्र असो, व्यक्तिगत आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत खेडेगावापासून विश्वापर्यंत प्रचंड आवाका गांधीविचाराने व्यापला असल्याचे दिसते. मानवावर प्रभाव टाकणाऱ्या सर्व प्रक्रियांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्याचे मुलगामी चिंतन त्यांनी केल्याचे स्पष्ट होते. मानवाचा विचार करताना कोणताही आयात विचार स्वीकारून त्यानुसार मानवी जीवनाचा अर्थ त्यांनी न लावता मानवाची प्रगती ज्या वेगवेगळया क्षेत्रांमधील सुयोग्य प्रक्रियांवर अवलंबून असते त्यांचा समग्र दृष्टीने मागोवा घेऊन त्या सर्व प्रक्रिया मानवाच्या सुखशांतीसाठी कशा परिणत होतील यासंबंधीचे सर्वस्पर्शी, सर्वलक्ष्यी व सर्वतिहतकारक विश्वमानवदर्शन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता.[2] "महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराची आजच्या काळातील प्रस्तुतता" या संशाधन लेखाची मांडणीद्वारे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट्ये -**

महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास पुढील उद्दिष्टांच्या अनुषंगाने केलेला आहे.

1) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.
2) महात्मा गांधीजींची सर्वोदय संकल्पना अभ्यास.
3) महात्मा गांधीजींचे विश्वस्त संकल्पना अभ्यासणे.
4) महात्मा गांधीजींचे साम्यवादी व भांडवलवादी अर्थव्यवस्थाबाबतचे विचार अभ्यासणे.

**गृहितके -**

महात्मा गांधींच्या आर्थिक विचाराची आजच्या काळातील प्रस्तुतता अभ्यासताना पुढील गृहीतके मांडली आहेत.

1) महात्मा गांधींचे आर्थिक विचार सत्य व अहिंसेवर आधारलेले आहेत.

2) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारात साम्यवाद व भांडवलवाद या पाश्चात्य आर्थिक विचारांना स्थान नाही.

3) महात्मा गांधींच्या आर्थिक विचारात सर्वोदय, विश्वस्त अशा नाविण्यपूर्ण आर्थिक संकल्पना आहेत.

4) महात्मा गांधींचे आर्थिक विचार आर्थिक समतेचा पुरस्कार करतात.

**महात्मा गांधींच्या आर्थिक विचारातील समाविष्ट बाबी :**

भारतातील गांधीकालीन कमालीचे दारिद्रय आणि बेरोजगारीच्या प्रश्नामुळे भारतीय समाजातील विषमतेचे दर्शन महात्मा गांधीजींना स्वातंत्र्यपूर्व काळात झाले. या दारिद्रय आणि बेरोजगारीस भारतातील ब्रिटीशांनी केलेले आर्थिक शोषण ज्याप्रमाणे जबाबदार होते, त्याचप्रमाणे वर्ण-जातव्यवस्थेने वेढलेले समाजमन व उत्पादनसंबंध हेही जबाबदार होते. वर्ण-जात व्यवस्थेने भारतातील काही जातींना जन्मत:च कष्टाचे धनी बनवले होते तर तथाकथित उच्चवर्णीय जातींना ऐतखाऊ बनवून शारीरिक श्रमाविषयी त्याच्या मनात घृणा निर्माण केली व उत्पादक श्रमापासून त्यांची फारकत केली. ब्रिटीश वसाहतवादाने आणलेली भांडवलशाही उत्पादनपद्धती व शिक्षणव्यवस्थेतून शारीरिक श्रमाची अधिकच अप्रतिष्ठा झालेली होती. उत्पादनप्रक्रियेमध्ये यंत्रांना प्राप्त होणाऱ्या वाढत्या महत्वामुळे ही आर्थिक विषमता वरचेवर वाढत चालली होती. अशा परिस्थितीत भारतातील एकूण विषमतेच्या प्रश्नाचे महत्व जाणून ते सोडविण्यासाठी काही मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केले. महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील मूलगामी प्रश्नांच्या त्यांच्यापरिने उत्तरे देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्यातूनच गांधीजींचे आर्थिक विचार किंवा चिंतन व्यक्त झाले. रूढ अर्थाने त्यांचे हे अर्थशास्त्रीय चिंतन नसले तरीही आर्थिक समतेची एक मूलगामी दृष्टी प्राप्त करून दिली. [3] महात्मा गांधींची आर्थिक चिंतनातील दृष्टी समजावून घेण्यासाठी पुढील काही आर्थिक घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**1) आर्थिक समता म्हणजे प्रत्येकाची समान संपत्ती नव्हे :-**

महात्मा गांधींच्या मते आर्थिक समता म्हणजे प्रत्येक माणसाला समान धन किंवा संपत्ती असे नव्हे. तर व्यक्तीला गरजा भागविण्याएवढी पुरेशी संपत्ती प्राप्त होणे. मुंगीपेक्षा हत्तीचे खाणे हजारपट जास्त असते. पण ते काही विषमतेचे लक्षण नव्हे गांधींच्या मते, आर्थिक समतेचा वास्तविक अर्थ म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजेइतकी संपत्ती किंवा धन मिळणे होय. एखाद्या ब्रम्हचारी व्यक्तीने जर पत्नी व चार मुले असलेल्या माणसाइतकी खासगी संपत्ती जमवून ठेवली तर त्यामुळे आर्थिक समतेचे उल्लंघन होईल. [4] असा विचार त्यांनी मांडला.

**2) आर्थिक विषमतेचे मूल कारण शोषण :-**

महात्मा गांधींच्या मते भारतातील आर्थिक विषमतेचे महत्वपूर्ण कारण म्हणजे शोषण आहे. त्यांचे हे मत साम्यवादी विचारवंत कार्ल मार्क्सच्या मताशी सहमत होणारे आहे. समाजातील शोषण संपल्याशिवाय आर्थिक समता अस्तित्वात येणार नाही असे मत मांडतात. या शोषणाचे विदारक वास्तव मांडताना ते म्हणतात की, "श्रीमंत-गरीबातील आजचा विरोध हे एक दु:खदायक दृश्य आहे. गरीब खेडूतांचे शोषण परकी सरकार अणि शहरात राहणार त्यांचे देशबांधवही करीत आहेत. त्यांच्या या विधानातून असे स्पष्ट होते की, गांधीजींचा आर्थिक समतेचा विचार हा केवळ आर्थिक प्राप्तीतील समानतेपुरता मर्यादित नसून तो मानवाच्या शोषणमुक्तीचा परिपूर्ण विकासाचा विचार आहे. [5]

**3) शहरकेंद्री विकासनीतीस विरोध व ग्रामपुनर्रचनेचा आग्रह :-**

महात्मा गांधीजींनी आर्थिक समतेच्या भारतासंदर्भात जो व्यापक अर्थ स्पष्ट केला त्यामेध्ये त्यांनी शहरकेंद्री विकासनीतीस विरोध करून ग्रामपुनर्रचनेचा आग्रह धरल्याचे स्पष्ट होते. भारतातील ग्रामपुनर्रचना म्हणजे पारंपरिक खेड्यातील सरंजामी जीवनाचे पुनरुज्जीवन नव्हे. त्यांना ग्रामपुनर्रचनेचा हा अर्थ कधीही अपेक्षित नव्हता. पुनरूज्जीवन म्हणजे या खेड्यांतील पारंपरिक मानवी संबंधाची फेररचना असे त्यांना सुचवायचे होते. उत्पादनसंबंधात बदल केल्याशिवाय ही फेररचना अशक्यच होती. त्यासाठी खेड्यांतील जमिनींचे फेरवाटप, खेड्यांचे औद्योगिकिकरण, शिक्षण व आरोग्य विषयक सोयीसुविधा, स्थानिक बाजारपेठांची निर्मिती, सहकारी शेती इत्यादी बाबींचा ते आग्रह धरत होते. [6]

**4) वर्गकलह (वर्गसंघर्ष) - नव्हे सर्गसमन्वय :-**

विसाव्या शतकातील महात्मा गांधीजींचे समकालीन पाश्चात्य विचारवंत कार्लमार्क्स यांनी मांडलेल्या साम्यवादी विचारप्रणालीतील श्रीमंत व गरीब या दोन वर्गातील वर्गकलह किंवा वर्गसंघर्षाची संकल्पना महात्मा गांधीजींनी अमान्य केल होती. कारण मार्क्सवादात गरीब व श्रीमंतामध्ये कलह, द्वेष, तिरस्कार या अनिष्ट बाबींना महत्व दिले होते. या अनैतिक व

अनिष्ट कल्पनांद्वारे अस्तित्वात येणाऱ्या नव्या समाजाची रचना करणे अयोग्य वाटत होते. आर्थिकदृष्ट्या समाजात असणारी विषमता वर्गीय प्रक्षोभ वाढवून नष्ट करण्याऐवजी, या दोन्ही वर्गांमध्ये समन्वय, सलोखा घडवून आणल्याने ती नष्ट होईल असा त्यांना विश्वास वाटत होता. वर्गसमन्वयाचा सिद्धांत वास्तवात उतरविण्यासाठी महात्मा गांधींनी दोन मार्ग असल्याचे स्पष्ट केले. त्यापैकी पहिला मार्ग श्रीमंताच्या हृदयपरिवर्तनाचा तर दुसरा मार्ग श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्त समजून गरीबांना स्वत:ची खासगी संपत्ती काही विशिष्ट प्रमाणात वितरित करणे हा होता.[7]

**5) विश्वस्ताची संकल्पना :-**

महात्मा गांधींनी अहिंसा व हृदयपरिवर्तनाच्या मार्गावरील विश्वासातूनच 'संपत्ती विश्वस्त' संकल्पना मांडल्याचे आढळते. शोषणरहित आदर्श मानवी समाजाची निर्मिती करणे, त्यांचे स्वप्न होते. आर्थिक शोषण व आर्थिक विषमतेला त्यांचा विरोध होता. असे असले तरी, कार्ल मार्क्सच्या साम्यवादातील वर्गसंघर्षाचा हिंसाधारित, मार्ग अमान्य होता हे स्पष्ट होते. महात्मा गांधीजी अहिंसेचे उपासक असल्यामुळे हृदयपरिवर्तनाद्वारे आर्थिक समता प्रस्थापित होऊन आर्थिक शोषण संपुष्टात येईल असा प्रचंड आशावाद त्यांच्याकडे असल्याचे स्पष्ट होते. महात्मा गांधीजींनी आपली 'संपत्ती विश्वस्ताची' संकल्पना मांडत समाजातील ज्या श्रीमंत लोकांकडे स्वत:च्या व कुटुंबाच्या आवश्यकतेइतकीच खासगी संपत्ती असेल तर ती स्वत:कडेच ठेवावी. व जास्तीची खासगी संपत्ती गरीबांना मोफत दान करुन त्यांना त्या संपत्तीचा मालकी हक्क मिळावा परंतु भांडवलदार, जमीनदार आणि श्रीमंतांनी आपण स्वत:च्या खासगी संपत्तीचे मालक आहोत असे न मानता, ही संपत्ती समाजाच्या मालकीची असून आपण केवळ त्या संपत्तीचे केवळ विश्वस्त आहोत असे समजावे. श्रीमंतांनी स्वत:च्या मालकीच्या खासगी संपत्तीचा वापर समाजहिताकरिता तसेच गोरगरीब, गरजू लोकांच्या कल्याणासाठी, प्रगतीसाठी करणे म्हणजे महात्मा गांधीजींची विश्वस्त संकल्पना होय. [8] महात्मा गांधीजीची विश्वस्त संकल्पनेत श्रीमंतांच्या, भांडवलदारांच्या सद्सदविवेकबुद्धीला आवाहन करुन त्यांना त्यांच्या नैतिक कर्तव्याची जाणीव करून देण्यावर होता. पण त्यांचा हा संपत्ती विश्वस्ताचा मार्ग कितपट यशस्वी होईल याबाबत अनेकांनी शंका उपस्थित केल्याचे दिसून येते.

**6) अतिरिक्त औद्योगीकिकरण व यांत्रिकीकरणास विरोध-**

महात्मा गांधींनी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि साम्यवादी अर्थव्यवस्थांच्या विकास प्रारुपांना काही मूलभूत प्रश्न विचारत अतिरिक्त औद्योगीकरण व यांत्रिकीकरणास केलेला विरोध समजून घेणे आवश्यक ठरते. आधुनिकीकरण म्हणजे औद्योगिकीकरण आणि यंत्र-तंत्रज्ञानाचा वाढता वापर अशी समजूत पश्चिमी विकासवाद्यांनी करून दिली होती. तिच्या अनुषंगाने औद्योगिकीकरणास विरोध म्हणजे आधुनिकीकरणास विरोध, अशी समजूत करुन देण्यात आली होती. दि. 31 जुलै 1946 रोजी भारतातील विविध प्रांतांतील उद्योगमंत्र्यांच्या परिषदेत भाषण करताना त्यांनी यंत्रविरोध म्हणजे काय व कशासाठी याचा खुलासा केलेला होता. तो या शब्दांमध्ये, "यंत्र म्हणजे काय? असे कोणी विचारील. एका अर्थाने मानव हाच सर्व सृष्टीतील अद्भूत यंत्र आहे. त्याची आवृत्ती काढता येत नाही की नक्कल करता येत नाही. पण या व्यापक अर्थी मी हा शब्द वापरत नसून मानवाच्या किंवा प्राण्यांच्या श्रमाला पूरक न होता किंवा त्यांच्यातील कौशल्य न वाढवता त्याचे उच्चाटन करू पाहणारे साधन म्हणजे यंत्र होय" हा अर्थ मला अभिप्रेत आहे. यंत्राच्या वाढीला किंवा विकासाला काही मर्यादा नाही. मानवी श्रमाचे तसे नाही. मानवाची कुवत किंवा शारीरिक कौशल्य विशिष्ट मर्यादेपलिकडे जाऊ शकत नाही. या परिस्थितीतूनच यंत्राचे तिसरे लक्षण उद्भवले. त्याला जणू स्वत:ची इच्छा किंवा बुद्धी आहे असे दिसते. यंत्रे हे मानवी श्रमाच्या विरोधी आहे. मानवाचे उच्चाटन करणे ही यंत्राची प्रवृत्ती आहे. हजार मानवांचे नसले तरी शंभर मानवांचे काम यंत्र करते. त्यामुळे बेकार व अर्धबेकारांच्या संख्येत भर पडते यंत्राचा तो धर्मच आहे कोट्यवधी लोकांना दडपून टाकण्यात व पिळून काढण्यासाठीचे यंत्र हे अतिउत्कृष्ट साधन आहे. सामाजाचा घटक म्हणून सर्व मानव समान असतील तर यंत्राला मानवाच्या अर्थव्यवस्थेत स्थान असू नये.[9]

**7) स्वदेशी संकल्पनेचे समर्थन :-**

महात्मा गांधींनी त्यांच्या शोषणाविरोधी विचाराचा घटक म्हणून मांडलेली स्वदेशी संकल्पना महत्वपूर्ण ठरते. त्यांच्या स्वदेशीचा प्रमुख आधार हा परदेशी माल, भांडवल आणि परदेशी व्यक्ती यांना केवळ विरोध करणे असा निषेधात्मक स्वरुपाचा नव्हता. तसाच प्रत्येक भारतीय देशी उत्पादनांचे, वस्तुंचे विधिनिषेधशून्य समर्थन व उदात्तीकरण करणे असाही नव्हता. त्यांच्या मते कोट्यवधी भारतीयांचे कल्याण करणारी संकल्पना म्हणजे 'स्वदेशी' होय. या स्वदेशीचे भांडवल व ज्ञान परकीय असले तरी

चालेल. मात्र ते हिंदी लोकांच्या, भारतीयांच्या पूर्णपणे नियंत्रणाखाली असले पाहिजे. ते पुढे असे स्पष्ट करतात की, "सारे भांडवल विदेशी असले आणि पाश्चात्य तंत्रही हिंदी मंडळाच्या अमलाखाली काम करीत असले तरी खादी ही खरी स्वदेशी होईल." गांधींच्या या विधानातून असे स्पष्ट होते की, भारतीयांचे आणि त्यातही इथल्या बहुजन तळागाळातल्या समाजघटकांचे हित ज्या बाबींमुळे जपल जाई ती बाब स्वदेशी गणली जाईल.[10]

**8) ग्रामोद्योगांना महत्व :-**

महात्मा गांधींनी त्यांच्या आर्थिक विचारात ग्रामोद्योगांना महत्वपूर्ण स्थान दिल्याचे स्पष्ट होते, भारतातील ग्रामीण बेरोजगारी, दारिद्रय दूर करण्यासठी व पर्यायाने खेड्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता हस्तोद्योग, कुटिरोद्योगांना चालना दिली जावी. त्यामुळे भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. खादी ग्रामोद्यागांसारख्या उद्योगाद्वारे ग्रामीण भागाचा विकास होईल.[11]

**9) श्रमप्रतिष्ठा महत्वपूर्ण :-**

महात्मा गांधींनी त्यांच्या आर्थिक विचाराची मांडणी करताना श्रमप्रतिष्ठेला महत्व दिल्याचे स्पष्ट होते. श्रमप्रतिष्ठा समाजात रुढ व्हावी. सर्वप्रकारच्या श्रमाला समान प्रतिष्ठा मिळावी त्यासोबतच सर्व व्यवसायांना समान प्रतिष्ठा मिळावी. एकंदरीत श्रमप्रधान मानवी समाजाची निर्मिती व्हावी हा त्यांच्या आर्थिक विचाराचा महत्वपूर्ण पैलू होतो हे दिसून येते.[12]

**10) कृषी आधारित अर्थव्यवस्था :-**

महात्मा गांधींच्या मते, एकेकाळी भारतातील खेडी लहान मोठ्या शहरांना त्यांच्या सर्व गरजेच्या वस्तू पुरवित असत. पण शहरे जेव्हा विदेशी देशांच्या बाजारपेठा बनल्या आणि परदेशातील स्वस्त आणि दिखाऊ माल आणून विकला जाऊ लागला त्यामुळे खेड्यांचा विकास थांबला. त्यामुळे भारत गरीब झाला. गांधीजींनी खेड्यांच्या तत्कालिन दुरवस्थेबाबत मत व्यक्त करताना म्हटले की "शहराची वाढ ही मी एक अनिष्ट गोष्ट मानतो. ब्रिटीशांनी भारताला लुबाडले ते त्यांच्या शहरांमार्फतच शहरांनी खेड्यांना लुटले शहरांचा जे इमला बनला आहे, त्यात खेड्यांच्या रक्ताचा चुना आहे. आज शहरांच्या शिरा रक्ताने फुगलेल्या आहेत ते रक्त खेड्यांच्या धमन्यात पुन्हा वाढ लागावे आशी माझी इच्छा आहे.[13] महात्मा गांधींनी भारतातील खेड्यातील कृषी आधारीत अर्थव्यवस्थेचे समर्थन केल्याचे दिसून येते. त्याचे महत्वपूर्ण कारण म्हणजे तत्कालिन काळात भारतातील सर्वाधिक खेड्यात वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या होती हे आहे.

**11) 'सर्वोदय' संकल्पनेचा पुरस्कार :-**

जैन मुनी आचार्य सामंतभद्र यांच्या साहित्यामधून महात्मा गांधींनी 'सर्वोदय' शब्द स्वीकारलेला होता. त्यांनी 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मकथेत (आत्मवृत्तात) सर्वप्रथम सर्वोदय शब्द वापरला असून हे त्यांच्या विचारप्रणालीचे एक अपत्य असल्याचे दिसते. त्यानंतर त्यांनीच जॉन रस्किन यांच्या 'अन टू धिस लास्ट' नामक ग्रंथाचा जो गुजराती भाषेतील अनुवाद केला होता त्याचे शीर्षकही सर्वोदय असेच ठेवले होते. त्यामुळे सर्वोदय संकल्नेचे मूळ आपल्याला महात्मा गांधीजींच्या विचारप्रणालीमध्ये सापडते. थोडक्यात असे स्पष्ट होते की, आधुनिक समाजापुढील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महात्मा गांधींच्या विचारप्रणालींचा स्वीकार करणे म्हणजे सर्वोदय. समाजाला उपलब्ध असलेल्या भौतिक, आर्थिक व आध्यात्मिक साधानांचा सार्वजनिक करुन घेण्याचे सर्वोदय म्हणजे एक शास्त्र आहे. 'अधिकाधिकांचे अधिकाधिक सुख' या उपयुक्ततावाद्यांच्या मूलसूत्रापेक्षा सर्वोदयाचे उद्दिष्ट अधिक व्यापक स्परुपाचे आहे. समाजातील प्रत्येकाचे व सर्वांचे कल्याण त्याला अपेक्षित असल्याचे स्पष्ट होते. समाजवादाच्या कोणत्याही प्रकारापेक्षा सर्वोदयाची संकल्पना किंवा तत्त्वज्ञान अधिक समावेशक आणि सर्वस्पर्शी आहे. कारण समाजवादाच्या सर्वच प्रकारात फक्त श्रमिकांच्याच (कष्टकऱ्यांच्याच) उत्कर्षाचा विचार मांडण्यात आला आहे. आर्थिकदृष्ट्या श्रीमंत अर्थात अधिकांबद्दलच एक प्रकारचा अनुदार दृष्टीकोण त्यात गृहीत धरलेला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तींचे हित आणि सार्वजनिक हित यांच्यात अव्दैत सर्वोदयाने गृहीत धरलेले आहे. उच्च आणि नीच, समर्थ आणि असमर्थ, बुद्धिमान आणि मंदबुद्धी या सर्वांचाच अभ्युदय किंवा प्रगती सर्वोदयामध्ये समाविष्ट झालेली आहे. "जगा आणि जगु द्या" यापेक्षाही उच्च दर्जापूर्ण उसणारा आदर्श सर्वोदयाने स्वीकारत 'इतरांकरिता जगा' या वेदादी तत्वज्ञानाचा प्रत्यक्ष मानवी व्यवहारांमध्ये एक प्रकारे अवलंब करणे अपेक्षित ठेवलेआहे.[14]

**समारोप/निष्कर्ष :-**

"महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील प्रस्तुतता" या संशोधन लेखाची मांडणी प्रस्तावना, उद्दिष्ट्ये, गृहीतके. व समारोप/निष्कर्ष या पद्धतीने केलेली आहे. महात्मा गांधीजींनी त्यांच्या आर्थिक विचारामध्ये विश्वस्त संकल्पना, सर्वोदय यासारख्या विविध नाविन्यपूर्ण संकल्पनांची मांडणी केली होती आधुनिक औद्योगिकीकरण व यंत्रयुगाला विरोध करीब श्रीमंत वर्गसमन्वय, कृषीआधारीत अर्थवयवस्था, श्रमप्रतिष्ठा, ग्रामोद्योग, सर्व व्यवसायांचा किंवा कामांचा एकसमान दर्जा, स्वदेशी इत्यादी आर्थिक बाबींवर त्यांनी विचार मांडले होते. त्यांनी आपले आर्थिक विचार तत्कालिन भारतीय परिस्थितीच्या अनुषंगाने मांडले होते. त्यांच्या सर्व आर्थिक विचारांना नैतिक मुल्यांची जोड दिलेली होती. जे अर्थशास्त्र व्यक्ती किंवा राष्ट्राच्या नैतिक कल्याणाला तडा देणारे असेल ते अनैतिक अर्थशास्त्र असून ते नाकारण्याचे काम त्यांनी केल्याचे स्पष्ट होते. जो देश गरीब देशाला. आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे आर्थिक शोषण करून लुबाडतो. ते अनैतिक अर्थशास्त्र असल्याचे मत व्यक्त करतानाच मानवी समाजाने आपल्या भौतिक, चंगलवादी गरजा वाढवणे म्हणजे संस्कृती नसून त्या हेतुपूर्वक कमी करणे हीच खरी संस्कृती असल्याचे मत व्यक्त केले. यातून त्यांनी आजच्या एकविसाव्या शतकातील चंगळवादी, भौतिकवादी समाजाला आपल्या गरजा मर्यादित ठेवण्याचा जणू कानमंत्रच दिलेला आहे. महात्मा गांधींना अहिंसावादी मानवी समाज निर्मिती करावयाची होती. त्यामुळे मानवी समाजातील शोषण संपल्याशिवाय खऱ्या अर्थाने अहिंसावादी समाज अस्तित्वात येणार नाही अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या मते आर्थिक समानता ही 'अहिंसक स्वातंत्र्याची' गुरुकिल्ली असून आर्थिक समानतेसाठी भांडवलदार (श्रीमंत) व गरीब (कष्टकरी) यांच्यातील वर्षानुवर्षे सुरु असलेला संघर्ष नष्ट व्हावा. अल्पसंख्य श्रीमंतांच्या हातात एकवटलेली राष्ट्रीय संपत्ती गरीबांच्या कडे विश्वस्त संकल्पनेच्या माध्यमातून गरीबांकडे हस्तांतरीत करणे म्हणजे आर्थिक समता म्हणता येईल. त्यांच्या मते आर्थिक समता म्हणजे प्रत्येक माणसाला समान धन (संपत्ती) असे नसून प्रत्येकाला गरजा भागवण्याइतकी पुरेशी साधनसामग्री उपलब्ध होणे. ग्रामोद्योग, कुटीरोद्योगांद्वारे दारिद्रय निर्मूलन व आर्थिक विकासाची प्रक्रिया खेड्यांपासून सुरु व्हावी असाही विचार त्यांनी मांडल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या आर्थिक विचारामध्ये त्यांनी खेडेकेंद्रीत अर्थव्यवस्थेचे समर्थन करुन शहरीकरण नाकारले आजे. आज एकविसाव्या श्यातकात गांधीजींच्या या विचाराकडे दुर्लक्ष झाल्याने खेडी ओस पडून शहरीकण वाढत जाऊन बकाल स्वरुपाची शहरे दिसून येत आहेत. त्यांनी औद्योगिकीकरण व यंत्रव्यवस्थेला केलेला विरोध योग्य होता हे स्पष्ट होते. आज एकविसाव्या शतकात जगभर रोबोटिक अर्थात यंत्रमानवक्रांती आल्याने उद्योग व्यवसायातील कष्टकरी मानव कर्मचाऱ्यांच्याऐवजी यंत्रमानवांचा वापर सुरू केल्यामुळे या उद्योग व्यवसायातील अनेक कर्मचारी बेरोजगार झाल्याचे दिसून येत आहे. इतकेच नाही तर मोठ्या रुग्णालयातील परिचारिका, मोठ्या पंचतारांकित होटेल्स व रेस्टारंटमधील कर्मचाऱ्यांची जागाही आता या यंत्रमानवाने घेतल्याने त्यांना नोकऱ्यांपासून मुकावे लागत आहे. त्यामुळे गांधींजींचा या यांत्रिकीरणाला का विरोध केला? व तो कसा योग्य होता याचा प्रचिती आपण आजच्या काळात येत आहे. महात्मा गांधींनीं भांडवलशाही व साम्यवाद हा दोन्ही पाश्चात्य व परदेशी अर्थव्यवस्थांना विरोध करून वर्गसमन्वयावर आधारित नाविण्यपूर्ण सर्वोदय संकल्पना मांडून वर्गसमन्वयावर भर दिल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत अहिंसेवर आधारीत असलेले त्यांचे विचार आजच्या काळासाठी प्रस्तुत / प्रासंगिक आहेत हे स्पष्ट होते.

**संदर्भसूची :-**

1) जैन अशोक, प्रथमावृत्ती ऑक्टोबर 2009, निवडक राजकीय विचार, शेठ पब्लीशर्स प्रा. लि. मुंबई, पृ. 173.
2) भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती जानेवारी 2016, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स , नागपूर पृ. 503.
3) सुमंत यशवंत, पहिली आवृत्ती एप्रिल 2016, महात्मा गांधींची विचारसृष्टी, काही अलक्षित पैलू, साधना प्रकाशन, पुणे, पृ. 39
4) कित्ता, पृ. 41
5) कित्ता, पृ. 41 व 42
6) कित्ता, पृ. 43 व 44
7) गर्गे स.मा.व इतर, प्रथमावृत्ती 1 मे 2011, पाश्चात्य व भारतीय राजकीय विचार, के. सागर पब्लीकेशन्स पुणे, पृ. 278
8) कित्ता, पृ 279 व 280

9) सुमंत यशवंत, उपरोक्त पृ.42 व 43.

10) कित्ता, पृ. 44 व 45

11) पाटील. वा. भा., प्रथमावृत्ती 2009, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, भाग-2, प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव, पृ.66 व 67

12) कित्ता, पृ. 66

13) सुमंत यशवंत, उपरोक्त, पृ. 44.

14) भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती जानेवारी 2016, उपरोक्त पृ. 513 व 514.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# जागतिकिकरण आणि गांधी मुल्ये

**डॉ. माधव कदम**

शिवाजी कॉलेज, कंधार

---

विसाव्या शतकाला जागतिकीकरणाचे युग म्हणून संबोधले जाते. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये क्रांतीकारी स्वरुपाचे बदल झाले. संचाराची व संपर्काची साधने अतिशय विकसीत झाल्यामुळे जगाचे अंतर कमी होऊन विश्व लहान झाले. परंतु दुसऱ्या बाजूला राष्ट्रा-राष्ट्रातील मानवांच्या अपेक्षा आणि भौतिक गरजा मोठ्या प्रमाणात वाढल्या. त्यामुळे आज विश्वामध्ये परस्परावलंबनाची प्रक्रिया वाढली आणि त्यातूनच उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकिकरणाचा जन्म झाला.

जागतिकीकरण ही अतिशय व्यापक संकल्पना आहे. जागतिकीकरणाचा संबंध अर्थकारणासी जोडला जात असला तरी जागतिकीकरण हे सर्व मानवी पैलूंना स्पर्श करणारे आहे. त्यामुळे आज विश्वातील कोणतेही राष्ट्र अथवा कोणताही व्यक्ती जागतिकीकरणाचा प्रक्रीयेपासून अलिप्त राहू शकत नाही.

जागतिकीकरण ही बहुआयामी प्रक्रीया असल्यामुळे अनेक विचार, मुल्ये जागतिकीकरणामुळे प्रभावित झाले आहेत. त्यातल्या त्यात गांधीवादी विचार आणि मुल्ये जास्तीत जास्त प्रभावित झाले आहेत. म्हणून पूर्वीपेक्षाही अधिक आज गांधी मुल्यांची निकड निर्माण झाली आहे. कारण जागतिकीकरण आणि खाजगीकरण हे वरवर आकर्षक आणि दिव्य वाटत असले तरी ते आतून भयानक आणि विनाशक स्वरुपाचेच आहे. जागतिकीकरणामुळे शोषणाला आणि दमनाला एक नया आयाम प्राप्त झाला आहे. जागतिकीकरणाने शोषणाची एक नवीन प्रक्रीया जन्माला आली आहे. गांधीवादात समष्टीचा विकास अपेक्षीत आहे. तर जागतिकीकरण विशिष्टाच्या विकासावर आधारित आहे. त्यामुळे जागतिकीकरणात मानवतावादी मुल्यांना कसलाच थारा नाही.

गांधीनी संचयाला विरोध केला. पण जागतिकीकरणाने संचयाची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढवली. जागतिकीकरणात माणुस प्रचंड असमाधानी बनला. माणसांच्या अपेक्षा आणि गरजा पट्टीमध्ये वाढल्या. अन्न, वस्त्र आणि निवारा या ज्या मुलभूत गरजा होत्या त्या गरजांची मोठी यादी निर्माण झाली. व्यक्ती आहे त्यात समाधान मानन्यापेक्षा जे आपल्या जवळ नाही त्यासाठी दु:ख करीत आहे. भौतिक सुखासाठी माणसे आसूसली. जागतिकीकरणाने व्यक्तीचे सुख आणि समाधान हिरावून घेतले त्यामुळे या असमाधानी माणसाला गांधी मुल्येच स्थिरता देवू शकतील.

गांधींनी खेड्यांच्या स्वयंपूर्णतेचे स्वप्न पाहिले. पण आज जागतिकीकरणामुळे खेडी ओसाड पडत आहेत. खेडयांचे लोंढे शहराकडे धाव घेत आहेत. कारण जागतिकीकरणामुळे कुटीर उद्योग नेस्तनाबूथ झाली. त्यामुळे खेड्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली. पोटाची खळगी भरण्यासाठी ही खेडी शहराकडे धावली. त्यामुळे शहरे मोठ्या प्रमाणात फुगली. या अतिरेक लोकसंख्येचा भार शहरांना सुद्धा न झेपवणारा असल्यामुळे शहरे सुद्धा नियोजनात कमी पडत आहेत. शहरातील वाढती लोकसंख्या नव-नवीन समस्यांना जन्म देत आहे. म्हणून खेड्यांचे पूनरुज्जीवन होणे आवश्यक आहे. शहराकडे धावणारा खेड्यांचा ओघ थांबवण्यासाठी खेड्यांची पूर्नबांधणी आवश्यक आहे. खेड्यामध्ये रोजगाराची निर्मीती व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

आधूनिक विकासनीतीचे घातक परिणाम सर्वत्र आज विश्वाच्या रंगमंचावर हवा, पाणी, पशु, पक्षी, जंगले आणि जमीन या सर्वच क्षेत्रात भयानक स्वरुप धारण करुन नैसर्गिक असंतुलन निर्माण करीत आहेत. ही नैसर्गिक असंतुलनाची प्रक्रीया जागतिकीकरणाने अधिक गतीमान आणि प्रभावी केली आहे. हवा आणि पाणी प्रचंड प्रमाणात प्रदूषीत झालेले आहे त्यामुळे मानवी आरोग्य प्रचंड प्रभावित झाले आहे. या अर्थनितीच्या विळख्यात मानवी जीवन अडकले आहे. एका बाजूला प्रचंड जंगलतोड तर दुसऱ्या बाजूला कंपन्या आणि कारखान्यांची उभारणी त्यामुळे निसर्गावर मानवी हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत

आहे. म्हणून निसर्गाच्या विनाशातून साधला जाणारा विकास हा भविष्यात मानवी अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असेल यात अजिबात शंका नाही. काही लोकांच्या विकासासाठी अनेक लोकांचा विनाश हे जागतिकीकरणाचे सूत्र आहे पण अशा प्रकारचा विकास हा भंकसपणा आहे. काही व्यक्ती पुरता आपमतलबी विकास हे कोणतेही अर्थशास्त्र नाही तर ते स्वार्थशास्त्र आहे. म्हणून अशा प्रकारचा विकास चिरकाल असू शकत नाही. विकासाला मानवी चेहरा प्राप्त झाला पाहिजे. विकास हा समष्टी असला पाहिजे. वनस्पती, प्राणी या सर्वांवर प्रेम करुन आणि पर्यावरणावर आलेले आक्रमण थांबवूनच मानवाला शाश्वत विकास साध्य करता येईल.

जागतिकीकरणाचा बाजार अर्थव्यस्थेने सर्व मानवी सभ्यता उध्वस्त केल्या आहेत. पैसा मिळवण्यासाठी व जास्तीत जास्त नफा कमवण्यासाठी अन्नधान्यामध्ये प्रचंड प्रमाणात भेसळ केली जात आहे. पैशासाठी मानवी जीव व मानवी आरोग्याकडे मोठ्या प्रमाणात डोळेझाड केली जाते. महात्मा गांधींनी शांति आणि अहिंसेचा मुलमंत्र दिला. परंतु जागतिकीकरणाने व्यक्ती आणि राष्ट्रे एकमेकांविरुद्ध उभी केली आणि त्यांना लढण्यासाठी शस्त्रांचे साठे निर्माण केले काही पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या कारखान्यातून वस्तू व सेवांच्या उत्पादनाऐवजी 60% उत्पादन हे शस्त्रास्त्रांचे केले आहे. कारण वस्तू व सेवांच्या उत्पादनापेक्षा शस्त्रास्त्रांचे उत्पादन हे फार मोठा नफा देणारे आहे. म्हणून हीच राष्ट्रे आपली शस्त्रास्त्रांची बाजारपेठ चालवण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रात संघर्ष जन्माला घालण्याचे काम करतात. म्हणून या विकृतीला पायबंद घालण्यासाठी सत्य आणि अहिंसा या गांधी मुल्यांची विश्वाला अधिक गरज निर्माण झाली आहे. आज जगाला शस्त्राची आवश्यकता नाही तर शास्त्राची आवश्यकता आहे. त्यासाठी शांतिचे तत्वज्ञान आणि अहिंसेचे शास्त्र विकसीत होण्याची आवश्यकता आहे. मानवी मुल्ये आणि मनवी सभ्यतांची जोपासना करायची असेल तर त्यासाठी मानवी समुदायाला महात्मा गांधीजीच्या वाटेवरच चालण्याची आवश्यकता आहे. या भरकटलेल्या जगाला गांधीच दिशा देवू शकतात. भौतीक सुखाने वैफल्येग्रस्त विश्वाला गांधी मुल्येच समाधान देवू शकतात. आज विश्वामध्ये निर्माण झालेल्या सर्व कृत्रीम समस्येवर गांधी मुल्यातूनच आशेचा किरण सापडू शकतो.

महात्मा गांधी ही एक व्यक्ती नाही तर ती एक कृती आणि विचार आहे. जो विचार वर्तमानकाळातील मानवी समस्यांना उत्तरे पूरवू शकतो. सद्यकालीन सैरभैर झालेल्या समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेला वैचारीक अधिष्ठान पूरवू शकेल. आज गांधीजीच्या विचारांची वैयक्तीक जीवनापासून ते सार्वजनिक जीवनापर्यंत व राष्ट्रापासून ते आंतरराष्ट्रीय जगापर्यंत सर्वच स्तरावर आवश्यकता निर्माण झाली आहे.

संदर्भ सूची :

1. महात्मा गांधी, हिंद स्वराज्य, परमधाम प्रकाशन, पवनार.
2. भोळे भा.ल., भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
3. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन औरंगाबाद.
4. श्रीपाद जोशी, महात्मा गांधी जीवन आणि शिकवण.
5. चव्हाण पंजाब, मुल्यव्यवस्था गांधी विचार (संपा) निर्मल प्रकाशन, नांदेड.
6. प्रसाद कुलकर्णी, महात्मा गांधी आणि गांधी वचने, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी.
7. विठ्ठलराव जाधव (संपा) राष्ट्रपिता महात्मा गांधी विशेषांक, नांदेड.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# एकविसाव्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता

**प्रा.डॉ. जी.डी. घोडे**

(HOD), राज्यषास्त्र विभाग प्रमुख, एम.ए., एम.फील., पीएच.डी., नेट, सेट, कै. बाबुरावजी पाटील महाविद्यालय, हिंगोली, जि. हिंगोली –431513

---

**प्रस्तावनाः–**

आपण ज्या गांधी – विचारांचा व प्रश्नांचा विचार करू इच्छितो तो विचार अगर ती समस्या शुध्द विचारांची समस्या आहे. अशा शुध्द विचारास दादांनी (न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी) अपौरूषेय विचार म्हटले आहे. तो व्यक्तीनिरपेक्ष आहे. ज्या विभुतीला त्यांचे दर्शन झाले असेल तिचे नाव एक व्यवहार म्हणून त्या विचाराला देतो. पण म्हणून तो त्याच्यापुरताच मर्यादीत नसतो. विचार हा देश, काल, वर्तमान यांनी मर्यादीत नसतो. तो पाश्चिमात्य अगर पूर्वेचाही नसतो. त्यास व्यक्तीनिष्ठा अगर ग्रंथनिष्ठा मान्य नाही. शुध्द विचार हा विभुती–प्रामाण्यवादी अगर ग्रंथ प्रामाण्यवादी नसतो व नसावा. यालाच आचार्य विनोबाजींनी 'विचारशासन' म्हटले आहे. म्हणूनच जेव्हा त्यांच्या विचारांना 'गांधीवाद' म्हणून संबोधले गेले, तेव्हा गांधीजी म्हणाले होते की, गांधीवाद नावाची वस्तू अस्तित्वातच नाही. असा कुठलाही 'उपद्रव' मी केला नाही. याखेरीज आपण हेही विसरता कामा नये की गांधींच्या वेळी ज्या समस्या अस्तित्वात होत्या, त्यापेक्षा अन्य व अनेक पटीने तीव्र अशा समस्या आज आपल्यासमोर उभ्या आहेत व नवीन लढाया जुन्या व गंजलेल्या शस्त्रांनी लढता येत नाहीत. महापुरूषांच्या विचारांचा मागोवा व त्यातील तथ्ये मार्गदर्शक ठरतात, पण त्यांचा 'पाथेय' म्हणून उपयोग करून त्या अधिष्ठानावर नवीन चिंतन करण्याची गरज असते. दुर्दैवाने आपण चिंतनाची प्रक्रियाच थांबवून सर्व समस्यांसाठी 'रेडीमेड नुक्से' त्यांच्या वाड्.मयात शोधीत असतो व हे विसरतो की, सर्व प्रश्नांची तयार उत्तरे नसतात ती नव्याने शोधावी लागतात. महापुरूष जेथे थांबले किंवा म.गांधींना त्यांचा खुन झाला म्हणून थांबावे लागले, त्याच्या पुढचा विचार व चिंतन करण्याचे 'दायित्व' व जबाबदारी आपली सर्वांची व त्यातही युवकांची आहे. त्यासाठी सर्वप्रथम प्रश्न व समस्या यांचे विश्लेषण करून त्या समजून घ्याव्या लागतील. प्रश्नांचे आकलन व्यवस्थित झाले की, प्रश्नांची उकल होण्यास सुरवात होते तेच सर्वात महत्वाचे आहे. कारण पूर्वी त्या प्रश्नांची जी उत्तरे शोधण्यात आली होती, ती उत्तरेच आज 'प्रश्न' किंवा 'समस्या' म्हणून उभे ठाकले आहेत. उत्तरेच प्रश्नरूपात उपस्थित झाल्याने नव्याने विचार करण्याची गरज आहे.

म.गांधींच्या अगोदर आधूनिक भारतातील कोणत्याही चिंतकाने त्यांच्या इतका सर्व स्पर्शी विचार केला होता असे दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती कोणतेही क्षेत्र असो – वैयक्तिक आत्मशांती पासून विश्वशांतीपर्यंत गावापासून–विश्वापर्यंत मोठा आवाका गांधी विचारांनी व्यापला आहे. मानवावर प्रभाव टाकणाऱ्या सर्व प्रक्रियांची सुक्ष्म निरीक्षण करून त्यांचे मुलगामी चिंतन गांधींनी केले होते. माणसाचा विचार करतांना कोणतेही आयात तत्वज्ञान स्विकारून त्यानूसार मानवी जीवनाचा अर्थ गांधींनी लावला नाही तर माणसाची प्रगती ज्या अनेकानेक क्षेत्रातील सुयोग्य प्रक्रियांवर अवलंबून असते त्यांचा समग्र दृष्टीने मागोवा घेवून त्या सर्व प्रक्रिया मानवाच्या सुखशांतीसाठी कशा परिणत होतील यांचे सर्वस्पर्शी व सर्व हितकारक विश्व–मानव दर्शन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. त्यामुळेच जात, धर्म, पंथ, वर्ग, राष्ट्र इत्यादी भेदभाव मनात न आणता मानवांच्या भवितव्याबद्दल आस्था बाळगणारे सर्व विचारी मानव गांधींच्या विचारामुळे प्रभावीत झाले होते. जीवन हेच परमसत्य असून त्याची सगळी अंगोपांगे मिळून एक अखंड पूर्णांक बनला आहे. हे सत्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात साकार करण्याचा प्रयत्न गांधींनी केला. हीच त्यांची जीवन साधना होती तिलाच 'सत्याचे प्रयोग' असे नाव दिले होते. माणसामाणसांच्या संबंधात जीवनाच्या एकतेकडे वाटचाल करीत राहणे म्हणजे सामाजिक प्रगती आणि त्या दिशेने केलेले प्रयत्न म्हणजे सत्याचे प्रयोग अशा त्यांच्या व्याख्या होत्या. ब्रिटीशांविरूध्दच्या स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व करण्याची ऐतिहासिक जबाबदारी गांधींनी पार पाडली. तत्पूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या जुलूमी सत्ताधाऱ्यांविरूध्द तिथल्या भारतीयांना संघटीत करून त्यांनी सत्याग्रहाचे नवे लढातंत्र विकसित केले. हे खरे असले तरी त्यांच्या विचारांचा बंध जो निष्पन्न झाला त्याचे लक्ष केवळ त्या ऐतिहासिक घटनापूरते सिमीत राहिलेले नव्हते. आधूनिक सभ्यतेने जे सत्तेच अफाट केंद्रीकरण केले आहे आणि जो टोकाचा व्यक्तीवादी विचार प्रचलीत केला आहे त्याला उचित पर्याय देण्याचे व्यापक उद्दिष्ट त्यांच्या चिंतनाचे होते. जगाच्या सामाजिक इतिहासात केंद्रीभूत सत्ता आणि अतिरिक्त व्यक्तीवाद या दोन प्रवृत्तींनी समुदायाच्या सुसंवादी व जैविक संरचनांचा विध्वंस केला असून परिणामस्वरूप सामाजिक परात्मभाव आणि आर्थिक दारिद्रय यांच्यात वाढ होणे अटळ झाले असे गांधींचे निदान होते. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण विचारांचा रोख आधूनिक सभ्यतेतील विध्वसंक प्रवृत्तींचा बिमोड करून

त्यांना रचनात्मक पर्याय कसे देता येतील यावर होता. गांधींनी आधूनिक सभ्यतेचे पायाभूत आधाराच प्रश्नांकीत केले. आधूनिक पाश्चिमात्य जीवन शैलीतील विलासीकरण, आक्रमकता, निधर्मीपणा, तंत्रज्ञानशरणता इत्यादी वैशिष्टये त्यांना भावत नव्हती. दुर्बल राष्ट्रांच्या शोषणावर पश्चिमी औद्योगिक सभ्यतेची उभारणी झालेली असल्यामुळे उच्च विचारसरणीशी ती विसंगत आहे. ती अंधकार युगाची व रूग्णईत स्वरूपाची आहे. वस्तूसंचयाचा आत्यंतिक सोस बाळगल्यामुळे मानवी मूल्यांचा ऱ्हास या सभ्यतेत अटळ ठरतो. निसर्गाच्या जवळ जाणारी, निसर्गाशी जवळून चालणारी, स्वेच्छेने स्विकारलेल्या साधेपणाची संस्कृतीच खरी मानवी संस्कृती गांधींच्या मते असू शकते. आधूनिक काळात विशेषतः एकविसाव्या शतकात राजकारणाच्या प्रचलीत पध्दती विश्वकुटूंबाचे आदर्श प्रत्यक्षात आणण्याबाबत केवळ कुचकामीच नव्हेत तर त्या आदर्शाला बाधकही आहेत. साम्राज्यवाद जावा, वसाहतवाद इतिहास जमा व्हावा यासाठी जगभर अनेक चळवळी झाल्या. व्यक्ती स्वातंत्र्यावर आधारीत लोकशाहीची कास काहींनी धरली तर काहींना आर्थिक समतेवर भर देणाऱ्या समाजवादी विचाराने आकर्षित केले. युध्दाचे भीषण परिणाम पाहिल्यानंतर पुन्हा त्या संहारक संकटात मानव जातीला पाहावे लागू नये अशा उपायांचा शोधही जगभर सुरूच आहे. प्रत्यक्षात मात्र विश्वशांतीच्या आदर्शापासून जग खूपच दूर आहे. उलटपक्षी मानव समाजाला भयभीत करणाऱ्या अनेक घटना घडत असून हिंसक विध्वसंक प्रवृत्ती अधिकाधिक उग्र होत चालल्या आहेत. असे का व्हावे? विकास साध्य केलेला माणूस अमानुष का बनतो आहे? असे काही प्रश्न जगभराच्या विचारवंतांना सतावत आहेत. स्वतंत्र भारताच्या लोकशाहीने या प्रश्नांची उत्तरे जगाला द्यावीत अशी गांधींची अपेक्षा होती. या लोकशाहीत हिंसाबळाला राजमान्यता वा लोकमान्यता मिळता कामा नये. जनतेच्या ठिकाणी अहिंसात्मक आत्मबल संघटीत होवून त्याने राज्यसत्तेला वठणीवर ठेवावे, सत्याग्रही जनशक्ती असेल तरच सामाजिक न्याय स्थापन होवू शकेल. अन्यथा कोणत्याही प्रकारची शासन व्यवस्था सामाजिक न्याय आणू शकणार नाही, अशी गांधींची खात्री होती. म्हणून एकविसाव्या शतकात गांधींच्या विचारांची प्रासंगिकता तपासून पाहणे संशोधनाचे उद्देश व कार्य आहे.

प्रत्येक शतकाचे विशेष प्रश्न असतात. त्यावेळी त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विचार जन्माला येतात. म्हणूनच विचारांना परिस्थितीचे अपत्य म्हटले जाते. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला साम्राज्यवादाच्या विरोधातील चळवळींनी जोर घेतला आणि अनेक देश स्वतंत्र झाले, विकासाचे प्रयत्न सुरू झाले. याच आधारावर जगाची विभागणी विकसीत, विकनसनशील, व अविकसित देश अशी झाली. त्या शतकामध्ये भारतीय समाज मनावर गांधीवादाचा प्रभाव होता. गांधीवाद हे त्यावेळच्या प्रश्नाचे उत्तर होते. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना माणूस एकीकडे आर्थिकदृष्टया, भौतिकदृष्टया संपन्न होतो आहे असे दिसते, परंतू हे चित्र तितकेसे खरे वाटत नाही. कालपरत्वे समाजाच्या विचारसरणीत बदल होतो आहे. विज्ञान यूगात वावरत असूनही सामाजिक विषमता, सांप्रदायिक विव्देष, जातीयता, असहिष्णूता आणि भोगवादी वृत्तीचे थैमान, भ्रष्टाचार, दहशतवाद, नितीमत्तेचा होत जाणारा ऱ्हास आजच्या मानवी जीवनाला दिशाहीन करत आहे. भारताने 1991 पासून स्विकारलेल्या जागतिकीकरणाच्या झपाटयात मानवी नितीमूल्यांचा, सदभावनांचा ऱ्हास होत आहे. पाश्चात्यांच्या सांस्कृतिक गुलामगीरीत आम्ही पुन्हा बंदीस्त होण्याची चिन्हे आहेत, समाजाचा काही भाग अजूनही अंधश्रध्दांनी वेढला आहे, जात मनातून जात नाही, बदलत्या समाज व मूल्यव्यवस्थेमुळे युवकांचे भरकटलेपण वाढले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था खिळखिळी होत चालली आहे. जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याला आत्महत्येकडे वळावे लागत आहे. महिलांची परवड होत आहे, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी 2020 मध्ये भारत प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाईल हे स्वप्न भारतासमोर उभे केले आहे. या स्वप्नांची पूर्तता करावयाची असेल तर गांधीजींचे विचार आवश्क आहेत का? आत्मपरिवर्तन घडविण्याची शक्ती गांधींच्या विचारात आहे का? आत्मपरिवर्तन घडले तरच व्यक्ती, कुटूंब, समाज, देश विश्व या भावी संकटातून वाचेल का? गांधींच्या विचारातून राष्ट्र विकासाचा मार्ग सापडणार आहे का? मानव धर्म जागात रूजणार आहे का? या प्रश्नांची उत्तरे जर सकारात्मक असतील तर आजच्या या भयावह स्थितीला तोंड देण्यासाठी गांधींच्या विचारंची प्रासंगिकता तपासून पाहणे आवश्यक वाटते.

एकविसाव्या शतकात पर्यावरणाच्या समस्या, वैश्विक तापमान वाढ उग्र स्वरूप धारण करीत असतांना दिसून येत आहेत. गांधींच्या विचारांमध्ये आपल्याला या प्रश्नांची उत्तरे शोधावयाची आहेत. गांधींची विकास कल्पना ही निश्चित स्वरूपाची आहे. गांधी सत्य, अहिंसा, अपरिग्रह, ब्रम्हचर्य हा विचार सांगतात. त्यांनी स्वयंपूर्ण ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली, मोठया उद्योगांऐवजी कूटीर उद्योगांचा पूरस्कार गांधी करतात. गांधींच्या मते, केवळ लोकशाही प्रणालीचा स्विकार करून चालणार नाही, ती समाजाच्या सर्व स्तरात जीवनशैली म्हणून स्वीकृत झाली पाहिजे असे त्यांना वाटे. त्यासाठी त्यांनी स्वावलंबी खेडे आणि ग्रामीण शासन अशी दोन सूत्रे आग्रहाने प्रतिपादन केली होती. आपली आजची कृषीप्रधान व्यवस्था कमालीची परावलंबी आहे, स्वतःच्या शेतीत पिकवलेला माल कुठे विकावा, याचे मोल काय ठरवावे याचे कोणतेही स्वातंत्र्य त्याला नाही. म्हणूनच हा श्रमजीवी पोशिंदा

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


शेतकरी आत्मनाशाच्या कडेवर उभा आहे. अशा वेळी गांधींचा स्वावलंबी खेडयांचा आग्रह रास्त वाटतो. म्हणून एकविसाव्या शतकातील या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या उग्र समस्यांचे निराकरण गांधी विचारात शोधण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधनात करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:—**

1) एकविसाव्या शतकातील भारतातील (विशेष संदर्भ : महाराष्ट्र) सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेवून झालेल्या व होवू घातलेल्या बदलांचा शोध घणे.
2) एकविसाव्या शतकातील समाज जीवनाला प्रभावीत करणाऱ्या मानव निर्मित ज्वलंत समस्यांचा शोध घेणे.
3) म.गांधींचे जीवन व प्रकाशित साहित्याचा सखोल अभ्यास करून त्यांच्या विचारांची प्रासंगिकता तपासणे.
4) एकविसाव्या शतकातील भारतातील खेडयांच्या स्थितीचा आढावा घेणे.
5) भारताची मूळ संस्कृती व संस्कारापासून आजचा समाज किती प्रमाणात जवळ आहे? व किती प्रमाणात दूर गेला आहे? याचा सखोल अभ्यास करणे.
6) एकविसाव्या शतकात उपलब्ध परिस्थिती करीता आवश्यक असलेल्या मानवतावादी, उदातमतवादी, नितीमूल्यांनी यूक्त अशा व्यावहारिक विचारांचा शोध घेवून गांधी विचारांच्या सखोल अभ्यासातून परिपूर्ण व्यवस्थेला अनुकूल विचारांचा शोध घेणे.
7) भारताने इ.स. 1991 साली स्विकारलेल्या धोरणाच्या परिणामांचा शोध घेणे.
8) म.गांधी यांच्या विचारांची वर्तमानकालीन प्रासंगिकता (उपयुक्तता) वर्तमान समाजाल त्याची जाणीव करून देणे.

**संशोधनाची गृहितके :—**

1) म. गांधी यांचे विचार जागतिक स्तरावर सकारात्मक विचार मानले जातात.
2) आधूनिक संदर्भात म.गांधी यांच्या विचारांची ज्वलंत आवश्यकता भासू लागली आहे.
3) म.गांधी यांचे विचार उत्क्रांतीवादी स्वरूपाचे आहेत.
4) म.गांधी यांच्या विचारांमधून आदर्श आणि चिरंतन व्यवस्थेची भावी प्रेरणा मिळते.
5) विद्यमान (सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक) व्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणात बदल (अनुकूल व प्रतिकुल) होवू घातले आहेत.
6) उपेक्षित, शोषीत, श्रमिक, शेतकरी, तळागाळातील सामान्य व्यक्ती हा म.गांधींच्या विचारांमधील मध्यवर्ती केंद्रबिंदू आहे.

**निष्कर्ष :—**

1) एकविसाव्या शतकात लोकसंख्या वाढ, भ्रष्टाचार, दहशतवाद, असुरक्षितता, अस्थिरता, पर्यावरणाचा ऱ्हास आदि ज्वलंत समस्या दिसून येतात.
2) एकविसाव्या शतकातील खेडी ही मोठया प्रमाणावर परावलंबी दिसून येतात.
3) भारताच्या प्राचीन संस्कृतीमधील आदर्श मूल्य व व्यक्ती जीवनाला आकार देणारे संस्कार ऱ्हास पावत असतांना दिसून येतात.
4) जागतिकीकरणाच्या स्विकारामुळे एकविसाव्या शतकातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थिती अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही अंगांनी मोठया प्रमाणात प्रभावीत झाली आहे.
5) भौतिक विकासालाच 'परिपूर्ण विकास' म्हणून बघितले जात असल्याने व्यक्ती विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.
6) एकविसाव्या शतकात पक्षीय राजकारणामुळे विशिष्ट लोकांच्या हाती सत्ता एकवटलेली दिसून येते. सामान्य माणूस सत्तेपासून दूरच असलेला दिसतो आहे.
7) गांधींनी समाज परिवर्तनाची जी साधने सांगितली त्यात अहिंसेचा किंवा अनाक्रमणाच्या मार्गाने होणारे परिवर्तन आगामी राजकीय सत्तेला मार्गदर्शन करणारे आहे.
8) एकविसाव्या शतकातील मानव हा दबावाखाली, दडपणाखाली, सतत भितीच्या मानसिकतेत जीवन जगत असतांना मोठया प्रमाणावर दिसून येत आहे.
9) राज्यसंस्थेमध्ये वर्तमान काळात व्यक्ती—व्यक्तीचे दुरावलेले संबंध जातवाद, भाषावाद, प्रांतवाद यासारख्या फुटीरवादाच्या भावना व आगामी काळातील राजकारणातील प्रश्न सोडविण्यास गांधी विचार उपयुक्त ठरतील.
10) आजच्या राजकीय व्यवस्थेत सत्तेला महत्व आले असून सामान्य व्यक्तीला त्यापासून दूर ठेवले आहे. परंतू गांधींच्या धर्म आणि राजकारणाबाबतचा मुख्य हेतू सामान्य व्यक्ती हा होता. गांधी विचारधारा धर्माला सामान्य व्यक्ती जीवनाशी जोडून राजकारणात आणू इच्छिते.

11) गांधींचे धर्म आणि राजकारणाबाबतचे चिंतन आधूनिक राजकीय व्यवस्थेत समाजपरिवर्तनासाठी वर्ग विहीन समाजरचना निर्माण करण्यासाठी, सामाजिक प्रबोधनासाठी, आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरू शकते.
12) एकविसाव्या शतकात आंतकवादी, नक्षलवादी, कट्टर धार्मिकतेच्या व शस्त्रास्त्र स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर जगाला व भारताला अतिरंजीत हिंसाचारापासून वाचवून शांततापूर्ण सह–अस्तित्वासाठी म.गांधीजींचे अहिंसेबाबतचे विचार प्रभावी आहेत.
13) गांधीजींची धर्म संकल्पना सांप्रदायिक सद्भावना, सहिष्णूता, नैतिकता, मानवतावाद वाढविण्यास उपयुक्त आहे.
14) लोकशाहीमध्ये आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आणि हिंसा टाळण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थते म. गांधींनी दिलेले सत्याग्रहाचे अहिंसात्मक साधन प्रभावी आहे.
15) एकविसाव्या शतकात भारतातील आर्थिक विषमता, बेकारी, दारिद्रय कमी करून लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्याच्या दृष्टीने गांधींचे आर्थिक विचार महत्वपूर्ण ठरतात.
16) सतत वाढती लोकसंख्या आणि मोठया प्रमाणात भौतिक साधन संपत्तीचा वाढता उपभोग यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा पडणारा तुटवडा हे टाळण्यासाठी गांधींनी सांगितलेला अपरिग्रहाचा विचार म्हणजेच गरजा कमी करण्याचे विचार महत्वपूर्ण आहेत.
17) भारतातील गरीब–श्रीमंतामधील आर्थिक विषमतेची दरी कमी करण्याच्या दृष्टीने श्रीमंताकडील अतिरिक्त संपत्ती समाज कल्याणासाठी वापरण्याचा विचार देणारी म. गांधी प्रणीत विश्वस्त संकल्पना उपयुक्त आहे.
18) धार्मिक श्रेष्ठतेवरून हिंदू–मुस्लीमांमधील संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने म.गांधींचे हिंदू–मुस्लीम ऐक्यासंबंधी विचार महत्वपूर्ण आहेत.
19) एकविसाव्या शतकात भारतात भाषावाद उग्र रूप धारण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या धर्तीवर म. गांधींनी राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेचे केलेलल समर्थन व त्यासाठी केलेले कार्य पाहता ते भाषावाद कमी करण्यास व राष्ट्रीय एकात्मता वाढण्यिास मदत करीत असतांना दिसून येते.
20) गांधीजींनी अस्पृश्यता निवारणासाठी केलेले कार्य व मांडलेले विचार पाहता समाजातील भेदभाव, उच्चनिच्चता, अस्पृश्यता कमी करण्यासाठी महत्वपूर्ण ठरतात.
21) नैतिक व आध्यात्मिक राजकारणासंबंधी गांधींनी मांडलेले विचार आजच्या स्वार्थी राजकारणास आळा घालण्यासाठी उपयोगी आहेत.
22) गांधीजींनी अंतर्गत वाद सोडविण्यासाठी सरकारवर किंवा गुंडांवर अवलंबून न राहता वाडया–वस्त्यांमध्ये शांतीसेनेची स्थापना करण्याचा जो विचार मांडला आहे तो आज एकविसाव्या शतकात सुध्दा प्रासंगिक आहे. उदा. म.गांधी तंटामुक्त गाव समिती आणि ग्रामरक्षक दल, पोलीस मित्र हे वरील विचारांचे प्रतिक होत.
23) गांधींनी धर्म व राजकारणाबाबत सत्य, अहिंसा, सत्याग्रह हा मंत्र देवून धर्म व राजकारणाप्रती त्यांनी पाया घातलेला दिसून येतो.
24) आधूनिक प्रगतीने पर्यावरणाचा ऱ्हास मोठया प्रमाणावर होवू लागला आहे.
25) एकविसाव्या शतकातील सर्वसमावेशक उपलब्ध परिस्थितीचा विचार करता आज गांधी विचारांची प्रासंगिकता असल्याचे दिसून येते.
26) आधूनिक काळातील औद्योगिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञानात्मक आणि भौतिक प्रगतीने मानवी श्रमाची प्रतिष्ठा कमी केल्याचे दिसून येते. शारीरिक श्रमाअभावी उत्पन्न होणाऱ्या आरोग्याच्या समस्या मोठया प्रमाणावर वाढलेल्या दिसून येतात.

**षिफारषी :–**

1) समाजातील जातीभेद, धर्मभेद, असमानता नष्ट करण्यासाठी म.गांधींनी सांगितल्याप्रमाणे लोकांचे ऱ्हदय परिवर्तन करावे लागेल, त्यासाठी प्रभातफेऱ्या, प्रचार दौर काढून लोकांत जाणीव जागृती केली पाहिजे.
2) व्यक्ती जीवनातील राज्यशासनाच्या वाढत्या हस्तक्षेपावर नियंत्रण प्रस्थापित होणे आवश्क आहे त्यासाठी राज्याने व्यक्ती जीवनातील हस्तक्षेप कमी करावा.
3) भौतिक विकासाबरोबरच व्यक्ती विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.
4) एकविसाव्या शतकात स्काऊट गाईड संघटना, सेवादल, विविध युवक संघटना, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रामसेवेच्या संस्था इत्यादी सर्व संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय एकात्मता कार्याचा विस्तार करता येईल.
5) शारीरिक, मानसिक, बौध्दिक, व्यावसायिक शिक्षणाबरोबरच व्यक्तीच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक शिक्षणातून व्यक्तीच्या आत्मिक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

6) भारतीय राजकारणात विविध जाती, धर्म, भाषा, प्रदेश व फुटीरतावादावर चालणारे पक्ष व संघटनांवर बंदी घालण्यात यावी.
7) समाजातील वाद–विवाद व दंगली सोडविण्यासाठी गावागावात, वस्त्या–वस्त्यांमध्ये शांतीसेनेची स्थापना करण्यात यावी.
8) शारीरिक श्रमाकरीता व्यक्तीला प्रोत्साहीत करणे व शारीरिक श्रमाचे महत्व समाजाला पटवून देणे आवश्यक आहे.
9) देशातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी गरीब व दारिद्रय रेषेखालील लोकांच्या किमान मुलभूत गरजा भागविण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत.
10) एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या युगात वावरत असतांना भारतीय संस्कृती आणि संस्कार परंपरागत नीती–मूल्ये यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
11) समाजातील श्रीमंतांनी आपल्याकडील अतिरिक्त संपत्तीचा वापर गरीब लोकांच्या हितासाठी करावा. म्हणजेच त्या पैशाव्दारे धर्मादाय संस्था स्थापन कराव्यात. उदा. वृध्दाश्रम, शैक्षणि संस्था, अनाथालय, हॉस्पीटल इ.
12) दहशतवाद, नक्षलवाद कमी करण्यासाठी शासनाने अविकसित भागाच्या विकासाकडे लक्ष देवून त्यांच्या मुलभूत गरजा भागविण्याच्या दृष्टीने विकास योजना राबविल्या पाहिजेत.
13) भारतातील मूलभूत शिक्षणक्रमात व्यवसायभिमुखतेबरोबर शारीरिक श्रमाचे शिक्षण देणे आवश्यक आहे.
14) समाजातील लोकांनी आपल्यावरील अन्याय निवारणासाठी किंवा आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी हिंसेच्या मार्गाने न जाता उपोषण, संप, धरणे, असहयोग आणि अहिंसक सत्याग्रह साधनांचा वापर करावा.
15) देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी तघू व कुटीररोद्योगांना प्रोत्साहन देण्यात यावे.
16) देशातील प्रादेशिकतावाद कमी करण्यासाठी संपूर्ण प्रदेशाचा समतोल विकास करणे गरजेचे आहे तसेच मागास प्रदेशाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.
17) शालेय अभ्यासक्रमामध्ये श्रम, मूल्य शिक्षणाबरोबरच सर्वधर्माची ओळख करून देणारा त्यातील आदर्श तत्वांची ओळख करून देणारा अभ्यासक्रम ठेवण्यात यावा. जेणेकरून मुलांमध्ये सर्व धर्माप्रती समानतेची भावना निर्माण होईल.
18) दहशतवाद कमी करण्यासाठी दहशतवादी संघटनांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या पक्ष, संस्था अथवा संघटनांव्दारा आर्थिक अथवा राजकीय पाठिंबा मिळणार नाही यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.
19) राज्याराज्यातील दहशतवाद, नक्षलवाद मोडून काढण्यासाठी जनतेतील जागृतता व परस्पर सहकार्य व्यापक पातळीवर असणे आवश्यक आहे.
20) देशातील नक्षलवाद कमी करण्यासाठी सर्व प्रकारच्या आर्थिक व राजकीय सत्तेपासून वंचित वर्गाला, जनजातीला आदिवासी घटकांना राष्ट्रीय प्रवाहात आणले पाहिजे.
21) सर्व प्रकारच्या मूलतत्ववादी धर्मांधतेला विरोध केला पाहिजे. त्याचबरोबर सत्य अहिंसा व विश्वबंधूता जोपासली पाहिजेत.
22) एकविसाव्या शतकात अल्पसंख्यांकाच्या हितसंबंधचे संरक्षण करणे त्यांच्या मनातील असूरक्षिततेची भावना कमी करणे जातीपातीची भिंत तोडून त्यांच्यात एकजूटीची भावना वृध्दींगत करणे. अल्पसंख्यांकांची मानसिकता बदलून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात समरस करून घेणे व अल्पसंख्यांकांच्या जिवाचे व मालमत्तेचे रक्षण करणे व त्यांच्या रास्त व न्याय मागण्यांची दखल घेणे गरजेचे आहे.
23) राजकीय पक्षांनी व नेत्यांनी प्रादेशिक भाषेचे राजकारण करून सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :–**

1) धर्माधिकारी, चंद्रशेखर : गांधी – विचार व पर्यावरण, प्रकाशक, सर्वोदय आश्रम, म.गांधी मार्ग, धरमपेठ, नागपूर – 440010, पृ. 3, 4.
2) भारदे, बाळासाहेब : गांधी विचार मिमांसा : महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1993, पृ.3.
3) कित्ता, पृ. 14.
4) जोशी, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड 4, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1976, पृ. 943–4
5) भारदे, बाळासाहेब, पुर्वोक्त, पृ. 43.
6) ॲम्ब्लर, रेक्स, गांधीयन पीसमेकींग फॉर दि वेस्ट, व्ही.टी. पाटील (संपा.), न्यू डायमेन्शन्स ॲड पर्स्पेक्टिवज इन गांधीझम, इंटर इंडिया पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली, 1989, पृ. 376.

7) म. गांधी अभ्यास केंद्र, 21 व्या शतकात गांधी विचारांची आवश्यकता, ममता इंगोले (संपा.), एच.एन. सिन्हा कॉलेज, पातूर, 15 मार्च 2011, पृ. 5.
8) कित्ता, पृ. 6.
9) चतुर्वेदी, सत्येन्द्रनाथ, कार्लमार्क्स के साम्यवादी और गांधी के साम्ययोगी आर्थिक विचारों व्दारा नये समाज की रचना, कल्पना पब्लिकेशन, दिल्ली, 2007, पृ. 37.
10) निगळ, साहेबराव, मूल्य शिक्षण : स्वरूप सद्यस्थिती आणि अपेक्षा, परामर्श, खंड – 30, अंक – 1,2 मे– ऑक्टोबर 2008, पृ. 72.
11) पाण्डेय, उपासना, उत्तर आधूनिकता और गांधी, रावत पब्लिकेशन, जयपूर, 2007, पृ. 148.
12) आहूजा, राम, भारतीय समाज, रावत पब्लिकेशन, जयपूर, 2001, पृ. 244.
13) इंसान की तलाश और हिंसा का चक्र (संपा.), या लेखातून आऊटलुक, ऑक्टोबर 2009, पृ. 8.
14) लोकसत्ता (संपा.), 19 सप्टेंबर 2010, पृ.. 6.
15) जैन माणक, गांधी के विचारों की 21 वी सदी में प्रासंगिकता, आदी पब्लिकेशन, शांती नगर, जयपूर, 2010.
16) Gandhi M.K., Village Industries, Navjivan Publishing House, Ahmedabad, 2004.
17) सोर वासंती, एकविसाव्या शतकात गांधी, परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा, 2010.
18) गांधी मो.क. (अनु.), देशपांडे पा.ग., विधायक कार्यक्रम त्यांचे रहस्य व स्थान, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
19) Terechek Ronald J., Gandhi Struggling for Autonomy, Vistar Publication, New Delhi, 2002.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
| --- | --- | --- |
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार

**प्रा.डॉ.दामाजीवाले एम.डी.**
इतिहास विभाग प्रमुख, स्वामी विवेकानंद महा.शिरूर ताजबंद

---

अहिंसेच्या मार्गाने भारत देशाला ब्रिटिशाच्या जुलमी राजवटीतून स्वातंत्र्य मिळवून देणारे गांधीजी हे काही अर्थशास्त्रज्ञ नव्हते. तरीही गांधीजीचे त्या काळातील आर्थिक विचार आज २१ व्या शतकात मानवाच्या कल्याणासाठी उपयुक्त आहेत. सत्य, अंहिसा, सर्वोदय ग्रामोद्योग, धर्म, समाजकारण, राजकारण या विषयावर त्यांनी मांडलेले विचार, त्यांचे पत्रव्यवहार, हिंद स्वराज्य या पुस्तकातून त्याचे आर्थिक विचार स्पष्टपणे दिसून येतात. आधुनिक भारतातील घडामोडी गांधीजीच्या आर्थिक विचाराची नेहमी आठवण करून देतात. आजची अर्थव्यवस्था ज्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यात महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचाराची आवश्यकता वाटते. वर्तमान भारतातील आर्थिक समस्येवर गांधीजीच्या आर्थिक विचाराने मात करता येते.

महात्मा गांधीनी भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी मोठया उदयोगधंदयाना विरोध केला. प्राचीन काळी भारतात खेडी स्वयंपूर्ण होती. म्हणून खेडयाचे पुनरूजीवन झाले पाहिजे. मानवी श्रमाला महत्व देण्यासाठी त्यांनी मोठया उदयोगधंदयात यंत्राऐवजी मानवी श्रमाला प्राधान्य दयावी असे मत मांडले. बेकारी कमी करण्यासाठी हस्तोउद्योगाला प्राधान्य दिले. ग्रामीण विकास, कुटीर उदयोगधंदयाची वाढ, औदयोगिकीकरण श्रमशक्तीला संधी, स्वदेशी चळवळ खादी ग्रामोद्योग चळवळ सर्वोदय अशा विविध प्रकारे गांधीनी राष्ट्राचा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत शोधनिबंधातून त्याची मांडणी केली आहे.

उद्दिष्टे :-

१) महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचाराचा अभ्यास करणे.
२) भारतीय समाज व सामान्य जनमाणसावर गांधीजीच्या विचार प्रभावाचा अभ्यास करणे.
३) ग्राम विकासातून राष्ट्रविकासावर गांधीनी भर दिला होता हे स्पष्ट करणे

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी उपलब्ध दुय्यम पध्दतीच्या साधनांचा ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके वृत्तपत्राचा वापर करून माहिती संकलित केली. त्याचेच अध्ययन करून महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केला आहे.

**महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार :**

महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचाराचा केंद्रबिंदू हा ग्राम व ग्रामीण सर्वसामान्य जनता होती. म्हणून महात्मा गांधीनी ग्रामीण भागाच्या विकासावर भर दिला. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल. ग्रामाचा विकास हाच राष्ट्राचा विकास होय. म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' खरा भारत हा खेड्यातच आहे. खेड्यातील मुख्य व्यवसाय हा शेती व शेतीला पुरक असे लघु उदयोग किंवा कुटीर उदयोग आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही प्राचीन काळापासून कृषीप्रधान आहे. या कृषीचा व त्यावर अवलंबून असणाऱ्या उदयोगधंदयाचा विकास हे महात्मा गांधीना अभिप्रेत होते. त्याचे आर्थिक विचार ग्राम विकास, ग्रामोद्योग, हस्त कौशल्याच्या वस्तु निर्माण करणारे कुटीर उदयोग, मानवाच्या गरजा, श्रमप्रतिष्ठा आर्थिक समानता, यांत्रिकीकरणाला विरोध, स्वदेशी वस्तुचा वापर, खादी वस्त्राचा वापर, व समाजातील शेवटच्या घटकांचा विकास, स्वावलंबन इ. वर अधिक भर दिला. मानवाने आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्यात, जेवढे आहे तेवढयातच आपला उदरनिर्वाह चालवावा असे गांधीना वाटत होते. आपल्या संपत्तीचा उपयोग मानवाने लोक कल्याणासाठी करावा त्यामुळे सामाजिक विषमता कमी होइल असे गांधीजीना वाटत होते.[१]

**ग्रामविकासावर भर :**

भारतातील ब्रिटीश सत्तेचे आणि त्यांच्या आर्थिक धोरणाचे परिणाम लक्षात आल्याने महात्मा गांधीनी भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे बदल झाले पाहिजे असे त्यांनी विचार मांडले. त्यांनी भारतीय जीवन पध्दतीचा सर्वांगीण विचार केला. यात बदल घडवून आणावयाचे असेल तर खेडे स्वावलंबी आणि स्वंयपूर्ण झाले पाहिजे. हे त्यांच्या आर्थिक विचाराचे मुलसुत्र होते आणि ग्रामविकास हा त्यांच्या आर्थिक विचाराचा मुलाधार होता. म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' अशी घोषणा दिली.[२] राष्ट्रविकासाची सुरूवात ही खेड्यापासून झाली पाहिजे. ब्रिटिश पूर्व काळात भारतीय खेडी ही

स्वयंपूर्ण होती. स्थानिक गरजाची पूर्तता स्थानिक पातळीवर होत होती. पण ब्रिटिशांच्या औद्योगिक धोरणामुळे कारखानदारी वाढली. वाढत्या कारखानदारीमुळे ग्रामीण भागातील लघुउदयोग कुटीर उदयोगधंदे बुडाले. खेड्यांना औदयोगिक शहरावर आवलंबून राहावे लागले. ही व्यवस्था बदलण्याची खरी गरज आहे. खेड्यातील शेवटच्या समाज घटकापर्यंत पूर्वीसारखी उत्पादनाची साधने निर्माण करून पुन्हा नव्याने त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. सर्व स्थानिक गरजाची पूर्तता स्थानिक उपलब्ध साधनाद्वारेच व्हावी. असे विचार गांधीजीचे होते. राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या प्रगत करण्यासाठी आगोदर ग्रामाची अर्थव्यवस्था प्रगत होणे गरजेचे आहे.

**स्वदेशी चळवळ :**

भारतात ब्रिटिशांची सत्ता असल्यामुळे त्यांनी कारखानदारीतून निर्माण केलेल्या वस्तुचा बाजारपेठेत व्यापार होत असे. परिणामी स्वदेशी वस्तुची बाजारपेठच नष्ट झाली होती. यामुळे देशी कुटीर, लघु उदयोगाला एक प्रकारची अवकळा आली. तो बंद पडण्याच्या मार्गी लागल्यामुळे दारिद्रय, बेकारी, उपासमारीची वेळ भारतीय कारागीरावर आली. देशातील ही परिस्थिती बदलण्यासाठी स्वदेशीचा गांधीनी पुरस्कार केला. स्वदेशी म्हणजे देशातील छोटया-छोटया उदयोग धंदयाना प्रोत्साहन मिळेल व उत्पन्न, रोजगार, राहणीमान व राष्ट्रीय स्तर उंचावण्यास मदत होईल. उदयोगास चालना मिळेल. देशाबाहेर जाणारी संपत्ती भांडवलाचा देशातच वापर करणे शक्य होईल व देश आर्थिकदृष्ट्या सबल बनेल. तसेच स्थानिक पातळीवर परस्परांच्या गरजा परस्पर भगविल्या जातील. खेडे स्वंयपूर्ण होऊन शहरावर आवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.[३] स्वदेशी चळवळीला गतिमान करण्यासाठी धर्माचा आधार घेतला ते म्हणत की, स्वदेशी देशाच्या धार्मिक उन्नतीचा मुलाधार आहे. स्वदेशीचा आवलंब न करण्याऱ्यांना स्वाभीमानी म्हणता येणार नाही. जपमाळ ओढण्याऐवजी चरख्याची माळ फिरवण्यात त्यांनी धन्यता मानली. नाडियाद येथे महिलांच्या सभेत मार्गदर्शन करताना स्वदेशीत धर्म आणि अर्थ या दोन पुरूषार्थाचे दर्शन घडविले. शेजाऱ्याला शक्तीनूरूप कार्य करवून घ्यायला प्रेरित करणे हा धर्म मार्ग, देशातील धन देशातच ठेवून राखणे हा अर्थ पुरूषार्थ होय. यानिमित्ताने स्वदेशीचे व्रत घेण्याची प्रेरणा गांधीनी महिलांना दिली. चरखा धर्माप्रती व स्वदेशी बाबत महात्मा गांधीनी फार मोठया प्रमाणात जागृती करून समाजाचा व देशाचा आर्थिक स्तर उचावंण्याचा मार्ग दाखवून दिला.[४]

**यंत्रास विरोध :**

महात्मा गांधीनी ब्रिटिशांच्या वसाहत वादाला विरोध केला. त्यांच्या औदयोगिकी करणाविरूध्द आपली मते मांडली. मानवी जीवनात जितक्या गरजा जास्त तितका विकास जास्त होतो. ही वर्तमान विकासाची परीभाषा आहे. अर्थशास्त्रही या परिभाषेशी सहमत आहे. ब्रिटिशांच्या अवजड उदयोगधंदयाना विरोध केला कारण यंत्र म्हणजे मोठया प्रमाणावर उत्पादन त्यातून अनेक सामाजिक, आर्थिक प्रश्न निर्माण होतात. वाढत्या उत्पादनातून स्पर्धा, भांडवलशाही शोषण हे दोष निर्माण होतात. त्यासाठी उदयोगधंदयाचे विकेंद्रीकरण करून छोटे छोटे उदयोगधंदे काढले पाहिजे. यात यंत्राऐवजी मानवी श्रमाला प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे बेकारी दूर होवू शकते. गांधीजीनी यंत्राला विरोध केला नाही. ते म्हणत की, 'शरीरसुध्दा यंत्र आहे, तर मी यंत्राला कसा विरोध करेन? माझा यंत्राला विरोध नाही, परंतु यंत्र माणसाचा गुलाम झालं पाहिजे, माणुस यंत्राचा गुलाम होता कामा नये' हा यंत्र उदयोगबाबत गांधीचा विचार होता.[५] आजच्या परिस्थिती संपूर्ण मानवी जीवनच यंत्रमय झाले आहे. मानव यंत्राचा गुलाम बनला आहे. कमी श्रमात आधिक मोबदला हे समिकरण आजच्या अर्थव्यवस्थेत झाले आहे. तत्कालीन परिस्थितीतील मानवाच्या मुलभूत गरजा संपून गेल्या नविन गरजा निर्माण होवून मानव यंत्रातच पूर्णपणे आडकलेला आहे.

**खादी चळवळ व चरखा संघ :**

महात्मा गांधीनी दक्षिण आफ्रिकेतील यशस्वी सत्याग्रह लढा देवून भारतात परत आल्यानंतर राजकिय गुरू ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या आदेशानुसार देशभर फिरून जनजागृती केली. इंग्रजाच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्याचे ध्येय गांधीनी आपल्या नजरेसमोर ठेवले. इंग्रजी राजवट नष्ठ होण्यास दिर्घकाळ लागेल. याची जाणीव झाली. म्हणून ग्रामीण समाजाच्या विकासासाठी व त्यांना ब्रिटिश निर्मित कापडावर आवलंबून राहावे लागू नये. स्वदेशी कापड निर्मितीसाठी चरखा हे उपयुक्त साधन मानले. हे साधन हाती घेवून खादी ग्रामोद्योगाच्या रचनात्मक कार्याच्या आधारे ग्रामविकास होऊ शकते. व भारतीय अर्थव्यवस्था सक्षम बनू शकते. म्हणून महात्मा गांधीनी वर्धा जवळील सेवाग्राम आश्रमातून खादी चळवळीचा प्रारंभ केला. महात्मा गांधीनी 'हिंदस्वराज्य' या १९०९ साली लिहिलेल्या ग्रंथामध्ये

चरख्यानेच हिंदुस्थानचे दारिद्रय संपेल असे म्हटले आहे.[६] जसे स्वातंत्र्य चळवळीला गतिमान करण्यासाठी स्वदेशी चळवळीला बळ मिळण्यासाठी चरखा व खादी चळवळीला गती देण्याचा महात्मा गांधीनी प्रयत्न केला.

१९२५ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक पटना येथे झाली. चरखासंघ स्थापन करण्याची काँग्रेस महासमितीने परवानगी दिली.[७] या चरखासंघाचे अनेक उद्दिष्टये होती. त्यापैकी गरीबांना मदत करणे, मजूरी प्राप्त करून देणे, दुष्काळी परिस्थितीत उत्पादन न झाल्यास रोजगार मिळवून देणे, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा देणे, कताई संबधीच्या संस्थाना मदत करणे इ. कार्य चरखा संघामार्फत करण्यात आली. खादीच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील लोक स्वावलंबी बनेल त्याची अर्थव्यवस्था सुधारेल, कापूस उत्पादक शेतकरी सुधारेल, ब्रिटिश सरकारकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबेल. हा दृष्टीकोन ठेवूनच काकीनाडा येथे 'अखिल भारतीय खादी मंडळाची स्थापना करण्यात आली' विदेशी कापडावर बहिष्कार टाकण्याचे साधन म्हणून चरख्यावर तयार झालेल्या खादीचा वापर करण्यात आला. यातून ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडून आले.

**श्रमप्रतिष्ठा :**

महात्मा गांधीजीनी आपल्या आर्थिक विचारात मानवी श्रमाला अधिक महत्व दिले आहे. त्यांनी स्विकारलेल्या नविन शिक्षण प्रणालीमध्ये सुध्दा श्रमाधिष्टीत मुल्याच्या विकासावर भर दिला होता. गांधीजीना दक्षिण आफ्रिकेच्या वास्तव्यात 'इंडियन ओपिनियन' या साप्ताहिकाच्या संदर्भात जोहान्सबर्गहून दर्बानला जाते वेळेस हेन्री पोलक यांनी दिलेले व १८६० साली प्रकाशित झालेले ब्रिटिश विचारवंत जॉन रस्किनचे 'अन टू धिस लास्ट' हे पुस्तक १९०३ साली वाचले. या पुस्तकाच्या वाचनातून शारीरिक श्रमाच्या प्रतिष्ठेचे महत्व पटले.[८] महात्मा गांधीजीच्या मते, ग्रामीण अर्थतंत्राचा संस्कार श्रम प्रतिष्ठेद्वारे विकसित करता येतो. यातून बौध्दीक संस्कार घडविले सहज शक्य आहे. भारतात ब्रिटिशपूर्व कालखंडात नेमके याकडे दुर्लक्ष झाले आणि आधुनिक शिक्षण पध्दतीने तर यापासून फारकत घेतली परिणामी भारतीय समाजाची सामाजिक संरचना ग्रामीण अर्थतंत्राच्या सामुहिकतेंपासून दूर गेली. हे गांधीजीच्या लक्षात आल्याने बौध्दीक संस्कार व श्रमप्रतिष्ठा यांची सांगड घातली. नयी तालीम, बुनियादी शिक्षण, किंवा वर्धा शिक्षण योजनेतून त्यांनी समाजातला श्रमाधिष्ठित मुल्याच्या वाढीसाठी शिक्षण दयावे अशी योजना मांडली होती. आजही भारतात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करून तरूणात श्रमप्रतिष्ठा जोपासण्याचे कार्य केले जाते. याद्वारे तरूणामध्ये स्वावलंबनाची भावना विकसीत होते. व्यक्तीच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांचा विकास होतो. प्रत्येकाला श्रमाचा मोबदला मिळणार असल्याने माणसाला श्रमावर निष्ठा ठवेणे सोपे जाते. यामुळे सामाजिक आर्थिक विषमता नष्ठ होईल.

**आर्थिक समता :**

भारतात आर्थिक समता प्रस्थापित व्हायची असेल तर भांडवलदार व कामगार या वर्गातील संघर्ष संपला पाहिजे आणि श्रीमंत व गरीब यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी भरून निघाली पाहिजे असे गांधीजीचे मत होते.[९] पण त्यासाठी सरकारी सक्ती किंवा सशस्त्र संघर्ष हे मार्ग त्यांना अभिप्रेत नव्हते. त्यापेक्षा श्रीमंत व भांडवलदार वर्गांनी गरीबाचे शोषण थांबवावे. त्यांना न्याय वागणुक दयावी. त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी श्रमाचा योग्य मोबदला दयावा. दक्षिण आफ्रिकेत असतांना महात्मा गांधीनी जॉन रस्किनचे 'अन टू धीस लास्ट' या ग्रंथाचे वाचन केले. यातून गांधीजीना आर्थिक विषमतेची जाणीव झाले. जॉन रस्किनने भांडवलशाही समाजव्यवस्थेला विरोध केला होता. या विचाराचा गांधीवर प्रभाव पडलेला दिसून येतो. आर्थिक समतेसाठी झटणे याचा अर्थ भांडवल आणि श्रम यांच्यातील विरोध नाहिसा करणे हा होय. ज्या थोडया धनिकांच्या हातात आज देशाची संपती गोळा झालेली आहे. त्याची पातळी खाली आणणे आणि गरीबीत जीवन जगणाऱ्या जनतेची आर्थिक पातळी उंचावणे हे गांधीजीना अभिप्रेत होते.

**सर्वोदय व विश्वस्त मंडळ :**

जॉन रस्किनच्या 'अन टू धीस लास्ट' या ग्रंथाचा प्रभाव गांधीजीवर पडला होता. या ग्रंथातील विचारातूनच सर्वोदय हा विचारशब्द महात्मा गांधीनी वापरात आणला. सर्वाची उन्नती म्हणजे सर्वोदय, सर्वाचा उदय किंवा विकास असा याचा अर्थ होतो. समाजातील शेवटचा घटक जो विकासापासून वंचित आहे. अंत्य म्हणजे शेवट म्हणजे विकास व प्रगतिपासून शेवटी असलेला घटक सर्वोदयाच्या केंद्रस्थानी होता. सर्वोदयाच्या तत्वज्ञानात आधी सर्वाचा उत्कृर्ष आहे. अशी वृत्ती असणे आवश्यक आहे. १८ जाने १९४८ च्या 'हरिजन' च्या अंकात महात्मा गांधीजीनी सर्वोदयाची रूपरेषा

स्पष्ठ करताना सांगितले की, खऱ्या भारताचे लोकशाहीचे स्वप्न जर साकार व्हायचे असेल तर 'खऱ्या भारतातल्या सामान्यातल्या सामान्य माणसालाही आपण भारताचे शासक आहोत असे वाटले पाहिजे. केवळ मुठभर बडया लोकांना आपण शासनकर्ते आहोत असे वाटता कामा नये'[१०] महात्मा गांधीजीच्या सर्वोदयात सामान्य श्रमीक, मजूर आणि धनिक उदयोगपती या दोन्ही घटकात समानता पाहिजे. प्रत्येकाने घाम गाळून आपली उपजिविका करावी. समाजातील आर्थिक विषमता नष्ठ करण्यासाठी जे धनिक आहेत. त्याचे मन वळवून त्यांच्या सपंत्तीचा विनियोग समाजात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी करावा. या धनिक वर्गाने स्वतःला विश्वस्त समजून आपल्या मालमत्तेचा उपयोग करावा. यातूनच महात्मा गांधीजीनी विश्वस्त कल्पना मांडली आहे. महात्मा गांधीनी मांडलेली विश्वस्त कल्पना ही एक त्याच्या आर्थिक विचाराचा महत्वाचा भाग आहे. देशात संपत्ती निर्माण करावयाची असेल तर त्यासाठी सर्वाची मदत हवी असते. सर्व संपत्ती ही ईश्वरी सपंत्ती आहे. त्यावर सर्वाचीच मालकी असली पाहिजे एखादया व्यक्तीकडे अतिरिक्त संपत्ती असेल तर तिचा उपयोग समाजाच्या आर्थिक विकासासाठी करावा. तो विश्वस्त म्हणून करावा जमिनदार व भांडवलदार यांनी गरीबांचे आर्थिक शोषन न करता त्यांनी विश्वस्त म्हणून कार्य करावे. गरीब व श्रीमंत असा भेदभाव करू नये.

**निष्कर्ष :**

महात्मा गांधीजी हे एक आदर्शवादी व अध्यात्मवादी पुरूष होते. प्रामुख्याने ते मानवतावादी होते. ते अर्थशास्त्रज्ञ नव्हते. पण त्यांनी नैतिकदृष्टीने विचार करून सामान्य माणसाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी जे विचार मांडले. ते एखादया प्रकांड अर्थतज्ज्ञानाला लाजवेळ असे होते. भौतिकवादाला, चंगलवादाला आळा घालून सर्वांना समानतेच्या वाटेने नेणारे होते. गांधीजीच्या अर्थशास्त्रात, दारिद्रय, बेकारी, विषमता, हिंसकवृत्ती, इ. घटकांना नष्ठ करून मानवी जीवन सुखी व समृध्द करणारे विचार होते. आज गांधी विचारांना मानाचे स्थान देण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत. आपल्या देशात असलेली गरीबी दारिद्रय बेकारी, अशिक्षितता व निर्माण होणाऱ्या नवनविन समस्या दूर करण्याकरीता गांधीजीचे आर्थिक विचार कृतीत उतरविण्याची खरी गरज आहे. गांधी विचारातूनच फार मोठे परिवर्तन होऊ शकते.

**संदर्भ :**


१. प्रा.रमेश पानसे, नयी तालीमः, गांधी प्रणित शिक्षण विषयक प्रयोगाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ.२६.
२. डॉ.सौ.सुर्यकांता अजमेरा, व प्रा.सौ.अनुराधा पोतदार, महात्मा गांधीची विचारधारा, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०११ पृ.८९
३. उपरोक्त, पृ.६७
४. डॉ.विश्वास पाटील, सत्याग्रही गांधी, गांधी रिसर्च फाऊडेशन, जळगाव, २०११, पृ.५१.
५. नारायणभाई देसाई , अज्ञात गांधी, समकालीन प्रकाशन, (आ.४ थी), पूणे, २०११, पृ.४६-४७
६. उपरोक्त पृ.६८
७. उपरोक्त पृ.७०
८. प्रा.रमेश पानसे, पूवोक्त, पृ.२२
९. डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, भारतीय राजकीय विचारवंत, पिपंळापूरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २०११ पृ.१५८
१०. गाठाळ साहेबराव, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९९, पृ.२३८.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# आजच्या काळात महात्मा गांधीच्या विचारांची प्रसंगीकता

**डॉ. संजय गायकवाड**
(राज्यशास्त्र विभागप्रमुख), श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमतनगरए जि. हिंगोली

---

## प्रस्तावना

महात्मा गांधी हे आदर्शवादी युगप्रवर्तक विचारवंत होते. त्यांनी धर्म आणि राजकारण यांचा समन्वय साधून व्यावहारीक अशी आध्यत्मवादी दृष्टी आपणास दिली. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांस मानवी जीवनात सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी मानलेल्या सत्य अहिंसा, सत्यागृह, आदर्शराज्य, ग्रामस्वराज्य, स्वयंपूर्ण खेडे, विश्वस्त संकल्पना, धर्मविशयक विचार, अर्थविशयक विचार, राजकारणविशयक विचार, राष्ट्रवादासंबंधी विचार, स्वच्छताविषयक, जलसाक्षरता या विचारांचा अभ्यास करता व समकालीन स्थितीचे अवलोकन करता आजच्या काळातही महात्मा गांधीच्या विचारांची आवश्यकता आहे असे आपणास दिसून येते.

भारत हा खेडयामध्ये राहतो खेडी नष्ट झाल्यास भारत नष्ट होईल असे गांधीजींचे मत होते. राष्ट्र उभारणीत स्वावलंबी खेडे हा महत्त्वपूर्ण घटक आहे. प्रत्येक खेडे हे नव्या रचनेचा केंद्रबिंदू असेल. गांधीजींच्या मते भारताचे दर्शन मुठभर शहरांमधून नव्हे तर सात लाख खेडयांमधून घडते. खेडयांच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल व व्यक्तीचा सर्वांगिण विकास खेडयांमधून होईल. स्वायत्त असलेली खेडी स्वयंस्फूर्त सहकार्यांच्या बळावर आपापल्या गरजा भागवू शकतील आणि सर्वांना शांततामय सहजीवन प्राप्त होईल. महात्मा गांधींचा ग्राम विकासावर भर होता, ग्रामीण विकास घडून आल्यास अन्न, वस्त्र, निवारा,शिक्षण, बेरोजगारी, व्यसनाधिनता या समस्या राहणार नाहीत त्यासाठी त्यांनी ग्राम राज्याची संकल्पना मांडली.खेडीही स्वयंपूर्ण, स्वयंशिस्त व स्वावलंबी असतील त्यामुळे समाजातील विषमता कमी होईल, व्यक्ती आपली बुध्दी व कौशल्य वापरून संपत्ती मिळवेल असे त्यांचे मत होते.

वर्तमानकालीन परिस्थितीचा विचार करता गांधीजींचे ग्रामीण विकास विषयक विचार व ग्राम स्वराज्य संकल्पना आजही महत्त्वपूर्ण आहेत. सरकारने गांधीजींच्या या विचारांचा अवलंब न केल्याने आज खेडी उध्वस्त होत आहेत. खेडयांकडे दुर्लक्ष केल्याने बेरोजगारी व्यसनाधिनता, गुन्हेगारी या समस्या आज ग्रामीण स्तरावर निर्माण झालेल्या दिसून येतात. ग्रामीण विकास न झाल्याने शहरी करण मोठया प्रमाणात वाढले असून शहरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण पडत असून सोयी सुविधांवर त्याचा परिणाम होतो आहे. म्हणून ‘स्मार्ट सिटी’ ऐवजी ‘स्मार्ट व्हीलेज’ निर्माण करणे आवष्यक आहे व त्यासाठी गांधीजींच्या विचारांची आज आवश्यकता आहे.

महात्मा गांधी संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणारे तत्त्वचिंतक होते. त्यांचे आर्थिक विचार व विश्वस्त संकल्पना सर्वांना मार्गदर्शक ठरते. त्यांनी मांडलेली अर्थव्यवस्था ही श्रम प्रतिष्ठा, विकेंद्रिकरण व साधन सुचितेवर आधारीत होती.आज भारत जागतीक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे परंतु भारताच्या या विकास प्रक्रियेत गांधीजींच्या आर्थिक विचारांची गरज प्रकर्षाने जाणवते. आज भ्रष्टाचार, आर्थिक विषमता यांस भारतात सामोरे जावे लागत आहे. गांधीजींच्या विचारांना आत्मसात केले असते तर या समस्या निर्माण झाल्या नसत्या. गांधीजींचे अर्थशास्त्र नितीशास्त्राशी संबंधीत होते. वर्तमानात महात्मा गांधीजींच्या नैतिक विचारांना भ्रष्टाचारी नेत्यांने मुठमाती देऊन अर्थिक विकास धुडकावून लावल्याचे वास्तवीक चित्र आहे. ‘सत्तेतून पैसा आणि पैशांतून सत्ता’ हे दुष्ठ चक्र आज भारतीय व्यवस्थेत निर्माण झाले आहे. केवळ ‘मि प्रधान सेवक आहे’ असे म्हणून चालणार नाही तर त्यासाठी गांधीजींची विश्वस्त संकल्पना व आर्थिक विचार आत्मसात करणे व तसे वर्तन करणे गरजेचे आहे.

भारतीयांमध्ये अर्थिक सामाजीक समस्या निर्माण होतील असे कुठलेच यांत्रिकीकरण व औद्योगिकरण गांधीजींना नको होते. त्यांच्या मते यंत्रामुळे मानवी श्रमाचे महत्त्व कमी होते व भांडवलदारीमुळे आर्थिक केंद्रिकरण होते. भारतात मनुष्य बळ आहे त्यामुळे श्रम शक्तीही आहे.पण पुरेशे भांडवल नाही म्हणून मोठे मोठे कारखाने न उभे करता ग्राम उद्योग व कुटीरउद्योग यांना चालना दयावी त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न मिटेल तसेच मृतप्राय झालेल्या खेडयांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल. खादी व गोपालन यांना अग्रक्रम दयावा, उद्योग गटागटाने (बचतगटाने) चालविण्यात यावे असे त्यांचे मत होते. आज गांधीच्या या विचारांचा अवलंब न केल्याने श्रम प्रतिष्ठेचे महत्त्व कमी झाले आहे व शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, चोरी, गुन्हेगारी यांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते तसेच विषमतेवर आधारीत समाजरचना निर्माण झाली आहे.

स्वच्छतेला जीवनात प्राधान्य असले पाहिजे हे आपल्या आचार विचार आणि कृतीतून गांधीजींनी अनेकदा दाखवून दिले. दक्षिण अफ्रिकेत असताना त्यांनी स्वच्छता व आरोग्यविषयक लेखन तर केलेच शिवाय मैला स्वतःहून वाहून नेला, साफ सफाई केली. राजकोटमध्ये जलजन्य रोगांनी थैमान घातले होते, तेव्हा त्यांनी घरोघरी जावून सांडपाणी निस्सारण आणि आरोग्यासाठी प्रबोधन केले. 1901 मध्ये कॉंग्रेसच्या कोलकत्ता अधिवेशनामध्ये सहभागी झाले असता त्यांना असे जाणवले की, मैला अस्पृश्य जातींच्या लोकांकडूनच वाहिला जात आहे. या जातीभेदावर अधिवेशनातच त्यांनी नाराजी व्यक्त केली. स्वच्छतागृह साफ सफाईचे काम स्वतः हाती घेतले. प्रत्येकांने स्वतःची साफ सफाई स्वतःच केली पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता.गांधीजींच्या जन्मदिन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्वच्छ भारत' ही एक जनचळवळ सुरु केली, परंतू आजही गांधीजींचे स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण झालेले नाही. सध्या देशाची पत स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, अर्थकारण याबाबींमध्ये घसरत चालली आहे हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालामधून स्पष्ट होते. आरोग्य, पाणी हे स्वच्छतेशी निगडित असणारे विषय आता प्रदूषणाच्या समस्या बनलेल्या आहेत. प्रदूषणाचे प्रश्न जागतिक समस्यांचाही भाग असतात जसे, हवामान बदल. त्याचा सामना प्रत्येकास करावा लागेल आणि म्हणून गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता आजही महत्वाची आहे.

गांधीजींचा चष्मा आपल्याला एक पाऊल पुढे जाण्यासाठी प्रेरित करत आहेत. आज प्रत्येकाने घरातूनच स्वच्छतेची सुरुवात करणे गरजेचे झाले आहे. खत निर्मितीचा गांधीजींनी सांगितलेला मार्ग अवलंबला तर कचऱ्याचा प्रश्न संपेल व खतनिर्मितीही होईल. इलेक्ट्रॉनिक वस्तू, प्लॅस्टिक वेगळे करुन योग्य जागी पुर्नवापर करता येईल तसेच पाण्यामध्ये वापरले जाणारे सफाई रसायन, साबण हे विघटनशील असणारे पदार्थ वापरल्यास त्यामुळे जलप्रदूषणावरील भार कमी होईल. शुन्य कचरा निर्माण करणारे घरे निर्माण झाल्यास गांधीजींना अभिप्रेत असणारी स्वच्छ, सुंदर असणारी खेडी व शहरे म्हणजेच आजच्या काळातील स्मार्ट
व्हिलेज व स्मार्ट सिटी निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. स्वच्छता निर्माण झाल्यास देशाची शान तर वाढेलच पण त्याबरोबर पर्यटन विकासास चालना मिळवून अर्थकारणही साधता येईल.

**सारांश :**

गांधीजींच्या विचारांचा परामर्श घेता असे दिसून येते की विकसनषील देषांच्या विकासासाठी गांधीजींचे अर्थविषयक विचार सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने उपयुक्त आहेत.आज भांडवलशाही राश्ट्रे औद्योगिकरण व यांत्रिकीकरणाचे दुष्परिणाम भोगत आहेत. गांधीजींचे ग्रामस्वराज्य ग्रामीण विकासविषयक विचार हे आर्थिक विशमता उपभोगवाद, शोषण या सर्व समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त आहेत. मुल्य शिक्षण पध्दतीचा स्वीकार करून तरूणांनी स्वालंबी होवून ग्राम विकासासाठी प्रयत्नशील राहीले पाहिजे असा संदेष गांधीजी देतात.निर्व्यसनी समाज हा निकोप समाज व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे. गांधीजींच्या सत्ता विकेंद्रिकरण, ग्राम स्वच्छता, धर्मनिरपेक्षतता या विचारांना जागतिकिरणाच्या व उदारीकरणाच्या लाटेत नव्या संदर्भांची जोड दिल्यास त्यांच्या विचारांची उपयुक्तता व आवश्यकता आजच्या काळातही आहे हे सिध्द होईल.

**संदर्भ :–**


1 प्राचार्य डॉ. पी. डी. देवारे, डॉ. डी. एस. निकुंभ – भारतीय राजकीय विचार.
2 डॉ. अरविंद श्रृंगापूरे – समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत.
3 रा. गो. देवगावकर – राजकीय विचारवंत पाश्चिमात्य आणि भारतीय.
4 डॉ. भा. ल. भोळे – आधुनिक भारतीय राजकीय विचार.
5 रॉय किणीकर – गांधी नावाचे महात्मा.
6 अरूण सारथी – शोध महात्मा गांधीचा.
7 सु. श्री. पांढरीपांडे – महात्मा गांधींचे 'हिन्द स्वराज्य' आणि नवे मन्वंतर.
8 डॉ. वि. मा. बाचल – भारतीय राजकीय विचारवंत.
9 डॉ. वा. भा. पाटील – आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधी यांचे विधी व्यवसाय विषयक मत

**प्रा.सुवर्णा उमाकांत टेंकाळे**
**तत्त्वज्ञान विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय,हाडोळती, ता.अहमदपूर जि.लातूर**

---

गांधीनी भारतात फार काळ वकिली केली.दक्षिण आफ्रिकेत त्यांनी २० वर्षे वकिली केली.या कालावधीत त्यांनी कधीही खटला जिंकण्यासाठी खोटे साक्षीदार तयार केले नाहीत.अशील जिंकला किंवा हरला तरी ते कायम ठरलेली फीस घेत असत. त्यांच्या वकिली व्यवसायात धर्मभावनेने प्रवेश केला होता. गांधीजींना वकिली व्यवसायात भरपूर पैसा मिळत होता पण त्यांची फी सामान्यतः कमी असे. गरिबांकडून थोडी फी आकारीत आणि कित्येकांडून फीच घेत नसत.त्यांच्या वीस वर्षाच्या वकिली व्यवसायात शेकडो प्रकरणे त्यांनी न्यायालयाबाहेर मिटविली.अशिलांना कायद्याची मदत तर ते देत असतच पण प्रसंगी त्यांना इतर मदतही करीत. गांधीजी राजकोटला असताना जे वकील त्यांना खटले देत त्यांना नियमाप्रमाणे पैसे (दलाली )द्यावे लागत. गांधीजीनी असे कमिशन द्यायला नकार दिला.कारण,त्यांच्या नीतीमध्ये ते बसत नव्हते सत्य आणि सेवा यांना जो सर्वोच्च स्थान देतो तोच खरा वकील होय,असे महात्मा गांधी मानत असत.गांधीच्या या विचारावरून असे लक्षात येते की, त्यांनी विधी व्यवसायात पैसापेक्षा नैतिक मूल्यांना अधिक प्राधान्य दिलेले होते.जे आज या व्यवसायामध्ये क्वचितच पाहायला मिळते. कारण या व्यवसायात अनैतिकता भ्रष्टाचार मानवीय आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात झालेला आढळून येतो.

माणसे वकील होतात ती काही परदुःख दूर करण्यासाठी नव्हे तर पैसा मिळविण्यासाठी तो एक कमाईचा मार्ग आहे म्हणून. वकिलांचा स्वार्थ भांडणे वाढविण्यात असतो. भांडण झाले कि वकिलांना आनंद होतो. लहानसहान वकिल तर भांडणे लावतातही. त्यांचे दलाल जळवांसारखे गरिबांना चिकटतात आणि त्यांचे रक्त शोषून घेतात. हा धंदाच अशा प्रकरचा आहे कि, त्यात माणसांना भांडणे करण्याला उतेजन मिळावे. वकील हे रिकामटेकडे असतात. आळशी माणसे ऐषआराम भोगण्यासाठी वकील बनतात. ही वस्तुस्थिती आहे. वकील हा मोठा प्रतिष्ठेचा धंदा आहे. असा शोध लावणारे वकिलच असतात. कायदे तेच बनवितात त्यांची स्तुती सुद्धा तेच करतात. लोकांकडून किती पैसे घ्यायचे ते सुद्धा तेच ठरवितात आणि त्यांच्यावर छाप पाडण्याकरिता असे ढोंग करतात की, जणू काही अवकाशातून अवतरलेले देव पुरुषच असावे. इंग्रजांची न्यायालये नसती तर इंग्रज राज्य चालवू शकले नसते. खरी वस्तूस्थिती सांगायची अशी आहे की, इंग्रजांनी कोर्टाच्या मार्फतच आपल्यावर अंकुश ठेवला आहे. हिंदुस्थानी न्यायाधीश आणि हिंदुस्थानी वकील यांच्याशिवाय इंग्रजांचे काम चालले नसते.

गांधीजींच्या मते, वकील आणि न्यायाधीश हे चुलत भाऊ असतात. वकिलांचा धंदाच असा असतो की, त्यांना अनीती शिकवितो. वकील सहसा भांडणे मिटविण्याऐवजी ते कसे वाढतील,याचा सल्ला देतात. वकिलांचा स्वार्थ, भांडणे वाढविण्यात आहे. गांधीजींच्या मते, न्यायाधीश जो निर्णय देतात, तो समाधानकारक आहे हे म्हणणे अवघड आहे.कारण,त्रयस्थाचा निर्णय योग्यच असतो असे नाही. खरी गोष्ट हे तर दोन्ही पक्षकारच जाणतात. आपल्या भोळेपणामुळे आणि अज्ञानामुळे आपण असे मानतो की,आपले पैसे घेऊन हा त्रयस्थ व्यक्ती आपला न्याय करतो.

गांधीनी त्यांच्या ***हिंद – स्वराज्य*** या पुस्तकात असे म्हटले आहे की, कोर्टात प्रकरण गेले की, ते वर्षानुवर्षे प्रलंबित राहते. दोन्ही बाजूंचे वकील भांडण सजवितात, वाढवितात, खोटे–नाटे साक्षी-पुरावे उभे करतात. वकीलामुळे कित्येक जातीय दंगे झाले आहेत. त्यामुळे कित्येक कुटुंबे उद्धवस्त झाली. त्यांच्यामुळे भावाभावांत कडवटपणा आला. कित्येक राजेरजवाडे वकिलांच्या जाळ्यात अडकून कर्जदार होऊन बसले आहेत. अनेक जहागीरदार, वकिलांच्या कारस्थानांनी लुटले गेले आहेत. तथाकथित न्याय मिळविण्यासाठी सारा समाज कोर्ट कचेऱ्यांचा गुलाम बनतो. लोक स्वतःच्या अधिकारात न्याय करू शकतात ही गोष्ट समाज विसरतो. ही लाचारी, गुलामी सुप्रतिष्ठित करण्यात वकील सर्वात मोठा हातभार लावीत असतात. हिंदुस्थानला वकिलांनी कंगाल व गुलाम बनविले आहे. जर आपण वेळेवरच जागे झालो नाही तर चहूबाजूंनी घेरले जाऊन नाश पावू .

आजच्या न्यायालयत वकिलांचे कार्य न्यायाधीशांना भ्रमात टाकणे ,प्रकरणांना मोड-तोड करून मांडणे आणि लोकांना (पक्षकारांना) खोटे बोलायला शिकविणे हे आहे. गांधीच्या मते गुन्हेगाराला सोडविणे हे वकिलाचे काम नसून सत्यशोधनाच्या कामात वकिलांनी न्यायाधीशांना साहाय्य केले पाहिजे अशी त्यांची भावना होती. त्यांच्या मते वकिलांचे कर्तव्य पक्षकारांमध्ये पडलेली फुट भरून काढण्याचे आहे. उभय पक्षात वकिलाने समजुती व तडजोड करून तंटा मिटवावा. कोर्टाबाहेर दोघांचा समेट करावा असे त्यांना वाटे. तडजोड न केल्यास कोर्टाच्या पैशाची वेळेची, सामर्थ्याची हानी होते. तणाव वाढत जातो, असा त्यांचा अनुभव होता.वकिली व्यवसाय हा खोटेपणाचा व्यवसाय नाही हे सिद्ध करण्याचा त्यांचा निर्धार होता. वकिलीच्या धंद्यासाठी सत्याला जागून काम होऊ शकते ही त्यांची दृढ समजूत होती. धंदा म्हणून वकिली करणे हेच मुळातच अयोग्य आहे. असे त्यांना वाटे.सार्वजनिक कार्यापेक्षा गांधींनी वकिलीला नेहमीच दुय्यम स्थान दिले. गांधी म्हणत, वकिली हा काही ज्याच्याकडे आशेने बघावा असा व्यवसाय नाही. समाजावर वकील आणि न्यायलय यांचा पगडा नसता तर आपलं जगणं जास्त सुखाचं झालं असतं.

गांधींनी वकिलाच्या प्रचंड फिसबद्दल त्यांचा निषेध केला. वकिलांनी गरीबांकडून मनाला वाटेल तेवढा पैसा घेऊ नये म्हणून वकिलांची फीस निश्चित असावी असे त्यांना वाटत होते. समाजातील विषमता नाहीशी करण्यासाठी ते म्हणाले होते की, वकिलांची फीस मजुराच्या मजुरीपेक्षा जास्त नसावी. भंगी, डॉक्टर, शिक्षक वकील व व्यापारी इत्यादींना त्यांच्या दिवसभराच्या प्रामाणिक कामाचा एकसमान मोबदला मिळावा असे प्रतिपादन करून मानवी जीवनात समानतेची सर्वोच्च कल्पना गांधींनी मांडली. मजुरापेक्षा वकिलांची फीस जास्त का असावी? मजुरांपेक्षा वकिलांनी देशाचे काय अधिक भले करण्याला अधिक पैसा

घेण्याचा हक्क वकिलांना आहे काय? जर पैशांसाठी वकीलांनी भले केले असेल तर ते भले कसे म्हणता येईल? असा युक्तिवाद गांधी करतात.

गांधींना न्याय जलद मिळावा ,निर्दोष असावा, वाजवी असावा, महाग नसावा असे वाटे. यासाठी न्यायपद्धतीत मुलभूत बदल व्हायला पाहिजेत असे त्यांचे मत होते. राजसत्तेप्रमाणे न्यायाचेही विकेंद्रीकरण व्हावयास हवे तसेच न्यायासंबंधीची कार्ये पंचायतीच्या हातात सोपवावीत असे त्यांना वाटे. गांधींजी प्रचलित न्यायव्यवस्थेवर अशी टीका का करतात की, ती महाग,वेळखाऊ आहे आणि ती भारतीय जनतेच्या हिताची नाही तर ब्रिटीशांच्या व्यापारिक हिताची आहे असे ते मानत असत. त्यांच्या मतानुसार न्यायालयामध्ये कोणाचेही भले होणे शक्य नाही, कारण न्यायालयाचा उद्देश सरकारच्या सत्तेचे रक्षण करणे हे आहे. वस्तुत: गरिबांवर अन्याय करण्यासाठी हे सर्वात स्वस्त साधन आहे. ज्याला श्रीमंत लोक खरेदी करतात. सत्ताधारी व संपत्तिवान लोकांची कामे इतर मार्गांनी होत असल्यामुळे त्यांना न्यायालयात जाण्याची गरज पडत नाही.

न्यायपद्धतीच्या विलंबावर प्रतिक्रिया व्यक्त करताना महात्मा गांधी म्हणतात की, ‘ ब्रिटीश न्यायव्यवस्थेचे अनुकरण करणे हे भारतीयांसाठी धोक्याचे आहे कारण या पद्धतीचा अवलंब केल्याने भारतातील न्यायप्रशासन गुंतागुंतीचे व तांत्रिक स्वरूपाचे आणि विलंब लावणारे होणार आहे. त्यामुळे त्यानी असा सल्ला दिला की, न्यायासाठी लागणारा विलंब, प्रचंड खर्च व गुंतागुंतीवर मात करून भारतीयांना सुलभ व प्रभावी न्यायव्यवस्थेद्वारे न्याय मिळाला पहिजे. यावरून हे लक्षात येते की, ब्रिटीश न्यायव्यवस्थेचे अनुकरण केल्याने न्यायदान प्रक्रिया जटील बनली आहे. परिणामत: आजची न्यायव्यवस्था त्वरित व शीघ्र न्याय देऊ शकत नाही. महात्मा गांधी स्थानिक न्यायपंचायतींच्या संदर्भात म्हणाले होते की, ‘ग्रामीण भागात न्यायदानाठी निर्माण केलेल्या न्यायापंचायतीमुळे गरीब पक्षकारांना कमावलेला पैसा न्यायासाठी खर्च करावा लागणार नाही. तसेच खटल्यासाठी शहरामध्ये महिनोनमहिने व्यतीत करण्याची आवशक्यता नाही. अशा प्रकारची न्यायव्यवस्था ही साधी व स्वस्त तर असेलच तसेच त्यामुळे फक्त दिवाणी व फौजदारी प्रकरणाची संख्या जास्त किंवा कमी होऊ शकते. गावातील उघड गुपिते सर्वांनाच माहिती असल्यामुळे न्यायदानातील भ्रष्ट आचरण व लबाडी यांना वाव मिळण्याची शक्यता खूपच कमी असते.

गांधी म्हणाले होते, ‘ब्रिटीश न्यायालयात न्याय मिळविणे ही चैनीची बाब आहे. जो जास्त काळ न्यायासाठी पाठपुरावा करतो तो न्याय मिळवितोच हे एक सर्वकालिक सत्य आहे. तसेच असा एक मत प्रवाह आहे की, न्याय म्हणजे एक क्षुल्लक गोष्ट आहे. आणि त्याच्यावर खर्च होतोच. या विधीव्यवस्थेमध्ये काहीतरी दोष असला पाहिजे, ज्या योगे वकील प्रति महिन्याला हमखास पन्नास हजार रुपये ते एक लाख रुपये उत्पन्न मिळवू शकतात. ख-या अर्थाने विधीव्यवसाय हा सट्टेबाजाराप्रमाणे चालणारा व्यवसाय नसला पाहिजे. गांधींनी हे विधान करून कित्येक वर्ष होऊन गेली. तरीही आज हीच परिस्थिती पाहावयास मिळते. महात्मा गांधींना, वकिलांची एक महिन्याची जी कमाई अपेक्षित होती, ती आज एका दिवसाची कमाई असल्याचे दिसून येते.

आजमितीला आपणास असे जाणवते की, गरीब व ज्यांना अन्यायाने ग्रासले आहे असे लोक न्यायव्यवस्थेपासून दूर लोटले गेले आहेत. न्यायप्रक्रीयेत होणारा भरमसाठ खर्च, होणारा अक्षम्य विलंब यामुळे गरीब लोक न्यायप्रक्रियेतून दूर फेकले गेले आहेत. एवढेच नाही तर त्यासाठी कायदा व न्यायप्रक्रीयेचे स्वरूप हे सुद्धा कारणीभूत आहेत. अशा या विविध कारणामुळे त्यांची न्यायदानावरील श्रद्धा व विश्वास तर उडून गेलाच आहे. शिवाय न्यायदानाकडे संशयाने पाहण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली आहे. यामुळे गरीब न्यायवंचित लोकांत न्यायव्यवस्थेवर खुप कमी प्रमाणात निष्ठा राहलेली असून यासाठी न्यायव्यवस्था, त्यांच्या मनात न्यायाबद्दल प्रेरणा व आत्मविश्वास निर्माण करण्यामध्ये पूर्णपणे अपयशी ठरली आहे. गांधीच्या या विधानावरून असे स्पष्ट होते की चांगली न्यायव्यवस्था हाच आदर्श राज्याचा आत्मा असतो.

गांधीची इच्छा होती की, आज संपूर्ण न्यायव्यवस्था जी इंग्रजीत चालते यात परिवर्तन होणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयापर्यंत न्यायालयीन कारभार प्रादेशिक भाषेत चालावयास हवा या प्रक्रियेस इंग्रजीला जे मानाचे स्थान दिले गेले आहे ते, भूषणावह नाही व ते खऱ्या लोकशाही वृत्तीच्या विकासाला पोषक नाही. विधानसभा आणि संसद यातील कायदे लोकभाषा व राष्ट्रभाषेत असावे. विधीशिक्षणाची भाषा तीच असावी. तरच राज्य व्यक्तीचे नसून कायद्याचे आहे या संकल्पनेला अर्थ प्राप्त होईल.

मनमोहन घोष यांनी श्रीलंकेतील भारतीय मजुरांची प्रकरणे फीस न घेता आणि आपल्या प्रकृती अस्वस्थ्याकडे दुर्लक्ष करून चालविली. याची आठवण गांधींनी वकिलांना श्रीलंकेतील एका भाषणात करून दिली आणि मनमोहन घोष यांचा आदर्श समोर ठेवण्याचा सल्लाही दिला आपल्या आत्मचरित्रात गांधी म्हणतात, कायदा म्हणजे काळयाला पांढरे करणारी आणि पांढऱ्याला काळे करणारी बौद्धीक जादू नव्हे. कायदा म्हणजे न्यायाला सिंहासनावर विराजमान करण्याचा एक सततोध्योग मानला पाहिजे. कायद्यातील सर्वोत्तमतेचे आदर्श रुप गांधींच्या शब्दात व्यक्त झाले आहे.

गांधींना जेव्हा प्रश्न केला गेला की, न्यायमुर्तीपेक्षा वकिलांना भरमसाठ पैसा मिळतो मग चांगले चारीत्र्यवान, प्रामाणिक वा विद्वान न्यायमूर्ती मिळू शकणार नाहीत. तेंव्हा गांधीजीनी उत्तर दिले की चारित्र्यवान, विद्वान व प्रामाणिक माणसांना पैश्याच्या जोरावर न्याय विकत घ्यावे लागेल व ते समाजाचा देशाचा विचार करणारच नाहीत. इतके माझ्या देशाचे पतन झाले आहे असे मला वाटत नाही. यासंदर्भात गांधींनी सी.आर.दास,तैय्यबजी,मोतीलाल नेहरू आदींचे उदाहरण दिले आणि म्हंटले की,यांनी देशासाठी गलेलठ्ठ पैसा देणारी वकिली सोडली व फकिरी पत्करली. देशासाठी तुरुंगवाही भोगला. ही मंडळी न्यायमूर्ती होण्याच्या लायकीची नव्हती काय? सामान्य माणसाला परवडेल अशी स्वदेशी न्यायव्यवस्था असावी अशी गांधीची इच्छा होती. म्हणून त्यांनी लवाद कोर्टाची व प्रणालीची सूचना केली. पण दुर्दैवानी आज लवाद म्हणून कार्य करणारी मंडळी त्याकामासाठी रोजच इतकी फीस घेतात, जी विध्यमान न्यायमूर्तींच्या मासिक पगारापेक्षा ही अधिक असते. आजच्या लवाद प्रणाली बद्दल असे म्हंटले जाते की, ही तर निवृत्त न्यायमुर्तींसाठी स्थापन करण्यात आलेली रोजगारहमी योजनाच आहेत. या म्हणण्यात विनोदापेक्षा

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


वेदनेचा भाग अधिक आहे. कारण, ब्रिटीशानी निर्माण केलेली व आपण वारशात स्वीकारलेली संपूर्ण यंत्रणाच इतकी महाग आहे की, ती सामान्य माणसाच्या अवाक्याबाहेरची आहे. त्यास या प्रणालीत न्याय मिळणेच दुरापास्त झाले आहे असे गांधींना वाटत होते. पण या बाबतीत एकूणच परिस्थिती निराशाजनक आहे.

गांधीच्या मते, न्यायप्रणाली व न्यायमूर्ती हे त्यांना सोपविण्यात आलेल्या अधिकारांचे विश्वस्त आहेत, मालक नाहीत. कारण, त्यांच्या मते अधिकारांचा जन्म हा कर्तव्याच्या कुशीतूनच होत असतो. एवढेच नव्हे तर,न्यायदानाच्या कर्तव्याचे पालनं करता यावे म्हणूनच त्यांना अधिकार प्रदान करण्यात येतात. म्हणून अधिकारांपेक्षा कर्तव्यांनाच अधिक मोलाचे स्थान असते. कर्तव्यहीन अधिकारातून न्यायाची उत्पत्ती होत नसते.

गांधींनी स्वअनुभवाने वकिली व्यवसायाचे जे वास्तव चित्र रेखाटले आहे,ते आजदेखील आपणास तसेच असल्याचे आढळते. न्याय मिळवून देण्याच्या नावाखाली वकील पक्षकारांना प्रकरणात गुंतवून ठेवतात. गरिबांसाठी पंचायत फायदेशीर असल्याने व त्यात पारदर्शीकता असल्याने गांधींनी स्थानिक न्याय पंचायतीना अधिक महत्व दिलेले दिसते. कायद्याविषयी आदर बाळगणारे त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या विचारातून प्रकट होते. समाजाच्या सेवेसाठी न्यायसंस्था उपयुक्त व्हावी असे त्यांना वाटत होते. न्यायव्यवस्थेला समाजाभिमुख करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. विधी व्यवसाय हा सट्टेबाजाराप्रमाणे चालणारा व्यवसाय नसला पाहिजे. पण आज वस्तुस्थिती तसीच दिसून येत आहे. गांधींना न्याय पद्धतीचे मानवीकरण अगत्याचे वाटत होते. पण आपण अजूनही या क्षेत्रात इंग्रजांचेच दास्यत्व मनोभावे करीत आहोत. आजच्या न्यायप्रणालीत आमुलाग्र परिवर्तनाची गरज आहे. त्याखेरीज महात्मा गांधींना अभिप्रेत असलेली स्वदेशी न्यायप्रणाली प्रस्थापित होणार नाही.

प्रा.धवन यांच्या म्हणण्यानुसार, गांधीजी की अर्थव्यवस्था आवश्यकताओं की कल्याण की अर्थव्यवस्था है, न की संग्रह शिलता, जो की पुंजीवाद का लक्षण है ! म्हणजेच गरजेएवढे अर्थार्जन हे व्यवसायांचे तत्व असावे. अनावश्यक संपत्तीचा साठा करू नये. त्यांच्या मतानुसार, चांगल्या साधनांद्वारे आपणास साध्य सुद्धा चांगलेच मिळते. जसे साधन तसे साध्य हा विचार गांधीजींनी मांडला. त्याचप्रमाणे महात्मा गांधीजीनी या व्यतिरिक्त सर्वोदयाची संकल्पना मांडली. भगवदगीतेतील सर्वभूतहिताची कल्पना यात अन्यूस्यूत आहे. जैन दर्शनातील विचार ही या भगवदगीतेतील सर्वभूतहित या संकल्पनेवर आधारित आहेत. सर्वोदयात सर्वकल्याण, समाजातील शेवटच्या व्यक्तीचे हित, यात अधिकारापेक्षा कर्तव्याला अधिक महत्व दिले आहे. खेडी स्वयंपूर्ण असली पाहिजेत असे गांधीजी म्हणत. एकंदरीत गांधीजीनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, साधनसुचिता, विश्वस्त संकल्पना व रामराज्य या सर्व संकल्पनांचा प्रत्येक विधीज्ञाने अंगीकार केला तर या विश्वामध्ये कोणतीही व्यक्ती न्यायापासून वंचित राहणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक विधिज्ञाने असा विचार करावयास हवा की, सर्व कल्यानातच माझे कल्याण सामावलेले आहे. विधीज्ञांच्या अशा विचारांमुळे संपूर्ण न्यायव्यवस्था सुधारली जाईल तसेच आर्थिक हव्यास बाजूला ठेऊन अन्यायग्रस्थ लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी तो प्रयत्नांची पराकाष्ठा करू शकेल. महात्मा गांधीजीनी सांगितलेल्या नैतिक विचारणा अनुसरून जर आपण चांगल्या साधनांचा उपयोग आपल्या कार्यात केला तर त्याचे साध्य सुद्धा चांगलेच मिळू शकते. जसे कर्म तसे फळ या उक्ती प्रमाणे चांगल्या कर्मामुळे चांगलीच फळे चाखायला मिळतील. त्यामुळे विधीज्ञानी अनैतिक मार्गाचा वापर न करता योग्य सेवा दिली पाहिजे. अतिधनसंग्रह केव्हांही वाईटच. कारण, यामुळे व्यक्तीत अहमभाव निर्माण होतो तसेच यातून विविध इच्छा व वासना निर्माण होतात. परिणामी यात स्वतःचेच नुकसान होते त्यामुळे प्रत्येक विधिज्ञाने गांधीजींच्या नैतिक विचारांचा अंगीकार करून घेऊन आपला व्यवसाय करावा त्यातून सर्व कल्याण (Common Good ) साधता येणे शक्य होईल.

**संदर्भग्रंथ:**


१.गांधीजी मानव की महामानव:- गोखले द.न.

२.राष्ट्रीय जीवन चरित्र ग्रंथावली (भाग-१):- राष्ट्रपिता महात्मा गांधी-वर्मा कुसुमलता व वीरेंद्र यदुवंशी

३. महात्मा गांधी जीवन आणि शिक्षण :- श्रीपाद जोशी

४.बहुरूप गांधी:- अनु बंडोपाध्याय (अनुवादक – भागवत शोभा)

५. जनसामान्यांचे आशास्थान :- वाकोडकर अशोक

६. शोध गांधींचा :- चंद्रशेखर धर्माधिकारी.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# महात्मा गांधी आणि भारतीय स्वातंत्र चळवळ

डॉ.दताउध्दव जाधव

इतिहास विभाग प्रमुख, श्री रेणूकादेवी महाविद्यालय, माहूर जी. नांदेड.

---

महात्मा गांधी जगाच्या इतिहासातील साम्राज्यवादी शक्तिविरुध्द स्वातंत्र लढयात सत्याग्रहाचे नविन तंत्र वापरणारे व्यक्ति होते. मोहन करमचंद गांधीजीचे जन्म गुजरात राज्यातील पोरबंदर शहरात 2 आक्टोबंर 1869 ला झाला. वडील करमचंद गांधी आणि आई पूतळीबाई होते. आईमुळे मोहनदासावर जैन धर्मातील सकल्पना आणि प्रथाचा प्रभाव होता. तसेच प्राचीन साहीत्यातील आईवडीलाची सेवा करणारा श्रावणबाळ आणि सत्य बोलणारा व त्यानूसार वागणारा राजा हरीचंद्र या दोन कथाचा महात्मा गांधीजीवर प्रभाव पडलेला होता. त्यानी आपल्या आत्मचरीत्रात याचा उल्लेख केला आहे. करमचंद गांधीजी पोरबंदरचे दिवाण होते. महात्मा गांधीजीचे इ.स. 1883 मध्ये कस्तुरबा माखनजी याच्या बरोबर विवाह झाला होता. शालेय शिक्षण पुर्ण केल्यानंतर ऐकोणीसव्या वर्षी 1888 ला इंग्लंड मध्ये लंडनला कायदयाचे उच्च शिक्षण घेतले होते. बॅरीस्टरची पदवी प्राप्त केल्यानंतर गांधीजी 1891 ला भारतात आले. आणि राजकोटच्या न्यायलयात वकीली सुरु केले होते. इ.स. 1893 मध्ये त्यानी त्या काळच्या ब्रिटिश दक्षिण आफ्रिका येथील दादा अब्दुल्ला आणि कंपनी या नावाच्या एका भारतीय कंपनीतील एका पदासाठी करार केला. दक्षिण आफ्रिकेत 21 वर्ष राहीले होते. तेथील भारतीयाना असमान वागणून दिली जात होती. 7 जुन 1893 ला गांधीजी जवळ पहिल्या वर्गाचे तिकीट असतांना त्याना पीटरमारीत्झबर्गमध्ये रेल्वे अधिकाऱ्यानीतिसराडब्यातबसण्याससांगीतलेहोते.आणिगांधीजीनीत्यांनानकारदेताचत्याचाअपमानकरुनरेल्वेतुनढकलुन दिलेहोते. तसेचडर्बनमध्येन्यायधिशानी टोपी काढण्याचा आदेश दिला होता. या घटना त्याच्या आयूष्याला कलाटणी देणाऱ्याठरल्या. त्यांच्या जीवनावरप्रभावपडलाआणिअन्यायकारकव्यवस्थाबदलण्याचेत्यानीनिश्चयकेला. इ.स. 1915 मध्ये गांधीजी भारतात आले. आणि भारतातील इतर नेत्यापेक्षा वेगळया प्रकाराचे आंदोलन केले होते.

महात्मा गांधीच्या नेतृत्वाचे वेगळेपण जाणण्यासाठी 'गोविंद तळवळकर यांच्या 'नवरोजी ते नेहरु' यातील उतारा........

**" वीस साली चळवळ सुरु करण्यापुर्वि गांधीजी जवळजवळ पाच वर्षे हिन्दूस्थानात होते. गोखल्याच्या सल्ल्याप्रमाने त्यांनी साऱ्यादेशाच्यादौरा केला होता. त्यांची ठिकठिकाणीची भाषणे ही तत्कालीन नेत्यापेक्षा वेगळी असत. तातल्या त्यात** 1916 **च्या फेब्रवारीत त्यांनी बनारस हिन्दू विद्यापीठाच्या उदघाटन प्रसंगी केलेल्या भाषणाने देशभर खळबळ माजली. या सभारंभाला अनेक राजे, महाराजे व मोठमोठे पुढारी आले होते. आणि पं. मालवीय यांनी एक ज्ञानसत्रच आयोजित केले होते. महात्मा गांधीनी या ज्ञानसत्रात केलेले भाषण ओजस्वी व परखड होते. ते म्हणाले "पुढारी काय करतील इकडे माझे लक्ष नसून विद्यार्थी व सामान्य जनता काय करणार इकडे आहे. काल ज्या महाराजांनी अध्यक्षपद भुषविले ते देशाच्या दारीद्रया बदल बोलले. परंतु व्हाईसरॉयनी ज्या मंडपात उदघाटन सभारंभ साजरा केला तेथे कोणते दृश्य दिसले, पॅरीसहून आलेल्या एखादया जवाहियाच्यानेत्रानासुखदेणारेतेदृश्यहोते.**

**तेथे जमलेली बहुमोल रत्नांनी नटलेली सरदार मंडळी व देशातील लक्षवधी जनता यांची मी तुलना केली. तेव्हा मला असे वाटु लागले, की, जोपर्यंत या जवाहिरांचा त्याग करुन राष्ट्राचा निधी म्हणुन हे धन तुम्ही धारण करणार नाही. तोपर्यंत हिन्दुस्थानला मुक्तता मिळणार नाही. आमच्या देशातील शेकडा**75 **टक्के लोक शेतकरी आहेत. धान्याच्या एका ताटाऐवजी दोन ताटे पिकविण्याचे त्यांच्यात सामर्थ्य आहे. पण त्यांच्या श्रमाने निर्माण झालेले फळ जर आम्ही लुबाडुन घेतले किंवा दुसऱ्याला लुबाडू दिले तर आमच्यात स्वराज्याची वृती फारशी जागृत आहे असे म्हणता येणार नाही. आम्हास देणगी म्हणुन कधीही स्वराज्य मिळणार नाही. ब्रिटिश**

**साम्राज्याचा इतिहास पहा, ते स्वातंत्र्याचे भेक्के असले तरी जे लोक स्वः स्वातंत्र्य, संपादन करणार नाहीत त्यांना ते स्वातंत्र्य देणार नाहीत "**

यावरुन असे निर्दनास येथे की, महात्मा गांधीनी भारतीय सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या आंदोलनाला पांठीबा दिला. खेडयातील सामान्य लोकात जाउन आपले विचार समजावून सांगितले. शेतकऱ्याना, मजुर कामगार आणि विद्यार्थीना आपल्या सोबत घेउन आंदोलन केले. कारण त्यांच्या लक्षात आले होते.की, शहरातील श्रीमंत लोक आपल्या आंदोलनात सहभागी होणार नाहीत.ते आपल्या कामात मग्न राहतात त्यांच्याकडे वेळ नसतो. शहरातील लोक विकसित व सुक्षशित असतात.म्हणून त्यांना कोणतेही नविन विचार पठवून देणे अवघड जाते. आणि ते स्विकारतील याची शाश्वती नसते. असे अनेक अडचणी महात्मा गांधीजीच्या समोर होत्या. यातून त्यांनी सोफा मार्ग अवलंबला तो म्हणजे अंहिसा आणि सत्याग्रहाचा.आणि हे दोनीही तत्वे खेडयातील सामान्य लोकाच्या व विद्यार्थ्यांच्या डोक्यात बसु शकते. कारण ते कुठल्याही नविन विचाराने प्रभावित झालेले नव्हते. तसेच महात्मा गांधीनी सामान्य माणसाचे पोषाख स्विकारले होते. कारण त्याना माहीत होते की, सामान्य माणसाना आपले विचार पठवुन देण्यासाठी त्याच्या सारखे वागले पाहिजे. त्यांच्यात मिसळले पाहिजे. त्यांच्यासारखे दिसले पाहिजे. तरच ते आपल्याला व आपल्या विचाराला स्विकारतील. आणि ते ऐक वेळेस स्विकारले तर आपल्या प्रत्येक आंदोलाना पाठींबा देतील. सामान्य जनता व विद्यार्थी हे दोन असे घटक आहेत की, ते निस्वार्थ कोणत्या कामास तत्पर राहतात. म्हणुन त्यांच्या सहकार्‍या शिवाय कोणतेच आंदोलन करने शक्य नाही हे महात्मा गांधीजी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी इतरापेक्षा वेगळे विचार मांडले. ते सामान्य जनते पर्यंत पोहविण्याचे कार्य केले होते. त्यात ते यश मिळविले होते. दक्षिण आफ्रिकेत साम्राज्यवादी व वर्ण विरोधी शक्तिविरुध्द लढताना महात्मा गांधीनी शांततेच्या व अहिसेच्या मार्गाने भारतीयाना न्याय मिळवुन दिला होता. त्यामुळेच महात्मा गांधीजीकडे सर्व जगाचे लक्ष वेधले गेले. त्यानंतर महात्मा गांधीजी भारतात परत आले. आणि चंपारण्य, खेडा, अहमदाबाद येथे त्यांनी सत्याग्रह तंत्राचा वापर करुन यश संपादन केले होते. बॅरीस्टर असूनही सर्वसामान्यसारखा राहणारा व राष्ट्रीय आंदोलनाला नवी दिशा देउ शकणारा नेता म्हणून सर्व राष्ट्राचे लक्ष केंद्रीत झाले होते. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय चळवळ ही हळुहळु जनतेची चळचळ म्हणून विकास पाहू लागली. देशाच्या स्वातंत्रप्राप्ती साठी महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली भारतीय तीन मोठी आंदोलने झाली. अहसहकार आंदोलन हे भारतातील इंग्रज राज्यकर्त्यांची दडपशाही व महायुध्दोत्तर काळात भारतीय मुस्लिमानी सुरु केलेली खिलाफ़त चळवळ यातुनच असहकार आंदोलनाची पार्श्वभुमी तयार झाली. जालीयनवाला बागेतील हत्याकांड, पंजाबात लष्करी कायदयाच्या अमलात घडलेले अमाणुष अत्याचार,हंटर कमिशनचा असमाधानकारक अहवाल आणि इ.स. 1919 च्या राजकीय सुधारणांचे निराशाजनक स्वरूप,या सर्व कारणामुळे महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली 1920 ला संप्टेबंर महीण्यात असहकार आंदोलन सुरू झाले. असहकार आंदोलनांचा कार्यक्रम देशापुढे मांडताना गांधीजी म्हणाले, 'अहिंसक असहकाराचा मार्ग योगय रितीने चोखाळला तर भारताला एका वर्षात स्वराज्य मिळेल. 31 डिसेंबर 1929 ला लाहोर येथे रावी नदीच्या तीरावर भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात संपुर्ण स्वातंत्र्याचा ठराव गांभीर्याने व एकमुखाने संमत करण्यात आला. राष्ट्रीय सभेचा हा ठराव भारताच्या सपुर्ण स्वातंत्र्य या ध्येयाचा घोष करणारा आणि स्वातंत्र्य चळवळीची नजीकच्या भविष्य काळातील दिशा स्पष्ट करणारा होता. इ.स. 1930 ला महात्मा गांधीजीच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची देशव्यापी आंदोलन सुरू झाले. स्वातंत्र प्राप्तिसाठी गांधीजीच्या नेतृत्वाखाली झालेले ते दुसरे मोठे आंदोलन होते. भारतीय स्वातंत्र चळवळीच्या इतिहासात सविनय कायदेभंगाच्या आंदोलनास महत्वाचे स्थान होते. आंदोलनास प्रत्यक्ष प्रारंभ होण्यापुर्वी काही काळ या आंदोलनाची पार्श्वभुमी तयार होत होती. ब्रिटिशांचे कायदे हेच भारतातील ब्रिटिश राजवटीचे आधिष्ठान होते. त्यांचे बरेच कायदे जुलमी, अन्यायकारक होते. ते जुलमी कायदे मोडुन देशातील ब्रिटिश राजवटीचे अधिष्ठान नष्ट करावे,ही कायदेभंगाच्या चळवळीमागची भुमिका होती. मिठाला सर्व लोकाच्या जीवनात महत्व असते. त्यामुळे मिठावर कर बसविणा-या कायदयाचा भंग करणा-या आंदोलनात सर्व सामान्य लोकसुध्दा सहभागी होतील अशी गांधीजीची आपेक्षा होती. आणि ती खरीही ठरली. वायव्य सरहद प्रांतातील पठाण लोकांनी खान अब्दुल गफारखान यांच्या नेतृत्वाखाली सविनय

कायदेभंगाच्या आंदोलनात भाग घेतला.पठाणांच्या संघटनेचे नाव खुदा-इ-खिदमतगार असे होते. लाल डगला हा या संघटनेच्या सदस्यांचा गणवेश होता. म्हणुन इंग्रज त्यांना 'लाल डगलेवाले' असे म्हणत होते. खानला 'सरहद गांधी' म्हणत होते. कायदेभंगाच्या चळवळीच्या निमित्ताने स्त्रिया कामगार शेतकरी आणि समाजातील सामान्य घटक देशाच्या स्वातंत्र चळीवळीत प्रथमच मोठया प्रमाणात सहभागी झाले होते. यामुळे स्वातंत्र चळवळीस व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. दीर्घ काळ चाललेल्या या आंदोलनाचे परीणाम महत्वाचे ठरले. कायदेभंगाच्या आंदोलनामुळे महात्मा गांधीच्या नेतृत्वाच्या अलौकिकत्वाचे आणि निशस्त्र प्रतिकाराच्या सामर्थ्याचे जगाला ओळख झाली. भारताच्या व्हाईसरॉयने 8 ऑगस्ट 1940 ला ब्रिटिश सरकारच्या वतीने एक घोषणा केली. ऑगस्ट घोषणा या नावाने ती प्रसिध्द झाली होती. राष्ट्रीय सभेची त्वरित स्वातंत्र देण्याची मागणी मान्य न झाल्याने राष्ट्रीय सभेची ऑगस्ट घोषणा फेटाळून लावण्यात आली होती. 15 ऑगस्ट 1940 ला मुंबई येथे राष्ट्रीय सभेच्या महासमितीचे आधिवेशन घेण्यात आले होते. आणि त्यात वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या आंदोलनाचे सर्वाधिकार महात्मा गांधीकडे देण्यात आले होते. गांधीजीनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या मोहिमेचे प्रारंभ करण्यासाठी आदर्श सत्याग्रही म्हणून आचार्या विनोबा भावे यांची निवड केली होती. आचार्या भावे हे अभ्यासक व साधुतुल्य वृतीचे होते. वर्धा जिल्यातील सेवाग्राम येथे त्यानी विधायक कार्यक्रमाला सतत सहभागी होत होते. 17 ऑक्टोबर 1940 ला पवनार येथे युध्द विरोधी भाषण करून सत्याग्रह केला होता. त्यांना तीन महिनयाची शिक्षा झाली होती. पंडीत जवाहरलाल नेहरू हे दुसरे सत्याग्रही होते. 1941 च्या अखेर पर्यंत वैयक्तिक सत्याग्रहाची मोहिम चालू होती. या कालावधीत पंचविस हजार सत्याग्रही तुंरूगात गेले होते. नंतर ही चळवळ बंद करण्यात आली होती. ब्रिटिश सरकारने बंदिवान सत्याग्रहीना सोडून देण्यात आले होते. वैयक्तिक सत्याग्रहाने महात्मा गांधीनी भारतात यूध्द विरोधी तसेच ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधी भुमिका लोकाच्या मनात तयार केली होती. 'भारत छोडो'आदोलन 1942 ला सुरू झाले. दुसरे महायुध्द सुरू झाले होते. या युध्दाची भीषणता, जपानी आक्रमणची वाढती भिती आणि भारतातील राजकीय पेचप्रसंग सोडवण्यात क्रिप्स शिष्टाईस आलेले अपयश, या कारणावरून 1942 च्या आंदोलनाची पार्श्वभुमी तयार झाली होती.7 व 8 ऑगस्ट 1942 ला मुंबई येथे गवालीया टॉक मैदानावर राष्ट्रीय सभेच्या महासमितीचे अधिवेशन भरले होते. मौलाना अबुल कलाम अझाद हे या अधिवेशनाचे अध्यक्षहोते. 8 ऑगस्ट 1942 ला पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी त्या आधिवेशनात प्रसिध्द 'भारत छोडो' ठराव मांडला होता. आणि प्रचंड बहुमताने तो समंत झाला होता. त्या ठरावात असे म्हटले होते की, भारतातील ब्रिटिश राजवटीची तात्काळ समाप्ती ही केवळ भारताच्या हितासाठीच नव्हे तर लोकशाही रक्षणाच्या ज्या तत्वासाठी अमेरीका लढत आहे. त्यासाठीही आवश्यक आहे. या ठरावावर बोलताना महात्मा गांधी म्हणाले, **'आम्हाला ताबडतोब स्वातंत्र पाहीजे. संपुर्ण स्वातंत्र शिवाय अन्य कशानेही माझे समाधान होणार नाही. आपण एकतर स्वातंत्र मिळवु अन्यथा ते मिळवण्याच्या प्रयत्नात मरण पत्करू परंतू आपली गुलामगिरी कायमची राहिलेली पाहायला जगणार नाही'**त्यानी कार्यकर्त्याना **'करेगे या मरेगे'**हे मंत्र दिले. भारत छोडो चळवळ भारताच्या स्वातंत्र संग्रामातील सर्वात प्रभावी चळवळ ठरली. यात लाखोच्या संख्यने लोकाना अटक झाली होती. हजारो आंदोलक पोलीसांच्या गोळीबारात मरण पावले होते. गांधीजी आणि त्याच्या सहका-यानी हे स्पष्ट केले की, भारताला तात्काल स्वातंत्र दिल्याशिवाय भारत महायुध्दात मदत करणार नाही युध्दाच्या शेवटी इंग्रजानी भारतीयांच्या हाती सत्ता देण्याचे स्पष्ट संकेत दिले होते. तेव्हा गांधीजीनी आंदोलन संपविले. इ.स. 1946 मधील ब्रिटिश कॅबिनेट मिशनच्या शिफारशी नामंजुर करण्याची सुचना गांधीजीनी कॉग्रेंसला दिली होती. पण ही सुचना कॉग्रेंस पक्षानी अमान्य केले होते. कारण पंडीत नेहरू आणि पटेलांना माहीत होते की, जर ब्रिटिशाच्या शिफारशी मान्य नाही केल्या तर राज्य कारभाराचे नियंत्रण मुस्लिम लीग कडे जाईल. भारताची फाळनी करेल अशी कोणतीच योजना गांधीना मान्य नव्हती. सरदार पटेलानी गांधीजीना पटवून दिले की, फाळनी अतर्गत युध्द टाळण्यासाठी एकमेव पर्याय होता. 30 जानेवारी 1948 ला दिल्लीच्या बिर्ला भवनच्या बागेतुन लोकांबरोबर फिरत असताना गांधीजीना गोळी मारून हत्या करण्यात आली होती.

गांधीजीच्या मृत्यूनंतर पंडीत जवाहरलाल नेहरूंनी रेडियोवरून देशाला संबोधित केले होते,

**'माझ्या मित्र आणि सहका-यांनो, आपल्या आयुष्यातुन प्रकाश निघुन गेला आहे. आणि सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे आणि मला कळत नाही आहे तुम्हाला काय आणि कसे सांगावे. आपले आवडते नेते-राष्ट्रपिता, ज्यांना आपण प्रेमाने 'बापू' म्हणत असू आता आपल्यामध्ये नाही आहेत. कदाचित तसे म्हणणे चुकच ठरेल, पण आपण त्यांना आता बघू शकणार नाहीत, जसे आपण त्यांना इतके वर्ष बघत आलो आहोत. संकटांमध्ये त्यांचा सल्ला घ्यायला आपण आता धावत जाउ शकणार नाही,त्यांच्या सानिध्यातील शांती आणि समाधान आपल्याला मिळणार नाही, हा एक प्रचंड धक्का आहे, केवळ माझ्यासाठीच नव्हे, तर या देशातील कोटयवधी लोकांसाठीसुध्दा.'**
भारतीय जनता आणि जगातील मोठमोठे नेते विचारवंत दुःख सागरात बुडाले होते.महात्मागांधीजी देहाने गेले होते. मात्रगांधीजीचे विचार आजुनही जिवंत आहेत. आज गांधीवाद म्हणुनऔळखला जातो. गांधीवाद हा धार्मिक मानवतावाद आहे. नितीशास्त्र समाजरचना व राजनिती यांस आधारभुत अशी नैतिक आधारावर मानतावादात स्विकारलेली दिसते. अहिंसेचा व सत्य हा सिध्दांत गांधीनी राजकीय व सामजिक क्षेत्रात मोठया निष्टाने आणला. त्यालाच सत्याग्रह असे म्हणतात. सत्याग्रह म्हणजे सत्याकरीता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे. सत्य व अहिंसा या दोन नैतिक तत्वांवर आधारलेला रस्किनच्या पुस्तकावरुन सुचलेला गांधीचा सर्वोदयवाद हे सामाजिक व राजकीयआणि तत्वज्ञान होते. आर्थिक समता मानवी ऐक्याच्या तत्वावर विकसित करणे, ही ऐतिहासिक प्रगतीची गरज होती. सत्याग्रह हे त्याचे साधन होते. शांततापुर्ण मार्गाने सामाजिक विकास घडवुन आणणे यावरच महात्मागांधीजीचा भर होता.

सारांश

भारतीय राष्ट्रीय चळवळीतील 1920 ते 1947 हा कालखंड गांधीयुग म्हणुन ऑळखला जातो. पहिल्या महायुध्दानंतर स्वातंत्र्य चळवळीचे नवे पर्व सुरू झाले. देशाच्या राजकारणात महात्मा गांधीच्या नेतृत्वाचा उदय झाला. त्यांचे नेतृत्व अत्यंत प्रभावी होते. त्यांनी निशस्त्र प्रतिकाराच्या अभिनव मार्गाचा अवलंब केल्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या राजकीय लढयात देशातील सामान्य जनता मोठया प्रमाणात सहभागी होउ लागली.महात्मा गांधीनी सामान्य जनतेला निर्भय बनवले होते. राजकीय चळवळीना विधायक कार्यक्रमाची जोड दिली होती. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीमहात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलन 1920 ते 1922, सविनय कायदेभंग आंदोलन 1930 ते 1934 व 1942 चे भारत छोडो आंदोलन ही तीन प्रमुख जनआंदोलने झाली होती.महात्मा गांधीच्या लढयाचे सुत्रे म्हणजे शांततेच्या मार्गाने चळवळ करायची, प्रतीकार करायचा, अन्याय चालु दयायचे नाही. त्यासाठी तुरूंगवास भोगावा लागला तरी ते आनंदाने सोसायचे असे होते. त्यांनी खेडयांना ख-या भारताचे मुळ म्हणुन पाहिले आणि स्वयंपुर्णतेचा पुरस्कार केला होता. महात्मा गांधीनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्वाचा पुरस्कार केला होता. स्वातःही याच तत्वानुसार जगले आणि इतरांनाही तसे करावे असे सुचवले होते.

संदर्भ ग्रंथ

1. तळवळकर गोविंद – नवरोजी ते नेहरू – मुंबई मॉजेस्टिक प्रकाशन,1989.
2. महात्मा गांधी - माझे सत्याचे प्रयोग- साकेत प्रकाशन.
3. प्रधान ग. प्र. – स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत – साधना प्रकाशन, पुणे,1989.
4. महात्मा गांधी– विकिपीडिया. इंटरनेटवरून.
5. शोधगंगा --इंटरनेटवरून.

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# ''म.गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू'


**प्रा.डॉ. एस.व्ही.शेट्टे**

(राज्यशास्त्र विभाग प्रमूख)ए वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड


---

**प्रस्तावना :**

भारतीय समाज आणि तिच्या सांस्कृतीक परंपराचे, सदगुणांचे, वैश्विक स्तरावरील तिच्या मौठेपणाचे, विश्वबंधुत्व, भातृभाव, शुध्द मानवता, वसुवैध कुंटूबकम, सत्य–अहिंसा या बाबतीत आपल्या महान संस्कृतीचे जगाला आकर्षन आहे. संहिष्णुता, परमोधर्म, शालीनता, नम्रता तपश्चर्या ही अंगभूत गुणेही भारतीय संस्कृतीमध्ये आहेत. विविध जाती, धर्म, भाषा, सांस्कृतिक–वैचारिक वेगळेपणा असूनही प्रत्येक जण पहिल्यांदा स्वतःस भारतीय समजतो, ही एक आपली वेगळी ओळख आहे, एकंदरीतच एवढी विविधता असूनही या विविधतेत एक प्रचंड एकता कसी आहे, याचे अनेकांना कोडे आहे. अशा या सर्वसमावेशक भूमीमध्ये अनेक महान, तत्ववेत्यांचा विचारवंताचा, समाजधुरिणांचा, लढवया देशक्तांचा जन्म झाालेला आहे. यातील कांहीनी तर स्वतःच्या राष्ट्राबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःच्या, कार्यतत्परतेची, कृतीप्रवणतेची, विचारधारेची, विश्वबंधुत्वाची, जागतिक कल्याणाची एक देणगी दिलेली आहे, त्यापैकीच एक व्यक्तिमत्व म्हणजे म.गांधीचा उल्लेख करावा लागेल. खरे तर उपरनिर्दिष्ठ केल्याप्रमाणे म.गांधी हे केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक लोकविलक्षण व्यक्तिमत्व होत. म्हणून त्यांच्या विचारधारेला आणि व्यक्तिमत्वाला लाभलेली प्रतिष्ठा व सन्मान अतुलनीय असाच दिसून येतो. तर त्यामागे त्यांची तपश्चर्या, साधना, साधनशुचिता, साध्य आणि साधने, विश्वसनियता, साधी राहणी, उच्चविचारसरणी, स्वार्थ, लोभ, मोह यातून मुक्ती, इत्यादी गुणवैशिष्ट्यांमुळे म.गांधीचे व्यक्तिमत्व अधिकच उठावदार दिसून येते. त्याचे विचार, त्यांचे तत्वज्ञान 'गांधीवाद' या नावाने ओळखले जाते, भारतातील नव्हेतर जगातील अनेकांना गांधीवादी विचारधारेने आकर्षित केले आहे. तसेच त्यांच्या विचारांना अनेक पैलू आहेत, साधारणपणे गांधीजीच्या विचारातील एखादा पैलू जरी पाहिला तरी तो संशोधनाचा व्यापक विषय होऊ शकतो, परंतु प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधीच्या विविध पैलूवरती प्रकाश टाकताना तो ओझरता टाकावा लागेल, एकंदरीत गांधीजीच्या विचाराची व्याप्ती प्रचंड आहे. ती व्याप्ती लक्षात घेऊनच म.गांधी यांच्या मौलिक चिंतनावर प्रकाश टाकावा लागेल. दुसरे म्हणजे म.गांधीच्या विचारांच्या विविध पैलूचा आढावा घेताना असे आढळते की, त्यांनी एक आदर्श अशा स्वरूपाचे तत्वज्ञान देशापुढे ठेवले. अहिंसावादी सत्याचा आग्रह धरणारे असे त्यांचे समग्र तत्वज्ञान होते. राजकारणात साधनशुचिता, सत्यनिष्ठा आणि चारित्र्य यांची गरज आहे. असे ते ठामपणे मांडत.[1] त्यांच्या विचारांना अनेक पैलू असून सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, राजकीय आदी अंगाचेही त्यास विशेष संदर्भ आहेत. तत्पूर्वी म.गांधी यांच्या विचारांचे विविध पैलूचा शोधनिबंधाच्या दृष्टिकोणातून संशोधनात्मक उहापोह करतांना प्रस्तुतशोधरुपी निबंधासाठी पुढील संशोधन पाय–यांचा विचार करून संशोधन आराखडा तयार केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत शोधरूपी अथवा संशोधन निबंधामध्ये म.गांधी यांच्या विचाराचे जे विविध पैलू आहेत, त्या सर्व पैलूंचा धावता आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1) म.गांधीयांच्या विचारातील प्रमूख असणा–या 'सत्य अहिंसा' या विचाराचा आढावा घेणे.
2) म.गांधीजीच्या धर्मविषयक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
3) म.गांधी यांच्या राज्यविषयक विचारातील विविध संकल्पने संधोधनात्मक अध्ययन करणे.

**संशोधन समस्या :**

महात्मा गांधी यांच्या आदर्शवादी विचारांचे पैलू नेमके कोणते आहेत याचा शोध घेणे.

**गृहितके :**

1) म.गांधी यांच्या वैचारिक पैलूमध्ये 'सत्य–अहिंसा' सत्यागृह या बाबीना प्रथम प्राधान्य दिसून येते. विशेषतः गांधीनी सत्य–अहिंसा व शांतता या मार्गाने भारतीयांना आत्मबल प्राप्त करून दिले.
2) म.गांधीच्या वैचारिक जडणघडणीत रस्किन, टॉलस्टॉय, थोरो यांच्या विचारांच्या प्रभावासह भारतीय संस्कृती, धर्म, अध्यात्म, नैतिकीकरण, साधन शूचिता इत्यादीचाही प्रभाव दिसून येतो.
3) म.गांधी यांच्या विचारातील विविध पैलूपैकी 'मानवतावाद' अहिंसक लोकशाही, सर्वोदयी समाज, विश्वस्त संकल्पना, खेड्यांची स्वयंपूर्णता, ग्रामस्वराज्य इत्यादीचेही दर्शन घडते.
4) म.गांधी यांच्या विचाराचे जे कांही इतर महत्वाचे पैलू आहेत, यात ग्रामोद्योग, खादीचा वापर, चरखा, अस्पृश्य निवारण, प्राथमिक सक्तीचे शिक्षण, अराज्यवाद, अंत्योदय, अध्यात्मनिष्ठ मानवता, –हदयपरिवर्तन, ग्रामपुनर्रचना, हस्तोद्योग जातीनिर्मुलन, आर्थिक विषमतेचे उच्चाटन इत्यादी पैलूही त्यांच्याविचारांत दिसून येतात.

**संशोधनाचा हेतू :**

प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधी यांच्या विचारांचे जे कांही विविध पैलू आहेत, ज्यास मानवतावादासह शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक इत्यांदींच्या विचारांचे, भारतीयांच्या कल्याणाचे, राष्ट्रप्रेमाच्या शिकवणुकीचे जे संदर्भ आहेत, त्या सर्वांचा थोडक्यात अभ्यास करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :**

संशोधन हे लहानसे असो की, व्यापक अशा दोन्ही संशोधनात तथ्य संकलन करावे लागते. प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रकाशित अशा साधनांची निवड केली आहे.

**अभ्यासाची पध्दती :**

शोधनिबंध अथवा संशोधनाच्या शिर्षका प्रमाणे, विषयाप्रमाणे अभ्यासाची पध्दती निवडावी लागते, प्रस्तुत अभ्यासासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दतीचा आधार घेतला असून संशोधनाच्या गरजेप्रमाणे इतर अभ्यास पध्दतीचाही वापर केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात म.गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू लक्षात घेतले तर त्यांनी मांडलेले विचार हे अगदीच मौलिक स्वरूपाचे आहेत, किंबहूना भारताचे 'स्वातंत्र्य' या एकमेव उद्दिष्टाखेरीज येथील समाज जीवनातील असलेल्या विविध समस्या व सामाजिक क्षेत्रातील त्यांचे अध्ययन, चिंतन खूपच महत्वाचे आहे. त्यांच्या विविध विचारातील पैलूंना 'आत्मशुध्दीचे' आधार आहेत. गांधीजीचे तत्वज्ञान हे प्रचंड व्यापक आहे, ते जागतिक किर्तीचे एक महान पुढारी होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते अग्रस्थानी होते, एवढे सारे असूनही ते प्रथमतः स्वतःस सत्याचे नम्र उपासक मानीत असत, म्हणजेच सत्य आणि अहिंसेच्या पैलूविना म.गांधीच्या विचाराचे अध्ययन करणे अशक्य आहे. त्यांच्या विचाराचे जे विविध पैलू आहेत, त्यात सत्य–अहिंसा, अपरिगृह, संहिष्णूता, सर्वधर्म समभाव, सामंजस्य, मानवतावाद, राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीयवाद इत्यादी वैचारिक पैलुनेही त्याचे अध्ययन करावे लागते. थोडक्यात सत्य आणि अहिंसेचे एक महान पुजारी म्हणून भारतातच नव्हेतर जगाच्या कानाकोप–यातही म.गांधी हे सर्वांचेच श्रध्दास्थान आहेत. एकंदरीत ते सत्याला परमेश्वर मानीत असत. सत्य हा अहिंसेचा मूलभूत घटक आहे, अहिंसा ही सत्यावर आधारलेली असते, त्यामुळे अहिंसेची सत्यापासून फारकत करता येत नाही. म्हणून ते म्हणतात, केवळ इश्वर सत्य आहे, म्हणून भागणार नाही. सत्य हाच इश्वर आहे.[2] तात्पर्य हा की, गांधीजी यांच्या विचाराची सुरूवातच सत्य–अहिंसेच्या तत्वज्ञानाने होते. थोडक्यात सत्य–अहिंसा या तत्वाबरोबर त्यांचेवर रामायण–महाभारत आणि अन्य धर्मिय धर्मग्रंथाचाही मोठा प्रभाव होता. थोरो, जॉन रस्किन, टॉलस्टाय यांच्या विचारांचाही त्याचेवर मोठा प्रभाव होता. म्हणूनच एवढ्या मोठ्या साम्राज्यवादी शक्तीशी लढताना त्यांनी सत्याग्रहाचे तंत्र वापरले, त्यात त्यांनी यशही संपादन केले. एकंदरीत त्यांची सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, तात्विक अशा वैचारिक पैलूंचे आपणास अध्ययन करावे लागते. –हदयपरिवर्तनावर त्यांचा विश्वास होता. किंबहूना लढा सामाजिक असो की राजकीय असो यात त्यांनी साधनशुचितेचा आग्रह धरला. अध्यात्मनिष्ठ मानवतावाद हा म.गांधीच्या विचारातील एक महत्वाचा पैलू होता, चिरंतन टिकणा–या नीतीमुल्यांकडे दुर्लक्ष करून सामाजिक प्रगतीची अपेक्षा करणे व्यर्थ आहे, ही महात्मा गांधीची श्रध्दा होती.[3] त्यांच्या वेगवेगळ्या विषयावरील चिंतनाला 'गांधीवाद' म्हणून ओळखले जाते. त्यातीलच एक महत्वाचा विचार म्हणजे मानवतावाद होय. एकंदरीत त्याचे तत्वज्ञान हे मानव केंद्री आहे, म्हणून सत्य, अहिंसा, सत्याग्रह, मानवतावाद या पैलूने त्यांचे अध्ययन करावे लागते. तसेच त्यांच्या राजकीय विचारांचेही विविध पैलू आढळून येतात, याच अनुषंगाने त्यांच्या राजकीय विचाराच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना अराज्यवाद, आदर्श राज्य, रामराज्य, संसदीय लोकशाही, स्वराज्य या बाबतीतही त्याचे विचार अगदीच मर्मग्राही आहेत. म.गांधी हे स्वतःला अराज्यवादी मानतात, गॉडविन प्रुदॉ यांचेही या सिध्दांतात महत्वाचे स्थान आहे. या करीता म.गांधीनी धर्म आणि राजकारण यांचा मेळ घातलेला आहे, किंबहूना राजकारणाचे अध्यात्मीकरण व्हावे हा पैलू त्यांच्या राजकीय विचारात दिसतो. म.गांधी हे आदर्शतः अराज्यवादी होते. साध्य आणि साधने यांचाही त्यांनी विचार केला होता. रामराज्यात प्रत्येक जन शासनकर्ता असेल, प्रत्येक जण स्वतःच्या सद्सद् विवेक बुध्दी प्रमाणे वर्तन करेल, खेडे हा समाजसंघटनेचा घटक असेल.[4] म.गांधीच्या एकूणच विचारात अराज्यवाद, रामराज्य, स्वराज्य, खेड्यांची स्वयंपुर्णतः इत्यादीप्रमाणे ते लोकशाहीचेही समर्थक असल्याचे दिसून येतात, परंतू त्यांच्या लोकशाहीचे पैलू मात्र अध्यात्मिक दृष्टिकोणातून पूढे येतात. ग्रामप्रधान समाज निर्मितीसाठी खेडे स्वायत्त असेल हा त्यांच्या विचारातील राजकीय पैलू दिसून येतो. पंचायत राज, विकेंद्रीकरण या बरोबरच अहिंसक, अध्यात्मिक लोकशाही यावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. स्वराज्य हे त्यांच्या लोकशाहीचे स्वरूपही पुढे येते. समता, जनसार्वभौमत्व, स्वस्त व सुलभ न्याय, व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वयंस्वीकृत नीतिनियमांचे वर्चस्व ही त्या लोकशाहीची मुल्ये म.गांधीनी नमुद केली आहेत.[5] म. गांधीजीच्या विचाराचे जे विविध पैलू आहेत, त्यात साधी राहणी उच्च विचारसरणी हा एक त्यांच्या विचाराचा महत्वपूर्ण पैलू आपल्या समोर येतो. व्यक्तीस्वातंत्र्य, स्वराज्य, ग्रामराज्य, लोकशाही यावर त्यांचे चिंतन अतिशय मूलगामी होते. त्यांचा राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद याबाबतचा विचारही अगदीच मानवतावादाकडे नेतो. विशेषतः पाश्चिमात्य राष्ट्रवादापेक्षा भारतीय राष्ट्रवाद निश्चितच वेगळ्या स्वरूपाचा आहे, कारण या देशाला हजारो वर्षाचा प्राचीन इतिहास असून विविध धर्माचे लोक येथे राहतात. राष्ट्रवाद ही कांही इंग्रजाची देणगी नाही तो असंख्य वर्षापासून भारतात ही भावना आहे. जागतिक शांततेच्या दृष्टीनेही भारत आपले योगदान देऊ शकतो. भारत जेंव्हा स्वतःसाठी स्वातंत्र्य मागतो तेंव्हा इतर सर्व लहान मोठ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकांक्षेला तो मान्यता देतो, कोणाच्याही स्वातंत्र्याला तो गौण लेखत नाही.[6] याविचारातून त्यांची राष्ट्रवादाबाबतची विधायकदृष्टी यांच्या विचारांसह आंतरराष्ट्रीय वादा बाबतची विचारसणीही दृष्टिक्षेपास येते.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

म.गांधी यांच्या विचाराला विविध पैलू होते, प्रत्येक पैलूवरील त्यांचे चिंतन अगदीच समस्येच्या मुळाशी जाणारे होते. हे उपरोक्त विश्लेशनावरून लक्षात येते. विशेषतः त्यांनी प्रथमतः सत्याग्रहाचा वापर दक्षिण आफ्रिकेत केला होताच, शिवाय ते भारतात परतल्यानंतर भारताच्या विविध भागांचा त्यांनी दौरा केला होता, त्या दौ–यात त्यांना आपल्यातील अज्ञान–दारिद्र्य यांचा प्रत्यक्ष अनुभव आलेला होता. एकंदरीत या सामाजिक चिंतनातून त्यांचा सामाजिक सुधारणेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण विकसित झाला. सत्य–अहिंसा, मानवता हे गांधीजीचे आद्य दैवत होते. खास करून सामाजिक सुधारणेच्या अनुषंगाने त्यांनी रचनात्मक कार्यक्रमही आखले होते. त्यात ग्रामोद्योग, खेड्यातील स्वच्छता, मूलभूत शिक्षणाचा प्रारंभ, अस्पृश्यता निवारण, आर्थिक समानता, स्त्रीमुक्ती या कांही कार्यक्रमाचा आपणास आवर्जुन उल्लेख करावा लागेल. खास करून स्त्रियांच्या बाबतीतील त्यांच्या विचाराचे अनेक स्त्रीवादी पैलू आपणास दिसून येतात, त्यांनीच हजारो स्त्रियांना राजकारणाच्या सार्वजनिक क्षेत्रात आणले होते, ही बाब विसरता येण्यासारखी नाही. राजकीय प्रचार, सभा, संमेलने, व्याख्याने, सत्याग्रह, तुरूंग भरती अशा सर्व ठिकाणी नवजागृत स्त्रीची शक्ती वापरून दाखवणारे ते पहिले भारतीय होत.[7] यावरून ही बाब स्पष्ट होते की, म.गांधीजीनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांच्या सहभागासह सार्वजनिक जीवनातही तिला पुरूषा एवढेच हक्क मिळाले पाहिजेत, यासाठी आग्रहाने प्रतिपादन केले. गांधीच्या मते, ''स्त्री मुक्ती ही स्त्री–पुरूष समतेची शर्तच आहे आणि म्हणून प्रत्येक समतावादी स्त्री–पुरूषाने स्त्री दास्याच्या विरोधात उभे राहिले पाहिजे.'' असे गांधी सांगतात.[8] म.गांधी यांच्या विचारांना भारतीय स्वातंत्र्यापासून ते धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, ग्रामसुधारण, हस्तोद्योग, स्त्रियांची दास्य मुक्ती, शांतता, संयम, आत्मशुध्दी, इश्वर–श्रध्दा, अहिंसा परमोधर्म इत्यादीचे संदर्भ प्राप्त झाले आहेत, त्यांच्या आर्थिक विचारातील पैलुमध्ये, विश्वस्त संकल्पना, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय, विशेष करून ग्रामस्वराज्य, खादीचा वापर, स्वदेशी, यांत्रिकरणाला विरोध हे त्यांच्या आर्थिक विचारांचे पैलू दिसून येतात, यातही त्यांनी खास करून श्रमप्रतिष्ठेला अत्यंत महत्वाचे स्थान दिले. गांधीजीची ही संकल्पना ''भाकरीसाठी कष्ट'' म्हणून प्रसिध्द आहे. विश्वस्ताच्या संकल्पनेत सर्व संपत्ती इश्वराची आहे, हा मुद्या लक्षात घेवून समाजातील श्रीमंत लोकांनी संपतीचे विश्वस्त म्हणून काम करावे, असा रास्त मुद्या त्यांनी मांडला, त्यातून त्यांचा आर्थिक विचार, समाजसेवा, गरीबांचे कल्याण इत्यादी पैलू स्पष्ट होतात. एकंदरीतच गांधीजी आणि गांधीवादाबाबत यांचे महत्व आचार्य भागवतानी पूढील शब्दात व्यक्त केले आहे, ''दयानंदाची वैदिक निष्ठा, राममोहन रॉय यांचा सर्वधर्म समभाव, रामकृष्णांची अध्यात्मिकता, विवेकानंद, रामतीर्थ यांची दरिद्रीनारायणाची तळमळ, अरविंदाची साधनमग्नता, लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य, प्रेम आणि धैर्य आणि रविंद्रांचे विश्वप्रेम यांचा म.गांधीत समन्वय झाला आहे.''[9] या वैचारिक महानतेवरून आणि त्यांच्या विचारांच्या उंचीवरूनच म.गांधीजीच्या विचारातील विविध पैलू आपल्यासमोर येतात.

**सारांश /निष्कर्ष :**

म.गांधीजी यांच्या विचारांचे विविध पैलू लक्षात घेऊन त्याचे संशोधनात्मक अध्ययन करताना त्यांच्या विचाराचे क्षेत्र हे प्रचंड व्यापक होते. किंबहूना त्यांच्या तत्वज्ञानाचा अवाकाही अगदीच व्यापक होता आणि विचारांचा केंद्रबिंन्दू 'मानवता' होता. सत्य–अहिंसा, निर्भयता, सत्याग्रह सर्वोदय, विश्वस्त, व्यवहारिक शिक्षण, अध्यात्मिक लोकशाही, सर्वधर्मसमभाव, श्रमप्रतिष्ठा, स्वराज्य, खेडीसुधारणा, स्त्री मुक्ती, आत्मशुध्दी, विश्वबंधुता कृतिप्रवणता, नितीमत्ता इत्यादी सारखे अनेक महत्वाचे पैलू म.गांधीच्या विचारात दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) गर्गे स.मा., राजदरेकर सुहास, भारताचा स्वातंत्र्य संग्राम,(1997), विद्या प्रकाशन, नागपुर, पृ.95
2) डॉ. बाचल वि.मा., गोळवलकर, वराडकर, क्षीरसागर, भारतीय राजकीय विचारवंत,(2002), अनिरूध्द पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. 238.
3) गर्गे स.मा., राजदरेकर सुहास, भारताचा स्वातंत्र्य संग्राम पुर्वोक्त, पृ. 238.
4) व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, राज्यशास्त्र कोश, (1987), दास्ताने रामचंद्र आणि कं, पुणे, पृ.262.
5) भोळे भा.ल.भारतीय राजकीय विचारवंत,(जून 1995), पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृती, पृ.112.
6) भोळे भा.ल., भारतीय राजकीय विचारवंत, पुर्वोक्त, पृ. 121.
7) कोकंडाकर जे.आर. 'गांधी विचार, नरहर कुरूंदकरांचा दृष्टिकोण,(2015), श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृती, पृ.70
8) यशवंत सुमंत, म.गांधीची विचारसृष्टी, एप्रिल 2016, साधना प्रकाशन पुणे, पृ. 58.
9) कुलकर्णी गो.मं. बीजलेख, पुंडे दत्तात्रय,(संपा.), गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, 1995, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.26.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधी आणि राष्ट्रीय सेवा योजना

**गणेश वामन पाटील**

**संशोधक विदयार्थी (समाजकार्य), सामाजिक शास्त्रे विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ नांदेड**

---

**सारांश**

महात्मा गांधी यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा, उपेक्षित दूर्लक्षित घटकांना विकासाची संधी मिळाली, त्यांना मदत व्हावी असे वाटत होते. यानुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्याचे, त्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना मदत करण्याचे कार्ये करतात. खेड्याकडे चला हा संदेश महात्मा गांधी यांनी दिला होता. त्यानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा विचार घेऊन गावामध्ये विशेष शिबीर आयोजीत करते. या मार्फत निर्मलग्राम, सर्वागिण व शाश्वत ग्रामविकास, पाणलोटचे कार्ये, कोल्हापुरे बंधारे, चर देणे, रस्ते, नालेसफाई, वृक्षरोपण, रक्तदान इ. कार्य केले जातात. याच बरोबर पथनाट्य, रॅली, उदबोधक चर्चा, शिवार फेरी, गावकरी संवाद या माध्यमातून समाजाच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक युवाशक्ती व उर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य केले जाते.

**संज्ञा**

युवक, गांधीवाद, सत्य, अहिंसा, सेवाभाव, ग्रामविकास, श्रमसंस्कार

**प्रस्तावना**

महात्मा गांधी यांनी भारतीयांना व संपूर्ण जगाला सत्य, अहिंसा व सत्याग्रह या तीन संकल्पनाची अमुल्य देणगी दिली आहे. महात्मा गांधी यांच्या विचारास गांधीवाद, गांधी तत्वज्ञान, सर्वोदयवाद अशी विविध संबोधने वापरली जातात. परंतू अशी संबोधने वापरुन आपले विचार बंदिस्त करणे अथवा मर्यादित करणे त्यांना पसंत नव्हते. ते म्हणत असत, “गांधीवाद अशी कोणतेही गोष्ट नाही, माझ्यानंतर एखादा वैचारिक संप्रदाय निर्माण व्हावा अशी माझी इच्छाही नाही.” “कोणतेही नवे तत्व अथवा स्वयंम निर्माण केलेली आहे. असा दावाही मी करीत नाही. मी माझ्या पध्दतीने सनातन श्वाश्वत तत्वे आपल्या दैनंदिन जीवनास व प्रश्नास लावून पडताळून पाहण्याचा फक्त प्रयोग केला आहे.”[1] त्यांनी मांडलेलले हे विचार सत्य आहेत. कारण त्यांनी साधे सरळ विचारांची मांडणी केलेली आहे. त्याचे विचार विविध लेख, भाषणे, प्रार्थनेनंतरचे चिंतन यातून व्यक्त झालेली आहेत. व तात्विक चर्चेपेक्षा संपूर्ण मानवी जीवन हिच प्रयोग शाळा समजून दैनंदिन व्यवहार अथवा जीवन व्यवहार हाच पाया समजून आपल्यापुढे असलेल्या तत्वांचा पडताळा पाहून शाश्वत सत्य शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. युवकांच्या संदर्भात महात्मा गांधीजींचे असे मत होते की, युवकांनी खेड्यात कायम वस्ती करावी. तेथे ते उपकारकर्ते म्हणून नव्हे तर स्वयंसेवक म्हणून जातील. त्यांनी स्वतःच्या दिनचर्येत पूर्ण बदल करावा. युवकांनी सेवाभावी बनुनच खेड्यात जावे. अशा सेवाभावी युवकांमुळे गावातील अडचणी कमी होण्यास मदत होतात. ते सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देतात. वेतनी ग्रामसेवकांकडून सर्वच परिवर्तनाचे हे काम पुर्ण होईलच असे नाही. त्यांना काहीनां या कार्यात फारसा रस नसतो. यासाठी युवकांचा ग्रामीण विकासातील सहभाग हाच राष्ट्विकासाचा पाया आहे. ही त्यांची युवकांविषयी धारणा होती.

**उद्देश**

१) महात्मा गांधी यांचे विचार अभ्यासणे.

२) राष्ट्रीय सेवा योजनेच्या निर्मितीचा आधार जाणून घेणे.

३) राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गांधी विचार जाणून घेणे.

**गृहितके**

१) महात्मा गांधी यांचे विचार महत्वपुर्ण आहेत.

२) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेचा आधार गांधी विचारावर आहे.

३) गांधी विचारानुसार देशातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य सुरु आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत शोधनिबंध लेखनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. या संशोधन पध्दतीचा अवलंब करुन वर्णनात्मक विवेचन करण्यात आले आहे.

**तथ्यसंकलन**

प्रस्तूत शोधनिबंधाच्या लेखनासाठी द्वितीयक तथ्य संकलन तंत्राचा अवलंब केला आहे.

**तथ्यविश्लेषण**

प्रस्तूत शोधनिबंध लिखाणासाठी प्राथमिक व्दितीयक तथ्य संकलन तंत्राच्या सहाय्याने संकलित तथ्याचे विश्लेषन करण्यात आले आहे.

**महात्मा गांधी विचार**

महात्मा गांधी यांच्या मते, भारतातील खेड्यांच्या विकासात भारताचा विकास दडला आहे. कारण भारत हा खेड्यांचा देश आहे. सार्वजनिक स्वच्छतेची कमतरता, सकल आहाराची कमतरता आणि अज्ञान व इतरही मुददे ग्राम विकासातील अडचणी आहेत. यासाठी ग्रामस्वराज्याची निर्मिती होणे आवश्य आहे.[2] भारतात प्राचीन काळापासुन दर्जेदार ग्रामव्यवस्था होती. या ग्रामव्यवस्थेत काही दोष होते. ते नष्ट करण्यासारखे आहेत. यामुळे ही नवी संस्कृती स्थापन करणे गांधींना सर्वस्वी अशक्य वाटते. महात्मा गांधी यांचे याविषयी असे मत होते की, आमच्या देशाला ग्रामसंस्कृती शिवाय तरणोपाय नाही. या संस्कृतीत असणारे दोष या देशाचा स्वयंइच्छेने सहभागी युवावर्ग नाहीसे करू शकेल व एकूण सर्व जीवनक्रमात आमुलाग्र बदल करता येईल. शहरात राहणारे खेड्यात जाण्यास उत्सूक नसतात. खेड्यातील जीवन स्वीकारणे काहींना कठीण वाटते. पण ख-या अर्थाने कल्याण करावायचे असेल तर सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देउन या देशातील युवकांनी खेड्यात ठाण मांडायला हवे. म्हणुनच महात्मा गांधी यांच्या विचारातुन राष्ट्रीय सेवा योजनेची ग्रामीण विशेष शिबीर कार्यरत आहेत. या देशात केवळ सत्ता बदलून काम होणार नाही. येथील ग्रामीण जीवनाचा कायापालट करावा लागेल. त्यासाठी स्वत:च्या आयुष्याचे बलिदान करणारी एक यूवा पिढी तयार करावी लागेल. या बलिदानाशिवाय आम्हाला एक स्वतंत्र व स्वावलंबी राष्ट्र म्हणून जगता येणार नाही.[3]

महात्मा गांधीजींच्या मते, या देशातील यूवकांनी खेड्यात कायम वस्ती करावी. स्वयंसेवक म्हणून जावे. युवकांनी सेवाभावातूनचच खेड्यात जावे. अशा सेवाभावी यूवकांचा गावातील अडचणींमूळे उत्साहभंग होत नाही. ते सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देतात. यामूळे यूवक वर्गाच्या स्वयंप्रयत्नातून व त्यांच्या सेवेतून गाव बदलू शकते. गाव स्वच्छ राखणे, शिक्षणाचा प्रसार करणे ही कामे प्राधान्याने होतील. स्वत:चे जीवन शुध्द असल्याने त्याचा गाव विकासावर परिणाम होतो. यूवकांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला आवश्यक ती गरजाभिमुख सेवा मिळाली तर हळूहळू त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. व ते आपण होऊन यूवकांना आपल्या समस्या सांगतील. अशा प्रकारची एक समग्र ग्रामसेवेची कल्पना महात्मा गांधी यांच्या मनामध्ये होती. त्यांच्या कल्पनेला व विचाराला प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणक्षेत्राच्या माध्यमातून केले.[4]

**राष्ट्रीय सेवा योजना :-**

महात्मा गांधी यांच्या समग्र ग्राम संकल्पनेला मुर्त स्वरूप देण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात शासकीय स्तरावर प्रयत्न झाले. 1964 मध्ये नेमलेल्या डॉ. डी. एस. कोठारी आयोगाने शिक्षणाच्या सर्व टप्प्यावर विद्यार्थी समाजसेवेशी जोडला जावा. अशी शिफारस केली होती. त्यानूसार 1967 मध्ये झालेल्या भारतातील सर्व राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत एन.सी.सी. सोबत एन.एस.एस. (राष्ट्रीय सेवा योजना) असावी हे मान्य करण्यात आले. देशातील सर्व विद्यापीठाच्या कुलगुरुच्या परिषदेत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वागत होऊन 24 सप्टेंबर 1969 रोजी महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तत्कालीन शिक्षणमंत्री व्ही. के. राव यांनी 37 विद्यापीठात प्रायोगिक तत्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरु केली. आज देशातील हजारो महाविद्यालये व लक्षावधी विद्यार्थी या योजनेत सहभागी आहेत.[5]

**राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य :-**

**1) ग्रामीण भागात विशेष वार्षिक शिबीर :–**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या सभोवतालच्या ग्रामिण भागामध्ये विशेष वार्षिक शिबीराचे आयोजन केले जाते. यासाठी विशेष शिबीरार्थी विद्यार्थी, समन्वयक शिबीरस्थळी वास्तव्याला राहतात. काळात महाविद्यालयीन युवकांकडून ग्रामिण भागात स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षलागवड, अंधश्रध्दा निर्मुलन यासाठी कार्य केले जाते. ग्रामिण जनतेला या विषयाचे महत्व पटवून देण्यावर भर असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्य समन्वयकाकडून व युवक विद्यार्थ्यांकडून होणारे हे कार्ये महात्मा गांधी यांच्या विचारास प्रत्यक्षात आणण्याचे कार्य आहेत.

**2) जिल्हा युवक शिबीर :–**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावर विशेष युवक शिबीराचे आयोजन होत असते. या शिबीराच्या माध्यमातून सध्यस्थितीतील समस्यावर चर्चा होते. युवकांमध्ये याविषयी जागृतता वाढविण्याचा प्रयत्न होतो. श्रमसंस्कार, स्वावलंबन वृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण करुन नेतृत्व गुणाला चालना दिली जाते

**3) व्यक्तीमत्व विकासावर भर :–**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन स्वंयसेवक विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत असल्याचा अनूभव विद्यार्थी सांगतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकाचे प्रभावी व्यक्तीमत्व घडवून त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण केली जाते. हे महात्मा गांधी यांना अपेक्षित असणारे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होत असल्याचे दिसते.

**4) युवकांमध्ये सेवा संस्कार रुजवण्यावर भर :–**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सेवा आणि त्याग ही तत्व महत्वाची आहेत. या तत्वाचा युवकांच्या आयुष्यात महत्व आहे. महात्मा गांधी यांच्या विचारानुसार शिक्षण क्षेत्रातून सेवा संस्कार तरुणांवर व्हावा, तरुणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवा शक्तीचा राष्ट्राला उपयोग व्हावा, या हेतूने शिक्षण क्षेत्रात विविध योजना वेगवेगळ्या स्तरावर राबविल्या जातात. या माध्यमातून युवकामध्ये सेवा संस्कार रुजविण्याचे कार्य केले जाते.

**5) समाज परिवर्तनाचे कार्य :–**

अलिकडच्या काळात समाजात वेगवेगळ्या विचित्र घटना घडतांना दिसतात. अशा परिस्थितीत तरुण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडविण्याचे कार्य केले जाते. राष्टीय सेवेचे योजनेचे युवक ग्रामस्थांच्या सेवसाठी तयार असतात "बॉटम अप □प्रोच"नुसार काम करीत आहे. पारदर्शकता येण्यासाठी ग्राम सभेचे महत्व राष्टीय सेवा योजनेच्या उदबोधन वर्गातुन ग्रामस्थांना दिले जाते. महात्मा गांधी यांना शिस्त व कर्तव्य यांची जाणीव होती. त्यांचप्रमाणे राष्टीय सेवा योजनेच्या युंवक राष्टीय सेवा योजनेत व त्यांनतरही वरील गुणांचा अवलंब करतात गांधीजीच्या विचारातुन व राष्टीय सेवा योजनेतुन देश सकारात्मक पदधतीने काम करीत आहे.

**6) नाविण्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी :–**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध नाविण्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी होत असते. यामध्ये पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड, सीसीटीव्ही, ग्रीन ऑडीट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधतता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, समाजवृती लेक वाचवा अभियान, आर्थिक, कौटुंबिक आणि शैक्षणिक इत्यादी नाविण्यपुर्ण उपक्रम राबविले जातात. राष्ट्रीय सेवा योजना ही एक युवा चळवळ आहे. ही अखंड सुरु ठेवण्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार सातत्याने प्रयत्नशिल आहे. केंद्र सरकार राज्यशासनांच्या माध्यमातुन विदयापीठांना आणि विदयापीठ महाविदयालयाना अनुदान देत असते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होणारे हे कार्य गांधी विचारावर आधारित आहे. देशातील युवकांना ग्रामीण जीवन, समस्याची जाणीव व्हावी, पर्यावरण संवर्धन, स्वावलंबन, शिस्त, प्रामाणिकता उत्तम संवाद कौशल्य देशभक्ती हे मुल्य यांच्यामध्ये रुजावे, सेवा संस्कार वृत्ती निर्माण व्हावी असे त्यांचे मत होते. या सर्व

मुल्याना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष स्वरुप प्राप्त झाले आहे .'Not me but you' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद वाक्य आहे. हे युवकांना राष्ट्रसेवेसाठी तयार राहण्याचे उद्देश देते.

अशा प्रकारे गांधी विचार हा राष्ट्रीय सेवा योजनेच्या निर्मितीच्या व कार्याचा आधार असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासांचा निघालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

1) महात्मा गांधी यांच्या विचाराचा वर्तमान स्थितीत स्विकार करणे आवश्यक □□□.
2) वर्तमानकालीन सर्व समस्याची सोडवणूक गांधी विचाराने शक्य आहे.
3) महात्मा गांधी यांचे विचार वर्तमान समस्येवरील उपाय असल्याने त्यांच्या विचाराच्या आधारे राष्ट्रीय सेवा योजनेची सूरुवात झाली आहे.
4) यूवकांना राष्ट्र सेवेची, ग्रामीण जीवनाशी एकरुप होण्याची व ग्रामीण समस्याची जाणीव निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते.
5) राष्ट्रीय सेवा योजनेमूळे यूवकाचे व्यक्तिमत्व विकसित होऊन नेतृत्व गुणांचा विकास होतो.
6) यूवकांमध्ये सेवा संस्कार रुजवण्याचे कार्ये राष्ट्रीय सेवा योजनेमूळे होते.
7) देशातील यूवा शक्तीला नवचेतना देण्याचे कार्ये राष्ट्रीय सेवा योजनेमूळे होते.

**मूल्यमापन :-**

महात्मा गांधीच्या विचारापासून प्रेरणा घेऊन 1978 मध्ये कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात झाली. सध्या कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रासाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरु आहे. या माध्यमातून यूवकांचा राष्ट्रविकासामध्ये सहभाग वाढत आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यात यूवकाचे योगदान राष्ट्रीय सेवा योजनेमूळे लाभत आहे. राष्ट्रीय एकात्मता, शिस्त, स्वावलंबन, प्रामाणिकता, लोकशाही, मुल्य, त्याग, सेवाभाग, श्रमप्रतिष्ठा ही मुल्य व संस्कार या माध्यमातून यूवकांवर रुजवले जात यूवकाचे व्यक्तिमत्व राष्टीय सेवा योजनेमुळे विकसित होत असल्याचे दिसते. हे महात्मा गांधी यांच्या विचाराचे यश आहे. यामध्येच महात्मा गांधीचे महत्व आहे.

**संदर्भ :-**


1) शहा, डॉ. मु.ब., (2007), गांधी विचार, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ.क्र. 26
2) शहा, डॉ. मु.ब., (2007), गांधी विचार, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ.क्र. 26
3) गांधी मो.क., (2007) माझ्या स्वप्नाचा भारत, वर्धा परधान प्रकाशन
4) गांधी मो. क. (2007), हिंदस्वराज्य, वर्धा परधान प्रकाशन
5) मुढाळ, राम, (1998), भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, नागपूर, अंशूल पब्लिकेशन्स


***********

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधीजीचे स्वराज्य विषयक विचार

**प्रा. जी.पी. चव्हाण**

**आदर्श महाविद्याल, हिंगोली**

---

स्वतंत्र भारतात राज्यकारभार लोकांच्या संमतीने आणि त्यांच्या इच्छेनूसार चालावा अशी गांधीजींची इच्छा होती. गांधीजींच्या स्वराज्य याचा अर्थ लोकांना आपल्या इच्छेनुसार स्वत:चे भवितव्य घडविण्याचा, तसेच स्वत:च्या प्रयत्नातून आपले जीवन समृध्द करण्याचा अधिकार होय.

स्वराज्याची व्याख्या करताना म. गांधी म्हणतात, स्वराज्याचा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे लोकांच्या संमतीने चाललेले हिंदुस्थानचे शासन ही संमती बहुसंख्य प्रौढ स्त्री-पुरुष नागरिकाच्या मतांव्दारे व्यक्त झालेली असावी. त्या नागरिकांमध्ये काही जन्मसिध्द नागरिक असतील तर काही स्वीकृत नागरिक असतील, पण त्या सर्वांनी राज्याच्या सेवेतील शारीरिक परिश्रमांचा आपला वाटा उचललेला असलाच पाहिजे आणि मतदार म्हणून आपले नावही नोंदवलेले असलेच पाहिजे. परंतु प्रतिनिधिक शासनाच्या या संस्थात्मक स्वरुपापेक्षा कार्यात्मक नैतिकतेवर गांधी अधिक भर देतात. संसदीय लोकशाहीचा ते पुरस्कार करतात, पण मर्यादीत कामासाठी नेहमी करीता नव्हे. ब्रिटिशांच्या राजकीय संस्थासंबंधी अत्यंत प्रखर शब्दात गांधीनी निषेध केला आहे. पार्लमेंटला ते वांझ म्हणतात, कारण त्यांच्या मते आतापर्यंत तिने स्वत:च्या बुध्दीने एकही उत्तम गोष्ट केलेली नाही. तसेच अन्यत्र ते तिला वेश्या म्हणून धिक्कारतात. कारण वारंवार बदलणाऱ्या मंत्र्याचे तिजवर नियंत्रण चालते. त्यामुळे या संस्थांचा काही या देशावर अंमल राहावा अशी तडजोड ते मान्य करीत असले तरी मुळात त्यांच्या बद्दल त्यांना आदर नाही व विश्वासही नाही. पाश्चात्य लोकशाही हे नाझीवाद व फॅसिस्टवादाचे सौम्य स्वरुप आहे, असे त्यांचे मत होते. फार तर साम्राज्यवादाच्या नाझी-फॅसिस्ट प्रवृत्तींना लपवणारा तो सुंदर मुखवटा आहे असे ते म्हणतात. गांधीच्या आदर्श राज्यातली संसद अशी असणार नाही. कारण ती अशी बाहय दबावाखाली कार्य करणार नाही, आणि दुसरे असे की, तिच्यावर फक्त उत्तम असेच प्रतिनिधी निवडून जातील.

स्वराज्य म्हणजे गोरगरिबांची, जनता जनार्दनाची त्यांच्यासाठीच असलेली लोकशाही अशी व्याख्या ते त्यामुळे करतात. त्यालाच ते रामराज्य अशी संज्ञा देतात. मनुष्य आणि समाज यांच्या परिपूर्णत्व क्षमते संबंधाचे गांधीचे स्वप्न म्हणजे रामराज्य होय.

प्रतिनिधीक संस्थापेक्षा त्यांचा भर लोकशक्तीवर आहे. खरे स्वराज्य मूठभरांच्या हाती सत्ता आल्याने अस्तित्वात येणार नाही, तर त्या सत्तेचा गैरवापर होत तिला प्रतिकार करण्याची क्षमता सर्वांच्या अंगी निर्माण झाल्यानेच ते येणार आहे. म्हणजेच सत्तेवर नियमन व नियंत्रण ठेवण्याच्या आपल्या क्षमतेची जनसामान्यांना शिकवण देण्यातूनच स्वराज्याची स्थापना होऊ शकते असे गांधीचे मत होते.

स्वराज्य हे, गांधीच्या मते, केवळ काही सुशिक्षित व धनिक लोकांची मिरासदारी असून चालणार नाही. कोणत्याही वांशिक-धार्मिक भेदभावाला त्यात जागा असणार नाही. ते सर्वांसाठी असेल. सुशिक्षित धनिकांसाठी जितके असेल तितकेच किंबहुना अधिकच ते अंधांसाठी, पंगूसाठी, घाम गाळूनही उपासमार भोगणाऱ्या लक्षावधीसाठी असेल. ते एका जागी लिहितात माझ्या स्वप्नातले स्वराज्य हे गरिबांसाठीचे स्वराज्य आहे. आयुष्याच्या गरजा राजघराण्यातील व धनिक वर्गातील लोकांइतक्याच सामान्य लोकांनाही भोगता याव्यात सर्वांना राजप्रसादात राहता यावे असा याचा अर्थ नाही. सुखासाठी प्रासादांची गरज नसते. परंतु जीवनावश्यक सर्वसाधारण सुखसोयी सर्वांनाच उपलब्ध असाव्यात एवढाचा याचा अर्थ आहे. तशा त्या होत नाहीत तोपर्यंत पूर्ण स्वराज्य मिळाले असे म्हणता येणार नाही. गांधीच्या मते, स्वराज्याला पूर्ण तेव्हाच म्हणता येईल जेव्हा ते राजपुत्रांइतकेच शेतकऱ्यांसाठीही असेल, श्रीमंत जमीनदारांइतकेच मातीत राबणाऱ्या कुळासाठीही असेल. जेवढे हिंदूसाठी तेवढेच मुसलमानांसाठी आणि तेवढेच पारशी, जैन, यहूदी आणि शीखासाठीही असेल. जाती, धर्म, सामाजिक दर्जा या कशाच्याच आधारे त्यात भेदभाव घडणार नाही. स्वराज्य ही संज्ञा आणि तिच्या प्राप्त्यर्थ अवलंबिलेले सत्य-अहिंसा हे मार्गच,

गांधीच्या मते, या गोष्टीची साक्षी देतात की ते स्वराज्य काही लोकांसाठी इतरापेक्षा अधिक असणार नाही, काहीसाठी पक्षपाती व इतरांसाठी पूर्वग्रहदूषित असणार नाही ते समताधिष्ठित व धर्मनिरपेक्ष असणे अपरिहार्य ठरेल.

स्वराज्य हे बहुसंख्येचे म्हणजेच पर्यायाने हिंदूचे राज्य असेल हे मत गांधीनी अत्यंत नि:संदिग्ध शब्दांत खोडून काढले आहे. ते तसे झाल्यास आपण त्याला स्वराज्यच म्हणणार नाही व संपूर्ण सामर्थ्यानिशी त्याचा प्रतिकार करु असे ते म्हणतात. हिंद स्वराज्य हे सर्वांचे राज्य असेल, न्यायाचे राज्य असेल असे त्यांचे मत होते. त्या राजवटीत मंत्रिपदावर हिंदू असोत, मुसलमान असोत व शीख असोत किंवा विधीमंडळे जरी सर्वस्वी हिंदू वा मुसलमानांनी वा अन्य कोणत्याही जमातीच्या व्यक्तींनी भरलेली असली तरी त्यांना समतोल न्यायबुध्दीनेच कारभार करणे भाग आहे. या देशातील कोणत्याच जमातीने अन्य जमातीचे भय बाळगण्याचे कारण नाही.

गांधीच्या स्वराज्य कल्पनेला महत्वाची आर्थिक बाजू आहे. आपले स्वराज्य गरिबांसाठीच आहे असे त्यांचे मत आहेच. गांधीची स्वराज्य कल्पना स्वराज्य कल्पना चौरसाकृती होती. चौरसाच्या एका कोपऱ्यावर राजकीय स्वातंत्र्य, दुसऱ्यावर आर्थिक स्वातंत्र्य, तिसऱ्यावर नैतिक सामाजिक आणि चवथ्या कोपऱ्यावर धार्मिक स्वातंत्र्य असेल, यापैकी कोणताही कोन बिघडल्यास स्वराज्याच्या चौरसाचा आकारच बिघडेल असे गांधी मानीत असत.

राजकीयदृष्ट्या रामराज्य अशी परिपूर्ण लोकशाही की ज्यामध्ये मालमत्ता असण्या नसण्यावरुन वा वर्ण, वंश, धर्म, लिंग इत्यादीवरुन विषमतेला मुळीच स्थान नसते; ज्यामध्ये भूमी आणि राज्य यांचे स्वामित्व जनतेकडे असते. न्याय तत्पर, भाषण व मुद्रण या संबंधी स्वातंत्र्य असते आणि या सगळया गोष्टी शक्य होतात याचे कारण म्हणजे तिचे स्वयंस्वीकृत नीतिमत्तेच्या कायदयाच्या निर्बंधाचा अंमल चालत असतो. हे त्यांचे स्वप्न त्यांनी सुचवलेल्या मार्गानी साकार होऊ शकेल काय? या प्रश्नासंबंधी मतभेद संभवतात. मात्र ते स्वप्न पाहणाऱ्या मनाची उत्कटता आणि तळमळ याबद्दल मतभेदाला जराही जागा नाही. गांधीचे स्वराज्य म्हणजे ईश्वराचे पृथ्वीवरील राज्य होते, सदाचाराचे राज्य होते. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय त्यांनी परिपूर्ण असा तो अहिंसक समाज होता. गांधीच्या मते अशी अहिंसेवर आधारलेली व सत्यान्वयी नैतिक निर्बंधांनी नियंत्रित झालेली लोकशाही तेव्हा अस्तित्वात येऊ शकत नव्हती याचे कारण सर्वांगिण व बहूमुखी विषमता हे तर होतेच, त्याचप्रमाणे काही यंत्रणात्मक दोषही त्या संकल्पनेत होते. आपण या यंत्रणात्मक अपुरेपणापेक्षा सध्याच्या काळी हिंसाराच्या व असत्याच्या परिणामक्षमतेवर जो विश्वास दिसून येतो तीच या अपयशास अधिक कारणीभूत आहे.

एके ठिकाणी म. गांधी म्हणतात, स्वराज्यापेक्षा अस्पृश्यता-निवारणाचा प्रश्न मला अधिक प्रथम क्रमांकाचा वाटतो. अशा प्रकारे हिंदू धर्मातील या तिरस्करणीय प्रथेचा समाचार घेतल्यानंतर तथाकथित अस्पृश्य वर्गालाही धिराचा सल्ला देतात. हिंसक किंवा सक्तीने तुम्ही अस्पृश्यता निर्मूलनाचा लढा लढाल तर तुमचा लढा यशस्वी होणार नाही. कारण अस्पृश्यतेसारखी अमानवीय प्रथा नष्ट करुन तुम्ही एक प्रकारे धर्मकार्यच करीत आहात. मग धर्मकार्य करताना हिंसक किंवा सैतानी मार्गाचा वापर करुन कसे चालेल? त्यामुळे सक्तीने किंवा पाशवी बळाने जर तुम्ही अस्पृश्यता निवारणाचा प्रयत्न कराल तर तुमचे ध्येय कधीच यशस्वी होणार नाही. निर्मूलनाकडे दुर्लक्ष करुन भारतीय स्वातंत्र्याची आस धरणे म्हणजे सूर्याकडे पाठ फिरवून त्याच्या दर्शनाची आस धरण्यासारखे होय. यंग इंडियामधील 1920 च्या एका लेखात ते म्हणतात, अस्पृश्यतेच्या पालनामुळे हिंदू स्वातंत्र्यास पात्र ठरणार नाही आणि स्वातंत्र्याची प्राप्ती झाली तरी त्याचे रक्षण त्यांना करता येणार नाही. अस्पृश्यांना गांधी हरिजन असे संबोधित, कारण आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत.

आपल्या रचनात्मक कार्यक्रम या छोटेखानी पुस्तकात त्यांनी व्यसनाधीतेसारख्या मानसिक व्याधीकडे लक्ष वेधले होते. दारु, अफू आणि मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम भारतीय समाजात दिसत होते. मानसिक आणि शारीरिक अशा दोन्ही पातळयांवर माणसाला पंगू करणाऱ्या या व्यसनाचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे, ही गांधीजीची तळमळ होती. समाजातील उच्चविदयाविभुषित डॉक्टर वर्गाने दारुबंदीच्या प्रचारासाठी नवनवीन प्रचारतंत्रे शोधून काढले पाहिजेत असे आव्हानही ते करतात. दारुबंदी करताना दारुडयावर किंवा गांजेकरांवर सक्ती करणेही गांधीजींना मान्य नाही. अहिंसेच्या सुनियोजित मार्गानेच व्यसनी व्यक्तीचे मतपरिवर्तन केले पाहिजे. सक्ती किंवा हिंसक मार्गाने व्यसनमुक्ती केली तर ती तात्कालिक ठरेल. संधी मिळताच ती व्यसनाधिनता पुन्हा डोके वर काढेल. म. गांधी म्हणतात निस्वार्थ हेतूने कार्य करणाऱ्या स्त्री व विद्यार्थी स्वयंसेवकांनी पुढाकार घेऊन प्रेमाने व्यसनाधीन असणाऱ्या व्यक्तींना व्यसनमुक्तीसाठी प्रवृत्त करावे. चितशुध्दीतून मिळणारा आनंद हा व्यसनातून मिळणाऱ्या आनंदापेक्षा कधीही श्रेष्ठ असतो, हे त्यांच्या मनावर बिंबवावे. अशा प्रकारे समाजाचे आरोग्य

संवर्धन करणारा व्यसनमुक्त समाज गांधींना अभिप्रेत होता. अशा प्रकारे समाजाचे आरोग्य संवर्धन करणारा व्यसनमुक्त समाजा गांधींना अभिप्रेत होता. या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी शूचिर्भूत मार्गात वापरले पाहिजेत, असा गांधींचा कटाक्ष होता.

गांधीजीच्या राज्याराज्याती समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर आधारित आहे. समाजात फक्त चार वग्र असतील ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र परंतु व्यक्तीचा वर्ग हा वंशपरंपरेनूसार न ठरविता तो तिच्या कार्यानुसारच ठरेल. गांधीजी एका वर्गातील व्यक्तीला आपल्या गुणानुसार दुसऱ्या वग्रत जाण्याची परवानगी देतात. तसेच निरनिराळया प्रकारची कार्ये करणाऱ्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा एकाच प्रकारचा असेल. कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसेल. भंग्याचे काम करणारी व्यक्ती ही डॉक्टरचे काम करणाऱ्या व्यक्ती इतकीच श्रेष्ठ असेल. तसेच त्यांच्या धंदयाचे वेतनही सारखेच असेल. प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुटूंबातील धंदा सुरु ठेवावा. गांधीजींची समाजरचना कार्यावर आधारलेली आहे.

गांधीजींनी जीवनाच्या सर्व अंगाचा विचार केला होता. शिक्षणाचा त्यांनी बारकाईने विचार केला होता. राष्ट्रीय विकासाला योग्य शिक्षणाची गरज आहे हे लक्षात घेऊन त्यानी आपला शैक्षणिक दृष्टीकोन मांडला त्यांचे असे मत होते की, पुस्तकी शिक्षण निरर्थक असते. त्याचबरोबर माणसाला व्यावहारिक शिक्षण मिळाले पाहिजे. त्याशिवाय जीवन यशस्वी होणार नाही. समृध्द मानवी जीवन हे नीतीमूल्यावर आधारलेली आहे. शिक्षणातून ज्ञान संपादन तर झालेच पाहिजे, पण चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व निर्माण झाले पाहिजे. शिक्षणातून राष्ट्रभक्ती निर्माण झाली पाहिजे. देशबांधवाविषयी प्रेम वाटले पाहिजे. आपले शिक्षण आपल्याच भाषेत झाले पाहिजे. त्यामुळे विषय सुलभतेने समजतो व भाषेचा अभिमान जागा होतो. जे पालक आपल्या मुलांना इंग्रजीच्या माध्यमातून शिकवतात ते आपल्या मुलाचे व समाजाचे नुकसान करतात.

स्वत:च्या कर्तृत्वाने इतिहास घडविणारे महापुरुष आपल्या मनासारखा इतिहास मात्र घडवू शकत नाहीत, हे ऐतिहासिक वास्तव कोणालाही नाकारता येणार नाही. याच उक्तीनुसार स्वत:च्या जीवनाने व मरणानेही इतिहास घडविणाऱ्या या महात्म्याच्या स्वप्नातला भारत मात्र अजून प्रत्यक्षात आलेला नाही. ज्या साम्राज्यवादाच्या दमन नीती विरुध्द गांधीनी लढा दिला, दुर्देवाने तीच वस्त्रे आज भारतातील प्रत्येक सरकार गणवेशासारख मिरविताना दिसते. ब्रिटिशाचे राज्य गेले पण आलेले स्वराज्य सुराज्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच दयावे लागेल. असे असले तरी वर्तमान स्थितीत याचा विचार करता भारतीय व्यवसथेपुढील समस्या जसे- भारतातील बहुतांश राजकीय पक्ष स्वार्थ स्वहित जोपासतात. राजकारणात जात, धर्म, वंश, प्रांत, भाषा यांचा गैरवापर होतो. ऑपरेशन दुर्योधन वाहीनीच्या माहितीनुसार जनतेतील काही लोक प्रतिनिधीना आपले प्रश्न संसदेत मांडण्यासाठी लाच देतात ही बाब म्हणजे जनतेच्या चारित्र्यावर संशय घेणारी आहे तसेच निवडणुकीच्या वेळी काही मतदार आपली मते विविध प्रलोभनाला बळी पडून उमेदवाराला देतात. एवढया खालच्या स्तरावर लोक जात असल्याचे चित्र दिसते. शहरीकरण झपाटयाने वाढतय तर खेडे भकास होताना दिसतात. दहशतवाद, प्रांतवाद, गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार, गरिबी, दारिद्रय, शोषण, पिळवणूक, विषमता, तरुणामधील व्यसनाधिनता, बेकारी, उदासिनता, समाजाचे झालेले नैतिक अध:पतन या पार्श्वभूमीवर भारतीय भूमी, जनता, समाज, संस्कृती विचारसरणी यास अनुसरुन असलेल्या म. गांधीजीच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, नैतिक या चौरसावर आधारीत स्वराज्याची स्वीकृती काळाची गरज आहे.

**संदर्भग्रंथसूची-**

1) Dhavan Gopinath – The Political Philosophy of Mahatma Gandhi.
2) बुध्ददेव भट्टाचार्य – गांधीज □टिटियूड टुवर्डस पोलिटीकल पॉवर आय.आय.ए.एस.
3) भोळे, भा.ल., आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत. पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर – जून 2003.
4) भारदे, बाळासाहेब – गांधी विचार-मीमांसा: पुणे गांधीस्मारक निधी प्रकाशन, 1993.
5) कुमारप्पा, भारतन (सक्षिप्तकार), संक्षिपत् आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद – 380014.
6) कुमार, अशोक, राजनीति विज्ञान, उपकार प्रकाशन, आगरा-2.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# म. गांधी यांच्या विचारांचे विविध पैलू

**प्रा.डॉ.सुदर्शन सदाशिव क्षेत्री**

इतिहास विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि.नांदेड

---

**प्रस्तावना :**

जगाच्या इतिहासात ज्या महामानवांचा उल्लेख केला जातो त्यामध्ये म.गांधी चे नाव आवर्जून घेतले जाते. महात्मा गांधीचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान जितके महत्वाचे आहे तितकेच त्यांचे विचारही महत्वाचे आहेत. म्हणून महात्मा गांधीचे व्यक्तीमत्व विविध पैलूने वैशिष्टयपूर्ण आहे. म.गांधी हे केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अनोखे व्यक्तीमत्व होते. कारण त्यांनी भारतासाठी दिलेल्या स्वातत्रय लढयात सत्याग्रहाचे नवीन तंत्र वापरले आणि ते साम्राज्यवादी शक्तीविरुध यशस्वीही झाले. अशा महामानवाच्या विचारात अनेक पैलू पाहावयास मिळतात. त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक प्रयोग केले. त्यात ते यशस्वीही झाले. कारण त्यांच्या विचाराची बैठक मजबूत होती. त्यांच्या विचाराचे जे विविध पैलू आहेत त्यात स्त्री विषयक विचार, मानवताधर्म, व्रत विचार, स्वच्छतेविषयक विचार, सत्याग्रह अशा कितीतरी विचारातून त्यांची वैचारिक बैठक मजबूत होत गेली आणि त्यातूनच त्यांचे इतरांपेक्षा वेगळे व्यक्तीमत्व उदयास आले.

**1. स्त्री विचार :**

म.गांधीने आपले विचार विविध विषयांवर मांडले. तसेच त्यांनी स्त्री विषयक विचार मांडून स्त्री-पुरुष समता प्रस्थापित झाली पाहिजे यावर अधिकचा भर दिलेला होता. कारण प्राचीन काळापासून पुरुषांनी स्त्रियांचे मोठया प्रमाणात वेगवेगळया पातळीवर ती शोषण करून स्त्रियांना दुबळे बनवले. पण स्त्री ही पुरुषापेक्षा दुबळी नसून ती शक्तीशाली आणि संयमी असल्याचे ते सांगतात, "ईश्वराने स्त्री ऱ्हदयात अपार व अमाप शक्ती ओतलेली आहे. प्रसूती वेदना सहन करणारी स्त्री जगात काय सहन करू शकणार नाही? त्या असहय वेदना सहन करुन मनुष्याला निर्माण करण्याची शक्ती ज्या स्त्री जातीला भगवंताने दिली आहे. त्याहून धैर्याची, हिंमतीची व प्रेमपूर्ण वात्स्ल्याची अधिक कठीण कसोटी क्वचितच पहावयास मिळते."[01] पुरुषाने स्त्रियांना कमी लेखू नये कारण निसर्गाने स्त्रियात अपार शक्ती प्रदान केलेली आहे असे म.गांधी सांगतात. पण स्वार्थी वृत्तीच्या पुरुषांनी मात्र स्त्रियांना अबला समजून तिचा आपल्या फायद्यासाठी हवा तसा वापर करुन घेतला. स्त्रियांना आपल्या बरोबरीचे स्थान दिले गेले नाही. म्हणून पिढ्यानपिढ्या तिचा विकास होवू शकला नाही. म्हणून म.गांधीजी म्हणतात, पुरुषांनी स्त्रियांना आपल्या बरोबरीचे स्थान देवून तिची उन्नती घडवून आणली पाहिजे. स्त्रियांची आजपर्यंत उन्नती का होवू शकली नाही याचे कारण ते पुढे सांगताना म्हणतात, "स्त्रियांना तुम्ही गुलाम आहोत असे शिकविले गेले आहे. आपला दर्जा पूरा ओळखून पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तव्य पार पाडण्यास स्त्रियांना समर्थ करणे हे काँग्रेसजनांचे काम आहे."[02] गांधीजींना स्त्रियांच्या संदर्भात एकच म्हणावयाचे होते. स्त्री ही पुरुषापेक्षा कुठेही कमी नाही. उलट पुरुषाच्या तुलनेत तिच्याकडे अधिक संयम, प्रेम, शक्ती, वात्स्ल्य, धैर्य या गोष्टी पहावयास मिळतात. म्हणून पुरूषांनी स्त्रियांना आपल्यापेक्षा कमी लेखू नये. स्त्रियांवरील प्रभूत्व संपुष्टात आणावे कारण स्त्री व पुरूष या दोघांनी मिळून एक पूर्ण वस्तू ईश्वराने निर्माण केली आहे. निसर्गाच्या योजनेत दोघे समान आहेत असे म.गांधी सांगतात.

**3. मानवता धर्म :**

म.गांधीने मानवता धर्माच्या बाबतीतही अत्यंत सकोल तितकेच महत्वाचे विचार मांडलेले आहेत. म.गांधीना भारत देशात अनेक धर्माचे, जातीचे, वर्गाचे लोक व त्यांच्यात असलेली विषमता पहावयास मिळाली. त्यामुळे भारतीय जनतेतील राष्ट्रप्रेम कमी असल्याचे लक्षात आले. भारतीय जनतेत असणारा भेद नष्ट करण्यासाठी त्यांनी मानवता धर्माची शिकवणूक भारतीयांना देवून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. म.गांधी यांच्या विचारात मूलाधार आहे. धर्म विचार, धर्म म्हणजे सत्य स्वरूप परमेश्वराचे साक्षात दर्शन करून देणारा तो धर्म असे म.गांधी धर्माची व्याख्या करताना दिसतात. पुढे जावून ते म्हणतात, "जो धर्म हिंदू धर्माच्या ही वर आहे. जो माणसाचा स्वभाव बदलून टाकतो. जो अंतरातील सत्याशी पक्की गाठ घालतो आणि अंत:करण नित्यशुद्ध करून राहतो तो धर्म मनुष्याच्या प्रकृतीतील जे शाश्वत्व आहे. आत्माच्या पूर्णाभिव्यक्तीपुढे ज्यास कसलीही मातबरी वाटत नाही, आत्मदर्शन न झाल्यास आणि जगन्निया त्यांचे ज्ञान व त्यामधील संबंध

आत्मप्रतित न झाल्यास बेचैन करणारा तो धर्म."[03] म.गांधीजीने धर्माच्या संदर्भात सांगितलेले विचार सर्व धर्माच्या, जातीच्या आणि वर्गाच्या लोकांना आत्मचिंतन करण्यास भाग पाडतात. त्यांच्या मानवता धर्मविषयक विचारात एकच गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे भारत देशात अनेक जाती धर्माचे लोक राहतात पण त्यांच्यात एकवाक्यता, समानता दिसून येत नाही. उलट भारतीय जनतेत कमालीची विषमता दिसून येते. ही वृती नष्ट करण्यासाठी म.गांधीजीने मानवता धर्माची कास धरून मानव जातीतील विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पुढे ते म्हणतात, "प्रत्येक व्यक्तीने आपापसात निर्भयपणे पण प्रेमळतेने निरहंकारी वृत्तीने पण ममत्वाने, अनासक्तीवृत्तीने पण कर्ममय होवून वागल्यास धर्म, जाती, उच्च-निचता हे भेदभाव नाहीसे होतील आणि सर्वत्र कल्याणकारी समाज निर्माण होईल."[04] मानवताधर्म या विचाराच्या माध्यमातून मानवा मानवात प्रेम वाढविण्याचा प्रयत्न केला. म.गांधी हे प्रयोगशील होते म्हणून त्यांनी सर्व धर्माच्या प्रार्थना एकाच व्यासपीठावरून केल्या. तसेच त्यांनी सत्याग्रहाश्रमाची स्थापना करून जातीभेद, धर्मभेद, पेशाभेद, स्त्री-पुरुष भेद इत्यादी भेद गौण समजून एक नवीन समाज रचना करण्याचे व त्याद्वारे मानवता धर्मप्रसाराचे कार्य केले.

**4. व्रत विचार :**

म.गांधीजीच्या विविध विचार पैलू मधला हा एक पैलू आपणास पहावयास मिळतो. म.गांधीने आपल्या जिवनात अनेक प्रयोग करून स्वत:चे अनेकापेक्षा वेगळे व्यक्तीमत्व निर्माण केले होते. मानवी जीवनात वृत्त याचा अर्थ अढळ असा निश्चय होय. एखादा विचार अंगीकारला की, मग आपले काहीही झाले तरी चालेल पण विचारात बदल होता कामा नये, असे त्यांना वाटत असे. म.गांधीनी वृत्तविचार हा शरीर आणि मन याच्यावर संपूर्ण नियंत्रण राखण्याच्या उदेशाने अंगीकारला. आपल्या बरोबर आपल्या अनुयायांनाही आदेश दिला. वृत्ताच्या संदर्भात ते म्हणतात, "एखादे वृत्त घेणे हे मानसिक दौर्बल्याचे लक्षण नाही. उलट ते स्वत:च्या सामर्थ्याचे लक्षण आहे. तसेच वृत्त हे सौम्य आहे किंवा कडक आहे. यावर त्याचे महत्त्व अवलंबून नाही तर एकदा घेतलेले वृत्त कोणत्याही परिस्थितीत न मोडण्याच्या निर्धारातच त्याची खरी थोरवी आहे."[05] मानवी जीवनात व्रत विचाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून म.गांधीनी आपल्या जीवनात असे अनेक प्रयोग केलेले दिसतात. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी अहिंसा या तत्वाचा अंगीकार केलेला होता. असहकार चळवळ यशस्वी होत चालली होती. पण तिला चौरीचौरा या ठिकाणी घडलेल्या घटनेमुळे (हिंसा) गालबोट लागले म्हणून म.गांधीजीने ही चळवळ तहकूब केली. अनेकांना म.गांधीचे हे विचार पटले नाही. पण म.गांधीजींनी कोणाचेही ऐकलेले नाही. कारण ही चळवळ सुरू होण्यापूर्वी त्यांनी अहिंसेचे वृत्त घेतलेले होते. अशा प्रकारे म.गांधीजींनी आपल्या जीवनात वृत्त विचाराला त्यांनी अनन्यसाधारण महत्त्व दिल्याचे दिसते.

**5. स्वच्छते विषयक विचार:**

म.गांधीजीने आपल्या जीवनात स्वच्छतेला अनन्य साधारण असे महत्त्व दिलेले होते. ते स्वच्छतेचे पुजारी होते. आयुष्यभर त्यांनी स्वच्छता जपली व पूर्ण भारतवासीयांना देखील स्वच्छतेचे महत्त्व सांगत राहिले. एवढेच नाही तर स्वच्छतेचे काम करणाऱ्यांना सन्मान प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले. म.गांधी स्वच्छतेच्या संदर्भात ते नेहमी आग्रही असत. स्वच्छतेच्या ठिकाणी ईश्वराचा वास असतो असे ते मानत असत.

म.गांधी जिथे कुठे जात त्या ठिकाणचा परिसर स्वच्छ करीत असत आणि तेथील लोकांमध्येही स्वच्छते विषयक आपले मत मांडून त्यांच्यात जागृती घडून आणण्याचा कसोशीने प्रयत्न करीत. म.गांधीजी जेव्हा विदेशात विशेषत: दक्षिण अफ्रिकेत गेले होते. त्या दिवसात ते तेथील भारतीयांना स्वच्छतेच्या संदर्भात जागरूक करीत राहिले. स्वच्छतचे महत्त्व म.गांधीच्या मनावर एका घटनेमुळे बिंबले गेले. तेव्हापासून ते त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत स्वच्छतेचा पुरस्कार करीत राहिले. ती घटना पुढील संदर्भातून पहावयास मिळते. "1885 मध्ये ब्रिटिश सरकारने दक्षिण अफ्रिकेतील भारतीय आणि आशियायी व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यापारी ठिकाणांचा परिसर अस्वच्छ ठेवल्याबद्दल ताकीद दिली होती."[06] ही गोष्ट गांधीजींच्या मनावर बिंबली तेव्हापासून त्यांनी स्वच्छतेच्या संदर्भात जागरूक झाले व इतरांनाही जागरूक केले.

**6. सत्याग्रह :**

म.गांधीजीने आपल्या जीवनात अनेक प्रयोग केले. त्यातला एक प्रयोग म्हणजे सत्याग्रह. आपल्या संपूर्ण जीवनाची घडण सत्याग्रही निष्ठेवर उभारणे, वाटेल तेवढी संकटे आली तरी ज्याला आपण सत्य समजतो त्यावर टिकून राहणे यालाच सत्याग्रह

असे म्हणतात. मग सत्यासाठी अनेक कष्ट सहन करावे लागते आणि हे कष्ट करत आहोत याचे आपल्याला भानसुद्धा नसले पाहिजे. म.गांधीजीने या प्रयोगाचा उपयोग समाजातील समस्या आणि प्रश्न सोडविण्यासाठी केला. इ.स.1916 मध्ये म.गांधीने लिजी बेटात (प्रशांत महासागर) सत्याग्रहाचा पहिला प्रयोग केला. या प्रयोगात मजूरांचा प्रश्न सोडविण्यात ते यशस्वी झाले. यानंतर बिहार प्रांतातील चंपराण्यातील मोतीहारा येथील निळ उत्पादकांच्या प्रश्नावरून म.गांधीनी लढा दिला. यातही ते यशस्वी झाले. त्यानंतर अहमदाबाद या ठिकाणी गिरणी कामगारांचा प्रश्न सोडविला. खिलाफत आंदोलन 1919, खेडा सत्याग्रह असे कितीतरी सत्याग्रहाचे प्रयोग करून ते यशस्वी झालेले दिसतात. त्याचे कारण "सत्याग्रहाच्या लढाईत एका पक्षाची हार होते आणि दुसऱ्या पक्षाची जीत होते. उलट सत्याग्रहात दोन्ही पक्षाची जीतच होते. लढाईत एकमेकांची मने एकमेकां विरूदध होतात, तर सत्याग्रहात एकमेकांची मने एकमेकांशी जुळती होतात. सत्याग्रहात एकमेकांच्या बुद्धीचा पडदा खुलतो."[07] थोडक्यात सत्याग्रहाची शक्ती तितिक्षा नाही. सत्याग्रहात आपल्याला सहन करावे लागते. सत्याग्रहाच्या मुळाशी प्रेम असते, सत्याग्रह हे नित्य विकसित होणारे शास्त्र आहे असे म.गांधीजी म्हणूनच. म.गांधीजीच्या विचाराची आज वर्तमानकाळात फार आवश्यकता आहे. या विचाराची कास धरून जीवन जागण्याचा प्रयत्न केला तर प्रत्येकाचे जीवन शिस्त आणि सुखी झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :**

1. त्र्यं.शि.भारदे (प्रकाशन), गांधी विचार दर्शन- स्त्री जीवन खंड-06, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधीभवन, पुणे, तृतीय आवृत्ती, डिसेंबर 1988, पृ.क्र.14.
2. कित्ता, पृ.क्र.18.
3. अनंतराव जगताप, 'इथे मराठीचिये नगरी' गांधीजी उषा ज्योती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, सप्टेंबर 1976, पृ.क्र.07.
4. कित्ता, पृ.क्र.07.
5. पंडित नलिनी, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, 1983, पृ.क्र.67.
6. ब्रिजेश सिंह (मुख्य संपादक), लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, अंक 04, ऑक्टोबर 2019, पृ.क्र.17.
7. शाह कान्ताबाई (संपादक), गांधी : जसे पाहिले – जाणले, ग्रामसेवा मंडळ परिधान प्रकाशन, पवनाई, वर्धा, तिसरी आवृत्ती, 1988, पृ.क्र.61.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# महात्मा गांधी यांचा ग्रामिण विकास दृष्टिकोनः एक चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ.विजय एन.भोपाळे**

संशोधक, सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि.परभणी

---

**प्रस्तावना :**

भारताच्या स्वातंत्र्यात सर्वात अग्रणी असे नाव म्हणजे महात्मा गांधी होय. महात्मा गांधी यांचे योगदान हे सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक क्षेत्राबरोबर आर्थिक क्षेत्रात देखील पहावयास मिळते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत जे सत्याग्रह, आंदोलनें व लिखाण केले यामध्येच त्यांचे आर्थिक विचार पेरलेले दिसून येतात. महात्मा गांधी यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास करुन आर्थिक सिंध्दात प्रतिपादित केले नाहीत. त्यानी वेळोवेळी जी आर्थिक भूमिका घेतली किंवा मांडली हेच त्यांचे आर्थिक विचार म्हणून नावारुपास आले. त्यांच्यावर टॉलस्टॉय, योसे, क्रोपोटाकिन, रस्कीन, गोखले यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. सर्वोदय, स्वदेशी, ग्रामोद्योग, विश्वस्तवाद इत्यादी तत्त्वामध्ये त्यांचे आर्थिक विचार सापडतात.

गांधीजीच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी आपल्या देशातील विद्यापीठात स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आल्याचे दिसून येते. जसे डिपार्टमेंट ऑफ गांधीयन थॅाट, भागलपूर, विद्यापीठ भागलपरु(बिहार) डिपार्टमेंट ऑफ गांधीयन स्टडीज पंजाब विद्यापीठ चंदीगड़(पंजाब) तसेच वाराणसी येथील गांधीयन इंस्टीट्युट ऑफ स्टडीज नवी दिल्ली येथील गांधी स्मृती आणि दर्शन समिती येथे देखील त्यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केला जातो.

**ग्रामिण विकास आणि भारतीय जीवन**

भारतात इंग्रज येण्यापुर्वी खेडी ही स्वयंपुर्ण होती. ग्रामीण भागातील जीवन हे आल्हाददायक व सुखकर होते. उत्पादन, विनिमय, वितरण व उपभोग या उत्पादन प्रक्रियेच्या क्रिया हया ग्रामिण भागातच घडून येत असत. प्रत्येक खेडी स्वयंपुर्ण होती. त्यामुळे सर्वांना रोजगार प्राप्त होता. बाजारपेठेत सर्वच वस्तूचे उत्पादन होत असल्यामुळे सर्वांनाच सर्व वस्तूचा उपभोग घेण्यासाठी दुसऱ्या उत्पादकांचा उपभोगकर्ता म्हणून जावे लागे. त्यामुळे अत्युच्च उत्पादनपातळी पहावयास मिळत नसे. ग्रामीण उद्योग हे भरभराटीस आलेले होते. त्यामुळे खेडी समृध्द होती. परंतु इंग्रज राजवटीच्या आगमनानंतर म्हणजेच आधुनिक युगाचा प्रारंभ झाल्यानंतर खेडयाचे चित्र संपूर्ण बदलून गेले. खेडयांची स्वयंपुर्णता नष्ट होऊन ती शहरांवर अवलंबून राहू लागली. ग्रामिण भाग फक्त कच्चा माल तयार करण्याचे केंद्र बनले. पक्का माल हा आधुनिकतेच्या सहाय्याने शहरात तयार होऊ लागला. तोच पक्का माल अधिक किंमतीला खेडयागावांत विकला जाऊ लागला. खेडयातील रोजगार कमी झाला. ग्रामिण भागातील संपत्तीचे शहरी भागात केंद्रीकरण झाले. ग्रामोद्योग नष्ट झाले त्यामुळे कारागीरांचे कौशल्य देखील कमी झाले याचा परिपाक खेडयातील जनता बेकारी, दारिद्रय, उपासमार अशा समस्यांच्या विळख्यात सापडली. उत्तरोत्तर ग्रामिण भारताची स्थिती नाजूक होत गेली खेडी ओस पडू लागली, शहरीकरण वाढत गेले, वाढत्या शहरीकरणामुळे विविध समस्या वाढू लागल्या. नितीमय जीवनाचा ऱ्हास होऊ लागला अशा परिस्थितीत ग्रामीण भारताचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. कृषी संपन्नता आली पाहिजे. उद्योग विकेंद्रीत झाली पाहिजे खेडी समृध्द व आदर्श झाली पाहिजे यासाठी महात्मा गांधी यांनी 'खेडयाकडे परत चला'. असा संदेश दिला. ग्रामस्वराज्य, सर्वोदय, विश्वस्तवाद व ग्रामोद्योगांच्या सहाय्याने ग्रामिण जीवन विकसित झाले पाहिजे यासाठी महात्मा गांधी यांनी जे विचार मांडले ते ग्रामिण विकासासाठी प्रेरणादायक आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार अभ्यासणे.
२. महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना समजूण घेण.
३. महात्मा गांधी यांचा ग्रामिण विकास दृष्टीकोन अभ्यासणे.
४. साप्रंत स्थितीत गांधीजीचे विचार ग्रामिण विकासासाठी आवश्यक आहेत हे पाहणे.
५. रामराज्य ही संकल्पना समजूण घेणे.

**महात्मा गांधी यांचा ग्रामिण विकास दृष्टिकोन**

भारत हा देश खेडयांनी बनलेला असल्यामुळे खेडयांचा विकास झाल्याखेरीज भारताचा विकास होणार नाही. महात्मा गांधीनी मांडलेल्या ग्रामस्वराज्याच्या किंवा ग्रामराज्याच्या तत्त्वज्ञानामध्ये खेडयांच्या सर्वांगीण विकासाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले. देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वयंपूर्ण व शांतताप्रिय झाले तर बाहेरील सत्तेची त्याला काहीच आवश्यकता राहणार नाही. गांधीजींची अशी अढळ श्रध्दा होती का राजसत्ता, अर्थसत्ता व समाजसत्ता यांचे प्रत्येक गावात एकमत झाले तर ग्रामराज्यच नव्हे तर रामराज्य देखील निर्माण होऊ शकेल. खेडी ही केवळ राजकिय सत्तेची केंद्रे न बनता ती अर्थकारणाची व समाजकारणाची देखील केंद्रे बनली पाहिजेत.

**ग्रामीण विकासाठी आवश्यक बाबी.**

**१. शिक्षण :**

भारताचा विकास होण्यासाठी ग्रामिण भागाचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामिण भागात शिक्षणाची सोय असावी. स्त्रियांनादेखील शिक्षण उपलब्ध व्हावे. शिक्षणातूनच विकास शक्य आहे. शिक्षण हे व्यवसायाभिमुख व नित्तीमत्ता वाढवणारे असावे असे त्यांचे मत होते. म. गांधी आणि त्यांच्या स्वयंसेवकानी ग्रामिण भागात शिक्षणासाठी स्वतः प्रयत्न केले आहेत.

**२. आरोग्य :**

ग्रामिण भागातील जनतेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी चांगले दवाखाने असावेत. खेळाची मैदानी असावित. विशेषतः स्वच्छता असणे गरजेचे आहे. जोहान्सबर्ग येथे त्यांच्या वास्तव्यात स्वच्छते अभावी भारतीय (हिंदी ) लोकांना हीनतेची वागणूक देताना म. गांधीनी स्वतः सहन केलेली आहे.

**३. पायाभूत सुविधा :**

ग्रामिण भागात स्वच्छ रस्ते, पिण्याचे पाणी, दिवाबत्ती, सार्वजनिक हॉल, सार्वजनिक नाटयगृह, करमणूकीच्या सोयी, इत्यादी प्रकारच्या पायाभूत सुविधा ग्रामिण भागात उपलबध झाल्या पाहिजेत जेणे करुन ग्रामिण विकासाला चालना मिळेल.

**४. लोकशाहीपध्दतीचा कारभार :**

ग्रामस्वराज्य या संकल्पनेत गांधीजीनी लोकशाहीपध्दतीचा स्विकार केला आहे. पंचायतीने लोकशाहीपध्दतीने कारभार करावा. पंचायतीला कायदे करण्याचा, न्यायदान करण्याचा अधिकार असावा. सर्वांना त्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**५. अस्पृश्यता नसावी :**

म.गांधी यांनी ग्रामिण भागात अस्पृश्यता पाळणे हा मोठा दोष आहे हे स्पष्ट केले. अस्पृश्यता ही ग्रामिण विकासासाठी धोकादायक आहे.

**६. ग्रामोद्योगाना चालना :**

पूर्वीच्या काळी खेडी स्वयंपुर्ण होती ती स्वयंपुर्ण होण्यासाठी म.गांधीनी खेडयांचे पुनरुज्जीवन होणे आवश्यक आहे असे म्हटले आहे. स्वदेशी मालाचा स्विकार करुन जास्तीत जास्त ग्रामोद्योग स्थापन व्हावेत. यासाठी त्यांनी चरखा हे ज्वलंत उदाहरण दिले आहे. म्हणजेच खेडयांचा विकास होण्यासाठी ग्रामोद्योगांना चालना देणे आवश्यक आहे.

**७. दारिद्रय निर्मूलन :**

ग्रामिण भागात दारिद्रयाचे प्रमाण हे जास्त आहे. त्यामुळे दारिद्रय नाहीसे करण्यासाठी सहकारी तत्त्वावर उद्योग उभारणे आवश्यक आहे. या उद्योगातून मिळणारा नफा सर्वांना प्राप्त झाला पाहिजे. जास्तीची संपत्ती जमा करु नये अशा संपत्तीचे धनिकांनी विश्वस्त होणे आवश्यक आहे. ज्याचा उपयोग गरिबी दूर करण्यास होईल.

थोडक्यात असे म्हणता येईल की, महात्मा गांधी यांच्या ग्रामिण विकास दृष्टिकोनात ग्रामराज्याची कल्पना समाविष्ट झालेली आहे. एक प्रकारे ग्रामिण भागाची विकास व या विकासातून पर्यावरण पशू- पक्षी, समग्र मानव जात सुखी असली पाहिजे. ज्यामध्ये अहिंसा, सत्य, प्रेम या बाबी असल्या पाहिजेत यालाच महात्मा गांधी यांनी रामराज्य असे म्हटले आहे.

**म. गांधी यांचा विकास दृष्टिकोन आणि आजची सद्यस्थिती**

महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य या संकल्पनेत ग्रामिण भारताविषयीचा विकास दृष्टिकोन मांडला आहे. आजही स्वातंत्र्यप्राप्ती नंतरदेखील ५२% जनता ही खेडयात वास्तव्य करत आहे. आजही त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेतीव्यवसायाकडे पाहिले जाते. आज ही ५५% जनता ही कृषीवर अवलंबून आहे. ग्रामोद्योग जवळपास कमी झाले आहेत. म्हणजेच कच्चा माल पुरवठा करणारा भाग म्हणून ग्रामिण भागाकडे पाहिले जातो हाच कच्चा माल वापरुन तोच जास्त किंमतीला विकणे म्हणजे एकप्रकारचे शोषण आहे. उद्योगांचे काही शहरांपुरते केंद्रीकरण झाले आहे याचा परिणाम रोजगारांवर झालेला आहे. असमतोल विकास होऊन भारताचे ग्रामिण भारत व शहरी भारत म्हणजेच विकसित भारत व अविकसित भारत असे विभाजन झाले आहे. ग्रामिण भागात पायाभूत सुविधा आजतागायत चुकिच्या नियोजनामुळे पोहोचल्या नाहित. त्याचा परिणाम खेडे ही स्वयंपुर्ण न राहता ती शहरांवरती विसंबून आहेत. त्यामुळे श्रीमंत आणि गरिब यातील दरी जास्तच वाढत आहे. भांडवलाचे मोजक्याच व्यक्तीकडे संचयन होत आहे. त्यामुळे ग्रामिण विकासाला खिळ बसलेली दिसून येते.

थोडक्यात आजही महात्मा गांधी यांचे विचार महत्वपूर्ण आहेत म.गांधी यांनी हे दाखवून दिले आहे की खरा भारत हा खेडयातच आहे. त्यामुळे खेडे समृध्द व स्वयंपुर्ण झाली पाहिजेत. कोणत्याही विकसित राष्ट्रांचा विकासाचा क्रम पाहिला असता ग्रामिण भागांशी संबंधित कृषी, कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांचा विकास अगोदर होऊन नंतर ते राष्ट्र प्रगतशिल बनले आहे. म्हणून आजदेखील खेडी स्वयंपुर्ण म्हणजेच विकसित झाली तर भारताचा विकास देखील प्रेरणादायक झालेला दिसून येईल.

**संदर्भसूचि :**

सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
आर्थिक विचारांचा इतिहास - डॉ.बी.डी.इंगळे
बँकिगची तत्त्वे व ग्रामिण विकास - मोहन सराफ आचार्य
इंटरनेट -

# महात्मा गांधीजी यांचे विचार : काहीं अनुकरणीय पैलू

**प्रा. चोंडीकर प्रकाश नीळकंठराव**
**ग्रंथपाल, शाहिर अण्णा भाऊ साठे महाविद्यालय, मुखेड जिल्हा- नांदेड**

---

आधुनिक भारतातील महान नेत्यांमध्ये महात्मा गांधींचे नाव घेणे क्रमप्राप्त ठरते. गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. गांधीजी हे साहित्यातील एक पात्र नसून ऐतिहासिक तथ्य आहे. त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर, 1869 गुजरात मध्ये पोरबंदर येथे झाला होता. त्यांचा मृत्यु 30 जानेवारी, 1948 रोजी दिल्ली येथे झाला, तरी गांधीजी भारताच्या इतिहासात अमर राहिले. एक भारतीय वकील, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ता व लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध चलावलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे ते एक प्रमुख नेते होते. ते भारताचे राष्ट्रपिता म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या सार्वजानिक जीवनाला सोडून भारताच्या आधुनिक इतिहास पूर्णपणे समजुन घेता येत नाही. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ गांधीजी शिवाय पूर्ण होत नाही. प्रस्तुत लेखनातमहात्मा गांधीजी यांचे विचार : काहीं अनुकरणीय पैलूया अनुषंगानेअभ्यास करण्यात आलेला आहे.

गांधीजींचे व्यक्तिमत्व हे अनेक अंगी होते. त्यांनी एकाच वेळी संत, राजकारणी, समाजसुधारक अशी भूमिका बजावली. संताप्रमाने त्यांनी व्यक्तीच्या नैतिक पुनरुत्थानला महत्व दिले. देशातील लक्षावधी लोकांना इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळवून देणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होतेच. त्याशिवाय त्यांनी देशातील अनेक वाईट चालीरीती पासून मानवी जीवनाची सुटका करण्याचा प्रयत्न केला. गांधीजींनी ब्रिटिश सम्राज्याविरुद्ध एक अभूतपूर्व लढाई लढली. त्यांच्या लढाई मध्ये सामान्य जनसमुदाय मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

ब्रिटिशांच्या एवढ्या बलाढ्य सम्राज्याविरुद्ध लढाई करून रक्तविहीन राज्यक्रांती घडवून आणणे ही काही साधारण बाब नव्हती. त्यामुळेच त्यांना एवढी लोकप्रियता प्राप्त झालेली होती. त्यांचे जीवन पावलो-पावली मार्गदर्शक ठरणारे आहे यात काहीं शंका नाही.

त्यांनी भारतातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर ब्यारिस्टरची पदवी घेण्यासाठी इंग्लंडला गले. तेथून कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबई मध्ये वकिली सुरु केली होती. तो व्यवसाय त्यांना काही जमला नाही. पुढे ते कायद्याच्या कमाकारिता दक्षिण अफ्रिकेला गेले. तेथे ते गिरमिटिया म्हणून ओळखले जायचे, आणि तेथे हिंदी लोकांवर होणारा आन्याय त्यांनी पाहिला, अनुभवला तेंव्हा त्यांच्या अंतरंगात अन्यायाविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य जागृत झाले. तिथेच त्यांना अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह करण्याचे सुचले. आणि त्यांनी हे हत्यार प्रथमत: दक्षिण अफ्रिकेतच वापरले.पुढे हेच हत्यार भारताला स्वातंत्र्य प्राप्ती करीता वापरले. अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी 'अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह' हे हत्यार सदैव अनुकरणीय राहिल यात कहीं शंका नाही.

गांधींच्या सत्याग्रहास इंग्रज सरकार घाबरत असे. त्यांना भारताचे राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते. रविन्द्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम ही 'राष्ट्रपिता' उपाधिगांधिजींना दिली होती.त्यांना दक्षिण अफ्रिकेतील वंशभेदाचा अनुभव आलाच होता.वंश भेद आणि वर्ण भेद मानवते साठी नकोच गांधींचाहा विचार सदैव अनुकरणीयच रहील. सर्व मानव सामान आहेत असा त्यांचा आग्रह होता.

गांधीजींचे लेखन कार्य सुद्धा अतिशय चांगले होते. त्यांनी अनेक पुस्तकांमधून अनेक प्रकारचे विचार मांडले आहेत. त्यात हिंद स्वराज्य, गांधीजींची संक्षिप्त आत्मकथा, गांधी विचार दर्शन: अहिंसाविचार, गांधी विचार दर्शन: राजकारण, गांधी विचार दर्षन: सत्याग्रह प्रयोग, गांधी विचार दर्शन: सत्याग्रह विचार, गांधी विचार दर्शन: सत्याग्रहाची जन्मकथा, गांधी विचार दर्शन: हरिजन, नैतिक धर्म, माझ्या स्वप्नांतील भारत इत्यादि ग्रंथाची त्यांनी निर्मिती केली.

इतरांनी ही गांधींवर अनेक पुस्तके लिहिली. महात्मा गांधीवर अनेक चित्रपट निघाली आहेत.भारतीय स्वातंत्र्य लढ्याकरता गांधिजींनी जिवाचे रान केले. १९१४ मध्ये ते दक्षिण अफ्रिकेतुन भारतात परतले.

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139


१९१५ पासून भारतीय राजकारणात लक्ष्य देवू लागले.१९१७ मध्ये त्यांनी चंपारणयेथील शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन केले. पुढे १९२०-२२ मध्ये अहिंसेच्या मार्गानेअसहकार आंदोलनसुरु केले.

१९३०-३२ दरम्यान दांडी येथील मीठाचा सत्याग्रह मिठाचा जाचक कर कमी करण्यासाठी केला. आणि सविनयकायदेभंगाची चळवळ हाती घेतली. १९४०-४२ दरम्यान व्यक्तिगत सत्याग्रह केला. आणि १९४२ मध्य छोडो भारत आंदोलन सुरु केले.पृथ्वी आपल्या प्रत्येकाची गरज भागवू शकते, पण कोणा एकाची हाव नाही' असेत्यांनी त्यांच्या 'माझे सत्याचे प्रयोग' या पुस्तकात नमूद केले आहे.

संस्कृतीच्या नावाखाली पुराणमतवादीरुढीवाद आणि परंपरा यांना कवटाळून बसणाऱ्यांना गांधीजींनी आपल्या वर्तनातूनवेळोवेळी दाखवून दिले.गांधीजींच्या मार्गाने चालण्याचा आव आणून नथुरामला कवटाळता येणार नाही, अशी दुटप्पी भूमिका असूच नये.जगासमोर आज दोन मुख्य आव्हाने आहेत. त्यात एक दहशतवादाचे आणि दुसरे वातावरणीयबदलांचे. या समस्यांमुळेच विश्वात एक प्रकारची अशांतता दिसू लागली आहे आणि यासमस्यां सोडवण्यासाठी महात्मा गांधीचे विचार व कार्य मार्गदर्शन करतील यात कहीं शंका उरत नाही.

पण आज आधुनिक सभ्यतेच्या नावाखाली लोक भौतिक चंगळवादाकडे झुकलेले दिसतात. गांधीजींची साधी राहणी आणि उच्च विचार होते. 'मज़बूरी का नाम महात्मा गांधी' असे नसून 'मजबूती का नाम महात्मा गांधी' आहे हे चिंतनाअंतीसमजुन घेतले तर सामान्य जिवनातील समस्यां गांधी विचाराने सोडवता येऊ शकतात हे ध्यानात येते.

गांधीजींचे विचार व कार्य, करनी व कथनी यात आंतर नव्हतेच आणि असेलच तर ते नगण्य होते असेच म्हणावे लागेल. पैसा आणि भौतिक साधने यांच्या हव्यासापोटी पर्यावरणीय संतुलन ढासळत चाललेला आहे. अशा वेळी गांधीजींचे विचारच पर्यावरण व मानवतेला वाचवू शकतील यात काही शंका नाही.

### संदर्भ ग्रंथ


1. डॉ. ओम प्रकाश गाबा, *राजनीति सिद्दांत की रूपरेखा,* मयूर पपेरबॉक्स, नोयडा, 6 वा नव-निर्मित संस्करण : 2004.
2. महात्मा गांधी, '*दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास*', अनुवादक,पंढरीनाथ सावंत, मनोविकास प्रकाशन, पुणे, 2014.
3. गांधीजी, हिन्द स्वराज्य, अनुवादक, अम्रतलाल ठाकोरदास नाणावटी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पुनर्मुद्रण,2009.
4. मोहनदास करमचंद गांधी, '*माझ्या स्वप्नातील भारत*', साकेत प्रकाशन, पुणे, 2009.
5. महात्मा गांधी, '*दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास*', अनुवादक,पंढरीनाथ सावंत, मनोविकास प्रकाशन, पुणे, 2014.
6. जे. आर. कोकंडाकर, '*महात्मा गांधी और उनकी विचारधारा*', श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, 2009.
7. S. V. Prabhanath (edtor), '*Gandhi Today*', Serials Publications, New Delhi, 2010.
8. मोहनदास करमचंद गांधी, '*मंगल प्रभात*'', अनुवादक, अम्रतलाल ठाकोरदास नाणावटी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पुनर्मुद्रण, 2009.
9. माणक जैन, '*गांधी के विचारोंकी २१ वी सदी में प्रासंगिकता*', आदि पब्लिकेशन, शांती नगर, जयपुर, 2010, अन्वयार्थ प्रकाशन, गांधी अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
10. M. K. Gandhi, '*Village Industries*', Navjivan Publishing House, Ahamadabad, 2004.
11. Ranald J. Terehek, '*Gandhi Struggling for Autonomy*', Vistaar Publication, New Delhi, 2002.
12. B. N. Roy, '*Reading Gandhi*', Gandhi Book Centre, Bombay Sarvoday Mandal Authorpress, Mumbai.
13. उपासना पाण्डेय, '*उत्तर आधुनिकता और गांधी*', रावत पब्लिकेशन, जयपुर, 2007.
14. मोहनदास करमचंद गांधी, '*सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन*', अनुवाद, सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन, रिया पब्लिकेशन, कोल्हापुर, 2013.
15. श्रीराम निकम, *गांधी आंबेडकर : अस्पृश्य मुक्ती संघर्ष*',लोकवांगमय गृह प्रकाशन, मुंबई, 2008.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# मराठी साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव

डॉ. संभाजी शिवाजी जाधव

मराठी विभाग प्रमुख, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविदयालय, उमरीए ता. उमरी जि. नांदेड

---

महात्मा गांधी हे आधुनिक काळात प्रभावी व्यक्ती होवुन गेले. त्यांची विचार प्रणाली आज गांधीवाद म्हणून एक स्वतंत्र विचार पध्दती रुढ झाली आहे. त्यांचे अनुयायी गांधीवादाला जीवन पध्दती मानतात. तरी पण म. गांधीनी केलेल्या विपूल लेखनात त्यांनी प्रतिपादलेली एक स्वतंत्रविचारधारा असल्याचे दिसून येते. त्यांच्या विचारांचा प्रभाव आधुनिक काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रावर जसा पडलेला आहे. तसाच साहित्य आणि साहित्यिक यांच्यावर ही पडल्याचे दिसून येते. या प्रभावास गेल्या शंभर वर्षात मराठी साहित्याने कसा प्रतिसाददिला तो यातून मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे. गांधीजींच्या जीवनमानाचा खोल व व्यापक प्रभाव मराठी जनमानसावर झाला आहे. गेली एक शतक जगातील सर्वाधिक चर्चित व्यक्तिमत्व हे महात्मा गांधीजींचे राहिले आहे. आईनस्टाईन गांधीबददल असेही म्हणाले की, "जे कार्य भगवान बुध्दारने सुरु केले, ते गांधीनी पूर्णत्वास नेले."[१] गांधी हत्येनंतर एक खिश्चन तत्वज्ञ म्हणाला, "येशू खिस्तानंतरचा एकमेव खिश्चन आज मृत्युमुखी पडला."[२] बुध्द खिस्ताशी होणारी ही तुलना पाहिल्या नंतर महात्मा गांधीचे मोठेपण आपल्या लक्षात येते. अशा प्रभावी व्यक्तिपासून मराठी साहित्य प्रभावहीन कसे राहिल. त्यातही गांधीजी दीर्घ काळ महाष्ट्रात होते. त्यांचे समकालीन साहित्यिक त्यांची आंदोलने अनुभवत होते. नंतरच्या काळात गांधीजीबद्दल भरपूर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांच्या माध्यमातून साहित्यिक प्रभावित होते. त्यामुळे असे म्हणता येईल की, आजच्या नव साहित्यिकावरही गांधीवादाचा प्रभाव निश्चितच आहे. "भोवतालचे सामाजिक पर्यावरण आणि साहित्यादी कला यांचे अनुबंध कोणत्याही काळात कांही प्रमाणात स्पष्ट करता येतात."[३] हे विधान गांधीचे कार्य त्यांचे ग्रंथ लेखन यांचा प्रभाव समकालीन आणि त्यानंतर उदयाला आलेल्या साहित्यावर कसा दिसून येतो हे स्पष्ट करण्याकरीता पुरेसे आहे. यावरून गांधिविचारांचा प्रभाव मराठी साहित्यावर असल्याचे निश्चितच दिसून येतो. एवढेच नाही तर गांधीजींच्या प्रेरणेने लेखक लिहिते झाले असे म्हटले तर वावगे होणार नाही.

मराठी कविता आणि गांधीवाद

कविता हा वाङमय प्रकार इतर वाङमय प्रकारापेक्षा अधिक उत्कट आणि रसिकावर अधिक प्रभाव पाडणारा वाङमय प्रकार आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपुर्व काळात सारा देश गांधीजींच्याविचाराने प्रभावित झाला होता. तेव्हा अनेक भाषामध्ये राजकीय व सामाजिक चळवळीवर कविता लिहल्या गेल्या त्या पध्दतीने मराठी भाषेतही कविता लेखन झाले भा. रा. तांब, माधव ज्युलियन, यशवंत, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर यांच्या कविता लेखनावर गांधी विचारांचा निश्चितच दिसून येतो. अज्ञातवासींच्या कविता संग्रहाला प्रस्तावना लिहीताना भा. रा. तांबे म्हणतात, “खरे वाङमय तेच होय की, जे समाजातील अगदी खालच्या तळापर्यंत भेद करत जाईल.”[४] भा. रा. तांबे यांनी गांधी विचाराने प्रभावीत होवून कविता लिहिल्या ‘रूद्रास आवाहान’ ही त्यांची जालीयनवाला बाग हत्ययाकांडाचा निषेध करणारी कविता आहे. ‘गाडी बदलली’ या कवितेतून त्यांनी अहिंसा विचाराचर पुरस्कार केल्याचे दिसून येते.

मराठी कादंबरी आणि गांधीविचार:

कादंबरी हा वाङमय प्रकार व्यापक आणि लेखकाच्या कल्पनाविलासाला भरपूर वाव देणारा चिंतनशील वाङमय प्रकार आहे. आधुनिक काळात या वाङमय प्रकारामुळे अनेक विषय लेखकांना ताकदिनिशी हाताळता आले. अनेक प्रश्नांना न्याय देता आला. त्यातून रसिकांना आपल्या कक्षा रूंदावण्यास मोठा फायदा झाला. हा वाङमय प्रकार ही गांधीजींच्या प्रभावापासून दूर राहूशकला नाही वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, माडखोलकर, श्री. व्य. केतकर, पु, य. देशपांडे. वा. म. जोशी असे अनेक नामवंत करदंबरीकार गांधीजींचे समकालीन आहेत. हे सर्वच कादंबरीकार गांधीजींच्या प्रभावापासून दूर राहू शकले नाहीत खांडेकरच्या अश्रु या कादंबरीतील शंकर नावाचा

शिक्षक त्यांनी उभा केला आहे. तो आदर्श तत्वाचे व नीतीमत्तेचे पालन करणारा आणि आपल्या दु:खा पेक्षा दुस-याच्या दु:खावर अश्रु गाळणारा नायक आहे. "माणसानं फार तर स्वत:साठी रडू नये; परंतु दुस-यासाठी त्यानं रडायला हवं. जगात प्रिती, भक्ती, सेवा, त्याग, जे-जे कांही चांगल पिकतं ते कशामुळे कुणा ना कुणाच्या डोळयातून हा पाऊस पडत राहतो म्हणूनच ना"[५] खांडेकरांच्या कादंबरीतील नायकाच्या तोंडी असलेले हे विचार पाहता असे जाणवते की, खांडेकर मनाने गांधीविचाराशी किती एक रूप झाले होते. त्यांच्या लिखाणात गांधीवादी आदर्श ठायी ठायी आढळतो.

ग. त्र्य. माडखोलकर यांचे कादंबरी लिखाणही गांधी विचारापासून दूर राहू शकले नाही पण त्यांच्या वरील प्रभाव हा खांडेकरांपेक्षा वेगळा आहे. सुरेश डोळके माडखोलकराविषयी म्हणतात, "राजकीय कादंब-या लिहणा-या ग. त्र्य. माडखोलकरांचे नायक राजकीय प्रवृत्तीचे नाहीत. त्यांची कोणत्याही वादावर निष्ठा नाही. त्यांचे पर्यावसन नाकर्त्या वावदूक व स्वप्नरंजनात्मक सुखवादयात झाले आहे अर्थात अराजकीय असणे ही सदेखील एक राजकीय दृष्टी व कृती असते. गांधींचा भर अशा मंडळींना आपल्या कोशातून बाहेर खेचून काढून त्यांना देशातील दरिद्रीनारायणाचे दर्शन घडवून त्यांच्या सेवेला जुंपण्यावर होता. आजच्या भाषेत सांगायचे तर आपल्या उच्चवर्णीय सुविधाभोगी वर्गातील प्रत्येक अनुयायाने अनिवार्यत: डी-कास्ट व डी-क्लास व्हावयाला हवे असा त्यांचा आग्रह होता. स्वाभाविकच गांधी व गांधीवाद ह्यांचा तिरस्कार हे माडखोलकरांच्या अ-राजकीय नायक कादंब-यांचे वैशिष्ट्ये असल्यास नवल नाही. सत्य आणि अहिंसा हे गांधीचे मुखवटे असून ते मुळात एक खलनायक आहेत. असे माडखोलकरांच्या मुखवटे कादंबरीच्या नायकाचे मत आहे."[६]

वा. म. जोशीवर गांधीवादाचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वत: गांधीजींच्या चळवळीत उतरले होते. त्याकरीता त्यांनी तुरूंगवासही भोगला होता. त्यामुळे गांधीवाद त्यांच्या कादंबरीमधून स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या सुशिलेचादेव या कादंबरीतील नायक विश्वकुटुंबवाद स्विकारतो. तर इंदु काळे व सरला भोळे या त्यांच्या कादंबरीत त्यांनी गांधीजी प्रणीत बुध्दीप्रामाण्यवादाच स्विकार केल्याचे दिसून येते. यातील नायक विनायकराव हा गांधीविचाराच्या प्रभावाखाली आहे. तो गांधीजीच्या चळवळीत भाग घेतो प्रसंगी तुरूंगातही जातो. या कादंब-यावरून वाम. म. जोशीवर असलेला गांधीवादाचा प्रभाव स्पष्टपणे वाचकाला जाणवतो.

निष्कर्ष

मराठी साहित्यावर गांधीविचराचा खोल ठसा उमटला आहे. स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात गांधीविचाराने प्रेरित होवून चळवळीकरिता अनेक कविता लिहल्या गेल्या व लिहिल्या जात आहेत.

गांधीविचारांचा प्रभाव आजही मराठी साहित्यावर आहे.

गांधीजीच्या कार्याच्या प्रेरणेने मराठी साहित्यात मोलाची भर पडली आहे.

गांधीवादामुळे मराठी साहित्यीकांना समाजाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन मिळाला.

संदर्भ सुची


१. Aksharnama.com, गांधीविचार आणि मराठी साहित्य, ०३ डिसेंबरि २०१८.
२. कित्ता
३. थोरात हरिश्चंद्र , मूल्यभानाची सामग्री, शब्द पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २०१६, पृष्ठ क्र. १६५.
४. कविवर्य तांबे साहित्यविचार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली १९८४, पृष्ठ क्र. १५७.
५. विभुते शंकर, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१०, पृष्ठ क्र. २६.
६. Aksharnama.com, गांधीविचार आणि मराठी साहित्य, ०३ डिसेंबरि २०१८.

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# ‘हिंद–स्वराज्य’तील विचारांची कालातितता

**प्रा.डॉ. संगीता नारायणराव मुंढे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

---

**गोषवारा :-**

संपूर्ण मानवजातीला सत्य,अहिंसाआणि सत्याग्रहाची शिकवन देणाऱ्या महात्मा गांधीच्या विचाराची आवश्यक्ता सदय परिस्थीतीत मोठया प्रमाणावर आहे. त्यांचे सर्वच लेखन आजच्या काळातदिपस्थभासारखे आहे. ‘हिंद-स्वराज्य’ हे पुस्तक म्हणजे त्यांच्या अनेक दिवसाच्या विचार मंथनाचा परिपाक होय.या पुस्तकात त्यांनी काँग्रेस आणि तिचे पुढारी, बंगालची फाळणी, स्वराज्य म्हणजे काय?, सभ्यता, हिंदुस्थान कशामुळे गमावले, वकील, डॉक्टर, शिक्षण, सत्याग्रह इ. अनेक विषयावर मते मांडली आहेत ती आजच्या काळात महत्वाची ठरतात.

**प्रस्तावना:-**

महात्मा गांधी हे एक युगप्रवर्तक नेते होते. कसलेही शस्त्र हातात न घेता केवळ आत्मबळावर देशाला बलाढ्य अशा इंग्रज साम्राज्यापासून स्वातंत्र्य मिळवून देणारा हा एक अवलिया होता. त्यांच्या दृष्टीने देशाला केवळ स्वातंत्र्य मिळवून देणे महत्वाचे नव्हते तर मुल्ययुक्त समाजनिर्मितीला त्यांनी महत्व दिले आहे. हिंदूस्थान स्वतंत्र झाल्यानंतर ते कसे असेल? याचे एक स्वप्न गांधीजींनी पाहिले होते.ते स्वप्न म्हणजेच ‘हिंद-स्वराज्य’ हे पुस्तक होय. यातून म.गांधीच्या दूरदृष्टीची कल्पना येते. ‘हिंद- स्वराज्य’ या पुस्तकातून व्यक्त केलेल्या विचारांची आवश्यक्ता सदय समाजाला आहे. म्हणून त्यांचे हे विचार समजून घेने महत्त्वाचे ठरते.

**उददेश:-**

1) महात्मा गांधी यांच्या विचारांचा अभ्यास करणे.
**2)** ‘हिंद-स्वराज्य’ या पुस्तकातून आलेल्याविचारांचा अभ्यास करणे.
**3)** ‘हिंद-स्वराज्य’ या पुस्कातून आलेल्या विचारांची सदय परिस्थीतीत उपयोगिता जाणून घेने.

**विषय विवेचन :-**

‘हिंद-स्वराज्य’ हे पुस्तक महात्मा गांधी यांनी 1908 साली इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेस परतत असतांना जहाजावर लिहले आहे. मुळ पुस्तक हे गुजरातीत आहे.ही एक लेखमाला आहे. नंतर ते पुस्तकरुपाने 1901 साली प्रसिदध् झाले. आपल्या या पुस्तकाच्या लेखनापाठीमागचा उद्देश महात्मा गांधी सांगतात, “भारतातील हिंसावादी संप्रदायाला व त्याच विचाराच्या दक्षिण आफ्रिकेतील वर्गाला उत्तर म्हणून लिहिले आहे.”[1] ‘हिंद-स्वराज्य’ या पुस्तकातून व्यक्त केलेली मते अनेक दिवसाच्या विचाराचा, वाचनाचा परिपाक आहे. भारतीय संस्कृती ही सर्व जगात श्रेष्ठ होती, पण आपण इतरांच्या अंधानूकरणातून तिच्याकडे दूर्लक्ष्य करून आपण आपलेच मोठे नुकसान करीत आहोत. हीच भूमिका प्रामुख्याने या पुस्तकातील विचारांच्या पाठीशी आहे. बाबा भांड यांच्या मते, “राजकीय गुलामीतून मुक्त होणे पुरेशे नाही,तर जगात पसरत असलेल्या वैचारिक साम्राज्यवादापासून ही मुक्ती मिळविने हे खरे स्वातंत्र्य, असे त्यांचे मत होते. आपले ते सगळे मागासलेले, बुरसटलेल म्हणून त्यांग करणाऱ्या आणि पाश्यात्य संस्कृतीच्या भौतिक झगमगाटाने दिपून जावून त्यांचे अंधानुकरण करणाऱ्या आजच्या तरुणालाही हेचसांगावेसे नाही वाटत?[2]

आज स्वातंत्र्य मिळूनही आपण पाश्चात्य संस्कृतीचे, भाषेचे गुलाम आहोत. खऱ्या अर्थाने वैचारिक स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर, पुन्हा आपल्याला आपल्या प्राचिन भारतीय संस्कृतीकडे वळावे लागणार आहे.हाच संदेश या पुस्तकातून दिला आहे. 'हिंद-स्वराज्य' हे अगदी शंभर पानाचे छोटेशे पुस्तक आहे. वेगवेगळ्या विषयावरील ही लेखमाला आहे.काँग्रेस आणि तिचे पुढारी, बंगालची फाळणी, स्वराज्य म्हणजे काय?, सभ्यता, हिंदुस्थान कशामुळे गमावले, वकील, डॉक्टर, शिक्षण, सत्याग्रह इत्यादी अनेक विषयावर सौदाहरण चर्चा या पुस्तकात केली आहे. आपल्या परतंत्राचे मुळ कशात आहे तेही सांगितले आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणीला ते आयुष्यात महत्व देतात. मानसाच्या गरजा जेवढ्या कमीत कमी असतील तेवढा माणूस हा सुखी असतो व त्याचा हव्यास, गरजा वाढल्या की एक असंतोष त्याच्या ठिकाणी निर्माण होतो तो त्याचे सुख, समाधान हिरावून घेतो, म्हणून महात्मा गांधींनी गरजा या कमीत कमी ठेवायला सांगितल्या आहेत. आपण सध्याच्या काळातही पहातो की माणसाने वैज्ञानिक प्रगती खूप केली, हे करत असतांना माणूस निसर्गापासून दूर गेला आणि आपलं सुख, समाधान हरवून बसला.

इंग्रजांनी भारतावर राज्य केलं यात ते इंग्रजांना दोष देत नाहीत तर याला भारतीयच कसे कारणीभूत होते ते सांगतात. इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले होते आपणच आपल्या तात्कालीक फायद्यासाठी त्यांना इथे जागा दिली. नंतर ते त्यांच्या अक्कलहुषारीने राजे झाले, यात चूक भारतीयांचीच आहे. त्यांच्या मते, "हिंदूस्थान इंग्रजांनी घेतले असे नाही तर, आपण त्यांना ते दिले. हिंदुस्थानात ते स्वतःच्या बळावर टिकले नाहीत, तर आपण त्यांना ठेवून घेतले आहे."[3]आपण आपसात लढत बसल्यामुळे त्यांचे फावले त्यांनी आपली सत्ता अधिक बळकट केली. आजच्या काळातही जोपर्यंत आपण आपल्या चुका सुधारत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य मिळवूनही देशाची प्रगती होणार नाही. महात्मा गांधीनी शंभर वर्षापूर्वीच औद्योगीक क्रांतीनंतर विकसित झालेली सभ्यता ही मानवी हितासाठी उपायकारक असल्याचे सांगितले होते. आपल्या सर्व दुःखाचे मूळ हे आपल्या सभ्यतेच्या हव्यासात आहे असे ते म्हणतात. सभ्यता म्हणजे काय? ते सांगत असतांना ते म्हणतात, "सभ्यता ही एक स्थिती आहे. या सभ्यतेची खरी ओळख अशी की, लोक बाह्य वस्तूच्या शोधात आणि शरीरसूखात सार्थकता आणि पुरुषार्थ माणतात."[4]माणसाने जसजशी प्रगती केली तसतसा माणूस हा मुळ जीवनापासून दुर गेला, बाह्य दिखाव्याला महत्व प्राप्त झाले. खरे सुख, समाधान हे लोपले गेले. सध्याच्या काळात महात्मा गांधीचे हे विचार खूप महत्वाचे आहेत. सध्याचे युग हे जाहिरातीचे युग मानले जाते. या काळात बाह्य दिखाव्यालाच अतोनात महत्व आले आहे. त्यामुळे मानवी जीवनातून धर्म, नीतीमुल्य नाहीशे होत आहेत. माणूसच मानसाचा वैरी झाला आहे. सगळ्या समस्येचे मुळ हे मानवी सभ्यतेचा हव्यास हे आहे. यातूनच न संपणाऱ्या भोवऱ्यात माणूस अडकला आहे. अनेक विकारांनी माणसाला घेरले आहे. खरे सुख कशात आहे, शाश्वत मुल्य कोणती आहेत हे जोपर्यंत माणूस सदसदविवेकबुध्दीने तपासून पाहणार नाही तोपर्यंत त्याला खरे सुख किंवा स्वातंत्र्यही मिळू शकत नाही. म्हणून महात्मा गांधींनी सगितलेली सभ्यता विषयक जी मते आहेत ती आजच्या काळात खूप महत्वाची ठरतात.

महात्मा गांधींनी धर्माला आपल्या जीवनात महत्वाचे स्थान दिले आहे. त्यांच्या मते, "मला धर्म प्रिय आहे, त्यामुळे हिंदुस्थान धर्मभ्रष्ट होत चाललेले आहे. याचे मला पहिले दुःख आहे. 'धर्म' म्हणजे हिंदु, मुसलमान, पारशी, असा मी घेत नाही, परंतू या सर्व धर्मामधला जो धर्म तो नाहीसा होत चालला आहे. आपण ईश्वराला विन्मुख होत चाललो आहोत."[5]महात्मा गांधीना धर्म म्हणजे मानवता, मानवी नैतिक मूल्य आपेक्षित आहेत. जी मूल्य एकून मानव जातीचे कल्यान करणारी व शाश्वत अशी मूल्य आहेत. त्या मूल्यावर आपली भारतीय संस्कृती उभी आहे. सर्व धर्माचा पाया ही मूल्य आहेत.तिच मूल्य आपण विसरत चाललो आहोत. जोपर्यंत धर्माने आचारण करणार नाही तोपर्यंत तो खऱ्या अर्थाने सुखी, समाधानी व स्वतंत्र होणार नाही असे

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

त्यांचे मत आहे. सध्याच्या नैतिक मुल्याच्या ऱ्यासमय काळात आपला समाज, संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर आपल्याला या नैतिक मूल्याचं, गांधीजींनी सांगितलेल्या धर्माचं पालन केल्याशिवाय तरणोपाय नाही.

महात्मा गांधींनी आपल्या 'हिंद–स्वराज्य' या पुस्तकात आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधलेती गोष्ट म्हणजे त्यांच्या मते हिंदूस्थानला कंगाल करण्यामध्ये रेल्वे, वकील आणि डॉक्टर यांनी महत्वाची भुमिका बजावली आहे. इंग्रजांनी आपल्या व्यापाराच्या सोईसाठी भारतात रेल्वेची सुरुवात केली. एकीकडे ही सेवा म्हणजे आपल्याला हिंदुस्थानचा विकास वाटतो पण या रेल्वेमुळेच भारतातील परंपरागत व्यवसाय बुडाले, कच्चा माल इंग्लंडला घेऊन जाणे सोपे झाले. यातूनच जास्तीत जास्त हिंदुस्थानचे शोषण इंग्रजांनी केले. संसर्गजन्य रोगाचा फैलावही रेल्वेमुळे पटकन होतो असे गांधीजीचे म्हणने होते. याच मुद्याचा विचार आजच्या संदर्भात केला तर वाढत्या वाहणामुळे प्रदुषणाची समस्या गंभीर रुप धारण करत आहे. त्याच बरोबर भारतातील पैसा विदेशी मोठ्या प्रमाणावर जात आहे. यांत्रिकीकरणामुळेच बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. संसर्गजन्य रोगाचा धोका तर खूप वाढला आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात उदभवलेला संसर्गजन्य रोग हा अवघ्या काही तासात जगभर पसरलेला दिसतो. उदा. इबोला, सार्स, डेंग्यू, कोरोना ई. वाढत्या दळणवळणाच्या साधनामुळे अपघाताचे प्रमाण तर वाढले आहेच शिवाय मानवी आरोग्यही धोक्यात आले आहे. गांधीजीच्या मते, "माणव प्राण्याला अशा रितीने निर्माण केले आहे की, त्यांनी आपल्या हातापायाने जमेल तेवढेच जाणे येणे करावे. रेल्वे वगैरे साधनांनी धावपळ करण्याचे आपण बंद केले तर फार गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न होणारच नाहीत."[6]म्हणजे विज्ञानाचा अतिरेकी वापर हा मानवासाठी हाणीकराक ठरत आहे. त्यातून माणूस त्यांच्या मुळ उद्देशापासून दूर जात आहे व दु:ख ओढवून घेत आहे. यत्रयुगाचे दुरगामी परिणाम गांधीजींना तेंव्हाच दिसले होते म्हणून त्यांचा यंत्रयुगाला विरोध होता. त्यांच्या मते, "यंत्राचे वारे सोसाट्याने वाहू लागले तर हिंदुस्थानात गिरण्या काढण्यापेक्षा आजसुध्दा मँचेस्टरला पैसे पाठवून तिथले रद्दी कापड वापरने बरे. कारण तिथले कापड वापरण्याने आपला पैसाच तेवढा जाईल हिंदुस्थानात मँचेस्टर करण्याने आपला पैसा हिंदुस्थानात राहील खरा पण तो पैसा आपले रक्त शोषेल, कारण तो आपली नीती नाहीशी करील."[7]आज भारत स्वतंत्र असला तरी, इथले लोक यंत्राचे गुलाम झाले आहेत. यंत्राशिवाय आपला दिवस जात नाही. यंत्राप्रमाणे आपणही यंत्रवत झालो आहोत. जेंव्हा यंत्रे नव्हती तेंव्हाही माणूस जगतच होता की, आणि आजच्यापेक्षा कीतीतरी चांगल्या पध्दतीने, धर्माने आणि नीतीने. यंत्रयुगाने माणसाला नीतीभ्रष्ट व स्वत:चे गुलाम बनवले आहे. आज गांधीजी जीवंत असते तर त्यांनी कोणती भावना व्यक्त केली असती याची कल्पनाही करवत नाही.

हिंदूस्थानच्या दुर्दशेला वकील आणि डॉक्टरही कसे कारणीभूत आहेत हे त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या मते, "वकीलांनी हिंदुस्थानला गुलामगीरी आणली, त्यांनी हिंदू मुसलमान तंटे वाढविले, त्यांनी इंग्रजांची सत्ता वाढविली असे माझे मत आहे"[8]त्यांच्या मते, वकील हे भांडणे सोडविण्याऐवजी भांडने लावण्याचे काम करतात कारण त्यांचा धंदा तो आहे. इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी हिंदु मुस्लीमामधीली तेढ जास्त वाढवले व 'फोडा व राज्य करा' या नीतीचा वापर करुन राज्य केले. त्यामुळे हिंदुस्थानचे खुप मोठे नुकसान झाले.आजच्याकाळातही राज्यकर्ते याचपध्दतीने जाती धर्मामध्ये तेढनिर्माणकरुनराजकारणकरतांनादिसतात. वकिलांप्रमाणेडॉक्टरांनाहीगांधीजीदोषदेतात. त्यांच्या मतेडॉक्टरांच्या पेक्षावैद्यबरे. डॉक्टरांनीआपल्यालाखिळखिळेकरुनटाकलेआहे.डॉक्टर ही अनितिच्या मार्गाने पैसाकमवण्याच्या मागेलागलेआहेत.

**निष्कर्ष:-**

1) सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह ही तत्वच खऱ्या अर्थाने मानवाला स्वातंत्र्य मिळवून देवू शकतात.
2) आपल्या गरजा कमीत कमी ठेवणे हा सुखी होण्यासाठी सोपा मार्ग आहे.
3) मुल्ययुक्त समाजनिर्मितीसाठी गांधी विचारांची आवश्यकता आहे.

4) श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे.

5) आधुनिक बहुतेक समस्याच्या पाठीमागचे कारण म्हणजे सभ्यतेचा हव्यास व वाढते यांत्रिकीकरण हे होय.

6) खऱ्या अर्थाने माणूस हा सुशिक्षित बनवायचा असेत तर स्वभाषेतून शिक्षण घेतले पाहिजे.

**संदर्भ -**

**1)** महात्मा गांधी – हिंद स्वराज्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्र.आ.2001 पृ.6

**2)** तत्रेव पृ.3

**3)** तत्रेव पृ.33

**4)** तत्रेव पृ.30

**5)** तत्रेव पृ.37

**6)** तत्रेव पृ.45

**7)** तत्रेव पृ.97

**8)** तत्रेव पृ.52

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# महात्मा गांधीजीचे स्त्री विषयक विचार

प्रा.अंभोरे अशोक गंगाराम

इतिहास विभाग प्रमुख, तोष्णीवाल महाविद्यालय,सेनगांवता. सेनगांव जि.हिंगोली

---

प्रास्ताविक :-

२१ व्या शतकात स्त्रीने सर्वच क्षेत्रात भरारी घेतल्याचे चित्र आपल्याला दिसून येते. पूरूषांबरोबर सर्वच क्षेत्रात स्त्री स्वाभीमानाने जीवन जगत आहे. स्त्री ही अबला नसून सबला क्षाली आहे. स्त्रीयानां कायद्याव्दारे त्यांना त्यांचे हक्क मिळत आहेत. स्त्री स्वातंत्र्याचा पूरस्कार महात्मा गांधीजीनी अवर्जन केलेला दिसत आहे. निसर्गाकडून स्त्रीला माणसिक द्याक्तीची जोड मिळाली असून अहिंसक लढा देण्यासाठी स्त्री अधिक लायक व सक्षम आहे. स्त्रीला गृहरक्षणाबरोबर समाज व राष्ट्र मजबूत करण्याची जबाबदारी पेलायची आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांनी केलेली अभूतपूर्व कामगीरीचे सामर्थ्य महात्मा गांधीजींला माहित होते. सदरील लेखात महात्मा गांधीजीचे स्त्री विषयक विचार मांडलेले आहेत.

**स्त्री पूरूष समान असावेत :-**

1- महात्मा गांधीजींना पूरूष व स्त्रीयांना समान मानले आहे. दोघांना समान अधिकार असावेत स्त्रीयांनी पूरूषांवर अवलंबून न राहता स्वतः निर्भयपणे जीवन जगता यावे. गांधीजीची अपेक्षा होती. स्त्रीयांच्या स्वभावाचा फायदा घेवून त्यांचे शोषण होवू नये यांवर महात्मा गांधीजीचा कटाक्ष असे स्त्रीला मालमत्ता आणि शिक्षणाचाअधिकार व विकासांची संधी मिळवून देण्याच्या विचारांचे महात्मा गांधी होते.

**स्त्रीचा पूरूषाबरोबर सहभाग आवश्यक :-**

2- भारतातील स्त्रीया जोपर्यंत पूरूषांच्या सोबत राजकीय व धार्मिक बाबी मध्ये भाग घेत नाहीत. तसेच पूरूषांच्या कामात वाटा उचलला नाही तर दे ॑ ाचा विकास कसा होईल. असे महात्मा गांधीजीना वाटत होते. स्त्रीयांच्या मदती कूटूंब नाही. मूलांवर संस्कार करण्याची जबाबदारी ही स्त्रीयांची आहे. स्वदेशी व्रताचे पालन, व स्वदेशिय संस्कार प्रथम स्त्रीयांवर होणे गरजेचे आहे. असे महात्मा गांधीजी म्हणत.

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांचा सहभाग :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत असहकार , सविनय कायदेभंग , चलेजाव चळवळीनी नेतृत्वाखली भाग घेतला होता. सहकार चळवळीत स्त्रीयांनी परदेशी कापडाच्या होळीत फार मोठया प्रमाणात भाग घेतला होता. यामध्ये अनेक मध्यमवर्गीय आणि सुरक्षित स्त्रीया होत्या. दारूबंदीसाठी स्त्रीया सहभागी का होतात तर व्यसनी पतींच्या प्र ॑ नाबरोबर कूटूंबाचा व मूलांचा प्र ॑ न स्त्रीया समोर उभा असतो.

**स्त्रीयावर बाहेरून बंधने लादली जाउ नयेत :-**

स्त्रीयांनी स्वतंत्र विचार केला पाहिजे. अलीकडे स्त्रीया राजकारणात भाग घेतात पण स्त्रीयांनी स्वतंत्रपणे विचार करावयास पाहिजे. पूरूषांनीच स्त्रीयांना स्वातंत्र्य देवून त्यांना विचार करायला भाग पाडले पाहिजे. आपण पूरूषापेक्षा कमी आहोत असे स्त्रीयांनी समजू नये. आणि स्त्रीयांवर जी अनिष्ठ प्रथा व बंधने आहेत. त्यांच्याविरूध्द बंड करण्याचे सामर्थ्य स्त्रीयांत असले पाहिजे. या विचारामूळे स्त्रीयां घराबाहेर पडून समाजसेवेला वाहून घेतले असल्याचे आज पाहावयास दिसून येते.

**स्त्री स्वातंत्र्यायाचा पूरस्कार महात्मा गांधीजीनी केला :-**

पूरूषांबरोबर स्त्रीयांला सूध्दा निसर्गाकडून मानसिक द्याक्तीची देणगी मिळाली आहे. पूरूषानी स्त्रीयावर हक्क गाजवू नये. स्त्रीयांनी सूध्दा आपण पूरूषांच्या हातचे खेळणे आहे असे समजू नये. स्त्रीयांनी स्वतला कमी समजू नये. म्हणून स्त्रीयांनी आपले समाजातील व कूटूंबातील स्थान मिळविण्यासाठी पूढे आले पाहिजेत असे महात्मा गांधीजीना वाटत होते.

**स्त्रीयावर दाखविलेला वि ॑ वास महात्मा गांधीनी सिध्द केला :-**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

स्त्री व पूरूषा शिवाय जगाची कल्पनाच करणे शक्य नाही. स्त्री पूरूषांनी एकमेकांचे गूण ओळखले पाहिजे. पूरूषामध्ये स्त्रीयांचे मृदूता, निर्भयता, दृढता यासारखे गूण वाढीस लावले पाहिजे. अनेक पूरूषांनी स्त्रीयांचे कामे केली पाहिजेत आणि जे काम पूरूषाला जमत नाही. ते काम स्त्रीया निश्चीतपणे करू शकतात. यावर महात्मा गांधीजीचा दृढ विश्वास होता.

**स्त्री शिक्षणाची गरज :-**

स्त्रीयामध्ये हक्क, जागृती व रक्षणासाठी स्त्री शिक्षणाची गरज असल्याचे महात्मा गांधीजी सांगतात. शिक्षणापासून स्त्रीयांना वंचीत ठेवणे म्हणजे अर्धी मानवजात अविकसीत ठेवणे आहे. भारतामध्ये सर्वात जास्त स्त्रीया ग्रामीण भागात राहात असल्यामूळे स्त्रीयांच्या विकासासाठी सुरक्षित स्त्रीयांनीच पूढाकार घेतला पाहिजे असे महात्मा गांधीजी सांगतात.

**स्त्रीयांना पडदा पध्दतीमधून महात्मा गांधीजीनी बाहेर काढले. :-**

बालविवाह, पडदापध्दती, सामाजिक चालीरीती धार्मिक रूढी, व परंपरा या स्त्री विरोधात होत्या. त्यामूळे स्त्रीयांना जगातील घडामोडीचा संबंध येत नसे त्यामूळे स्त्रीयाची मानसिक व बौध्दीक वाढ होत नाही. पडदयाच्या निमीत्ताने त्यांचे संरक्षण करता येत नाही स्त्री पूरूषांचा एकमेंकावर विश्वास असला पाहिजे असा गांधीजींचा विश्वास होता.

**आंतरजातीय विवाहाला समर्थन :-**

स्त्रीयांना गूलामगीरीत ठेवण्यासाठी बालविवाह, हूंडा पध्दती अस्तीत्वात होती. स्त्रीला या जाचक बंधनातून जर बाहेर काढायचे असेल तर विधवा विवाह, आणि आंतरजातिय विवाहाचे महात्मा गांधीजी समर्थन करतात. समाजसूधारकानीच कायद्याच्या आधारे सूधारणा करावी. अशा कायद्याला महात्मा गांधीजीनी मन मोकळेपणाने पाठिंबा दिला. सामाजिक सूधारणा पेक्षा परिवर्तन करायचे असेल तर स्त्रीयांना शिक्षणाची आवश्यकता आहे असे महात्मा गांधीजीनी सांगितले.

**सारांश:**

एखादया राष्ट्राचे मापदंड ठरवायचे असेल तर त्या राष्ट्रातील स्त्री किती सूरक्षित आहे. तीचा सामजिक दर्जा कसा आहे यावर अवलंबून असतो. स्त्री ही पूरूषापेक्षा अधिक थोर आहे. आईच्या शिकवणूकीमूळे प्रत्येक घर हे विद्यापीठ समानच आहे. जगाला शांततेची शिकवणफक्त स्त्रीच देवू शकते. स्त्रीमध्ये अपार शक्ती आहे. स्त्रीमध्ये स्वतच्या संरक्षणासाठी दूस-यावर अवलंबून राहण्याची गरज नाही. आत्मसंरक्षण हाच तीचा धर्म आहे. स्त्रीने आपल्या शरीरपावित्र्याचे रक्षण केले पाहिजे. स्त्री पूरूष यांनी एकमेंकाना समजून वागून सहकार्य केले तरच कूटूंबाचे समाजाचे व राष्ट्राचे कल्याण होईल अशी थोर विचारधारा महात्मा गांधीजीची होती.

संदर्भ :

1- संपादक श्रीराम जाधव - गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगीरी महाविद्यालय, औरंगाबाद २००९
2- नलीनी पंडीत - गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मूंबई जानेवारी २००३
3- एस.एस. गाठाळ - आधूनिक भारताचा इतिहास , कैलास पब्लीकेशन औरंगाबाद
4- चिरडे बालाजी - भारतीय इतिहासातील स्त्रीया, निर्मल प्रकाशन , नांदेड २००६
दीक्षीत ना.सी. - भारताचा इतिहास, पिंपळापूरे आणि कंपनी पब्लीकेशन नागपूर, प्रथम आवृत्ती २००४

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# मराठी कादंबरी आणि गांधीवाद

**प्रा.डॉ. गणपती जोतीबा मोरे**

**सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी जि. परभणी**

---

भारतीय राजकारणात गांधीजींचा उदय ही घटना अत्यंत महत्वपूर्ण आहे. म.गांधीनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत नेली. सर्व सामान्य स्तरातील स्त्री-पुरुषाना त्यांनी या चळवळीमध्ये सामावून घेतले. गांधीजीनी लोकांपुढे एक कृती कार्यक्रम ठेवला. त्यांच्या 'खेड्याकडे चला' या घोषनेने प्रभावित होऊन लोकांचे लक्ष शहराकडून खेडयाकडे वळविण्यात गांधीजींचा सिंहाचा वाटा **मुख्य शब्द-** आत्मशुध्दी, अस्तिकता, सेवाभाव, प्रेमभाव

**प्रस्तावना**:-

१९२० च्या सुमारास लो. टिळकांचा मृत्यू आणि भारतीय राजकारणात गांधीजींचा उदय ही घटना अत्यंत महत्वपूर्ण आहे. म.गांधीनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत नेली. सर्व सामान्य स्तरातील स्त्री-पुरुषाना त्यांनी या चळवळीमध्ये सामावून घेतले. गांधीजीनी लोकांपुढे एक कृती कार्यक्रम ठेवला. त्यांच्या 'खेड्याकडे चला' या घोषनेने प्रभावित होऊन लोकांचे लक्ष शहराकडून खेडयाकडे वळविण्यात गांधीजींचा सिंहाचा वाटा आहे. अस्पृश्यता निवारण, दारुबंदी, सफाई, साक्षरता मोहीम, सूत कातने यंत्रामुळे मजुरांवर बेकारीची पाळी येते म्हणून यंत्र संस्कृतीला पर्यायाने भांडवलदारी व्यवस्थेला विरोध, अहिंसेचा पुरस्कार, ह्रदय परिवर्तनावर भर, आत्मशुध्दी, अस्तिकता, सेवाभाव, मनुष्यमात्राबदल प्रेमभाव आणि लोक शिक्षणात श्रमाला महत्व या रचनात्मक कार्यक्रमाचा तत्कालीन लोकजीवन आणि पर्यायाने साहित्यावरही पडला. प्रस्तुत शोध निबंधामध्ये मराठी कादंबरीवर पडलेला गांधीवादाचा प्रभाव ( १९२० ते १९५०) याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

हा कालखंड मराठी कादंबरीत फडके-खांडेकर कालखंड म्हणून ओळखला जातो. फडके हे कलावादी तर खांडेकर हे जीवनवादी वस्तुत: या दोघांचेही विचार हे स्वप्नरंजनपर असल्याचे सुखदायीच ठरते. मराठीतील प्रारंभीचे 'यमुनापर्यटन' कर्ते बाबा मद्मनजी आणि हरिभाऊ आपटे यांनी वास्तववादी कादंबरीचा प्रवाह निर्माण करुन वास्तववादाची जोरदार पाया भरणी केली होती. परंतु या काळातील मराठी कादंबरीकारांवर फडके-खंडेकर यांच्या सुखवादी विचारांचाच प्रभाव पडल्याने आणि जनमानसाच्या भावजीवनाशी एकरुप होण्याची तल्लिनता तत्कालीन कादंबरीकाराने न दाखविल्यामुळे गांधीवादाची अव्यवहर्याता लक्षात घेता मराठी कादंबरीवर गांधीवादी विचारांचा म्हणावा तसा प्रभाव पडला नाही असे दिसून येते.

असं असले तरी वा.म.जोशी याच्या 'सुशीलेचा देव', 'इंदू काळे व सरला भोळे', वरेरकरांची 'मी रामजोशी', 'फाटकी बाकळ' , वि.स.खांडेकराच्या ' कांचनमृग' पासून 'दोन ध्रुव' पर्यंत, साने गुरुजींच्या 'श्यामची आई' प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी', 'अग्नियान' या कादंबरीतून गांधीवादी विचारांचा प्रभाव असलेला दिसून येतो.

वा.म.जोशी यांच्या 'सुशिलेचा देव' मध्ये विश्वकुटूंब वादाचा पुरस्कार केलेला आहे. साम्यवादी विचारसरणीशी या वादाचे साम्य असले तरी वा.म. जोशी अत्याचारी मार्गाला, सशस्त्र क्रांतीला आणि व्यक्तिस्वातंत्र्य विरोधी विचाराला विरोध करतात. हा गांधीवाद विचाराचाच प्रभाव असल्याचे दिसून येते. 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतून गांधीवादाची व्यवहार व तत्वनिष्ठा यांच्याशी सांगड घालतांना त्यांच्या मनात वैचारीक गोंधळ झाल्याचेच दिसून येते. यातून टिळकांची लोकसंग्रही व्यवहारीक वृती आणि गांधीजीची तात्विक तडजोड नाकारण्याची निर्भयवृती यांच्या रस्सी खेचीचाच ताबा तत्कालीन युवकांच्या मनावर पडल्याचेच दिसून येते. विनायकराव केळकरांच्या कौन्सिल प्रवेशा संबंधी म्हणतात,"माझी बुध्दी तुमच्या बाजुला आहे, पण भावना गांधीकडे मला ओडते; त्याला मी काय करु?" या विनायकरावांच्या मतावरुन तत्कालीन विचारवंत गांधीवादाकडे बुध्दिनिष्ट दृष्टिने न पाहता भावनाशील दृष्टिने बघतात. त्यामुळे गांधीवादाची प्रत्यक्ष

जीवनात अव्यवहर्याता लक्षात येते. गांधीवादी विचाराकडे असे द्विधा मनस्थितीने पाहिले गेल्याने त्या भोवती संभ्रमाचेच वातावरण निर्माण झाले.

वरेरकरांच्या 'मी रामजोशी' या कादंबरीत कमल, जनी आणि कथा नायक यांच्या प्रेमाच्या त्रिकोनाचेच वर्णन केले आहे. कादंबरीच्या शेवटी नायक कबुली देतो की, मी खेडयात आलो खरा, पण अजुनही वास्तवाचा खरा बोध मला झालेला नाही. गांधीच्या ग्रामोध्दाराचे कार्यक्रम येथे (ग्रामसफाई, साक्षरता मोहीम, सूतकातने) या येतात. गांधीवादी विचाराचा भाग येथे असला तरी जीवन दृष्टीशी एकरुप होऊन तो येत नाही.

वि.स.खांडेकराच्या कादंबर्यात नायकाचे खेडयात जाणे, शिक्षणाच्या कार्याला वाहून घेणे, गिरणी मालकाच्या मुलाने शाळेसाठी संपत्तीदान करणे इत्यादी गोष्टी त्यांच्या कादंबरीतून येताता. असे असले तरी ते गांधीजीच्या 'खेडयाकडे चला' या घोषणेतून त्यांचे नायक खेडयाकडे येतात. पण सोबत ते जणू शहरच घेऊन येतात असे म्हणता येईल.

प्रेमा कंटक यांनी गांधीवादाच्या प्रेमातून 'काम आणि कामिनी' व अग्नियान' या कादंबर्या लिहिल्या असल्या तरी त्यांची गांधी विचाराशी श्रध्दा कुठे तरी डळमळीत होत असल्याचाच भास अधिक होतो.

साने गुरुजींचे व्यक्तिमहत्व हे गांधीवादाला जास्त पोषक असल्याचे दिसते. त्यांच्या वृतीतील अस्तिकता, आदर्श वादाविषयी त्यांना तीव्र आवड, सेवाभावाचे त्यांना असलेले आकर्षण, त्यागाची तत्परता, बुध्दीवादाबद्दल शंका, मनुष्य मात्राबद्दल तीव्र प्रेमभाव हे गुण त्यांच्यात इतरापेक्षा अधिकच असल्याचे दिसतात. 'क्रांती', 'संध्या', 'रामाचा शेला', 'धडपडणारी मुले', 'श्यामची आई' या कादंबर्यातून गांधीवादी विचारसरणी आलेली आहे.

गांधीवादाला विरोध करणारे लेखकही मराठी कादंबरीतून मोठया प्रमाणावर आलेले आहे. यामध्ये ना.सी.फडके हे अग्रणी आहेत. गांधीचे राजकारण वैयक्तिक लहरीवर चालते हा फडके यांचा आक्षेप आहे. आणि गांधीजींचा हृदय परिवर्तनाचा मार्ग अशक्य कोटीतला आहे. त्यांच्या 'उन्माद' या कादंकरीत साधनशुचितेचा आग्रह निरर्थक आहे. असा सूर आळवल्याचे दिसून येते. माडखेलकरांच्या 'मुखवटे' व 'कांता' या कादंबऱ्या मधूनही गांधीवादाचा व व्यक्तिश: गांधीचाही अत्यंत तीव्र निषेध कला आहे.

एकूणच चंद्रकांत बांदिवडेकर यांनी म्हटल्या प्रमाणे एकूण महाराष्ट्रात गांधीवादाला फारसे स्थान मिळाले नाही, हे खरे आहे. गांधीवाद न मानण्याचे कारण मराठी कादंबरीकारांची खोलवर रुतलेली सुखवादी प्रवृती खेडयात जाऊनही तिथल्या परीस्थितीचा वस्तुनिष्ठपणे वेध घेण्याऐवजी प्रेम त्रिकोणाचा चाळा अधिक प्रभावी ठरला. गांधी प्रत्यक्ष व्यवहारात भयावह वास्तवाशी सामना करीत राहीले. त्यांच्या वीरवृतीचा अंशिक प्रभाव पडला असला तरी मराठी कादंबरी ऊंचावली असती. हे चंद्रकांत बांडिवडेकरांचे विचार रास्त वाटतात.

**संदर्भ-**


1) पवार गो.मा., हातकणंगलेकर म.द., मराठी साहीत्य: प्रेरणा आणि स्वरुप, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६ पृ.१६४

2) पुंडे द.दि.(संपा.), गांधीवाद आणि मराठी साहीत्य, पृ.६१

3) राजाध्यक्ष विजय, मराठी वाङमय कोश, खंड चौथा, महाराष्ट्र राज्य साहीत्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२, पृ.१०६

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचाराची संकल्पना

**प्रा. डा. राठोड यु. सी.**

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

---

**प्रस्तावना**

भारताच्या इतिहासात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहीले गेले आहे. कारण देशाच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि सांस्कृतिक बदल घडवुन आणण्या पासून ते देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. महात्मा गांधींनी वेगवेगळया क्षेत्रात केलेल्या सुधारणांमुळे त्यांचे नाव भारतातच नव्हे तर परदेशातही आजरामर झाले आहे. १९९० ते १९४८ या काळाला **गांधीयुग** म्हटले जाते. गांधीजी भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख व्यक्तीमत्व होते. त्यांच्या विचाराचे अनेक पैलू आहेत. जसे स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकिय विचारवंत, धर्मवक्ते, थोर अर्थतज्ञ असे अनेक पैलु होते. राजकारणा प्रमाणेच गांधीजीचे अर्थकारणही मानवतावादावर आधारलेले होते, त्यानी अर्थकारणात विकेद्रीत व विश्वास मुलक अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करुन स्वावलंबनावर भर दिलेला दिसुन येतो. महात्मा गांधीजींनी स्वावलंबनासाठी विकेंद्रीत दृष्टीकोनाचा उपयोग करुन चरखा महत्वपुर्ण मानला. चरख्याच्या सहाय्याने खादीची निर्मिती करुन स्वावलंबन साध्य होऊ शकते यासाठी त्यानी खादी आणि चरख्याला महत्वाचे स्थान दिले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारावर टॉलस्टॉय, जॉन रस्किन, थोरो याच्या विचारांचा प्रभाव होता. जॉन रस्कीन यांच्या unto the Last या ग्रंथाच्या अधारेच सर्वोदय हि कल्पना मांडली तर टॉलस्टॉयच्या ग्रंथामूळे गांधीजी अहिंसेचे पुजारी व सत्याचे उपासक बनले. गोपाळ कृष्ण गोखले यांना ते राजकिय गुरु मानत होते.

**<u>गांधीजींचे आर्थिक विचार –</u>**

गांधीजींचे आर्थिक विचार हे समाजवादी विचारसरणीला अनुसरुन असून त्यास नौतिकतेचा आधार आहे. ते नेहमी गरजा कमी करा असे सांगत हे विचार त्यांचे समाजातील समाज सुधारक श्रीमंत व्यक्ती यांच्याशी संबंधित आहेत.

1) **<u>विकेंद्रीत अर्थव्यवस्था –</u>**

गांधीजीचे आर्थिक विचार सामाजिक व राजकिय क्षेत्रातील त्यांच्या आध्यात्मनिष्ठ मानवतावादाशी सुसंगत असंच आहेत. या आदर्शवादी तत्वचिंतकांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर टिका केल्या. भारतातील राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्यांचा खेड्यांशी जवळचा संबंध आला. खेड्यातील स्वयंपुर्ण ग्रामसंस्था नव्या विकेंद्रीत अर्थव्यवस्थेला पायाभुत बनवु शकेल अशी आशा त्यांनी मनाशी बाळगली. राजकिय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर राष्ट्रांच्या आर्थिक हितसंबंधाची जपवणूक करण्याची जबाबदारी त्यांनी स्विकारली. गांधीजींच्या यंत्राना कडवा विरोध होता. तो कमी करुन त्यांनी उद्योगधंद्याच्या राष्ट्रियीकरणाचे तत्व मान्य केले. परंतु शासन व्यवस्थेवर त्यांचा अविश्वास होता. अराज्यवाद, राष्ट्रवाद, समाजवाद आणि सत्याग्रह कार्यपद्धती यांच्या मिश्रणातून गांधीच्या आर्थिक विचारांना चालना मिळाली.

2) **यंत्र संस्कृतीला विरोध -**

गांधीजींनी इ.स. 1909 मध्ये हिंदु स्वराज्य या ग्रंथात आदर्शवादी तत्वचिंतकांचा विचार मांडला. त्यांच्या मते कारखान्यात यंत्रावर काम करणारा माणूस यांत्रिकच बनतो. त्यांचा उत्साह, सर्जनशिलता, निर्णयशक्ती यांना खिळ बसुन त्यांच्या जीवनातील सहजता, शांतता, समाधान नाहिशे होते. मानवाने अधिकाधिक सुखोपभोगामागे लागण्या ऐवजी आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्यात असे सांगितले. ते भौतिकसुखापेक्षा नैतिक विकासाला अधिक महत्वदेतात भांडवलशाहीला शह देऊन ते पर्यायी समाजव्यवस्थेचा पुरस्कार करतात. आर्थिक विकास हा नैतिकतेला धरुन असावा असे त्यांना वाटत होते.

यंत्रधिष्टीत पाश्चात्य संस्कृतीला ते नेहमीच विरोध करत. आधुनिक यंत्रसामग्री ही युरोपिय समाजाला जडलेली व्याधी आहे. असे गांधीजी म्हणत. इंग्रजी राजवटीमध्ये भारताचा आधुनिक यंत्रसंस्कृतीशी प्रथम परिचय झाला. ज्यामूळे स्वयंपुर्ण ग्रामव्यवस्था धोक्यात आली. खेडी स्वयंपुर्ण होती ती परावलंबी झाली. खेड्यातील बारा बलुतेदारी नष्ट होऊन बाजारपेठेत शेतकरी पैशासाठी धान्य विकु लागला. खेड्यातील व्यवसाय नष्ट होऊ लागले. शरीर श्रम, साधी राहणी, ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण स्वायत्त व स्वयंपुर्ण ग्रामव्यवस्था हे त्यांचे स्वप्नच नव्हे तर वास्तव विचारशैली होती. रेल्वे, दवाखाने, यंत्रे, सैन्य, कायदे,

Special Issue 28 , Vol. 1 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139


न्यायालय असावीत पण ते देशात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी गांधीजींचा यंत्र शक्तीला विरोध होता. परंतू काळाचा ओघ, आधुनिकीकरण यांचा विचार करुन ते देशाच्या आर्थिक विकासासाठी यंत्र सामग्रीच्या वापरास परवाणगीही देतात.

**3) देशीउद्योगधंद्यांना संरक्षण –**

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यामूळे देशातील लघु व कुटीरोद्योग संपुष्टात आले. भारतातील जुन्या व नव्या उद्योगाचे संरक्षण परकीय मालाच्या स्पर्धेपासून करण्यात यावे. अशी येथील अर्थतज्ञ, राजकारणी यांनी मागणी केली.

बाल्यावस्थेतील उद्योगधंद्याने संरक्षण हे तत्व गांधीजींनी उचलून धरले होते. खुल्या व्यापाराने भारतातिल उद्योगाचा –हास होऊन येथील शेतकरी धुळीस मिळालेला आहे. मी स्वतः खादीला अग्रक्रम तोवर देत राहील जोपर्यंत त्यांना संरक्षण हे परकीय स्पर्धेपासुन मिळत नाही. असे महात्मा गांधी म्हणत असत.

**4) आर्थिक समानता –**

गांधीजी हे लोकाभिमुख वृत्तीचे राजकिय पुढारी होते. श्रीमंत, गरीब, बुद्धीजिवी त्यांच्यासाठी ते सर्व सारखेच. आर्थिक समतेसाठी झटणे याचा अर्थ भांडवल आणि श्रम यांच्यातील अनादी विरोध नाहीसा करणे होय. स्वातंत्र्यासाठी लढा देत असताना सुशिक्षीत पिढी मात्र इंग्रज सरकारला पिळवणुकीत साहय करत आहे, हे त्यांना जानवत होते. बौधिकश्रम हे सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारे आहेत. परंतू अन्नधान्याची गरज सगळयानांच असते. त्यामूळे प्रत्येकाने श्रम करणे हे प्रत्येक माणसाचे जन्मसिद्ध कर्तव्य आहे.

**5) स्वदेशी –**

भारत सरकारचे करविषयक धोरण असावे. यासाठी एका आयोगाची नेमणूक केली गेली. या आयोगाच्या शिफारसीमुळे कापड, साखर, कागद, आगपेट्यांचा उद्योग अशा काही उद्योगांना आयात मालाच्या स्पर्धेपासुन संरक्षण मिळू लागले. या संरक्षणाचा फायदा घेण्यासाठी देशात अनेक देशी व परकीय कंपन्यांची स्थापना झाली. गांधीजींच्या मते स्वदेशी कंपण्या म्हणजे ज्या कंपन्यांच भांडवल, व्यवस्थापन, दिग्दर्शन हे मॅनेजिंग डायरेक्टर यांच्या द्वारा भारतीयांच्या हातात असेल त्या भारतीय कंपण्या होत. गांधीजींनी स्वदेशीचा पुरस्कार आणि परकिय मालावर बहिष्कार टाकला. देशातील कपडा जाड आणि महाग असेल तरी, परंतु परकियांनी त्यांच्या देशातील कपडा आयात केलेला वापरायचा नाही. असे ते म्हणत. असे केले तरच देशातील पैसा देशातच राहील. त्यामुळे देशातील संपत्तीचा उपयोग देशाच्या विकासासाठी करता येऊ शकेल. स्वराज्य आणि स्वराष्ट्र अभिमान यांच्यात परस्परपुरकता आहे. त्यामुळे महात्मा गांधी स्वदेशीचा आग्रह करत.

**6) श्रम प्रतिष्ठा –**

गांधीजी श्रमाला एक प्रकृतीचा नियम समजत. जो व्यक्ती या निसर्गनियमाचे उल्लंघन करेल ती स्वतःच अडचणीत येईल. शारीरीक श्रमामुळे मानसाचे आरोग्य चांगले राहते. जिवनात आनंद निर्माण होतो. शारिरीक श्रम हे एक पवित्र कर्तव्य आहे. श्रमामुळेच मणुष्याला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. जे लोक या पासून वंचित राहतात, अशा लोकांबाबतचे त्यांचे विचार वेगळे दिसून येतात. गांधीजींच्या विचारावर एक फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ सिस्मॉडी यांचा प्रभाव दिसून येतो.

**7) कुटिर उद्योग –**

गांधीजी विकेंद्रीकरणाचे पुरस्कर्ते होते व याच विचारातून त्यांनी कुटीरोद्योगाचे समर्थन केले. ग्रामीण भागातच छोटे छोटे उद्योग स्थापन झाल्यास कच्च्या मालाचे पक्क्या मालात रुपांतर करता येईल व रोजगार निर्मिती होईल. आर्थिक विषमता निर्माण होईल, त्यामुळेच ग्रामीण भागातच कुटीरोद्योगाची निर्मिती केली पाहीजे असे त्यांना वाटत असे.

गांधीजींनी खादी ग्रामोद्यागाला सुर्यमालेतील केंद्रस्थानी असणा-या सुर्याची उपमा दिली होती. तर गांधीजींच्या मते अन्य ग्रामोद्योग हे सुर्यमालेतील सुर्याभोवती फिरणारे अन्य ग्रह आहेत. गुळ तयार करणे, टोप्या, केरसुन्या, घाणीतून तेल काढणे, साबन बनविने, हाताने दळण काढणे, काड्याच्या पेट्या तयार करणे, मध तयार करणे, कातडी तयार करणे, खेळणी बनवणे, चटया बनवणे अशा प्रकारचे अनेक कुटीरोद्योग तयार केल्यास खेड्यातील लोकांना खेड्यातच रोजगार प्राप्त होईल व खेडे स्वयंपुर्ण होतील.

**8) सर्वोदय कल्पना –**

जॉन रस्कीचे अनटु धिस लास्ट (Un To This Last) हे पुस्तक वाचून महात्मा गांधीजी फारच प्रभावित झाले. त्यांनी त्या पुस्तकाचे गुजराती भाषेत भाषांतर करुन त्या पुस्तकाला त्यांनी सर्वोदय हे नाव दिले. सर्वोदय म्हणजे समाजातील एकाच वर्गाचा नव्हे तर समाजाचा उदय, सर्वांचा उदय, सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण, सर्वांचे मंगल म्हणजेच सर्वोदय होय. अशी महात्मा गांधीजीची संकल्पना होती.

**9) सर्वोदय योजना –**

गांधीजींनी सर्वोदयाचा रचनात्मक कार्यक्रम तपशिलवार तयार केला आहे.

1) बहुजन समाजाचे राहणीमान उंचावण्यासाठी शेतकरी व कामगार यांच्याकडे भरपुर लक्ष द्यावे.
2) जमिनदाराकडून शेतक-याची आणी भांडवलदाराकडून श्रमिकाची पिळवणुक होऊ नये.
3) शेतक-यांनी स्वतःच्या समित्या स्थापन कराव्यात तसेच कामगारांनी स्वत;च्या संघटना निर्माण कराव्यात.
4) मुलांना व प्रौढांना शिक्षण द्यावे. मुलांना मुलभूत व प्रौढांना तांत्रिक शिक्षण द्यावे.
5) ग्रामोद्योग व खेड्यातील लोकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे.
6) प्रत्येक खेडे हे प्रजासत्ताक बनले पाहिजे.
7) समाजात आर्थिक समानता व जातीय सलोखा राहील अशी सर्वोदय योजना गांधीजींनी तयार केली.

गांधीजींच्या या सर्वोदय योजनेतून असे दिसून येते की, गांधीजींनी वर्ग संघर्ष टाळण्यासाठी शेतक-यांच्या व कामगारांच्या हितासाठी अधिक विचार केलेला आहे. तसेच शिक्षण, प्रशिक्षण, स्वच्छता आणि जातीय सलोखा, आर्थिक समानता याही गोष्टींना गांधीजींनी अतिशय महत्व दिल्याचे दिसते. त्यांची हि सर्वोदय कल्पना खरंच प्रत्यक्षात निर्माण झाली तर भारत ख-या अर्थाने सुजलाम सुफलाम होईल अशी मला खात्री वाटते.

**10) महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना**

महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना अमलात आणण्यासाठी अनेकविध अभ्यासपूर्ण पैलू सांगितली आहेत. गांधीजीच्या स्वराज्याचा केंद्रिबदु खेडे आहे. त्याचे स्वरुप प्राचीन ग्रामस्वराज्याप्रमाणे राहील. भारत हा सात लाख खेड्यात दिसतो. या स्वराज्याची उभारणी राजकिय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा चार घटकांवर झालेली असेल. अश्या राज्याची उद्दिष्ट समाजाची सेवा करणे हेच असणार आहे. गांधीजी म्हणतात की, माझ्या दृष्टीने स्वराज्य व रामराज्य एकच आहे. माझ्या लोकशाहीच चित्र रामायणात काढलेले आहे. कोणत्याही स्वराज्यात धर्मराज्य असले पाहीजे. त्यात प्रजेला अतिशय महत्वाचे स्थान असले पाहिजे.

गांधीजीनी स्वराज्याची उभारणी करत असताना बारीक बारीक बाबी विचारात घेतलेल्या दिसून येतात. जेणे करुन स्वराज्याचा अविभाज्य घटक खेडे स्वयंपुर्ण होईल.

**11) ग्रामस्वराज्य –**

खेड्याचा विकास हाच भारताचा विकास आहे, असा गांधीजींचा ठाम विश्वास होता. म्हणूनच सन 1920 मध्ये खेड्याकडे चला असा संदेश त्यांनी दिला. यामुळे सा-या देशाचे लक्ष खेड्याकडे गेले, त्यामूळे ग्रामजीवन, ग्रामसंस्कृती प्रकाशात आली. ग्राम हाच भारताचा कणा आहे. हे लोकांच्या लक्ष्यात आले. यातूनच ग्रामजनतेचा विकास हे सरकारचे उद्दीष्ट झाले.. ग्रामस्वराज्याची संकल्पना प्रामुख्याने आर्थिक दृष्ट्या स्वयंपुर्ण खेड्यावर आधारीत होती. जवळपास सात लाख खेड्यामध्ये भारत वसलेला आहे. अशी गांधीजींची धारणा होती. खेड्याकडे चला असा नारा त्यांनी दिला. आदर्श खेडे कसे असावे किंवा ग्रामस्वराज्याची वौशिष्ट्ये त्यांनी पुढील प्रमाणे सांगितली.

1) प्रत्येक खेडे अन्नधान्य व वस्त्राबात स्वयंपुर्ण असावे.
2) प्रत्येक खेडे हे आर्थिक दृष्ट्या स्वयंपुर्ण असावे.
3) प्रत्येक खेड्यामध्ये समाजमंदिर असावे व कृषी व्यवसाय प्रगत असावा.
4) प्रत्येक खेड्यातील सर्व व्यवहार सहकारी पद्धतीने चालावे.
5) खेड्यातिल शेतीमधून अन्नधान्याचे आणि नगदी पिकाचे उत्पादन घ्यावे.

**निष्कर्ष–**

1) गांधीजींचे आर्थिक विचार आजही भारतीय अर्थव्यवस्थेस प्रगती पथावर घेऊन जाणारे आहेत,
2) स्वदेशी संबंधी गांधीजींचे विचार जागतिकीकरणातही भारतासारख्या विकसनशिल देशाच्या हिताचे आहेत,
3) सर्वोदय या कल्पनेतून गांधीजींची सर्वांच्या विकासाची आर्थिक समानतेची दृष्टी दिसुन येते.
4) दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता, प्रादेशिक विषमता, गरीब-श्रीमंत यामधील अंतर या सारखे अनेक आर्थिक व सामाजिक समस्यांच्या सोडवणूकीसाठी गांधीजींच्या विचाराची योग्य व काटेकोर अंमलबजावणी करने गरजेचे आहे.
5) निती आयोगाने गांधीजींचे कुटीर उद्योग व स्वयंपुर्ण ग्राम या संकल्पनेचा अभ्यास करुन अनेक योजनांमधून तिची अंमलबजावणी करावी.
6) पाश्चात्यांच्या चांगल्या गोष्टींचेच अनुकरण करावे.
7) गांधीजी आर्थिक समानता निर्माण करण्यासाठी साम्यवाद, समानतावाद, मानवतावाद, यांचा पुरस्कार करतात.

**संदर्भग्रंथ सुची –**

1) बाळ सामंत - महापर्व
प्रकाशक – सुर्यकांत देशमुख, सचिव, महाराष्ट्र
राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मंत्रालय, मुंबई. 1986
2) प्र. रा. दामले - गांधी दर्शन
शुभदा सारस्वत पब्लिकेशन प्रा. लि. पुणे 1982
3) त्र्यं. वि. पर्वते - गांधी – पर्व
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मंत्रालय, मुंबई. 1985
4) चव्हाण, भिसे. जवळगे, हट्टेकर (संपादक) - गांधी विचार
निर्मल प्रकाशन, नांदेड 2012
5) अनु बंडोपाध्याय - बहुरुप गांधी, मनोविकास प्रकाशन पुणे, 1994
6) नारायणभाई देसाई - आपले गांधी, गांधी संशोध प्रतिष्ठाण,
जळगाव 2009

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 28 , Vol. 1<br>March 2020 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# महात्मा गांधी यांचे सत्य आणि अहिंसेविषयक विचार

**डॉ. मधुकर रामचंद्र साठे**

इतिहास विभागप्रमुख,छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. औरंगाबाद

---

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधींचा जन्म 02 ऑक्टोबर 1869 रोजी काठेवाडीतील पोरबंदर येथे झाला. मॅट्रीकपर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बॅरिस्टरची पदवी प्राप्त करण्यासाठी गांधीजी विलायतेला गेले. शिक्षणक्रम पूर्ण करून मुंबईमध्ये वकिलीचा व्यवसाय सूरू केला. परंतू वकिलीच्या व्यवसायामध्ये फारसा जम न बसल्यामुळे परत ते आफ्रिकेला गेले. पेढीवाल्या व्यापा-यांनी त्यांना आपला वकिल म्हणून पाठविले. त्याकाळी पेढीवाल्यांचे खटले आफ्रिकेतील न्यायालयातून चालवत होते आणि पेढीवाल्यांचे वकिल म्हणून आफ्रिकेमध्ये गेलेले गांधीजी तेथील भारतीयांचे नेते बनले. आफ्रिकेमध्ये युरोपियन लोकांच्या वसाहती होत्या. तेथील साधन संपत्तीवर युरोपियननांची मक्तेदारी होती. मूळ निवासी निग्रो यांना गुलामासारखे वागविले जात असे. आशिया खंडातील अनेक देशामधून गरजू लोक लहान मोठया नोक-या किंवा मजूरी करण्यासाठी आफ्रिकेमध्ये गेलेले होते. त्यामध्ये भारतीयांची संख्या जास्त होती. वर्णश्रेष्ठत्वाच्या कल्पनेने पछाडलेले यूरोपियन लोक आशिया खंडातील लोकांना कस्पटासमान मानत होते. आफ्रिकेमध्ये जे भारतीय स्थायिक झाले त्यांना मतदानाचा हक्क दिला नव्हता. त्यांच्याबाबत काळा-गोरा हा भेद केला जात होता. तेथे निग्रो व भारतीय यांचा तिरस्कार केला जाई. यूरोपात मानवाच्या हक्कांचा उदो उदो करणारे गोरे लोक आफ्रिकेत निग्रो व आशियायी लोकांना मानवतेने वागवत नव्हते. तसेच गांधीजी प्रिटोरियाला जाण्यासाठी रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत असताना श्वेतवर्णीय रेल्वे अधिका-याने त्यांना धक्के मारून खाली उतरविण्यात आले. हिंदी माणसाने पहिल्या वर्गाने प्रवास करणे म्हणजे यूरोपियन लोकांची मानखंडना आहे असे त्या अधिका-याला वाटले असावे. गांधीजींना ही विसंगती खटकली. या घटनेतून त्यांना कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढा देण्याची स्फुर्ती मिळाली व त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी सत्याग्रह लढा उभारला आणि त्यामध्ये यशही मिळविले. अहिंसात्मक सत्याग्रहाच्या शस्त्राला यामुळे फार मोठे यश प्राप्त झाले होते. या लढयामुळे गांधीजींचा आत्मविश्वास वाढला होता.

1). महात्मा गांधीजींनी आपल्या जीवनामध्ये आचरण केलेले सत्य व अहिंसा या तत्वाचे महत्व स्पष्ट करता येईल.

2). महात्मा गांधीजींनी दिलेल्या आदर्श तत्वांचा समाजाला दिशा देण्यासाठी उपयोगी पडेल याची माहीती स्पष्ट करता येईल.

3). महात्मा गांधीजींनी अहिंसात्मक व सत्याग्रहाच्या माध्यमातून केलेल्या लढयाचे महत्व मांडता येईल.

4). महात्मा गांधीजींच्या सत्य व अहिंसा या विचारामूळे समाजामध्ये वर्णभेद, गरीब-श्रीमंत, जमीनदार-शेतमजूर, कारखानदार-मजूर, स्पृश्य-अस्पृश्यता यांच्या मधील विषमता कमी करण्यासाठी वापरलेला मार्ग स्पष्ट करता येईल.

**गांधीजींचे सत्यविषयक विचार :-** महात्मा गांधीजींना अहिंसा विचारांचे शिक्षण बायबलमधून मिळाले. देवा त्यांना क्षमा कर, कारण ते काम करतात, त्याची त्यांना जाणीव नाही, हे येशु ख्रिस्तांचे वाक्ये त्यांच्या मनावर बिंबले होते. त्याचप्रमाणे गीता, महाभारत, रामायण आणि बौध्द धर्मातील ग्रंथाचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. गांधीजींनी आपले विचार निरनिराळया वेळी परिस्थितीप्रमाणे व्यक्त केले आहेत. व्यक्ती किंवा परिस्थितीनूसार सत्याची कल्पना बदलते. म्हणून सापेक्ष सत्याला पूर्ण सत्य म्हणता येत नाही. निरपेक्ष सत्य श्रेष्ठ असते. ते ईश्वर आहे. निरपेक्ष सत्य सत्, चित्त व आनंद यांचा सुंदर मिलाप आहे. सत्याचा मार्ग हा शूरांचा आहे. तेथे भ्याडाचे काम नाही. सत्य हा महात्मा गांधींजींच्या विचारांचा आत्मा आहे. सत्य हे मानवी जीवनातील सर्वोत्तम मुल्य आहे. म्हणजेच आपण सत्यनिष्ठ असतो म्हणजे कोणतीही खडतर गोष्ट सूसहयच वाटते असे गांधींजीचे मत होते. सत्याच्या तलवारीला कधीच गंज चढत नसतो. कारण तिला धारदार ठेवणारे प्रेरणास्त्रोत आपल्या अंत:करणातच असतात. सत्याचा आग्रही स्वत:चेच नव्हे तर अखिल मानवजातीचे कल्याण करीत असतो. कोण्या एकाने बंदूकीच्या गोळयांनी गांधीजींना संपविण्याचा प्रयत्न केला. परंतू गांधी विचार मात्र त्याला संपवता आले नाहीत. सत्य आणि अहिंसा या दोन मुल्यांचा गांधीजींनी सातत्याने पूरस्कार केला. भित्रा माणूस कधीही सत्यवादी असू शकत नाही. निर्भय बनण्यासाठी सत्यनिष्ठ बनले पाहीजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणून **आचार्य विनोबा भावे यांच्या मते, भगवान बुध्दानंतर**

**सत्य, अहिंसेचा मोठा पुजारी गांधीजीच होते. पंडित नेहरू त्यांच्याविषयी लिहितात – गांधीजींच्या इतका सत्यनिष्ठा पूरूष मला तरी माहिती नाही.** राजकारणी मनुष्यात इतकी सत्यनिष्ठा असणे म्हणजे धोक्याचा सदगुण होय. कारण असा पूरूष स्वत:चे मत बोलून दाखवितो आणि मनातील फेरबदल, घडामोडी तो लोकांसमोर इतक्या उघडया करून ठेवतो की त्यांनी पाहावे. अन्यायाला प्रतिकार अहिंसेने करावे हे केंव्हाही श्रेष्ठ असे गांधीजी मानत असत. परंतु भितीमुळे अन्याय सहन करण्यापेक्षा हिंसेने उत्त्र दिले तरी योग्य ठरेल अशी त्यांची भूमिका होती. **भिती व हिंसा** असे दोनच पर्याय उपलब्ध असतील तर मी हिंसेच्या बाजून असेल, असे गांधीजी म्हणत असत. त्यांना बलवानाची अहिंसा अभिप्रेत होती. गांधीजींचा साधनसूचितेवर भर होता आणि म्हणूनच स्वातंत्र्यलढयामध्ये अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत असताना हिंसेचे गालबोट लागू नये असा त्यांचा कटाक्ष होता. म्हणून एक विराट मानसिक क्रांती घडवून आणली. **सत्याचे प्रयोग** या आत्मकथेत सत्याग्रहाचा मूळ उद्देश हृदय परिवर्तन आहे. नि:शस्त्र प्रतिकार हे असहाय्य् लोकांचे साधन आहे. नि:शस्त्र प्रतिकारापेक्षा सत्याग्रहाचा लढा वेगळा आहे. सत्याग्रहामध्ये नैतिकता हा गूण असणे आवश्यक आहे. सत्याग्रह हा संपापेक्षाही प्रभावी मार्ग आहे असे मत गांधीजींचे होते. सत्याग्रहाच्या मार्गामुळे सत्याग्रह करणा-यांचे मनोधैर्य वाढते. परंतू त्याच प्रमाणात अन्याय करणा-यांचे मात्र खचत जाते. अशी त्यांची धारणा होती. नैतिकतेच्या अधिष्ठानामुळे सत्याग्रहाला सामाजिक प्रतिष्ठा लाभते. अन्याय करणा-यांना त्यामूळे समाजाची सहानुभूती मिळू शकत नाही. सत्याग्रह हा आत्मबलावर आधारित असल्याने तो उदात्त आणि श्रेष्ठ ध्येयाकडे जाणारा एक मार्ग आहे असे गांधींजी मानत असत. म्हणून त्यांनी बिहार प्रांतातील चंपारण जिल्हयात गो-या लोकांनी निळीच्या मळयातून काम करणारे हिंदी मजूरांच्या शोषणाविरूध्द सन 1917 मध्ये सत्याग्रह केला. अहमदाबादमधील कापड गिरणी कामगारांच्या न्याय मागणीसाठी सत्याग्रह करून 35% वेतनवाढीची मागणी मंजूर करून घेतली. गुजरातमधील खेडा जिल्हयातील दूष्काळी स्थितीत शेतसारा माफीसाठी सत्याग्रह करून शेतक-यांना शेतसारा माफी मिळवून दिली.

**<u>गांधीजींचे अहिंसेविषयक विचार</u> :-**

मानवाची उन्नती करणा-या किंवा अंतिम सत्याचा मार्ग दर्शविणा-या तत्वज्ञानाचाच गांधीजींनी पूरस्कार केला होता आणि म्हणूनच त्यांना अभिप्रेत असलेला धर्म हा **मानवता धर्म** होता असे म्हणता येईल. कोणत्याही प्राण्याला विचार, उच्चार आणि आचार या तिन्ही दृष्टीने न दूखावणे म्हणजे खरी अहिंसा होय. अहिंसा ही केवळ स्वप्रवत भावना नाही तर मनुष्यांच्या अंत:करणात आणि नैतिक प्रवृत्तीत असलेला तो एक कार्यप्रवण गुण आहे. त्या गुणाने उत्साहशुन्य व्यक्तीच्या ठिकाणी सुध्दा उदात्त ध्येयाची स्फुर्ती होते अशी धारणा गांधीजींची होती. जो माणूस सत्याचा उपासक असतो तो नेहमीच अहिंसेवर मन:पुर्वक प्रेम करणारा असतो. हिंसेचे साम्राज्य पसरलेले असताना ज्या ऋषीमुनींनी अहिंसा या तत्वांचा शोध लावता तो नक्कीच न्यूटनपेक्षा थोर शास्त्रज्ञ असल्याचे गांधीजी म्हणतात. कारण शस्त्रांच्या मर्यादा ओळखून शस्त्रांपेक्षाही प्रभावी आणि निर्धोक अशा अहिंसेचा शोध त्यांनी लावला. शरीरानेच नव्हे तर मनानेही कोणाला इजा न करणे, हाच गांधीप्रणित अहिंसेचा खरा अर्थ होय. अन्याय किंवा द्वेष करणा-या विरूधद कोणताही द्वेषमूलक प्रतिकार केला जाणार नाही हेच अहिंसेत अपेक्षित आहे. या अर्थाने अहिंसा म्हणजे पूर्ण निरागसता होय.

गांधीजींच्या मते अहिंसा मर्यादित, तात्पूरती किंवा कालसापेक्ष असूच शकत नाही. ती सार्वत्रिक, सर्वकाळ व चिरंतन अशीच असते. म्हणून स्वराज्य संपादण्यासाठी आपण अहिंसक लढयाचा कार्यक्रम आखला पाहिजे. कारण आपण मिळविलेले स्वराज्य हिंसाबळावर प्राप्त केलेले असेल तर त्याला स्वराज्य कसे म्हणता येईल? परकीय केवळ शस्त्रबळानेच वश होतात हे जेवढे खरे आहे तेवढेच ते प्रेमबळानेही वश होतील. हे नि:संशय स्वराज्य प्राप्तीसाठीचा अहिंसेशिवाय दूसरा विकल्प आहे असा विचार जरी आपल्या मनात आला तर अहिंसेचा मार्ग प्रशस्त होण्याऐवजी तो मार्गच अप्रस्तूत ठरेल. चांगल्या जोपासलेल्या झाडावरून फळ जेवढया स्वाभाविकपणे खाली पडते. तेवढीच आपली अहिंसाही स्वाभाविक असली पाहीजे.

**अहिंसा तत्वे :-**

1). जमीनदारी पध्दती ही अहिंसात्मक मार्गाने नष्ट झाली पाहिजे.

2). अहिंसा शिकवून येत नाही तर ती आचरणाने येते.

3). अहिंसा म्हणजे आत्मविश्वास व केवळ परमेश्वरावर विश्वास होय व ती बाळगण्याने आपल्या अंगी नम्रता असणे जरूरी आहे.

4). अहिंसा ही बलिष्ठांचे आणि धैर्यमेरूंचे हत्यार आहे.

5). अहिंसा ही शब्दांनी शिकवता येणे शक्य नाही, मनापासून केलेल्या प्रार्थनेनेच अंत:स्थ परमेश्वराने दिलेले उत्त्र म्हणजे अहिंसा होय.

6). अहिंसा ही अमोघ शक्ती व्हावयाची असेल तर तिचा उगम मनात झाला पाहिजे. जो मनूष्य् मृत्यूला भितो व ज्यांच्यात प्रतिकाराची शक्ती नाही अशाला अहिंसा शिकवता येत नाही. अहिंसा ही एक प्रबळ शक्ती आहे. ती शक्ती माणसाला माणूस बनवते व माणसे एकमेकांची शोषक न होता पोषक बनतात.

**अहिंसचे प्रकार :-**

1). विधायक अहिंसा – प्राणीमात्रांच्या कल्याणसाठी नेकदिलाने प्रयत्न करणे म्हणजे अहिंसा होय. एखादया व्यक्तीच्या कार्यात व्यत्यय न आणणे म्हणजे विधायक अहिंसा होय. सर्वजण प्रेममय बनविणे हाच विधायक अहिंसेच आशय होय. अहिंसा ही सत्याची पूर्व अट आहे.

2). निषेधात्मक अहिंसा – जीवनातल्या निरामय आनंदासाठी क्रोध, द्वेषमूलक विचार, तिरस्कार, घृणा, इत्यादींचा त्याग करणे, वाईटांचा सर्वार्थाने निषेध व चांगूलपणाचा सर्वस्वी स्वीकार करणे म्हणजेच निषेधात्मक अहिंसा होय.

3). निरपेक्ष अहिंसा – या अहिंसेमध्ये संपुर्ण शाकाहारी असावे व अहंभाव त्याग हे अपेक्षित असते. सर्वसामान्यांनाही साध्य होईलच असे नाही. तूमचा अहंभाव प्रगट झाला की जणू हिंसा घडली म्हणून निरपेक्ष हिंसा ही एक उच्चतर मनोवस्था असल्याचे गांधीजी म्हणतात.

4). नैतिक अहिंसा – अ). वीरपूरूषाची अहिंसा – एखादी व्यक्ती सामर्थ्यवान असूनही अहिंसेचा पूजारी असते. दुर्बलतेतून नव्हे तर सबलतेतून ज्या अहिंसेचा पूजारी असतो. तोच अहिंसेचा अविष्कार होत असतो. तीच वीर पूरूषांची अहिंसा होय. ब). दुर्बलांची अहिंसा – ही सोयीसाठी व स्वार्थापोटी स्विकारलेली अहिंसा असते. कारण अशी व्यक्ती हिंसेला विरोध करत असते. ती आत्मबळाची प्रेरणा म्हणून नव्हे तर स्वत:च्या भित्रेपणामुळे. या अर्थानेही कामचलाऊ अहिंसाच म्हणावी लागेल. अहिंसा हे दुबळयांचे भूषण नसून सामर्थ्यवानाचे भूषण आहे. अहिंसा दूबळेपणातून निपजली असेल तर अहिंसेचा सत्यार्थ्यच त्याला उमजला नाही असे म्हणावे लागले. कारण अहिंसा ही शौर्याची परमसीमा असते.

सत्य ज्याप्रमाणे लोकांच्या पसंती अथवा नापसंतीवर अवलंबून नसते तर ते स्वत:ला सिध्दच करावे लागते. तद्वताच अहिंसा हे मानवी जीवनातील स्वंयसिध्द मूल्य आहे. सविनय प्रतिकारापेक्षाही सत्याग्रह हीच संज्ञा गांधीजींना अधिक उपयुक्त वाटते. सत्याग्रही हा पुर्णांशाने अहिंसक व निर्भय असतो, जे शक्ती आणि सक्तीच्या जोरावर मिळविले जाते ते केवळ शक्ती आणि सक्तीच्या आधारावरच राखले जाऊ शकते. त्यामुळे गांधीजींनी सत्याग्रह हा अधिक शाश्वत आणि चिरायू असा मार्ग आहे असे म्हणतात. सत्य आणि अहिंसेच्या मिलनातून निर्माण झालेले ते अत्युच्च सामर्थ्य होय. सत्य व अहिंसेचे विचार त्यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातून मांडलेले आहेत. 1931 मध्ये भारतात आपल्या नेतृत्वाखाली असहकाराची दैदिप्यमान चळवळ उभी करून अन्याय-भ्रष्ट शासनाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य नाकारणे असा होतो. सविनय कायदेभंगाचा अर्थ शांततापूर्व उठाव असा होता. राष्ट्रीय आंदोलनात 1930 साली गांधीजींनी याची सूरूवात केली व 1942 मध्ये **भारत छोडो** आंदोलनात या चळवळीने परमोच्च बिंदू गाठला. हिजरत(देशत्याग) हिजरत या ऊर्दु शब्दाचा अर्थ स्वत:च्या इच्छेने देशत्याग करणे असाच आहे. अहिंसेच्या मार्गाचे अपयश देशत्यागाचा म्हणजे हिजरतचा पर्याय सत्याग्रही पूढे शिल्लक राहतो. उपोषण किंवा उपवास म्हणजे धार्मिक व वैयक्तिक कर्म होय. उपवास हे आत्मबलात वाढ करण्यासाठी टॉनिकचे कार्य करते. इतरांना कष्ट देवून ह्रदयपरिवर्तन होत नसते तर स्वकष्टाने इतरांच्या ह्रदयपरिवर्तनाचा अनोखा मार्ग गांधीजी सांगतात. आपले होणारे शोषण थांबविण्यासाठी गांधी हरताळचा मार्ग सांगतात. पण हा हरताळ अहिंसेच्या मार्गाने असला पाहिजे. हरताळ म्हणजे कामगारांनी काम बंद करणे होय.

**निष्कर्ष :-**

1). महात्मा गांधीजींनी मानवी जीवनाचा दृष्टीकोन सांगितला आहे. त्याप्रमाणे सत्य व अहिंसात्मक कार्यामूळे मानवी जीवनाची शैली सोपी व सूलभ होण्यास मदत होते. महात्मा गांधीजींच्या विचारांची गरज आज समाजाला आहे.

2). सत्य, अहिंसा, अपरिग्रह, विश्वस्थ संकल्पना, साधनसुचिता इत्यादी विचारांमूळे समाजामध्ये परिवर्तन होण्यास मदत होते. हे महात्मा गांधीजींनी दिलेल्या तत्वज्ञानामूळे स्पष्ट होते.

3). अहिंसात्मक व सत्याच्या मार्गाने चळवळी, सत्याग्रहाच्या माध्यमातून शासनाकडे मागणी केल्यास कोणतीही हिंसात्मक घटना न होता त्या मान्य करून घेता येतील. या विचारांची आज समाजामध्ये गरज आहे.

4). मानवाने सत्य व अहिंसेने वागल्यास त्याला आत्मबळ व आत्मचैतन्य मिळते हे विचार महात्मा गांधीजींनी आपणांस दिलेले आहेत.

**संदर्भ :-**

1). आधूनिक भारताचा इतिहास – डॉ. प्र. नं. देशपांडे
2). भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास – डॉ. एस. एस. गाठाळ
3). आधूनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ. एस. एस. गाठाळ
4). स्वातंत्र्यपूर्वकालीन राजकीय विचारप्रवाह
5). महात्मा गांधीजींची विचारसृष्टी – यशंवत सूमंत
6). गांधी, विनोबा आणि जयप्रकाश – मिलिंद बोकिल
7). गांधीजी होते म्हणून – बाळ पोतदार